म. ग्रं सं. ठाणें.
विषय इतिहास
सं. क्र. 336



REFBK-0000212

सन १९०४

~~१९१६~~


इतिहास - ३३८


महाराष्ट्राचा इतिहास -

चिपळूणकर ल० कृ०


कि० २।। रु० सन - १९०४












REFBK-0000212









REFBK-0000212

स्थळप्रत
२१२

श्री.

महाराष्ट्र इतिहास.

संकेत.

श्रीमत्समर्थसज्जन—,
हृन्मेरुशिरःप्रतापगडराचेल्या ।
नीति रामदासशिवपर्दि,
स्वधर्मभूरति महारथीं खचित्या ॥ १ ॥

महाराष्ट्राचा इतिहास अजून सिद्ध करावयाचा आहे. त्याला साधनीभूत जीं जुनीं राजकीय व धार्मिक व्यवहाराचीं, (त्या त्या बाबतींतील पुढाऱ्यांचीं ते ते व्यवहार त्यांच्या हातून घडत असतांना एकमेकांनीं एकमेकांस लिहिलेलीं) अस्सल पत्रें तीं, सध्या कोठें सुप्रसिद्ध स्वेतिहाससंशोधक रा. रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, मयूरभक्त लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांसारखें पदवीधर, तसेच रा. दत्तात्रय बळवंत पारसनीस ब्रह्मेंद्र स्वामीचें चारित्र लिहिणारे असे कित्येक सद्गृहस्थ अधिकउणें प्रयत्न करीत आहेत तेव्हां, उपलब्ध होऊं लागलीं आहेत. त्या सर्व उपलब्ध व उपलभ्य साधनांचें जेव्हां प्रकाशन होईल तेव्हां महाराष्ट्राचा—आपल्या प्रिय देशाचा व पूज्य पूर्वजांचा-खरा खरा इतिहास—" धर्मार्थकाममोक्षाणामुपदेशसमन्वितं । पूर्ववृत्तं कथायुक्तमितिहासं प्रचक्षते ॥ १ ॥"—ह्या आपणांकडील अत्युदात्त व्याख्येशीं जुळणारा असा कोणा तरी अर्थात् स्वभूमि, स्वभाषा, स्वजन आणि स्वधर्म यांस वाहिलेल्या स्वजनोत्कर्षेच्छू महापुरुषाकडून लिहिला जाणें शक्य होणार आहे अशी आमची दृढ समजूत आहे. तिला अनुसरूनच सद्यःस्थितींत आह्मी महाराष्ट्र इतिहासाची साधनें जशीं जशीं तीं आमच्या हातीं येतील तशीं तशीं छापून प्रसिद्ध करण्याचें आपलें कर्तव्य समजून करीत आहों. ही साधनें अश्रांत परिश्रमानें कधीं उकिरड्यांतून तर कधीं उकिरडेबाज

(पंत प्रधान) यांस'; दुसरा सरकारी, 'नाना (फडणीसास) स;' आणि तिसरा खासगी, 'गोविंदराव भगवंत यास'. हा तिन्ही मुखांचा पत्रव्यवहार एकाच खडर्याच्या लढाईसंबंधीं प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष चालणाऱ्या कारस्थानांचा द्योतक आहे. त्यामुळें एकाच मित्तीचीं त्याच त्याच बाबतीचीं पत्रें गोविंदराव कृष्ण यांचीं माधवराव नारायण पंतप्रधान, नाना फडणवीस आणि गोविंदराव भगवंत या तिघांस गेलेलीं पाहावयास सांपडून ह्या त्रिवर्गांचीं परस्पर नातीं, यांचीं व्यक्तिनिष्ठ व अन्यसापेक्ष धोरणें, त्याचप्रमाणें ह्यावेळीं नुकतीच अस्तित्वांत येऊं पाहत असणारी इंग्रजी सत्ता ह्मणजे तराजूनें तरवारीच्या साहाय्यानें मांडलेला बुद्धिबलाचा डाव आपणांस कसा काय फळेल किंवा नडेल ह्याबद्दलचें ह्या मराठी राज्यकार्यधुरंधरांचे संशय इत्यादिकांचें वाचकांस चांगलेंच दर्शन घडेल. त्याचप्रमाणें मराठे सरदारांत ह्यावेळीं परस्परांविषयीं कितपत स्नेहबुद्धि वसत होती, त्यांचें आपल्या स्वामीसंबंधीं कितपत प्रेम होतें आणि ह्या प्रसंगीं ह्मणजे खडर्याच्या लढाईंत त्यांना एके ठिकाणीं आणण्याचें काम कोणा राज्यकार्यधुरंधरानें आपल्या चातुर्यानें साधलें हें पाहणेंही मोठें कौतुकास्पद असून तितकेंच बोधप्रदही आहे. त्याविषयीं आह्मी आपले ग्रह हा पत्रव्यवहार बराचसा छापून झाल्यावर निश्चयात्मक असे लोकांपुढें स्वतंत्र प्रस्तावनारूपानें मांडणारच आहों. तेव्हां सध्यां अधिक कांहीं लिहित नाहीं. मात्र हा पत्रव्यवहार अव्याहत छापून निवरण्याचें काम फार खर्चाचें व श्रमाचें आहे. पैकीं श्रम आमच्याजवळ आहेत. परंतु द्रव्य आमच्या महाराष्ट्र बांधवांनींच सवडींत सवड करून पुरविलें पाहिजे. वार्षिक खर्च केवळ छापण्याचा निर्वाळा ह्मणजे हें काम पडूं न देण्याचें आह्मीं आनंदानें अभिवचन देतों. कोणी उदार आत्म्यानें जर दहा, वीस, पंचवीस, पन्नास असे रुपये बुडींत खर्चास ह्मणून दिले तर त्यांचा आह्मी मोठ्या आदरानें स्वीकार करूं; व प्रत्येक तीन रुपयास एक प्रमाणें त्याची इच्छा असेल तर मासि-

पुस्तकाच्या प्रती त्याला पाठवूं. अशा आश्रयदात्यांच्या उदारपणानें ऐतिहासिक पुरुषांचे हस्तलेखही प्रकाशलेखनद्वारा आम्ही वाचकांस देऊं. आमच्याजवळ श्रीशिवाजी, संभाजी, शाहू, नानाफडणवीस, बापू गोखले, परशुरामभाऊ पटवर्धन, महादजी, मल्हारबा इत्यादि अनेक जवळ जवळ दीडदोनशें निरनिराळ्या ऐतिहासिक पुरुषांचे हस्तलेख आहेत.

असो. काव्येतिहाससंग्रहाच्या मार्गे जवळ जवळ वीस वर्षांनीं हा स्वेतिहाससाधनप्रकाशनाचा उद्योग होत आहे. काव्येतिहाससंग्रहानेंच प्रथम आमचा इतिहास विदेशियांनीं लिहिलेल्या स्वरूपांत सत्यापासून किती दूर आहे याची थोडीशी कल्पना करून दिली. त्यावर आजपर्यंत मूळ कागदपत्रांचें यथाकालप्राप्तसाधन घेऊन कित्येकांनीं नाना फडणवीस, महादजी सिंदे, मल्हारराव होळकर अशांचीं चरित्रें लिहिलीं आहेत. त्या चरित्रलेखांनींही आमचा इतिहास अजून केवळ किती अंधुक आणि अपुरा आहे हें अधिक स्पष्टपणें प्रत्ययास आणलें. सारांश, स्वेतिहासाचीं साधनें त्यांच्या मूळ स्वरुपांत उजेडांत येण्याची अवश्यकता मराठी वाचकांपैकीं प्रत्येक प्रौढ व विचारी गृहस्थाच्या अंतःकरणांत आतां चांगलीच बिंबली आहे. तेव्हां काव्येतिहाससंग्रहाप्रमाणें सध्याच्या वाढत्या प्रमाणावर असणाऱ्या आमच्या वाचनाभिरुचींत ग्राहकांच्या अभावामुळें हा आमचा प्रयत्न अर्धवट राहण्याची पाळी न येईल अशी बरीच उमेद आहे. ती ईश्वराच्या प्रेरणेनें महाराष्ट्र वाचक सफल करोत हेंच त्या दयाघनाजवळ मागणें आहे.

संपादकीय कर्तव्यास मुख्यतः रा. रा. जगन्नाथ रघुनाथ घारपुरे, वामन रामचंद्र जोशी, आणि नारायण कृष्ण गद्रे, ह्या तिघांनींच जरी बांधून घेतलें आहे तरी रा. रा. पद्मनाभ भास्कर शिंगणे बी. ए. एल्. एल्. बी. आणि कृष्णलाल मोहनलाल जव्हेरी एम् ए. एल्. एल्. बी. ह्या गृहस्थांचें ह्या पहिल्या अंकापासूनच त्रिवर्गसंपादकांस पूर्ण साहाय्य आहे. विशेषतः ह्या

अंकांतील व पुढेंही मधून मधून येणाऱ्या फारसी पत्रांचें लिप्यंतर आणि मराठी भाषानुवाद करण्याचे कामीं रा. रा. कृष्णलाल मोहनलाल जव्हेरी एम्. ए. एल्. एल. बी. ह्या गृहस्थांचें जर संपादकांस साहाय्य मिळालें नसतें तर फारसी भाग सध्यां तरी तसाच ठेऊन पुढें जावें लागतें. कारण जशी सध्याच्या मराठी जाणणारांस जुनी पत्रव्यवहाराची भाषा अगदीं अपरिचितत्वामुळें दुर्बोध होते त्याचप्रमाणें जुनी फारसी पत्रेंही दुसरी भाषा फारसी घेऊन बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्यासही फारच दुर्बोध होते असा आमच्याच मित्रमंडळींतील कांहीं फारशी पदवीधरांना आह्मीं तीं पत्रें दाखविलीं तेव्हां आह्मांस अनुभव आला. सारांश रा. रा. जव्हेरी यांचें साहाय्य फारच मोलाचें झालें आहे, आणि तें त्यांनीं केवळ निरपेक्षबुद्धीनें व अत्यंत उत्सुकतेनें केलें आणि पुढेंही ते तसेंच वेळोवेळीं करणार आहेत ह्याबद्दल त्यांचे संपादकांवर अति उपकार होत आहेत. ह्या शिवायही संपादकांस नामदार दाजी आबाजी खरे बी. ए. एल् एल्. बी. रा. रा. सदाशिव रामचंद्र बखले बी. ए. एल. एल्. बी. इत्यादि बरेच विद्याव्यासंगी गृहस्थ कोणत्याही प्रसंगीं साहाय्य करण्यास उत्सुक आहेत ह्यामुळें संपादकांस उत्तेजन येत आहे. सारांश महाराष्ट्र इतिहास मासिक पुस्तकासंबंधीं संपादकीय कर्तव्य शक्य तितकें उत्तम होण्याची व्यवस्था कशी आहे हें वाचकांस आतां जास्त स्पष्ट करून सांगण्याची आवश्यकता नाहीं.

महाराष्ट्र इतिहासाच्या प्रत्येक अंकांत ४८ पानें पत्रें इत्यादिकांस दिलीं जातील; व उरलेल्या आठ पानांत मराठी पुस्तकांची पोंच व अभिप्राय. विशेषतः ऐतिहासिक पुस्तकांचें साधार व सोपपत्तिक परीक्षण करण्याचें योजिलें आहे. प्रसंगविशेषीं आपल्या इतिहासाचें विवेचन करणाऱ्या आंग्लादि परभाषेंतीलही पुस्तकांची चांचणी घेऊन त्यांची वाचकांस ओळख

करून द्यावयाचें कामही यथावकाश करावें असें मनांत आहे. आश्रय चांगला मिळाल्यास ऐतिहासिक स्थलांचेंही सचित्र वर्णन करण्यास ठीक पडेल.

महाराष्ट्र बांधवांस विनंति.

आह्मांजवळ जरी सध्या सुरू केलेलें ४८ पृष्ठांचें मासिक पुस्तक दहा पंधरा वर्षें चालेल इतके कागदपत्र आहेत तथापि महाराष्ट्रांतील अनेक इतिहासप्रसिद्ध पुरुषांच्या वंशजांपाशीं व आप्तेष्टांच्या घरीं महाराष्ट्राच्या इतिहासाची पुष्कळ सामग्री इतस्ततः माळ्यावर किंवा तळघरांत फुकट रद्दी ह्मणून पडलेली असते; असा आमचा अनुभव आहे. तर तसल्या जुन्या अव्याहत परंपरेच्या घरंदाजांनीं आपलीं तळघरें, अंबारें आणि माळे वगैरे शोधून किंवा कित्येकांच्या घरीं पिढ्यानुपिढ्या बंद असणाऱ्या पेट्या शोधून महाराष्ट्राच्या इतिहासास उपयोगी पडणारे कागदपत्र कृपा करून आह्मांकडे पाठवावे. आह्मी अशा गृहस्थांस त्यांचे मूळ कागद नकला करून घेऊन परत पाठवूं आणि छापिल्यावर त्यांच्या दोन दोन प्रतीही त्यांस पाठवूं. आमची ही विनंति फुकट जाणार नाहीं आणि महाराष्ट्र इतिहासाच्या सांखळीचे मधलेच चुकलेले दुवे लवकरच जागच्या जागीं येऊन महाराष्ट्राचा सुसंगत इतिहास दहावारा वर्षांच्या आंत लिहितां येणें शक्य होईल अशी फार उमेद आहे. तर लोकांनीं प्रयत्नपुरस्सर आह्मांस चहूंकडून कचीं साधनें ह्मणजे कागदपत्रें पुरवावींत इतकेंच त्यांजपुढें पदर पसरून आमचें मागणें आहे.

भित्ति वैशाख शुद्ध १ शके १८२६.

७८
सन १९०४

संपादक.

म.इ. १७०

श्री.

दुसऱ्या बाजीच्या राजवटीच्या आरंभाची कांहीं विश्वसनीय टिपणें.

शके १७१८ नलनाम संवत्सरे सुरुसन सबातैन मया, व आलफ, सन १२०६, संवत १८९३, राजशक १२३, इसवी १७९६ व १७९७.

१ बाळोबा पागनीस निसबत शिंदे यांणीं विचार केला कीं नाना निघोन गेले. बाजीरावसाहेब यांचा इतबार नाहीं व हे राज्याचे उपयोगीही नाहीं व नान बाहेर असतां आपण बंदोबस्त करूं लटलें तरी आपले विचारांत भोसले, होळकर वगैरे सरदार व मुत्सदी येणार नाहीं. हें प्रकर्ण सारें असेंच ठेऊन हिंदुस्थानांत जावें तरी नाना सरदारी बुडवीतील; तेव्हां कोणीतरी श्रीमंतांचे दवलतींतील पुढें करून त्याचे माथा कारभार ठेऊन आपण कांहीं जहागीर व खर्चास घेऊन येश मिळवावें अशी तजवीज करूं लागले. तेव्हां बहिरोपंत मेहंदळे व राघोपंत थत्ते यांचे मार्फतीनें परशुरामभाऊ यांशीं बोलणें लाविलें. तेव्हां परशरामभाऊ यांनीं सांगितलें कीं बाजीरावसाहेब कोणाचे विचारांत चालतील न चालतील ही तुमची खातरजमा झालीच आहे. याजकरितां आह्मी या कामांत येत नाहीं व आह्मीं सरदार; कारभार आमच्यानें होणार नाहीं. नाना बाहेर आहेत त्यांस तुमचा भरवसा नाहीं, व सर्वांचें लक्ष माधवरावसाहेब यांचे वंशाकडे व नानाकडे आहे. तेव्हां कोणी अनुकूल होणार नाहीं. याजकरितां बाजीरावसाहेब यांस अटकाव करून चिमणाजी आप्पास, माधवरावसाहेब यांस दत्तक दिल्हे तरी सर्वांचें एक लक्ष होईल असें परशराभाऊ यांचे बोलणें नानाचे रुकारानें पडलें. त्यावरून बाळोबा पागनीस यांणीं विचार केला कीं उभयतांस त्याचे हवालीं केलें तरी आपले हातीं कांहीं राहात नाहीं; याजकरितां बाजीराव साहेब यांस अटकाव करून आपले जवळ ठेवावें आणि चिमाजीअप्पा यांस परशुरा-

मभाऊ यांचे हवालीं करावें, असें ठरवून पागनीस यांणीं परशरामभाऊ यांस सांगितलें कीं बाजीराव साहेब यांस आह्मीं लष्करांत अटकावून ठेवितों आणि चिमाजी अप्पा यांस तुमचे स्वाधीन करितों; तुह्मी येश्वदाबाईचे मांडीवर देऊन दत्तविधान करून चिमणाजी माधव करावें ह्मणजे सर्वांचे मनोदयानरूप होऊन सारे अनुकूळ होतील; तेव्हां ही गोष्ट परशरामभाऊ यांणीं कबूल केली आणि बाहिरोपंत मेहंदळे यांस साताऱ्यास नानाकडे पाठविले आणि सांगितलें कीं अशी मसलत होत आहे, आपण. यास रुकार देऊन वस्त्रें देवावीं आणि आपण मेणवलीस यावें; बाळोबा तात्या व भाऊ यांची आपली सपनाई होऊन आपली खातरजमा जाली ह्मणजे पुण्यास यावें. असें बोलणें झालें त्यावरून मेहंदळे याजवर नानाची मर्जी रुष्ट जाली. नानानीं विचार केला कीं शिंदे व परशरामभाऊ एक जाले व माधवरावसाहेब यांस दत्तक होणार तेव्हां साऱ्यांचें लक्ष तिकडे लागेल. ये वेळेस रुकार न दिल्हा तरी आपले माथां अपेश येईल असें समजून वस्त्रें द्यावयास साताऱ्यास बाबूराव आपटे होते त्यांस सांगून आपण वाईस येऊन राहिले. बाजीराव साहेब यांस हातीं न घेतां दत्तविधान केलें हें भाऊचें नानाचें वाकडें येण्याचें कारण.

१ वैशाख शु॥ १३ सोमवार छ. १ जिल्कादी बाजीरावसाहेब यांस शिंदे यांणीं फौजेंत अटकाव करून चिमणाजी अप्पा यांस परशरामभाऊचें हवालीं केलें. त्याणीं जबरदस्तीनें पालखित घालोन पुण्यास आणिलें आणि त्रिंबकराव अमृतेश्वर आपटे यांस साताऱ्यास पाठवून शाहूराजे याजपासून वस्त्रें व शिक्केकटार आणिलीं आणि वैशाखवद्य ४ बुधवार छ. १७ जिल्कादी पुण्यांतील वाड्यांत दवलतराव शिंदे येऊन चिमणाजी अपा यांचें दत्तविधान जालें. दत्तविधानाचा शास्त्रार्थ महादेव दीक्षित आपटे व यज्ञेश्वर शास्त्री द्रविड यांणीं सांगितला. दत्तविधान जाल्यावर दरबार जाला. सारे सरदार, मुत्सद्दी, वकील जमा होऊन चिमणाजी माधवराव यांस पेशवाईची वस्त्रें दिल्हीं. चुलते असतां पुतणे यांस दत्तक दिल्हें हें चांगलें जालें नाहीं असें लोक बोलत

होते. परशुरामभाऊ यांणीं च्यार लक्षांची जहागीर शिंदे यांस द्यावयाची ठरविली.

चिमाजी अप्पा यांस वस्त्रें जाल्यावर नानास; पुण्यास येण्याविशीं बाळोबा पागनीस यांचा रुकार घेऊन परशरामभाऊ यांणीं सांगून पाठविलें. त्यावरून नानांचें बोलणें पडलें कीं भाऊंनीं आपले चिरंजिवास येथें पाठवावें. त्याजवळ बोलणें होऊन ठरेल तसें करावयास येईल ह्मणोन सांगितलें; त्याजवरून परशरामभाऊ यांणीं आपले चिरंजीव हरी परशराम यास नानाकडे रवाना केलें. त्यांणीं सडे जावे. ते पांच हाजार फौजेनिशी शिरवळास गेले; त्याजवरून नानाचे मनांत फौजेसुद्धां येतात तेव्हां कांहीं दंगा करावयाची मसलत दिसती असा अंदेशा आला, व बाबा फडके यांणींही सांगून पाठविलें कीं आपण करणें तें सावधगिरीनें करावें, व आणखीही लोकांनीं बातमी सांगितली त्याजवरून वैशाख वद्य ३० छ. २८ जिल्कादी मुहूर्त न पहातां तेथून सडे निघोन प्रतापगडास गेले आणि घाटबंद्या करून माहाडास गेले.

१ नाना निघोन गेले ही बातमी येतांच बाळोबा पागनीस यांणीं परशरामभाऊस सांगितलें कीं नानास धरावयास पलटण देतों. तुह्मीं आपलीं फौज पाठवून नानास धरावें; तेव्हां भाऊंनीं सांगितलें. कीं तूर्त असें करावयाचें नाहीं. नाना अनकुळ नच होते तरी मग तसें करूं असें सांगितले, परंतु नानाचे भाऊचे दिवसेंनदिवस वाकडेपणा वाढत चालला त्याजवरून परशरामभाऊ यांणीं नानाचे वाडे व सरंजाम जप्त केलें.

१ शिंदे यास खर्चास ऐवज द्यावयाकरितां परशरामभाऊ यांणीं कर्जपट्टी शेहरांत केली.

१ शिंदे यांचे लस्करची लाही वगैरे मुलकांत होऊन रयतेस उपद्रव फार हाऊं लागला.

१ परशरामभाऊ यांणीं—मोकळें करून खरडग्याचे स्वारीस ऐवज नबाब यांचे सरकारांतून द्यावयाचा ठरला त्यापैकीं येणें राहिला तो द्याव-

याचा ठरविला. मोकळे होऊन गुळ टेंकडीजवळ राहिले. त्याणें आपले जवळ हैद्राबादेहून कांहीं फौज आणविली व कांहीं पुण्यांत नवी ठेविली. त्या फौजेंत हुजरातचे फौजेचे लगतींचीं फौज नारोपंत चक्रदेव यांणीं फार पाठविली.

१ नाना माहाडास गेल्यावर त्यांणीं मसलत केली.

१ रायगड वगैरे किल्ले लक्षांत राखोन किल्ल्यांचा बंदोबस्त केला.

१ रायाजी पाटील यांचे हातून दवलतराव शिंदे यांशीं राजकारण करून पागनीस यांस कैद करावें आणि बाजीरावसाहेब यांस मोकळें करावें, शिंदे यांणीं फौजेसुद्धां हिंदुस्थानांत जावें ह्मणजे दाहा लक्षांची जाहागिर व नगरचा किल्ला द्यावा असें केलें; त्यावरून राज्यकारण जमलें.

१ नबाबाजवळ गोविंदराव काळे यांचे बोलणें केलें कीं नाशारिनमुलुख यास सुचना जाऊन त्याणीं आमचे लक्षाप्रमाणें चालावें, व आमचें राजकारणास अनुकूळ असावें. बाजीरावसाहेब राज्यावर आले ह्मणजे खडर्याचे स्वारीस जो मुलुख घेतला आहे तो परत देऊं व ऐवज येणें ठरला आहे तो सोडून देऊं. असें ठरल्यावरून ते नानाचे राजकारणास अनुकूळ होऊन नाशारिनमुलुख यांस नानाचे लक्षानें चालण्याविशीं सूचना केली; त्याजवरून नाशरीन यांणीं परशरामभाऊ यास द्यावयाकरितां ऐवज परडयास आणिवल होता तो परडयास तसाच ठेविला; दिल्हा नाहीं.

१ बाबा फडके यांजकडे ऐवज पाठऊन हुजरातचे फौजेस खर्चास आंतून देऊन फौज त्याणीं आपले लक्षांत लाऊन घेतली.

१ बाजीरावसाहेब शिद्याचे लस्करांत होते, त्यास ऐवज खर्चास पाठविला. त्यांचे लक्ष आपल्याकडे होतें तें दृढ करून घेतलें. बाजीरावसाहेब यांणीं आपले बंडांत दोन तीनशें लोक जमा केला.

१ मानाजी फाकडे बाजीरावसाहेब यांचेजवळ शिंदे यांचे लष्करांत होते, त्यांस खर्चास पाठविलें. त्यांणीं कांहीं लोक आपले जवळ जमा केले.

१ शिंदे यांणीं पागनीस यांस कैद करावें, व बाबा फडके यांणीं परशरामभाऊ यांस कैद करावें असा संकेत होऊन श्रावण वद्य ८ छ. २२ सफरी शिंद्याची फौज तयार जाली व फडके यांजवळ हुन्नजरातची फौज तयार होऊन आली, इतकि यांत पागनीस सावध होऊन त्यांणीं आपले लष्करचा बंदोबस्त केला व परशरामभाऊ हुशार जाले. त्याजवरून फडके यांची फौज माघारी गेली. नंतर परशरामभाऊ यांणीं फौज व पागेचे सरदार यांस गोडी व जरब देऊन फोडाफोड केली आणि बाबा फडके यांस भाद्रपद वद्य १२ बुधवार छ. २९ रबीलावली कैद करून चाकेण किल्ल्यांत पाठविलें; घराची जप्ती केली; नारोपंत चक्रदेव पळोन गेले; ते मशरीन याचे लष्करांत जाऊन काठीकर, शिलेदार यांचें गटांत राहिले. मालोजी घोरपडे व निळकंठराव परभु, परशरामभाऊ यांचे लक्षांत आले नाहींत सबब त्यांचें घराचे आसपास चौक्या ठेऊन धरावयाची मसलत केली परंतु ते आपले मजबुदीनें राहिले; आणि फौजसुद्धां निवोन बाई प्रांतीं गेले.

१ शिंदे यांचे फौजेंत फितूर जाला. बाजीरावसाहेब यांजवळही लोक जमा जाले, व मानाजी फाकडेही लोक जमा करूं लागले; तेव्हां कोणे वेळेस बाजीरावसाहेब यांस काढून नेतील हा भरंवसा बाळोबा पागनीस यांस पुरेना. याकारितां बाजीराव साहेब यांचे तीन दिवस पाणी बंद करून त्यांचे बांडांत लोक होते ते काढून देऊन बाजीरावसाहेब यांस हिंदुस्थानांत पाठविण्याकारितां रवाना केलें, ते केसो गोविंद यांचे बेलापूर पावेतों गेले.

१ मानाजी फाकडे यांचे भोंवतें पलटण तोफा ठेऊन त्याचे पाणी बंद करून त्यांस काढून दिल्हे, ते बाई देशीं जाऊन फौज जमा करून राहिले. मालोजी घोरपडे व निळकंठराव परभु, अगोदर गेलेच होते. व बज्याबा शिरवळकर यांस माहाडाहून नानानीं बाई प्रांतीं पाठविलें, ते सारे एक होऊन फौज जमा केली, खर्चास देत होते.

१ भोसले यास नानानीं माघारें आणविलें. येणेंप्रमाणें नानानीं माहाडास राहून मसलत केली.

१०

१ नानाचे राजकारण सिद्ध होऊन अश्विन वद्य १२ गुरुवार छ० २९ रबिलाखरी चिमणाजी माधवराव वाड्यांत असतां शिंदे यांणीं बाळोबा पागनीस यांस कैद करून चक्रदेव यांजबरोबर शिंदे, मशरीन मुलुख यांची फौज येऊन, परशरामभाऊ यास जाग्यावर धरावें असा नारोपंत चक्रदेव यांचा बेत होऊन, परशरामभाऊ वैद्य (यास?) नारोपंत चक्रदेव यांणीं चिठ्ठी पाठविली ती जासुदानें चुकून परशरामभाऊ पटवर्धन यांस दिल्ही पाहून ते सावध होऊन अप्पासाहेब यांस बरोबर घेऊन विठ्ठलवाडीकडे गेले, तिकडून जुन्नरास गेले; वाटेस घोडनदीचे काठीं——कुळकर्णी यांचे घरीं अप्पासाहेब यास लाही-पीठ घेतलें. त्या कुळकर्ण्यास शंभर रुपयांची जमीन द्यावयाचा करार केला होता परंतु ती पावली नाहीं. नारोपंत चक्रदेव, परशरामभाऊचे मागें जुन्नरास गेले. तेथें परशरामभाऊ अप्पासाहेबसुद्धां किल्ल्यावर जाऊन राहिला. खालीं नारोपंत चक्रदेव फौजसुद्धां गेले. तर दुसरे रोजीं चक्रदेव याणीं बाण किल्ल्यावर लाविले. ते बाण जेथें घोडी फार होतीं त्यांत पडल्यामुळें बहूत हावालदिल होऊन बोलणें लाऊन अप्पासाहेब यांस चक्रदेव यांचे हवालीं केलें आणि अनंतराव रास्ते यांस जामीन देऊन परशरामभाऊ त्यांचें हवाली जाले. रास्ते यांणीं त्यास भीमातिरीं मांडवगण फुराट्याचे आहे तेथें नेऊन ठेविले, अप्पासाहेब यांस चक्रदेव यांणीं पुण्यालगत भांबवडयास आणून ठेविलें. छ. १७ जमादिलावेल कार्तिक वद्य ४ शुक्रवार, राघोपंत यांस कैद करून किल्ल्यावर ठेविले.

१ अप्पासाहेब व परशरामभाऊ पुण्याहून निघोन गेले. नंतर तेच वेळेस त्रिंबकराव नारायण परचुरे कोथरूडचे बागेंत होते त्याणीं येऊन पुण्याचा बंदोबस्त केला. बहिरोपंत मेंहदळे सापडले त्याची बेहुरमत केली, त्यास व

त्यांचे पुत्र अन्याबा यांस धरून कैद केले व परशरामभाऊ यांजकडील लोकांस धराधर फार केली, कैदेंत ठेविलें, त्यांची घरें लुटून सरकारांत आणिलीं; शहर हावालदील जालें.

१ श्रीमंत बाजीरावसाहेब हिंदुस्थानांत रवाना केले, ते केसो गोविंद यांचे बेलापुरापर्यंत गेले होते, त्यांस शिंद्यानें आपले लष्करांत माघारें आणिलें. येते समई कोरेगांवचे मुक्कामीं बाजीराव साहेब छ, १४ जमादिलावली येऊन तेथून नाना फडणीस यांस चिठ्ठी पाठविली. तिची नक्कल राबिसन साहेब यांचे कागदांत सापडली. त्यांतील मजकूर कीं आमची स्वारी कोरेगावांस आली, तुमचे येणें न जालें त्यांस पुण्यानजीक येऊन राजश्री दवलतराव शिंदे, अलीजा बाहादूर व अजमल उमराव बाहादूर यांसुद्धां भेटीस येणें. दुसरें सरकारचें हिताकारितां तुमचे वचन ज्याशीं गुंतलें असेल तें वचन सरकारचें गुतलें. खातरजमेनें लौकर यावें. आपले विष्याराखेरीज कांहींएक घडावयाचे नाहीं. याप्रमाणें चिठ्ठी पाठविली.

१ अमृतरावसाहेब पुण्यास आणिलें.

१ बाबा फडके चाकणेस होते ते पुण्यास आले.

१ श्रीमंत बाजीरावसाहेब, चिमणाजी अप्पा. अमृतराव साहेब यांच्या भेटी मूंढव्याचे मुक्कामीं जाल्या. कार्तिक वद्य ७ सोमवार छ. २० जमादिलावेल.

१ नाना फडणीस यांशीं शिंदे अनकूळ जाल्यामुळें त्यांचें राजकारण सिद्ध झालें. व बाजीरावसाहेब यांची चिठ्ठी गेल्यावरून नाना फडणीस जलदीनें माहाडाहून निघोन पुण्यालगत यरंडवणे येथें येऊन मुक्कामास आले. बाजीरावसाहेब यांचा भरवसा नाहीं, याजकरितां मशारीनमुलुख यांस दरम्यान घेऊन नवाई यास बाजीरावसाहेब याची चिठ्ठी देविली; त्याचा मसुदा राबीसन साहेब यांजवळचे कागदांत सांपडला. त्यांतील मजकूर कीं बाळाजी जनार्दन फडणीस यांस आम्हाकडून त्यांचे ज्यानास व हुर्मतीस अपकार होईल येविशीं त्यांस संशय; यास्तव मशारनिल्हेची खातरजमा

आह्मीं आपल्याकडून करविली त्याप्रमाणें आपण केली. त्यांस बाळाजी जनार्दन यांजकडून आमचे जातीस व दौलतीस व पंत प्रधानीस व खावंद-गिरीस व तेज्यास सबाह्य अंतर वाकडे होऊं नये. पंत ------आम्हा-जवळ असेल अथवा सोईस न पडल्यास स्नानसंध्येस नेमाप्रमाणें निरोप दिल्हा जाईल. त्यांचे ज्यानास व मालास व हुर्मतीस सबाह्य वाकडे होणार नाहीं व चित्तांत येणार नाहीं. त्याजवरून नानाची खातरजमा होऊन कार-भार त्यांचे विच्यारें होऊं लागला.

१ श्रीमंत बाजीरावसाहेब व चिमाजीअप्पा व नाना फडणीस व रघोजी भोसले व दवलतराव शिंदे व तुकोजी होळकर व मशारीनमुलुख, मानाजी फाकडे व घोरपडे, पाटणकर, निंबाळकर, हुजरांत पागेचे सरदार यांच्या भेटी कार्तिक वद्य १२ स जाल्या.

१ श्रीमंत बाजीराव रघुनाथ यांस पेशवाईची वस्त्रें आणावयास सातारी-यास अबा शालूकर गेले होते. त्यांणीं वस्त्रें व शिकेकटार आणिलीं, तीं मसनदीवर ठेऊन मार्गशिर्ष शु॥ ६ सोमवार छ. ४ जमादीलाखरीं तेरा घटका रात्रीस मुजरे करून घेतलीं. बाजीराव रघुनाथ पंत प्रधान जाले. पुढें फाल्गुन अखेरपर्यंत मजकूर जाले ते.

१ गोदिंदराव गाईकवाड यांस वस्त्रें जाल्याचें पत्र बाजीराव-साहेब यांणीं छ. २५ जमादिलाखरचे पाठविलें. त्यांत छ. ४ जमादिलाखरीस वस्त्रें जालां असें लिहिलें आहे. त्या पत्राची नक्कल तात्या मजमदार यांजवळ आहे त्याजवरून.

१ बाजीरावसाहेब यांची स्त्री, धोंडोपंत मंडलीक यांची कन्या मृत्यु पावली, तिची क्रिया डेऱ्यांत लष्करांत पौषमासीं केली.

१ माघ शु॥ ९ गुरुवारीं छ. १८ साबाजी बाजीराव-साहेब व चिमणाजी अप्पा व अमृतराव व त्यांचे पुत्र विनायकराव व अमृतराव यांची स्त्री अशीं पहाटेस गज-

राचें वेळेस पुण्यांत शनवारचे वाडयांत दाखल जाली. वाडयाभोंवतीं चौकी शिंदे यांजकडील तोफा व पलटणचे लोक होते.

१ बाजीरावसाहेब यांचें लग्न फाल्गुन माशीं जालें. कन्या दाजीबा फडके यांची; नांव राधाबाई ठेविलें.

१ बाळाजी जनार्दन बुधवारचे चावडीजवळचे वाडयांत यरंडवणें येथून राहिले. कारभार त्यांचे विद्यमानें चालला. परशरामभाऊ यांणीं कर्जपट्टी लोकांवर घातली. हातीं तिचा वसूल चालविला. शिंद्यास पैसा द्यावयाचा होता तो त्यांस देत गेले.

९

येणेंप्रमाणें मजकूर जाले.

१ श्रीमंत बाजीराव रघुनाथ प्रधान यांस मार्गशिर्ष शु॥ ६ पेशवाईचीं वस्त्रें होऊन पंत प्रधान झाले, ते समई सरकारची दौलत व मनुष्यें कांहीं होतीं बी॥

१ सरकारचे कारखाने.

१ तोफखाना सखारामपंत पानशे व त्यांचे पुतणे गणपतराव विश्वनाथ पानशे वगैरे.

१ खुद्द सखारामपंत.	१ गणपतराव विश्वनाथ.
१ माधवराव कृष्ण.	१ जयवंतराव
२	२

४

१ याजकडे होता. दारुगोळा तोफाचे गाडेसुद्धां गोलंदाज, खलासी गाडीवान वगैरे कामगार मणसें व रखवालीचे

गाडदी, खर्चास माहाल व गांवगाडग्याचे बैलसुद्धां कारखाना तयार होता.

१ पिलखाना.

१ सरदार भगवंतपंत दर्शनी. १ सरदार अलीमाहात कारभारी रामचंद्रपंत गाडगीळ.

२

एकूण दोन कारखाने मिळोन हत्तीप्रत अजमासें १०० शंभर यांचे चाकरीची माणसें व हत्तीचा सरंमजामसुद्धां तयार.

१ उष्टरखाना नि॥ गणपतराव मोरेश्वर सरंमजामसुद्धां ऊंजफर अजमासें १५०० पंधराशें.

१ फरासखाना नि॥ राघोपंत अंबीकर यांजकडे खडर्याचे स्वारीस डेरे व रावटया वगैरे सरंजाम तयार केला तो, व दलंबादल डेऱ्यासुद्धां सरंजाम कायम.

१ शिलेखाना काम सदाशिवपंत वाकणकर यांजकडे.

१ नारो शिवराम खाजगीवाले कारभारी, गणेशपंत मठगे याजकडे कारखाने.

१ कोठी, २ लकडखाना, ३ इमारत, ४ बागा, ५ पेठा पुण्याच्या, ६ कुरणें, ७ वहींत कोठी, ८ रथखाना, ९ शिकारखाना, १० देवस्थान पर्वती, ११ नळाचा काखाना, १२ दारुखाना.

१२

येणेंप्रमाणें कारखाने होते.

१ थट्टी रामचंद्र नारायण पुसुभा यांजकडे.

म.इ

२ पोते व जामदार खाना शामराव गोविंद पोतनीस यांजकडे.

१ मुत्पाक कोठी, नारो कान्हो ठोसर यांजकडे.

१ जिनसखाना व वैद्यशाळा बाबूराव करमरकर यांजकडे.

१ वाकानिसी विठ्ठलराम वाकनीस यांजकडे.

१ पुस्तकशाळा गोविंदपंत आपटे यांजकडे.

१ न्यायाधिशी व राजाध्यक्षता यज्ञेश्वरशास्त्री द्रविड, अपाशास्त्री यांचे बंधु यांजकडे.

१ यज्ञशाळा राघो सदाशिव शेवडे.

१ सबनिशी गोविंद हरी बर्वे.

१७

येणेंप्रमाणें कारखाने होते.

१ पागा १ हुजरांत घोडीं अजमासें दाहा हजार १०००० यांचे सरदार, यांचीं नांवनिशीं.

१ पागा, हुजूर, हरी इच्छाराम, व लक्ष्मण गंगाधर.

१ पागा हुजूर गोविंदराव सदाशिव.

१ अनंतराव बाबर.

१ सटवाजी मांजरे.

१ अनंतराव सोमवंशी.

१ व्यंकटराव रघुनाथ.

१ बहिरजी मुळे.

१ महिपतराव रघुनाथ; १ जगंनाथ रघुनाथ.

१ बळवंतराव मुंढे; १ भिकाजी जनार्दन; गंगाधर गणेश;

१ बळवंतराव नारायण; १ मिरा माहात; १ मर्दुजा माहात;

१ गणेश बाजीराव; १ अवधूतराव सोमवंशी;, बाजीराव गोविंद; १ जैतुजी बाबर; १ येशवंत सूळ; १ गणेश हरी;

१ रावजी फडर्ते; १ हायबतसिंग कृष्णसिंग; १ राघो गंगाधर; १ माणकाजी भोयटे; १ येशवंतराव देव; १ नारायण भिकाजी; १ मानी पायघुडे; १ हनमंतराव गावडे; १ सुलाजी वरांडे; १ बळवंतराव सुब्राव; १ हायबतराव पलोड;
१ कृष्णाजी नारायण; १ उमाजी वाघ;
१ लक्ष्मणसिंग; १ निळकंठराव जगताप;
१ हैबतराव शंकर; १ पांडुरंग विठ्ठल;
१ रामचंद्र सदाशिव. १ महादजी शिंदे;
१ सावजी निंबाळकर; १ सग्यावा निंबाळकर
१ येशवंतराव ताकपीर; १ भास्कर जगन्नाथ;
१ तुको अनंतराव; १ विश्वासराव चिंतामण;
१ चिमाजी जताप; १ रंगो शामराज;
१ विठ्ठल मल्हार; १ सखोजी सूल;
१ सयाजी मुळे, १ भिवराज यवत,
१ खंडेराव बल्लाण; १ पिराजी शितोळे; १ जावराव भोयटे;
१ मुधाजी भोयटे; १ सुभानराव शिंदे; १ आबाजी अनंतराव; १ विसाजी गणेश; १ गमाजी निबाळकर; १ अमृतराव गावडे; १ मनासिंगराव जगथाप; १ बळवंतराव नागनाथ इदापूरकर; १ पर्वतराव भालपकर; १ विठ्ठलराव निकम;
१ दौलतराव काठे; १ बळवंतराव थोरात.
१ निळकंठराव रामचंद्र, १ बाबुराव अनंत.
१ राघो बापूजी; १ कान्होजी खल्हाटे;
१ गिरजाजी बरगे; १ जगन्नाथ केशव;
१ बळवंतराव नागनाथ लिमगांवकर.
१ रामजी भोयटे; १ दादू माहात; १ धोंडो मल्हार; १ राघोजी पठारे; १ शिवराव कडेकर; १ गोपाळ बापूजी;

१ लक्ष्मण त्रिंबक; १ रंगराव पुरुषोत्तम पानशे; १ रामचंद्र शिवाजी, १ खंडेराव बल्लाळ पुरंधरे; १ चिंतामणराव पांडुरंग; १ माधवराव परशुराम; १ अवधुतराव येशवंत; १ अबाजी कृष्ण शेलुकर; १ अबाजी गणेश बेहेरे. १ परशराम महादेव कुंटे; १ धोंडो बल्लाळ गोखले.

९३

---

१ सरंमजामी फौजेचे सरदार, थोर लहान.

१ निळकंठ माहादेव पुरंधरे व त्रिंबकराव महिपत वगैरे पुरंधरे.
२ नरसिंह खंडेराव विंचुरकर.
३ गोपाळराव त्रिंबक राजे बाहादर.
४ खंडेराव त्रिंबक ऐढेकर.
५ पटवर्धन मंडळी परशराम रामचंद्र व रघुनाथराव निळकंठ व चिंतामणराव पांडुरंग वगैरे.
७ पांडुरंग बाबूराव बारामतीकर,
८ रघुनाथराव बळवंत नायगांवकर.

सिद्धेश्वर महिपत बिनिवाले; कृष्णराव बळवंत ऊर्फ अप्पा बळवंत; अनंत भिकाजी रास्ते; काशिराव गणपत रास्ते; गणपत अनंतराव मेंदळे उर्फ अन्याबा बापू; माधवराव रामचंद्र; गणपतराव विश्वनाथ व सखाराम येशवंत पानशे; त्रिंबकराव अमृतेश्वर पेठणे; परशराम पंडित प्रतिनिधी; पथला निसबत बाळाजी जनार्दन; पथला निसबत हरी बल्लाळ फडके; छत्रसिंग व भाऊसिंग टोके; विठ्ठलराव रामचंद्र व बळवंतराव अप्पाजीराव अबीकर; महिपतराव वगैरे धुमाळ; कृष्णाजी रणदिवे; माहादाजी नाईक निंबाळकर; दवलतराव निंबाळकर हणमंतराव भोसले जितिकर; मल्हारराव सोमवंशी

हासाजी व गिर्जोजी आठोळे; रामराव चितळकर; कृष्णराव साळुखे खंडेराव वगैरे सोमवंशी; हैबतराव सोमवंशी; हेंबतराव ढमढेरे; नारायणराव ढमढेरे; दादजी वगैरे शिताळे अवसरीकर; खंडेराव वगैरे शिताळे कुशेगांवकर; शिताळे नेहावकर; संभाजी व जोत्याजी जाधवराव; जिवाजी आठोले; अनंतराव थोरात; अमसिंग जाधवराव; संभाजी राऊत; कृष्णाजी बाबूराव दाभाडे; रघोजी वगैरे भोसले साखरीकर; माणिकराव वगैरे धायगुडे; रायाजी जाधव; अंनतराव पोवार; हणमंतराव जाधव भुईजकर; सटवाजी व सुलतानजी धायभर; जानोजी व प्रीताजी शेकर; शेख महमद; कृष्णराव भगवंत; भोयटे मंडळी नासिराबादकर; खेत्रोजी भोयटे; सखोजी शिर्के; तुकोजी अनंतराव; बळवंतराव व विठलराव पवार; गोविंदराव व द्वारकोजी पवार; बाळजी व मालजी भोसले; चंद्रराव पवार; राणोजी पवार विश्वासराव शिवराव धिराजी पवार; मल्हारजी पवार; तुकोजी व सदाशिव पवार मानाजी फुकडे;

निसबत सर लष्कर.

खूद्द अप्पाजी मोरे सर लष्कर; हैबतराव आठोळे; मानाजी व येशवंतराव गाढवे; हणमंतराव आठोळे; हणमंतराव गिन्यानजी आठोळे; बनाजी आठोळे; जिवनसिंग लाडू; जैबतराव माहाणवफर; मानाजी बळवंतराव देवकांते; सुभानराव वाघमोरे; जिजाजीराव काडे;

निसबत फत्तेसिंग भोसले; खुद्द जातेसिंग भोसले; अनंतराव शिर्के; माणिकराव चिमणाजी धायगुडे; अमृतराव अरंगर; येशवंतराव पांढरे विठोजी माले; शिदाजी जाधव; तुलजाजी पवार; माधवराव बावने; माळोजी बंडगर; भगवंतराव बंडगर; होनाजी बंडगर; शिंदेराव वगैरे सोळसकर; संताजी शितोळे; अनंतराव मचाले; रघुनाथराव निळकंठ.

माधवराव भापकर; मिरखान टोके; मालोजी घोर्पडे; रुस्तुमराव जाधव शिंदखेडकर; गोविंदराव निळकंठ; हणमंतराव अदमणे; जानोजी ढमढेरे;

गणोजी शिर्के; बोधेमंडळी; रंगराव माहादेव वडेकर; शंकरराव नरसिंह वगैरे लेलेमंडळी; शिदोजी बाबर; रामजी व विठोजी भाळेराव; आवजी कवडे; हैबतराव खताळ; खंडेराव भोसले; गंगाधर शंकर पुरंधरे; बळवंतराव नागनाथ.

११०

१ मोठे सरदार.

१ दवलतराव शिंदे; अलिज्या भाहादूर; २ काशिराव होळकर; ३ रघोजी भोसले नागपुरकर; ४ समशेर बाहादूर; ५ बुंदले.

१ गारदी नेहमीं पुणें मुक्कामीं चाकरीस अजमासें १०००० दाहा हजार यांचे सरदारांचीं नांवनिशीं.

१ मुसामोत्रो व मुसाकुरास मुसाजलले; २ मुसावास; ३ मुसापीत; ४ मुसाजरंज; ५ शामिरखान रोहिले; ६ सय्यद अमद अरब नाना फडणस याजकडील; ७ बळवंतराव काशि; ८ विनायक नारायण परांजपे; ९ राघो विश्वनाथ गोडबोले

९

१ मुत्सदी व कारभारी.

१ नाना फडणीस; २ बाबा फडके; ३ नारोपंत चक्रदेव; ४ गोविंदराव काळे; ५ गोविंदराव पिंगळे; ६ गोविंदराव बाजी; ७ बहिरो रघुनाथ मेहंदळे; ८ अबा शेलूकर; ९ राघोपंत गोडबोले; १० दादा गर्दे; ११ महिपतराव चिटणीस; १२ नारो निळकंठ मजमदार; १३ गोपाळराव मुनशी; १४ चिंतोपंत देशमुख; १५ त्रिंबकराव परचुरे;

१६ अत्या गुरुजी; १७ बापुजी बल्लाळ लेले; १८ भाऊ सरंजामी; १९ गोविंदपंत आपटे; २० विठ्ठलपंत वाकनीस; २१ तिमाराव पारसनिस; २२ पांडुरंगपंत ढमढेरे; २३ बन्याबा शिरोळकर; २४ शिवरामपंत थत्ते; २५ सदाशिव भट दिवाणजी; २६ मोरोपंत गडबोले; २७ गणेशपंत मटांगे निबसत खाजगी; २८ रामचंद्र नारायण तुळशीबागवाले; २९ दादो हरी मराठे; ३० चिमणाजी खंडेराव.

—

३०

---

१ कारकून अजमासें ५००० असामी.

१ निसबत दफ्तर हुजुरचे, २ निसबत खाजगीवाले.

३ निसबत तोफखाना, ४ निसबत पुणें सुभा, ५ निसबत पागा, ६ निसबत हाशम, ७ निसबत गारदी, ८ निसबत शिलेदार, ९ कारकून शिलेदार, १० माहाला निहायचे, ११ सरंजामी माहालचे, १२ किल्ले हायचे.

—

१२

१ हाशमी लोक पुण्याचे बंदोबस्तास चौकी पाहाऱ्यास, त्याचे काम नारायणराव हाशमनिस व विनायक नारायण आगाशे, अजमासे असामी २०००

१ कित्ता लोक.

१ जासूद व बेलदार बाघोपंत अबीकर निसबत फरास खाना याजकडे.

२ खास बारदार गुणे याजकडे.

३ कामाठी व तबेलेदार नारो शिवराम खासगीवाले यांजकडे कारकून गोविंदपंत कामाठी.

४ व प्याद्दे गोविंद हरी सबनिस यांजकडे.

५ खासजिलीब अबाजी बल्लाळ ठोसर याजकडे.
६ शहरचे रखवालीस शिपाई व बरेड काम त्रिंबकराव नारायण परचुरे यांजकडे.

—

६

शके १७२१ सिद्धार्थी नाम संवत्सरे, सुरु सन मया तैन व अलफ सन १२०९ संवत १८९६, राजशक १२६ इसवी सन १७९९ व १८००.

१ चैत्र व॥ २ रविवारीं शंकरराव रघुनाथ सचीव भोरास मृत्यु पावले. मरतेसमई दत्तक पुत्र घेतले त्याचें नांव चिमणाजी शंकर ठेविलें. येविषयीं शंकरराव रघुनाथ सचीव यांचें पत्र नानास आलें आहे त्याजवरून. छ. १५ जिल्काद.

२ दौलतराव शिंदे यांनीं बायाचा समेट व्हावा याकरतां बाळोबा पागनीस व धोंडोबा व बनी मोदी नगरांत कैदेंत होते त्यांस नगराहून सोडून आणिलें ते चैत्र वद्य ३ सोमवारीं छ. १६ जिल्कादी वानवडी वाड्यांत येऊन भेटले. त्यास वस्त्रें जवाहीर दिलें. आणि कारभारांत घातलें. नंतर बाळोबातात्या व बाबुराव आंग्रे व आबा चिटणीस त्रिवर्ग मिळून बायाचा समेट करविला. बाया जेजूरी आलीकडे रोज बुधवार भाद्रपद व॥ ७ मीस येऊन राहिल्या. बाळोबा वगैरे वानवडीस आले. नंतर बायानीं सांगोन पाठविलें कीं, आमचे जवाहीराचे सजोग आहेत ते आह्माकडे या मुक्कामीं पाठवावें ह्मणजे आह्मी लष्करांत येऊं. त्यांजवरून बाळोबा तात्यानीं शिंदे यास सांगून बायाचे सजोग बायाकडे पाठविलें. ते घेऊन बाया कूच करून वानवडीस न येतां पैठणबाब गांवचे सुमारें गेल्या. तेव्हां शिंदे यानीं बाळोबा तात्यास विचारलें. त्यांनीं सांगितलें कीं गेल्या तरी चिंता नाहीं. असें बोलोन नारायणराव बक्षी यांस बायाचे लष्करांतून बोलावून आणिलें व फौजही फोडून आणिली. बाबूराव आंग्रे यांची रवानगी कुलाब्यास करून सारा कारभार पागनीस करूं लागले. बाया गंगेकडे गेल्या.

३ आप्पा बळवंत चैत्र व॥ ३० छ. २८ जिल्काादी पुणें येथें मृत्यु पावले. मरणसमयीं दत्तक पुत्र घेतला. त्याचें नांव बळवंत कृष्ण ठेविलें.

४ बडे खानाची चिट्ठी गोपाळराव भगवंत याचे नावें आली. त्यांत मजकूर कर्णेल साहेब बदादूर याणी सांगितलें आहे कीं दौलतराव शिंदे याजकडील पेंढारी नबाब असफजहा बहादूर याचे तालुक्यांत हंगामाकरतां व शिंदे याचे कारभारी याचा इरादा ऐकण्यांत येतो कीं नबाबचे तालुक्यांत खटला रहावा. नबाब सर्व प्रकार कंपनी सरकारचे सरकतीविषयीं सामील व सराफ आहेत. त्यापक्षीं नबाब साहेबाचे मुलुख व महालाचें संरक्षण कंपनी बहादुरचे सरकारास लाजीम आहे. त्याचा इतजा काशी मल्हार याचे विद्यमानें दौलतराव शिंदे यास लोक श्रीमंताचे खिजमतीस तवमदारूनमहा सैतक करावी म्हणोन चिट्ठी छ. ६ जिलहेज सन तिसा ती सैनात–आली तिची नक्कल राबीसन यांचे कागदांत आहे. त्यावरून.

१ टिपू सुलतानावर पलटणीची स्वारी कंपनी सरकार नबाब पेन्नवे या तिन्ही सरकारानी सरकतीनें केली. तेव्हां तहनामा त्यावर टिपू सुलतान मारेसबंदरचे फराशिसासी माराकत व रिफाकर्तीचे कौल करार करून त्याची नेमत कुमकेस आणिले व इंग्रजाचे सरकाराशी लढाईचा इरादा ठेवून फौजेची तयारी केली. त्याजवरून तिनीशरीक सरकारांतून मसलत करावयाची तदबीर केली. त्याप्रकरणीं वकीलाचे जबाबास सवाल आले व जनराळाची व नबाबाची पत्रें आली. त्याच्या नकला व तरजुमे वगैरे राबीसन साहेब याजवळचे कागदांत निघाले. त्यावरून मसलत प्रकरणीं मजकूर साराश लिहिला आहे.

१ कर्णेल प्रालकर यानी छ. १८ जमादी केवल सन तीसातिसैन आश्विन व॥ ९ मीस नाना फडणीस याजकडे येऊन सवाल केले व त्याचे जबाब आले. तीं कलमें येणेंप्रमाणें—

१ टिपूचे मसलत प्रकरणी तीन महिने श्रीमंताशीं बोलत आहों. आपल्यास इनाम असेल. आपले सरकारांत घरचे मह्याकमुले याचा विचार कांहीं

दिसत नाहीं. फरासीस टिपू यास सामील आल्यावर मसलत जड पडल्याची तदबीर व्हावी. त्याचे उत्तर नानानी केलें कीं, हें पहिलें करारांतच आहे. परंतु तिन्ही सरकारची पत्रें टिपूस पाठवावयाचे ठरलें होतें त्याचें काय झालें? टिपूकडील उत्तर येते ह्मणजे पुढील अर्थ समजतां त्याजवर कर्णेल बोलले हें कलम त्यांतून जाब आला नाहीं. जनराकचे ख्यालांत असे असेल कीं, अगोदर तयारी करून मग पाठवावें. उत्तर समर्पक न आल्यास विचार करणें तो करावा. उत्तर आल्यावर मग तयारी करण्यास लागावें. तें ठीक नाहीं. असें कियासा वरून दिसतें.

२ शिंदे याचे पलटणांत फराशीस बहुत आहेत. टिपूशीं मसलत याकरतां हा आंदेशा आहे. हिंदुस्थान दूर असतें तर चिंता नव्हती. नबाबाचे सरकारांत फराशीस होते. त्याची जेमत नबाबानी आपले आकत्यारांत आणून त्यास काढून दिलें तेंही आपला निभाव न लगे याजकरतां कंपनीचे सरकाराशीं सफाईकरून त्याचे फौजेंत राहिले. यावें उत्तर नानाचे आलें कीं शिंदे याचे रवानगीचे तरतुदींत आहों.

३ कर्णेल बोलले कीं टिपूकडे श्रीमंताची पत्रें जाण्याचा शशीक भारी आहे. असें कलम त्यांतून व चिमपटणाहून बातमी आली. बहुशा वकील गेला असेल यावरून संशम आमचे मनांत आहे. नानानीं उत्तर केलें कीं श्रीमंतास विचारून सांगूं.

—

३

१ जनरल कलकत्तेकर याचे पत्र पेशवेसरकारांत छ. २२ जमादीला आलें त्यांत मजकूर. आमचें पत्राचें जाबांत मजकूर हा कीं टिपूसुलतान याशीं तिन्ही शीरक सरकारांतून करार आले. त्यांत खुलष नसतां सुलतान मवसुफाकडून हारकत नाहीं. रात आली ताजुक आहे. रयतेची आबादी व मुलखाची नीगा हावजी मजूर खातर असे. सुलतान महसुब यास पत्र लि-

हिण्याची तदबीद व हारीफाचे गैरचालीस हुशारी व निगाहावजी मुनसब टिपूसुलतान याणीं करारांत खलप आणिल्यास तिनी सरकारांत द्यावें.

श्री.

१७१९, पिंगलनाम संवत्सरे, सुरुसन, समान तीसैन मया तैन व अलफ, सन १२६०, संवत १८५४, राजशक, १२४ इसवी १७९७ व १७९८.

१ नाना फडणीस घराहून कारभार करीत, त्रिंबक नारायण परचुरे यांजकडे तारिख घालावयाचें काम, नारोपंत चक्रदेव नानाचे व श्रीमंताचे मध्यें जाण्यायेण्यास होतें, व फौजेचें काम त्यांजकडे होतें.

२ आमदाबादचा सुभा चिमाजीआप्पा याचें नांवें करून केशव कृष्ण यांजकडे मामलतीचें काम सांगितलें होतें. तें दूर करून आबाजी कृष्ण शेलूरकर यांजकडे सांगितलें छ. १९ सवाल.

३ दादा गद्रे याणीं सदाशिव पेठेंत देवालय मुरलीधराचें बांधले त्याची आर्चा वैशाख शुद्ध १० शनवार छ. ८ जिल्कादी केली ते दिवशी मेस्तर बेट यांचे पलटणचे लोकांची व अर्बाची कटकट त्या देवेळाजवळ होऊन शेंपन्नास मनुष्यें ठार पडलें. नंतर मुसोमोन्नम व शाहामीरखान दरम्यान पडून कज्जा तोडला. कज्जाचें कारण विशेष नव्हतें. देवाजवळ आरब राहात होते, तिकडून मेस्तर बैण्याचे लोक जाऊं लागले. त्यांस आरबानें मना केलें, तें त्यांनीं ऐकलें नाहीं. त्याजवरून लढाई सुरू झाली.

४ नगरचा किल्ला व दाहा लक्षांची जहागीर शिंदे यास देऊं करून करार नानानी केल्याप्रमाणें त्यास दिली. मोरो बाबुराव फडणीस त्या किल्ल्यांत आटकेस होते, त्यास तेथून काढून त्रिंबकास ठेविलें.

५ चिमाजीआप्पा याचे दत्तविधान फिरवून चिमणाजी माधवराव होते ते चिमणाजी रघुनाथ केले. महादेव दिक्षित आपटे व यज्ञेश्वरशास्त्री द्रवीड याणीं दत्तक करावयास शास्त्रार्थ सांगितला. त्यांजवर बाजीरावसाहेब यांची बेमर्जी होऊन दरबार मना केला.

६ चिमणाजीअप्पाचें पहिलें लग्न छ. १८ जिलकाद वैशाख वद्य ९ मंगळवारीं झालें. मोरोपंत दामले यांची कन्या नांव सिताबाई ठेविलें.

७ रघोजी भोसले सेनासाहेबसुभा आषाढ वद्य ४ गुरुवारीं १८ मोहरमीं नागपूरास जावयाकरतां निरोप दिला. सबब गढेमडळ चोरोगडसुद्धां त्यास घ्यावयाचे नानानीं ठरविलें. त्याच्या सनदा पेस्तर स. २७ जिल्हे दिल्या असेत.

८ श्रीधर लक्ष्मण मुनशी व कृष्णराव माधव व रामचंद्रदादा निसबत रघोजी भोसले यास परगाणे जळगांव प्रांत वऱ्हाडेपैकीं देहे ८ इनाम दिले स. १७ सफर.

९ बाळाजीपंत पटवर्धन व भिवजी काळे यांस पागा दिल्या.

१० पर्वतींची दक्षणा चार खासे वसून वाटावयास प्रारंभ केला.

११ मशिरीन मुलुख यास हैदराबादेस जावयास निरोप श्रीमंताचा घेतल्याशिवाय गेले. खरडयाचे स्वारीस नबाबाचे सरकारचा मुलुख घेतला होता तो नानानी बाजीरावसाहेब यांजकडून माघारा देविला. रुसकतीवांचून देऊं लागले. त्याचे मनांत वाकडेपणा नसावा. दोस्ती साफ चालावी, ह्मणोन सदाशिव माणकेश्वर यास पत्र श्रीमंताचे गेलें त्यांत लिहिलें आहे. मशिरीन मुलुख हैदराबादेस गेल्यावर नुरुदी हुसनखान ऊर्फ बोडखान याचे बंधु नबाब निजामजंग याचे निसबतीस बीस हजार फौज व परांडानल दुर्ग किल्हे त्याचे हवालीं झाले. सलाबतखान व सुभानखान वगैरे फौज निजाम जंग याचे तेनातेस आली. निमामजंग याजवळ नानानीं आपले तर्फे जनार्दन शिवाजी मस्कर व त्रिंबकराव साटे यांस ठेविलें. फौजेची छावणी पंढरपुराचे आसपास सरहोदवर भीमा पार होती. पुढें नाना फडणवीस मृत्यु पावल्यावर मस्कर यांस निजामजंग याणीं कैद केलें. पुढें निजामजंग यास हैदराबादेस बोलावून घेऊन किल्ल्याची घालमेल केली, व फौज त्याची दूर झाली. महादास नाना असतां गोविंदराव भागवत याचे विद्यमानें चवदा कलमांची याद नबाब यास मखलाशीची करार करून दिली.

त्याजवर नानाचा करार करून दिली. त्याजवर नानाचा करार नव्हता. याजकरता रघोत्तमराम यास नानाची चिट्टी लिहिली. त्यांत लिहिलें आहे आहे कीं जे समयीं तुह्मीं याद आणाल तेव्हां करार करून देऊं; ती याद सही व मान्य असें. यादीवर आमचे हातचा करार नाहीं ह्मणोन दवला बहादर संशय घेतील, यास्तव हें करारचें पत्र लिहिल्याप्रमाणें आमलांत येईल ह्मणोन छ. १७ रबिलाखरचें पत्र त्याची नक्कल राबीसन साहेब यांजवळचे कागदांत आहे. चवदा कलमाचा तपशील लागला नाहीं. व नाना पुण्यास आल्यावर मशिरीन मुलुख याजपासून पाच कलमाची याद करून घेतली आहे त्याचाही तपशील सांपडला नाहीं.

१२ तुकोजी होळकर याचा काळ श्रावण वद्य ८ मंगळवारीं झाला. क्रिया काशीराव होळकर याणी केली. छ. २१ सफर पुढें काशीराव व मल्हारराव यांचे बनेना. मल्हारराव आपली फौज थोडीशी घेऊन दाभाडे यांजवळ राहिले त्याजकडे आंतून नानाचें लक्ष. याजकरतां काशीराव होळकर याणीं दौलतराव शिंदे यांस ऐवज रोख व मुत्सद्दी यास दरबार खर्च व इनाम गांव द्यावयाचे कबूल करून मल्हारराव यास धरावयाचे ठरविलें. त्यांजवरून शिंदे याणी धरावयास फौज पाठविली, परंतु मल्हारराव याणी शिपायगिरी केली. जमेत थोडी यांजमुळें मारले गेले भाद्रपद व॥ ९ छ. २२ रबिलावक. त्याजवळ लाख रुपये बोली करून एक शिपाई चाकरीस होता तो ठार पडला. आणखी लोक मारले गेले. लोणीकर होते ते ठार पडले. त्याची बायको शितोळे याची लेक लोणीस होती. तिला वर्तमान समजतांच तिणें प्राण सोडला. यशवंतराव होळकर पळोन गेले. मल्हारराव याची बायको जिजिबाई गरोदर होती. त्यास घेऊन मल्हार शामजी कारभारी पुण्यांत येऊन कुमठे यांचे वाड्यांत राहिले. जिजीबाई प्रसूत होऊन पुत्र झाला. त्याचें नांव खंडेराव होळकर ठेविलें.

१३ गणपतीचा उत्साह वाड्यांत झाला. गणपति पोंचवावयास श्रीमंत पायउतारा गेले यामागें अंबारीत बसून जात होते.

१४ कुलाब्याचे संस्थान रघोजी आंग्रे याचे तिर्थरुप येसाजी आंग्रे रेवदंड्यास राहात होते. त्याचा दावा संस्थानावर नसतां बाबूराव आंग्रे, दवलतराव शिंदे याचे मामा त्या आगत्यानें श्रीमंताची परवानगी घेऊन, येशवंतरावाकडे हरीपंत भावे याजवर बराबर पलटण देऊन कुलाब्याचा किल्ला शिंदे याणी घेऊन बाबुराव आंग्रे यास दिला. राघोजी आंग्रे याचे हवाली केलें. त्याणी कैदेंत ठेविलें. नंतर दसऱ्याचे दिवशीं श्रीमंतानीं संस्थानची वस्त्रें बाबुराव आंग्रे यांस देऊन वसई सरखले किताब दिल्हा.

१५ परगणे होनगुंद माहाल तोफखाना याकडे सरंजामास होता. तें ठाणें घ्यावयाकरितां रायचुराहून मुदगलकर याणीं तोफा व फौज आणविली. सबब धोंडोपंत गोखले फौज बाळगून कर्नाटकांत होते, त्यास होनगुंदचे कमाविसदारानीं कुमकेस बोलाविलें. त्यावरून गोखले याणी फौजसुद्धां जाऊन मुगदलकरासी लढाई दिली. तोफा पाडाव करून आणिल्या. त्यावरून गोखले यास सर्फ राजीचें पत्र रजबचें पत्र गेलें. त्याची नकल चिटणीसाजवळ आहे त्यावरून बाजीरावसाहेब यांचा मिजाज कायम नाहीं. पहिल्यानें शिंदे याशीं राजकारण केलें नंतर पुण्यांत नानाची भेट होतांच त्यास मिळोन शिंद्याशीं बिघडलें. पुढें नाना कारभार करीत असतां त्याजविषयीं अनेक प्रकारें वाकडेपणा मनांत आणूं लागले. त्यास अनुमोदन अमृतरावसाहेबाचे पडत गेले. व सर्जेराव घाटगे साह्य मसलतीस झाले. तेव्हां नानास शिंदे याणी कैद करावें असें केलें. त्या राजकारणांत नानाचे भरंवशाचे यशवंतराव घोरपडे मिळाले. त्यानीं शिंद्याविषयीं नानाची खातरजमा केली. शिंदे नानाचे घरीं आले. मेजवान्या देऊन सफाई दाखविली. तत्राप नानास भरंवसा न येई. तेव्हां मुकरेसाहेब याजकडून शिंदे याणीं इनाम देऊन लष्करांत मेजवानीस यावें असें ठरविलें. पौष वद्य १३ रविवारीं छ. १२ रजबा शिंदे यांचे लष्करांत वानवडीवर मेजमेजवानीकरतां गेले. तोंपावेतों नानास धराव्याचे शिंदे याणी मुलारेसाहेब यास कळों दिलें नव्हतें. नाना लष्करांत दाखल जाहल्याबर कळविलें. त्यावरून

त्याचें बोलणें पडलें कीं, ही गोष्ट होणार नाहीं. तेव्हां दवलता शिंदे यांणीं मरासद अल्ली वैद्य याजपासून त्याशीं बोलोन रुकार घेतला. मुलारेसाहेब लाचार होऊन रुकार दिला. नंतर नानास व त्यांजबरोबरचे मंडळीस कैद केलें. शिबंदिचे लोक काढून दिले व कांहीं पळून आले. नानाचे वाडे व सरंजाम वगैरे श्रीमंतानीं जप्त केले. सरंजामाच्या जप्तीच्या सनदा मुजुमदार यांचे घरीं बार आहेत; व बाळाजी जनार्दन याचे निष्टत अंतर दिसले. सरकार लक्षाची वर्तणूक नाहीं. याजकारितां दौलतराव शिंदे आलीजा बहादर यास आज्ञा करून मशारनिल्हे नजरबंद केलें. तुह्मास कळावें, आपले स्नेहाचे सिलसिले सरकाराशी पूर्वीपासोन आहे त्याप्रमाणें असावें ह्मणोन पत्र छ. १२ रजवान बाजीरावसाहेबांनीं पाठविली. ती तपशील.

१ श्रीमत महाराज छत्रपति.
२ करवीरकर महाराज
३ सेनासाहेब व सुभा.
४ गोविंदराव गाईकवाड
५ टिपू.
६ मालीट इंग्रज मुंबईकर.
७ फिरंगी गोंवेकर.
८ जंजीरेकर हापशी.

८

सदरहुप्रमाणें यादीची नकल महिपतराव चिटणीस याजवळ आहे, त्याजवरून लिहिलें असे. नाना कांहीं दिवस शिंद्याचे लष्करांत होते. तेथून नगरचे किल्ल्यांत पाठविले.

१ नाना, शिंदे यांचे लष्करांत गेल्यावर श्रीमंतानीं बाबा फडके, आप्पा बळवंत नारोपंत चक्रदेव, गोविंदराव पिंगळे व नारो निळकंठ मुजुमदार, त्रिंबकराव परचुरे, नारायणराव वैद्य चिटणीस वगैरे सारे मंडळीस वाड्यांत बोलावून कैद केलें.

२ कारभार, रावसाहेब यास घेऊन बाजीरावसाहेब जातीनें आपणच करूं लागले. तारिख आपणच घालों लागले. फौजेचें काम बाळाजीपंत पटवर्धन यांजकडे सांगितलें. अमृतरावसाहेब यांचे लक्षानें कारभारांत गोविंदराव काळे व शिवराम नारायण थत्ते वागों लागले.

३ परशराम रामचंद्र यांचे सरंजामाची जप्ती मोरो बापुजी यांजकडे सांगितली छ १७ रजब.

४ कोंकणचा सरसुभा विनायकराव अमृतेश्वर याचे नांवे करून वस्त्रें दिली छ १० साबान, सरसुभ्याचें काम अमृतरावसाहेब यार्णी गणपतराव जीवाजी जोग यांजकडे सांगितलें.

५ करवीर महाराज फौजसुद्धां तासगांवास उपद्रव करून कर्नाटकांत जाऊन पेशवे यांचे मुलखांत ठाणें घेतली लुटले. व वल्लभगड किल्ला घेतला. बेळगांवास उपद्रव केला. त्यांजविशी मुरारजी पवार याजबराबर बाजीरावसाहेब यार्णी पत्रे करवीर महाराज व रघुनाथराव माने यास पाठविली; त्यांत मजकूर ठार्णी सोडून ध्यावीं व ऐवज घेतला असेल तो माघारा ध्यावा व मुलखास उपद्रव करूं नये ह्मणोन छ. १२ साबान सनसमानची पत्रें गेलीं त्याचीं उत्तरें महाराजांची व माने यांची आली. त्यांत वल्लभगड हवाली करून ध्यावयास कोणी पाठवावा. ह्मणजे त्याचे हवाली करून मुलखास उपद्रव होणार नाहीं ह्मणोन आलीं. त्याच्या नकला महिपतराव चिटणीस यांजवळ आहेत व करवीकर यांची फौज टिपुसुलत[illegible]चे मुलखांत जाऊन
मेल बिदनुर तालुका लुटुन व वरकड त[illegible]
त्यास ताकीद होऊन लूट केली आहे ती ठ
असें व्हावें ह्मणोन टिपुसुलतान याचें पत्र [illegible]
सरदारास निक्षून ताकीद रवाना केली
तिसांत गेला आहे त्याची नकल महि[illegible]
जवरून नानाफडणवीस कैद झाल्य[illegible]
यांस गेलें. त्यांत दुसरा अमलदार अ[illegible]

आबाजी कृष्ण यांजकडील कारकून यांस वसूल घेऊन द्यावा म्हणोन सदर-हूची नकल चिटणीस यांजवळ आहे. त्यांजवरून.

१ श्रीमंतांचे वाडयाभोंवते पलटचे लोक होते ते उठोन गेले. छ. १ रमजान सरकारचे लोक आबा काळे यांचे निजबतीचे पलटणचे चौकी पहाऱ्यास बसविले.

२ दौलतराव शिंदे याणीं सखाराम घाडगे सरजेराव यांचे कन्येशीं लग्न केलें नांव बायजाबाई ठेविलें. समारंभ मोठा झाला फाल्गुनमास. व बाळाबाई चितोळे यांची कन्या यशवंतरावदादाभाडे सेनापति यास दिली. लग्न मार्गशीर्ष-माशी झालें.

३ नानाचे निसबतीची मंडळी वाडयांत कैदेंत होतीं त्यापैकीं त्रिंबकराव परचुरे याणीं बाळोजी कुंजर याचे विद्यमानें आपले जवळचें सारें द्रव्य सरकारांत समजाऊन त्यापैकीं तीन लक्ष रुपये शिंद्याकडे रोकड होते ते दिले; आणि श्रीमंताचा निरोप घेऊन फाल्गुन व॥ ६ गुरुवारीं छ. १९ मनाजी काशीयात्रेस गेले. खामगावचे अन्नछत्र त्याचे होते त्याची नेमणूक चालवावी व कल्याणपैकीं त्याचे हुजूरचे दप्तरचे आसामी बाबदचे दोन हजार रुपये दरसाल त्रिंबकराव जिवंत आहे तो काशीस पाठवावें. याचा करार श्रीमंतांनीं करून सनदा दिल्या. नानास कैद केल्यावर अमृतरावसाहेब याणीं कारभार करावा असें त्याचें मनांत होतें. परंतु दौलतराव शिंदे याचें लक्ष बाजीरावसाहेब यांजकडे व बाजीरावसाहेब यांचें मनांत रावसाहेब याणीं मुखत्यारी करावी असें होतें. याजमुळें रावसाहेब यांचें मनांत वांकडेपणा

दर्शनास जावयाचे निमित्तानें बाहेर डेऱ्यास

नीं जाऊन राहिले.

श्री.

सुरू सन, ईहिदे, मया, तैन व अलफ,

न, १८९७ शक १२७ इसवी सन

स वर्ष प्रतिपदेपासून लागले. बाजी-

रावसाहेब त्यांजवर देणें करून कारभार कचेरी होऊं लागला. नारोपंत चक्रदेव फडणीसीची तारिख करीत होते चैत्र शु॥ १.

२ अमृतरावसाहेब यांणीं वडगांवास बारव विहिर केली तिचें उद्यापन वैशाख शु॥ ६ छ. ४ जीव्हेजी केलें.

३ नारोपंत चक्रदेव व बजाबा शिरवळकर चिमणाजी खंडेराव असे नानास दत्तक पुत्र घ्यावा असें श्रीमंतांजवळ व शिंदे यांजवळ बोलानें ठरावांत आणिलें, श्रीमंतांचें मनांत नव्हतें, परंतु चक्रदेव वगैरे यांस कैद करावयाकरतां नाद चालविला. श्रीमंतांनीं शिंदे यांस संकेत करून त्यांस वाड्यांत बोलाविलें ते जेष्ठ व॥ ७ सह अष्टमी शुक्रवारीं छ. २० मोहरम शिंदे फौजसुद्धां वाड्यांत आले. शामीरखान वगैरे फौज चक्रदेव यांणीं वाड्यांत बोलाविली. शिंदे आल्यावर दत्तकाचे ठरावावयाकरतां नारोपंत चक्रदेव, बजाबा शिरवळकर, धोंडोपंत लिमये, राघोपंत गोडबोले, लक्ष्मणपंत चक्रदेव, चिमणाजी खंडेराव असे आंत बोलाऊन कैद केलें. नंतर शामीरखान यास लोकसुद्धां प्रहर रात्रीस वाड्यांतून बाहेर काढून दिलें. शिंदे याचे लोक वाड्यांत होते.

४ नाना फडणवीस यांचे वाड्यांत अरब होते ते न निघत. याकरतां तोफा त्यांचे वाड्यास जेष्ठ व॥ ८ शनवारीं लाविल्या. पश्चिमेकडील एक कोपरा जाया झाला व वाड्यांत गोळे जाऊन पडले. दुसरे दिवशीं जेष्ठ व॥ ९ छ. २२ मोहरम रविवारीं अरब बाहेर गेले. शामीरखान पठाण भवानी पेठेंत होते. त्याजवर तोफा शिंद्याकडून येऊन त्याचे वाड्यावर गोळे मारून त्यांस लष्करांत नेलें. तेथून काढून दिलें जेष्ठ व॥ १० सोमवार छ. २३ मोहरम.

५ अमृतरावसाहेब व बाबासाहेब व अप्पासाहेब नानाफडणीस याचे बायकांचे समाधान त्याचे घरीं गेलें. जेष्ठ व॥ १४ छ. २७ मोहरम

मोरो बाबुराव फडणीस जुन्नरास येऊन राहिले होते ते आषाढ शु॥ १ छ. २९ मोहरम सोमवारीं पुण्यास आले. गारपिरावर श्रीमंत त्रिवर्ग व दौलतराव शिंदे वगैरे एक जागा बसून मोरो बाबूराव येऊन भेटी झाल्या.

शिंदे आपले गांवास गेले. मोरो बाबूराव बाबासाहेबांचे मागें अंबारींत चवरी घेऊन बसले. अमृतरावसाहेब व चिमणाजीअप्पा एके अंबारींत होते. त्यांचे मागें मोरो बाबुराव यांचे पुत्र बसेल. अंबारीचे पुढें व बाबासाहेबांचे मागें आबा पुरंधरे याची अंबार, याप्रमाणें स्वारी रवीवाराहून बुधवार पेठेनें वाडा उजवा घालोन वाडयांत दाखल झाले.

६ गोविंदराव कृष्ण काळे कैदेंत होते त्यांस चिट्ठी बाजीरावसाहेब याणीं पाठविली कीं, नारोपंत चक्रदेव वगैरे मंडळी यांची चाल आह्मांस दाखवून दवलत करावी. नाना फडणीस यास नगराहून आणावयाचें करून त्यांची जरब आह्मांवर ठेवून कामकाज चालवूं लागले ती तुमची आमची बोलणीं समक्ष होतच होती. सांप्रत या चालिची पराकाष्टा दिसण्यांत आली. ती काय लिहावी ? समक्ष बोलण्यांत येईल. जेष्ठ व॥ ७ मास मशारिनिल्हे आदि-करून चिमणाजी खंडेराव व बज्याबा शिरवळकर वगैरे मंडळी नजरबंद केली. नंतर दवलतींत दिसावयाजोगा माणूस हुजूर नाहीं. तुह्मी पेचांत, शिंदे याचीं बोलणीं तुह्मांविषयीं तेव्हांची त्यांत कसेंही करून तुमची मुक्तता होय. या प्रयत्नांत मी आहेच; दवलतींत माणूस दिसावयाकरितां जुन्नराहून मोरोबाबादा फडणीस यास आज आणून गारपिरावर भेट होऊन खबासीत घेऊन पुण्यास आले. तुह्मांस कळावें ह्मणून चिट्ठी पाठविली त्याचा मसुदा राबिसनसाहेब बहादूर यांचे कागदांत सांपडला त्यावरून.

१ नारोपंत चक्रदेव कैद केले ते व बजाबा शिरवळकर व राघोपंत गोडबोले व धोंडोपंत लिमये व लक्ष्मणपंत चक्रदेव एकूण पांच असामी बाळाजीपंत पटवर्धन खासा पागेसुद्धां व भिवजी नाईक अशी बराबर देऊन जुन्नरास आषाढ शु॥ १२ शीस नेले. हाडपसरास पोंहचविलें. चिमणाजी खंडेराव प्रतागडास पाठविले.

२ दौलतराव शिंदे यांची खानगी हिंदुस्थानात करावयाचें ठरविलें. त्याजवरून श्रीमंतांचे दौलतीचे बंदोबस्ताचीं कलमें शिंदे यांजकडून करार

करून घेतला. त्याची याद व शिंदे यांस सरकारांतून ऐवज घ्यावयाचा ठरला त्याची याद राबीसनसाहेब बहादुर याजवळचे कागदांत आहे त्यावरून.

१ श्रीमंतांनीं दौलतीचे बंदोबस्त विषई कलमें लिहून याद शिंदे यांजकडे वानवडीस पाठविली त्या कलमावर शिंदे यांणीं करार करून याद सरकारांत पाठविली. यादीची तारिख छ. २ सफर आषाढ मास सन मजकूर– कलमें—

१ सरकारचे व जातमुबारकेचे लक्ष सोडून जे असतील त्याचा बंदोबस्त मनोदयारूप केला जाईल. त्यास तुह्मी अनुकूल असावे. सदरहु अन्वयें आह्मांकडून अनुकूळतेंत कमी होणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

२ पुण्यांतील व प्रांतांतील दादी फिर्यादी तुह्मांकडे येऊन ताहाकयांत पत्रें व हुजुर चिठ्या घेतात त्यास या उपरी कोणी दादी फिर्यादी आल्यास हुजूर पाठवावें. परभारें तुह्मांकडून पत्रें व मसाले वगैरे होऊं नये व हुजुर चिट्ठयाही होऊं नयेत. सदरहु अन्वयें वर्तणुक होईल. हा करार हरएक जाती कामाकरतां तुमची चिट्ठी हुजुर येऊं नये. सरकारांतून विश्वासुक बोलणार त्यांशीं तुह्मी बोलावें. मशारीनिल्हे जी हुजुर विनंती करून जाबसाल वाजवी असतीलसे उलगडून घेऊन तुह्मांस सांगावें.

सदरहु अन्वयें सरकारांतून आज्ञा होईल त्याशी जुजबी जाबसाल असतील ते बोलण्यांत येतील. येणेंप्रपाणें करार.

३ तुमचे रवानगीचे खर्चाविषयीं तुह्मी सरकारांत यिनंती केली याजवरून सरकारचे व तुमचे विचारे सदतीस लक्ष रुपये तुह्मांस द्यावयाचें ठरलें. त्यास यामागें सरकारांतून व सरकारचे कारकून वगैरे यांजपासून ऐवज घ्यावयाचा करार होऊन तुह्मी दस्तऐवज घेतले त्यापैकीं वसूल पाउन, बाकी राहिली ती याउपरी तुह्मी मागूं नये. दस्तऐवज चिट्ठया वगैरे असतील ते सरकारांत माघारे घ्यावें.

४ रवानगीचे खर्चास सदतीस लक्ष रुपये ठरले त्याप्रमाणें पंचवीस लक्ष रुपये तूर्त घ्यावें. त्याची निशा सावकार खुशालचंद यांजकडून देववावी

आलाहिदा यादी मुदतीची ठरेल त्याप्रमाणें एक महिन्याचे आंत निशा घ्यावी. व बारा लक्षांच्या वराता बाळाजी गोविंद बुंदेले व शिवराम हरी झांशीचे मामलेदार यांजवर करून घ्यावा. यामागें सरकारचे कारकुनाचे दस्तऐवज असतील ते शोध करून निघतील ते माघारे दुसरे विल्हेस पडले असल्यास त्याजबद्दल जाबसाल राहिला नाहीं; येणेंप्रमाणें करार.

५ तुह्मांकडील दोन पलटणें व एक हजार फौज हुजुर चाकरीस राहील. त्याणीं सरकारचे आज्ञेप्रमाणें चाकरी करावी. हुकमांत वागावें. त्याचे मदत खर्चास पांच लक्ष रुपयांचा वसुली सरंजामकडील दिला आहे.

पांच लक्षाचा सरंजाम पलटणें व फौज राहील त्यास वसूल जमेच्याकडील घ्यावा. सरकारआज्ञेप्रमाणें चाकरी करून हुकमांत वागतील येणेंप्रमाणें करार.

६ सरकारांतून तुह्मांस जाण्याविषयीं आज्ञा होईल तेव्हां कांहीं अडचण न घालतां कुच करून जावें. आज्ञा झाल्याविरहीत कुच करून जाऊं नयें. मसलदीनुरूप जाणें राहाणें स्वामीचे शेवकाचे विचारें ठरेल त्याप्रमाणें करण्यांत येईल. सरकार आज्ञेप्रमाणें निरोप घेऊं. न जाणें झाल्यास कांहीं अडचण घालणार नाहीं येणेंप्रमाणें करार.

७ प्रांतांतील सरकारचे व सरंजामी यांजकडील गांव खेडीं वगैरे येथें तुह्मांकडून व तुह्माकडील तालुकेदार यांजकडून जप्त्या झाल्या असल्यास उठवाव्या. व याउपरी होऊं नयेत.

सदरहु अन्वयें जप्त्या उठवून देऊं येणेंप्रमाणें करार

८ स्वामीचें वांकडें पहाणार व लक्षांत नाहींत त्याचें पारपत्य स्वामीनी करून निष्कट करावें. आह्मी सर्व प्रकारें अनुकूल ऐशी तुमची विनंती त्यानें आणि दवलतीचे व जातमुबारकेचे वांकडे पहात असतील व लक्षांत नाहींत व उद्योगीही नाहींत अशांचें पारपत्य व बंदोबस्त सरकारांतून होईल, त्यांस तुमची अनुलता असावी. आज्ञा होईल तसें करीत जावें, ह्मणजे निष्कट होईल.

सरकारचे वांकडे पहात असतील व लक्षांत नाहींत त्याचें पारपत्य

सरकारांतून व्हावें. त्यास सेवकाकडून आज्ञेप्रमाणें अनुकुळतेंत कमी पडणार नाहीं येणेंप्रमाणें करार.

९ सरकार तालुक्यांत तुह्मांकडील पागे पतगे मनस्वी उपद्रव देऊन खंडण्या वगैरे ऐवज घेतात. तो मना करून, याउपरी सरकार प्रांतांत पागे पतगे वगैरेस निक्षून ताकीद पाठवून बोलवून घ्यावें ह्मणजे सरकारचे लागदार लावणीच्या बंदोबस्ती करतील. तूह्मी निक्षून ताकीद केली असतां उपद्रव करूं लागल्यास त्याचें पारपत्य करावें. पागे पतके व कंपुवाले यांचा उपद्रव लागतो त्याचा बंदोबस्त आज्ञेवरून होईल. कोणी लबाडी केल्यास पारपत्य करावयास येईल. येणेंप्रमाणें करार.

१० सरकारचे मातबर व महान सरदार वगैरे व पर दवलतदार यांजकडून सरकारचा ऐवज वगैरे जबासाल उलगडून घ्यावयाचें तें कराराप्रमाणें त्यांजपासून सरकारांतून उलगडून घेतले जातील. कोणी दिकत केल्यास जरब देऊन कामें उगवलीं पाहिजे. त्यांस तुह्मीं अनुकूळ असावें.

वाजवी ऐवज सरकारचा येणें वगैरे जाबसाल असतां कोणी दिकत करील त्यांजवर जरब देऊन उलगडून घ्यावे येविषयीं सेवकाकडून अनुकूळता होईल येणेंप्रमाणें करार.

११ जात मुबार केले दवलतीचा बंदोबस्त करून सर्वावर दाब व तेज असावें हें तुमचें मानस. त्यास जात मुबारकेकडून दवलतीचा बंदोबस्त होण्यास तुमची अनुकूळता पाहिजे. तशी सबाह्याभ्यांतर कायम असावी. हार कोणाचे समजाविल्यावांचून संशय घेऊन, दरम्यान कलुष तुह्मी चित्तांत आणूं नये. कोणी कांहीं समजाविल्यास हुजूर विनंति करून स्वच्छता वरचेवर करून घेत जावी. प्रांतांतील तुह्मी उपद्रव व पत्रें व चिट्ठ्या मसाले मना केले ह्मणजे दाब व तेज तुमचे मनोदयानुरुप निर्दर्शनास येईल.

स्वामींनीं जातीनिशीं दवलतीस आळा घालोन बंदोबस्त करावा हीच इच्छा. त्याप्रमाणें स्वामीकारितां सेवकाकडून कोणतेही प्रतिकूळ पडणार नाहीं. कोणाचे समजाविल्यावरून स्वामीचे चित्तांत व सेवकाचे चित्तांत संशय घेऊं

नये. राजकारणसंबंधी व सल्लामसलतीचा दाखला पहिलेपासून सेवकाकडे द्यावयाची चाल आहे. त्याप्रमाणें सरकारांतून आज्ञा होत नाहीं. परस्परें कोणाचें सांगितल्यावरून चित्तांत संशय आल्यास, सरकारांतून आज्ञा होत जावी. इकडूनही विनंति होईल. संशय दोन्हीकडेही राहूं नये. ज्यांत स्वामीचा दाब तेज प्रतापाची वृद्धि होय तेच करण्यांत येईल येणेंप्रमाणें.

—

११ करार.

१ शिंदे यांस ऐवज द्यावयाचा ठरावून बाजीरावसाहेब याणी कराराची याद करून दिली. छ. १७ फर आज्ञा. मास ७

१ फौजेचे खर्चाबद्दल रुपये,

३७०००००

२९००००० तूर्त नक्त रुपये सावकारी निशा.

१२००००० वराता हिंदुस्थानांत बाळाजी गोविंद बुंदेले व शिवराम हरी झांशीवाले यांजवर दावा.

३७०००००

सदतीस लक्ष रुपये तुह्मांस द्यावयाचे ठरले. त्यापैकीं बारा लक्षांच्या वराता बाळाजी गोविंद बुंदेले व शिवराम हरी झांशीकर मामलेदार याजवर द्यावयाच्या. बाकी पंचवीस लक्ष रुपये राहिले. त्याच्या मुदतीची याद आलाहिदा ठरेल त्याप्रमाणें एका महिन्याचे आंत खुशालचंद याची निशा दिली जाईल. येणेंप्रमाणें करार. फौज व पलटणें हुजुर चाकरीस राहातील. त्यास सरंजाम स्वदेशांत वसुली बेरजे चालवून द्यावा ते १००००० रुपये तुम्हांकडील एक हजार फौज दोन पलटणें हुजुर चाकरीस राहतील, त्याचे मदतखर्चास

पांच लक्ष रुपयांचा सरंजाम कचा वसुली जमेचा स्वदेशांत लोऊन दिला जाईल. येणेंप्रमाणें करार.

—

२

९ सदरहु प्रमाणें ऐवजाची याद करून दिली.

—

२

---

१ बाजीरावसाहेब व आप्पासाहेब व मोरो बाबुराव फडणीस वगैरे मुत्सद्दी व सरदार शिंदे याचे कारभारी आबा चिटणीस यांणीं आपल्या डेऱ्यांत स्वयंपाक केला. तेथें भोजनास गेले. अमृतरावसाहेब वाड्यांतच होते. आषाढ शु।। ८ छ. ६ सफर सोमवार.

२ अमृतरावसाहेब यांणीं भिवडी वगैरे सात लक्षांचा सरंजाम घेऊन कोकणांत भिवंडीस जावयाकरतां श्रावण शु।। १ छ २९ सफरी प्रातःकाळीं वाड्यांतून निघून गेले. स्त्री सौभाग्यवति वहिनीबाई व पुत्र विनायकराव वाड्यांत होते. देखावे अमृतरावसाहेब करीत होते ते राहिले. बाजीरावसाहेब देणें व फडणीसीची तारीख करून कारभारास सदाशिव माणकेश्वर व गोपाळराव मुनसी व बाळोजी कुंजर होते. मोरोबा फडणीस आपले घरीं असत.

३ नाना पुरंधरे यांचे पुत्र बज्याबा यास पुत्र दत्तक माहिपतराव त्रिंबक ऊर्फ नाना पुरंधरे यांणीं सरंजामी याचा कारभार करावा ह्मणोन श्रीमंतानें सांगितलें. श्रावण मास पागेचें काम निळकंठ महादेव पुरंधरे यांजकडे सांगितलें. त्याचे तर्फेने सदाशिवपंत फाटक पागेचे काम पहात होते.

४ श्रावण मासचा देकार पांच दरवाजे मिळोन दिला. अडीच लक्ष रुपये खर्च झाला. बाजीरावसाहेब व आप्पासाहेब व मोरोबा फडणीस देकार ध्यावयास होते. दत्तराव शिंदे देकारांत आले होते. प्रदक्षणा सर्वांनीं

केल्या. समारंभ यथास्थित झाला. ब्राह्मण वाडग्यांत व पर्वतीचे मिळोन बेचाळीस हजार झाले.

५ ढेंढेरे याजकडे हुजुर पागा होती. त्याजवर नारोबा आठवले याची चौकशी नेमली. श्रावण शुद्ध १३ छ. ११ रबिलावल.

६ मोरो बाबुराव फडणीस यांस तारिख घालावयास विजयादशमीस सांगितलें.

७ नाना फडणीस मृत्यु पावले. बाळोबा वगैरे मारले गेले व पदरचे मंडळींपैकीं बहुतेक कैद केले. अमृतरावसाहेब निघोन गेले. आतां शिंदे गेले असतां बखेडा होणार नाहीं असें बाजीराव साहेब याणीं मनांत आणून. कार्तिक शु॥ १२ छ. १० जमादिलाखरी दौलतराव शिंदे यांस निरोप दिला. खंडेराव होळकर त्यांचे हवाली केले. कार्तिक अखेर पावेतो शिंदे वानवडीवर राहून जांबगांवास गेले; तेथून पुढें गेले. सरजेराव कागलास जावयाकरितां राहिले. बराबर गेले नाहींत. गाईकवाड यांजकडून दाहा लक्ष रुपये शिंदे यास सरकारांतून देवविले. जावजी पाटील निसबत गाईकवाड याणी बाघोलीचे मुकामीं शिंदे याचे लष्करांत जाऊन बिसा दिवसांत ऐवज बडोद्यांत पाठवून द्यावा याचा करार करून खास हवाला घेतला. नरसिंह खंडेराव विंचुरकर व रंगराव राजे बहादुर व पवार रघुनाथराव बळवंत जायगांवकर यांणीं चार पतकें बराबर द्यावी व काशीराव होळकर यास बराबर द्यावें असें निरोपसमयीं ठरलें. येविषयीं शिंदे यांचीं पत्रें कीं गाईकवाड याजकडील ऐवज पटला नाहीं. व खंडेराव होळकर व चार पतके यांस आज्ञा होऊन रवानगी सत्वर झाली पाहिजे ह्मणून सरकारांत व बाळोजी कुंजर यांस छ. २१ फजल व १६ फजालची पत्रें चाळीसगावचे मुक्कामाची आली ती रावसनसाहेब याजवळचे कागदांत सांपडली ती त्यावरून—

यशवंतराव होळकर यांचें पत्र छ. १३ जमादिलाखरचे सरकारांत आलें कीं, शिंदे याजकडील बाया याणीं पुण्यापासून येथपर्यंत मुलखाची धूळ

करून कोठे ठिकाण राहूं दिला नाहीं. पुढेंही येथूम बहकुम जावयाची चाल पाहून त्याची खातरजमा करून जवळ जावणोन घेतल्या असतां मुलखांत धूम आरंभून उज्जनीचा विध्वंस करावा ही दृष्टि पाहिली. मार्गाची चाल एकही दिसेना. निरोपाय जाणून स्वाधीन करणें प्राप्त होऊन, आसमंतात घेरा घालोन ध्यावा तों ज्यारीचें शेतांतून निघोन उज्जनीत गेल्या. सभोंवति नाकेबंदी ठेविली आहे. कदाचित् निघोन गेल्यास त्यांचे मागें फौजांची रवानगी करून ज्यांत बंदोबस्त तेंच घडेल. खर्च घरचे कलहामुळें पराकाष्टेच्या चाली होऊन कांहीं ठिकाण राहिला नाहीं. याउपरी व इकडील शिंदे यांजकडील बंदोबस्त होऊन ऐक्यता राहून व पूर्वरीतीनें सरकार चाकरी घडे तें केलें पाहिजेल ह्मणोन पत्र छ. २१ जमादिलाखर कार्तिक व।। ८ मीस आले. त्याचें उत्तर सरकारांतून गेलें कीं लक्ष्मीबाई उज्जनींत जातां मेवाडचा रोख धरून निघोन गेल्या ह्मणोन ऐकण्यांत होतें. त्याचे पिछास तुह्मी फौज पाठविली असेल व येविषयीं दौलतराव शिंदे याणींही तिकडील सरदार इंगळे व जनरल याजला लिहून पत्राच्या रवानग्या केल्या आहेत. त्याप्रमाणें तेंही पाठलाग करतीलच. परंतु तुह्मीं त्याची वाट ज्या हाता जिकडे गेल्या असतील तिकडे शोध लावून जलदिनें फौजेच्या रवानग्या करून सरकार आज्ञेप्रमाणें ज्यात हास्तगत ते करणें. बंदोबस्त प्रकरणीं लिहिलें त्यांस येविषयीं मल्हार शावजी यांशीं बोलण्यांत आलें आहे. लिहीतील त्याजवरून कळेल. मशारनिल्हे सरकार आज्ञेप्रमाणें लिहितील तेंच खचीत समजोन इकडील बंदोबस्त विषयीं संशय न धरावा. लिहिल्याअन्वयें करणें ह्मणोन उत्तर पाठविलें. होळकर यांचें पत्र व उत्तराचा मसुदा राबिसनसाहेब यांजवळचे कागदांत सांपडला त्यांजवरून.

१ श्रीमंताची स्वारी मार्गशीर्ष मासीं निघोन सासवडास नाना पुरंधरे यांचे वाडयांत जाऊन राहिलें. तेथून जेजूरी, मोरगांव, भुलेश्वर, वाई, वगैरे गेले. पुरंदर पाहिला नारायण याचें दर्शन घेतलें. पुण्यास माघ शु।। ७ मीस दाखल झाले.

२ वसई सरसुभ्याचें काम वामनाजी हरी मराठे यांजकडून दूर करून बाजीराव गोविंद बरवे यांस दिलें. तें काम कांहीं दिवत खंडेराव रास्ते व आन्याबा अभ्यंकर करीत होते. पुढें बाजीराव बर्वे यांजकडून सरसुभा दूर करून खंडेराव रास्ते यांजकडे सांगितला. शिंदे हिंदुस्थानांत गेल्यावर सरजेराव घाडगे कागलास जाऊन माघारे पुण्यास येऊन कुंजर यांचे घरीं खर्चाकरतां धरणें दिलें. तेव्हां श्रीमंतांनीं लोक पाठवून कुंजर यासह सोडून घेऊन सरजेराव यांस पुण्यांतून काढून दिलें. ते दरकूच शिंदे याचे लष्करांत गेले.

३ श्रीमंताकडील बाळोजी कुंजर व शिंदे यांजकडील देशमुख व लिंबाजी भास्कर व बाबाजी पाटणकर एक विचारे कारभार करूं लागले. सदाशिव माणकेश्वर याजविषयीं खातरी श्रीमंताजवळ बाळोजी कुंजर यांनीं करून सरकारांतून जवाहीर अंगावर घालावयास देऊन भागानगरास वकिलीवर पाठविलें. त्यांचे कारभारी कृष्णाजी भवानी श्रीमंताजवळ राहिले.

४ जयवंतराव महाणवर फत्तेसिंग बहादर यांजकडील सरंजामाची जप्ती सालमजकूरी केली छ. १० मोहरम.


५ कृष्णाजी दाभाडे यांजकडील सरंजामाची जप्ती सालमजकुरी केली छ. २२ मोहरम.

६ शिवाजी महाराज कोल्हापुरकर यांस पुत्र फाल्गुन व॥ ७ रविवारीं थोरले स्त्रीस झाले. त्याचें नांव आबासाहेब ठेविलें.

७ नारोपंत चक्रदेव कारभारांत होते तों पावेंतों तारिख तेच घालीतच होते व मामलती जिल्हेस कोणी पैका देणें व खर्च करणें त्याचे परवानगीनें तारिख होत असे. ते कैद झाल्यावर श्रीमंत तारिख घालों लागले. व चिंतोपंत देशमुख यांस माहीतगारीकरितां कामांत घेऊन मामलती जिल्हेस लावूं लागले. महाली मुलखी काम खुद पाहूं लागले. बरकड राजकारणी कामावर बाळोजी कुंजर वगैरे होते. रसद सरकारी व आपली खाजगी असा ठराव करावयाचा सांप्रदाय नवा श्रीमंतांनीं सुरूं केला.

८ धोंडोपंत गोडबोले यांस पलटणें तयार करावयास सांगितलीं.

९ बाजीरावसाहेब यांणीं दौलतराव शिंदे यांस स्वदस्तुर पत्र लिहून पाठविलें कीं तुम्हांकडून स्वदस्तूर अलिकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी वरचेवर पाठवीत जावें. समग्र पृथ्वीचे पाठीवर आमचे जन्मांतरीचें तःपश्चर्येचे सोबती एक आपणच सेवक आहेत. आह्माविषयीं किती काळजी आपले जवळ प्राण जीग जीग केले असतील. परंतु माझे जातीविषयीं आपला खंबीर लोभ व निष्ठा एकरूप आमचे मनोदयानुरूप वागावयाचीच राहून मोठ्या मोठ्या माणसाची सांगणी मनावर धरली. तीच कारणें जन्मपर्यंत शेवटास जाऊन शेवट गोड व्हावा. आपली उभयतांची कीर्त रहावी हेंच सबाह्यांतर आमची इच्छा आह्मांस राहून आणून संकटांत मोकळे करून, आह्मांविषयींचे कल्याण करावयाचेंच करावयाचें असा खंबीर भगवंत सत्तेंकरून धरून आम्हांस स्वरूपास **आणिली.** आणून उजेडास आणिलें. हें सर्व करणें आपण केलें तसेंच आमचे जन्मपर्यंत निभवावें. आपली अशी सख्य भक्तिची निष्ठा मनांत आणून, अंतःकर्णापासोन प्रसन्न होऊन लिहिण्यांत येतें कीं, बाबा आह्मांस आपण आहेत. आह्मीं आपले आहों ह्मणोन पत्र पाठविलें. तें राबिसनसाहेब याजवळचे कागदांत सांपडलें त्याजवरून.



कित्येक शब्दांची व्युत्पत्ती.

वऱ्हाड, मऱ्हाड, कऱ्हाड.

मराठा शब्द महाराष्ट्र शब्दाचा अपभ्रंश कित्येक समजतात. कित्येक महारट्ट शब्दाचा हा अपभ्रंश असावा असें ह्मणतात. आणि कित्येक मरहट्ट असें ह्या शब्दाचें मूळस्वरूप असावें असें प्रतिपादितात. पैकीं दुसरी व्युत्पत्ति विद्वानांना मान्य आहे, असें दिसतें. डा. भांडारकरांनीं आपल्या दख्खनच्या इतिहासांत हीच व्युत्पत्ति मानिली आहे. शकांच्या, शातवाहनाच्या, व अशोकाच्या वेळीं दक्षिणेंत रट्ट ह्मणून एक लोक होते; त्यांचेच भाऊबंद रट्ट, रड्डी, वगैरे उत्तर कर्नाटकांतील कांहीं जुने लोक होत; ह्या रट्टापैकीं कित्येक कुळी महापराक्रमी निघाल्या व त्यांनीं आपल्याला महारट्ट असें बहुमानार्थी नांव घेतलें; वगैरे अनुमानें काढिलेलीं प्रसिद्ध आहेत. कार्ले येथील शिलालेखांत महारथी व महारथिनी असे शब्द आलेले आहेत. ते दोन वर्षांपूर्वीच्या मराठ्यांचे वाचक आहेत, असें बहुतेक सर्व प्राचीन लेखसंशोधकांचें ह्मणणें आहे. परंतु महारथी ह्या संस्कृत शब्दाचें महारट्ट हें प्राकृत रूप कसें झालें हें नीट उलगडून कोणीच दाखविलें नाहीं. रथ शब्दाचें रह व रथी शब्दाचें रही अशीं प्राकृत रूपें होतात; रट्ट व रट्टी अशीं होत नाहींत. महारथी उगाच मजेखातर रूप लिहिलें, असेंहि म्हणणें शोभत नाहीं. कारण, हे शिलालेख कांहीं कोणाला फसविण्याकरितां लिहिलेले नाहींत. त्यावेळीं जें रूप प्रचलित असेल तेंच लिहिलें असेल. अशोकाच्या शिलालेखांत रास्टिक ह्मणून एक नांव येतें तें निराळेंच. येणेंप्रमाणें (१) रास्टिक, (२) महारथी, (३) महारट्ट, (४) मरहट्ट, व (५) महाराष्ट्र, असे एकाच देशांतील लोकांच्या नांवाचें पांच प्रकार पहाण्यांत येतात. ह्यापैकीं खरें नांव कोणतें असेल तें निश्चयानें सांगतां येत नाहीं. मराड, मरट्ट, मऱ्हाटा. मराठा, अशीं हीं रूपें अलीकडील सात आठशें वर्षांत प्रचारांत आहेत. मराठा ह्या

शब्द अलीकडील तीनशें वर्षांतील लेखांत दृष्टीस पडतो. त्या पूर्वीच्या तीनशें वर्षांतल्या ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथांत मऱ्हाटा असें रूप आढळतें. प्राकृत पिंगल-सूत्रांत मरट्ठ, महरट्ठ अशीं दोन रूपें सांपडतात. व एक दोन ताम्रपटांत मराड असें रूप येतें. सारांश, हा शब्द गेल्या दोन हजार वर्षांत नऊ दहा प्रकारांनीं लिहीत आले आहेत. पैकीं खरा शब्द व रूप महरट्ठ असावें असें वाटतें. रट्ठ हें ह्या देशांतील एका पुरातन कुळीचें नांव आहे; व महरट्ठ हे त्या-कुळींतील एका पोटभेदाचें नांव आहे. आतां, महरट्ठ म्हणजे मोठे रट्ठ असा जो कोणी कोणी विद्वान् अर्थ करतात, ह्या अर्थाहून निराळा एक अर्थ ह्या शब्दाचा करावा असें पुढील कारणाकरितां मला वाटतें. मराठींत वऱ्हाड व कऱ्हाड असे मऱ्हाड शब्दासारखेच दोन शब्द आहेत. हे दोन्हीं शब्द एकाच देशांतील निरनिराळ्या प्रांतांत रहाणाऱ्या लोकांचे वाचक आहेत. वऱ्हाड शब्द वहरट्ठ व कऱ्हाड शब्द कहरट्ठ शब्दाचा अपभ्रंश दिसतो. येणें प्रमाणें महरट्ठ वहरट्ठ व कहरट्ठ असे तीन शब्द पुढें येतात. हे तिन्हीं शब्द रट्ठांच्या निरनिराळ्या पोटभेदांचे वाचक आहेत हें उघड आहे. आतां, ताम्र-पत्रांतून व ग्रंथांतून कऱ्हाड शब्द करहाटक, करहट्ठ अशा रूपांनीं आढळतो, हें खरें आहे. परंतु, मरहट्ठ, मरहाटक, ह्या शब्दाप्रमाणेंच करहाटक, करहट्ठ हीं भ्रष्ट रूपें आहेत असें मानणें रास्त आहे. वरहट्ठ व वरहाटक हे शब्द ताम्रपटांत व ग्रंथांत कोठेंहि आढळत नाहींत. पण, महरट्ठ व कहरट्ठ ह्या शब्दांप्रमाणेंच हजार पंधराशें वर्षांपूर्वी वहरट्ठ हा शब्द प्रचलित होता असें अनुमान होतें. कदाचित् वहरट्ठ ही पोटकुळी राजकीयदृष्ट्या फारशी महत्त्वाची नसल्यामुळें तिचा नामनिर्देश ताम्रपटें व ग्रंथ ह्यांत नाहीं, इतकेंच. तेव्हां, वहरट्ठ, महरट्ठ व कहरट्ठ असे तीन शब्द व्युत्पत्यर्थ आपल्यापुढें उभे राहतात. ह्या तीन शब्दांतील वह, मह, व कह ह्या शकलांचे अर्थ बसवावयाचे आहेत. माझ्या मतें, वह ह्मणजे पलीकडील, मह ह्मणजे मधील व कह ह्मणजे अलीकडील, असे अर्थ घ्यावे. रट्ठ कुळींचे एकंदर तीन पोटभेद होते, पलीकडील रट्ठ ते वहरट्ठ, मधील, रट्ठ ते महरट्ठ, व अलीकडील रट्ठ ते

कहरट्ट. सारांश, हजार बाराशें वर्षांपूर्वी एके काळीं महाराष्ट्राचे वऱ्हाड, मऱ्हाड व कऱ्हाड असे तीन भाग होते व त्यांतील लोकांस वऱ्हाडी, मऱ्हाडी व कऱ्हाडी किंवा वऱ्हाडी, मराठे, व कऱ्हाडे अशीं नांवें पडलीं. ह्या तिन्हीं प्रांतातील तिन्हीं पोटकुळ्या एकच भाषा बोलतात व एकाच कुळींतल्या आहेत. मधील पोटकुळीतील जे महरट्ट किंवा मराठे ते राजकीय चळवळी करणारे असल्यामुळें त्यांच्या नांवानें नागपुरापासून तुंगभद्रेपर्यंत व तैलंगणपासून कोंकणापर्यंत जो विस्तीर्ण मुलुख आहे तो महशूर झाला आहे. भोज, पिटिनिक, अपरांतिक, वगैरे पैठण, नगर, उत्तर कोंकण प्रांतांतील मराठी भाषेसारखीच भाषा बोलणारे लोक राजकीयदृष्ट्या महत्वाचे नसल्यामुळें महरट्टांच्या ह्मणजे मराठ्यांच्या तेजांखालीं लोपून गेले. नाशकापासून वाईपर्यंतचा जो टापू तो महरट्टांचा मूळदेश; वाईपासून कोल्हापुरापर्यंतचा जो प्रांत तो कहरट्टाचा मुलूख; व खानदेशापासून नागपूर प्रांतापर्यंतचा जो देश तो वहरट्टांचा प्रांत, असा प्रकार होता. पहिल्यांदा एकटी महरट्ट कुळी राजकीयदृष्ट्या महत्वाची झाली; तिनें पुढें वहरट्ट व कहरट्ट ह्या पोटकुळ्या आत्मसात् केल्या; आणि नंतर वाढत वाढत नागपूर, खानदेश, पैठण, बालेघाट, गुलबुर्गा, कोल्हापूर, बेळगांव, उत्तरकोंकण, दक्षिणकोंकण, गोंवा, कारवार, वगैरे प्रदेश आक्रमिले. हा प्रकार शहाजी व शिवाजी ह्यांच्या पर्यंतच्या पांचशें वर्षांत झाला. नंतर मराठशाहींत ओडिसा, ग्वालेर, इंदूर, बडोदा, गुजराथ, अर्काट, तंजावर, येथपर्यंत मराठ्यांच्या छावण्या व वसाहती पसरल्या. असा हा मराठ्यांच्या कुळीच्या राजकीय प्रसाराचा वृत्तांत आहे. हा प्रसार होतांना पूर्वी अनेक अडथळे आलेले आहेत व सध्यां तर तो बहुतेक थांबल्यासारखाच आहे. परंतु ह्या कुळीच्या वाढीचा गेल्या दोन हजार वर्षांचा इतिहास पहातां, सर्व आर्यावर्तावर व जवळच्या म्लेंच्छ देशांवर ही कुळी पसरावी असा अंदाज बांधावा लागतो. ही पसरणी होतांना हजारों ठेंचा, लाखों अडचणी व शेंकडों वर्षे लागतील, हें उघड आहे.

शिवगड, शिवगंगा व शिवपूर.

पुण्याच्या दक्षिणेस दहा बारा मैलांवर सिंहगड नांवाचा प्रसिद्ध किल्ला आहे. ह्या किल्याचे सिंहगड हें नांव शिवाजीनें तानाजी मालुसऱ्याच्या स्मरणार्थ ठेविलें; व मराठ्यांच्या इतिहासांत त्याच नांवानें तो किल्ला प्रसिद्ध आहे. शिवाजीच्या पूर्वी मुसलमानांच्या अमदानींत ह्या किल्याला कोंडाणा ह्मणत असत. हें नांव मुसुलमानांनीं फारशी भाषेंतून ठेविलेलें नाहीं. गडाच्या पूर्वेस कोंडणपूर ह्मणून एक गांव आहे, त्यावरून सान्निध्यामुळें कोंडणा असें गडाला मुसुलमानांच्या पूर्वीच नांव पडलेलें आहे. " अस्ति दक्षिणपथे कुंडिनपुरं नामनगरम्" हें पंचतंत्रांतील वाक्य सर्वश्रुत आहे. तेंच हें कुंडिनपुर ऊर्फ अपभ्रंशानें कोंडणपुर असावें. परंतु हेंही ह्या किल्याचें सान्निध्यानें नांव पडलेलें आहे; खरें नांव नव्हे. ह्या किल्याचें खरें नांव शिवगड. गडाच्या माचीवरील कोळी आणि कल्याण वगैरे आसपासच्या खेड्यांतील गांवढे ह्या गडाला शिवगड ह्मणतात. ह्या गडापासून जी नदी कोंडणपुरावरून पूर्वेकडे शिवापूरास जाऊन वनेश्वरावरून नीरेला मिळते, तिला शिवगंगा ह्मणतात. तिच्या कांठीं असलेलें मोठें गांव शिवपूर होय. हें गांव शिवाजीच्या वेळेस अगदीं भोज्ज्याजीस आलें होतें. तेथें शिवाजीच्या मनांत एके वेळीं आपली राजधानी करावी अस्से येऊन, त्या गांवाची चांगली उस्तवारी झाली व त्यास शिवापुर असें नांव पडलें.

कोल्हापूर.

सह्याद्रीच्या कांहीं भागांतील पूर्वेकडे उघडणाऱ्या खोऱ्यांना ज्याप्रमाणें मावळे ह्मणतात, त्याप्रमाणेंच ह्या पर्वताच्या कांहीं भागांतील खोऱ्यांना कोल ह्मणण्याची पुरातन कागदपत्रांत वहिवाट आहे. कोल्हापूराच्या पश्चिमेकडील सह्याद्रीच्या खोऱ्यांना कोल ह्मणत. ह्या कोलांतून देशांत येतांना वस्तीचा जो मोठा गांव त्याला पुरातन काळीं कोलापूर ह्मणत व अर्वाचीन काळीं कोल्हापूर

अथवा कोल्हापूर ह्मणतात. कोल्हा ह्या जनावराच्या नांवाशीं ह्या शहराच्या नांवाचा कांहीं एक संबध नाहीं. कोल्हापूरच्या पश्चिमेकडील खोऱ्यांत फार पुरातन काळीं कोल ऊर्फ कोळ लोक रहात होते, त्यावरून त्यांच्या प्रांतालाहि कोळ ह्मणत असत. सह्याद्री पर्वतांतील कातकरी, भिल्ल, कोळी, कातवडी वगैरे मूळच्या लोकांपैकींच हे कोल ऊर्फ कोळ होत. कोल्हापूराचें करवीर हें संस्कृत नांव सापेक्ष दृष्टीनें अलीकडील आहे असें दिसतें.

महाबळेश्वर.

सह्याद्रीच्या ज्या खोऱ्यांना सध्यां आपण मावळें ह्मणतों त्यांना हजार बाराशें वर्षांपूर्वी मामल ही संज्ञा असे. ह्या मामलदेशांतील जी मुख्य देवता ही मामलेश्वर अथवा मामलेस्त. महाबळेश्वराच्या भोंवतालील खेडयांतील लोक महाबळेश्वराला मामलेसरच ह्मणतात. मामलेसराला महाबळेश्वर हें नांव शास्त्रीपंडितांनीं आपल्या संस्कृत वाणीला साजेल असें दिलें आहे.

खानदेश व सेउणदेश.

खानदेश हें नांव बऱ्हाणपूराच्या किंवा अलजपूराच्या नबाबानीं दिलें असा कित्येक युरोपियनांचा व एतद्देशियांचा तर्क आहे, आणि खान ह्या शब्दाकडे पहातां सकृद्दर्शनीं हा तर्क खरा असावा असें समजण्याकडे प्रवृत्ति होते. परंतु किंचित् सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां असें दिसून येतें कीं हा शब्द अगदीं शुद्ध प्राकृत आहे. ह्या प्रांताचें मूळचें नांव कन्हदेश. कृन्हदेश ह्मणजे कृष्णदेश. देवगिरीच्या यादव कुळांत कृष्ण ऊर्फ कन्ह नांवाचा राजा झाला. त्यानें आपलें नांव ह्या प्रांताला दिलें. कन्हदेश, कान्हदेश, कानहनदेश, व खानदेश, अशा परंपरेनें अपभ्रंश होत होत खानदेश असें नांव प्रचलीत झालें. वहरइ उर्फ वऱ्हाड व नाशिक ह्यांच्या दरम्यानचा जो पश्चिमेकडील प्रांत त्याला कन्हदेश ऊर्फ खानदेश ह्मणत. वऱ्हाड व नाशिक ह्यांच्या दरम्यानच्या जो पूर्वेकडील व गोदेच्या उत्तरेकडील प्रांत तो देवगिरी ऊर्फ देवरी प्रांत होय, आणि देवगिरीच्य

दक्षिणेस, नाशकाच्या पूर्वेस व जुन्नराच्या उत्तरेस जो प्रांत आहे त्याला सेउणदेश ह्मणत. ह्या सेऊणदेशाची राजधानी सेउणनगर उर्फ सध्याचें सिन्नर होय. सेउण हा यादव कुळांतील एक राजा होता. ह्या सेउणदेशाचा उल्लेख डाक्टर भांडारकरांच्या दख्खनच्या इतिहासांत आहे. परंतु सेउणदेश ह्मणजे सध्याचा अमका प्रांत असें त्यांत सांगितलें नाहीं.

अमदानगर.

देवगिरि ऊर्फ देविचा घांट चढून वर आलें ह्मणजे अमदानगर लागतें. ह्यालाच प्रस्तुतकालीं अहमदनगर ह्मणतात. अहमदनगर अमदानगर शब्दाचा अपभ्रंश आहे. अमदा ह्मणून यादवकुळांतील एका राजाची नाटकशाळा होती तिच्यावरून ह्या शहराला अमदानगर नांव पडलें असें कित्येक लोक ह्मणतात. अमदा ऊर्फ अमळा ह्या नदीच्या नांवावरून हें नाव पडलें असें ही कित्येकांचें ह्मणणें आहे. ह्यापैकीं कोणतेंहि ह्मणणें खरें धरलें तरी ह्या शहराचें नांव मूळचें फारशी नाही हें निर्विवाद आहे.

राजुरी, राउरी, राजपुरी, रायरी, रायरेश्वर.

राजपुरी हा मूळ संस्कृत शब्द त्याचें प्राकृत राअउरी शउरी राहुरी; राजा शब्दाचें जुनें मराठी राअ, राय. त्यापासून रायपुरी, रायरी, रायरेश्वर. राजपुरी हें गाव वाईच्या दक्षिणेस तीन कोसांवर व रायरेश्वराचा डोंगर वाईच्या पश्चिमेस चार कोसांवर आहे. राजपुरी, वेरुळी, रायरेश्वर वगैरे ठिकाणीं जुन्या सिद्ध पुरुषांची व राजपुरुषांची एकेका प्रचंड दगडाची थडगीं आहेत. तीं थडगीं आपल्या पूर्वजांचीं आहेत, असें तेथील गांवढे सांगतात.

वेरूळ, वेरूळी, येरुळी.

दौलताबादेजवळील वेरूळचीं लेणीं प्रसिद्ध आहेत. वेरूळ शब्द विहारालय शब्दाचा प्राकृत अपभ्रंश आहे. [illegible] लहान विहारालय ह्मणजे वेरूळी.

वाईच्या उत्तरेस अंबाड खिंडीजवळ डोंगरावर वेरुळी ह्मणून गांव आहे. वेरुळीचा येरुळी हा अपभ्रंश आहे.

कान्हेरी, कण्हेरी, कण्हेरखेड कानगाव

कन्हगिरीचा अपभ्रंश कन्हेरी, कान्हेरी, कण्हेरी. कण्हेरी हें गांव वाईच्या उत्तरेस असणाऱ्या मांढरदेवीच्या डोंगराच्या पूर्वेस दोन कोसांवर व शिरवळाच्या दक्षिणेस दोन कोसांवर आहे. येथें डोंगरांत एक विहार आहे. त्याचें तोंड एका प्रचड शिलेनें कोंदलें आहे. आंत खोल्या, तळें वगैरे आहेत ह्मणून वृद्ध सांगतात. कण्हेरी येथील रामदाशी मठाचे मूळ संस्थापक वासुदेवबोवा—रामदासस्वामीचे शिष्य—ह्या गुहेंत तपश्चर्या करीत असत.

खंडाळें, खिंडाकें.

महाराष्ट्रांत खंडाळीं पुष्कळ आहेत. खिंडतल, खंडतल, खंडअळ, खंडाळ, खिंडाळ, अशा परंपरेनें हा शब्द आला आहे. खिंडीच्या तळचें किंवा माथ्यावरचें जें गांव तें खंडाळें.

पंढरी.

गांव ब भोंवतालील शिवार ह्यांना पंढरी व काळी अशा संज्ञा महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहेत. गांवांतील घरठाणाची जेवढी जागा तेवढी पांढरी; व शेतें, कुरण, वगैरे सर्व काळी. पंढरीस मूळची कोष्टयांची वस्ती दहापाच घरांची होती. ह्मणून तिला मुळीं पंढरी अथवा पांढरी ह्मणत. जेथें सध्या विठोबाचें देऊळ आहे तेथें पूर्वी शेतें होतीं. ह्या काळींचा जो देव त्याला काळ्या ह्मणत. ह्याच काळ्याला सान्निध्यानें पंढरीचा राणा ह्मणू लागले. ही माहिती एका वारकऱ्यानें दिलेली आहे.

धणीचाबाग.

साताराशहरांत पहिल्या शाहु महाराजांच्या वेळेपासून छत्रपतींचे कांहीं

बाग आहेत. पैकीं एका बागाला धणीचाबाग ह्मणतात, व एका विहिरीला किंवा चिरेबंदी जल विहाराच्या जागेला धणीची विहीर म्हणतात. धणीचा बाग व धणीची विहीर म्हणजे कोणाचा बाग व कोणाची विहीर म्हणून कित्येक लहान मोठ्या माहितगार लोकांस विचारतां समाधानकारक उत्तर मिळत नाहीं. कोणी ह्मणत, धणी ह्मणजे धनी अर्थात् छत्रपति. परंतु धनी शब्दांतील नीची णी कशी झाली तें कोणी सांगेना. कोणी ह्मणत धनीण ह्या शब्दाचा अपभ्रंश धणी असावा. त्यांच्यां मतें धनिणीचा बाग ह्यावद्दल धणीचा बाग असा जलद बोलण्यानें अपभ्रंश झाला असावा. ही व्युत्पत्ति खरी मानण्याला एक अडचण येई. ती अशी कीं ह्या बागेंत शाहूच्या राण्या रहात नसून एक सुस्वरूप नाटकशाळा रहात असे. राण्या रहात असल्या तर धणी म्हणजे धनीण ऊर्फ राणी असा अर्थ करतां आला असता. तेव्हां धणी ह्या शब्दाचा दुसरा कांहीं तरी अर्थ असला पाहिजे. धणी हें विशेषनामहि नाहीं, अर्थात, धणी हा शब्द आधुनिक मराठी भाषेतून बहुतेक लुप्त झालेला असला पाहिजे व त्याचा पत्ता चार पांचशें किंवा नऊ दहाशें वर्षांपाठीमागें काढीत गेलें पाहिजे. निर्णयसागर छापखान्यांत छापलेल्या प्राकृत पिंगलसूत्रांच्या ६४ व्या पृष्ठावर खालील श्लोक आहे.

प्राकृत.

रे धणि मत्तमअंगजगामिणि,
खंजणलोअणि, चंदमुहि, ।
चंचल जुव्वण जात ण आणहि;
छइल्ल समप्पइ काँइ णहि ? ॥

संस्कृत.

रे प्रिये मत्तमतंगजगामिनि,
खंजनलोचने, चंद्रमुखि, ।

... नं. ...

चलं यौवनं जातं न जानासि;
विदग्धेभ्यः समर्पयसि कुतो नहि ? ॥

त्यांत धणी ह्या शब्दाचा अर्थ वारयोषित् आहे. हाच धणी शब्द साताऱ्यांतील धणीचा बाग व धणीची विहीर ह्यांच्या मालकिणीला लागलेला अद्यापही ऐकूं येतो.

सातारा.

हा शब्द सितारा ह्या फारशी शब्दापासून निघाला असावा असें अनेकांचें ह्मणणें आहे. माझ्या मतें, हा शब्द शुद्ध मराठी आहे. सध्याच्या साताऱ्याच्या दक्षिणेस सातें ह्मणून एक गांव आहे, त्याच्या जवळचा जो दरा तो सातदरा. हा सातदरा सातारा किल्ल्याच्या दक्षिणेस ऊरमोडीच्या पलीकडे जो डोंगर आहे त्याच्या कुशींत आहे. जुना सातारा ह्मणून ज्याला ह्मणतात तें गांव व तो दरा येथेंच होतें व आहे. पुढें महा दऱ्याच्या जवळ जुन्या साताऱ्यांतील लोकांनीं येऊन वस्ती केली, तेव्हां त्या वस्तीला सातारा हें नांव पडलें. मराठी सातारा व फारशी सितारा हे शब्द एका वेलांटीनेंच तेवढें भिन्न असल्यामुळें व फारशींत सतारा व सितारा हे दोन्हीं शब्द एकाच अक्षरांनीं लिहित असल्यामुळें, सातारा हा शब्द सितारा ह्या फारशी शब्दाचा अपभ्रंश असावा, असा तर्क निघाला. परंतु, मुसुलमानांचें आगमन महाराष्ट्रांत होण्याच्या पूर्वी सातदरा ऊर्फ सातारा अस्तित्वांत असल्यामुळें, हा तर्क निराधार आहे हें उघड आहे.

पेण.

प्रकीर्ण ह्याचें प्राकृत पइण्ण. प्रकीर्णग्राम=पइण्णगाम=पेण्णगांव=पेण जेथील घरें मूळचीं दूर दूर होतीं तें पेण गांव.

वसई.

सं. वसति=प्रा. वसइ.


पैठण.

फलस्थान=फलठाण=फलटण. मलस्थान=मालठाण=मलठण. विंवस्थान=विंवटाण=ठाणें. प्रतिस्थान=पइठाण=पैठण. पट्टन ह्या शब्दाशीं पैठणाचा काहीं एक संबंध नाहीं.

रंकाळें.

कोल्हापुरास एक मोठा तलाव आहे, त्याला रंकाळ्याचा तलाव ह्मणून ह्मणतात. त्याचें कारण असें सांगतात कीं ह्या ठिकाणीं एक अत्यंत दरिद्री माणूस रहात होता. त्यानें कवडी कवडी भिक्षा मागून हें तळें मूळ बांधिलें. ह्या आख्यायिकेवर जर फारशी भिस्त ठेविली नाहीं, तर ह्या शब्दाची व्युत्पत्ती निराळ्या तऱ्हेनें करतां येण्यासारखी आहे. कोल्हापुरास पुष्कळ तळ्यांना नावें झाडावरून पडलीं आहेत. जसें—पद्माळें वगैरे. त्याप्रमाणेंच रंकाळें शब्द हा एका जुन्या वनस्पतिवाचक शब्दाचा अपभ्रंश आहे. लंकालय असा शब्द गाथासप्तशतीच्या चवथ्या शतकाच्या १९ व्या श्लोकांत आला आहे. " लंका रक्षःपुरी शाखा शाकिनी कुलटासुच " लंका ह्मणजे झाडी, कुंज. ज्या तळ्याभोंवती कुंज आहेत तें लंकालय. ह्या लंकालयांत एक जुना संध्यामठ आहे. तो पन्हाळच्या भोजराजाच्या वेळेपासूनचा आहे असें ह्मणतात. व त्या मठाच्या रचनेवरून तो त्या वेळचा असावा ह्यांत संशय नाहीं.

विश्वनाथ काशीनाथ राजवाडे.



श्री.

महाराष्ट्र इतिहास.

(गोविंदराव काळे यांचें दफ्तर.)

सरकारी-रावसाहेब.

श्रीमंत राजश्री माधवराव नारायेण पंत प्रधान यांस

पत्रें रवाना केलीं.

आवो तीसईन. १

माहे मोहरम उर्फ श्रावण मास चंद्र १९ रोजीं डांकेवर.

शके १७१५ श्रा. व. २ शुक्रवार,

श्री.

श्रीमंत राजश्री ——— ——— राव ———

साहेब स्वामीचे सेवेसीं ———

विनंती. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सा। नमस्कार विनंती विज्ञापना. ता। छ १९ माहे मोहरम पर्यंत मु। बेदर येथें स्वामीचे कृपावलोकनेंकरून

---

१ (शके १७१४ माघपासून शके १७१६ ज्येष्ठपर्यंत ह्मणे इ. स. १७९३ जानुआरी, फेब्रुआरी, ते इ. स. १७९४ मे, जून.)

सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष– छ २० माहे जिल्हेजचें पत्र सरकारांतुन सादर जालें तें छ २७ माहे माारीं पावलें. त्यांत " नबाब टिपु " सुलतान बाहदुर यांचे मसलहतसमंधी तिहीं सरकारचे करारनामे जाले, " त्यांत सरकारचे तेरावे कलमांत, व नबाबाकडील दहावे कलमांत, " आइंदा टिपु बाहदुर यांनीं बदआहदी केल्यास तिहीं सरकारांनीं येक होऊन " त्याची तंबी करावी. याचा ठराव पुढें तीहीं सरकारचे सलाहानें केला " जाईल ह्मणोन करार आहे. त्यास जनराल लाड बाहदुर यांजकडून मिस्तर " किनवी यांनीं याद नबाब निज्याम आलि खानबाहादुर यांस दाखविली " त्याची नकल नबाबांनीं तुह्मांपासी दिल्ही, तुह्मी हुजुर पाठविली, व मिस्तर " मालिट यांनीं सरकारांत याद गुजराणिली; दोहींचा माार येकच. त्यास याचा " विचार पाहतां करारनामा पहिला जालाच आहे; हासल मुद्दा टिपुने बदमा- " मली केल्यास त्यास तंबी करावयाची. याजकरितां या कलमाचाठराव " येकाच कलमांत ठराऊन फर्द पाठविली आहे, ते मिस्तर मालिट यास " दाखविली. त्याचे बोलण्यात आलें कीं "लाड बाहदुर यांचे यादी बमोजीब " व्हावें; त्यास तेरावे कलमांतील मसलहतीच्या ठरावाच्या शाकला यांत आल्याचें " आहेत. याजकरितां येकच कलम ठराउन पाठविलें यांत जाबसाल उगविल. " या माराचें थैली पत्र नबाबास व ठरावाची फर्द पाठविली" असें पत्र देऊन " फर्द दाखवणें, याचे जाब घेऊन लौकर पाठवणें " ह्मणोन आज्ञा त्यास नबाबाकडे जाऊन मध्यस्त समीप असतां सरकारांचें थैलीपत्र प्रविष्ट केलें, व येक कलमाची फर्द सरकारांतुन आली, तेही दाखविली; याजवर. तीनचार घटिकापर्यंत बोलणें जालें. याचा जाा आलाहिदा पुरवणीपत्रीं विनंती लिा आहे. आवलोकनें सविस्तर माार ध्यानात येईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

शके १७१५ श्रा: व: ५ शुक्रवार:

श्री.

विनंती विज्ञापना: नबाबास सरकारांचें थैलीपत्र प्रविष्ट करून येक केलें.

माची फर्द सरकारांतुन ठराऊन आली. ती दाखविल्या नंतर नबाब बोलले कीं
" इंग्रजांनीं सात दफा ठरऊन यादास्त पाठविली असतां, हे एक कलमाची
" मुख्तसर फर्द यांत ते मतलब उगवत नाहींत. मुख्तसर फर्द ठरवावयाची
" सबब काय ?" ह्मणोन मजला विच्यारिलें. याचें उत्तर मीं केलें कीं
" पेशजी टिपु सुलतान यांचे मसलहत प्रकर्णी तीन सरकारचे तहनामे परस्परें
" जाले त्यांतील आह्मांकडील तेरावे व इकडील दाहावे दफेंत आईंदा तजवीज
" ठरावी असें आहे. त्या प्रकर्णी हल्लीं इंग्रजांनीं सात दफेची यादास्त पाठविली,
" तो मतलब एक कलमांतच उगवला. त्यापक्षीं सात दफेचें लिहिणें तुल व विशेष
" नाहीं. तेरावे व दहावे दफेंतील जो मजमून याचा मतलब या फर्देत आला,
" तेव्हां लांब लिहिण्याचें प्रयोजन नाहीं, सबब एक फर्दच ठरली यांत कांहीं गेलें
" नाहीं." याजवर मध्यस्त बोलले कीं " पुढील तहनामा झाल्यानंतर मागील
" तहनामा बरबाद होतो. मागील तहनाम्यांत तेरावे व दाहावे दफेंत आईंदा
" तजवीज ठरावयाचा लेख. त्यासआईंदा तजवीज ठरण्याची तरकीब इंग्रजांनीं
" सात दफेची याद पाठविली त्यांत उघडी आहे या मुख्तसर कलमांत मागील
" तहनाम्यावर हवा पडला यांत ठराव व्हावा तो कांहीं जालाच नाहीं
" तेव्हां पहिला तहनामा आहे तोच अधीक काय ठरलें ? आईंदा
" तजविजीची तरकीब काय ठरली? असे इंग्रज ह्मणो लागल्यास याचा जबाब
" काय ?" याचें उत्तर मीं केलें कीं " इंग्रज वाजवीनें बोलूं लागल्यास याचा
" जबाब हाच कीं तेरावे व दहावे कलमांत टिपूकडून बद आहदी दर येकासी
" जाल्यास, त्याचा ठराव आईंदा तीन शरीकांचे विच्यारें व्हावा
" येसा सांवीक तहनाम्यांतील करार. याचा ठराव हल्लीं जाला कीं बद
" आहदीची दर्याफ्त दोघां शरीकांनीं करून तरफसानीकडे नसियतपूर्वक
" सांगोन पाठवावें. इतक्यावर त्यानें न ऐकिल्यास पहिले तहनाम्याप्रा करावें
" असें आहे. त्या अर्थी ठराव उलगडुन जाला; ठराव न होण्यांत बाकी
" काय आहे ?" या प्रा बोलल्यानंतर मध्यस्त मागती बोलले कीं " ज्यासमई
"तरफसानीकडून बद आहदी होईल त्याप्रसंगीं जर इंग्रजास गरज आहे

" तर तुह्मीं ह्मणतां याचप्रा समजोन कांहीही प्रतीची सबब; दरपेष न
" आणितां चालतील; हें न होतां त्यांजला गरज नाहीं असें जाल्यास, याचा
" उलट अर्थ करतील कीं, साबीक तहनाम्याचे तेरावे व दहावे दफेत आइंदा
" शकल ठरावी असें आहे त्याची शकल तर अलिकडे काहीं मुख्तसर
" फर्देत ठरली नाहीं; मागील तहनाम्याप्रा करावें ऐसा लेख; मागील
" तहनाम्यांत तो ठराव नाहीं; त्यापक्षी ठराव आतां होणें; तेव्हां त्या वरुतीं
" जसी गरज व मतलब तसें ह्मणों लागतील; त्यास नाहीं होय ह्मणावयाची
" दरज राहत नाहीं. यास्तव प्रसंगोपात त्यांची दरज कांहीं न राहतां हलींचा
" तहनामा उलगडावा. तो या मुख्तसर कलमानें. पुढें इतका विच्यार
" आहे. यास्तव इंग्रजांनीं सात दफे लिहिल्या त्यात खुलासा ठरावाची
" तरकीब आहे त्याप्रा खोलून असावें हें सलाह." या प्रा मध्यस्त
बोलले. त्यास सात दफे न लिहिण्याचीं कारणें सर्व मनांत, परंतु यांसीं त्यां-
तील कांहीं बोलण्याची आज्ञा नाहीं, आणि हीं मनांतील कारणें; यांचा फाया-
पही करावयाचा नाहीं; याजकारितां फर्देत जें लिहिलें होतें त्या अन्वयें यांसीं
बोलण्यांत आलें. एक गोष्ट मध्यस्त बोलले कीं "मागील तहनाम्यांत
" आइंदावर हवाला दिल्हा. त्याचा ठराव हलीं होतो यांतही मोहगम आहे.
" तरकीब ठरली नाहीं. हीच दिकत इंग्रज घेतील" याचें उत्तर त्यांस असें दिलें
कीं " आइंदा शकल ठरावांत येईल असें पेशजीचे तहनाम्यांत आहे. ह्मणोन
" हलीचे येका कामाचे फर्दांत लिहिलें आहे कीं सकल पेशजीचें तहनाम्याप्रा
" तिंही परीकांनीं करावी. त्यास जसी पूर्वी तव्हे मसलहतीची ठरली त्या
" प्राच तरकीब; ऐसा अर्थ यांत निघाला कीं नाहीं? तेव्हां हलीची
" फर्द मोहगम नाहीं. यांत तरकीब ठरावांत आली. साता कलमांचा तहनामा
" केला; त्यांत तूल फार आहे. एक कलमाची फर्द ठराविली, यांत मुख्तसर
" थोडक्यांत आहे, अर्थ कांहीं गेला नाहीं, असें समजोन ही फर्द ठरून
" आली. त्यास दोंहीं सरकारचें येकवाक्यतेचें उत्तर इंग्रजांसी व्हावें
इतकाच प्रकार " याजवर नबाबांसमक्ष मध्यस्त बोलले कीं " इंग्रजांनीं

" ठराविलें त्यांत परीकाचे फौजेनें प्रसंग पडतांच जे हजर असेल तित-
" क्यानसी सामील व्हावें. नंतर पुढें कसें करावें याची तजवीज तिवांचें
" विच्यारें ठरऊन करावें याप्रा उलगडून लिहिलें, तसें या फर्दंत उलगडलें
" नाहीं, याजकरितां मनांत कल्पना येतात त्या सांगतों. त्याप्रा तुह्मीं
" श्रीमंतांस लिहून पाठवून उत्तर आणवावें नंतर ठरविण्यांत येईल, असें
" नवाबांनीं सांगितलें " त्याप्रा कलमवंदीची पुरवणी आलाहिदा पा
त्यावरून ध्यानांत येईल रा।छ १९ मोहरम हे विज्ञापना.

शके १७१५ श्रा. व. २५ शुक्रवार.

श्री.

विनंती विज्ञापना यैसीजे. नवाबास सरकारचा खरीता दिल्हा. त्याचा जबाब मोहरम माझे पत्रावर हवाला घालून स्वामीचे नांवें खरीता दिल्हा, व पुरवणी लिहावयासी सांगितली, ती नवाबांनीं आपण रोंबरो वाचून पाहून रवाना करावयासी सांगितलें, त्यास खरीता पाठविला आहे, व आकरा कलमाची पुरवणी आलाहिदा आहे, त्यावरून ध्यानास येईल. कलमवंदीचें नवाबाची आज्ञा येईल त्याप्रा नवाबासी जाबसाल बोलण्यांत येतील. रा।छ. मोहरम हे विज्ञापना.

नवाबांनीं श्रीमंतांस पत्र लिहिलें त्याची नकल.

---

१ (रूबरू).

२ अस्सल पत्र फारसी लिपींत व भाषेंत आहे. भाषेंत बऱ्याच चुका आहेत. तथापि, मराठी वाचकांकारितां सर्व भाग कायम ठेऊन बालबोध लिपींत मूळ व त्याचा अनुवाद दिला आहे. मराठी अनुवाद खेरीज करून बाकीचे सर्व श्रम आमचे मित्र रा. रा. कृष्णलाल मोहनलाल जव्हेरी एम्. ए. एल्. एल्. बी. वकील हायकोर्ट यांचे आहेत व त्याबद्दल त्यांचे आह्मीं फार आभारी आहोंत. ह्याचा निर्देश प्रस्तावनेंत केलाच आहे.

फारसी पत्राची नकल.

एलाही.

शहामत व बसालत मुस्तब उबहत व अयालत मनझलत मनीअ-उ-श्शान बुलंद मकान बरखुरदार सतुदेह अतवार दरहिबज्ञ बाशंद.

मकतूबे मरगूब मुसर्रत असलूब मुशएर बरसीदने मीस्तर हाल किनवी दिलावरजंग व मुरसले लार्ड कार्नवालिस बहादुर के बराये फिरस्तादने निझदे

---

१ सदरपत्राचा मराठींत अनुवादः—" मिस्तर हाल किनवी दिलावरजंग यांजकडून आलेली तहनाम्याची कलमबंदी व कॉर्नवालिस बहादुर यांचें पत्र अर्शी आपलेकडे रवाना होण्याकरितां रा. गोविंदराव कृष्ण यांजजवळ दिलीं होतीं तीं पाँचल्याचें आपलें कृपापत्र वाचून परम संतोष होऊन समाधान वाटलें. तसेंच, लाटसाहेब बहादुर यांचे तर्फे मिस्तर मालीटसाहेब यांनीही पूर्वी ठरल्या बमोजीब हर्फबहर्फ तहनाम्याची याददास्त पाठविली आहे; व त्यांतील मुख्य मुद्याचा भाग इतकाच आहे कीं दिपुसुलतानने अद आहदी केल्यात लागलीच त्यास तंबी करणें योग्य व अवश्य होणार आहे नंतर याचा सारांश एक दफेत घालून मिस्तर मालीट यांस दाखविला. त्याबर त्यांजबराबर झालेल्या भाषणांत असें निघालें कीं लाटसाहेबांकडून आलेल्या तहनाम्याबमोजीब सर्व झालेलें बरें. तेराव्या कलमांतील मजकूर ज्या मानें निराळे फर्दत गोविला आहे, त्या प्रमाणेंच हल्लीं या मजकुरी निराळे फर्दत गोविला जाऊन स्पष्ट खुलाशासह आपल्याकडून त्याजकडे पाठविला जावा म्हणजे त्याचा जबाब लवकर येऊं शकेल. सदर संबंधी सविस्तर माहिती गोविंदरावांनीं लिहिलीच आहे, त्यांजवरून सर्व ध्यानांत येईल. सदरहु प्रकरणसंबंधानें पुढील परिणामावर दृष्टि ठेऊन विशेष सावधगिरी ठेविली पाहिजे व झणजच हाईल तितक्या कालजीनें एकंदर प्रकर्णाचा सूक्ष्म विचार करून मागचा पुढचा विचार पाहून सर्व ठरविल पाहिजे. ह्यासंबंधी आलाहिदा कलमबंदी सदरहु गोविंदराव यांस सांगण्यांत आलीच आहे. त्या सर्वांचा विचार होऊन उत्तर यावें. पाठविलेली फर्द कशी फायदेशीर होणार आहे याचा विचार लार्ड कॉर्नवालीस साहेबांकडून आलेल्या कलमबंदीच्या अवलोकनाबरोबर व्हावा व या सर्व गोष्टींचा विचार होऊन योग्य व ग्राह्य वाटेल तो विचार इकडे सत्वर कळविला जावा. तसेंच राजमान्यराजश्री राव यांचे पत्रावरून सर्व कलमें स्पष्टपणें समजण्यांत येतील. आपले दिवस सुखानें जावोत!"

आन शहामत मुरत्तेब हवाले राव गोविंद किशन शुदेबद. बइनकेट मिस्तर माले नीझ अझ तर्फे लार्डबहादुर याददाश्त मुतावके दफआते मझकूरे लफ्झबलफ्झ रसानीदेह. चुनकरारनामेदर अवायिल झीबेतरतिप या फतेह व कुल्लियये हमीन के अगर टिपू सुलतान बद सलूकी नुमायद तदारुक बतलाफीये आन लाझम व झरूर. बनाबर आन शिक्के इनमानी दरएक कलम मुकरर साखतेह बमिस्तर मालेट नमूदे शुदे, दरकीलोकाले मिस्तरे मझकूर चुनान बर आमद के मुवाफके याददाश्ते फिरस्तादये लार्ड बहादुर व अमल आयद. चुन तदबीराते दफे सीझदहुम दरफर्दे मुशरुखसे हाल पानकाल दर आमदे अझीन ममर यककलम करारदादे फर्दे आन (अझ?) जानुबेमा बदौलत तरस्सूल याफतेह जबाबश बझूदी बरसद. मफसूल बगोविंदराव किशन कलमी शुदेह बयान खाहंद नमूद वसुले बेहजत शमूल (खाहंद?) नमूद. चुन मुकदमये मरकूमे अझ कुल्लियात ब एहतियात दर उमूर आतीये अझाल वाझम वहझम व माल अंदेशी असत बनावरान बाझी मरातेब दरीन बाब व रावे मझकूर फरमुदेह शुदेह ताबादे दरयाफ्त जवाबे मुरातबे मरकूमये हुस्ने फर्दे मुरसले उश्शहामत मरतबत बादफाते तजवीझ लार्ड बहादुर ब मीझाने तासुल संजीदे आनचे मुनासब बाशद व तजवीझ दर आयद इतला दारे शवद वहम अझ नवश्ते रावे मोअझझ मफसुल पयरायये इझाह खाहद याफत. झीयादे अय्याम बफाम बाशद.

श्रीमंतांस अक्रा दफ्याची पुरवणी नबाबाचे सांगितल्या प्रो लिहिली त्याज. वर नबाबांनी स्वादवाहल करून दिल्हा ते ठेऊन त्याची नकल पुण्यास रवाना केली–

विनंती विज्ञापना. लाड कारणवालिस यांजकडून टिपुसुलतान यांनीं बंद आहदी केल्यास त्याचे तंबीचे शकल ठरावीस बाब साता दफेची तहनाम्याची यादास्त नबाब बंदगान आली याजकडे आली त्याची नकल रवाना केली व मिस्तर मालिट याचे मारफत सरकारांतही सदरहु प्रो पोहचून, त्यांतील हासल येककलमाची फर्द सरकारांतून ठराव होऊन येविसी बंदगान आली

यास खरीता पत्र आलें; ते आज्ञे प्रों छ ३० जिल्हेजी मध्यस्तासमीप आस्तां हाजरतीस गुजराणिलें; कलमाची फर्द सरकारची आली ती हर्फ व हर्फ वाचून दाखविली. मुलाहिजा होऊन हाजरतीचे फर्मावण्यांत आलें कीं मुख्तसर येक फर्दाचा तहनामा होणें यांत कबाहती दिसण्यांत येतात याचा तपसील—

लाड बाहादुर यांनीं साता दफ्याचा तहनामा ठराऊन इकडे व राव पंत प्रधान यांजकडे पाठविला कीं सदरहु अन्वयें हरदो सरकारचे करार ठरुन परस्परें तीन सरकारचे तहनामे व्हावे. यांत आइंदा हरगीज खलल न राहाण्याची तजवीज होऊन आली असतां त्या दफाती एकीकडे राहून हाल येफर्द ठरावून आली याप्रों इकडोन व तिकडोन इंग्रजाचे वकीलाशीं बोलल्यानंतर इंग्रज मनांत आणतील कीं आह्मीं ज्या दफाती ठराविल्या त्या वाजवी आणि तिन्हीही सरकारास समान असें असोन दरकिनार केल्या. हल्लींचे फर्देत, "उगेंच नित्य येऊन तंबी तरी करावयाची नाहीं" असा लेख, यावरूनही त्यास वाईट वाटलें कीं हरयेक बाहाणा करून तंबी करावी असी आमची खाबाइश आहे कीं काय? ह्मणोन हें लिहिणें. तस्मात टिपूकडील यास खातर, सबब हा प्रकार, असें दिलनिशीन होईल. इंग्रजांनीं ज्या दफा ठरावून पाठविल्या यांत दोष तो कोणता? व त्या बमोजीब हरदो सरकारचे तहनामे न होणें व मुख्तसर कलमाची फर्द ठराविली याची वजः काय? ——— कलम.

१ हल्लीं हे फर्द रावपंतप्रधान यांजकडोन ठरून आली. हीच फर्द मोहोर व दसखत होऊन इंग्रजाकडे रवाना होईल, किंवा या फर्देचे मजमुनाप्रों पत्र लेहून इंग्रजास पाठवावयाचें? या दोहींतून कोणता निश्चय केला तो कळावा. ——— कलम.

१ या फर्देत टिपु सुलतान यांजकडोन बद आहदी तीन शरीकांपैकीं येकासी नमूद जाल्यास त्यानें दोन पुरकास इतला घ्यावी, त्यानंतर बद आहदीची दर्याफ्त दोघांनीं करून टिपूस सांगावें. त्याजकडोन अमलांत न आल्यास सात्रीकचे तहनाम्यांत बमोजीब तिन्हीं सरकारांनीं करावें ऐसा लेख.

त्यास रइसांपैकीं येकासीं बद आहादी कोणेसमयीं नमूद करील याचा कांहीं नेम नाहीं व फलाण्यासी बद आहदी पुरु करावी हा खियाल त्याचे मनांत येईल ते वख्तीं ज्याजवर बदकरारीचा डौल त्यास येक व येक कांहीं समजणार नाहीं. टिपुचे चित्तास येईल तेव्हां पासोन तो आपले जमथत व सरंजामाची तयारी मजबूत करून येकायेकीं परदा खुला करील. तेसमईं दोन शरीकांस इतल्ला देणें, त्यांणीं बद आहादीची दर्याफ्त करणें, टिपुकडे नसियत करून निरोप जाणें, त्याचा जबाब तो होऊन देईल, याची इंतजारी करणें, त्याजवर त्याणें न ऐकिल्यास साबीकचे करारा बमोजीब तीन शरीकांनीं येक विचारें तंबी करण्याचा उद्योग. इतक्या गोष्टी घडण्यास अलबता नाहीं तरी साहासात महिनें, बलकी येक वर्षाचा आरसा. तोपावेतों तरफसानीं मजबूत सरंजाम जमयेतेनसी ज्या ठिकाणीं खलल घंगेज करील, त्यास शरीकाकडील कुमकेचा प्रकार तर सदरहु फुरसतीचा; त्यापक्षीं कुमक येण्याची इच्छा न धरितां जातीनें जें होणें तें हो ! याजवर आली हे मोठी कबाहत आहे. याचा विचार कसा ? ——————————कलम.

१ इंग्रजानीं सात दफ्याचा तहनामा होण्याचीं याद लिहिली. त्यांत टिपूनें तीन शरीकांपैकीं येकासीं खलाल केल्यास ते समईं दोन शरीकांची जमयेत ते हाजर असेल तितक्यानसी ज्याजवर नमुदी असेल त्यास शामील होऊन त्याचा बच्याब करावा. आइंदा तीन शरीकांनीं येक विचारें पुढें तजवीज ठरावी. ऐसें इंग्रजाकडील सात दफेच्या यादींत खोलून आहे. तात्पर्य कीं शरीकांनीं फौज शामील करण्या विषईं तामुल करूं नये. हा मतलब कांहीं या मोहगम कलमाचे फर्देत उगवत नाहीं ——————————कलम.

१ तीन सरकारांसीं परस्परें पेशजी टिपुसुलतान यांचे मसलहत प्रकर्णीं तहनामे जाले; त्यांत राव पंतप्रधान यांजकडील तेरावे व इकडील दाहावे दफेंतील मजमून कीं " टिपूकडून बद आहदी झाल्यास त्याचे तंबीची शकल आइंदा ठरविली जाईल " त्यांस त्या पकलेची

तजवीज हालीं इंग्रजांनीं सात दफा ठराऊन पाठविल्या यांत खोलून लिहिलें आहे. सांप्रत येक दफेची फर्द आंली. यांत तेरावें व दाहावें कलम साबीकचे तहनाम्यांतील त्याचे शकलची तजवीज असें करावें हें ठरलें नाहीं. तेव्हां तेरावी व दाहावी दफे सारखी हेंही मोहगम फर्द; आणि हवालाही मागिल तहनाम्यांवर पडला; त्यास टिपूनें हरयेकासी बद आहदी केल्यास आह्मीं त्या समयीं इंग्रजास तहनाम्यांप्रो अमलांत आणावें असें ह्मणों लागल्यास, ते वेळेस इंग्रजास गरज असल्यास दिकत घेणार नाहींत; अथवा त्यांस मतलब जरूर नाहीं; आणि यादों सरकारांत तो समय गरजेचा आहे; तरी इंग्रज दिकत काहडतील कीं " पहिला तहनामा व दुसरे फर्देत शकलची तजवीज करार जाली नाहीं. यास्तव हाल करार ठरावा " तेव्हां इंग्रज आणिक मुद्दे दरपेश आणितील ते आपले गरजेकरितां कबूल करणें प्राप्त पडतील. यास्तव मोहगम दफा लिहिणें कवाहल आहे. ——————कलम.

१ कदाचि(त) मनांत येईल कीं " तिहीं सरकारांसीं टिपूचा तहनामा व आहद मजबूत जाला त्या अर्थी त्याजकडोन फिसाद अमलांत कसा येईल?" तरी ईसा मिंया यांस पत्रे टिपूचीं आलीं यांत कांहीं बद आहदीचे चालींत बाकी काय आहे? हें पुरते पणें ध्यानांत आणावें ह्मणोन पत्रें आह्मांस दाखविलीं. बजीनस पत्राच्या नकलाच पाठविल्या आहेत. ——————कलम.

१ मसलतीचे रुईनें पाहतां इंग्रजासी बद आहदीचा कदम टिपूकडून दिलफैल नमूद होणार नाहीं. कारण कीं ते जबरदस्त; मगर या दों सरकारांतून येकासीं खलल पैदा करील यांत तथा नाहीं. त्याजकडून खलल उप्तन्न होतांच शरीकाची कुमक या करारावरून घडत नाहीं; तेव्हां गोष्ट मुष्किलीची पडेल. यास्तव हे फर्द येक दफेची मोहगम लिहून आली आहे.-ही करार करण्याची सलाह राव पंतप्रधान यांस समजून उमजून आहीं कसी द्यावी? हे मसलहत सलाहदौलत नाहीं ——————कलम.

१ अगर टिपुसुलतान याजकडोन या दों सरकारासीं बद आहदी अमलांत येणार नाहीं असी राव पंतप्रधान यांची पक्की खातरजमा असल्यास खुलाशानें आमचीही तमानियत व्हावी. मग सदरहु मुख्तसर कलमाची फर्द ठराविली याचा संतोष अगर असंतोष इंग्रज मानोत! मुजाका नाहीं. ——कमल.

१ टिपूकडील भरवंसा व तमानियत खातरखा नाहीं त्यापक्षीं इंग्रजांनीं यादास्त ठरविल्याप्रो करार करणें ये न सलाह. त्या सात दफेंत अगर कमजास्त कितेक हर्फ करणें तें तफेंनचे सलाहानें जाल्यास मुजाका नाहीं. गला व घोडीं व उंटें वगैरे खरीदीविषईं त्यांत लिा आहे. त्यास लडाईचे प्रसंगास सदरहु कलमें तिन्हीं सरकारांस समान व उपयोग आहे. ——कलम.

१ टिपु खुष्कींतील सरदार; यास टाकून इंग्रज टोपीवाले यांसी दोस्ती व येगानगत ठेवावी याची कांहीं हाउस नाहीं; परंतु टिपु कोणे वेळेस काय करील याचा भरवंसाच येईना; याजकरितां इंग्रजासी इतकी बळकटी करणें प्राप्त; टिपुचाही भरवसा नाहीं आणि इंग्रजांसी दुखवावें हें तुमचे व आमचे दोन्ही दौलतीस सलाह नाहीं. ——————————कलम.

१ इंग्रजांसीं दोन्ही सरकारांतून दोस्ती अधिक व्हावी किंवा आहे तितकीच असावी अथवा जे आहे त्याजहून कांहीं घटावी याविषईं दोन्हीं दौलतींनीं स्वस्थ अगर मजबुत राहण्यास कांहीं साधकताही पाहिजे. साधकता काय तेहीं समजावी. ——————————कलम.

११

अक्रा कलमें लिहिलीं आहेत. यांतील सलाह—मसलहतीचे विचारें पाहातां इंग्रजांनीं ठराविल्याबमोजीब सात दफेचा तहनामा बहाल होणें यांत इंग्रजांस संतोष व आपलाले दौलतीस प्रसस्त. तीन शरीकांची येकवाक्यता व मसलहतीची पोख्तगी आणि टिपुकडीलही दगदगेचा धोका रात्रंदिवस करणें


लागणार नाहीं. सर्व गोष्टींस आजरूये मसलहर्त गुण येतात–इतके परियायें विच्याराचे मार्गें खूब दर्याफ्त करून जबाब जलद येऊन पोंहोंचावा. लाड बाहादुर यांस विलायतेहून पेहम येण्याविसीं हुकुम येतात. परंतु टिपूसीं मसलहत आरंभापासोन आपले विद्यमानची, याचानक्षा मुस्तकीम ठरून मग जावें; यास्तव हरदो सरकाराचे जबाबाची इंतजारी करून लाडबहादुर राहिले. "जबाबास विलंब न होतां उत्तर लौकर आणावें. त्यासरीखा तहनाम्याचा ठराव करावयास येईल." ह्मणून हाजरतीनीं व मध्यस्तांनींही सांगितल्यावरून विनंती लिहिली असे. रा छे १५ मोहरम हे विज्ञापना.

शके १७१५ श्रा. व. २ शुक्रवार.

श्री

विनंती विज्ञापना. टिपुसुलतान यांनीं ईसामियां नबाबाकडील ताडपत्री व ताडकरी वगैरे महालांतील तालूकदार यांस टिपूनें फारसी पत्र येक लिहिलें व कमरादीखान यांनीं तीन पत्रें हिंदवी लिहून पाठविलीं. त्याच्या नकला पारसी पत्राची पारसी नकल व हिंदवी पत्राच्या हिंदवी नकला येकूण पत्रें च्यार याच्या नकला सेवेसीं रवाना केल्या आहेत. त्यावरून ध्यानास येईल रा छ १५ मोहरम हे विज्ञापना.

टिपुसुलतान यांचें पत्र आबासीरंगाचे मलकईसा याचे नांवे आलें त्याची नकल.



(फारसी)

जहाझ गिर्दे जदवले सूनेरी.

मनशूरे फयझ गंजूर झिल्लुल्लाह अलामुल्क उलमिनान टिपुसुलतान बादशाहे गाझी खुल्लुल्लाह मुल्कहु व सल्तनतहु बनामे सियादत व निजावत पनाह व शुजाअत निशान मलेक इसा सलमहु.

१ हा शक असल्यास चूकआहे; कारण तसा शक कोठें नाहीं.

अरझी मये खते मुशीर उल मुल्कके बनामे आनशुजाअत निशान रसीदे बूद मुरसले ब इस्तसवाबे बरखुरदार इकबाल निशान मीर कमरुद्दीनखान बनझर गुझश्त मझमुनश बदर्याफ्त रसीद. अस्ल इनस्त के इनदौलत अबद पयवंद एनायात अझतकदुसेत आलास्त अगर कसी मीखाहद केइन दौलतरा झरर रसानद हरगिझ मझलुत नमीरसद. वहरसे सुलतनत मुलहेक शुदन नीझ खाम खयाल. बावस्के नुकसाने करोरहा दर कंपनी सरकार. अझ मुखालीफन शुदे बाशद आनहावकते तदारुके आन मी बीनद. इनशाअल्ला तआला तदारुके आनहम अनकरीब. बीलफेल रायाते आलीयाते सरकारे हयदरी हमराहे बरखुरदार मसतूर बनाबरुतबये झमीनदाराने आनीकोंदी वगयरहू तअय्युन याफ्तेह. अझ आंजा ब फयझ हिसार याने कोठीमी रसद. बायद के आन शुजाअत निशान ब खातरजमी बला बिसवास अझ बरखुरदार मुलाकात नुमायद. बीलमुशाफेह हमे कयफियत मालूम खाहद शुद. गरझ, बदुरुस्त अयतकाद व साफीदिल झाहरव बातेन दर सरकारे हयदरी रुजूबायदबूद, अलबत्ते सरफराझी खाहद याफत. मुवाफके वाजेबुल अर्झ आन शुजाअत निशान तालुके तारमरी वगयरहु बरान तियादत पनाह बहाल. बगयर अझआन कडपा व कही कोटा व गहमम बशर्ते फराहम आवुर्देने से हझार सवार वसेहझार बार सिवाये मवजूदाते जमिय्यते हाल हमराहीये इशान मुमताझ फर्मूदेह खाहद शुद. व जागिरते यकलक व बोस्तो पंजहझार रुपिये दरहमुन नवाही दहानीदे खाहद शुद. व दर मुकद्दमये निगाह दाश्तने सवारान बहाली व बरतफी व कमी व झीयादती मुख्तार बर आन शुजाअत निशानस्त. व चीझीखर्च बनाबरे फराहम नमूदने जमीऽअत मआरुझ दाश्तेबूद मालूम शुद. बरजिबके मआरुझे मनशूरे फयझ गंजूर दरबाबे रसीनीदने मबलगे मझकूर अझ आनूजा तलबानीदे खाहद गीरफत. जमीऽअत रा मुवाफके करार फराहम बायद नमूद. वदस्तगीरी नमूदने समाकूरी कारीमेह. बगीरफतने थाणे मीर मुस्लु मआरुझ बुद झाहेर शुद. लेकीन, घडे मजकूर बनाये

गुंजीकोटा काबेले मुनहेदम नीस्त. कदेआन घडनिझरे मुशीरउलमुल्कबहादर चे बनाबरान निगारशे मीरवदे घडे मजकूरा थाणे कायम नुमायद. किल्ल्ये गुंजीकोटा मुतेस्सल अझ तालुके आन शुजाअत निशान अस्त; बनागोरीयान व मदुमाने थाणे किल्ल्ये मझकूर किस्मीके दानदं अझखुद राझीसारसेह आनचुनान पुख्तगी व मजबुती नुमायंद. बक्तीके हुकमे हुझुर. बनाबरे गीरफतने थाणे सादेर गरदद बलातामुल किल्ल्ये मझकूर दर सरकार आयद. दरीन अयन मुजरा व कारदानी ये आन शुजाअत निशान अस्त. व अखबारे अजतर्फे शमाल मुतबातर तलबानींदे मरसूल दारदं. व मावका कयफियत अझ खते बरखुरदारे मसतूर मालूम खाहद शुद. मरकूम याझदहुमे माहे बहारी सने ८१४१ महमंद खते गुलाम महमद मुनशी—

वरील पत्राचा मराठींत अनुवाद.

फायझ गंजर झिल्लुलाठ-टीपुसुलतान बादशाह याजकडून सियादत व निजामत पन्हाव शजाअत निशान मालिक हसा यास सलाम, आपलें व मशीर-मुल-मुल्क यांचें आपले नांवचें गेंलेलें अशीं दोन्हीं पत्रें बरखनदार एखल निशान भीर कमरुद्दीन खान याचे मार्फतीनें आलीं तीं पोंचलीं; मजकुर समजला. त्या सर्वांचें बीज (आमचेमतें) असें दिसतें कीं हे चिरंतन राज्य हें ईश्वरदत्त देणगीपैकीं येक असल्यानें कोणाचे मनांत आलें तरी त्याला कोणाचाही धक्का बसणें शक्य नाहीं. शिवाय तिन्हीं सरकारचें ऐक्य होऊं शकेल ही कल्पना व्यर्थ आहे. कंपनीसरकारास त्यांच्या शत्रूमुळें जरी कोटयवधी रुपयांचें नुकसान झालें असेल, तरी त्या सर्वांचा विचार तें भरून काढण्याचीवेळ येईल तेव्हां ते करतील; व ईश्वर कृपेनें तशी वेळ जवळच आहे. खरें झटलें झणजे हैद्राबाद सरकारचे सैन्यानें त्यांच्या उज्वल व फडकणाऱ्या झेंड्या समागमें वर लिहिलेला बरकनदार व अनीकोंदीचा जमीनदार यांच्या टोळयानिशीं फयझ हिसार अथवा कोटी

येथें जावें. या कामाकरितां सदरहु जमीनदाराची नेमणूक केलीआहे. सदर बरकनदाराची आपण अवश्य भेट घ्यावी व त्याजशी अगदीं मोकळ्या मनानें व निःशंकपणें सर्व विचार व्हावा. समक्ष तोंडी संभाषणान सर्व गोष्टींचा उलगडा होईल. सारांश, आंतबाहेर कोणतीही कसर न ठेवितां प्रामाणिक पणानें व मोकळ्या मनानें सर्व गोष्टी हैद्राबादसरकारापुढें मांडल्या गेल्या पाहिजेत. त्यांच्या मोठेपणांत व बहुमानांत खात्रीनें भर पडेल. तुमच्या ह्मणण्याप्रों तारमरी वगैरे तालुके तुमचेकडें कायमचे दिले जातील.याशिवाय हल्लीं तुमचेजवळ असलेल्या सैन्यापेक्षां जास्त तीन हजार ३००० स्वार व तीनहजार बारें तुह्मीं आणिल्यास, कडप्पा कहीकोटा व गहमभ हीं तुह्मांस दिलीं जातील व त्याचेच आसपासचे प्रदेशांत सव्वालक्षाच्या जहागीरीही तुह्मांस मिळतील. रिसाल्यासबंधानें बहाली बडतर्फी तरक्की किंवा बजाई करण्याचा पूर्ण हक्क तुह्मांकडे राहिल, तसेंच फौज जमा करण्याच्या खर्चासंबंधानें तुह्मीं लिहिलें होतें, तें समजलें. त्यासंबंधानें येक लक्ष पंचविस हजार रुपये पाठविण्यासाठि फैर हिसरच्या सुभेदाराच्या नावानें हुजूरून हुकूम जारी झाला आहे. सबब त्याजकडे रकमेची मागणी करून रकम वसूल करून घ्यावी व ठरावाप्रमाणें रिसाला जमवावा; समोकूरी करीमीच्या कुमकेसंबंधाने व मीर मरलुचे ठाणें घेण्यासंबंधानें मजकूर लिहिला तोही समजला. परंतु सदर किल्ला गुंजीकोट्याचे आधारानें असल्यानें (किंवा गुंजीकोट्यासारखा आहे सबब) पाडण्यालायक नाहीं. त्याचें महत्व मशीर-उल-मुलक बहादुर यांस माहित आहे. याकरितां (किल्याचें ठाणेंकरावें) सदर किल्यावर ठाणें बसवावें ह्मणून लिहिलें आहे. गुंजी कोट्याचा किल्ला तुमच्या जहागिर गांवां जवळ आहे. तेव्हां वाटेल त्या रितीनें गडावरील लष्कर व नागोरी लोक खुष

---

१ हा शब्द मूळांत आहे तसाच दिला जाहे. त्याचा अर्थ भारवरदारी (Transport) किंवा नळ्या-बैलुका-पायदळ-अशी होऊं शकेल.

करून ठेवावे. व यासंबंधानें इतकी मजबुती झाली पाहिजे कीं, हुजूरकडून ठाणें घेण्याबदल हुकूम आल्याबरोबर तें सरकारच्या हस्तगत झालें पाहिजे. तुमची नोकरी व तुमचें चातुर्य या कामाकडे (लागलें) पाहिजे. तिकडून उत्तरेकडील बातम्या नेहमीं आणून लिहीत जाव्या. बाकीचा मजकूर बरकंदाराच्या पत्रावरून कळेल. (लिहिलें) ता० ११ माहे बाहारी सन ८१२७ महमद दस्तुर गुलाम महमद मुनशी.

मोहरमीर करुदी अलीखान.

सियादत व नज्याबतपनाह व पुजायेत व तहवरदस्तगाह:—मलकईसा सलमुहु खतम ये अर्जी दरजनाब व अलमियान माबहाजरत पातशाह गाजी खलदला मलकहु व सल्तनतहु मरसूल केलें तें पोहोंचलें लिहिलें तें मजमून दुफसल जाहीर जालें. अर्जीमदार दरहदुर अमदस गुजराणिलें. अवल अपुज्यायेत निषांकडोन खिलाफ आहद जाहालें तें बजुबान मुबारक बयान केलें. इंजान बबीसियार अतवान अर्ज मारूज करून अफली तकसिरात करविलें. असें लाजलाके आं(?)सफायेदिल आहेत, या पकडून दरगाह वाकपनाह आणून सावीत कदीम राहणे हा बमोजब येत खीलफमर्जी हाजुर होणार नाहीं, ह्मणोन मोकरार अर्ज केले. असो. इंज्यान बच्या आहद करारखिलाफ न होये ऐसे अमलांत आणने इंज्यानबआ सियादत निज्याबत पनाह:च कामांत कसूर करणार नाहीं बफजलही अजमतस खी(खै)र ताटूकज्यात अंनवाट मोसमम असें इंज्यानब आनकरीब बाफोज मनसुरा अनागोंदीवरून न (फ?)हु (नु?) लहो त आहो अज खिदमत बहेतर साबक सरफराज फर्माविलें असे अं बुजायेत व तहवर दस्तगासही कडपा व गंजीकोट वगैरे तहसी तपखी (दी?) व फौजेचा बाहलीव बरतफी कमी व ज्यादती आजहूजर फैजंग दुरहुनू मोकरार करून घेतले असे बायेदकी जमयेत तीन हजार सवार व तीन हजार बारची दफूराह करून ठेवणें. सरकार इंज्यान बच्चा अजमसाहेबन हैदराबादेस बतौर

अखबार लिहून जे मतालब, येईल हाजुरांत अर्जी करणें. यांत आं सियादत वनज्याबतपना:चा आ इतमाद मजबूत होईल. आइंदा अर्ज मारूज करणेस इंज्यानबेस जाये होये सारखें रोज बरोज अफजूं करीत जाणें. मालाय मरवारीद तुषा लाहुरास अस्पतुरकी हकत. हे साहेबखां व ताजखां मरसूल केलें तें पोचले. अलहाल मनपूर फैजंगनूर हासल करून रवाना केलें असें बारतीबा आंबज्या आणिलें खूद्द बदौलतनी जबर अहवाल आं तहवर दस्तगाह: नियायेत व निहायेत मुतवजे व मराहीम बफजल व करम असे व अजबमे सुरत खातरजमा आन सरकारवाला इंज्यान ब करून ब करार सरकार पांदिषानी करीत जाणें. बिहून खातर जमा इंज्यान ब जीनहार आं पुज्यात तहवर निषांस कलमी करणार नाहीं बाजेमरातब बजुबानी दुलेखान मालुम होये. व नाम बरवुफैदवी सरकार व जजिद इंज्यान ब येत बरास्त आंचखुबजी जाहीर कराल मंजूर करणें बिनाबर दाखल इमानी सेख इमाम यास पाठविलें असे जुबानी हुबजहुर खाषाहद अमद ज्याबचे निगारषवद

पो छ २७ माहे रजब सन २०७ हिजरी.

(माघ व. १४ शनिवार शके १७९३.)

मोहर मीर कमरुदी अलीखान.

सियादत व नज्याबत पन्हां पुज्यायेत व तहवर दस्तगाह मलक ईसा सलमहु दरीविला अर्जदास्त कीलेदार रायेदुर्ग हाजुरांत गुजरलें कीं " मलकईस " अमीन पा। ताडकरी बाजमयेत खुद येऊन मरेसी व असासा आज तालुक " आंबावर दु तालके माहाल रायेदुर्ग घेऊन गेले. तमाम तालुके सरकार ताख्त ताराज केला. आंजीसबब वरीयायां फरारी जाहली " ह्मणोन लि।। होतें याजवर मिजाज अमदस बरहम होऊन आषुजाअत दस्तगाहवरी न्याह येतराजी फर्माविलें, व अहकाम बनाम सरदारान अफवाज खुद ज्याबज्या गेली जे बाद ईजफरागतही दुफसदान जमीदारान तालुके ज्यात सरकार जेहत गोष मालीं मलकईसा व जती नमूदन तालुके आत ताडकरी वगैरे कस्त करणें इंज्यानबेस हुकुम जाला जे बाद तंबी जमीदार अनागोंदी मये जमयेत बनवाह

फौजहीसार पोंहचवून जही तालुकात मरकुमल सदर अमलेत आनणें, त्याचे साबकचे दोस्तीवर नजर ठेवणें, या सबब लिहिलें जातें जे:—अगर बेहबूद खुद ज्यान व अहरुदरकार असलियां अर्जी मवाफिक मसोदा हुरसेल हाल तयार करवाऊन निजद इंज्यानब रवानाकरणें. अर्जी मजकुर दर हाजुर अमद: गुजराणुन बसफाईकडून आपली तकसीरात करवाऊन, व आइंदा बर अहवाल आ तहवार दस्तगाहत फजूलात हाजरत पादशाह गाजी जुलला मलकहु मघुमुल होये वगैरे दरदाख्तही अमलांत येईजे सारखे केलें जाईल. अगर इंकदर करीन सलाह आं तहवरदस्तगाह न होये, मये जमयेत व सरंजाम वगैरे घेऊन ताडकरी सोडोन व वाकेनूर व ताडपत्री गंजीकोटाच आश्रा करून ते मैदानेत राहणे व इला कबाहत हासख्त दरदेश हुसियारी व खबरदारी जरूर चंदुफिमाहैन इर्तवात कदीम आंजी सबब इतला केली असे. पेस्तर दुख्तीयार जी याद चेनवीस्तेशवद लिहे.

मोहर मीर कमरुदी अलीखान.

सियादत व नज्याबत पन्हा: पुज्याअत व तहवर दस्तगाह मलकईसा सलमहु—खतमै अर्जी दरजनाब हजरत पादशाह गाजी जिल्कहदुल कुलमकान टिपुसुलतान खल्दलाह मुलकहु व सल्तनतहु मरसुल केलें, तें पोहचवून कैफियेत व मोफसल मफहुन जाहालें, व मसीरल्मुलुकचा खत पाठविलें बजीनस हाजुरांत गुजराणिलें. खुद बदौलत मुतवजे होऊन मुतवजै फर्माविलें. बाद मुजाहिजे हार्फ न हार्फ इर्षाद जालें. इनषाला खुताला तदारुला आन करीब असे. आं पुज्याअत व तहवर दस्तगाह यास लिहिणे कीं "जमयेत मोतबर " मवाफिक नविस्ते साबीक फराहीम करीत जाणे. कडपा व गंजीकोटा वगैरे " माहालात सुपुर्द आं पुज्यायेत व नज्याहतपन्हा: यांस केले जाईल गरज " इनायात मजीदत फजूलात मघमुल हाल. येशांस खिदमत उमरा उमराई मरातब लासानी सर्फराज होत आहे. बखातरजमा व इतमिनान लवाजमे फिदवीयेत ज्यांफिशानी वकार सरकार बजहुर आणे आईन मुजरा " असे आं पुज्यायेत व तहवर दस्तगाह मारूज केलें असे, जमयेत भारी, मुलुक जुजवी, हासल

कमि, याकडोन इ॥फाक होत नाहीं. हाजुरांत अर्ज करून खर्च मामुल मरहमत करवणे ह्मणून, बारतीबाक मारुज आं सियादत नज्याबत पन्हः हाजुरांत बिसियार अर्ज मारूज करून हादु कदमेस कफील होऊन, येक लाख पंचवीस हजार रुपयेचे परवानगो हासल करून, मनपुर फैजंगनुर बनाम दारोगे फैज हीसार ईजहार करून रवाना केलें असे मुबलग मजकुर आनवाउन घेणें. जमयेत दरेषान न होये सारखे फराहम करीत जाणें. अखवार साहेबान हैदराबाद मुतवातर अर्ज करीत जाणे. सेख उमर वगैरे सवरुतगराचे बाबत घोडे व मषराचे गटे पाठविले ते हाजुरांत गुजराणिलें बिसियारपसंद हिजीरा फर्माविलें व बाजेमरातब दुफसल मालुम दोईल. ताजखान वतुलहेखान यास पगावर ठेविलें. बिसियार बेहतर व आईन खुषनुधी इंज्यानब जाहालें. ज्यादाच ब कलम आयेंद हुमर आमी मारुज केलें होतें जे सावीक जे मनपुर व तलदुफ नामाखत फारसी वरूद फर्मावित होते हालाहिंदवी सादर होत आहे काये सबब बरी सलाह हातीस्त ह्मणोन ईर्षाद जाला आहे

पौ छ २६ रमजान सन १२०७ हिजरी. पोहचला.

(अधिक वैशाख व. १३ बुधवार शके १७९३.)

श्री

श्रावण व. २ शुक्रवार शके १७९३.

विनंति विज्ञापना. मध्यस्ताचें बोलण्यांत " कीं टिपुसी तीन सरकारचा " तहनाम्यास कांहीं बहुत दिवस जाले यैसे नाहीं, इतक्यांत आतांच त्या- " जकडून बेकरारीच्या चाली सुरु होतात; तेव्हां पुढें भरंवसा काये माना- " वयाचा ? तलालकोटा येथें इकडील ठाणें असतां, तलालकोटा लोचन गुंडाचे " पोटीं ह्मणोन टिपुनें आपलें ठाणें तेथें घातलें हें एक. दुसरें, गुती सरकार " पैकीं सिंगणमला या सरकारचे वाटणींत घेतला. याची रक्कम दहा हजार होन " टिपूचे कमाल बेरजे प्रो लागली, त्यास सिंगणमला तालुक्याचे कुल " सवीस देश मिळोन वसूल पाहिला असतां दहा हजार होन नाहीं. ऐसें " असोन सवीस देश तालुका सिंगणमला तालुका सिंगणतसा नाहीं. तेराच

"गांवची तुकडी ह्मणोन तेरा गांवास दुरडमाला तालुका येसे नांव ठेऊन तेरा
"गांवास हरकत केली आहे. तसेंच इंग्रजाचे वांटणींत किरट रामराज्याकडील
"एक तालुका आपला ह्मणून लाऊन दिला, त्याची हौ कटकट पडली आहे.
"मुलें अद्याप वोलीस आहेत तोंच ह्या चाली" या प्रो बोलण्यांत आलें
र॥ छ १९ मोहरम हे विज्ञापना

श्री

श्रवाण व. २ शुक्रवार शके १७९३.

विनंति विज्ञापना. मध्यस्तानी बोलण्यांत आणिलें कीं "अनागोंदी व
"हुचेंगी दुर्ग हे तालुके टिपुकडील; तेथील जमीनदाराचा हांगामा भारी,
"दखल नाहीं, सबब टिपुनें फौज दहा बारा हजार दोन तालुकियाचे बंदो-
"बस्तास पा॥; जमीनदारासी व त्यांचे फौजेसी एक लडाइही जाली. या
"प्रो वर्तमान आहे" ह्मणोन सांगितलें र॥ छ १९ मोहरम हे विज्ञापना.

श्री

श्रावण व. २ शुक्रवार शके ७१९३.

विनंती विज्ञापना. मध्यस्ताचे बोलण्यांत आलें का, "टिपुची चालबे-
आहदीची व शरारत व गरुरीची इतकी सजा जाली तथापी जात नाहीं.
"पहिले तख्त केलें होतें, ते तख्तावर बसावयाची मात्र बाकी होती. हाली
"त्या तख्तावर बसावें हा इरादा करून साअत मुकरर केली. तख्तारूढ
"जाल्यानंतर रोज च्यार च्यार हिंदु आणून मुसलमान करावे ही योजना केली.
"याप्रो वर्तमान आहे, मग काय घडते पाहावें. सारांश, पहिल्या
"चाली अद्याप दूर झाल्या नाहींत. कोणे विसींचा भरंवसा व विश्वास
मानावा असें नाहीं." याप्रो बोलले. र॥ छ १९ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. २ शुक्रवार शके १७९३.

विनंती विज्ञापना. मध्यस्ताचे बोलण्यांत आलें कीं "लाडबहादुर कल-
"कत्याहून चेनादपटणास येणार; त्यांजकडे मीर आलम बहादुर यांची र-

"वानगां करण्याची तजवीज केली आहे. कारण कीं, करनूलकर संबंधीं "टिपूकडील बेशकसीचा जाबसाल, याचा बंदोबस्त होणें. दुसरें, तलालकोटा "वगैरे ठाणीं इकडील असतां ज्यादती करून टिपूनें घेतलीं. सिंगनमला "तालुकीयांत निमे आपला ह्मणतच आहे. इत्यादिक जाबसाल लाडांसी बोलून बंदोबस्त जाले पाहिजेत. याजकरितां यांची रवानगी जरूर." याजवर आह्मी बोलिलें कीं "इतकींच कामें आहेत किंवा आणीक कांहीं आहे." मध्यस्त बोलिलें, "असेंच दुजबाबसाल आहेत. काहीं विशेष नाहीं; परंतु, गेल्यानें बंदोबस्त होईल." याजवर आणीक मी विचारिलें कीं "अशा कामास मीर आलम बाहादुर यांनीं जावें लागेल कीं काय?" तेव्हां मध्यस्तांनीं उत्तर केलें कीं जें "मीर साहेब यांस वाकफी येत आहे. याजकरितां यांचे जाण्याचा बेत केला आहे. याचा इतला तुह्मां सरकारांत ल्याहावा, आणि उत्तर आणवावें, ह्मणजे यांची रवानगी करण्यांत येईल. कदाचित सलाहास असें आलें कीं:-' जुजबी काम, याजकरितां मीर साहेब यांस कशास पाठवावें? पत्रांत जाबसाल लिहून पाठवूनच उगवावें.' असें उत्तर आलियास तसेंच करावयास येईल" ह्मणोन सांगितलें, त्याजवरून सेवेसीं विनंति लिहिलीं आहे. याचे जाबाची आज्ञा लौकर जाली पाहिजे रा॥ छ १९ माहे मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. २ शुक्रवार शके १७९३.

विनंति विज्ञापना. नवाबाचे येथें इंग्रजांचीं व फरासीस यांची लढाई विलायेतेमध्यें पांच चार वेळां जाली त्याचा अखबार पारसी आली ती व दुसरी अखबार चिनापटणाहून सवदागिरानी पाठविली. ती दुरुस्तसर आहे व हाल छ ६ जिल्हेची अखबार मछली बंदरास नवाबाकडील वकील आहे. त्यांणीं पाठविली, ती मोहरमचे समारंभांत नवाबास पावती जाली नवती. तिची नकल येक गृहस्थापासोन घेतली; याउपरी नवाबास पावती होणार.

एकूण तीन अखबारेच्या नकला सेवेसीं रवाना केल्या आहेत. त्याजवरून ध्यानांस येईल.

१ प्रथम अखबारेचा बंद पाठपोट भरून लिहिला आहे.

१ दुसरी अखबार चिनापटणाहून सवदागरांनीं लिहिली त्याचा एक वर्ख.

१ तिसरी अखबार मछेलीबंदराहूनवकालतराम यांणीं पा॥ तिचा येक बंद येक तर्फा.——

—

३

——तीन अखबारा फारसी पाठविल्या आहेत, त्याजवरून ध्यानांत येईल रा॥ळ १९ मोहरम हे विज्ञापना.

इष्टवट इंग्रजाकडील वकील येथें आहे त्यांणीं यांस अखबार विलायेतेहून आली तें दिल्ही, तिचीं नकल हे असे.

* तरजुमये इनतेखाबे जंग बा फरासीस दरविलायत. व तारीखे गुररे बमार्च्य सने १७९३ इसवी मुतावके हफदहुमे रजब सने १२०७ हिजरी मसाम अल आनहून सुलताने अलमान बादशाहे परुस फौजे खुदहारा सेजुक कर्दे वक्ते शव उबूरे नदी बइस्मे नरोर नमूदे अलस सबाह बर्फौजे फरासीस के मुरचिल व बॅटरीहा बस्ते बूदन्द अझसे तर्फ युर्श नमूदन्द फौजे फरासिस तावे मुकावमत न यावुर्दे रुबफरार निहादे दवाझदे अझरावे किलान् वसी झूदे बेटरी व खजाने फौज फौज व गनीमत आमद यकहजारो दोसद फरासिस कुश्ते व जखमी व शिस्सद असीर शुदन्द. व अझ् फौजे अलुमान दह कस कुश्ते. व चहारकस जखमी व अझ फौजे प्रूस हमानकद्र बतारीखे मजकूर शहाजादये झ्रीज बइस्मे चार्लस वक्ते सेपोहोर बसरकर्दे हरावुले अफवाज फरमुद. ता बरचंद बॅटरीहा ये फरासीस के तयार बूदन्द युर्श नमूद नह झर्बे तोपेदिगर बदस्त, आमद, चंद कसे फरासिस कुश्ते व चहारसद दस्तगीर व जख-

* फारसीची नकल.

मीहा बिसियार, शुदन्द. व तारीखे दुयम मझकूर अफवाजे फिरूजी व अफवाजे सुलताने मझकूर बत आकूबे फरासीस परदाख्ते बर सियास मेलके किल्ये बिसियार किलान् व मुतहक्कम व दरआनथावे शिश्हजार फरासिस बूद युर्श किर्दद. हफसद फरासीस व कतल आमदन्द. वथानये किल्ये मकुरारामये असबाब व आझूके वाफेर तसखीर दर आवुर्दन्द व असीरान व मजरूहान बिस्यार जनरला डोंबीअर सरदारे फरासीस दस्तगीर गश्त. ब अफवाजे फीरुझी अझ तर्फे फरासीयान दस्तगीर कर्दे मी आरंद. फरासीयान अझ इत्तलाये किल्ये सियास मेले हेरासान शुदे खुद बखुद किल्ये मुसतरकरा गुझाश्ते इरादे दारंद के फरारी शुदे तमामे मुल्के आन तफरा बेगुझारंद. सुलताने अलमान व बादशाहे परूस किल्ये मुसतरकरा फरुद गाहे खूद साख्तंद व तारीखे सिय्युमे माहे मझकूर तआकुबे फरासिस नमूदे पंच हजार कसरा कुश्ते व झख्मीये बिस्यारीरा दस्गीर नमूदे दो झुंडे व बीस्तोसि अझराब दर मयदान याफतंद. व दो झबे गुब्बारे व झखीरये जंगी व आझूके व कुर्तिहा व गोलेहा बदस्ते आवरदे वरकिनारे दरियाये मुझा फरूद आमदंद. सवाराने फौजे फिरुझी दोहझार फरासियाने फरारीरा दस्तगीर करदंद. व तोपखाने व असबाबे झखीरये हर किसम बदस्ते फौजे फिरुझी दर आमद. ब तारीखे चहारुम हरावुले फौजे फिरुझी उबरे नदीये मुझा नमुदेत आकुबे मकहुरान ता तकंदर नमूद व बर तकंदर रसीदे जंगे खूबे शुद. लेकीन चुन सवागने शाहझादे चार्लस नरसीदे बुदंद व शव तारकिबूद शाहझादये मवसूफ हमानजा फरूद आमद. बतारीखे वंजुम वक्ते सुब य शाहझादये मवसूफ कूच करदे दीदंद के तं कदररा फरासियान खालीकरदे फरार नमूदंद. अस मकाने मझकूर खझानये फौज व बॅटरीहा वझंखीरये बिस्यार बदस्त आमर से पलाटन दरानजा गुझाश्ते ना फौजे जरीदे व त आकुबे आनहाणरदाख्त यक झर्ष व यक झुंडे बदस्त आ व रसदके व जनरल गेलिकेट सरदारे फौजहमे दस्तुरे फतेह व सरदारे मुयससरे बीकदमी करदे फरासियानरा कुश्ते व झख्मी बिस्यार कर्दे अमवाले फरावान बदस्ते आवरदे. चुन इनहर सेजुक बाहीम

इ सालदास्तद फरासीयानके दरमकाने रूझमांद मनाह गिरफते बुदंद हेरासान शुदे अझमकाने मसतूर पेश्तर फरार नमूदंद, व रुझ मांझ दरदस्ते फिरोझी दर आमद. बा उमदय आन मुल्क केर आयाये बाद शाहाने मनसूर व अझ चंदी महकूमे अहले बलवाबुदंद अझ आमदने पादशाहाने खुद व गलबये आनहा व हझीमत खुरदने अहले बलवा विस्यार खुशदेल शुदंद वहर हझ मीश आमदे मुवारक वाद वाद मी गुयंद व शुकरानें व जनावे एलाही वनो मी आरंद व फरासियान रा हरजा केमी याबंद मीझनंद. तारीखे शिशुमे मार्च बगायते हश्तुमे मिनहु मकामे महपसाने फरासियान अझजाबजा दरीनजा मी रसद. व जनरल डोम्बीअर केदस्तगीर शुदे बुद हममी आयद. शाहझादये दुय्यमे पादशाहे इंग्रीझ बसर करदगीर जमीअते इस्तहझार अझहुझूरे बादशहा दस्तूरी यफते बराये ए आनत वलदीस दर मुलके मसतूर दाखल शुद. व बादशाहे मुल्के-फरासिस बनामे तिफले खुर्द साले बादशाहे मकबूल केदर कैदे फरासियानें अहले बिलोरस्त व बनायब व वकीले मुतलक व मुखत्यारी व बिरादरे किलाने बादशाहे मझकूर व मीर व रशीगीरी व सीयेसालारी व बेरादरे दुय्यमे पादशाहे मसनूर मकरर शुद. व हरदो बरादरानें मझकूर मये जमाअते पादशाही शरीके पादशहा नेदीगर केबराये ए आनत आमदंद व यक शहरे किलानके नामे आन या उन दर मुलके फरासीस अस्त शिस्तहझार कारीगर के अझ दस्ते अहले बालवा परीशान शुदे बुदंद फुरसतदीदे अझरे फाकते कदीम राझी शुदे सरे शुरेश वरदास्तद अहले वलवा राहरजा केमी या बंद मी कुशंद बदर शहे रहाये दीगर हमचुनीन कझाया मीनमूद. गोया अझ जमाअते फरासीआन दोफरीक शुदे अंद. व.....दर तयारी ये जहाझात व फौजबराये शराकत व खबी मशगुल. व तारीखे मंजुमे फीरूझी अझ बादशाहे इस्तंबुल व बादशाहे अंगीझ चुनीन इत्तेला शुद के इनजानेब मगझी सीजहासे किलानके फीजहास अझ हफताद अझरावे ता यकसरो दवाझदे अझराव खाहदबूद बसर करदगीर ओकोडाल सरदारे शुभाजलदबराये

तंबिये फरासिस खाने मी कुनम व बतारीखे शान्झदहमे फिरुझी दर शहरे लंडन व बादशाहे इंग्रीझ अझतर्फे बादशाहे तुर्कीस इत्तेला शुदके इनजानेब मवाझी हस्तो धंज जहाझे किलाने जंगी तयार मी कुनम व बसर कर्दगीए सरदारे शुभा हर मुल्के फरासिस मी फिरस्तम. वं बतारीखे हश्तोह कदहमे फिरूझी दरमकाने कील के फरासियाने दरसाल गुझश्ते मुतसेरेफ शुदे बुदंद दरीन विला जमइ अझ फरासियान केदर आनजा बंदंद व जबरदस्ती अझ बाशदहाये आनजा कौलो कसमे शराकत मी गीर फतदं. लेकीन बाशदहाये मझकुर हमेहा बयक झबान सदा आवरदंद के उमरे सुलतानें व फिल अल फौर बरफरा सियाने मझकूर हुमले करदंद अझ चूब व तरझदे बदर करदंद. फरासियान ताब न आवरदे झुंठे बगयरे गुझाश्ते गुरीखतदं व हमचुनीन बाशदहाये कोलस वाद नीझे व अमल आवरदे.

२ फरासीस व इंग्रजाकडील अखबार चिनापटणास परभारें आली तिची नकल सवदागरानी येथें पाठविली तिची नकल हे असे,

* तरजुमये अखबारे विलायत बमुजबे
नवश्तये सौदागराने बाशंदे चिनापट्टन.

कौमे वलंदीझ एताअतें फरासीस नमूदंद. दर मूल्के खुद निशानें फरासिस बर कोठीण खुद कायम कर्दे अंद हमशीदे बादशाहे अंग्रीझ मये पिसर शरीके फरासिस शुदे कौमे फरासिस हररोसे मकाने अंग्रीझ मुशार अलयहे रा कायम करदंद. बील फेल फौजे अंग्रीझ अझतर्फे दरिया दरमुल्के खुद व फौजे फरासीस अझ इनतफे. हरदो जमीअत बजाये खद मुस्तइद. मरकुमे विलायत १७ शावान सने १२०७ हिजरी.

३ मछेली बंदराहून छ. ६ जिल्हेजची अखबार राजे वकालतराम यांणीं पाठविली तिची हें नकल असे.

---

* असल फरासीस.

*हव अल गफूर अकरसे अ अला.

शिशुभे झील हज्जे अलहराम सन १२०७ हिजरी.

किल अझीन हकीकते मिनाकशे इंग्रीझ व फरासीस दर विलायत व दरींजा व इरादये इंग्रीझ व एंत्तेझाए किल्ल्ये व लेचडी व गिरफत वगीरे जहाझात वइझ्झे अझ्दर आवरदे बुद. दरीन विला किश्ती अझ विलायत दर अर्झ चहलो यंज रूझ व चिनापट्टन आमदे खतूतीके आवरदे बुद रसानीद खावये कलकत्ता गरदीद. चुन हुकमे विलायत दर मुहासरये किल्ल्ये लेछडी व तसखीरे आन रसीद अहालीये चिनापट्टन पंजहजार बार व सेहझार सिलेदार व अझरावे अतवाब व सुर्व व वारूत व आझूके व गयरहु व कडालूर व देवपट्टन के अझ अमकनये कदीमये इशानअस्त खानेफरदंद व दीगर सामाने हर्व व मुहासरेह अनकरीब इरसाल मीदारंद. इरादे अस्तके अफवाज व आलाते मुहारबे व मुहासरे दरान मकान मुजतमे व मुहय्यासारने व हय्याते मजमूई अझीजा वरसे मकसद बायद शिताफत. व हम चुनानदर अंदक फुरसत मुतवज्जये मुहासरे खाहद शुद व अझ विलाये फरासिस बा मालके वेलचडी नवश्तई रसीदके मुत आकबे हिजदे जहाझ मशहून व मुमलव अझ मर्दुमाने जंग व सुर्वो वारूत व खजाने व वेलचडी खाने नमूदे अम्मा वसवबे इरारते हवा व मुखाले फते मिझाजे अझ सिलेदारे मझकूर बीशतर अरझये तलक व कमतर बारेदे मकसद गरदीदंद. दरीन व कतदर किल्ल्ये वेलचडी झीयादे अझ दो हजारो पानसद फरंगीये जंगी मवजूद नीस्त व मी गुयदं के बरसरे किल्ल्ये अझरावे अतवाबे किलान निस्त. दर अंबदीये वेलचडी मुनाही फरदंद केतदर कसके आझूकयेसे माह दरखानये खुददाश्ते बाशद दरशहर बेमानद वगरने राहे किस्मी फरागीरद. व पोर्तुगीश व वलंदीझ रफीके तरीके इंग्रीझदं व इस्पानीये व देनमार्कीये मुमद व मुआवने फरासिस गश्ते दरीं विला यक जहाझे फरासिसराके मुमल व अझ बिरंज बुद बगारत बुर्दे सरदारश दर किल्ल्ये

* असल फरासीस.

मछलीबंदर बकयदे उसार गिरफतार अस्त खबर अस्तके लोर्ड कार्नवालीश बजहते सरंजामे फरासिस अझ कलकते व चिनापट्टन मी आयदं फते अलीखान सरंजामे गावाने तुपकशीरा अझबराये खातरे कंपनीये इंग्रीझ किस्सये हिमत साखे अस्त आयदे अझांजा रूमीदहद व अर्झे खासीये पुशाने बसाते एकबाल व बंदगाने दरगाहे इझ्झा जलालमीर सानद. झीयादे इदे अदब.

सदर तिन्हीं अखबारांचा अनुक्रमें मराठींत अनुवाद. * (१) युरोपांत प्रेंचांबरोबर झालेल्या लढाईच्या हकीगतींतील एका उताऱ्याचा तरजुमा.

ई. स १७९३ च्या मार्च महिन्याच्या पहिले तारखेस ह्मणजे हिजरी सन १२०७ च्या रजबच्या १७ वीला जर्मनीचा बादशहा मसाम अलअन हून व प्रशिआचा राजा यांनीं आपल्या सैन्याच्या तीन टोळ्यां करून, नरुर नांवाची नदी रातोरात ओलांडून, तोफखाने व खंदक यांनीं सुरक्षीत जागा घेऊन बसलेल्या फ्रेंच लोकावर तीन बाजूंनीं हल्ला केला. फ्रेंच सैन्याचा त्या हल्यामुळें टिकाव लागेना व त्यामुळें तें पळून गेले, बारा मोठ्या तोफा, तेरा ब्याटरी व लष्करी खजीना इतकी लूट त्यास मिळाली. १२०० फ्रेंच लोक जाया व जखमी झाले आणि ६०० कैदी हातास आले. जर्मनांपैकीं १० मेले व ४ जखमी झाले. प्रशिअनांची संख्याही तितकीच होती. त्याच दिवशीं सुमारें तीन प्रहरचे सुमारास चार्लस् नांवाच्या इंग्रज राजपुत्रानें तोंडावरील टोळीवरोबर घेऊन, लढाईला तयार असलेल्या कांहीं प्रेच तोफ खान्यावर हल्ला करून ९ तोफा हस्तगत केल्या. कांहीं प्रेंच लोक मारले गेले. ४०० कैद केले गेले व बरेच जखमी झाले. त्याच महिन्याच्या दुसरे तारखेस हें विजयी सैन्य व बादशहाचें सैन्यांनीं मिळून सियासमेलच्या किल्यापावेतों फ्रेंचांचा पाठलांग केला. हा किल्ला फार मोठा व मजबुत आहे व तेथें फ्रेंचांचे ६००० लढाऊ लष्कर आहे. त्याजवर त्यांनीं हल्ला करून ७००

* हे आंकडे आमचे आहेत व त्यांची योजना, मूळ व अनुवाद यांच्या क्रमाच्या सोईसाठीं केली आहे. सं. + तोफखाने

फ्रेंच पाडले व किल्ला घेतला. किल्ल्यांत बरीच अन्नसामुग्री व इतर दारुगोळा होता तो त्यांस मिळाला. तसेच त्यांनीं बरेच लोक जखमी केले व बरेच कैदी सांपडले. फ्रेंचांचा सरदार जनरल डोंविअर हा हातीं सांपडला व त्याबरोबर बरेच प्रेंच लोक कैद झाले. सियासमलचा किल्ला पडल्याची बातमी कळतांत फ्रेंचांची फार गाळण झाली व लागलीच किल्ला व त्याचे भोंवतालचा मुलूख तसाच टाकून देऊन त्यांनीं पळून जाण्याचा विचार केला. जर्मन बादशहा व प्रशिआच्या राजांनीं ह्या सोडून गेलेल्या किल्ल्यावर आपली छावणी करून तिसऱ्या तारखेला फ्रेंचांचा पाठलाग केला, ह्यावेळीं ९०० लोक मारले, बरेच जखमी व कैद केले व रणांगणावरून दोन निशाणें व २३ तोफा व बरींच काडतुसें, गोळ्या व अवतर लढाईचें सामान आणिलें. तसेंच दोन जंगी तोफा व बरींच काडतुसें, गोळ्या व अवंतर लढाईचें सामान त्यांना मिळालें. नंतर मेन्झ नदीवर त्यांनीं तळ दिला. विजयी सैन्याच्या रिसाल्यानें, पलालेल्या फ्रेंच सैन्यांतले २००० लोक कैद केले, व त्यांचे तोफखानें व सर्व प्रकारची सामुग्री ह्यांच्या हातीं सांपडली. ४ तारखेला ह्या फौजेच्या तोंडावरची टोळी मेन्झ नदी ओलांडून तंकदर पावेतों ह्या घाबरलेल्या सैन्याचा पाठलाग करीत गेली. तेथें पोहोंचल्यावर फार भयंकर रण माळलें. परंतु राजपुत्र चार्लसचा रिसाला आला नसल्यानें व रात्रहीं अंधाराची असल्याकारणानें त्यानें तेथेंच मुकाम केला. ५ वीला त्यानें कुच केला. तेव्हा त्याला असें दिसून आलें कीं प्रेंच लोक ती जागा सोडून पळून गेले होते, येथेंही त्यांस बराच लढाऊ सरंजाम, व बॅटरी व खजीना मिळाला. तेथें असलेल्या तीन पलटणांचा कांहीं निवडक लोकांनिशी पाठलाग करून यक तोफ व येक निशाण हस्तगत केलें. सेनापति गेलिंगेट व एकत्र सैन्याचा सेनापती असे दोघे पुढें पाठलाग करीत जाऊन प्रेंचांपैकीं बरेच जाया व जखमी करून पुष्कळशी लूट घेऊन आले. ह्या तिन्ही तुकड्या जेव्हां पुन्हां एकत्र जमल्या तेव्हां रोझामंड शहरांत दबा धरून बसलेले फ्रेंच लोक घाबरून तें शहर शत्रूच्या हातांत सोडून पळून गेले. तेथील सरदार लोक ह्या विजयी राजाची

च प्रजा असल्यानें त्यांच्या जमामुळें त्यांस फार आनंद झाला; व मध्यंतरी कालानुरोधानें जरी त्यांजवर बंडखोरांनीं आपली सत्ता बसविली होती, तरी ते पळाल्याचें वर्तमान समजल्यापासून प्रत्यहीं सकाळीं ते शहराबाहेर येऊन ह्या विजयी राजांचें अभिनंदन करून व ईश्वराची प्रार्थना करीत असत व कोठेंहीं फ्रेंचांचीं गांठ पडली कीं त्यांस मार देत असत. तारीख ६ मार्चपासन ७ मार्च पावेतों जेथें फ्रेंच लोक कैद करून ठेविले होते तेथून त्यां सर्वांस एक जागीं आणण्यांत आले. त्यांतच जनरल डॉबिअर हा होता कारण तोही कैद केलेल्या लोकांपैकींच येक होता. इंग्रजांच्या दुसऱ्या राजपुत्राला ७००० लोकांचें आधिपत्य मिळाल्यावर डच लोकांच्या मदतीकारितां तो निघाला व वर सांगितलेल्या जागांनां शह दिला. फ्रेंच बंडखोरांच्या कबजांत त्यांचा राजा कैद केलेला होता. त्याच्या लहान मुलाला फ्रान्सचा राजा नेमिलें व युवराजाची व प्रतिनिधीची जागा त्याच राजाच्या वडील भावाला दिली. तसेंच त्याच्याच आणखी एका भावाला मुख्य प्रधान व सरलष्कर नेमिलें. हे दोघे बंधु एकंदर सर्व राजचिन्हांसहित त्यांचे मदतीसाठीं आलेल्या राजास येऊन मिळाले. फ्रान्स देशांतील रोवेन नामक शहरांत ५०००० कामकरी लोक होते, त्यांना बंडखोरांनीं फार छळलें होतें. ह्या लोकांनीं आपली संधि आली आहे असें पाहून जागजागीं जुटी केल्या व बंडखोर सांपडल्याबरोबर त्यांना मार देण्याचा सपाटा चालविला. दुसऱ्या जागींसुद्धां असाच प्रकार चालूं झाला. जणूं काय त्या वेळीं फ्रेंच लोकांत दोन फळ्याच झाल्या होत्या असें दिसूं लागलें. बाकीचे लढाऊ जहाजें व लढाऊ शिपाई तयार करण्याच्या उद्योगाला लागले. पांचवे तारखेस इंग्लंडच्या राजाला इस्तंबोलच्या सुलतानाकडून बातमी लागली कीं, फ्रेंचांनां शासन करण्याकरितां इंग्रज ओकोडेल याचेबरोबर ७० पासून १०० तोफा पाठविल्या जात आहेत. १६ तारखेला इंग्लंडच्या राजाकडे तुर्कस्थानच्या सुलतानाकडून निरोप आला कीं २५ मोठीं लढाऊ जहाजें तयार करून आपले सरदाराबरोबर फ्रान्स देशांत लवकरच पाठविली जाणार

आहेत. कील नांवाचे शहर तेथील लोकांवर जुलुम करून फ्रेंच लोकांनीं गेल्यावर्षी घेतलें होतें व तेथील लोकांपासून जबरीनें बंडवाल्याशीं प्रामाणिक पणानें वागण्याबद्दल शपथा घेतल्या होत्या. परंतु ता० ७ व ८ रोजीं तेथील सर्व लोक एकदम " जर्मन बादशहा दीर्घायु होवो, फ्रेंचांचा त्याचे हातून पाडाव होवो " असा घोष करीत त्यांनीं फ्रेंचांवर हल्ला केला व काठ्या आणि कून्हाडी यांनीं त्यांस बराच मार देऊन बाहेर हांकून लाविलें फ्रेंचांना त्यापुढें टिकाव धरतां येईना; आणि ह्मणून आपलीं निशाणें वगैरे तशींच टाकून देऊन त्यांनीं पळ काढला. अशींच स्थिती कोलसबाद येथें झाली.

२ चिनापट्टन येथील व्यापाऱ्यांना आलेल्या पत्रावरून युरोपांतील आलेल्या बातमीचें भाषांतर

डच लोकांनीं फेंचाचें वर्चस्व कबूल केल्यावर त्यांनीं आपल्या कोठी (कारकान्या) वर फ्रेंचांचें निशाण रोविलें, इंग्लंच्या राजाची बहीण व तिचा मुलगा यांनीं फ्रेंचांशीं मैत्री केली व दोन तीन ठिकाणीं त्यांचें स्वामित्व त्यांनीं कायम केलें. इंग्रजी सैन्य त्यांच्या देशांतील किनाऱ्याच्या प्रदेशांत तयार आहे. व फ्रेंच सैन्य त्यांचे बाजूला तयार आहे. इंग्लंडमध्यें हिजरी सन १२०७ शाबानच्या १७ वे तारखेस लिहिलें.

३ तो सर्वांत पवित्रतम व श्रेष्ठतम आहे; तोच क्षमा करील.

ता. ६ झीलहज्ज अलहराम सन १२०७ हिजरी.

युरोपांत व या देशांत इंग्रज आणि फ्रेंच यांचे दरम्यान झालेल्या लढाईची बातमी किंवा बेलचारी घेण्याचा इग्रजांचा उद्देश अगर इंग्रजांनीं कांही जहाजें धरली ह्या बातम्या आपल्यास पोंचण्याचे पूर्वी ४९ दिवसाचे प्रवासांतच येथें पोंचलेलें यूरोपांतून येक जहाज आलें आहे तें चिनापट्टणास लागलें व त्यानें आणिलेलीं कांहीं पत्रें येथें देऊन तें कलकत्यास रवाना झालें. बेलचारीला वेढा

घालून तें घेण्याविषयीं युरोपांतून हुकुम आला असल्यानें चिनापट्टन येथील लोकांनीं कदलूर व देवपट्टन ह्या त्यांच्या जुन्या ठाण्यांकडे ९००० बारा (पलटणें–बंदुकावाले–किंवा, भारवरदारी–पान १९ टीप-पहा). ३००० शिलेदार, तोफा दारूगोळा व लढाऊ सामान व वेढा देण्याला उपयोगी पडणारें बरेंच सामान रवाना केलें व आणखीही बरेच लढाऊ सामान लवकरच जाईल. त्यांचा इरादा असा दिसतो कीं वरील जागीं फौज व सर्व सामान व वेढ्याची सर्व तयारी जय्यत ठेऊन तेथून सर्वांनीं एकवटून हल्ला करायचा व अशा रितीनें अल्पकाळांत वेढा द्यायचा. फ्रान्स देशांतून बेलचारी येथील लोकांस असें आश्वासन आलें आहे कीं लवकरच १८ जहाजें, तोफा, बंदुका, शिपाई-दारूगोळा व इतर लढाऊ सामानासहित पाठविलीं जात आहेत. परंतु ते येईपर्यंत त्यांनीं आपलें नांव राखावें व सदर ३ शहराचें उत्तम रितीनें संरक्षण करून तें राखण्याचा त्यांनीं प्रयत्न केला पाहिजे. लागलीच त्यांनीं ४ जहाजें ३०० शिलेदार, दारु-गोळा व सामानसह बेलचडी येथें रवाना केलीं. परंतु हवेंतील ऊष्णतेमुळें व दुखण्यामुळें त्यापैकीं बरेच लोक मेले आणि मुकामाला फारच थोडे येऊन पोहोंचले. हल्लीं बेलचडीच्या किल्यांत २९०० पेक्षां ज्यास्त लढाऊ युरोपिअन नाहींत. व असेंहीं समजतें कीं तटबंदीवरून मारा करण्यासारख्या मोठ्या तोफांसुद्धां तेथें नाहींत. बेलचडी शहरांत असा जाहीरनामा फिरला आहे की फक्त ज्यांजवळ तीन महिन्याची सामुग्री असेल त्यांनीं राहावें व बाकीच्यांनीं चालतें व्हावें. पोर्तुगीझ लोक इंग्रजांनां मिळाले आहेत, आणि स्पनिश व जेनमार्कचे लोकांची फ्रेंचांना मदत आहे. नुकतेंच त्यांनीं तांदुळानें भरलेलें फ्रेंचांचें येक जहाज लुटलें आणि त्यावरील सरदाराला मछलीपटणास कैद केलें, अशी बातमी आहे कीं, कलकत्याहून लार्ड कार्न-वालिस येऊन सदरहू फ्रेंच प्रकरणावर स्वत: नजर ठेवणार आहे. इंग्रजी कंपनीबरोबर सलोखा राहावा या हेतूनें फते अलीखान तोफखान्यांच्या

बेलाच्या तयारींत आहे. यानंतर जें जें होईल तें आपल्यास कळविलें जाईल. जास्त काय लिहिणें ? लोभ करावा हे विनंति.

श्री.

श्रावण व. २ शुक्रवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. मध्यस्तांनीं बोलण्यांत आणिलें कीं::-"चिनापटणाकडोन अखबार आली त्यांत वर्तमान कीं::-'फूलचरीवर चिनापटणचा गौरनर सवीस पलटणे गोरे पगडीवाले सिवाय तोफा दोनसें इतक्या मजबूत सरंजामानसीं जाऊन इरादा केला. प्रथमतःच फलचेरीवर गोळे पुरु केले. येक लडाई याप्रमाणें होऊन त्याजवर जंगमजा केलें आणि फरासीसाकडोन अधिकारी फुलचेरी येथें आहे त्याजके इंग्रजीकडील गौरनरानें आपले पुत्रास किल्यास पाठविलें. निरोप सांगून पाठविला कीं::—इंग्रज व फरासीस या उभ येतां मध्यें लडाई परदेशीं जाली असतां मागील कायदा असा आहे कीं::—' लडाईत पाडाव माणसें इंग्रजांकडील फरासीसाकडे अथवा फरासीसाकडील इंग्रजापासीं आल्यास त्यांस मारहाण न करितां येहतीयातीनें ज्यांची त्याजकडे घ्यावी, त्यास आमची जमयेत सवीस पलटणें व तोफा वगैरे सरंजाम या प्रकारचा; तुह्मांपासीं कुल जमयेत दोन अडीस हजार. यास्तव लढाईचा इरादा न करितां मकान खाली करून घ्यावें. तुह्मीं चजिबस्त सुद्धां निघोन जावें. हें न करितां जंग करावी असाच मनोदय असल्यास तोफा लाऊन येक येक सफीलव बुरुज मोकळा करून देऊं. त्यासमई मकान हस्तगत झाल्यानंतर तुह्मीं ह्मणाल कीं इंग्रज फरासीसाचा कायदा पाडाउ यांस सोडावें तरी तें कबूल होणार नाहीं. येविसीं आताच तुह्मांस बज्याउन सांगतों, लढाई होऊन तुह्मी हस्तगत जाल्यानंतर आह्मांस कतल करणें प्राप्त. इतका विचार पुर्तेपणें दूरदेशीनें समजोन याचा जवाब मामुल पाठवावा. याप्रो निरोप गेला. अद्याप याचा जवाब कांहीं आला नाहीं. याप्रो एक अखबार आली.

त्यांत वर्तमान दुसरें ऐकण्यांत आहे कीं इंग्रजाचें गौरनरानें सदरहु प्रो फुलचेरीचे फरासीसास सांगून पा. याचा जबाब फरासीसानें इंग्रजासी योजिला आहे कीं आमची जितकी फरासीसी जमियेत व तोफा वगैरे बार सरंजाम आहे तितकाच सरंजाम जमियेत, व बार इंग्रजी आमचे मुकाबिल्यास घेऊन यावें. तुमची आमची लढाई होऊन ज्याची सिकस्त होईल यानें फुलचरी मकानापासोन हातउचलावा. याप्रो ही वर्तमान आहे. याजवर यांचे त्यांचे लडाईची बातमी दुसरी अद्यापि आली नाहीं." याप्रो मध्यस्त बोलिले. र॥ छ १९ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. २ शुक्रवार शके १७१५.

विनंति विज्ञापना. मध्यस्तांनीं सांगितलें कीं " अखबारी वर्तमान येक येसे आहे कीं इंग्रजाचे बादषाहानें मिस्तर मेडोंस यास सरदारी देऊन फरासीसाचे तंबीकारितां मुकरर केलें. मेडोस फुलचेरी वगैरे बंदोबस्तांकरितां येणार " याप्र॥ आहे; त्यास मेडोंस बा सरंजाम इकडे आल्यानंतर, आधींच टिपुची त्याची दुष्मानी विशेष. त्यापक्षीं टिपुचे तंबीविषीचाही उद्योग करील यैसें वाटतें; इतक्यावर पाहावें. दुसरें यक वर्तमान येसेंही आहे कीं, " मेडोसांस " त्याचे बादषाहानें रवाना केलें हें वर्तमान फरासीसास समजल्यावरून फरा- " सीसानीं फौज सरंजाम पाठऊन मेडोंसाची त्याची लडाई जाली, त्यांत " मेडोस पडला " हें दुसरें वर्तमान तहकीक नाहीं " याप्र॥ बोलले. र॥ छ १९ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. २ शुक्रवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. अलफखान करनुलकर यांजकडून रणदुलाखान येथें आलें. नवाबाची मुलाजमत होऊन, मध्यस्तासीं बोलणें जालें. रणमस्तखान यांची दौलत व करनुल आदिकरून कुल तालुका अलफखान यांजकडे बा-

हाल असावा. यां समंधें नवाबाची नजर दाहा लक्ष व मध्यस्त दरबार खर्च बाबद पांच लाख, येकूण पंधरा लक्ष ठराविले. सदरहु पंधरा लाख रुपये दरसाल येक लक्ष प्रो पंधरा वर्षांत आदा करावे. या प्रो किस्तबंदीचा ठराव जाला. रणदुलाखान यांचें बोलणें मध्यस्तांसी कीं " टिपुकडून गुलाबखान पेषकसीचे येवजाकारितां करनुलास येऊन तगादा कारितो याचा बंदोबस्त करावा तर सालाचे सालास करार बमोजीब येवज ज्या बज्या होईल टिपु पेषकसीचा येवज घेऊं लागल्यास त्यास परभार देणें, आणि नजरे बाबद इकडेंही येवजाची सरबराई करणें, हें कसें घडेल ?" या प्र॥ बोलणें आहे इब्राइमखान रणमस्तखानाचे वडील पुत्र यांजला प्रथम खिताब व सरफराजी करून येथून करनूल तालुक्याचे बंदोबस्ताकारितां महमद अमीखां आरब यांजकडे रवाना केलें. मागाहून फौज पाठऊन कुमक करावी येसा बेत होता. तो राहून, अलफखानाकडील पैगम लागल्यावरून रणदुलाखानास येथें आणविलें, हें इब्राइमखान यास समजल्यावरून तेही पाकटु-राहून निघाले ते येथें आले. नवाबाची मुलाखत जाली. इब्राइमखां यांस साठ हजार रुपयांची जागीर यक तालुका द्यावा त्यांत त्याणी आपली गुजराण करावी; वरकड सर्व तालुका अलफखानाकडे, याप्रो रणदुलाखान यांसी निश्चयें ठरून संनदा पत्रें तयार करविली र॥ छ १९ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. २ शुक्रवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. नवाबांनीं मध्यस्ताजवळ असतां आह्मीं बोलण्यांत आणिलें कीं "टिपुसीं तीन सरकारचा तह पटणावर जाला ते समई करनूलकराकडील पेषकसीचा जाबसाल टिपूकडील मातबरांनीं बोलण्यांत आणिला, त्या समईची माहितगिरी तुह्मांस सर्व आहेच. करनूलकर समंधी माहितगिरी तुह्मांस सर्व आहेच. करनुलकरसमंधी जाबसाल तहनाम्यांत ते

वस्तीच उगवावा यैसे लाडांसी बोलण्यांतही आलें; परंतु, लाडबाहादुर यांनीं सांगितलें कीं तहनाम्यांत हें कलम उगवावें यैसें आज झटल्यास टिपुनें अगर कबुल केलें तर उत्तम; कबूल न केल्यास हरकत होईल. त्यापक्षीं जो जाबसाल तहनाम्यांत उगवाग येसा इकडील सवाल असतां त्यानें न कबूल करणें यांत काय राहिलें ? " इत्यादिक अंदेशे समजोन बोलण्यांत मात्र जाबसाल आला कीं " रणमस्तखान यांचे मोहरी दस्तायेवज पेषकसीचा निघाल्यास मंजूर. दस्तायेवज निघत नाहीं त्यापक्षीं हा जाबसाल मंजूर नाहीं. या प्रा॥ गुलामअली व रजाअली टिपुकडील मातबर यासीं इंग्रजांकडील मिस्तर किनवी व आम्हांकडून मीर आलम व राव पंतप्रधान यांचे तर्फेनें तुम्हींच होतां. तीन सरकारचे वकीलाचा जाबसाल सदरहू प्रा॥ असतां त्या समई रणमस्तखानाचा मोहरी दस्तायेवज निघाला नाहीं. पुढें पटणाहून कुच जालें; हा जाबसाल मुलतवी राहिला. सांप्रत टिपुकडून गुलाबखान करनुलास येऊन पेषकसीचा तगादा लाविला आहे. याजकारितां लाडबहादूर यांस पत्रें देऊन करनुलकराकडील सादुलाखान चेनापटणास गेला; अद्याप तेथेंच आहे. लाडबाहदूर याजकडील जबाब कीं " दस्तायेवज निघो अगर नसो. टिपुसुलतान करनुलकरास पेषकसीचा तगादा करतील त्यास मुजाहिमत नव्हती. व तालुकियांत आपला दखल होऊं नये येसे म्हणणें " त्यास पेषकसीचे जाबसालाची शर्त रणमस्तखान याचे मोहरी दस्तेयवजावरील करारांत असतां लाडबहादूर या प्रा॥ म्हणतात. ताजुब आहे. त्यास पेषकसीचे झटनिवारण करणें हें राव पंतप्रधान यांनीं व आम्हीं याचा उद्योग केल्याशिवाय घडत नाहीं. यास्तव येविषईं लाडसाहेबास पत्रें आमचे व राव पंतप्रधान यांजकडील या प्रो॥ जाऊन पहिला करार ठरल्याबमोजीब दस्तायेवज बजीनस असलियास मुजाका नाहीं. दस्तायेवज नसतां जबरदस्तीनें पेषकस घेणें हें सलाह नाहीं यास्तव हा कचा मार तुम्हीं राव पंतप्रधान यांस लिहून सदरहू अन्वये बंदोबस्ता प्रकर्णी

लाड बाहदूर यांस पत्र आणावावें म्हणोन बोलण्यांत आलें " त्यास त्यांनी मसोदा दिल्यानंतर सेवेसीं रवाना करीन. साठ १९ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. २ शुक्रवार शके १७१५.

विनंती विज्ञापना मध्यस्तास आम्हीं विन्याईलें कीं " करनुल संवस्थानचा बंदोवस्त इब्राइमखान यांनीं करावा, येसे पेषजी ठरलें असतां सांप्रत अलफखान यांजकडे बाहाली जाल्याचें यैकतो. याचें कारण काय? आलफखानाकडोन रणदुलाखान येथें आले; आपल्याकडील नजराणा वगैरे जाबसाल ठरलाच असेल. श्रीमंतांचे सरकारचा जाबसाल होणें. यास्तव करनुल प्रकरणी बंदोबस्त कोणे प्रकारचा ठरला? " याप्रो बोलल्यावरून मध्यस्तांनीं बोलण्यांत आणिलें कीं " टिपुकडील पेशकषीचे येवजाकारितां करनुलकरास तगादा लागला आहे. येविसीं लाडसाहेबांस लिहिलें होतें. परंतु लाडाचें म्हणणें कीं पेशकसीचा जाबसाल परभारें टिपुसुलतान करनुलकरांसी समजोन घेतील. आपल्याकडोन तोंपर्यंत करनुल तालुकियांत दखल होउं नये, असें आहे. त्याजवरून तूर्त इब्राहीमखान यांची पास करून तालुक्यांत हांगामा करणें सला नाहीं म्हणोन बिलफैल अलफखानाकडे तालुका आहे तसाच असावा; पुढें प्रसंगानरूप होणें तसें होईल. हा विचार समजोन आलफखानाकडेच बाहाली ठरली. इब्राहमिखान यांस साठ हजार रु. याची जागीर येक तालुका द्यावा, ऐसे रणदुल्लाखान यांसी बोलण्यांत आले. मग साठ हाजाराचा वसुली तालुका देतील अगर पांच हजार रु माहावारी द्यावी. दोन्हीतून येक ठरेल बंदगान आली याचें सरकारचे नजरेचे बोलणें जालें; परंतु मुलतवी आहे. सबब कीं रणदुलाखान यांचें बोलणें टिपुकडील पेषकसीचा तगादा मवकुफ करवावा. याबरून नजराणा वगैरे जाबसाल तूर्त मोहगम आहे. दोन्हीही सरकारचे जाबसाल ठरले पाहिजेत. " रणदुलाखान तुम्हांकडे आले होते कीं नाहीं

म्हणोन मजला विच्यारिलें मी सांगितलें, " अद्याप आम्हांकडे नाहींत " मध्यस्त बोलिले "ते तुम्हांकडे येतील, बोलतील. टिपुकडील पेषकसीचा तगादा भारी, याचा बंदोबस्त जरूर. यास्तव तुम्हीं सरकारांत लिहून लाडबहादूर यांस इकडील व तिकडील दुतर्फा पत्रें जाऊन बंदोबस्त व्हावा. करनूल संस्थान इकडील व तिकडील सालाबाद पेषकषीचे याजकारितां येयाचा एहतियात करणें आवल, " म्हणोन बोलिले. रा॥ छ. १९ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. २ शुक्रवार शके १७१५.

विनंति विज्ञापना. रणदुलाखान यांस मध्यस्तांनीं सांगितल्यावरून आम्हांकडे आले होते. खान मजकुर यांचें बोलणें कीं " रणमस्तखान मरहुम यांस " कदीम पासोन आश्रा व भरंवसा श्रीमंताचे सरकारचा व बंदगानअली या- " जकडील. त्यांतही श्रीमंताचे सरकारांत या संस्थानची यास खातर अधिक. " रणमस्तखान यांचे मागें अलफखान यांस सांभाळून संवस्थानचा बंदोबस्त " करणें हें सर्व परवरष त्या सरकाची आहे. आम्हीं ही सेवाचाकरी ता " मगदूर करण्यास हाजर. परंतु बिल फैल टिपुसुलतान याजकडील पेंषक- " सीचा तगादा बेनिहायेत आहे. याचा बंदोबस्त दोन्हीं सरकारांतून आधीं " जाला पाा. " या प्रो खान मजकूर यांचें बोलणें. यांचें उत्तर त्यांस दिलें कीं "टिपुकडील जाबसाल दोन्हीं सरकारांतून ठराव होईल तसा करावयाचा; परंतु श्रीमंताचे सरकारची नजर तरी ठरावी." "याचा विच्यार करून बोलतो " ह्मणोन निरोप घेऊन आपले मकानास गेले. " रणदुलाखान याचा बहुमान करावा " ह्मणोन मध्यस्तांनीं सांगितलें होतें त्यास मोगली पोषाग मये दुषाला व सिरपेंच या प्रो खुदारात केली रा॥ छ. १९ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. २ शुक्रवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. मध्यस्तांनीं बोलण्यात आणिलें कीं " राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांजकडील जाबसालाचा भाग तुटत नाहीं. जानोजी भोंसले व सेनाधूरंधर यांचे काराकीर्दीस दुतर्फा तहनामें जाले त्या बमोजीब परस्परें वहिवाट व्हावी तें न होतां सेनासाहेब सुभा यांची आगळीक होते. वराड प्रांतीं बेमोईन जेथें जसा दस्त पोहचतो तेथें अमल घेण्यास देसा देश करीतच नाहींत. यांचे जाबसाल आज रुपें वाजवी ठरावें ये बिसी तुम्हांसी किती वेळ बोलण्यांत आलें ? तुम्हीं ही त्यांजला जे पर्याये बसाल्याचे ते लिहिलेच असतील. पटणचे स्वारीहून येते समईं हरी पंडत यांसीही सर्व दर्जे बोलण्यांत आले, परंतु अद्याप कोणचाही मुजकाः होत नाहीं. त्याजकडोन विठ्ठलपंत सुभेदार बारा हजार फौज तोफा वगैरे सरंजाम घेऊन जडसी बाम्हणी वगैरे तालुकियांत सरहादेवर आले. गावेलगडावर तोफा नेऊन बंदोबस्ती केली इत्यादि वर्तमानेंही पेहम येतात; त्यास वाजवी जाबसालाचीं कामें बोलल्यानें उलगडायाची, त्यास फौजा पुढें ठेवणें व बंदोबस्त करणें याची सबब काय ? सेना साहेब सुभा सरदार आहेत. त्याजपासीं फौजेचा सरंजाम कमाल तीस हजारपर्यंत कामाचे वख्ती हें महपूर आहे, त्यापक्षीं दाहा बारा हजार फौजेनसी सुभेदार पुढें आल्यानेंच त्यांजपासीं फौज आहे हें समजावें येसे नाहीं, तर्फेचे तहनाम्या प्रो जाबसाल विल्हे लागावें. या सरकारचे जाबसालाचा फैसला त्याजकडोन व्हावा. त्याचेही जाबसाल इदूर, बोधन वगैरे माहाला घा दाण्याचा व प्रांत गंगथडी येथील बाक्या राहिल्या म्हणतात याचे उलगडे होऊन दुतर्फा करार बमोजीब अमलांत आणावें हें चांगलें. आतां ही दसऱ्या पावेतों त्याजकडोन कोण्ही मातबर मुख्तियार भवानी काळो अथवा श्रीधरपंत आगर कुशाबा चिटनीस या तिघांतून येकानें येऊन तडजोड करावी हे सलाह. नके जो जाबसाल आतां जसा उलगडण्यांत येईल,

तोच दसरा जाल्यानंतर करीन म्हटल्यास कठीण पडेल. तहनाम्याचे रुईनें जाबसाल विल्हे लागावे असें म्हणत असतां, या जाबसालास कोण्हीही गैर वाजवी म्हणार नाहींत, याचाही विच्यार असावा. येविसीं सेनासाहेब सुभा यांस तुम्हीं येक वेळ ल्याहावें " याप्रो मध्यस्ताचे बोलण्यांत आलें. ध्यानांत यावें यास्तव विनंती श्रीमंताचीही आज्ञा सेनासाहेब सुभा यांस जाऊन तिघांपैकीं येकानें इकडे येऊन जाबसालाचे भाग तोडावे, येविसी सरकारांत तुम्हीं लिहुन उत्तर लौकर आणवावें " ह्मणोन बोलिले त्यावरून विनंती असे. आज्ञा येईल त्याप्रो यांसी बोलण्यांत येईल. रा छ १९ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. २ शुक्रवार शके, १७१५.

विनंति विज्ञापना. औरंगाबाद येथील तमाम साहुकारास पटी आंठीघा॥ चा कर लाख रुपयाचा तेथील सुभे ईफ्तखारखान व मिरधे मुरादबक्ष यांणीं नवाबाचे हुकुमा बमोजीब केली. त्याची हिसेरसीद हरबाजी नाईक बिडवई याचा पुतण्या रघुनाथ नाईक याजवर साडेबारा हजार रुपयांची ठरली. पटी रुपयांचा तगादा सुभे व मिर्ध्याकडील; सबब, रघुनाथ नाईक यांनीं शहरांतील येक कलाल रुस्तुम ह्मणोन व आणिक कांहीं साहुकार वगैरे लोकांचा येका करून पांचसातसेपर्यंत जामियेत ही ठेविली; त्यांस रोजमुरा वांटुन सुभे व मिरधे यांस मागावयाची तजवीज केली. हें वर्तमान सुभ्यास समजतांच त्यांणीं तमाम साहुकार लोक रघुनाथ नाईक सुधां धरून आणून चौकसी केली; सर्वांचे संमतें या करण्याचे बाजीकार रघुनाथ बिडवई व रुस्तुम कलाल. त्यावरून सुभे व मिरधे यांणीं रघुनाथ नाईक यांचे पाईं बेडी घालून कैद केलें. दुकान घरदाराची जप्ती केली. कलालास तोफेचे तोंडी देऊन उडविलें. याप्रो औरंगाबादेहून अखबार छ. २६ जिल्हेजी नवाबाकडे आली. बिडवई याचा दुकान येक औरंगाबादेस तो तेथें जप्त झाला. हैदराबादेंतील दुकानाचीही जप्ती करविली. रघुनाथ नाईक याचा मामा त्रिंबक नाईक येथें

बेदरास स्वारीसमागमें आला. येथीलही दुकानावर पाहरे रात्रींच पाठवून जप्ती जाली. बहुत लोकांच्या ठेवी त्याचे दुकानीं फार दिवसांपासोन, त्यासुधा येकवार चीजबस्त कुल जप्तींत आले. सुभे यांणीं औरंगाबादी रघुनाथ नाइका पासोन गुन्हेगारीची नजर साडेबारा लाख रुपयांची फर्द मारहाण देऊन लेहून घेतले. सांप्रत दुकानांतील वद्दा सरकारांत आणऊन ई॥ पासोनं कोणाचा यैवज किती जमा याची चौकसी होत आहे इतकियावर काय होतें हें पाहावें र छ. १५ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. २ शुक्रवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. कादरखान माजी करोडा यांजकडे नवाबांनीं सरकार खममेटे तालुका काडोपली सुभा अमिली दाहा लक्ष रुपये ताहुदठरून सांगितला. लुखसत देऊन समागमें तीनसें स्वार व पांचसे बार जामियेस तैनात देऊन तालुकियास खान माार याची रवानगी केली रा॥ छ १५ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. २ शुक्रवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. कोदल येथील जमीदार बेदर येथील किल्यांत माजी कैद करून ठेविला होता. त्यास, पाहाऱ्यांतून रात्रीं तो निघोन पळून गेला. पाहऱ्याचे गारदी यास मारहाण होत आहे. जमीदाराचा शोध किल्यांत व पेठ व आसपास च्यार च्यार कोस लोक पाठऊन केला. परंतु सांपडला नाहीं. रा॥ छ. १५ मोहरम हे विज्ञापना.

श्री

श्रावण व० २ शुक्रवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. पंचोऱ्याचा अमल नवाबानीं आपले तमाम तालुक्यांत बसविला. पा॥ वसमत येथें पंचोऱ्याचा दखल करण्याकरितां करोड्याकडील

येक कारकून व चोपदार व पन्नास स्वार येथून सैद मुनवरखान अमीन यांस पत्रें देऊन रवाना केलें. वसमतेस जाऊन पोंहचल्यानंतर सैद मुनवरखान यानीं दखल दिल्हा. येक दिवस राहून दुसरे दिवसीं पंचोतरा जारी केला. चौक्या भोंवत्या ठेवून पंचोतरा मन मानेल तसा करोड्याकडील कारकून घेऊं लागला, सबब वसमतचे पेठकरी, व गांवांतील लोक व बायका दोन अडीच हजारा पावेतों मिळोन येकच बलवा करोड्यावर केला. दगडाचा मार च्यार साहा घटिकापर्यंत होऊन कांहीं स्वार व माणसें जखमीही जालीं. सैद मुनवरखान यास समजल्यानंतर त्यांनीं येऊन कजिया तोडविला. हें वर्तमान करोड्याचे कारकुनानें व चोपदारानें मध्यस्तास लिहिल्यावरून इतकें कृत्य सैद मुनवरखान व हैदरबेग सवदागर यांणींच केलें असें मध्यस्ताचे चित्तांत येऊन, येथून च्यारसें स्वार व पांचसें बार जमियेत रवाना केली कीं सैद मुनवरखान व सवदागरास पाठवून देणें, आणि पंचोतऱ्याचा बंदोबस्त करून ज्याणीं बलवा केला, त्यांत षामील जाले असतील त्यांचेही पारपत्य करणें. याप्रमाणें ताकीद होऊन स्वार व बार रवाना झाले. पुढें याचें काय ठरतें पाहावें. रा॥ छ १९ मोहरम विज्ञापना.

श्री.

श्रावण व. २ शुक्रवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. हैदराबाद येथें मध्यस्ताचा धाकटा पालक पुत्र गाजी उल्मुलक आहे. त्यास, अलीज्याह बहादुर साहेबजादे यांची कबुतरें सुटून आलीं तीं गाजी उल्मुलुक यांणीं धरून ठेविलीं. साहेबजादे यांचे माणसांसीं व गाजी उलमुलुक यांचे माणसांत कटकट होऊन परस्परें मनुष्य जखमीही जाली. साहेबजादे यांणीं कबुतरें आणविलीं. याप्रमाणें कटकटीचे वर्तमान हैदराबादेहून अखबार आली त्यांत आलें, रा॥ छ १९ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. २ शुक्रवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. तैमुरशाहा दुरानी इरानचे बादशाहा यांचा अंतकाल जाला. त्याजला च्यार षाहाजादे पैकीं मधील शाहाजादे षाहा आलम बादशाहा

गाजी दिलीचे पादशाहा यांचा भाचा बहिणीचा पुत्र तैमुरशाहा याचे तख्तावर बसल्याची आखबार नबाबाकडे आली. हें वर्तमान मध्यस्तांनीं सांगितल्यावरून विनंती लिहिली असे. रा॥ छ १९ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व० ३० गुरुवार शके १७१५

आखबार इ॥ छ २३ जिल्हेज त॥ छ ९ मोहरम शनिवार पावेतो. रवाना छ १९ मोहरम हे विज्ञापना.

छ. २८ मोहरमी रवानगी पत्रें टप्यावर.

श्री.

श्रावण व. ३० गुरुवार शके १७१५.

श्रीमंत राजश्री ——————— रावसाहेब
स्वामीचे सेवेसीं ———————

विनंती. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सा॥ नमस्कार विनंती. विज्ञापना. त॥ छ. २८ माहे मोहरम पर्यंत मु॥ बेदर येथें स्वामीचेकृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान सविस्तर छ. १६ माहे म॥रीं लेखन करून पत्राची रवानगी डांकेवर केली त्यावरून ध्यान्यांत आलें असेल. सांप्रत येथील वर्तमानाची विनंती आलहिदा पुरवणी पत्रीं लि॥ आहे. अवलोकनें त॥ मार ध्यानांत येईल उत्तरें रवाना होण्याविषयीं आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. ३० गुरुवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. टिपु सुलतान यांजकडून शुतर स्वारासमागमें मध्यस्तास पत्र छ. २३ मोहरमी आलें. मध्यस्तांनीं पत्र वाचून आपले मर्जीसहीत नवाबांकडे पाठविलें. नवाबांनीं मुलाहिजा करून टिपुकडील पत्राचा जबाब तयार करण्याकारितां फिरोन मध्यस्ताकडे पाठविलें. त्यानंतर मध्यस्तांनीं जबाबाचा मसविदा ठरविला. छ २४ रोजीं दुसरे दिवसीं मध्यस्ताकडे आहीं गेलों ते समईं त्यांनीं टिपुकडून आपल्यास पत्र आलें त्यांतील म॥र व जबाब रवाना

करण्याचा याचा बयान करून पत्र आलें. तें व जबाबाचा मसविदा दाखविला. याचा ता॥ आलाहिदा पुरवणी पत्रीं विनंती लिहिल्यावरून ध्यानांत येईल. छ. २९ रोजीं नबाबाकडे मध्यस्त जाऊन जबाब ठरविला तो दाखाविला. याउपरी शुतर स्वारास जबाब देऊन रवानगी होईल. रा॥ छ. २८ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. ३० गुरुवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. मध्यस्तास टिपूचें पत्र आलें त्यांत म॥र कीं "आपल्याकडील तिसरे किस्तीचा यैवज करार बमोजीब कडपें येथें सबतरखान याजसमागमे पा॥ आहे. तेथें ऐवज पारखून घेऊन रसीद द्यावी. व दुसरे हप्त्याचे यैवजाची रसीद अद्याप आली नाहीं, याजकारितां तेही रसीद पाठवावी." याप्रा॥ लि॥ आहे. पत्राची तारीख, जिल्हेज महिन्याचे अखेरीची आहे. याजवर मध्यस्तास मी विचारिलें कीं दुसरे हप्त्याचे रसिदीविषईं टिपूनें लिहिलें, त्यास यैवज पोंहचून रसीद पाठविली नाहीं याचें कारण काय ? मध्यस्ताचे बोलण्यांत आलें कीं " दुसरे हप्त्याचा यैवज अद्याप दाखल जाला नाहीं. यैवज पोंचल्यानंतर रसीदीस काय गुंता ! दुसरे हप्त्याबाबत यैवज टिपुनें प्रथम व्यंकटगिरिकडे पाठविला. इंग्रजांनीं आह्मांस लिहिलें कीं " यैवज न्यावा." त्याचा जबाब इकडून गेला कीं इकडील यैवज टिपुनें कडपे प्रांतीं पोंहचता करून द्यावा यैसा करार आहे, त्याप्रा॥ अमलांत यावें. त्यावरून इंग्रजांनीं त्यास ताकीद केली. दुसरे वायद्याचा यैवज तिकडून गुरुमकुंडयानजीक येके गांवीं (आ) आला. त्यांतही कांहीं बाकीचा यैवज मागाहून येणार. येकंदर दुसरे हप्त्याचा यैवज जमा करून कडप्यास पोंहचता होणार याप्रा॥ वर्तमान आहे. त्यास आम्हीं आपल्याकडून सैद गुलाम आली यास येथून कडप्यास रवाना केलें, त्याचें समागमें दुसरे किस्तीचे यैवजाची रसीद दिल्ही आहे. कडप्यास टिपूकडून दुसरे हप्त्याचा यैवज येईल तो पारखून घेऊन रसीद द्यावी" याप्रा॥ सांगितलें आहे. त्यास छ. २२ मोहरमपर्यंत कडपें येथें टिपूकडुन दुसरे वायद्याचा

अगर तिसरे हप्त्याचा यैवज कांहींच पावला नाहीं. या प्र॥ कडप्याचीं पत्रें आलीं. इतक्यावर यैवज आल्यास दुसरे किस्तीचा यैवज घेऊन रसीद सैद गुलाम अली देईल. तिसरे हप्त्याचा यैवज पोंहचल्यानंतर तेथुन सैद गुलाम याचें पत्र यैवज पावल्याचें आलें म्हणजे इकडून रसीद रवाना करण्यांत येईल. याप्र॥ मध्यस्ताचें बोलण्यांत आलें. र॥ छ. मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. ३० गुरुवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. टिपूकडील पत्र मध्यस्तास आलें, त्याचा जबाब त्यास रवाना करण्याचा यांनीं ठरविला. त्यांतील म॥र कीं " तुम्हीं शूतर स्वारा समागमें पत्र पाठविलें, त्यांत इकडील तिसरे किस्तीचा यैवज कडप्यास सबरखानासमागमें रवाना केला तो घेऊन रसीद द्यावी; व दुसरे हप्त्याची रसीद आपल्याकडून आली नाहीं ते पाठवावी म्हणोन लि॥ त्यास दुसरे हप्त्याचा यैवज कडपे येथें अद्याप तुम्हांकडून दाखल जाला नसतां रसीद पाठवावी यैसें लिहिलें हें काय ताजूब आहे ? येथून सैद गुलाम अली यां समागमें रसीद दुसरे हप्त्याची देऊन त्यास कडपें येथें रवाना केलें. यैवज लौकर दाखल व्हावा म्हणजे पारखून घेऊन सैद म॥र रसीद देतील तिसरे किस्तीचा यैवज कडप्यास पोंहचतां व्हावा. तेथें यैवज दाखल झाल्याचें पत्र सैद गुलाम यांची अर्जी येथें पोंचतांच तिसरे हपत्याची रसीद येथून रवाना होईल. या प्रा॥ टिपूचे पत्राचा जबाब यांनीं ठरविला. सैद गुलाम यासही सदरहु अन्वयें यांनीं पत्रें लिहून रवाना केली कीं, टिपुकडील दुसरे हप्त्याचा यैवज कडपें येथें पारखून घेऊन तुह्मांपासीं रसीद दिल्ही ते त्यांजकडे द्यावी. तिसरे हप्त्याचा यैवज कडप्यास दाखल होतांच तुमची अर्जी यावी. ह्मणजे तेही रसीद येथुन रवाना करण्यांत येईल. रा छ. २८ मोहरम हे विनंति. विज्ञापना.

श्री.

श्रावण व. ३० गुरुवार शके १७१५.

विनंति विज्ञापना. शमषदौला यांजकडील पागेचा तालुका सुभे महमदाबाद पैकी व कलबर्गे वगैरे सुभे विजापूर येकंदर पस्तीस माहाल येथील कुल

वहिवाट त्यांचे त्यांजकडे. यांत मध्यस्ताचा दखल नाहीं. शमषुदौला वारल्यानंतर पागेकडील सर्व देखरेख नबाब जातीनें करूं लागले. मध्यस्तांनीं खटपट करावयाचे रीतीनें करून पाहिली, परंतु साध्य नाहीं. शमषुदौला यांचा पुत्र लहान. कारभारी महमद अजीमखान यांचे निसबतीचे माहाल कलबर्गे भालकी चिटगोंदें चितापूर वगैरे याचा बंदोबस्त त्यांनीं राखिला. सर बुलंदजंग शमषुदौलाचे मेव्हणे व घासीमियां व गुलाम इमामखां व दिलदारखां व मुरादअली यांचे निसबतीचे लोक व पागा आलाहिदा. त्याचे बेगमीचा सरंजाम माहालही तोडून सदरहु इसमाचे निसबतीस वेगळाले होते. परंतु तालुकियाचा बंदोबस्त नाहीं, आणि चाकरी विषईंही करार माफीक कमती. त्यांत घासी मियांकडील तर फारच बखेडा. कारभार ओगडस्त. लोकांची धरणी पारणी नित्य खटला. याप्रा जालें. त्यावरून कांहीं दिवस यांचे तालुक्याचा बंदोबस्त पाहात जाणें ह्मणोन अजमखान यास नबाबांनीं सांगितलें. अजमखान यांचा इल हाक सरबुलंदजंग यांचे दसखत, यैसे ठराऊन क्रमही चालिला होता. तथापि निर्वेध बंदोबस्त खातरखा नाहीं. पागेकडील हिसेबाचा घोल मध्यस्तांनीं नवाबास अर्ज करून घातला. राज्याजीस हिसेब पाहण्यास सांगितलें. हिसेबी यैवज पागेवाल्याकडे निघाला. त्याची तडजोड ठरून पांचसहा लक्ष पर्यंत पागेवाल्याकडोन यैवज सरकारांस घेतला. पुढें पागेकडील बंदोबस्त येथास्थित व्हावा हें नवाबास अगत्य. या सर्वांत पाहतां येक महमद अजीमखान कार्य करतां त्यांनीं नवाबास अर्ज केला कीं शमषुदौला मरहुम यांजकडील सर्व बंदोबंत हजरत जातीनें करण्यास मुतवजे असोन हा प्रकार असा. गुलामता मगदुर सांगणें तें सांगतो, परंतु कोणी कोणांत नाहीं. याची येहतीयात जसी होणें तसी व्हावी. त्यावरून अजमखान यांस नबाबांनीं सांगितलें कीं कुल तालुकियाचा बंदोबस्त तुमचे जिमेस आहे. सरबुलंदजंग घासीमियां वगैरे यांस नेमाप्रा। माहवारी माहबमाह देत जावी. तालुक्यास अमला योजून बंदोबस्त पका करावा. त्यावरून अजमखान यांनीं सिदी इमाम यांचे अमीलीचे कारस्तानाचा बयान केल्यावरून पुल पागेकडील पस्तीस तालुकियाची सरअमीली

सिदी इमाम यांजकडे सांगावे. छ. २० मोहरमी अजमखान व घासीमियां यांजला सिदी इमाम यांस घेऊन येण्याविषीं नबाबांनीं चोपदार पाठऊन नेलें. सिदी इमाम यांस बाहालीचा खलात दिल्हा. माहावारीचे नेम ठरले त्याप्रा यैवज जिकडील तिकडें देऊन तालुक्याचा बंदोबस्त करावा या प्रा सांगितलें. सिदी इमाम यांनीं तमाम तालुकीयास जप्त्या रवाना केल्या. या उपरी अमील माहलो माहाल रवाना होणार. सिदी आठ च्यार दिवसांत येथून तालुकियास जाणार. सारांश, शमषुदौला यांजकडील तालुक्याचा बखेडा अलाहिदा टुक ड्यामुळें होता तो अजमखान यांचे विच्यारें नबाबांनीं येकत्र बंदोबस्त याप्रा केला. रा छ २८ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. ३० गुरुवार शके १७१५.

विनंति विज्ञापना. हरबाजी नाईक बिडवी याचे पुतण्यानें औरंगाबादी सुभ्यावर बलवा करावयाचे केलें. याची अखबार आल्यावरून दुकानाची जप्ती जाली. सांप्रत त्याजकडील त्रिंबक नाईक येथें आहे, त्याचें बोलणें मध्यस्तासी रोशनराये वहरी नारायेण यांचे मारफतीनें होऊन तूर्त साडेतीन लक्षाची निशा त्रिंबक नाईक यांनीं करावी यैसे मध्यस्तानीं ठरविलें. त्यावरून साडेतीन लाखाची फर्द घेतली. दुकानांतील नगदी यैवज व भरतीस लोकांकडे येणें तो लाऊन दिल्हा. दुकानावर पाहारे होते ते उठावयाची परवानगी मध्यस्तांनीं नवाबास अर्ज करून घेतली. रा छ २८ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व० ३० गुरुवार शके १७१५.

विनंति विज्ञापना. पुनर्वसु नक्षत्रापासोन आश्लेषा अखेर पावेतों तीन नक्षत्रें कोरडीं गेलीं. पाऊस नाहीं. वारा भयानक. खरीफाची पिकें व सर्व जिनस धान्याचे गचोऱ्यास येऊन पर्जन्य नाहीं यामुळें वालत चालली. धारण सस्त होती ते दररोज सेर आदसे (र) रोज माहाग होत चाली. पर्ज्यन्या-

मुळें मनुष्यमात्राचे होष ठिकाणीं नव्हते. इतकियांत श्रावण शु॥ षष्ठी मंगळवारीं मघा नक्षत्राची शुरुवात होतांच पर्जन्याचे वृष्टीस आरंभ जाला. सगळें नक्षत्र पाऊस इकडील तमाम प्रांतीं जाले. रात्रीं पर्जन्य पडावा, दिवसां उघडावा, याप्रा॥ दररोज. त्यांत च्यार पांच पाऊस मातबर जसें कुणबी लोकांस अपेक्षित तसे जाले. चहूंकडे पाणी पाणी जालें. वोढ्यास व नद्यास तमाम पूर आले. मार्गी येणार जाणार वाटसरू वोढ्या नाल्याचे पुरानें कितेक अटकून तीन तीन च्यार च्यार दिवस राहिले. कितेक दग्यानें वाहून गेले. बेदर येथें किल्यांत व शहरांत व पैंठा येथील भिंतींस पाणी लागून ढांसळून पडल्या. त्यांत कित्येक माणसें मेलीं, व जायाही जालीं. मघा नक्षत्राचा पाऊस इकडील प्रांतीं बहुत जाला. पूर्वा निघाल्यापासोन उघड पडली आहे. त्यांतही बारीक मोठा वरचेवर पडतच आहे. आह्मीं छपराची भिंत घालविली त्याजवर छपरें टाकावयाचा अवकाश पडला नाहीं; कारण कीं, तीन दिवस पर्जन्याची झड येकसारखी लागली. भिंत पडोन दोन माणसें प्यादे ठार जाले; व पांच सात जखमी जाली. तीं बरीं व्हावयास आणिक महिना दीड महिना पाहिजे. र॥ छ. २८ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. ३० गुरुवार शके १७१५.

विनंति विज्ञापना. चेनापटणाहून व्यंकटराम दीला याजकडील अखबार आली, ती सांप्रत रवाना केली आहे. राजश्री गोविंदराव सेवेसीं प्रविष्ट करतील. अवलोकनें सविस्तर मार ध्यानांत येईल. र॥ छ. २८ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

श्रावण व. ३० गुरुवार शके १७१५.

अखबार ई॥ छ ९ मोहरम त॥ छ. २९ माहे मार पर्यंत र॥ छ. २८ मोहरम.

विनंति विज्ञापना. राजेश्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा यांचें पत्र आ-ह्मांस आलें कीं, पुण्यास राजश्री श्रीधरपंत व कुशाबा चिटणीस यांची रवा-नगी राजश्री बाबूराव यांजसहित केली ह्मणोन; व सदरहु अन्वयें नवाबासही सेनासाहेबसुभा यांचे खरीता पत्र आलें तें त्यांजकडील माधवराव रामचंद्र यांनीं गुजराणिलें. रा॥ छ. २८ मोहरम हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद शु. १ शुक्रवार शके १७१५.

विनंति विज्ञापना. छ. २८ मोहरमी प्रथम प्रहरीं मिस्तर इष्टावरट फिरंगी मिस्तर ज्यान कनवी कडील आला होता. नवाबही बाहेर आले. दरबार जाला. फिरंगी मार यानें अर्ज केला कीं छ. १४ मोहरमी फुलकचेरीत इं-ग्रजाकडील ठाणें कायेम जालें.....त्याजवरून खुषीच्या तोफा सो-डावयास हुकुम केला. एकवीस बार जाले. कसी घेतली याचा तपसील मागाहून समजून घेऊन लिहून पाठवीन. रा॥ छ. २९ मोहरम हे विज्ञापना.

छ ६ सफरी टप्यावर पुण्यास.

श्री

भाद्रपद शु. ८ शुक्रवार शके १७१५.

श्रीमंत राजश्री ———— रावसाहेब स्वामीचे

सेवेसीं ————————————

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सा॥ नमस्कार विनंति. विज्ञापना. ता॥ छ २६ माहे सफरपर्यंत मु॥ बेदर येथें स्वामीचे कृपावलोकनेंकरून से-वकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान पेशजी डांकेवर ता॥ बार विनंति लिहिल्यावरून ध्यानांत आलें असेल. सांप्रत येथील वर्तमान अला-

हिदा पुरवणी पत्रीं सेवेसीं विनंति लेहून पत्राची रवानगी केली असे, याव. रून अवलोकनांत येईल. उत्तरें रवाना करावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद शु. ८ शुक्रवार शके १७१५

विनंती विज्ञापना. "पागेकडील पस्तीस माहालचा बंदोबस्त नवाबांनीं महमद अजीमखा यांचे विच्यारें सिदी इमाम यास सर अमीली देऊन केला" इत्यादिक तपसिलाची विनंती पेराजी लिहिल्यावरून ध्यानास आलें असेल. सिदी इमाम यांनीं तमाम पागेकडील तालुक्यांत आपल्या नक्त्या पाठविल्या. सर बुलंदजंग घासीमियां वगैरेकडील अमील होते ते तगीर जाले. त्यास हें सर्व करणें महंमद अजीमखा यांचे विच्याराचें. त्यांनीं घासीमियां यांजकडील संमत कांहीं घेऊन केलें. सर बुलंदजंग वगैरे अलाहिदा राहिले. ते आपले ठिकाणीं नाखुष, कीं झाडून तालुकियाचा सरसुभा सिदी इमाम जाला. तो माहाबारी उचले हातें देईल तें घेऊन खाऊन पडावें. तालुक्यांत सर्व हुकुम अहकाम त्यांजकडील. यांत राहिलें काय? याप्रा मनांत येऊन, त्यांनीं तीन च्यार इसमांनीं येक होऊन अटा बांधिला. व्यंकटराव सरसुभेदार सुरापुरकर यांजकडे सर बुलंदजंगाकडील तीन तालुके. पा हसनाबाद व अलंद गुंजोटी अमीलीनें होते, त्या तालुक्यास सिदीची जप्ती गेली. व्यंकटराव यांची व सिदीची पहिली ही अदावत. त्यांचे तालुके सिदीनें व सिदीचे व्यंकटराव यांनीं इजाफे कबूल करून केले, याप्रा चुरुस होतीच. हल्लीं सिदीचा पगडा कुल पागा तालुकियांतपडला, हे गोष्ट व्यंकटराव यांस आहद होऊन सरबुलदजंग यास हेही अनुकुल जाले. सरबुलदजंग आदिकरून व्यंकटराव यांचा येक विचार जाला कीं कोणेंही प्रकारें सिदीनें काम केलें हें उलटावें. इजाफा वरता बोलावा, परंतु जाले कामाची पायमली करून आपटी द्यावी. याप्रा नक्षा बांधुन राज्याजी यांचे विद्यमानें जाबसाल शुरु केला. पागा तालुकियाचा येकंदर सरकारी आकार शिवाय खर्च बावीस लाख. याजवर दहा लक्ष ज्याजती

आंकार करून देण्याचें बोलणें सिदीइमाम यांचें, अजमखान यांचें विचारें नवाबापासीं होऊन, बेचाळीस लक्षाचा अंदाजा ठरला. हलीं व्यंकटराव यांणीं दहा लक्ष इजाफा बोलण्यांत आणिला. बावन लक्षावर गोष्ट आली. मध्यस्ता पासीं राज्याजीचे मारफत बोलणें पडलें. पागा तालुकियांत हरयेक तऱ्हेनें आपला कदम सिरावा याची हाउस मध्यस्तास होतीच. इतके दिवस उद्योग केला परंतु साध्य न जाला. सांप्रत घरांतील फुट पडून अनायासें करून सरबुलदजंग वगैरे कडील पैगाम लागला. यांत संतोष मध्यस्तास होऊन नवाबाकडे मध्यस्त गेले. पागा तालुकियावर इजाफा असा इत्यादिक बयान करून अर्ज केला. सरबुलदजंग वासीमियां गुलामइमाम वगैरे आले. बोलणें च्यारसाहा घटिका पर्यंत यांचे त्यांचे जालें. व्यंकटराव यांची पाठ थापटून मध्यस्तांनीं आधींच सिद्ध केलें. बावन लक्षाचे आकाराचें बोलणें पडलें. शिवाय माहाल मार खर्च सिबंदी वगैरे आठ लक्ष यैसें बोलण्यांत होतें. त्याजवर ही मध्यस्तांनीं मात्रा चढवून बोलले कीं आठ लक्ष सिबंदी खर्च बाबत देणें व यैन बावन लाख. येकून साठ लाख रुपयांचा जिमा करून जो उचलील त्यानें पागा तालुकियाचे दरोबस्त काम करावें. याप्रा साठ लाखावर रकम येऊन पोहंचली. हलीं सिदी इमाम यांस म्हणतात कीं तुम्ही साठ लाख कबूल करून काम करावें. नाहीं तर सदरहुप्रा व्यंकटराव यांजकडे करार करून देतों. याचा विच्यार करून अर्ज करितों. याप्रा अजमखां व सिदी इमाम यांचे बोलणें. याजवर कोणाकडे ठरतें तें पाहावें. सारांश पागा तालुकियाचा बंदोबस्त आजपर्यंत नवाबांनीं जातीनें राखिला होता. सांप्रत घरांतील फुट पडल्यामुळे या थरास नौबत पोंहचली. रा छ. ६ सफर हे विनंती.

श्री.

भाद्रपद शु. ८ शुक्रवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. मध्यस्ताचे बोलण्यांत आलें कीं, "इंग्रज व फरासीस यांचा बिगाड विलायतेंत जाल्यानंतर त्यांच्या त्यांच्या तीन लडाया मातबर जाल्या. त्यांत तर्फेनचीं मनुष्यें बहुत खपली गेलीं. फरासीसाकडील जमाव भारी. इंग्रज

२१२ दा. क. .....

वगैरे तीन च्यार टोपीवाले येकत्र होऊन लडाया जाल्या, परंतु फरासीस गालब. तेव्हां इंग्रजांनीं रूसवाले टोपीकर याजकडे राजकारण करून त्यास षामील करून घेतलें. रूसवाल्याचा जमाव हमेषा भारी. ज्याजकडील जंगी जाहा. जांत तीस लाख लडाक माणसें समवाल्यासी ज्यांचीं लडाई पैहाम होत असती त्यांस इंग्रजांनीं मेळऊन घेतल्यानंतर रूसवाले व इंग्रज येकत्र होऊन फरासीसासी लडाई मातवर जाली. फरासीसाची सिकस्त जाल्याचें वर्तमान आलें. खुष्कींत फुलचेरी बंदरही इंग्रजांनीं घेतलें. " याप्रा बोलले. "तीन दिवसपर्यंत फरासीस इंग्रजासी फुलचेरीवर लडले. सेवटीं तावा इंग्रजांकडील फौज सरंजामाचा सोसेना, सबब किला इंग्रजांचे स्वाधीन केला. " याप्रा बोलले. रा छ. ६ माहे सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद शु. ८ शुक्रवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. मध्यस्तांनीं बोलण्यांत आणलें कीं " लाडबाहादुर-कलकत्याहून मोहरमी जाहजांत सवार जाल्याचें वर्तमान आलें. चेनापटणास येणार. छ. २२ मोहरमचीं पत्रें चेना पटणाकडून अखबार वगैरे आली. तोंपावेतों लाडसाहेब चेनापटनास दाखल जाले नाहींत. कलकत्याहून स्वार जाले त्यापक्षीं लौकर येतील " याप्रा बोलले. रा छ. ६ सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद शु. ८ शुक्रवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. अलफखान करनुळकर यांजकडुन रणदुलाखान नवाबांकडें आले. त्यांचे बोलणें मध्यास्तासीं होऊन अलफखान यांजकडे कुल तालुका बाहाल जाला. " टिपुकडील पेषकसीचे यैवजाची निकड करनुलकरास लागली. याचा बंदोबस्त व्हावा " म्हणोन रणदुलाखानाचें बोलणें. मध्यस्ताचे म्ह (ण) णें कीं " लाड बाहादुर यांसलेहन बंदोबस्त होईल तेथवर करितों, परंतु रणमस्तखान यांचा मोहरी द-

स्त यैवज टिपुपासीं असल्यास पेषकसीचा यैवज सालाबाद देणे ग्रा॥. करार-च असा आहे, त्यापक्षीं दस्त यैवज निघाल्यास बोलण्यास जागा नाहीं. परंतु दस्त यैवज मोहरी त्याजपासीं नाहीं. जर दस्त यैवज असता तर आजपर्यंत केद करून कशास ठेवते ? तथापि निघाल्यास दोन लाख रु. पेषकसीचा दस्त यैवज असला तरी लाख रु. तीन सरकारचे व लाख टिपुचे याचा निर्णय पुढें पाहता येईल. त्यास तुम्हीं बंदगान अली यांचे नांवें अर्जी ल्याहावी कीं, टिपुकडील पेषकसीचा तगादा होतो. त्यास रणमस्तखान यांचे मोहरी दस्त यैवज त्यापासीं निघाल्यास मंजूर." याप्रा॥ रणदुलाखान यांसीं मध्यस्तांनी बोलून रणदुलाखान यांची अर्जी सदरहुप्रा॥ नबाबास देण्याचा मसविदा मध्यस्तांनीं रणदुलाखान यांस आमचे समक्ष करून दिल्हा. रा॥ छ ६ माहे सफर हे विज्ञापना.

श्री

भाद्रपद शु. ८ शुक्रवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. चेनापटणाहुन व्यंकटरामदीला याजकडील अखबार सांप्रत आली ती येथून रा॥ केली आहे. राजश्री गोविंदराव भगवंत सेवेसीं प्रविष्ट करतील, त्यावरून वर्तमान अवलोकनांत येईल. उत्तर रवाना होण्यास आज्ञा जाली पाहिजे. रा॥ छ ६ माहे सफर हे विज्ञापना.

श्री.

अखबार ईा॥ छ. २५ मोहरम ता॥ छ ९ माहे सफरपर्यंत. रा॥ छ ६ सफर छ ८ सफरी टप्यावर पुण्यास.

श्री.

भाद्रपद शु. १० रविवार शके १७१५.

—श्रीमंत राजश्री ———— राबसाहेब ————

—स्वामीचे सेवेसीं ————

विनंती. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सा॥ नमस्कार. विनंती विज्ञापना. ता॥ छ ८ माहे सफर मुा॥ बेदर येथें स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें ब-

र्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान पेशजी छ. ६ माहे माारी लेखन करून पत्राची रवानगी डांकेवर केली तीं पत्रें सेवेसीं प्रविष्ट होऊन ध्यानांत आलें असेल. सांप्रत येथील वर्तमान अलाहिदा पुरवणीपत्रीं विनंती लिा आहे. अवलोकनें ध्यानास येईल. उत्तरें रवाना करावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवसीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्री

भाद्रपद शु. १० रविवार शके १७१५,

विनंती विज्ञापना. पागेकडील तालुकियाचे तगीरी बाहलीचा जाबसाल घोळाखालीं पडला. येविषीची विनंती ताा पेशजी लिहिण्यांत आली, त्यावरून ध्यानांत आलें असेल. तीन दिवस नित्य सरबुलंदजंग, व घासी मिया, व महमदअजीमखां वगैरे पागेकडील इसमें व राज्याजी याप्रा नबाबाचे दिवाणखान्यांत प्रातःकालापासोन प्रहररात्रपर्यंत जलसा व्हावा. कुल-पागेकडील महाल येथील सन १२०२ (फसली) साल गुदस्तचा आकार याचे हिसेब पाहून, त्या आकारावर इजाफा हिसेरसीद प्रा बसऊन साठ लाखाची बेरीज यैन व इजाफा मिळोन सिद्ध केली. पैकीं दोन टुकडे अलाहिदा तीस तीस लाखाचे केले. येक टुकडी सरबुलंदजंग यांचे निसबतीची, त्यांत साहेब जादे ज्याहांदरज्याहा पहिलेंच सरबुलंदजंगाकडे नेमणुक होती. ते व शमषुलउमरा यांचे पुत्र यांचे खासगीचा तालुका केला, व कारभार महमदअजीमखां यांजकडे होता. तोही सांप्रत सरबुलंदजंग, याजकडे ठरला. त्यासुधां तीस लाखाचा तालुका सरबुलंदजंगाकडे मुकरर-जाला. दुसरी टुकडी महमदअजीमखां व घासीमियां मिळोन उभयतांकडे तीस लक्षांचा तालुका. या प्रा ठराव जाला. रा छ ८ माहे सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद शु. १० रविवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. पागेकडील तालुक्याच्या दोन टुकड्या नबाबांनीं

ठराऊन वांटणी जाली. सरबुलंदजंगाकडे महमदअजीमखान यांजकडील तालुक्या पो कलबर्गे व चितापुर, अबजलपुर, मणुरमाषम, हुमणाबाद, बेंबली, हे वांटणींत गेले; व अजमखान यांजकडे सरबुलंदजंगाकडील हसनाबाद व हतमुरें, नारायेणखेड हे लागलें. घासीमियां यांजकडील देगळूर, सारबाड व खालखंदार, आदिकरून पहिले माहाल होते तेच बाहाल राहिले. त्यांपैकीं कांहीं गेला नाहीं, व त्यांस आला नाहीं. याप्रा दोन टुकडयांत माहालची वांटणी मध्यस्ताचे संमतें, नबाबाचे हुकमा प्रा राज्याजी यांनीं केली. या उपरी सरबुलंदजंग व महंमद अजीमखां यांजकडून अमील ठरून आपलाले माहालीं खाना होणार. येकंदर पागा तालुकियाचा आकार बतीस लाखाचा होता; त्याची बेरीज साठ लाखावर इजाफ्यासहीत कायम करून माहालाची वांटणी जाली. सरबुलंदजंगाकडून सर अमील व्यंकटराव सुरापुरकर व अजमखानाकडील सिदीइमाम व घासीमियांकडील फदुलाखान व तिमाराव हरी याप्रा अमील खाना होण्याचा बेत आहे. रा छ ८माहे सफर हे विज्ञापना.

श्री

भाद्रपद शु. १० रविवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. मध्यस्तानीं आपल्याकडील रिसाल्याचें व पागेचे लोकांस सर्वांस ताकीद केली आहे कीं " तुम्ही आपले सरंजामसहित तयार असावें खाविंदाचा हुकुम कोणे समई कसा होईल याचा कांही नेम नाही याजकरितां अगाऊ तुम्हांस इतला केली आहे. बेफाम न राहतां आपले जमियतीची सरंजामानसी तयारी करून सावध राहावे. हुकुम होतांच तेसमई तयारीची जिकीर न राहतां हुशारीनें असावे." याप्रा ताकीद केली. वरकडही अतराफ सिलेदार वगैरे लोकांस याचप्रा ताकीद आहे. नव निगादास्तीचे लोक मसादा घेऊन गेले. त्याप्रो कितेक आले; व येणार तेही वरचेवर जमा होत आहे. दाग चेहरे करून रोजमरे कितेकांचे ज्यारी जाले. शिवाय नवीन फुटकर लोक येतात, तेही ठेवितात. रा छ ८ माहे सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद शु. १० रविवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. राजश्री बाबाराव गोविंद यांस मध्यस्तांनीं सांगितलें कीं तुह्मीं पुणियास जाण्याची आपली तयारी करणें. पांच सात दिवसांत हजुरची रुखसत येक महिन्याची घेऊन जावें. बायका मुलें येथें आहेत; तसींच असो द्यावी. सडे जाऊन राव सिंदे यांजपासी पोंहचावें. तेथुनही निरोप सत्वरच घेऊन येके महिन्यांत येथें यावें. याप्रा सांगितल्यावरून मारनिलेनीं पुण्यास जावयाची तयारी आपली केली आहे. नवाबाची रुखसत व मध्यस्ताचा निरोप घेउन येथून निघाले, म्हणजे विनंती लिहिण्यांत येईल. रा छ. ८ सफर हे विज्ञापना.

श्री

अखबार ईा छ. २ ताा छ. ६ सफर पर्यंत रा छ. ८ सफरी
छ. ११ सफरी डाकेवर पुण्यास.

श्री.

भाद्रपद शु १३. बुधवार शके १७१५.

श्रीमंत राजश्री ———————— रावसाहेब
स्वामीचे सेवेसीं ————————————————

विनंती सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सा नमस्कार विनंती विज्ञापना. ता छ.११ माहे सफर पर्यंत मुा बेदर येथें स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान छ. ८ माहे मारीं लेखन करून पत्राची रवानगी डाकेवर सेवेसी केली आहे त्यावरून ध्यानांत आलें असेल. सांप्रत येथील वर्तमानाची विनंती अलाहिदा पुरवणीपत्रीं लिा आहे. अवलोकनें सविस्तर ध्यानांत येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद शु. १३ बुधशर शके १७१५.

विनंती विज्ञापना. पागेकडील तालुकियाचाकारभार आठ दाहा दिवस

पर्यंत घोळाखालें पडून रोज येक नक्षा ठरावा याप्रा होत गेलें. येकंदर पागा तालुकियाचे दोन टुकडे तीस तीस लक्ष इजाफ्यासहित येक सरबुलंदजंग यांचे निसबतीस साहेब जादे व शमपुल उमरासुधां व येकांत अजमखान व बासीमियां; याप्रा वांटणी दौलाचे संमतें राज्याजीनीं ठरविली. इत्यादिक ताा जें होत आलें त्याची विनंती पेशजी लिहिल्यावरून ध्यानांत आलें असेल. दोन वाटण्या याप्रा जाल्याचा विच्यार नवाबांनीं पाहून या करण्यांत तालुक्याचा बंदोबस्त खातरखा नाहीं. पुढेंही बखेडाच. समजोन नवाबांनीं अजमखान यांजकडे सांगोन पाठविलें कीं, "पागेकडील कामाचा कुल बंदोबस्त तुम्हांकडे सांगून सर अमीली सिदी इमाम यास दिल्ही. दरमियान व्यंकटराव सुरापुरकर यानी त्याजवर इजाफा कबुल केला, त्यास तुम्ही सरकार नुकसानीचे खादार कांहीं नाहीं. त्यापक्षीं इजाफा व्यंकटराव यांनीं केल्याप्रा तुम्हीच कबूल करून आपले कामाचा बंदोबस्त राखावा. अजमुल उमरा बहादुर यांची तुमचीही सफाई करून देववितों. त्यांनी तुम्ही येक विच्यारें राहून ज्यांत सरकार काम व उपयोग तें अमलांत आणावे. यांत आमची खुषी. आणी तुमचेही नोकरीस हेच लाजम आहे. अजमुल उमरा यांस तुम्ही षमषुल उमरा प्राा पाहात जावें."यैसें सांगोंन पाठविल्यावरून अजम खान यांनीं अर्ज केला की " जशी हाजुरची ईर्षाद त्याप्राा गुलाम हाजर आहे." याप्राा इकडील बंदोबस्त आंतुन करून दौलासही नवाबांनी सांगितलें कीं "पागेचे कामांत महमद अजीमखा यांचीच वकफियत चांगली.....यांचे हातें पागा तालुकियाचा बंदोबस्त ज्यारी राहावा तुम्ही त्या .....काम चांगलें तें करावें. अजमखान.....(शमशु)ल उमरा याची नजर होती तसी तुमची असावी; व खान माार ही तुम्हास त्यांचे ठिकाणीं समजोन वागतील." यातव्हेनें दोंही कडील साधन पकें केलें. तों पावेतों राज्याजी आदि करुन कोणा येकास हे कांहींच समजों दिल्हें नाही. दौलांनीं राज्याजीस सांगीतलें की तुम्ही तीन फर्दा तयार कराव्या. येक फर्द कुल तालुकियाचे काम व्यकटराव याचें नावें, दुसरी फर्द निमै सरबुलंदजंग व निमे महमद अजीमखां बासीमिया, हानक्षा, तिसरी फर्द अजमखान यांचे नावें कुल

तालुकियाची, या प्रा॥ तीन फर्दा तयार करून समागमें घेऊन यावें. यातून हाजरती ..... कलेल या प्रा॥ सां ..... फर्दा घेऊन दौला व राज्याजी नबाबाकडे गेले. पागेवालेही सरबुलंदजंग घासीमिया व अजमखान दिलदारखान हे सर्व आले. अमील व्यंकटराव सिदी इमाम हेही हाजर जाले. प्रथम नबाबाचें बोलणें दौलासी दोन घटिका होऊन, राज्याजी यांच्या फर्दा पाहिल्या. कुल तालुकियाचा बंदोबस्त अजमखान याजकडे सागांवा हें नबाबाचें त्रिच्यारास आलें, याचा रुकार दौलाचाही पडून अजमखान यास बोलाऊन नबाबांनीं खातरजमा करून सांगितलें. दौलाची व त्याची सफाइ करून दिल्ही. अजमखान याचें जिमे पागा तालुकियाचा कुल कारभार केला हें व्यंकटराव यांस समजतांच, माार निलेनीं ये तेथेंच आधीं बासष्ट लाखाची येकंदर फर्द दिल्ही होती, त्याजवर आणिक इजाफा पांचलक्ष ..... (गु) जराणली. नबाबांनीं पाहून दौलास ..... नबाब बोलले कीं, फर्द त्यांचें त्यास माघारी द्यावी. त्या प्रा॥ फर्द फिरोज व्यंकटराव यांचे यांस दिल्ही. बासष्ट लक्ष रु. व्यंटरावांनीं इजाफ्यासुधा केले होते; त्यां पैकीं च्यारलक्ष महकुफ करून अठावन लाखाचा अदाजा महंमद अजीमखां यांस करार करून दिल्हा. याशिवाय व्यंकटराव यांनीं नबाबाचे तोषेखान्यांत चार लक्ष रु. देण्याचा करार केला होता, तोही अजमखान यास नबाबांनीं माफ केला. याप्रा॥ अजमखान यांचीं पास खातर ठेऊन दौलाचें व त्यांचे रहस्य करून देऊन कारभार याप्रा॥ उलगडला. रा॥ छ. ११ माहे सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद शु १३. बुधवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. नबाबांनीं आपले समक्ष दौलास व अजमखान यांस सरकार कामावर येक विचारें राहून कामाची वहिवाट करावयाचें सांगोन सफाई उभयताची करून दिल्ही. अजमखान यांस दौलाकडे जाण्याचें सांगितल्यावरून खान मार दौलाकडे गेले होते तेही अजमखान यांचे घरास जाणार.

याप्रा तूर्त असा क्रम चालिला आहे. येकंदर पागेचे माहाला पौ दिलदारखान यांस जागीर साडेतीन लक्षांची नवाबांनीं लोहारें व आलुर हे दोन महाल नेमून दिल्हे. त्याप्रा या पुण्यांतून दोन माहाल त्याचे निसबतीस जाले. आलंद व गुंजोटी हे दोन माहाल व्यंकटराव यांजकडे अजमखान यांचे तर्फेनें देविले. बाकीचे सर्व तालुकियास अमील अजमखान यांनीं ठराऊन पाठवावें यैसा बेत ठरला ..... वगैरे अजमखान यांस व्यंकटराव ..... वा त्यांचे इस्तसवाबानें काम करावें यैसें ठरलें. रा छ. ११ माहे सफर हे विज्ञापना.

श्री

भाद्रपद शु १३. बुधवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. येथील तमाम मुतसदी व किरकोळी मनसबदार यांचे जागिरीवर पटी पांच लाख रुपयाची दौलानीं ठराऊन सर्वांचे मागें चोपदार व सजावल राज्याजी भवानदास सेडमल आदिकरून देखील भारामल यांस लाऊन निकड केली आहे कीं नजरेबाबत यैवज दाखल करणें. त्यांची रदबदल दौलासीं होत आहे. इतक्यावर यांचें काय ठरांवात येतें त्याप्रा मागाहून ता विनंती लिहिण्यांत येईल. दौलाचे कारकिर्दीपासोन मुतसदी यांनीं हजरी गणपतीचे कामांत तफावत ..... खो रुपयाचा ..... मुतसदी मंडलीवर निघतो. या विषींचा तगादा लागल्यावरून कांहीं आलल हिसेबी नजरेचा ठराव व्हावा असें बोलणें लागलें आहे. कारण कीं, याची जुजरसी केली असतां कोठपावेतों करावी ? सबब नजरेवर ठरावें असें होत आहे. यावर जसें ठरेल त्याप्रा विनंती लिहीन. रा छ. ११ माहे संफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद शु. १३ बुधवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. राजश्री बाबाराव गोविंद यांची रवानगी पुण्यास होण्याविषयीं दौलानीं नवाबास अर्ज केल्यावरून " बाबाराव यांस रुखसतीस

घेऊन येणें " म्हणोन नवाबांनीं दौलाकडे सांगोन पाठविलें. दौला मार निलेस घेऊन नवाबांकडे गेले. छ. १० सफरी बाबाराव गोविंद यांस नवाबांनीं रुखसत दिल्ही. याउपरी दौलाचा निरोप घेऊन रवाना होणार नवाबांनीं ..... बाबाराव यांचे तुमचें बोलणें दो ..... मग बाबाराव यांनीं जावें. त्यास दौलासमवेत बाबाराव यांचें बोलणें या उपरी जें होईल त्याची विनंती मागाहून लिहितों. रा छ. ११ माहे सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद शु. १३ बुधवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. गंजीकोटा व कडपे तालुकियांत मुफसदाचा हंगाम भारी. कितेक ठाणीं जमीदार वगैरे मुफसद लोकांनीं नबाबाकडील व टिपुकडील घेतली. याजकारितां मुफसदाचे तंबीस टिपुकडीलही कांहीं जमियत व सरंजाम आला. यैसें वर्तमान आहे. यावरून नवाबांनीं आपले तालुकियाचे बंदोबस्ताकारितां येथून दिलावरदौला किलेदार गंजीकोटा याजकडे मुसारेह मु .... समागमें येक .... व देन तोफा व दाहा निशाणें गारद्यांचीं व दाहा संदुखा बारुदचे याप्रा सरंजामानिसी रवानगी केली. रा छ. ११ माहे सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद शु. १३ बुधवार शके १७१५

अखबार ईा छ. ६ ता छ. १० सफर पावेतों रा छ. ११ माहे सफर-रा. छ. १७ माहे सफर पत्रें पुण्यास रवानगी ठ्याबर.

श्री.

भाद्रपद शु. ३० बुरुवार शके १७१५.

श्रीमंत राजश्री _____ रावसाहेब

स्वामीचे सेवेंसीं _____

विनंती सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना

ताा छ. १७ माहे सफर मुा बेदर येथें स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान पेशजी छ. ११ माहे मारीं लेखन करून पत्राची रवानगी डांकेवर केली ..... असेल. सांप्रत येथील वर्तमानाची ..... पुरवणीपत्रीं लेखन केली आहे. अवलो ..... ल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ सेवेसीं. श्रुत होय हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद शु. १३ बुधवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. "पागेवाल्याकडील तालुकियाचा कारभार महमद अजीमखान यांजकडे नवाबांनीं सांगोन दौलाची त्यांची सफाई केली." इत्यादिक तपसीलें विनंती पेशजी लिहिल्यावरून ध्यानांत आलें असेल. व्यंकटराव याजकडे आलंद, गुंजोटी, हासनाबाद तीन तालुके दिल्हे. वरकड तालुकियाची अमीली सिदी इमाम याजकडे सांगितली. अद्याप अमील रवाना जाले नाहींत. या उपरी होणार. अजमखान व घांसीमियां दौलाकडे रोज येतात जातात. मागील हिसेबाचाही मागती घोळ पडला आहे. व्यंकटराव यांचे मानस सिदीकडे तालुके असो नये. तथा आदावतीमुळें इजाफ्याच्या फर्दा वरचेवर देतच आहे. तालु (कि ?) यावर इजाफ्याचे येवजा ..... राद निर्वेध बंदो ..... ही नाहीं. याप्रो तुर्त पागा प्र ..... खाने पडलें आहे पुढें काये रंगावर येतें पहावें. पागेवाले याजवर हात फिरला नवता. अमानत होते. त्याजवरही कारभारी यानीं युक्तीनें हात घातला, तेव्हां पागेचे कारभारास कीड लागली. तेव्हां परिणाम समजलाच आहे. सा छ. १७ सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद व. ५ मंगळवार शके १७१५.

विज्ञापना राजश्री बाबाराव गोविंद यांस पुणीयास जाण्याची रुखसत नवाबाची आली याची विनंती पूर्वी लिहिलीच आहे. दौलाचा निरोप व्हावयाचा, त्यास दौलाचे हवेलीस नबाब येक दिवस आले होते. आणि पागेवाल्याकडील

कारभारही दौलाचेथें नित्य दीड प्रहर रात्रपर्यंत दोन तीन दिवस सतत होत आहे, त्याजमुळें बाबाजीराव यांचें निरोपाचें अद्याप जालें नाहीं. इतक्यावर जसें ठरेल त्याची विनंती मागाहून लिहितों. रा छ १७ सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद व. ५ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. ..... जी येथें येके ठिकाणीं अशी आहे कीं .... समई आपल्यासीं बिगाड करतील ..... पुरत नाहीं. ज्या समई नमुद होतील. तेव्हां मुष्कील पडेल हें समजोन, टिपु बहुत सावधपणें आतां पासोन बंदोबस्तास लागला. पाहाडी दरोबस्त किले येथील यजबुती ज्याबज्या करावयास लाविली. पाहाडी किले जातील सरंजाम पोक्त ठेऊन बंदोबस्त करविला. व, जमीदोन किले इंग्रजाचें लढाईत परिच्छिन्न राहावयाचे नाहींत. हें जाणून जितका जमीदोन किला कोयते पाडून साफ करावा यैसा विच्यार केला आहे. पटणचे पूर्वेकडे किला मजबूत करावयास आरंभ केला आहे. जातीनें रोज तेथें जाऊन किल्याची दुरुस्ती होत असती. नित्याचा दरबारही त्याच जागीं होतो. याप्रो वर्तमान शोध लागला, त्याची विनंती लिहिली असे. रा छ. १७ सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद व. ५ मंगळवार शके १७१५.

..... इंग्रज कलकत्त्यास ..... (गलबतां ....) त सवार होऊन चेनापटणास छ. माहे सफरी दाखल जाला. याचें वर्तमान नबाबांचे सरकारांत छ. १४ माहे मारीं चेनापटणचे अखबारींत आलें. रा छ. १७ माहे सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद व. ५ मंगळवार शके १७१५.

विनंति विज्ञापना. व्यंकटराम दिला याजकडून चेनापटणाहून अखबार आली, ती येथून रवाना केली आहे. राजश्री गोविंदराव भगवंत सेवेसी

प्रविष्ट करतील, त्याजवरून वर्तमान ध्यानांत येईल, रा॥ छ. १७ माहे सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद व. ५ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. पूर्वा नक्षत्र अखेरपर्यंत इकडील तमाम प्रांतीं पर्जन्याची वृष्टी फार जाली. कितेक ठिकाणीं मूग उडीद वगैरे जिनसांस पाणी लागुन खराब जाले. पाऊस उघडावा यैसें सर्वत्रांस जालें. उत्तरा नक्षत्र सगळें कोरडें गेलें. वापसे जाले. कितेक जागा रबीच्या पेरण्या जाल्या. खरीफ चांगलें आलें. सांप्रत तेरा चौदा सेर जौरी येथें धारण व तालुकियांत सतरा आठरा शेर याप्रों आहे. सारांष, साल मारि हंगामसीर धारण जसी व्हावी तसी होईल असें चिन्ह दिसतें. पर्जन्य चांगले जाले. रा॥ छ. १७ माहे सफर हे विज्ञापना.

श्री.

अखबार इा॥ छ. १० ता॥ छ. १६ माहे सफर खानाजीला असे. रा॥ छ. १७ माहे मजकुर सन १२०३ फसली, हे विज्ञापना.

छ २१ सफरी पुण्यास डांकेवर.

श्री.

भाद्रपद व ९ शनिवार शके १७१५

श्रीमंत राजश्री ——————— रावसाहेब ———————

स्वामीचे सेवेसीं ———————

विनंती सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सा॥ नमस्कार. विनंती विज्ञापना. ता॥ छ. २१ माहे सफरपर्यंत मु॥ बदेर येथें स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान छ. १७ माहे मारीं लेखन करुन पत्राची खानगी सेवेसीं केली त्यावरुन ध्यानास आलें असेल. सांप्रत येथील वर्तमानाची विनंती अलाहिदा पुरवणीपत्रीं लिहीली आहे. अवलोकनें ध्यानांत येईल. उत्तरें खाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेसीं श्रत होय हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद व. ५ शनिवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. राजश्री बाबाराव गोविंद यांस पुणियास जाण्याची रुखसत नवाबांनीं दिल्ही, त्या समई माारनिलेसी कितेक बोलण्याचे मरातब सांगणें तें आमचे समक्ष दौलांनीं त्यांसी बोलण्यांत आणून मग निरोप द्यावा यैसा बेत ठरला. छ. १७ माहे सफरी दौलांनीं आह्मांकडे सांगोन पाठविल्यावरून गेलों. बाबारावही आले. साहा सात घटिकापर्यंत येकांतीं बोलणें जालें. याचा ताा अलाहिदा पुरवणीपत्रीं विनंती लिाा आहे, त्यावरून सविस्तर ध्यानांत येईल. बाबाराव यांसी दौलाचें बोलणें जालें. त्यास माार निले आह्मांकडे येणार आहेत. त्यांत आह्मांवेगळे दौला त्यांसी काय बोलले आहेत.. यांतीलबी खुलासा समजेल, त्यासारखी मागाहून ताा वार लिहितो. रा छ २१ सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद व. ९ शनिवार शके १७१५.

विनंती विज्ञापना पागावाले यांजकडील तालुकियाचा रोज येक प्रकार याची विनंती पेशजी लिहिण्यांत आल्यावरून ध्यानात आलें असेल. नवाबांनीं अजमखान यांस सांगितलेंकीं, तुह्मीं शमषुल उमरा यांजप्राा अजमुल उमरा यांस समजोन, त्यांजकडे जात जावें. त्याप्राा प्रथम दिवसीं अजमखान व घासीमियां दोलाकडे जाऊन त्यांसीं बहुत नम्रतेचें बोलणें बोलले कीं "आपण शमषुल उमरा आहेत. जसा बंदोबस्त खातरेस येईल तसा करावा" तेव्हां दौलांनीं सांगितलें कीं तुह्मांविषईं हजुरांत अर्ज करून पागेचा बंदोबस्त ज्यांत खातरखां असेंच करीन. तालुकियांसंबंधे मागील देणे घेणें कोणाचें किती हें समजावावें. त्यावरून अजमखान यानीं तालुकियाची बाकी व देणें व स्वराज्याचे मामलतीची बाकी इत्यादिक समजाऊन दिल्हें. कुलतालुकिचा आकार बासष्ट लक्ष रु. ठरला यापैकीं पागेचें बेगमीचा यैवज बत्तीस लक्ष जातां तीस लाख रुपयांत स्वराज्याचे मामलतीचा यैवज बाकी असेल त्याचा

फडच्या करावा. व ज्याचें देणें त्यास वायदा ठरऊन द्यावें. सरकारचे कसेरेबाबत बाकी यैवज याचे तालुके तोडून सरकारांत द्यावे. याप्रा॥ दौलांनीं शकल काढून अजमखान व घासिमियां यांसी बोलण्यांत आणिलें. याचा विचार अजमखान यांनीं पाहतां कसेरेबाबत यैवजाचे तालुके निवडून परभारा घेतल्यानंतर बाकी जें राहिलें त्यांत पागेचा कुल कारखाना व देणें व सिवंदी खर्च व स्वराज्याची मामलत येणे करून गोष्ट निभावयाची नाहीं. हें समजोन अजमखान यांचे बोलणें दौलासीं कीं हें कांहीं आह्मांस सांगो नये. आपण शमषुल उमरा आहेत. तेव्हां पागेचा बंदोबस्त करणें तसा आपणच करावा; आणि वरकड कामही केलेलें तसें व्हावें. याप्रा॥ अंगानिराळें टाकून बोलतात. याजवर कोणे डौलास येतें पाहावें. सारांश दौलाचे मनांत फार दिवसांपासोन पागेकडील चौकसी आपण करावी ऐसें होतें. ते अनायासें हस्तगत जालें. आतां घोळाखालीं घालून रोज येक शकल काढितात. पहिले दिवसीं अजमखान घासीमियां दौलाकडे गेले. ते समईं त्यासी दौलांनीं आणा शपथा वाहून असा बंदोबस्त करितो, याप्रा॥ बहुत खातरजमेचे बोलले. दुसरे दिवसीं रंग वेगळाच. यावरून शपथ क्रियेची हे अवस्था. तेव्हां इतबाराची उमेद काय राहिली ? कोणेंही प्रकारें अजमखान यांजला दौलाचे बोलण्याचा करण्याचा भरंवसा वाटेना. यास्तव आंगानिराळी गोष्ट टाकून बोलतात यावर कोणे थरास येतें पाहावें. रा॥ छ. २१ सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद व. ९ शनिवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. " लार्डकारनवालीस इंग्रज याजकडून साता दफेची तहनाम्याची याद टिपुसुलतान यांचे मसलहत प्रकर्णी आली. त्या यादीचे कलमांत कांहीं कमबेष हर्फ करून साता दफेची याद श्रीमंताचे सरकारांतून गोविंदराव कृष्ण यांजकडे रवाना जाली, " या प्रा॥ मिस्तर मालिट यानें येथें मिस्तर इष्टवट इंग्रजाकडून आहे त्यास लिहिलें. त्यास याद आपल्यापाशीं येऊन पोहचली कीं काय ह्मणोन भीरआलम ह्मणत होते. त्यास अद्याप याद

आली नाहीं. आली ह्मणजे प्रविष्ट होतील यैसें सांगण्यांत आलें. रा छ. २१ सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद व. ९ शनिवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. तमाम मुतसदी मंडळी यांस दौलांनीं तगादा लाविला आहे कीं सिलेदार लोकांची हजरी गणती करार वालाह नाहीं. ज्याचे शंभर स्वार त्याचीं घोडी पन्नास साठ असतां शंभराची तलब रोजमुरे वगैरे सरकारातून घेतले. त्यांत सिलेदारास जितकीं घोडीं तितकाज यैवज दिल्हा. बाकी मुतसदी व हाजरीचे चोपदार यांनीं मिळोन तफावत केली याचा येकदोन पतालाऊन इा आपण कारभार करीत आल्या दिवसापासोन याचा हिसेब समजावणें. या प्रा तसदी केली. हिसेबास पाहातां कशास कांहीं मिळेना. लाखोंचाच पेंच. सबब याची नजर ठरऊन घ्यावी यैसें बोलणें मुतसदी मंडळीचें पडलें. त्यावरून साडेबावीस लाखाची तफरीक ठरली. राज्याजी व भारमल छटुलाल आदिकरून सर्वोवर हिसेरसीद प्रा वांटणी जाली आहे. परंतु याचाही निश्चय नाहीं. याजवर आणिक काय ठरतें ते समजल्यानंतर याची विनंती मागाहून लिहिण्यांत येईल. रा छ. २१ सफर हे विज्ञापना.

श्री.

भाद्रपद व. ९ शनिवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. ईसामियां याजकडे नबाबाचे सरकारातून गुती सरकारपैकीं ताडकरी व ताडपत्री व सिंगणमला व येलानूर हे च्यार तालुके होते. त्यास ईसामियाकडे टिपुकडील पत्राचा सिलसिला लागल्याचें दौलास समजलें. त्यावरून त्याजला येथें बोलाऊन घेतलें. टिपुचीं व कमरुद्दीखान याचीं पत्रें ईसामियापासीं होतीं. ते त्यानें दौलाचे हवालीं केलीं. टिपुकडील या तऱ्हेनें पैगाम, परंतु, आपण मिळालों नाहीं याप्रा इसामियानें दौलापासीं आपला निखालसपणा दाखविला. तथापि पुन्हां ईसामियास त्या तालुकियास रवाना केलें असतां काय तऱ्हा पडेल याचा अंदेशा दौलास. याजकारितां त्या च्यार

माहालाचें काम ईसामियाकडून तगीर करून दुसऱ्याकडे सांगितलें. नलगुंडा व देवरकुंडा हैदराबाद सुभ्याचे महाल येथील काम ईसामियांस सांगोन सनदा पत्रें दिल्ही. याउपरी ईसामिया हरदो तालुकियाचे बंदोबस्तास रुखसत घेऊन जाणार. हें वर्तमान ईसामियाकडे टिपुकडील राजकारणाचे सिल सिल्याचे इंग्रजास समजल्यावरून त्यानीं नवाबाकडे लिहिलें कीं ईसामिया फितुरी; याजकरितां ताडपत्री वगैर तालुके याजकडे सांगो नये. ततगीर करून दुसऱ्याकडे सांगावें ईसामियांस दुसरीकडील काम योजावें. याप्रा इंग्रजाचें मत; यावरून ईसामियाकडील तालुके पहिले दूर जाले. आसद अलीखानही टिपुकडील सिलसिल्यांत. यास्तव त्याची ही तिकडील तालुक्याची बरतरफी व्हावी. हे इंग्रजांचें ह्म (ण) णें. यप्रा बारीक वर्तमान मीर आलम यांचे द्वारां व परभारां समजलें. रा छ. २१ सफर हे विज्ञापना.

श्री

विनंती विज्ञापना. व्यंकटराम दिला याजकडून चेनापटणाहून अखबार आली ती रा केली आहे. राजश्री गोविंदराव भगवंत सेवेसी प्रविष्ट करितील. त्यावरून अवलोकनांत येइल. रा छ. २१ माहे सफर हे विज्ञापना.

श्री

भाद्रपद व. ४ सोमवार ते व. ७ शनिवार शके १७१५.

अखबार ईा छ. १६ ता छ. १९ सफर पर्यंत रा छ. २१ सफर

श्री

आश्विन शु. ३ मंगळवार शके १७१५.

माहे रावल ऊर्फ आश्विन मास. छ. २ रोज रावसाहेबास पत्रें.

श्रीमंत राजश्री _____ रावसाहेब

स्वामीचे सेवेसीं _____

विनंती सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सांष्टांग नमस्कार विनंती

विज्ञापना ता।। छ. २ माहे रा।। वल मुा। बेदर येथें स्वामीचें कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान पेशजी डांकेवर पत्राची रवानगी केली त्यावरून ध्यानांत आलें असेल. सांप्रत येथील वर्तमानाची तपसिलें विनंती आलाहिदा पुरवणीपत्री लिहिली आहे. अवलोकनें मजकुर ध्यानांत येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवसी श्रुत होय हेविज्ञापना.

श्री.

आश्विन शु. ३ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. बाबाराव यांस दौलाचा निरोप होऊन बाहेर जिनसीपासी जाऊन राहिले. माारनिलेस सांगावयाचें तें दौलानीं सर्व सांगितलें. छ. २२ सफरी दौलाचा निरोप जाला त्यापक्षी माारनिलेनें येका दो दिवसांत निघोन जावें. परंतु सरकारांतून जाबसालापैकीं आठ फर्दा ठरुन आल्या, त्याचे जबाब ठराऊन देण्याचे राज्याजी यांस दौलानीं सांगितलें. जबाब ठरण्या करितां इतके दिवस माारनिलेचा गुंता जाला. याउपरी आठ फर्दाचे जबाब माारनिलेपासीं ठराऊन देणार. ते दिल्हे ह्मणजे येथुन निघोन तिकडे येतील. रा।। छ २ माहे रा।।वल हे विज्ञापना.

श्री

आश्विन शु. ३ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. राजश्री बाबाराव गोविंद यास पुणियास जाण्याची रुखसत नवाबानीं दिल्ही, येविषईची विनंती पेशजी डांकेवर लिहिण्यात आलीच आहे. सरकार जाबसालप्रकर्णी माारनिलेसी बोलावयाचे प्रकार दौलानीं आमचे समक्षही बोलण्यात आणिले. छ २२ सफरी दौलानीं बाबाराव यांस आपल्याकडील निरोप दिल्हा. येक कंठी मोत्याची व पानदान दिल्हें. तेंच दिवसीं रात्रीं अकरावें घटिकेस बाहेर जाऊन राहण्याचा मुहुर्त दौलानीं बाबाराव यांस सांगितल्यावरून अकरा घटिका रात्रीं मशारनिले निघोन बाहेर डेरा देऊन राहिले. रा।। छ. २ माहें रौवल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. ३ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. पागेवाल्याकडील कारभाराची चौकसी दौला करूं लागले. अजमखान घासीमियां रोज दौलाकडे जाऊन प्रहर रात्रपर्यंत हिसेबाचे जलसे होत गेले. परंतु नित्य येक प्रकार वेगळाच. यावरून अजमखान व घासीमिया यांस दौलाकडील भरंवसा वाटेना. तेव्हां दोघे येकत्र होऊन दोन दिवस आड धरून दौलाकडे गेले नाहींत दौलानीं राज्याजी यांस त्याजकडे पाठविलें त्यांनीं राज्याजीसी बोलण्यांत आलें कीं या जाबसालापासोन आम्हीं हात उचलला. आपले विचारास येईल तसा बंदोबस्त करावा; हे गोष्ट नवाबास व दौलास समजल्यानंतर या प्रसंगीं पागेवाले यांस अजुरदा होऊं न देतां समाधानीनें कारभार उलगडावा हें प्राप्त जालें. अजमखान व घासीमिया यांस खातरजमा करून दौलांनी बोलाविलें. तुमचा कारभार तुम्ही मुखत्यारीनें पूर्ववतप्रा करावा. सरकारांत तेरा लाख रु० द्यावे. पागेचे नेमणुकेचा अदमास बतीस लाख त्यांप्रा जिकडील तिकडे माहावाऱ्या पोंहोंचत्या होऊन बंदोबस्त राखावा. स्वराज्याचे मामलतीची बाकी राहिली असेल त्याचा हिसाबाचे रुइनें इनफिसाल करावा. माहाल मजकुर खर्च व देणी सारासार पाहून तडजोड करणें. याप्रा सांगोन पागेचे कारभाराची मुखत्यारी अजमखान व घांसीमियांकडे सांगितली. व्यंकटराव यांनीं इजाफ्याची रकम चढविली. त्यासुद्धां येकंदर बेरीज बासष्ट लाखास आली होती. तें सर्व राहून तेरा लाख रु० मात्र सरकारांत दाखल करावें. वरकड कामास त्यांचे त्यासच मुखत्यार केलें. तेरा लाखाचा पर्याय पाहातां पेशजी पागेकडील हिसेब नवाबांनीं मनास आणावयाची आज्ञा राज्याजीस केली होतीं. त्या हिसेबा अन्वयें दाहा लक्ष पागेवाल्याकडून येणें व चितापुर वगैरे कांहीं तालुका पागेचे सरंजामासिवाय अमानीचा, त्याजबाबतं यैवज याचे हत्तेबंदी बाबत साहा लाख जातां बाकी सात लाख रु० दरसाल यैन पांच व दरबार खर्च दोन येकूण सात लाख सालाबादी बसेल. यांतही पांच लाखास यैवज पा

कलबर्गे बगैरे कितेक माहालीं जमीदाऱ्या सरकारांत जप्त, त्याचे हक, रुसुमसे-ज्याचा यैवजही याचे पोटीं. दोन लाख रु० मात्र ज्याजती दरसाल पडतात. वास्तव्य पाहातां याप्रो सारांश. पागेकडील कारभाराचा येक महिना कमकसर मोठा मझेला पडला होता. सांप्रत अशा तऱ्हेनें बंदोबस्त जाला. अजमखान व घांसीमियां यांची जुट येक जाल्यामुळें या कारभाराची भटी सेवटास चांगली उतरली. पागेवाल्याचे पुढ्यांतून सरबुलंदजंग व दिलदारखान हे फुटल्यामुळें इतका बखेडा पडला. सांप्रत, सरबुलंदजंगाचेही समाधान अजमखान घासीमियां यांनीं करुन कामकाजाचा क्रम पूर्ववतप्राा ज्यारी केला. दिलदार खानाकडे लोहारे व अलूर यैकेहली कसबा हे जागिरींत दिल्हे. व्यंकटरात्र याजकडे अलंद, गुंजोटी, हसनाबाद, कोळूर, हे च्यार तालुके राहिले. करेमुंगीस राज्याजी यांचे विद्यमानेचा अमील जाम नारायणखेड फतुदुलाखानाकडे दिल्हे. वरंकड कुल तालुकियाची अमीली सिदी इमाम यांजकडे ठरली. सर्वांची देखरेख जुजरसी अजमखान यांनीं करीत जावी. याप्राा पागेकडील कारभार ठरण्यात आला. तेरा लाख रु० सरकारांत देणें ठरलें. ते आदा करून देण्याचा जिमा आजमखान यांनीं केला. रा छ. २ माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. ३ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. येथून शुक्लतीर्थ ह्मणोन जागा कोस दीड कोसावर आहे. त्याचे आसपास मकेचे फड व ऊंस ज्याचा होता, त्यापासोन सरकारांत खरीदी करून त्या जाग्यावर बाडा बसऊन डेरे दिल्हे. वाड्याचें चौकीस मुसा रहेमु व अबदुल करीम कुमदान यांचे रिसाल्यापैकीं गाडद ठेऊन बंदोबस्त केला. छ. २१ व छ. २२ सफर दोन दिवस प्रातःकालींच नबाब सवार होऊन त्या जाग्यास गेले. प्रथम दिवसीं दौलासही समागमें नेलें. दहिहाड्या वगैरे सरंजाम आणऊन मकेचीं कणसें व खानाही तेथेंच जाला. दुसरे दिवसीं जनाना बरोबर होता. पागेवाल्याकडील लोक बराबर. याप्राा दोन दिवस मका व उंसाची सैर जाली. रा छ. २ माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. ३ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. ईसामियां यांजकडील पहिले तालुके गुतीसरकारचे ताडपत्री वगैरे तगीर करून दुसरें काम नलगुंडा व देवरकुंडा हैदराबाद सुभ्यापैकीं दोन माहाल खाजे मुनीमखां कुदरतजंग किलेदार कलबर्गेकर याजकडे होते, ते त्याजकडून काढून ईसामियां यांस अमीली दिल्हे. छ. २६ नबाबाची रुखसत होऊन खिलअत पांच पैरचे कारचोबी दिल्हा. इतक्यावर दौलाकडील निरोप घेऊन ईसामियां नलगुंडा व देवरकुंडयास जाणार. ताडपत्री वगैरे काम मवकुफ होण्याचें कारण याची तपसीलें विनंती पेशजी लिहिल्यावरून ध्यानांत आलें असेल रा छ. २ माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. ३ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. या प्रांतीं सालमारीं पर्जन्याची अतिवृष्टी जाली. हस्त नक्षत्राचे पाऊस आठ पंधरा दिवस उघडला तर रबीच्या पेरण्या होतील. असाच पडूं लागल्यास पेरण्या होण्याचें संकट. हैदराबादेकडेंही पर्जन्य भारी जाला. मुसा नदीस पूर आला, व जलपलींचें तळें फुटुन दोन्हीं पाणी येकत्र जाली. बेगम बाजार अगदीं वाहून गेला. च्यार माहालापासीं पाण्याचा डोहो होऊन फतेदरवाज्यांत देखील पाणी शिरलें. नदीचे आसपास गरीब गुरबाचीं घरें बहुतेक वाहून गेलीं. येकायेकींच पाण्याची अमद जाल्यामुळें कितेक माणसें असावधपणें मेलीं, गेलीं, व जिंदगीस तर ठिकाणाच नाहीं. याप्रा नदीचे पुरानें वर्तमान जालें. यांची अखबार नबाबाकडे आली. जलपलीचा तलाव फुटला होता. त्यास हजार पांचसें माणसें च्यार पांच दिवस नेहमीं लाऊन तलावाचा बंदोबस्त केली (ला?). हलीं धारण येथें जोरी तेरा सेर व तांदूळ नउ

---

१ पोषाख. २ वसें. ३ वेलबूटीदार.

साडेनउ सेर या अन्वयें आहे. पंचोत्र्याचे दिमतीमुळें धारण तालुकियांत आसपास आहे त्याहून येथें कमी. रा छ २ माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. ३ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. जागीरदार व ईतलाखी व पागा व रिसालदार फौजेस ज्याबज्या पंधरा वीस कोसी चराईस राहाणें बोलाऊं ते समई येणें, याप्रो पहिले हुकूम होऊन रवाना केले. त्याप्राा बेदराहून पंधरा वीस कोसीं आसपास चराईकरितां लोक राहिले. सांप्रत सरंजामासुधां येऊन हाजर होणें या प्राा ज्याबज्या ताकिदी गेल्या. नवनिगादास्तीचे लोकांपैकींही वरचेवर येऊन कांहीं जमले व बाकी येणें त्यांचीही निकड मोठी आहे. यासिवाये आणिकही लोक मिळतील ते जमा करावे यैसाही कितेक सरदारास हुकूम जाला आहे. नवनिगादास्तीपैकीं कितेक लोकांच्या हजऱ्या आजपर्यंत नवत्या, त्या जारी जाल्या. रोजमऱ्याचा यैवजही हाजरीचे अन्वयें देण्याची सुरुवात केली. मुसा रेहमुस हुकूम कीं आपली गाडद सारी तयार ठेवावी. नवीन पांच हजार गाडद सजऊन गाडदचा सरंजाम मजबुत करणें यैसें सांगितलें. सारांश, फौज व गाडद जमा करण्याची तुर्त गडबड फार आहे. रा छ. २ माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. ३ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. शंकरराव भोंग यांजकडे निर्मळ, इंदुर, बोधन, बालकुंडा आदिकरून नफरुदौला बाबत माहालाची अमीली होती. ताहुदाची बेरीज होऊन पराकाष्ठा सालोसाल बेरजे अन्वयें हिसेब कागदी पत्रीं व्हावें. त्यांत माहालातीचा यैवज कस्त मेहनतीनें वसूल होईल, त्यापैकीं खर्चवेंच वजा जाऊन बाकी सरकारदाखल होत आला. तो वसूली पोंहचून बाकी येकंदर ज्यापत्र लाख निघाली. त्याची किस्तवंदी पांच लाख दरमाहा दाखल करावे. शिवाय सालमारचा यैवज. याप्रा नक्षा दौलांनीं ठराऊन

शंकरराव यांस रुखसत केलें, च्यार महिने जाले. तीन लाख मात्र सरकारांत आले. वरकड येवजास ठिकाण नाहीं. यामुळें शंकरराव यांजवर दौलाची मर्जी खफा होऊन तालुकियाची नफी करविली. येथून स्वार शंभर व कांहीं गाडद मुध्यां जसीस अमील रवाना केला. याप्रा वर्तमान आहे. रा छ. २ माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. ३ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. रणदुलाखान करनुलकर यांस नवाबांनीं छ. २६ सफरी रुखसत दिल्ही. अलफखान यांजकडे करनुल आदिकरून रणमस्तखानाचा तालुका बाहाल जाला. तुह्मीं व आलफखान येक विच्यारें आपले दौलतीचा बंदोबस्त करावा यैसी रणदुलाखानास ईर्षाद जाली. बाहादुरीचा खिताब व जेगा सरपेंच पानदान दिल्हें. अलफखान यांचें नांवें बाहालीच्या सनदा यांचे सरकारच्या व्हावयाच्या होत्या, त्या तुर्त जाल्या नाहींत. कारण कीं टिपुकडील पेषकसीबाबत दरसाल दोनलाखप्रा आठ नऊ वर्षाचा जाबसाल याचा भाग तुटल्यासिवाय सनदापत्रें होत नाहींत. याप्रा सांगोन प्रस्तुत सनदा पत्रें दिल्हीं नाहींत. पुढें ठरेल तसें होईल. रा छ २ माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. ३ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. रणदुलाखान यांस रुखसत जाल्यावरून दौलास आह्मीं विच्यारिलें कीं करनुल संस्थान प्रकर्णी आपले सरकारचा जाबसाल नजराणा वगैरे फैसला आला असेल, रणदुलाखान यांस रुखसत जाली, त्यास. श्रीमंताचे सरकारचा जाबसाल करनुलकराकडून ईनफिसाल होणे यार्चे आपण सांगितल्या बमोजिब सरकारांत लिहीन. यार्चे उत्तर दौलांनीं केलें कीं "करनुलकरांकडून हजरतीचे सरकारचा जाबसाल अद्याप फैसला नाहीं. कारण कीं, टिपुकडील पेषकसीबाबत तगादा करनुलकरास आहे. त्याचा फै.

सला जाल्याशिवाय करनुलकरास सनदापत्रेंही करून देण्याचें मवकुफ जालें. बाहालीच्या सनदा होतील ते समइ नजराणा वगैरे जाबसाल अवल मुजका करून मग सनदा द्यावयाच्या हजरतीचे सरकारचा जाबसाल ठरावांत आला ह्मणजे त्या समई श्रीमंताचे सरकारचें ठराऊन घ्यावें. तूर्त टिपूकडील पेषकसीचे मझेल्यामुळें करनुलकराकडील जाबसाल मुलतवी. त्यास टिपुचे पेषकसीचे बाबत लचांड तोडून टाकलें पाहिजे. येविषई लाडबाहादुर यांस हाजरतीचीं व श्रीमंताचीं पत्रें जरूर जाऊन बंदोबस्त जाला पाहिजे. पटणावर तह जाला. ते समई रणमस्तखान यांचे मोहरी दस्तयैवजा वरील शर्त बालण्यांत असतां आज पर्यंत दस्तयैवज निघत नाहीं, आणि पेषकसीचा तगादाही मना होत नाहीं. याजकरितां लाड साहेबांस पत्रें दोन्हीं सरकारचीं जाऊन हा मझेला रफा व्हावा. सबब कीं करनुल संस्थान हरदों सरकारचे पेषकसीचें. या संस्थानची यांस खातर जरूर. इत्यादिक दौलाचे बोलण्यांतील भाव. त्यास लाडबाहादुर यांस येविषई हे आपले सरकारचीं पत्रें कशीं देतात व सरकारचीं पत्रें कोण्या अन्वयें लाडास जाण्याचीं. यांचें सांगतील त्या प्रो मागाहून विनंती लिहीन. सारांश, टिपुकडील पेषकसीचे जाबसालाकरितां करनुलकराकडील नजराणा वगैरे जाबसाल व सनदापत्रें मुलतवी या प्रो दौलाचें बोलणें. रा छ. २ माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. ३ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. घासीमियां यांजकडे पहिली पागेपैकीं जागीर व लोकनेमा प्रा आहेत. या सिवाय त्यांचे पुत्राचे नांवें नवा पांचसे लोकांचा करार जाला. पांचसे लोक नवे ठेवण्याचे मियांस सांगितलें, त्यावरून ते लोक ठेवावयास लागले. सदरहु पांचसे लोकांचा यैवज इतलासी अगर जागीर हें कांहीं अद्याप ठरलें नाहीं. ठरल्यानंतर विनंती लिहिण्यांत येईल. रा छ. २ माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. ३ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. माहाराव निंबाळकर यांची रदबदल दौलापासीं बाबाराव यांनी केली. दौलांनीं सांगितलें कीं माहाराव यांची चाल दुरुस्त नाहीं. मगर, त्यांचे पुत्रास हाजुर येण्याविषयीं अर्ज करितों. त्यावरून दौलांनीं नवाबास अर्ज करून माहाराव यांचे पुत्र जानोजी निंबाळकर यांस येण्याविषई नवाबाचा इनायतनामा व आपले पत्र बाबाराव यांचें समागमें तयार करून दिल्हें. जानोजी निंबाळकर करमाळें तालुकियांत आहेत. तेथुन येथें येणार. येथें आल्यानंतर जागीर वगैरे कांहीं पोटापुरती करून देणार. याप्रो आहे. रा छ. २ माहे रा वल हे विज्ञापनां.

श्री.

आश्विन शु. ३ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. छ. २७ सफरीं सैर करण्याकरितां नवाबाची स्वारी सिध जाली. पागेवाल्याकडील लोक वगैरे बाहेर दाटी फार जाली. सैद उमरखां यांचे चौऱ्यावर भावसिंग चौधरी बसला असतां घांसी मियांकडील घोड्याची लाथ चौधरी यास लागोन दांत पडले. घोड्याची लात बेजरब बसली. दोन घटिका मुर्छित चौधरी पडला. माणसांनीं उठवून त्याचे घरास नेलें. " होट तुटला, त्यास टांके देऊन नीट करणें" याप्रा नवाबांनी ताकीद केली. फिरंगी हाकीमास चौधऱ्याकडे पाठवून टांके व मलम देत असतात. चांगले होण्यास पांच च्यार महिने पाहिजेत. अशी अवस्था चौधरी याची जाली. रा छ. २ माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. ३ मंगळवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. सरकारचें पत्र छ. २९ माहे जिल्हेजचें राजश्री गणपतराव माधव यांजकडून आलें तें छ. १४ सफरी पावलें. त्यांत "मौजे वाघोली बु॥ पा॥ कजे धारूर हा गांव जागीर राजश्री गणपतराव माधव यांजकडे सरका-

रांतून आहे, त्यास भारामल नवाबाकडील याचा उपसर्ग लागतो. येविषीं नवाबा निजाम अलीखां बहादुर यांसी बोलोन बंदोबस्त करणें" ह्मणोन आज्ञा सादर जाली. त्यास मौजे मजकुरास भारामलाकडील नायबाचा उपसर्ग येविषईंचें वर्तमान समजल्यावरून सरकारचे पत्रापूर्वीही हा मार दौलासी तीन च्यार वेळां बोलण्यांत आला. सांप्रत सरकार आज्ञे वरुन निकड करून दौलांसीं बोलणें जालें कीं पेशजीपासोन श्रीमंताचे सरकारांत .....
(येथें येक सबंद पृष्ठ गहाळ झालें आहे. पृष्ठांक १२२) सं ..... (ठ)-
राऊन हरादो परगण्याची जागीर रुकनुदौला यांस दिल्ही. त्यांत हे दोन गांव वजा आहेत. रुकनु दौला यांस दिल्हे नाहींत. येविषीं दौलांस सांगोन हरदु गांवास तोसीस लागों न देणें. याप्रा सरकारी पत्रें. त्याच्या नकलां ह्या. त्या पक्षीं वाघोली व अरणी दोन्हीही गांव वजा आहेत. याजवर दौलाचें बोलणें कीं "आमचे सनदेंत अथवा दप्तरीं पाहतां कोठेंही वाघोली हा गांव वजा नाहीं. याचाही जबाब इकडुन जाला कीं सनदेंत अंदुरे तालुक्याचा तनखा लिहिला, तो वाघोली गांव अलाहिदा वजा देऊन बाकी तालुक्याचा तनखा लाऊन सनद दिल्ही, यैसाही अर्थ सिद्ध होतो. तर्फेनचे जें पहिलें दिल्हें तें जिकडील तिकडे चालावें असा करार असतां वाघोलीस हरकत करूं नये. श्रीमंतांचें सरकारचे जाबसालास सदरील हा सवाल आमचा आहे. याचा जाबसाल सरकारी येकंदर जाबसालांत उगवावयाचा. वाघोलीस भारामलानीं लोक पाो ते माघारे आणावे दौलाचें म्हणणें कीं वाघोलीचा जाबसाल पुढें जसा ठरेल व जिकडे गांव वाजवी होईल तिकडे द्यावा. तों पावेतों वाघोली गांव अमानत, यैसा जिमा तुम्हीं आपला करून दस्त येवज दिल्हास लोक माघारे आणऊं" आह्मी उत्तर केलें कीं "यैसे दस्तयैवज कोठवर म्हणोन द्यावे ? गांव आमचे जिमे आहे. परंतु दस्तयैवज सिवाये लोक तेथुन आणऊं नयेत, यैसें ध्यान दिसण्यांत आलें, व कालहरणावर टाकुन बोलतात. मंढे व मालेगांव हे दोन ठाणीं रोशनखानानें घेतलीं. ते पोटी पडले, हरीं वाघोलीस सुरुवात केली. त्यास, वाघोली

हा गांव सरकारचे दप्तरचे रुइनें वजाईत आहे किंवा कसें येविषीं यांसी बोल-ण्यास आज्ञा होईल त्याप्रो बोलेन. येविषीचे उत्तरास आज्ञा सत्वर जाली पाहिजे. रा छ. २ माहे रावल हे विज्ञापना.

श्री

भाद्रपद व. ७ गुरुवार ते आश्वीन शु. २ सोमवार शके १७१५

अस्वबार छ १९ रोज सफर ताा छ. १ रावलपर्यंत.

छ १० रावली डांकेवर.

श्री.

आश्विन शु. १२ बुधवार शके १७१५.

श्रीमंत राजश्री ———————— रावसाहेब

स्वामीचे सेवेसीं ————————————

विनंती सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सा नमस्कार विनंती विज्ञापना. ताा छ १० माहे रावल मुा बेदर येथें स्वामीचें कृपावलो कनें करून सेवकाचें वर्त-मान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान पेशजी डांकेवर ताा वार विनंती लिहिल्यावरून ध्यानांत आलें असेल. सांप्रत येथील वर्तमान अलाहिदा पुरवणी पत्रीं विनंती लिा आहे त्यावरून अवलोकनांत येईल उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

विनंती विज्ञापना. शंकरराव जोग यांजकडे नवाबाकडून निर्मळ, इंदुर बोधन, वालकुंडा वगैरे माहाल नफुरुदौला मरहुम यांजबाबत होते. त्यास बाकीचा तोटा भारी. तालुके तमाम उज्याड. साल माारचे पैत्रजास देखील ठि-काण नाहीं. सबब दौलाची मर्जी शंकरराव यांजवर खपा होऊन तालुकियाचें जमीस स्वार व अमील यांची रवानगी पेशजीची झाली. सांप्रत, शंकरराव यांजकडील कुल तालुकियाचें काम मीरबदरुद्दीन हुसेनखां पेशजी पागावालें यांजकडील तालुकियाचे अमीलीस होते, त्याजकडे निमे तालुकियाचें काम व निमे तालुका व्यंकटराव सुरापुरकर यांजकडे. याप्रा आलहिदा दोन-टुकडयांकरून दोवांकडे सांगितल्या. शंकरराव यांचेकारकिर्दीची बाकीही

तालुकियांत रुजु करून घेऊन वसूल करून सरकार दाखल करावी. व साल दरसाल नेमाप्राा यैवज पांवज्या करीत जावा. बेमुबलग बाकी राहूं न देतां कारस्तनींनें उगवा करून तालुक्याचा बंदोबस्त राखावा. सरकार-काम करावें. याप्राा उभयतांस ताकीद होऊन छ. ८ रावली दसऱ्याचे दिवसीं रात्रीं मीरबदरुदीन व व्यंकटराव याचे पुत्र त्रिमलराव यांस बाहालीचें खिलत व खिताब व रुखसतीची पानदानें दौलांनीं नबाबांस अर्ज करून देवविलीं. या उपर बदरुदीन व व्यंकटराव यांचे पुत्र त्रिमलराव उभयतां तालुकियास दौलाचा निरोप घेऊन जाणार. येथुन रवाना जाले ह्मणजे मागाहून विनंति लिहिण्यांत येईल. रा छ. १० माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. १२ बुधवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. शंकरराव भोगे यांचे तालुकियास जप्ती अमीन व स्वार नबाबांकडून पेशजी गेले, त्यांनीं इंदुर, बोधन वगैरे ठाणीं कितेक दाखल केलीं. शंकरराव यांस वर्तमान समजल्यावरून त्यांनें, आरमुर येथील गढी मातबर त्याची हमेषा राहण्याची जागा. तेथें पांच सात हजार पैदल वगैरे जमियत जमा करून आरमूरची गढी व शंकराई पेठ वगैरे मकानें बलाविलीं. याचा बोभाट आल्यावरून, येथून भारामल तेजवंत यांस रवाना करण्याची योजना दौलांनीं करून नबाबास अर्ज केला. छ. ८ रा वल दसऱ्याचे दिवसीं रात्रीं भारामल यांस रुखसतीचें पानदान दिल्हें. याउपरी भारामल दौलाचा निरोप घेऊन जाणार. भारामल यांचें समागमें जमियत दाहा हजार पर्यंत जाणार. दौलाकडील रिसाल्याचे लोक व जमातदार, व मुतफर्कात जागीरदार लोक चडचणकर सिंदे वगैरेस हकुम जाला. भारामल कुच करून येथून रवाना जाले ह्मणजे ताा विनंती लिहिण्यांत येईल. भारामल यांस रुखसत समई नबाबानीं जिगा व कलगी दोन अहद दिल्हे. रा छ. १० माहे रा वल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. १२ बुधवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. शंकरराव भोंग यांजकडे वातनीस दौलानीं आपला खिजमतगार सेखु पाठविला. त्यानें दौलांस लिहिलें कीं शंकरराव येथून निघोन भोंसले यांजकडे जाणार. शंकराई पेठ व आरमुर या दोन ठाण्यांचा बंदोबस्त केला. चीजवस्तसुद्धां जाणार. यैसी बातमी लिहिल्यावरून दौलानीं भारामल यांस फौजसुद्धां येथून रवाना करण्याची तजवीज केली. नबाबाची रुखसत दसऱ्याचे दिवशीं देविली. बाहेर डेरेही दिल्हे. दौलाचा मात्र निरोप घेणें बाकीस तो घेऊन कुच करणार, त्यास आज दुसरें पत्र सेखूचें दौलास आलें कीं " पहिलें मीं शंकरराव यांची चाल लिहिली होती. परंतु तें पाउल यांचें नाहीं. शंकरराव येथेंच आहे. कोठें गेला नाहीं; व परागंदा होण्याचा मनसबाही याचा दिसत नाहीं. हाजूरचे पत्र खातर जेमेनें येणें यैसें आल्यास हाजूर येतो. " या अन्वयें पत्र आल्यावरून काल भारामलचे रवानगीची गडबड भारी होती, तसी जलदी आज दिसत नाहीं. शंकर राव कडील विठलराव वकील येथें आहे. त्यासी व व्यंकटराव यासी गांठही घालून दिल्ही. शंकरराव यांस हाजूर येण्या विषयीं पत्रें रा होणार. इतक्यावर भारामल यांचे रवानगीचें कसें ठरतें तें मागाहून विनंती लिहितो. शंकरराव यांचीही पत्रें आजच दौलास आलीं आहेत. रा छ. १० माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. १२ बुधवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. राजश्री बाबाराव गोविंद येथून छ. २ माहे रावली कुच करून मैलारास गेले. दोन तीन दिवस तेथेंच मुक्काम करून होते. छ. ५ माहे मारी मैलाराहून निघोन पुढें गेले. याप्रा वर्तमान आलें. मशार निलें दरमजल येऊन पोंहचतील. रा छ. १० माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. १२ बुधवार शके १७२५.

विनंती विज्ञापना. रणदुलाखान करनुलकर यांची रुखसत नवाबाकडील व दौलाचा निरोप जाल्याची विनंती पेशजी लिताच आहे. खान मार २ रावली कुच करून दरमजल नारायेण पेंठचे मार्गे करनुलास गेले. रा छ. १० माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. १२ बुधवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. गाजी खान वसमतवाला पेशजी हषमजंग यांजपासीं होता. त्यानंतर राजश्री बलवंतराव लक्ष्मण सेलुकर यांजपासीही नौकर सें दोनसे लोकानसी होता. त्यांचा व गाजीखानाचा बेबनाव जाल्यामुळें त्याजपासून बरतरफ जाला. हल्लीं नवाबाचे सरकारांत नोकरीचे उमेदवारीनें दोनसें स्वार व शंभर पैदल सहित येथें छ. ३ रावली आला. स्वार फार करून करोल आहेत. रा छ. १० माहे रावल हे विनंती.

श्री.

आश्विन शु. १२ बुधवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. मलंगुर येथें जमीदार मुफसदाचा आठा जमा होऊन पांच साहा हाजार जमियत मिळाली. किला मुफसदानीं घेऊन तालुक्यांत हांगामा माजविला. त्यांचे तंबी करितां महंमद अजम बीडवाला याची जमियत दोन हजार सवार व तैनाती यक हजार. येकुण तीन हजार स्वार व च्यार हजार पयदलची जमियत मुसारेहमु व अबदुल करिम पैकीं. व हैदराबादेहून पांच तोफा समागमें बारूदचा सरंजाम घेऊन जाण्याची परवानगी होऊन अजमखान बीडवाला यास रुखसन मलंगुरास जाऊन जमीदाराची तंबी करकरण्याची जाली. छ. ८ रावलीं अजमखान बीडवाला आपले मेळा सुधां येथुन तीन कोसांवर कुच करून गेला. मलंगुर मागती किलेदारानें घेतलें, यैसेंही वर्तमान आज याचें सरकारांत आलें तेव्हां जमियत त्या कामाकरितां

रा जाली तेही माघारी येईल यैसें दिसतें. होईल त्याप्रा ता लिहीन. रा छ. १० माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. १२ बुधवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. दसऱ्याचे दिवशीं मी रात्रीं नवाबाकडे गेलों होतों. दौला व राज्याजी आदिकरून सर्व मंडळ जमा जालें होतें. नजरा जाल्यानंतर नवाबांनीं मला पानदान देऊन रुकसत केलें. मागाहून दसऱ्याची वस्त्रें तापकार चोबी, पोषाग मजकडे पाठविला. रा छ. १० माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. १२ बुधवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. चेनापटणाहून व्यंकटराम दिला याजकडून प्रस्तुत दोन अखबारा आल्या त्या रा केल्या आहेत. राजश्री गोविंदराव भगवंत सेवेंसी प्रविष्ट करितील. त्यावरून मार ध्यानात येईल रा छ. १० माहे रावल हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. २ सोमवार शके १७१५. ते आश्विन शु.११ मं. आश्विन शु.१२ बु.

अखबार ईा छ. १ रावल ता छ. ९ माहे मार. रा छ. १० रावल. छ. १४ रोज खाना टपा. रावल.

श्री.

आश्विन शु. १ रविवार शके १७१५.

श्रीमंत राजश्री _____ रावसाहेब
स्वामीचे सेवेसीं _____

विनंती सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना ता छ. माहे रावल पर्यंत मुा बेदर येथें स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. इकडील वर्तमान छ. १० माहे मारी डांकेवर तपशीलवार विनंती लिहिल्यावरून ध्यानास आलें असेल. सांप्रत येथील वर्तमानाची विनंती अलाहिदा पुरवणीपत्रीं लिहिली आहे. अवलोकनें

मार ध्यानांत येईल. उत्तरें खाना व्हावयास आज्ञाकरणार स्वामी समर्थ. सोळावें मोहरम पासून आज परियेंन दाहा खानग्य (।) पत्राच्या जाल्या. येकाचेंही उत्तरें लिहावयास आज्ञा न जाली. याजकरितां विनंती लिहिली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्री.

आश्विन शु. १ रविवार शके १७९५.

विनंती विज्ञापना. दौला अह्मांसीं बोलले कीं "बावुराव यांची खानगी होत आहे. तुमचे समक्ष यांसीं बोलावयाचें." तेव्हां आम्हीं त्यांस पुशीलें कीं "बाबुराव यांस काये सांगोन पाठवण्याचें मुकरर केलें हें समजावें" याजवर दौलांनीं बोलण्यास आरंभ केला कीं " तर्फैन सरकारचे जाबसाल वाजवी प्रा परस्परें फैसल्यांत यावें. आणि मदारुल मावला यांनीं व मी बे किलाफ असावें हे ख्वाहिष फार दिवसांपासोन चित्तांत. परंतु, तसा प्रकार घडून येतच नाहीं यास काये करावे? हें सर्व दरेनें तुम्हांसीं हमेष बोलण्यांत आलें. त्याजवर पटणची मोहीम करून येतें समई हरी पंडतजी यांसी बोलण्यांत कोणतींहि बाकी राहिली नाहीं. त्यांचें ह्मणणें कीं पुणियास गेल्यानंतर याचें उत्तर पाठवितो. .... (यापुढें १९ पृष्ठें कसरीचे सपाट्यांत सांपडलीं. पुष्ठांक १३१ ते १४९ सं.) .... इष्टवटाकडे मालिटानें पाठविलां. तेंव्हां संशय कोणता? माहिनाभर यांद न येण्याचें कारण काय? हे मसलतीचें काम. यास असी देरकेषी होणें खुषनुमा दिसण्यांत येते कीं काये? याचा विच्यार पाहावा. लाडबाहादुर यास विलायेतीहून पत्रें जलद येण्याची व निकड कशी? तथापि, टिपुचे मसलहत प्रकर्णी काम आपले विद्यमानचे. याची पुढिल ही दुरुस्ती आपले हातें हमेपणें व्हावी; यांत तीन सरकारास ही उपयोग व चांगलें. यैसें समजोन आज पर्यंत लाडास त्याचे खाविंदांचा हुकुम जलद येण्याचाही असतां, या कामा कारितां राहून, दोंहीं सरकारांत वकील आहेत त्यांस पैहाम लिहितात कीं साता दफेचा करार होऊन लौकर पोंहचाव्या. यैसें असतां साता दफेस सात महिने गुजरुन गेले.

१ एक मताने २ इच्छा ३ स्टुअर्ट ४ उशीर, दिरंगाई ५ चांगलें.

अद्याप प्रथम दिवस. येक वेंळ मुजमिला फर्द आली, त्याजवर इकडून लिहिलें गेलें. हली नवीन कितेक कलमें व कितेक पहिले दफेंतील मवकुंफ अशी याद ठरली तेही अद्याप तुम्हांपासीं आली नाहीं. ते याद तुम्हांकडे येणार. त्याजवर शाकें बेशाक होय नव्हे होऊन सलाह जाणार. मागतीं तिकडून आणीक काय ठराऊन येणार ? या खालेच दिवस गुजरले. व पुढें किती दिवस लागावयाचे याचा नेम कशावरून समजावा ? लाडास इतकी निकड, त्यापक्षीं इतक्यावर त्याचें रहाणें होण्याचें चिन्ह दिसत नाहीं. लाड बाहादुर विलायेतीस गेल्या नंतर नवा जनराल कलकत्त्यास आला आहे, त्यासी जाबसाल, त्याची चाल कशी हें समजत नाहीं. तेव्हां करारी कोणे प्रकारच्या व कशा याचा आसळूब काय तव्हेचा? हें दुरदेशीनें मनांत यावें. ठरली गोष्ट ते लांबणीवर पडून पुढें कसें ठरतें ? याचें अनुमान होत नाहीं. इतके प्रकार विच्याराचे मागें ध्यानात आणुन लाड बहादुर ... . (मधील पृष्टें कसरीनें गहाळ झाली आहेत. पृष्टांकं १४७ ते १७९ सं) (पृष्टांकं १८०) ..... करऊन सायेंबाना मध्य नबाब बरामद जालें. सरबुलंदजंग व घांसीमियां व अजमखां व मुनषी वगैरे इसमांचा सलाम जाला. मिस्तर किनवी दिलावरजंग यांची मुलाजमत नजर जाली. सलाबतखान यांस मोत्याचा तुरा, भुजबंद व त्याचे तीन पुत्रास खानीचे किताब दिल्हा. दौला व मीरअलम व किनवी यांसीं खलावत जाली. चंदा कंचनीचा नाच पाहिला. येक प्रहर सात घटिकेस बरखास जालें. आपले हवेलीस आले. छ. २ रोजीं गुरुवारीं दिवसां दरबरा जाला नाहीं. असद अलीखां यांनीं सालगिरेचे ज्याफतीची तयारि करून तीन प्रहरास दौलाचे हवेलीस पोषाग वगैरे सरंजाम घेऊन आले. येक घटिका रात्रीं नवाब जनान्या सहित दौलाचे हवेलिस आले. मामुली लोकांचा सलाम जाला. पंना भांडाचा व कंचन्याचा नाच होता. दौलांसीं बोलणें ही होतें. दोन प्रहर रात्रीं आपले हवेलीस गेले. छ ३ रोज शुक्रवारी दिवसां खैर सला. रात्रीं दौलाचीं अर्जी व धारणीचा निरखबंद गुजरला. छ. ४ रोज मंदवारीं प्रातःकालीं दोन खाने लावले. अडीच प्रहर दिवसां मुजाहिदुदौलां येऊन उतरल्याचा

१ संक्षिप्त २ तहकुब ३ शंका, किंतु ४शामियाना, कचरीचा तंबु.

अर्ज जाला. त्यास इस्तकबाल बादषाही बक्षीस पो. त्याजला तीन पारचे, दुषाला व स (सि ?) र पेंच दिल्हा. रात्रीं दौलाचेथें तयारी होऊन अर्जी गुजरली. च्यार घटिका रात्रीं नबाब जनान्या समवेत दौलाचे हवेलीस आले. मामुला इसमांचा सलाम जाला. मुजाहिदुदौला यांची मुलाजमत होउन नजर जाली. कंचन्याचा नाच होता. दोन प्रहर रात्रीं बरखास जाले. छ. ९ रोज रविवारीं तीन घटिकां प्रथम दिवसां नबाब बेदार जाले. दौलाची अर्जी ब दोन खाने व मेवा गुजरला. दिवसां दरबार जाला नाहीं. रात्रीं मामुली इसमें हाजर होतीं. त्यास जबाब जाला. छ. ६ रोज सोमवारीं येक प्रहर येक घटिका दिवसां खाबगाहमध्यें[1] नबाब बरामद जाले. जंगु व मुधा व मनवाचा सलाम जाला. लालन हजामाची याद केली. तो हजर जाला. हजामत होऊन येक प्रहर च्यार घटिकेत बरखास जाले. रात्रीं दौ. लाचे दिवाणखान्यांत बंदोबस्त होऊन सात घटिकेस जनान्यासहित नबाब तेथें आले. दौला व मीरआलम व सरबुलंदजंग व घासीमिया व अजमखां वगैरे इसमांचा सलाम जाला. प्रथम कंचनाचा नाच. त्यानंतर पना भांडाचा नाच होता. रावजीची याद केली. ते दरबारास आले. फुलाचे हार येक रावजीस व येक दौलास नबाबांनीं दिल्हे. दोन प्रहरास बरखास जाली. छ ७ रोज मंगळवारी प्रातःकालीं दौलाची अर्जी व दोन खानें मेवा गुजरला. लंगर हवदाचे फकीरानें पांच टोपली अनार गुजराणिगे (ले ?) दौलाचे घरीं रंगाची तयारी करऊन यक प्रहर यक घटिका दिवसां नबाब जनान्या सहित तेथें आले. बंदोबस्त जाला. कंचन्याचा नाच होता. रंगाच्या पिचकाऱ्या घेऊन मारगिरी जाली, यक प्रहर सात घटिकेस नवाब आपले हवेलीस आले. रात्रीं दौलाचे हवेलींत तयारी जाली. नबाबही येणार होते. परंतु, झुलकारअली साहेबजादे यांची मातुश्री हैदराबादेंत बेआराम होती, तिचा वाका जाल्याचें वर्तमान शुतरसवारसमागमें आलें. सा नबाबाचें येणें न जालें. छ. ८ रोजीं बुधवारीं प्रातःकालीं दौलाची अर्जी गुजरली. रंगाची तयारी करण्याचा हुकुम त्यांजला जाला. साहेबजादे मीरपोलादअली वगैरे यांची

१ शय्यागृह २ सांडणीस्वार.

याद केली. ते हजर जाले. येक प्रहर साहा घटिका दिवसा नबाब दौलाचे हवेलीस आले. दौला व सरबुलंदजंग व घासीमियां व अजमखां व रावरंभा तमाम सरदार मनसबदार मुतसदी लोकांचा सलाम जाला. रावजीकडे चोपदार पाठविला. तेही दरबारास आले. कुर्सीवर नबाब बरामद जाले. सर्वांचे हातीं पिचकाऱ्या देऊन रंग टाकिला. कंचन्याचा व भांडाचा नाच होतां. दोन प्रहर च्यार घटिकेस बरखास होऊन नबाब आपले हवेलीस गेले. रा छ. ११ रा खर हे विज्ञापना.

कार्तिक शु. १४ शनिवार कशे १७१५. ता०१६ नोव्हेंबर १७९३.

छ १६ रोज टप्यावर रवाना.

श्री.

कार्तिक व. ४ गुरुवार शके १७१५. ता० २१ नोव्हेंबर १७९३.

१ श्रीमंत रावसाहेब पेशवे यांस नेहमी प्रमाणें हवाल्याचें पत्र *

श्री.

कार्तिक व.४ गुरुवार शके १७९५. ता० २१ नोव्हेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. सिकारगा कारितां नवाबांनीं बाहेर निघावयाचा बेत दौलाचे विच्यारें ठरून तमाम लोकांस तयारीची ताकीद जाली. बेदराहून तीन कोस मांजे कमठाणें हवेली तालुकियाचा गांव चिटगोप्याचे मार्गावरील येथें शिकारग्याचे डेरे देण्याचें ठरलें. तेथील जागा मैदान, पाणी चांगलें. पूर्वी बेदरी पातशाहा राहात गेले, त्यांचे शिकारीस जाण्याचें मकान कमठाणें, याचाही बयान होउन जागा पाहून येण्याकारितां छ. १९ रा खरीं दौला प्रथम च्यार घटिका दिवसां स्वार होऊन कमठाण्यास गेले. तेथें जागा पाहून येणार. ते आल्यानंतर नवाबांनीं छ. १९ अथवा छ. २१ या दोन तारिखां

* (पृष्ठें १. ४२, ४८, ५०, ५५, ५९, ६२, ६६, ७७, ८०, पहा) अशीं पत्रें एकाच प्रकारचीं व एकाच मजकुराचीं असल्यानें पुनः पुनरुक्ती टाळण्याकारितां या पुढें न देण्याचें ठरविलें आहे. क्वचित स्थळीं विशेष मजकूर असल्यास सविस्तर लेख दिला जाईलच. संपादक.

पैकीं येके तारिखेस निघोन खैमें[1] दाखल व्हावें यैसा बेत आहे. नवाब निघाल्याचें वर्तमान मागाहून विनंती लिहिण्यांत येईल. रा छ. १६ रा खर हे विज्ञापना.

श्री.

कार्तिक व. ४ गुरुवार शके १७१५. ता० २१ नोव्हेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. कमठाणें येथें शिकरागाहा कारितां नवाब जाऊन राहणार. डेरे वगैरे फरास खान्याचा सरंजाम रवाना व्हावयाचा. तेथील लोकांचीं घरेंही खाली करविलीं. कामाठीं बेलदार लाऊन मरामत होत आहे. दौला जागा पाहावयाकारितां गेले आहेत. ते आल्यानंतर नवाब तीन च्यार दिवसांत कुच करून कमठाण्यास जाणार. रा छ. १६ रा खर हे विज्ञापना.

श्री

कार्तिक व. ४ गुरुवार शके १७१५. ता० २१ नोव्हेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. नवाबांनीं बाहेर निघावयाची तजवीज दौलाचे विच्यारें ठरली. त्यास डेरे दाखल होऊन फौज जमा करण्यांत पोहरतें[2] पडती, याजकरितां शिकारगाचे निमित्यानें कमठाणें येथें डेरे दाखल होऊन सैर शिकार करावी; इतक्यांत फौज सरंजाम कुल जमा होतो. सिकारगाचे मकानावर वाडाही मोठा देण्याची योजना जाली आहे. कारण कीं वाडयाचे रखवालीस फौज गाडद सभोंवतीं ठेवावी. येणेकरून फौज तयारी वगैरे दोष दिसण्यात नाहीं. यैसा बेत ठरून दौला जागा पाहावयास गेले. तेथून आल्यानंतर नवाब कुच करून जाणार. खैमें[3] दाखल होणार. येथें फौज गाडद जे जमियत आहे, ते हमेराह कुच करते दिवसीं वाड्याचे बंदोबस्तास राहावी. आसपास दाहापंधरा कोसीं जमाव चराई वगैरेस आहे, त्यांजला ताकीद आंतून निक्षून जाली आहे कीं जलद येऊन जमा होणे. पंधरा वीस दिवसांत कुल जमाव एकत्र करावा. यैसी धुन दिसत. येथील लोकमुखें वर्तमान कोणाचें ह्न (ण) णे नवाब बाहेर निघोन फौंज समवेत औरंगाबादेस जाणार. कोणाचे

१ तंबू २ स्फोट होतो; गवगवा होतो. ३ तंबु, डेरे ४ बरोबर.

बोलण्यांत रुख भोसले सेना साहेब सुभा याजवरील. कोणी ह्मणतात आतां फिरोन नवाब बेदरास येत नाहींत. परभारां हैदराबादेकडे जाणार. या प्रो अनेक तर्क करून बोलतात. वास्तविक कोणतें काय असेल तें असो. परंतु, षिकार गाहाचे बाहाण्यानें जमियत सरंजामाची मजबुती करून पुढें कर्तव्य तें नमुदांत आणावयाचें लक्षण या चालीवरून दिसण्यांत येतें. यास येक दाखला मिळतो कीं छ १४ रोजीं रात्रीं दौलांनीं चोपदारासमागमें येक रुक्का अह्मांकडे पाठविला कीं " हाजरत बंदगानआली कमठाणें येथें षिकारी करितां खैम दाखल होणार. तुह्मीं समागमें निघोन तेथेंच येऊन राहावें. या प्रा हाजरतीची आज्ञा. " याचें उत्तर दौलांकडे आह्मीं सांगोन पाठविलें कीं "हाजरत जेथें राहतील तेथें आह्मीं समागमें येऊन राहावें हें यैन सलाह व-लाजम. परंतु उंटें वगैरे भारबरदारी सरंजाम आमचा येथें हजर नाहीं. जरिदें तेथें येऊन राहिल्यास कुल सरंजाम येथें राहातो. चौकी पाहरा तेथील व येथील दोन ताण पडतात. चोरांचा उपद्रव असा कीं सारे रात्र मनुष्यें जागत आहेत, तथापि चोऱ्या होतात. यास्तव कमठाणें येथेंच षिकारीची सैर येंके जागीं असल्यास तेथें राहोटया पालें जूज सरंजाम देऊन दिवसां राहत जाऊं. रात्रीं येथें येऊं या प्रा जाणें येणें होईल. अथवा फिरतीं शिकार असल्यास समागमें येऊन राहणें जरूर. सरंजाम आ-णवावा लागेल. याची सलाह आपण जसी सांगाल तसें करूं." याजवर दौलाचे बोलण्यांत आलें कीं "कमठाणें येथें षिकारीस हजरत राहणार याचा एक महिनियाचा सरंजाम तेथील केला आहे. परंतु महिनाभर तेथें राहावयाचा बेत नाहीं. वीस दिवस कमठाणें येथें राहाण्याचा निश्चय, व सरंजाम येक महिन्याचा. वीस दिवसांत येथें येणें जाणें हा बेत मुजाकौ नाहीं. येथें सर्व खटला ठेऊन सडें येत जावें. तों पावेतों सरंजामही येईल. वीस दिवस कमठाण्यावर व कर्फा" यैसें बोलले. याजवर दौलास विचारिलें कीं " वीस दिवसानंतर कसे षिकार कोणीकडे होईल ? " दौलाचें ह्म (ण) णें कीं

१ पत्र. २ सडें. ३ हरकत. ४ मुकाम.

" कमठाण्यावरील वीस दिवस राहण्याचा बेत मला समजला. विसा दिवसानंतर पुढें इरादा कसा हें हाजरतीचें विचारें ठरेल तसें. " या प्रा बोलले. त्यास दौलानीं असें मोहगम बोलणें यांतील चिन्ह विच्यार करून ताडून पाहतां लोक तर्क करितात यास ताळा मिलतो. लोकवार्ता याचे प्रमाणें ही वाटत नाहीं. परंतु बाहेर निघोन फौजा जमा करण्यास निमित्त समर्पक आहे. पुढें जसा मनसुबा तसें करावयास प्रतिपं (बं) ध नाहीं. फौजा जमा करण्याची आणि बाहेर डेरे दाखल होण्याचा मोठी शोहरत[1] गोष्ट लपून राहावयाची नाहीं. त्या विषई षिकारगाहची सलाह काढून बाहेर निघणार असें आहे. रा छ. १६ राखर हे विज्ञापना.

श्री

कार्तिक व. ४ गुरुवार शके १७१५. ता० २१ नोव्हेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. दौलाचे हवेलीस सुलेमानपाह साहेबजादे त्यांचे दतकपुत्रकांचे सालगिरेचा समारंभ वीस बावीस दिवसपर्यंत नित्य किंवा दिसा आड रात्रीं नाच राग रंग नवाबानीं जनान्यासहित येऊन दोन प्रहर रात्र पावेतों राहून मग आपले हवेलीस जावें. याप्रा होऊन सेवटीं रंग करविला सरगष्त व मेहंदी ही निघाली. सालगिरेची समाप्ति जाली. दौलाची सालगिरेही यांतच येके दिवशीं जाली. रंगाचे दिवशीं आह्मांस बोलविल्यावरून गेलों होतो. रा छ. १६ राखर हे विज्ञापना.

श्री

कार्तिक व. ४ गुरुवार शके १७१५. ता० २१ नोव्हेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. सालगिरेसंमंधीं दौलानीं पोषाग मिस्तर किनवी दि. लावरजंग यांस साहा पारचे व इष्टवट लपटन यां दोघांस तीन तीन पारचे, याप्रा त्यांजकडे चोपदार समागमें पाठऊन दिल्हे. रा छ. १६ राखर हे विज्ञापना.

---

१ मशहूर. २ जन्मदिवस

श्री.

कार्तिक व. ४ गुरुवार शके१७१५. ता० २१ नोव्हेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. शंकरराव भोंग प्रकर्णी भारामल यांचीं पत्रें दौलांस आलीं व उमरखेडकरांनीं दस्तायैवज भारामलास दिल्हा, येविषीची तपसीलें विनंती पेशजी लिहिल्यावरून ध्यानांत आलें असेल. हलीं शिवराम बाबूराव व गंगाधर काशी यांचे पत्र उमरखेंडाहून आह्मांस आलें कीं, " शंकरराव निधोन कोसंबदे तालुकियाचें गावीं प्रथम राहून तेथून मुलें माणसें सुधां मौजे सोईट पा उमरखेड येथें आला. मावजी नाईक यानें राहूं नको ह्मटलें परंतु येकरोज मुकाम करून माहूर परगण्याकडे गेला. मागाहून नवाबाकडील जमातदार सोइटास आले. त्यांस तेथें शंकरराव नाहीं हें समजल्यावर ह्मशाकडे गेले. भारामल फौज तोफा सुधां सोइटास उतरून पायमालीकडे गाजीखान च्यारसें लोकांसहित मौजे चिली पा माहूर येथें जाऊन वेढा दिल्हा. तेथील नाईक भेटला. नऊ दाहा घोडीं भोंगांचीं सांपडलीं. फुलसांगवींत मुलें माणसें आहेत यैसें नाईकानें सांगितलें. फुलसांगवीहून भाड्याचे बैल करून उमरखेडा पासोन कोंसावर गांव आंबवानें येथील तळ्यावर भाडेकरी सोडोन फुल सांगवीस आले, या सांगितल्यावरून गाजीखान उमरखेड्यास आला. 'भाग लाऊन देणें' यैसें बोलणें पडलें. मावजी नाइक फौज येतांच गैर हाजर जाला. भोंग कोठें गेला असेल तो असो. भारामलाकडे येतो यैसें ह्मटल्यास गाजीखानानें न यैकुन मुकाम करून जिराइत व बागाइताची खराबी केली. भारामलाकडे कारकून पाठविला. त्यांणीं सुलतान खानास पाठविलें. तो व गाजीखान मिळोन बेशी पावेतों बंदी केली. आह्मीं भेटीस गेलों. त्यांणीं अटकाव केला. त्यानंतर भारामलाकडे शिवराम बाबूराव व भगवंतराव गंगाधर व रामराव दादाजी त्रिवर्ग गेलों. त्यांनीं पता लाऊन देण्याचें लिहिलें, मागितल्यावरून दिल्हें. न द्यावें तरी हांगामाचे दिवस. परगण्याची खराबी होंऊं लागली, सबब पत्र लेहुन दिल्हें. शिवरामबाबुराव यांस निरोप देऊन उभयतांस त्यांनीं समागमें ह्मशाकडे नेलें. " या अन्वयें पत्रीं मजकूर आहे.

त्यास उत्तर खेडकरांनीं भारामल यांस दस्तैवज 'शंकरराव याचा पत्ता लाऊन देऊं.' यैसा द्यावयाचा नव्हता. भारामल फौज सुधां तालुकियाची नुकसानी व पायेमलीकरितां तरी हा जाबसाल सरकारचा नव्हताशीं. तालुक्याची नुकसानी होइल म्हणोंन शंकरराव यांचा पत्ता लाऊन देऊं यैसें लिहिलें काये म्हणोन दिल्हें ?" ये विषईं निषेध करून उत्तर खेडकरास जबाब लिहिला. परंतु दस्तैवज बजीनस लिहून दिल्हा. तेव्हां पुढें यांचें कसें पडते पाहावें. ये विसीं सरकारांतुन आज्ञा येईल त्याप्रों यांसीं बोलण्यांत येईल रा छ. ११ राखर हे विज्ञापना.

श्री.

विनंती विज्ञापना. दौलाचे बोलण्यांत आलें कीं "शंकरराव भोंग उमरखेड तालुकियांत याचा पत्ता. व तेथील कमाबीसदारांनीं तंजेवत यांस दस्तैवज पता लाऊन देऊं यैसा दिल्हाअसतां सांप्रत उमरखेडकर म्हणतात कीं शंकरराव येथें नाहीं. नागपुरास गेला. या अन्वयें भारामल वगैरे पत्रें आलीं. त्यास बजीनस पता असोन नाहीं म्हणतात. तेव्हां उमरखेडकर यांस काये म्हणावें ? व शंकरराव तेथें नसल्यास म्हणोन तरी फायेदा कोणता ? नागपुरचा पता सांगतात, त्यास सेनासाहेब सुभा यास राव पंत प्रधान यांचे सरकारचीं पत्रें व त्यांचे कारभारी पुण्यांत आले आहेत त्याजलाही ..... (पुढील पृष्ठें गहाळ झालीं आहेत. पृष्ठांक १८८ ते १९४ सं.) पृष्ठांक १९४. असल फारसीचा कांहीं अवशिष्ट राहिलेला भाग.

श्री

कार्तिक वा। ९ शके १७१५. बुधवार ता० २७ दिसेंबर १७९३.

* न बायद कर्द. व अझ दफेसिय्युमे आन मसबदे चुनान मफहुम मीशवद के टीपुरा बराये खलल करदन हरयक शरीके दफे एजाझत बाशद. मआनी तदारुके खलले दफे अबल हरचंद दरानदफे कारे आन शरीक तमाम बुवद झरूर नीस्त बलके नसीहत बरान कर्द शवदके चुनान बारे दीगर न बायद कर्द व अगर हमचुनीन बाझ खाहद कर्द खुबनीस्त. पस बनाये

१ असल फारसीचा कांहीं अवशिष्ट राहिलेला भाग.

अहदनामे कफालते शुरका हमदीगर बराये तदारुके टीपु दरसुर खलल इस महलाले बलके इन अदाम मीवशीरद. बहेतर इन अस्त के इबारते लार्ड बहादूर दरीन दफे के कवायदे (? फवायदे) मआनीये आन अझहर बहाल दाश्तन उलान अनसब. दफे हफतुम आन-नहुमे आन-मसवदे चुनीन मरकूम अस्त हाला नक्शये मोहम करार याफते अस्त बमुजबे इन अगर मोहम कर्दन उफताद अझतर्फे टीपु मुलको किल्लेजात हमे बदस्त आयद हरसे बराबर हिस्से कर्दे बेगीरीद. चुन आनतहनामे अहदनामे केफालत अस्त न अहदनामये मोहिम व रुयश अस्त. के चुनहरसे सरकार मुसहद अंद हरयक हिस्से मुसावी दर तकसीम खाहंद याफत पस मवकए इन मआनी बआदे करार याफतने मोहम खाहद बुद. व अगर नवश्तने आनमझमुन खाह मींखाह मनझूर बाशद बहमीन एबारत बायद नवेश्त, के तकसीमे मुलको किल्लेजात वगयरहु के दर अवझे मुसालेहत अझ टिपु बदस्त अमद मुनासबे सरहदे हरयक सरकार बा टिपुशुदे बुवद बअमल आरंद. दरदफे हश्तुम दरखास्ते यकदो पलाटन अजसरकारे अंग्रीझ मरकूम अस्त इन सवाल जवाब तआलुक ब सरकारे कंपनीए अंग्रीझ दारद. अझसरकारे मा बदौलत इलाके नीस्त दरदफे नहुमे आन मसवदेह मरकूम अस्तके अझतर्फे टिपु मुलकि के गुझाश्त खाहद शुद दरान बराये ब्राह्मन व फकीर व दरगाह हरचे जारी बाशद बमुजबे आन हरसे जारी दारंद आन मझमुन अझ शरायते तहनामे चे तआलुक दारद हरयक सरकार दरदादने खेरात अझखानये खुद मुखत्यार अस्त. दफेदहुम के मझमुने पीशकशे सरकार राव पंतपरधान अझ टिपुसुलतान मरकुम अस्त आन दफे अझ अहदनामें केफालत नीस्त बलके अहदनामये मोहम अस्त अगर अहदनामे नवश्न हम मनझुर अस्त मझ पीशकशे सरकार मा बदौलत के अझ कदीम उल अय्याम अझ रुये असनाद वाजेब उलअद अस्त नीझ दाखेल कर्दे शवद लेकीन इन दफेसरीह बर खेलाफ बनाये इन तहनामे के फकत बराये हेफाझत व दफे खलले पीश कदमी ए टिपु सुलतानस्त बिलकुल बरहम मीखाहद व फिलल फौर मोहम लाझम कर्दन

मीं आयद. दरीन सुरत बर आवरदने आनदफे झरूर पुर झरूर. दफे याझ दहुम बारुत व गोले व बंदुक व तोप वगयरहु सामाने जंगी अगर दर सरकार मसतूर शुद अझ सरकारे कंपनी व बेपारी परवानगीए खरीदी बर्ली महसूल शवद. इझहोर दिलावरजंग बहादर चुनानस्त के फरुख्तने सामाने जंगी मआमुले सरकारे कंपनी नीस्त व बेपारीयानरा मुमानअते कुल्ली अस्त के हीच सामानें जंगी न फरुशंद. व गवरनर जनरल दरीं बाबहुकमे आम नमी तवानद दाद व दर सरकार माबदौलत सरंजामे मझकूर बिलकुल चंदान झरूर नीस्तअगर आन शहामत मुरत्तेब शुद झरूर बाशद. अझ मिस्तर मेलेट बहादूर हम मरातबे इझहारे दिलावर जंग बहादर तहकीक नु मायंद. झियादे अय्याम बकाम बाद.

श्री.

कार्तिक वा ९ शके १७१५. बुधवार ता० २७ दिसेंबर १७९३.

* तरजुमा श्रीमंतास नबाबाचे पारसी पत्राचा.

आं शाहामत मर्तबातच्या तजवीजेचा तहनामा मिस्तर मालिट बाहादुर यानीं पाठविला त्यास दोन महिने जाले, मिस्तर इष्टबॉरट बाहादुर थांचे मारफातीनें हाजुरांत गुजरला. ताजूब आहे कीं हा काल पावेतों राव गोविंदराव कृष्ण यांचे मार्फतीनें हाजुरात मसविदा न पोंहचला. यैसियास दाहा महिनें तहनाम्याचा जाबसाल दोन्हीं सरकारांसीं दरपेश. इतकी मुदत गुजरल्यानंतरही पाहणें जरूर. याजकारितां राव मजकुर याचे मारफातीनें मसविदा पोंहचण्याची इंतजारी अधिक न करणें जाणुन हाल मसविदा तिकडुन ठरला यासीं व लाड बाहादुर यांचे तजविजीनें सात दर्फाचा तहनामा ठरून आला, त्याचे शब्द व अर्थ यासीं मुकाबिला करून पाहतां यांत कमज्यादा करण्याच्या कबाहती खातरेंत गुजरल्या, त्याचा तपशील लिहिण्यांत येतो बिा. ?

(सदर तरजुमा मूळ प्रतींत दिलेला तसाच येथें घेतला आहे. सं.)

१ भाषांतर २ मोठी ३ पदवी ४ स्टुअर्ट ५ आश्चर्य ६ निकाल न होतां तसाच निकालाकारितां राहिलेला. ७ खटपट, काळजी ८ कलमाचा ९ मेळ, तलग १० मतभेद बांध।

१ या मसविद्यांत आपलाले दौलतीचे बंदोबस्ताचा शब्द लिहिला आहे. त्यास, या आइदनाम्यासी या शब्दाचा तालुक काय आहे ? श्रीरंगपटणचे आहदनाम्याचे शर्तीची यांस हा शब्द व परस्परें वंशपरंपरा व कायम मकाम येक दुसऱ्याचें हा शब्द लिहिला नाहीं. हा शब्द असेल तसा दाखल करणें जरूर.

१ दफे अवल व दुसरी या मसविद्याची. त्यांत लाड बाहादुर यांचे तजविजेचे दफातीसीं पाहातां शब्दाचा मात्र फेर परंतु, अर्थ येकच. त्याअर्थी लाडबाहादुर यानीं जसे शब्द लिहिले त्यांत तबादला कशाकरितां करावीं ?

१ लाडबाहदुर यांचे मसविद्याची तिसरी दफा पहिले तहनाम्याचे दुसरे दफेचें मजबुतीकरितां आहे. ती या मसविद्यांत बिलकुल मवकुफ केली. त्यास हालीं हा तहनामा होणे. याची बुनियाद श्रीरंगपटनाचा तहनामा, त्या तहनाम्याचे कायमी करितां हे दफा लाडानें ठराविल्या बमोजीब दाखल करणें जरूर.

१ या मसविद्याची तिसरी दफे यासी व लाड बाहादुर यांचे चौथे दफेसीं अर्थ पाहातां नवल आहे. परंतु लाडाचे चौथे दफेंत परीकांनीं जलदीनें ज्या शरीकास इजा पोंहचेल, त्याची इतला जाल्यावर तेच समई खबर घ्यावी असा मजमुन आहे. तसा अर्थ या मसविद्याचे तिसरे दफेंत समजण्यांत येत नाहीं. बलकी विपरीत आहे. याज करितां लाडाचे चौथे दफेंची इबारत बाहाल ठेवणें जरूर.

१ या मसविद्याचे चौथे दफेंत लिों आहे कीं वकील ठेवावा तो आपला व आपले खाविंदाचे चित्तांतील खुलासा जाहीर करीत जाईल इतकेंच लिहिलें आहे असें लिहिलें नाही कीं वकीलानें कोठें राहावे ? लाड बाहादुर यांचे पांचवें दफेत लिों आहे कीं हरयेक सरकारचा वकील दुसऱ्या सरकारचे फौजेंत राहून चित्तांतील खुलास व अहवाल जाहीर व्हावा. या करितां परवानगी असावी. तेव्हां हा मजमुन लाड बाहादुर यांचा चांगला जाहीर आहे.

---

१ संबंध, २ आधार; मूळ, पाया.

१ या मसविद्याचे पांचवे दफेंत अधिक लिहों आहे कीं घोड्याचे खरीदीची पुमारी पाहिजे. व शिपाई मनुष्याचे निगादास्तीचा शब्द कम केला. त्यास दिलावरजंग बाहादुर यांचा ईजहार आहे कीं घोडयाचें मेज व अमुक वर्षाचें प्रमाण या प्राा मिळाल्यास कंपणीचे सरकारांत पसंद. त्यास अशा तन्हेचीं घोडीं पसंदीचीं या मुलकांत कम. या बमग, पुमारीचे कैदेचे काय जरूर ? व सिपाई लोकांचे निगादाष्तीचा मार बाहाल ठेवणें, यांत तिन्हीं सरकारचा फायदा आहे यास्तव हा मजमुन बहरगीज मनकुफ करूं नये.

१ या मसविद्याचे तिसरे दफेंत असें समजण्यांत येतें कीं षरीकांतुन हरयेक शरीकासीं टिपुनें येक वेळ खलल करावी. अशी परत्रानगी यांत होती कीं पहिल्यानें येकासीं खलेल करिल, ते समई त्या शरीकाचे पुर्ते काम जालें तरी त्याचा बदाला जरूर नाहीं ? बलकीं फक्त नसियेंत त्यास केली जाइल कीं असें दुसरेयानें न करी; अगर दुसऱ्यानें करील तर चांगलें नाहीं. तेव्हां टिपुचे खलेल करण्याचे बदेल्याची आपसांत शरीकामधें आहदनाम्याचे जामीनीची बुनीयाद राहात नाहीं. यास्तव लाड बाहादुर यांनीं इबारत लिहिली ती फायद्याची हें जाहीर आहे. याज करितां तेंच बाहाल ठेवणें नकें व चांगलें.

१ सातवी दफा या मसविद्याची अशी लिहिली आहे कीं सांप्रत मोहिमेचा नक्षा करार पावला आहे. या प्राा हे अगर मोहीम करणें पडली आणि टिपुकडून मुलुख व किले जे कांही हातास येतील ते तीन हिसे बराबर करून द्यावे. कारण कीं हा तहनामा अहदनामा जामिनीचा आहे अहदनामा मोहिमेचा व चालण्याचा नाहीं. तिन्हीं सरकार येक आहेत. हर येकाची वाटणी बराबर होईल. तेव्हां यार्थाचा समय मोहीम जाल्यानंतर आहे अगर खामखां लिहिणें मंजुर असल्या (स) या ईबारतीनें लिहावें कीं वांटणी मुलुक वकीलें वगैरे टिपुचे सुलहामधें हातास येईल तो हरयक सरकारचे सरहादेच्या नासिब पहिल्यानें टिपुवर मोहीम जाली त्या प्राा वांटणीं अमलांत मुआणावी.

१ अंदाज. २ केव्हांही. ३ पंद, तहकुब. ४ परंतु. ५ ताकीद. ६ दुरुस्त, अडथळा. ७ भाषा. ८ अवश्य.

१ आठवे दफेंत येकदोन पलटणें इंग्रजाचे सरकारांतुन दरखास्त करून लिहिलें. त्यास हा जाबसाल कंपणी इंग्रज यांचे सरकारासी तालुक आहे, आह्मांसी इलाक नाहीं.

१ या मसविद्याचे न (व) वे दफेंत लिहिलें आहे कीं टिपु कडुन जो मुलुक सुटेल त्यांत ब्राह्मण व फकीर व दरगाहा जे कांहीं ज्यारी असेल त्या प्रा तिघांनीं ज्यारी ठेवावें. त्यास ह्या मजकुराच्या शर्ता तहनाम्यासी तालुक काय ? हरयेक सरकारांनीं खैरात देण्याविषई आपले घरचे मुखत्यार आहेत.

१ या मसविद्याचे दाहावे दफेंत मजमुन आहे कीं राव पंत प्रधान यांचे सरकारची पेषकश टिपु कडुन येणें ह्मणोन लिों आहे. त्यास हे दफा कफालेतीचे अहदनाम्यांतील नाहीं. बलकी, मोहिमेचे अहदनाम्यांतील आहे. त्यास अहद नाम्यांत लिहिणें मंजुर आहे. तरी आमचे सरकारची पेषकश कदीम पासोन सनदाचे रुईनें वाजवी आहे. हेही दाखल करावी. परंतु, हे दफा केवळ या तहनाम्या विरुद्ध. या तहनाम्याची बुनियाद केवल सरंक्षणार्थः टिपुसुलतान यांचे पेषकदमीचा खलल दूर व्हावा या विषईची आहे. ती खराब होती, आणि सध्यांच मोहिम करणें लाजमें होतें. यास्तव हे दफा काहाडणें जरूर फार जरूर.

१ अकरावे दफेंत दारुगोळा व बंदुखा व तोफा वगैरे सामान जंगी अगर सरकारांत मतलुब जाल्यास कंपणीचे सरकारांतुन बेपारी यांज पासोन बिला महसूल खरीदी करण्याची परवानगी असावी. त्यास दिलावरजंग बाहदूर यांचा इजहार येसी आहे कीं, जंगी सामान विकावयाचें कंपणींचे सरकारांत मामुल नाहीं. तमाम बेपारी यांस मनाई आहे कीं कांहीं समान जंगी न विकावें गौरनर जनरल या विषई हुकुम सर्वास देऊं सकत नाहींत. व आमचे सरकारांत हा सरंजाम घेण्याची बिलकुल जरूर नाहीं. अगर आं शाहामत मर्तबात यांस जरूर असल्यास मिस्तर मालिट बाहादुर यांसीं दिलावर जंग बाहादुर यांनी जाहिर केल्याचें मरातब पडताळून पहावें जियादा अेयां (ज्या) मबकाम बाद

१ संबध २ जामीन ३ जुवे ४ प्रमाणे ५ वाजवी ६ जाहीरनामा.

(ज्यास्त काय ? आपला काल सुखांत जावो.) रा छ २२ राखर अर्बा तिसैन मया व अलफ.

श्री.

कार्तिक बा ९ शके १७१५. बुधवार ता० २७ दिसेबंर १७९३.

विनंती विज्ञापना. नवाबांनीं सरकारांत पारसी पत्र लिहिलें. त्याचे हिंदवी तरजुम्यांत कांहीं शब्द संग्रहार्थाचे आहेत, त्याचा खुलासा अर्थ ध्यानांत येण्याकारितां विनंती कीं:—

१ **"या मसाविद्यांत"** असा शब्द जागा जागा आहे. त्यास सरकारांतुन दाफातीचा मसविदा ठरून मालिटाकडून यांजकडे आला. तो मसविदा लाडाकडून साता दफेची याद आली, त्यासी यांनीं मुकाबिला करून कमज्याद निवडून काढिलें, त्याचा दाखला पुरण्याकारितां **या** मसविद्यांत एसा शब्द आलें **" हामसविदा "** ह्मणजे सरकारांतून ठरला तो.

१ " वंश परंपरा " याचे पुढें **" कायम मकाम येक दुसऱ्याचे "** हा शब्द आहे. याचा अर्थ असा कीं, येंक अधिकारी तगीर होऊन त्याचे कामावर दुसरा होणें, त्यास **कायम मकाम** असें ह्मणावें. यांस दृष्टांत जसे लाड बहादुर जाऊन त्यांचे स्थलीं मिस्तर ज्यान षोर नवा जनराल आला या प्रमाणें.

१ "पलटणें इंग्रजांची सरकारांत दरखास्तीचें कलम" याजगीं "हा जाबसाल इंग्रजासीं तालुक. अम्हांसी इलाका नाहीं." ऐसें यांनी लिहिलें. यांचें तात्पर्य कीं, हा तहनामा तीन सरकारासीं; व तिन्हीं सरकारांतुन परस्परें देणें घेणें तेव्हा तीन सरकारास समान तसें कलम तहनाम्यांत असावें. पलटणाचे दरखास्तीचा प्रकार इंग्रजासीं. त्या अर्थी फक्त इंग्रजासींच तहनामा असता तर हें कलम नीट. तीन सरकारां मिळोन तहनामा होणें, यांत् याचें प्रयोजन नाहीं. असा यांचे लिहिण्याचा खुलासा. रा छ २२ माहे राखर हे विज्ञापना.

श्री

कार्तिक बा ९ शके १७१५. बुधवार ता० २७ दिसेबंर १७९३.

विनंती विज्ञापना. लाड बाहादुर व मिस्तर सरज्यान षोर यांची दोन तीन

पत्रें नवाबास पैल्या आल्या. त्या मिस्तर किनवी दिलावरजंग यांनीं नवाबास आह्मीं जवळ असतां गुजराणिल्या. पत्रें खोलून वाचून पाहिलीं. लाड बाहादुर यांचे पत्रांत माारकीं, " मी कलकत्याहून जाहाजांत स्वार होऊन विलायेतीकडे गेलो. त्या मजवर आपली ममता व दोस्ती येखलास होती, त्याच बमोजीब दोस्तीचा सिलसिला मिस्तर सर ज्यान षोर गौरनर माझे जागीं आहेत, त्यांसी असावा. " व ज्यान षोर याचे पत्रांतील माार कीं " लाड बाहादुर कलकत्याहून निघोन जाहाजांत बसोन विलायेती कडे (गेले?) गौरनरीचे अधिकारावर मी आहे. लाड बाहादुर यांसी दोस्ती व येगानगत आपली त्याहून ज्यादा तरकी असावी" याप्रों दोघांकडील पत्रातील माार. राछ २२ राखर हे विज्ञापना.

श्री.

कार्तिक वा ९ शके १७१५. बुधवार ता० २७ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. टिपुसुलतान यांस दौलांनीं आपलें तरफेनें पत्र तयार केलें, त्याचा मसविदा नवाबास मी समीप असतां वाचून दाखविला. त्यांत माारकीं, " तिसरे किस्तीचा यैवज तुह्मीं कडप्यास पाठविला, तो घेऊन अ, ह्माकडील फलाणा शक्ष कडप्यांत होता. त्याजपासीं रसीद यैवजाची आह्मीं पाठविली, ते त्यानें दिल्ही. आपल्यापासी येऊन पोहोंचलें. दुसरे बल्हारी, उमरगोड, तलालकोटा व सिंगणमला वगैरे तालुक्यांतील कितेक गांव आपले तशरुफांत आहेत, ते इकडील अमीलाकडे वागुजास्त कराव्याची ताकीद आपलें तालुकदारास निक्षुन यावीं कीं, हरगीज खलाल न राहे. या अन्वयें पत्राचा माा नबाबांनीं पाहून बेहतर आहे यैसे सांगितलें. रा छ. २२ माहे रावर हे विज्ञापना.

श्री.

कार्तिक वा. ९ बुधवार शके १७१५. ता० २७ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. अजिमुदौला प्रकर्णी नवाबांनीं सरकारांत पत्रें पेशज रवाना केलीं. त्या अन्वयें राव सिंदे यांसही पत्रें पाठविलीं. त्याचा जबाब

खरीता पत्र सिदें यांजकडून आलें ते दौलांनीं नवाबास वाचून दाखविलें. मी समीप होतों. पत्रांत मारकीं "आजिमुदौला जेथ पावेतों गेला असेल त्याची तहकीक करून हस्तगत करावा. त्यास, आजिमुदौला कोणते मार्गे गेल्याचें अद्याप समजलें नाहीं. ज्याबज्या तालुकदारास ताकिदी पाठविल्या आहेत, कीं जेथें सांपडेल तेथें अटकाऊन पाठऊन द्यावा. या बमोजीब पत्रें सर्वांस रवाना केलीं आहेत." या प्रा मार. राजश्री कल्याणराव व बाबाराव यांच्याही अर्ज्या आल्या, त्या हरराव यांनीं गुजराणिल्या. बाबाराव यांनीं लिहिले आहे कीं 'पुणियास पोंहचुन राव सिदें याची भेट जालीं. या प्रा लिहिलें.' रा छ २१ माहे राखर हे विज्ञापना.

श्री.

कार्तिक वा ९ बुधवार शके १७१५. ता० २७ दिसेबंर १७९३.

विनंती विज्ञापना. अजिमुदौला यांजकडील नरसिंगराव व खानसामा वगैरे लोक सांपडले ते यै (औ,) रंगाबादेहुन चिमणा राजे यांनीं येथें पाठविले. त्यांस कैद करून बेदरचे किल्यांत दाखल केलें. रा छ २२ माहे राखर हे विज्ञापना.

श्री.

कार्तिक वा ९ बुधवार शके १७१५. ता० २७ दिसेबंर १७९३.

विनंती विज्ञापना. नवाबास राव सिदें याजकडून घोडे अरबी दोन व काठेवाडी दोन (व) येकुण च्यार; व गुलकंद व गुलाब वगैरे जिनस आला. या समंधे बाबाराव यांची अर्जीसहित हरराव यांनीं छ २० राखरीं दौलाचे विचारें गुजराणिले. राछ २२ राखर हे विज्ञापना. सिंद्यांनीं पाठविली किंवा कल्याणराव यांनीं विकत घेऊन पाठविली याचा संशय आहे. शोध करून लिहितो. हे विज्ञापना.

श्री.

कार्तिक वा ९ बुधवार शके १७१५ ता० २७ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. शंकरराव भोंग याचा पता लावित भारामल हैशा

पात्रेतों गेले उमरखेडकर कमाविसदाराचे दोन कारकुन भारामला सभागमें आहेत. त्यांस ही निकड कीं शकंराव याचा पत्ता लाऊन देण्याचा जिमा तुमचा. त्या प्रा पता लाऊन देणें. त्यावरून शोध लावितां शंकरराव याची बायको व जवाहिराचे डबे दोन व सनगे पोषागियाचे पेटारे सांपडले. डबे व पेटारे भारामल यानीं दौलांकडे पाठविलें. सदरहु अन्वयें माराही भारामल यांनीं दौलास लिहिला. शंकरराव अद्याप सांपडला नाहीं. पुढें होईल त्या प्रा विनंती लिहीन. शंकर नाईक नागपुरास गेला याजकरितां भोंसल्यांस पत्रें जावीं, आणि त्यांजकडील कारभारी पुणियांत आहेत त्यांस ताकीद व्हावी ये विषई पेशजी नवाबाचे आज्ञे प्रमाणें दौलानीं सांगितलें त्याची विनंती पूर्वी लिहिली, त्याविसीं आज्ञा जालीच असेल. राछ २१ माहे राखर हे विज्ञापना.

श्री.

कार्तिक बा ९ शके १७१५. बुधवार ता० २७ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. कामठाणें येथें शिकारगाहाकरितां जाण्याची तयारी नवाबांनीं केली. जागा पाहाण्या करितां दौला छ १९ राखरी गेले होते. मैदान धरून वाढा मोठा दिला. कमठाण्यांत लोकाचीं घरें होतीं तीं तमाम खाली करविली. दोन तीन हवेल्याही आहेत. त्या येक नवाबाकडे; येक दौलानीं आपल्यास, योजून ठेविल्या. कामाठी, बेलदार, मजुरदार लाऊन जाग्याची मरमत करविली. जागीरदार, मनसबदार, मुतसदी सरदार सर्वास ताकीद कीं कोणीं बेदरांत न राहातां आपलाले संरजामसुधां कमठाण्यावर येऊन राहावें, झडे नेऊन उभे करविले. नवाबाचे खैम व चोबी बंगला जाऊन उभा राहिला. बरकडही लोकांचे डेरे, राहोट्या, पाले संरजाम कमठाण्यास गेला. वरचेवर जात आहे. वाडयाचे रखवालीस गाडद मुसारेहमु, व सैदउमरखां व अबदुलकरीम कुमदान वगैरेस हुकुम पोहचला. चराईस आसपास हाथी व उंट व बैल होते ते आणविले. काहीं आले व येतात. सरदार जागीरदारासही हुकुम असाच कीं आपलाले स्वार जेथें असतील तेथुन आणून जमा करावे. स्वार

गाड्याची मोजदादही कमठाण्यावर पाहावयाचा बेत आहे. याउपरी नबाब निघोन डेरे दाखल होणार. याची तपसीलें विनंती लिहिण्यात येईल. रा छ. २२ राखर हे विज्ञापना.

श्री.

कार्तिक वा ९ शके १७१५. बुधवार ता० २७ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. नबाबाची शारिरप्रकृती हैदराबादेंत होती त्याहून बेदरास आल्यानंतर कृशत्व अधिक. आलीकडे तर बहुतच क्षीण शरीर आहे. नाकुवत, त्यांतून पांच सात दिवसां पासोन दस्तही दोन तीन होतात. या प्रा प्रकृतीचा अहवाल आहे. रा छ. २२ रा खर हे विज्ञापना.

श्री.

कार्तिक वा ९ बुधवार शके १७१५ ता० २७ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. ईसामियांकडील पहिलें तालुके ताडपत्री, ततबारी, सिंगणमला, येलानुर हे च्यार तगीर करून दिलावरुदौला गंजीकोट्याचा किलेदार याजकडे सांगितलें. ईसामियां यांस हैदराबादचे सुभ्याचे तालुके नलगुंडा, देवरकुंडा व कोलीपाला वगैरे भवनगिरि सरकारसुद्धां सांगोन ईसामियां यांची रवानगी केली. छ. १९ राखरीं ईसामियां गेले. ईसामियां यांनीं टिपुस व कमरुद्दीखानास पत्रें लिहिलीं होतीं त्याचे जबाब सांपडले. दौलांनीं आह्मांस दाखविलें. याचा तपसील व पत्राच्या नकला पेशजी सेंवेसीं पाठविल्या. त्यास ईसामियां यांचें बोलणें दौलांसीं कीं " हीं पत्रें खोटीं; याची तहकीक करावी. " दौलानीं तहकीक करितां पत्रें खरीं नाहींत. ईसामियांचा पहिला कारकुन व्यंकटराव बरतरफ केला. त्यानें अदावतीनें दरम्यान तुफान रचून पत्रें तयार केलीं. हीं खोटीं यैसें दौलांस समजलें. रा छ. २२ राखर हे विज्ञापना.

श्री.

विनंती विज्ञापना. यैसीजे. येथील वर्तमान ता छ. १९ माहे राखर

बुधवार पावेतों अखबार पत्रीं लेखन करून सेवेसीं पत्राची रवानगी केली, त्यावरून ध्यानास आलें असेल. सांप्रत येथील वर्तमान छ मारी दौला कमठाण्यास जाऊन जागा पाहिली. तेथील लोकांचीं घरें खालीं करून मरामतीस बेलदार व कामाठी लाविले. येते समईं पांच हरणांची शिकार करून तीन प्रहराचे अमलांत किले बेदरास आले. नबाबास तीन दस्त जाले. रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. छ. १६ रोज गुरुवारीं तमाम सरदार व मनसबदार मुतसदी यांजकडे चोपदार पाठऊन ताकीद केली कीं, 'कमठाण्यास आपलाले डेरे दांडे पाठऊन मिसलबंदीनें उतरणें.' प्रातःकालापासोन दोन प्रहर पर्यंत नवाबास पांच दस्त जाले. चराईहुन पंचवीस हाथी व शंभर उंटें आले. दिवसां दरबार नाहीं. रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. छ १७ रोज शुक्रवारीं हैदराबादेहुन अलीज्याह-बाहादुर-साहेबजादे यांची अर्जी व नजर व मिठाई आली ती गुजरली. महमदपन्हा दारोगा हरकाऱ्याचा यास हुकुम जाला कीं 'कमठाण्यास जाऊन सरकारी व तमाम सरदार म (न) सबदाराचे झेंडे उभे करणें.' त्या प्रा झेंडे घेऊन तो गेला. येक प्रहर दिवसां खिलवतीमध्यें नवाब बरामद जाले. सरबुलंदजंग व अजमखां व यकरामुदौला वगैरे इसमांचा सलाम जाला. येक प्रहर दोन घटिकेस बरखास जाले. रात्रीं जनान्याचा बंदोबस्त होऊन कंचन्यांचा नाच होता.छ१८रोज मंदवारीं मुसारेहमुकडील गाडद हजार आली. याचा अर्ज जाला. दिवसां दरबार नाहीं. रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. छ १९ रोज रविवारीं फरेदुज्याह साहेबजादे यांनीं आपली सालगिरे जाल्याची नजर केली. मीर पोलादअली व सुभानअली यांची याद केल्या प्रा ते हजर जाले. त्यांस जनान्यांत बोलाऊन घेतलें. शुतरखाना शंभर उंट व च्यारसे बैल रथगाड्याचे आले.दिवसां दरबार जाला नाहीं.दोन घटिकादिवस शेष असतां चराईहून पंचवीस हाथी आले. छ २० रोज सोमवारी दौलांकडे हुकुम गेला कीं रावजीस व मिस्तर किनवीस घेऊन येणें. साहा घटिका प्रथम दिवसां खिलवतीमधें नवाब बरामद जाले. दौला व मीरआलाम व सरबुलंदजंग व घासीमियां व

अजमखान वगैरे मामुली इसमांचा सलाम जाला. रावजीची याद केल्याप्रा। ते आले. त्यांचाही सलाम जाला. दौला व रावजी व मीरआलम तिघांसीं खिलवत जाली. त्यानंतर मिस्तर किनवी व इष्टवट लपटन इंग्रजाकडील वकील आले. त्यासुधां बोलणें होऊन यक प्रहर च्यार घटिकेस किनवीस वाटे लाविलें.त्या नंतर यक घटिका निर्वस्त होऊन येक प्रहर पांच घटिकेस बरखास जालें. रा॥ छ १२ राखर हे विज्ञापना.

छ २१ गुरुवारीं टपा रवाना पुण्यास. 292

श्री.

श्रीमंत राजश्री ———— रावसाहेब स्वामीचे

सेवसीं ————

विनंती सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सा॥ नमस्कार विनंती विज्ञापना ता॥ २३ माहे राखर बेदर येथें स्वामीचें कृपावलोकानेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान पेशजी छ २२ माहे मजकुरीं लेखन करुन पत्राची रवानगी सेवेसीं केली त्यावरुनें ध्यानांत आलें असेल. सांप्रत येथील वर्तमान छ मजकुरीं रोज गुरुवारीं प्रथम दोन घटिका दिवस आल्यानंतर नवाब जर्द अंबारींत स्वार जाले. खवासींत दौला व मीरआलम होते. वरकड साहेब जादे ज्यांस समागमें यावयाची आज्ञा जाली ते व आणिक अमीर उमराव तयार होऊन आले. व जनान्याचा रथ व गाडया व अंबाऱ्या वगैरे सरंजाम सिद्ध जाला. या समुदायानसीं कसबे कमठाणें पा॥ मजकुर बेदरापासोन तीन कोसांचे फासल्यानें आहे, तेथें शिकारीचें मकान करार केलें आहे. स्वार होऊन गेले. कमठाणें याचे उत्तर व पुर्वभागीं गारद्याचा बाडा शिकारचे मैदान मध्यें सात कोस घेऊन बंदोबस्त करविला. याजमुळें बेदराहून लोकांस जाण्यास येका मार्गे नबाबाचे डेऱ्यास पांच कोस व पश्चमेकडून व पूर्वेकडोन जाण्यास बारा कोस, याजकरितां सर्वलोक, सर-

१ बसून

दार, मुतसदी आदिकरून समागमें गेले ते किल्याचे दरवाज्यावर परवानगी आंत जाण्यास नाहीं. दौला यांचे सांगण्यांत कीं नबाब कमठाण्यास वीस दिवस राहणार. आणि सरंजाम महिन्याचा तेथें करविला आहे. मग पाहावें- वीस दिवस राहतात किंवा महिना राहतात, नबाबाची प्रकृति या दिवसांत काहींसी बेआरामची दिसण्यांत आली. परंतु जाहेरदारींत दाखविण्यात कटाक्ष दाखऊन आहेत. बेदरची हवा तो कोणासच मानत नाहीं. कमठाणें येथील हावा कसी आहे हें आतां पुढें समजेल त्या प्रो विनंती लिहिण्यांत येईल रा. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

छ. ४ जमादिलावलीं पत्राची रवानगी डांकेवर.

श्री.

मार्गशीर्ष शु. ५ रविवार शके १७१५. ता०८ दिसेंबर स १७९३.

श्रीमंत रावसाहेब यांस मामुली प्रों हवाल्याचें पत्र*.... पृष्ठ टीप पाहा.

श्री.

कार्तीक शु. ५ रविवार शके १७१५. ता. ८ दिसेंबर स. २७९३

विनंती विज्ञापना. यैसीजे. कमठाण्यास शिकारगाहाकारिता नबाब बेदराहून निघोन डेरे दाखल छ. २३ माहे राखरीं जालें. बाडा बारा कोसाचा भारी बसला. नित्य प्रातःकालीं नी नबाबांनीं स्वार होऊन शिकारीस पांच सात कोस, केव्हां जनान्याचे बंदोबस्तानसीं, कोण्हे दिवसीं मर्दान्याची शिकार या प्रो रोज होत आहे. बाड्या बाहेरही कितेक लोक शिकारीस हुकुमा प्रो जाऊन शिकार करून गुजराणितात. या प्रों शिकारीचा तुर्त हररोज ज्यारी आहे. रा छ. ४ जमादिलावल हे विज्ञापना.

श्री

मार्गशीर्ष शु. ५ रविवार शके १७१५. ता० ८दिसेंबर स १७९३.

मिनंती विज्ञापना- मोलेंगांव प्रा वरवाल येथील. यात्रा सालाबादी चंपाषष्ठीपासोन सुरु होती. चहूंकडून घोडीं, तटें, उंट वगैरे जनावरें विकरीस

येतात. त्यास सालमजकुरीं नबाबाचे सरकारांतुन असदआलिखान यांस प. न्नास हाजाराचीं घोडीं व पागेंकडे चालीस हाजारांचीं खरीदी करण्याचा हुकुम जाला. असदअलीखान घोडीं खोस रवाना होणार. रा छ. ४ जाावल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष शु. ५ रविवार शके १७१५. ता० ८ दिसेंबर स १७९३.

विनंती विज्ञापना. चेनापटणांहून व्यंकटरामदिला याजकडोन अखबार आली ते पाठविली आहे. रा गोविंदराव भगवंत सेवेसीं प्रविष्ट करतील. अवलोकनें मजकूर ध्यानांत येईल. उत्तरें खोंन व्हावयास आज्ञा जाली पाहिजे' रा छ. ४ जाावल हे विज्ञापना.

श्री

कार्तीक शु. ५ रविवार शके १७१५. ता. ८ दिसेंबर स. १७९३.

विज्ञापना यैसीजे. येथील वर्तमान ता। २० माहे राखर सोमवार पावेतो अखबार पत्रीं लेखन करुन सेवेसीं पत्राची रवानगी केली, त्यावरुन ध्यानास आलें असेल. तदनंतर येथील वर्तमान छ मजकुरीं रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. छ २१ रोज मंगळवारीं प्रथम च्यार घटिकां दिवसां ख्वाबगाहामधें नवाब बरामद जाले. सैद उमरखान व अबदुल करीम व महमदषाबान यांचा सलाम जाला. लालन हज्यामाची याद केली. तो हाजर जाला. हाज्यामत होऊन येक प्रहर च्यार घटिकेस बरखास्त जाले. छ २१ रोज मंगळवार भारामल यांची अर्जी व शंकरराव भोंग यांचे दोन डबे जवाहिराचे व पोषागी सणगें वगैरे सरंजाम आला, तो गुजरला. रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. छ २२ रोज बुधवारीं दिवसां दरबार जाला नाही; रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. छ २३ रोज गुरुवारीं सवारीचा हुकुम होऊन लवाजमा हजर जाला. दोन घटिका प्रथम दिवशीं खिलवतीमध्यें नवाब बरामद जाले. दौला व सरबुलंद जंग व घांसीमियां व अजमखान व रायेराम व मुनशी व मीरआलम व

रावरंभा वगैरे मामुल इसमांचा सलाम जाला. हाथीवर जर्द अंबारीमध्यें नवाब सवार जाले. दोला मीर अलम उभयेतां खवासीमध्यें होते. किल्याबाहेर स्वारी आल्यानंतर फौज व गारद यांचा सलाम जाला. येक प्रहर तीन घटिका दिवसां कमठाणें येथें स्वारी डेऱ्यास दाखल जाली.सर्वांच्या नजरा होऊन बरखास्त जालें. चार घटिका दिवस शेष राहिला असतां बंगल्यामध्यें नबाब बरामद जाले. मामुली लोकांचा सलाम जाला. दुरबीण लाऊन चहुकडील बाडयाचें राण पाहिलें, मगर हेच समई बरखास्त जालें. रात्रीं खैर सला. छ २४ रोज शुक्रवारीं सवासे रथ व घ्यार हाथी गदीचे वगैरे स्वारीचा लवाजमा प्रातःकालीं हाजर जाला. दोन घटिका दिवसां नबाब स्वार होऊन जनान्यासहित शिकारीस गेले. शिकार करून येक प्रहर पांच घटिकेस डेऱ्यास आले. आंबराईमध्यें डेरे देण्याचा हुकुम फरासखाण्याचे दारोग्यास जाला. रात्रीं रोषनींनें नवाब दौलाचेथे आले. त्याची व साहेबजादेची नजर जाली. घ्यार घटिकेस आपलें मकानास आले. छ. २९ रोज मंदवारीं तीन घटिका दिवसां नबाब स्वार होऊन शिकारीस गेले. दौला समागमें होते. पांच पारिंदांची शिकार करून आंबराईतून आले. दौला शिकारीस पुढें गेलें. त्यांस येक हारण फांशांत सांपडलें तें त्यांनीं गुजराणलें. बाड्यांत तीन माणसें सांपडलीं, त्याचे हात तोडावयाचा हुकुम जाला. आंबराईत भोजन दौलांसहित जालें. येक प्रहर घ्यार घटिकेस मकानास आले. रात्रीं साहा घटिकेस नबाब बरामद जाले. पागावाले वगैरे मामुली लोकांचा सलाम जाला. जासुदाचे दारोग्यास हुकुम जालाजे वाडया आंत कोण्ही माणु (स) न ये येसा बंदोबस्त करजें. छ. २६ रोज रविवारीं दोन घटिका प्रथम दिवसां नबाब जनान्यासहित स्वार होऊन शिकारीस गेले. दौला स्वार होऊन मैलाराकडे गेले. अर्ज जाला. नवाबांनीं पांच पारिंदाचीं शिकार करून अंबराईत आले. तेथें भोजन जालें. दोन खाने खाना दौलाकडे मैलारास पाठविला. दौलांनीं चिते सोडोन

---

१ पक्षी.

दोन हारणाची शिकार करून पा, ते गुजरली. दोन प्रहर पांच घटिकेस नवाब डेऱ्यास आलें. दौला मैलाराहुन आले, त्यांचा अर्ज जाला. रात्रीं खैर सला. छ २७ रोज सोमवारीं दोन घटिकां दिवसां नवाब जनान्यासहित स्वार होऊन शिकारीस गेले. येक प्रहर च्यार घटिकेस माघारे आले. रात्रीं खैर सला. छ २८ रोज मंगळवारीं प्रातःकाळीं दौला स्वार होऊन शिकारीस पुढें गेले. तीन घटिकेस नवाब गदीचे हाथीवर स्वार जाले. शिकारीस गेले. पागावाले यांणी येक हारणाची शिकार केली. दौलांनीं च्यार हारणांची शिकार करुन गुजराणली. असदअलीखानानीं पारिंदाची शिकार केली. नवाबाची अंगठी गमावली, ते खिजमतगारास सांपडली त्यानें आणुन दिल्ही. त्यास इनाम दिल्हा. येक प्रहर पांच घटिकेस डेऱ्यास आले. दौलांस व पागावाले यांस हुकुम जाला जे बाडयाबाहेर शिकारीस जात जावे. रात्रीं खैर सला. छ २९ रोज बुधवारीं दोन घटिका दिवसां नवाब जनान्यासहित स्वार होऊन शिकारीस गेले. दौला व असदलीखान व रावरंभा शिकारीस परभारां गेलें. पागवाले अलाहिदा गेले. नवाबांनीं दोन हारणांची शिकार केली. दिलदारखानानें पांच हारणांची शिकार करुन गुजराणली. दौलांनी येक हरण धरलें. दोन प्रहराचे अमलांत नवाब डेऱ्यास आले. हैदराबादेहून नव तोफा दाहा दाहा सेर गोळ्यांच्या आल्या व वीस शेर गोळ्याच्या तोफा ४. च्यार पेटारे बारूत गोळ्याचे. सदरहु सरंजाम बेदरचे किल्यांत दाखल जाला. छ माहे जावल गुरुवारीं प्रातःकाली जनान्यासहित नबाव स्वार होऊन शिकारीस गेले. दौला व पागावाले व सलाबतखान बाडाबाहेर शिकारीस गेले. नवाबांनीं तीन हरणांची सिकार करुन डबापुरास गेले. तेथील उंसांचे गुऱ्हाळ तायार जालें. जनान्यासुधां उसाचा रस घेतला. भोजन जालें. दोन प्रहरास डेऱ्यास आले. रात्रीं खैर सला. रा छ ४ जेमादिलावल हे विज्ञापना.

श्री

मार्गशीर्ष शुा ५ रवीवार शके १७१५ ता. ८ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. दौला शिकारीकारितां श्रीक्षेत्र प्रभेर या राणांत छ २६

शाखरीं गेले. शिकार करुन नंतर क्षेत्रानजीक श्रीचें देवालयानजीक आंबराई आहे तेथें बसले. गांवातील ब्राह्मणांची घरें वगैरे जागा पाहाण्यास कोन्हा कोन्हास पाठऊन शोध करविला. पुढे चंपांशष्टी यात्रेचे दिवस. हाजरत येथें खान लाअपंजा होणार ह्मणोन बोलोन करोडगिरीकडील मुतसदी व पंचोत्र्य वाले कारकुन यांस बोलाऊन सांगितलें कीं ' लश्कर क्षत्रा समीप. याजकारितां बेपारी उदमे येण्यास व पंचोत्र्याचे दहशती मुळें व गाफिली करतील. त्यांस दिलासाचें कौल ज्याबज्या पाठऊन मामुल प्रो यात्रा करवणें ' व त्यावरुन करोडे यांणीं हुमणाबाद कलबर्गे व सुळेपेठ वगैरचे बेपारी यांस कौल पाा कीं तुह्मीं खातरजमेनें बवसवास माल घेऊन यात्रेस येऊन खरीदीफरोख्ती करणें. या प्रो तेथें येक प्रहर बसोन कारभार केला. पोहरत आम जाली कीं ब्रह्मणांचीं घरें खाली करवितात. नवाब येथें येणार. त्याजवरुन क्षेत्रींचे ब्राह्मण समस्त भयेभीत होऊन अह्मांकडे आले आणि वर्तमान सांगितलें कीं "हे क्षेत्र प्राचीन यास कधींही उपद्रव जाला नाहीं. तो आतां होणार. आह्मां ब्राह्मणांचे वाली श्रीमंत किंवा प्रसंगीं तुह्मी अहांत. हें अरीष्ट निवारण होय तें करावें " ह्मणोन बहुत घाबरे जाले. त्यावरुन दौलांकडे सांगुन पाा कीं "हें क्षत्र देवाब्राह्मणाचें येथें मागें उपद्रव जाला नाहीं, आणि पुढेंही होऊं नये. ब्राह्मणांनीं वर्षाचा धान्य संग्रह संसारकृत्याचा व सांप्रत यात्रेमुळें येजमान येणार याजविसीं आधिक संग्रह करून ठेविला आहे. व घरोघर बालातनी व दुखनाइत मुलें लेंकरें. यास या हिंवाळ्या दिवसांत कोठें घेउन जावें? कदाचित नवाबांची मर्जीच जाण्याविशीं असल्यास, यात्रेचा तमाषा पाहाणें तरी गांबा पासोन फासल्यानें डेरे उभे करून येक दोन राहिल्यास चिंता नाहीं. परंतु ब्राह्मणांस उपद्रव करून घरें खालीं करवणें हें चांगलें नाहीं " याप्रों सांगुन पाठविल्यावरुन दौलांनीं उत्तर पाा कीं आह्मीं क्षत्रास जाऊन जागा पाहुन आलों. त्या प्रों हाजरतीस अर्ज केला. परंतु अद्याप निश्चय नवता. हाल तुमचे लिहिल्यावरुन अर्जही करितों. बहुत करून ते जागा नाप-

१ सडे २ आधासन.

संत होईल. तथापी मागती इरादा केला तरी पुन्हां अर्ज करितों. तुह्मीं ब्राह्मणाची खातरजमाकरून क्षेत्रास वाटे लाऊन द्यावें. या प्रों उत्तर दौलांकडील आल्यानंतर सर्वत्र ब्राह्मणांची खातरजमा करून क्षेत्रास पाा. रााछ ४ माहे जाा दिवल हे विज्ञापना.

छ ११ जाावलीं डांकेवर

श्री

मार्गशीर्ष शुा १३ रविवार शके १७१५ ता. १५ दिसेंबर १७९३.

श्रीमंत रावसाहेब यांस मामुली हवाल्याचें पत्र-

श्री

विनंती विज्ञापना छ ६ जाावल मंगळवारीं नवाब शिकारीस निघाले. दौला व घांसीमियां व सलाबतखां समागमें होते. गदीचे हाथीवर नवाब पिछाडीस मनु छत्री धरून होता. दौलाही दुसरे गदीचे हाथीवर होते. शिकार करुन डेऱ्यास येतांच दौलांस उलटी होऊन ज्वर शरीरीं चहडला, तो अद्भुत. केवळ बेताब बेहोष होऊन पडले. कांहीं शुद्ध राहिली नाहीं. अशी अवस्था जाली. मीरअलम व हाकीम जवळ बसोन अवषध उपाय केले. आठप्रहर पर्यंत ज्वर येक सारखा होता. त्यानंतर कांहीं शम जाला. उजवे कुशीस पाठींत वायुचा दर्द भारी. त्यानें बहुतच हैराण. तीन दिवस पर्यंत बोलणें देखील नाहीं. या प्रा फारच विकल जाले. वैद्यांनीं अर्क प्याला भरून दिला, तो बेहोषीमुळें हातांतून खाले पडला. सांप्रत कांहींसा उपशम आहे. येक शब्द निघणें तर येक घटिका अशी अवस्था आहे. मीरअलम व हाकिम नेहमीं जवळ असतात. नबाब वरचेवर तबियतीची खबर आणवितात. नबाबांनीं दौलाकरितां आपला चोबीं बंगला त्यांचे मकानीं पाठविला. दौलाची तबियत तुर्त अशी आहे. मागाहुंन ताा विनंती लिहिण्यांत येईल. रा छ. ११ जाावल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशिर्ष शुा १३ रविवार शके १७१५ ता. १५ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. कमठाण्यास नबाब, डेरे दाखल जाल्यापासोन नित्य शिकारीस जनान्यासहित बाड्याआंत प्रातःकाळीं स्वार होउन जावें. दौला व पागावाले सलाबतखान वगैरे लोकांस बाड्या बाहेर शिकारीस जाण्याची ताकीद. त्याप्रा त्यांनीं परभारां जाऊन दीड प्रहर पावणें दोन प्रहर पर्यंत जे शिकार साध्य होईल ते घेऊन डेऱ्यास यावें. याप्रा क्रम चालत आला. बाडा बारा तेरा कोसांचा येकेहली चरकपली पर्यंत बसला. रमण्यांत हरणें बहुत, यैसी खबर पहिली होती. परंतु रोज शिकारीची कस्त होत आहे यांत नित्य दोन हरणें, केंव्हां येक मोठी शिकार साधल्यास च्यार पांच हारणें पराकाष्ठा, येखादे दिवशी शिकार होतही नाही. याजकरितां नवाबाची मर्जी खफा. सार्वकाल राग. असा काहीं प्रकार तीनचार दिवसां पासोन आहे. रा छ. ११ जावल हे विज्ञापना.

श्री

मार्गशीर्ष शुा १३ रविवार शके १७१५ ता. १५ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. नवाब कमठाण्याहुन फिरोन बेदरास येणार, याप्रा वर्तमान लोकमुखें दाट आहे. बेदरचे किल्यांतील हवेलीही झाडून नीट करावयास लाविली आहे. छ ११ जावलीं अथवा छ. १५ रोजीं येणार. यैसें येक वर्तमान. दुसरें, बंजरातीरीं डेरे देऊन आठ पंधरा दिवस आणिक सैर विकार करावी हेही वार्ता आहे. परंतु, बेदरास हवेली दाखल होण्याचीच खबर गरम आहे. ठरेल त्याप्रा विनंती मागाहुन लिहिण्यात येईल. रा छ. ११ मोहे जावल हे विज्ञापना.

श्री

मार्गशीर्ष शुा १३ रविवार शके १७१५ ता. १५ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. दौलाची तबियत कसलमंद, सबब मीरअलम रात्रंदिवस त्याचे समीप असतात. मीर अलम यांनी सबाई नाईक जासुदांचा यास

बोलाऊन विच्यारिलें की येथुन कुहीर किती आहे ? तेथुन हैदराबाद किती कोस ? कुहीरास झाडी डोंगर गवत काडी लस्करचे सरबराई जोगी महिनापंधरादिवसाचे बेगमीची आहे कीं नाहीं ? नाईक यानें सागितलें कीं कमठाण्यापासोन कुहीर आठ नउ कोस आहे. तेंथुन हेदराबाद तीस कोस. कुहीर जागा पान पत्री लांकुड फांटे चारा पुष्कळ अवा (द). हवाही चांगली आहे. याजवर मीर अलम यानें कलबर्ग्याचा रस्ता विच्यारला. नाइकानें सांगितला. त्याच्या फर्दा येक कुहीरची व येक कलबर्ग्याचे रस्त्याची व बंजरा तीरची जागा या प्रा तीन फर्दा तयार करुन मीरअलम यांनीं समागमें घेतल्या. दौलासी मीरअलम यांचें बोलणें जालें. यांतुन कांणतें ठरलें हें समजण्यांत आलें नाहीं. ठरेल त्याची विनंती मागाहुन लिहिण्यांत येईल. रा छ. ११ माहे जावल हे विज्ञापना.

श्री

मार्गशीर्ष शुा १३ रविवार शके १७१५ ता. १५ दिसेंबर १७९३.

विज्ञापना यैसीजे. येथील वर्तमान ता छ १ माहे जावल गुरुवार पावेतों अखबार पत्रीं लेखन करून सेवेसीं पत्राची रवानगी केली, त्यावरून ध्यानास आलें असेल. तदनंतर येथील वर्तमान. छ. मारीं रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. त्यांजला तलाव्यास जाण्याचा हुकुम जाला. छ. २ रोज शुक्रवारीं तीन घटिका प्रथम दिवसा दौला व असदअलीखा व घासीमियां वगैरे तलाव्यास गेले. त्यानंतर येक घटकेनें नवाब जनान्यासहित स्वार हौंऊन शिकारीस गेले. येक हरणाची शिकार केली. त्यानंतर नवाब घोडयावर स्वार जाले. असीला समागमें घेऊन बाडयाबाहेर निघोन दौला शिकारीस गेले. तेथें नवाब आले. येक डुकर पागवाल्यांकडील बारगिरांनी जखमी करून आणिला. दौलानीं पारिंदाची शिकार केली, ते गुजराणली. या प्रा तेथें होऊन नवाब बाडयाआंत आले. दोन प्रहर दोन घटिकेस डेऱ्यास पोंहचले. मागुन येक घटिकेनें दौला आंपले मकानास आले. रात्रीं तीन घटिकेस नवाब बरामद जाले. सरबुलंदंजगं घासीमियां व रायेरायां यांचा सालाम जाला. राये राया

यांच्या फर्दा पाहुन येक प्रहर तीन घटिकेस बरखास जालें. छ. ३ रोज मंद-वारीं दोन घटिका प्रथम दिवसां नवाब जनान्यासहित बाडयाआंत शिकरीस गेले. दोन हरणें फांशांत सांपडली. ते घेऊन येक प्रहर साहा घटिकेस डेऱ्यास आले. दौलांनीं बाडयाबाहेर जाऊन सात हरणांची शिकार करून पाठविली, ते गुजरली. रात्रीं खैर सला. छ. ५ रोज सोमवारीं तीन घटिका दिवसां नवाब जनान्यासुधां शिकारीस गेले. येक हरणाची शिकार करून येक प्रहर सात घटिकेस डेऱ्यास आले. दौला बाडयाबाहेर शिकार करून आले. अर्ज जाला. रात्रीं पांच घटिकेस ख्वाबगामधे नवाब बरामद जाले. सरबुलंदजंग व घासीमियां व अजमखां वगैरे इसमाचा सलाम जाला. येक प्रहराचे अमलांत बरखास जाले. छ. ६ रोज मंगळवारीं तीन घटिका प्रथम दिवसां मर्दान्यानें गादीवर नवाब हाथीवर सवार जाले. दौला व सलाबतखां व घासीमियां वगैरे चा सलाम जाला. चिऱ्यानें पांच हरणें धरलीं. पैा दौलास येक हरण व मीर अलम यांजकडे येक पाठविलें. शिकार होऊन येक प्रहर पांच घटिकेस डेऱ्यास आले. दौला आपले मकानास येतांच वमन होऊन ज्वर आला, रात्रीं खैर सला. छ. १ रोज बुधवारीं शिकार मना जाली. येक प्रहर पांच घटिका दिवसां खिलवतीमधें नवाब बरामद जाले. अर्जबेगी व सैदउमरखां वगैरे लो-कांचा सलाम जाला. दौलाची तबियत कसलमंद याची खबर आणविली. रा छ. ११ माहे जावल हे विज्ञापना.

छ. १६ जावलीं डांकेवर रवानगीं

श्रीमंत रावसाहेब यांस छ. १६ चे हावाल्याचें पत्र

श्री

मार्गशीर्ष व. ३ शुक्रवार शके १७१५ ता. २० दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. दौला छ ६ जावल मंगळवारीं शिकारीहुन आल्यापा-सोन त्यांची तबियत बेआराम. पाठींत वायुचा दर्द; आंगीं ज्वर, याचे उपशा-मनार्थ महमदमाखां हाकिम यांची दवा मीरअलमजवळ बसोन दोन तीन दि-वस हेंच जालें. दरबारची मनाई होती. छ. १० रोज शनवारीं दौलांस

कांहिंसें स्वस्थ वाटुन मर्दाना केला. रावरंभा व राज्याजी व नवाबाचे मुनशी व अर्जबेगी यांस बोलाऊन घेतलें. आह्मी कोन्हेरपंत यास पाठविलें. तेही जाऊन बसले. दौलांनीं आपले प्रकृतीचें वर्तमान सांगितलें. "शरीर भोग आहे, दोनच्यार दिवसांत स्वस्थ होईल" याप्रा बोलले. येक घटका पर्यंत सदरेहु मंडळी होती. त्यानंतर लोक आपलाले जागीं आले. दुसरे दिवसीं दौलाचा परामर्श करून यावें यास्तव प्रातःकाली आह्मी गेलों. बाहेरील कचेरींत मीरअलम व हाकीम व नबाबांचे जांवई वगैरे लोक होते. रावरंभादि आले. तेथेंच सर्व बसोन दौलाकडे आंत खबर पोंचविली. त्यास शनवारचे रात्री पासोन दौलाची प्रकृत फिरोन बिघडली. प्रातःकालीं बहुत विकल; शरीरीं ग्लानता बेहोष. नबाबांनीं सांगोन पाठविलें कीं, कचेरी व लोक मेळऊन बसों नये. येहतियात असावी. मीरअलम महंमदमाखां यां उभयतांस मात्र जाण्याची परवानगी. वरकड सर्वत्रांस मनाई. याप्रा बंदोबस्त जाला. मीरअलम व हाकीम दोघे दौलापासीं क्षणभर जाऊन हाकिमानें तबियत पाहुन अवषध दिल्हें, आणि उभयतांही बाहेर आले. दौला कांहीं शुद्धीवर नव्हते अशी अवस्था मीर अलम व हाकिमांनीं तबियतीचा अहवाल सांगितला. इतकें तेथें होऊन तेदिवशीं दौलाची गांठ न पडतां सर्वत्र आपलाले स्थळास आले, तों दिवस रात्र दौलाची प्रकृत अस्वस्थ. कोणाची वारयाबी नाहीं. दुसरे दिवशीं दोन प्रहर पावेतों तोच प्रकार. मीर अलम व हाकिम दवा देऊन आले. अस्तमानीं कांहीं स्वस्थ होऊन राज्याजी, समशेरबंत व रोशनराव यांस अर्ध घटका बोलाऊन घेऊन भारामलाकडील पत्राचे जाब लिहिण्यास सांगितलें. छ १३ रोजीं नबाबांनीं शिकारीस जाण्याची सिद्धता केली. बराबद जाले. दौला जनान्याचे वाटेनें म्यान्यांत बसोन नवाबांपासीं गेले. डेऱ्यांत दौलांस नबाबांनीं त्यांचे तबियतीचें वर्तमान विच्यारिलें. यांनीं अर्ज केला, नजर गुजराणिली. मीरअलम व हाकिम व राज्याजी व आह्मांकडून कोन्हेरपंत हे तेथें ते समई होते. येक घटिकेंत याप्रा होऊन दौलांस निरोप दिल्हा. आपले मकानीं आले. नवाब स्वार होऊन शिकारीस गेले. दौलाची मिजाज छ मारीं स्वस्थ कांहीं-

शी जाली. छ १४ रोजी दोनप्रहरपर्यंत बरेच होते. मागती प्रकृत बे आराम या प्रा यांचे मिजाजीचा अहवाल दिवसांत फेर दुसराहोतो असें आहे. याजवर प्रकृत फिरोन जशी दौलास येईल त्याप्रा विनंती मागाहुन लिहिण्यांत येईल. रा छ १६ माहे जाावल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा ३ शुक्रवार शके १७१५ ता० २० दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. दौलाची मिजाज मांदगी. सबब नबाबांनीं मीर-अलम व हकीम महमदमाखां यांस नेहमीं जवळ राहुन दवा देत जाणें यैसी ताकीद केली, त्या प्रा उभयतां त्याजपासींच असतात. असीलास पाठउन घटके घटकेचे वर्तमान आणवितात. नवाबांनीं आपला चोबी बंगला दौलाकरितां पाठऊन फरासाकडुन त्यांचे मकानीं उभा केला. तेथें दौला आहेत. हाकीम महमदमाखां यांस पांच हजाराची जागीर देण्याचीही योजना जाली आहे. राछ १६ जाहल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा ३ शुक्रवार शके १७१५ ता. २० दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. कमठाण्यास दाखल होऊन येकवीस दिवस जाले. सैर षिकार आलीकडे दौलाचे मिजाजमांदगी खाले दिवस गेले. मागती बेदरास छ १७ अगर छ १९ रोजीं येण्याचा बेत होता. परंतु तो राहिलासा दिसतो. नवबाचें मानस व माहालांतुंनही बेदरास यावे यैसा निश्चय होता. दौलाचा अर्ज कीं येथून फिरोन बेदरास माघारे जाण्यांत कुलयात बिघडती. यास्तव महिना पंधरा रोज कमठाण्यावरच राहावें. पुढें विचारासारखी तजवीज. असेंही वर्तमान आहे. यैकिल्यात येतें. बेदरास येण्याचा गुलबांग दाट होता. तो तुर्त दिसत नाहीं. मागाहुन जसें ठरेल तसी विनंती लिहीन. रा छ. १६ जाावल हे विज्ञापना.

श्री

मार्गशीर्ष वा ३ शुक्रबार शके १७१५ ता० २० दिशेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. भारामलाकडील पत्रें दौलास आलीं. त्यांत मारकि

" शंकरराव भोंग याचे ठिकाण लागत नाहीं. त्याचे भाउबंद व चीजबस्त कोठें कोठें याचे तलाशांत आहों. या प्रांती मुफसद नाईकडे यांचा हंगाम भारी याचे तंबीविषईं आज्ञा जाहल्यास उद्योग करूं. मावजी नाा सोईटकर टेंभुरदरा ह्मणोन उमरखेडचा गाव येथें आहे. तेथुन उमरखेड व सोईटावर स्वारी करणार. याजकारितां टेंभुरदऱ्यावर मीं फौजसुधां जातो. तें जागा बेलाग आहे. भोंसले यांजकडिल विठ्ठलपंत सुभेदार वासीमा पासोन पांच कोसांवर जभियतसुधां माहुरचे रुखानें आहेत, त्यांचे फौजेसी आह्मासीं फांसला पंचवीस कोसांचा आहे. त्यांनीं आह्मीं इत्यफाकानें राहुन मुफसद नाइकडे आदि करून यांचे तंबी विषईं तर्फेन मदद मावला करण्याचा ईषीदे. त्या बमोजीब त्यांचा आमचा नवर्स्त. खादंज्यारी कुमकही परस्परें होत आहे. बिलफैल सुभेदार नाइक ह्याचा शोध लाऊन तंबी कारितात. या प्रांती फौजाचे भयानें मुफसद कितेक मकानें खालीं टाकुन फरारी जाले आहेत. त्या गढया साफ करण्याचा उद्योग सुभेदाराचा आहे. आज्ञा येईल तसी वर्तणुक होइल. या अन्वयें पत्रातील मजकुर दौलांनीं ऐकुन राज्याजीस याचा जबाब देण्याचें सांगितलें. जबाब काय दिल्हा हें शोध लावलियावर मागाहुन लिहिण्यात येइल. रा छ. १६ माहे जावल हे विज्ञापना.

श्री

मार्गशीर्ष वा ३ शुक्रवार शके १७१५ ता. २० दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. शंकरराव भोंग यांजकडील तालुका इंदुर, बोधन वगैरे काम व्यंकटराव सुरापुरकर यांचे पुत्र त्रिमलराव यांजकडे सांगितलें. मारनिलेनी दौलास पत्र लिहिलें त्यांत मार कीं पा बालकुंडा येथील जमीदार दयारडि याचा पैगाम आलाकीं शंकरराव याची चीजबस्त कांहीं मजपासीं आहे ती मी देतो; व मुचालका लेहुन देतों कीं यासिवाय चीजबस्त आपले आंगीं लागल्यास दुपट देईन. कौल यावा. भेटीस येतों. दुसरें, भोंगाकडील

---

१ ऐक्य; सालोख जूट. २ बंडखोर. ३ इच्छा. ४ लेख ५ ६ आणि खरोखरच ७ निरोप.

कारकुन हणमंतराव क्षणोन येथें कैदेंत आहे. त्याचे विद्यमानें भोंगाकडिल पैगाम कीं मजला सरकारचा कौल आल्यास मी येतों. या प्रा लिहिलें आलें. याचे जबाब दौलांकडुन त्रिमलरायाकडे गैले कीं दयारडीस कौल पाठऊन आणवावें. चीजबस्त असेल ते घेऊन मुचलकाही सदरहु प्रा घ्यावा. त्याचे तालुकियाचें काम त्याचे हातें घ्यावें. भोंगाकडील पैगाम प्रमाण नाहीं. तुम्हीं हणमंतराव यासीं वचनीं गुंतूं नये. तो कैदेंत आहे तसाच असावा. याप्रा जबाब गेले. रा छ. १६ जावल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा ३ शुक्रवार शके १७१५ ता. २० दिसेंबर १७९३.

विनंति विज्ञापना. हषमतजंग याची जागीर वजीरखानाकडे सांगितली. जंगाचे जातीस भातांबरें वगैरे गांव आहेत. तेथें जंग आजपर्यंत होते. सांप्रत जंगांनीं नवाबास अर्जी व दौलास पत्र पाठविलें कीं माझी मिजास दुरुस्त नाहीं. याजकरितां हुकुम जाल्यास हैदराबादेस जाईन. या प्रा पत्रें आलीं. याचा जबाब नवाबांनीं पाठविला कीं तबियतीस इलाज करण्याकरितां तुम्हीं हैदराबादेस जावें. त्यावरून जंग भातांबर याहून निघोन छ १३ रोजीं मेलारास आले. छ १४ रोजीं तेथेंच मुक्काम जाला. आज उद्यां बेदरास येणार. शर्फुदौला यांची मेट घेऊन हैदराबादेस जाण्याचा निश्चय जाला. रा छ १६ माहे जावल हे विज्ञापना.

श्री

मार्गशीर्ष वा ३ शुक्रवार शके १७१५ ता. २० दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. चेनापटणाहुन व्यंकटरामदिला यांजकडुन अखबार आली. ते सेवेसीं रा केली आहे. राजश्री गोविंदराव भगवंत प्रविष्ट करतील. उत्तरें रवाना करण्यास आज्ञा जाली पाहिजे. रा छ. १६ माहे जावल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा २ शुक्रवार शके १७१५ ता. २० दिसेंबर १७९२.

विनंती विज्ञापना. राजश्री कल्याणराव व बाबाराव यांचीं पत्रें दौलास

आलीं. ती हरराव यांचें विद्यमानें गुजरलीं. पत्रें वाचतें समईं मीर आलम व महमदमाखां जवळ होते. बाबाराव यांनीं लिहिलें मीं पुणियास आलों. मदारुलमाहाम यांची भेट जाली. सविस्तर माार सांगितला. त्यावरून बहुत संतोष जालें. सांप्रत आपण हजरत सुधां शिकारगाहास आल्याचें व भोंसल्याकडील विठलपंत सुभेदार यांची तफैन दोस्ती भारामल यांस लिहून राखविली याचाही माार यैकुन खुष झाले. पुढें परस्परें भेटीं व्हावयाचाही बयान केला. त्याजवरुन मदारुलमहाम यांचे ह्मण्यांत बेहेतर आहे इत्यादि माार होता. हें यैकुन दौला निजले होंते ते थटकारुन उठोन वसले, आणि बोलले कीं " आह्मीं कोठें नको ह्मणतो?" या प्रा आवेश येऊन बोलले. याजवर मीर आलम बोलले कीं ह्या सर्व गोष्टीं गलत आहेत. राव माार यांची प्रकृत दुरुस्त नाहीं. तेव्हां हे जाब्साल काय करितात. या प्रा मीर आलम बोलल्यानंतर दौला उगीच राहिले. हें वर्तमान युक्तीनें खचित समजलें. सबब विनंती लि।। असे. रा छ १६ माहे जावल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा ३ शुक्रवार शके १७१५ ता. २० दिसंबर १७८३.

विज्ञापना येसीजे. येथील वर्तमान ता छ १० माहे जावल भंदवार पावेतों अखबार पत्रीं लेखन करून सेवेसीं पत्रीं रवानगी केली, त्यावरून ध्यानास आलें असेल. तदनंतर येथील वर्तमान. छ माारीं प्रातःकाळीं नवाब बेदार जाले. असीलास दौलाकडे पाठऊन त्यांचे तबियतीची खबर आणविली. तीन घटिकां दिवसां नवाब स्वार होऊन जनान्यासहित शिकारीस गेले. शिकार जाली नाहीं. दोन प्रहरास डेऱ्यास आले. रात्रीं खैर सला. छ. ११ रोज रविवारीं दिवसां दरबार जाला नाहीं व नवाब शिकारीसही गेले नाहींत. दौलाची तबियत फार अस्वस्थ होती. त्याची खबर वरचेवर असीलासीं आणवीत होते. मीर आलम व हाकीम महमदमाखां उभयतांस त्यांजपासीं नेहमीं असावें. या प्रा हुकुम जाला. छ १२ रोज सोमवारीं दोन घटिका प्रथम दिवसां नवाब सवार होऊन जनान्याचे बंदोबस्तासहित शिका-

रीस गेले. शिकार जाली नाहीं. त्यानंतर येदलाबाद ह्मणोन येक गांव आहे तेथें स्वारी गेली. पाटलाचे बायकोनें स्वयंपाक करून अन्न आणिलें तें घेऊन तिजला इनाम दिल्हा. येक प्रहर च्यार घटिकेस डेऱ्यास आले. दौलाची खबर अशीलास पाठऊन आणविली, रात्रीं खेरसला. छ १३ रोज मंगळवारीं पांच घटिका प्रथम दिवसां खाबगामधें नबाब बरामद जालें. दौला जवळचे वाटेनें म्यान्यांत बसोन आले. त्यांनीं नजर केली. पांच सांत इसमांचा सलाम जाला. दौलांसी क्षणभर बोलोन त्यांस वाट लाविलें. नबाब साहा घटिकेस स्वार होऊन शिकारीस येदलाबादेकडे गेले. दोन प्रहर तीन घटिकेस डेऱ्यास आले. दौलाचें प्रकृतीची खबर आणविली. रात्रीं पांच घटिकेस नबाब बरामद जाले. सरखुलंदजंग व घासीमियां व अजमखां वगैरे इसमांचा सलाम जाला. दिलदारखां व मुरादअलीस हुकुम जाला जे दोन चित्ते घेऊन वाडयाबाहेर हरणाची शिकार करून घेऊन येणें. चोबी बंगला दौलाचेथें उभा करण्याची ताकीद जाली. येक प्रहराचे अमलांत बरखास जालें. छ १४ रोज बुधवारीं प्रातःकाळीं दौलाचेथें चोबी बंगला उभा राहिला. त्यांनीं फरास व कामाठी नवाबांकडील यांस इनाम शंभर रु. दिल्हे. दोन घटिका दिवसां नबाब जनान्यासुधां स्वार होऊन अमलापूरचें जंगलांत शीकारीस गेले. भोजनादि तेथेंच होऊन दोन प्रहर दोन घटिकेस डेऱ्यास आले. दिलारखान व मुरादअली यांनीं वाडयाबाहेर च्यार हरणांची शीकार करून गुजराणली. दौलाची तबियत कांहींसी स्वस्थ जाली ह्मणून राज्याजी, रोशनराये, समशेरबंत वगैरे त्यांचे लोकांनीं त्यांस नजरा केल्या. रायेरायां याचे बंधू अप्पाराव कुटुंबासुद्धां माहुरची यात्रा करून आले. याचा अर्ज जाला. रा छ १६ माहे जावल हे विज्ञापना.

छ २४ जावलीं डांकेवर पुण्यास

श्री

मार्गशीर्ष वा १० शनिवार शके १७१५ ता. २८ दिसेंबर १७९२.

श्रीमंत रावसाहेब यांस छ. २४ चे मामुली हवाल्याचें पत्र

श्री

विनंती विज्ञापना. उमरखेडाहून काादाराचीं पत्रें इकडे येत गेलीं कीं भगवंतराव व रामराव उभयतां भारामल तेजवंत यांचें समागमें अटकेंत आहेत. त्यांची मोकळीक व्हावी व तालुकीयास इजा न लागे यैसा बंदोबस्त होऊन तेजवंतास पत्रें यावीं. त्यावरून दौलांसीं बोलण्यांत येत गेलें. सांप्रत उमरखेड प्रकरणीं ताा माार रा. गोविंदराव भमवंत यांनीं लिहिल्या आन्वयें दौलासी जाले कीं तेजवंतास आपले पत्र 'उमरखेडचे कारकून दोघे तुह्मीं समागमें नेलें त्यांस उमरखेडास पाठवून द्यावें. त्यांस त्यांजपासून दस्त ऐवज लेहून घेतला तो फिरोन द्यावा. आणि तालुकियांस उपद्रव परिछिन्न लागों नये' या अन्यर्थें एक पत्र आह्मापासी द्यावें ह्मणजे सरकारांत रवाना होईल. व एकंदर माारही आपण तेजवंत यांजकडे पाठवून सरकार हुकुमाप्रमाणें त्यांजकडून अमलांत येण्याचे करावें. याजवर दौलाचें बोलणें कीं 'उमरखेड करांनीं मावजी नाा यांस चीजबस्त सुद्धां दिल्हे नाहीं. व भोंगाचे भावाचा पत्ता लावून द्यावा त्यास हजर करावें ते केलें नाहीं यास काय करावें?' याचें उत्तर इकडुन कीं 'उमरखेडकर काादारांनीं दोंही सरकारची दोस्ती येखलास जाणून भोंगाचीं मुलें, मनुष्यें चीजबस्त जे शोधांत आली तें तेजवंत याचें हवाला केलीं. भोंगाचा भाऊ तेथें नाहींच त्यांपक्षीं यानी काय सांगावे? मावजी नाईक गैरहजर आहे. उमरखेडकरानीं आपले प्रयत्नास कांहीं कमती केली कीं काय? कारकून दोन्ही माहली पाठवावे. आणीकहि शोध लागेल त्यांत कसूर करणार नाहींत. या आन्वये मोठे झटापटीची बोलणी भवती न भवती फार कांहीं जाली. याजवर एक दो दिवसानंतर आणीकहि या समंधें दौलांसीं बोलणें जालें. दौलांनीं सांगितलें कीं तेजवंताचीं पत्रें आली त्यांत उमरखेडचे दोघे कारकून समागमें होते त्यांतून भगवंतराव यांस शरीरीं समाधान

नाहीं. सबब उमरखेडास रा केलें. रामराव मात्र जवळ आहे. मावजी नाईकाचा शोध फार केला. हलीं मालेगांवचे यात्रेस गेल्याचा ठिकाणा लागला, त्याची कंन्या व जांवई धरले, व मावजी नाईकचे पत्यावर उमरखेडकराची माणसेंहि गेल्याचे वर्तमान आहे, तहकीक करून मागाहून लिहीन. या प्रा भारामल यांचे पत्रांतील मजकूर ह्मणोन बोले. याजवर आमचें बोलणें कीं भगवंतराव यास उमरखेडास रा केलें उत्तम आहे, रामराव यासही रवाना करावें. दस्तऐवज फीरोन देवावा. उमरखेडास इजा लागो नये. या प्रा तेजवंतास निक्षून पत्र द्यावें. दौलानी सांगितलें कीं रामराव यास येथें पाठवून देण्याविषयीं पत्र तयार करविलें. तेजवंत मारनिलेस येथें पाठवून देतील. उमरखेड तालुक्यांत उपद्रव करूं नये यैसें पेशजी भारामल यांस पत्र गेलें. उमरखेडापासोन बावीस कोसाचे फासल्यावर तेजयंत आहे. हल्लीं इंदूर, बोधन, म्हसें, मुधोळ, या प्रांतीं कामगिरीस जाण्याविषीं भारामलास पत्रें गेलीं तिकडे जातील. पेशजीहि उमरखेड तालुक्यास फौचेचा उपद्रव जाला नाहीं. सेईटावर तीन मुकाम होतें. परंतु काडीस ढका लागला नाहीं. आतांहि इजा लागणार नाहीं. मारनिलेस ताकीद आहे. या प्रा बोलून रामराव यांस येथें पाठविण्याविषीं भारामल यास पत्र देण्याचा मसविदा ठरावीला तो दाखविला. आज उद्यां पत्र मोहर होऊन आलें ह्मणजे रवाना करण्यांत येईल. ता। विनंती मागाहून लिहीन. पत्रें दौलाकडून आलीं. याविसीं अलाहिदा पुरवणी लिा आहे त्यावरून ध्यानांस येईल रा छ २४ जावल हे विज्ञापना.

श्री

मार्गशीर्ष वा १० शनिवार शके १७१५ ता. २८ डिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. उमरखेडकर कागदाराची पत्रें पेशजी आह्मांस आलीं यांत त्यांनीं लिहिलें होतें कीं भगवंतराव यांचे शरीरीं समाधान फार नाहीं. यास्तव कोणेही प्रकारें त्यांचे येणें उमरखेडास व्हावें. रामराव, भारामल यांजपाशीं राहून भगवंतराव यांस वाटे लावील यैसी ताकीद यावी. त्यावरून हा मार दौलांसी

बोलण्यात आला होता. त्यांनीं तेजवंतास पत्र पाठविलें कीं भगवंतराव यांस ऊमरखेडास पावतें करून द्यावें. त्या प्रा तेजवंताचें पत्र आलें. दुसरें, तालुक्पास इजा लागों नये ऐसी ताकीद तेजवंतास आधीं जावी. हाही मार दौलांसी पेशजी बोलण्यांत आला. त्यांनीं तेजवंतास सदर्हु अन्वयें निक्षून लिहिल्यावरून तालुकियास उमरखेडचे कोठे उपद्रव न देतां ईर्षादेबमोजीब इंदुर बोधनाकडे कामगिरीस दरकुच जातो. याप्रा तेजवंताचे लिहिण्यांत ह्मणोन दौलांनी सांगितलें. हलीं रामराव याची सुटका व्हावी दस्तऐवज फिरोन द्यावा. येसें दौलांनीं आमचें बोलणें. याचे यानी असें ठराविलें कीं रामराव यांस येथेंच आणवितों. दस्तऐवजहि आणवावे यैसे आह्मी बोललों. दौलाचें ह्मणणें कीं असल दस्तावेज येथें आणिल्यास तुह्मीं छातीवर बसोन घ्याल. यास्तव नकला पाठवाव्या ऐसें भारामलास लिहितों. आह्मीं उत्तर असल दस्तयैवज येथें आपण आणवावे. आह्मीं आपल्यापासीं बोलुनच घेऊं. याप्रा बोलणें जालें. परंतु अस्सल कागद भारामल यांजपासीं असोन त्याच्या नकला येथें व रामराव यास पाठवावें. यांप्रा दौलांनीं दोन पत्रें तयार करून दिल्हीं, पैा येक पत्र परभारां उमरखेडकर काादारांकडे मुजरद रा केलें व येक पत्र राजश्री गोविंदराव भगवंत यांजकडे डोंकवर पा आहे. मारानिले सेवेसीं प्रविष्ट करतील रा छ २४ जावल हेविज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा १० शनिवार शके १७१५ ता. २८ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. दोलाचे तबियतीचें वर्तमान पेशजी विनंती लिहिल्यावरून ध्यानात आलें असेल. छ १९ रोजीं रात्रीं नबाबाकडे दौला आंतील वाटेनें म्यान्यांत बसोन गेले होते. राजश्री कल्याणराव व बाबाराव यांजकडील पत्रें आलीं. त्या प्रकरणीं बोलणें पांच सहा घटिका पर्यंत होऊन आपले मकानास आले. प्रकृतीस समाधान नाहीं. सबब दौला आपले येथें दरबार पहिल्या (प्रमाणें ?) करीत नाहींत. फार करून जनान्यांत असतात. येका दो दिवसाआंत दोन तीन घटिका मर्दाना करून मीरआलम राजाजी रोषनराव वगैरे कोणी कोणी

येतात त्यांस बोलावून घेऊन कांहीं जाबसाल होतो. छ २० रोजीं दौलांनीं स्नान केलें. तमाम लोकांनीं सतके नगदी रु. व खुर्दा व उडीद तेल, तीळ वगैरे जिन्नस तसदीक केलें. दौलास समाधान झाल्याच्या त्याचे लोकांनीं नजराही केल्या. दौलांनीं तबियत आराम झाल्याची नवाबास नजर पाठविली. सांप्रत दौलाची प्रकृत कांहीं स्वस्थ जाल्याप्राा आहे; परंतु निस्तोष आरोग्य नाहीं. ज्वर पहिला होता तो नाहीं. शम आहे. खोंकलाही बहुतसा नाहीं. शब्द हलुवट जाला. चेहऱ्यावर व अंगावर नकाहत व शरीरीं अशक्तता आहे. रा छ २४ जाावल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा १० शनिवार शके १७१५ ता. २८ दिसेंबर १७९३.

विनंति विज्ञापना. मिस्तर किनवी दिलावरजंग बाहादुर इंग्रजाकडुन नबाबापासीं वकीलीचे कामावर आहेत. त्यास यांची बदली इंग्रजांनीं करून यांचे कामावर दुसरा बकील पाठविला. तो येणार. सबब येथुन किनवी नबाबाची व दौलाची रुखसत बेऊन जाणार, किनवीनें आपला सरंजाम कुल असबाब येथुन हैदराबादेस रवाना केला. रुखसत होऊन दरमजल जाणार. हा मार मीरआलम यांस विच्यारला. त्याचे सांगण्यांत कीं दिलावरजंग यांची तंगीरी[1] होऊन जातात यैसे नाहीं. पलटणचे स्वारीहुन आल्यापासोन दिलावरजंग यांची तबियत दुरुस्त नाहीं. येथील आवहवाही माफिकत नाहीं. सबब लाड बहादुर व नवे जनरालास यांनीं सांगितलें कीं मी बिलायेतीस जातो. तर प्रकृत हुषार होईल. त्यावरून दिलावरजंगास हुकुमही आला कीं तुम्हीं बिलायेतीस तबियत आराम होण्याकरितां यावें, त्यावरून जातात. यैसें यांचे बोलण्यांत. सारांश किनवी येथुन रवाना होत आहे. मागाहुन विनंती लिहिण्यांत येईल. किनवी येथुन जाणार. येथील कामावर मिस्तर इष्टवट यास ठेविलें. दुसरा किनवीचे मुबादला येणार तोंपर्यंत काम इष्टवटानें चालवावें यैसें ठरलें आहे. रा॥ छ २४ जा॥वल हे विज्ञापना.

---

१ बरतरफी.

श्री.

मार्गशीर्ष वा १० शनिवार शके १७१५, ता. २८ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. चेनापटणाहुन व्यंकटराम दिला याजकडील दोन अखबारां आल्या,त्या पा।। आहेत. राजश्री गोविंदराव भगवंत सेवेसीं प्रविष्ट करतील. अवलोकनें मा।।र ध्यानांत येईल. उत्तराविषीं आज्ञा व्हावी. रा।। छ. माहे जा।।वल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा १० शनिवार शके १७१५ ता. २८ दिसेंबर १७९३,

विनंती विज्ञापना. राजश्री माहादजी सिंदे यांस नवाबांनीं पेशजी दोन च्यार वेळां यैवज येथुन हुंड्या वरचेवर पाठविल्या. येविषींची विनंती राजश्री नाना यांनीं सेवेसीं केलीच असेल. बाबाराव गोविंद इकडुन गेले ते समईंही दाहा लाखाच्या हुंड्या त्यांचे बराबर रा।। जाल्या. सांप्रत पांच लक्षांच्या हुंड्या राव सिंदे यांजकडे पाठवावयाकरितां यांनीं तयार केल्या आहेत. लौकरच रवाना होतील. यैसें वर्तमान यैकण्यांत आलें, मागतीं याची तहकीक करून लिहुन पाठवितों. रा।। छ. २४ जा।।वल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा १० शनिवार शके १७१५ ता. २८ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. कृष्णमा करोडा वारल्यानंतर करोडगिरीचें काम त्याचे पुत्राकडे दौलांनीं ठेऊन कृष्णमाचा भाऊ पापमा याचे हातें कारभार घेतला. यैवज सरकारचा कृष्णमाचे बेरजे अन्वयें बहुत येणें. त्याचा निर्वाह होईना. सबब पापमा दुखणें आलें ह्मणोन निरोप घेऊन गेला. त्यानंतर रामया ह्मणोन दुसरा भाई कारभारावर होता, त्यास यैवजाची सख्ती लागली, तेव्हां त्यानें हैदराबादेस जाऊन पांच लक्षांची तोड पाडितो ह्मणोन रुखसत घेऊन हैदराबादेस गेला. यैवजास ठिकाण नाहीं. कृष्णमा याचे हाताखाले हासन अली खान ह्मणोन होता. त्यानें तीन लाखाची सरबराई केली. सबब त्याजला करोडगिरीचे नयाबत मीरआलम यांचें विद्यमानें सांगोन कामे चालविलें. परंतु

यैवज बहुत येणें. त्याचा तगादा खान मार यास सख्त आहे. व कृष्णमाची अमानत साहुकार वगैरे जेथें जेथें जसी, त्याचाही शोध करून तगादा होत आहे. कादरखान पहिला करोडा व नुरमहंमदखान सिदी इमामखानाकडील यांजकडेही करोडगिरीचें संधान आहेच. पुढें काय ठरतें त्याप्रों लिहिण्यांत येईल. रा छ. २४ जावल हेविज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा १० शनिवार शके १७१५ ता. २८ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. हरबाजी नाईक बिडवई याचे दुकान औरंगाबाद व हैदराबादेंतील व येथील तिन्हींही जप्त करून लोकांच्या ठेव्यासुद्धां रोकड व वस्त व जी कापड चिजवस्त सुद्धां यैवज घेऊन मारानिलेचा यैवज ज्याजकडे येणें तो व ह्याचे दाखल्याने निवडून काहाडोन ज्याजकडे यैवज त्याचे मागें चोपदार लाऊन बै मुरवतीनें कितेकांपासोन यैवज घेतला, व घेतात. इतकेंही होऊन हरबाजी नाईक याचा पुतण्या व स्त्री व त्रिंबक नाईक वगैरे गुमास्ते यांची सुटका नाहीं. साडेबारा लक्ष माथां आहेत. त्यांपैकीं हा यैवज जो जमा होईल तो घेऊन बाकीचाही फडच्या त्यांनीं करावा. तेव्हां मुक्तता. हैदराबादेतील गुमास्ते वह्यांसुद्धां आणिले आहेत. वह्याची रुजुवात येक येकाची होत आहे. मोठा घोळ घातला. तसेंच लक्ष्मीचंद साहुकार यांजकडे अपराध नसतां वित्तविषय पंधरा सोळा हजार पर्यंत जिंदगी सरकारांत घेतली. हालीं कृष्णमा करोडे याचा यैवज कोणे साहुकारापासीं काये तो सांगणें व मुचलके लेहुन देणें. याप्रा तमाम साहुकारांस तगादा केला. याचें काये होतें तें पाहावें. सर्वांवर गजब जाला आहे. निर्व्हा नाहीं. रा छ. २४ जावल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा १० शनिवार शके १७१५ ता. २८ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. तिमाराव देशपांडे बसमतकर परागंदा जाला. त्याजला धराव्याकरितां सैद मुनवरखान व बाजीराव अमीन यांणीं उद्योग बहुत केला. परंतु हस्तगत जाला नाहीं. सांप्रत तिमाराव याचे राहण्याचा गांव मौजे लांक

पा। वसमत येथें सैद मुनवरखान व बाजीराव हजारपांचसें लोकांनिसी जाऊन गांवास महासरा केला. आंतुन गोळी चालती. तिमाराव याचा पुतण्या व चीज वस्त वगैरे तेथें आहे. लांक येथील गढीही मजबुत आहे. गढी घेऊन तिमाराव यांचीं मुलें मनुष्यें चीजवस्त जें तेथें असेल ते हस्तगत करावी. याप्रों सैद मुनवरखान व बाजीराव यांस ताकीद व उभयतांची कुमक करण्याविसीं भारामल यांसही याची आज्ञा आहे. मकान अद्याप यांचे हातीं आलें नाहीं. होईल त्याप्रों विनंती लिहिण्यांत येईल. तिमाराव यास विठ्ठलपंत सुभेदाराकडील आश्रा ऐसेंही यांचेथें वर्तमान आहे. रा। छ. २४ जमादिलावल हे विज्ञापना

श्री.

मार्गशीर्ष वा। १० शनिवार शके १७१५ ता. २८ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. फकरुदौला ईत्फखारखान यांजकडे अवरंगाबाद येथील शहरचे सुभेदारीचें काम. त्यास जामीन हाकीम ज्याफरखान आहेत. त्यास फकरुदौला सुभेदारी करून गेल्या तागाईत सरकारांत पैसा वसूल नाहीं. याजकरितां हाकीम मजकूर यांस तगादा हालीं लागला आहे कीं तुम्ही फकरुदौलास जामीन आहां. त्यांजकडील यैवज दाखल करणें. व त्याजकडेहि दस्तक सजावल यैवज व जमाखर्च घेऊन येणें म्हणोन जालें. दुसरें, चिमणाराजे यांजकडे दौलताबाद सरकारचे वगैरे येकंदर माहालची अमीली. याजकडुनही ताहुदाचे बेरजेचा यैवज बेमुबलग येणें. सबब मारनिलेवर दस्तक सजावले खाना करण्यास तयार जाले आहेत. रा। छ. २४ जमादिलावल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा। १० शनिवार शके १७१५ ता. २८ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. दौलाची तबियत बेआराम होती. सांप्रत आराम होऊन आरोग्यस्नान केलें. नजरा व लोकांचे तसदुक सतेके जाले छ. २१ जावल बुधवारीं नवाब दोन घटिका रात्रीं दौलाचे मकानास आले. मीर आलम व असद अलीखां जवळ होते. त्यासुद्धां दौ (लां) नीं नजर केली;

तबियतीचें मान विच्यारून त्यानंतर दोन घटिका दौला व मीर आलम यांसीं खिलवत जाली. सात घटिकेस नवाब दौलाचे मकानाहून आपले जाग्यास गेले. रा छ. २४ जमादिलावल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा १० शनिवार शके १७१५ ता. २८ दिसेंबर १७९३.

विनंती विज्ञापना. जंगमाची येक पोर बारा वर्षाचे वयाची तिचे आईवापास हजार रुपये देऊन खरीद केली. तिसीं नवाबांनीं निका छ. १७ जमादिलावलीं लाविला ह्मणोन वर्तमान येकदोन मातबर योकिलें, त्यवरुन विनंती लिहिली असें खरें वर्तमान आहे. रा छ. २४ जमादिलावल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा १० शनिवार शके १७१५ ता. २८ दिसेंबर १७९३.

विनंति विज्ञापना. नवाब कमठाण्यावर राहिले. तेथें जाग्याचा बहुत संकोच. गांवांत जागा थोडी. बाडा बाहेर मोठा दिल्हा. दोन कोस अडीच कोसांवर जेथें ज्याची सोये तसे लष्करचे लोक राहिले. तेव्हां बाहेर अथवा कमठाण्यांत राहण्याची सोये नाहीं. जाणुन बेदरचे मंगळवार पेठेंत मी पहिलें राहिलों त्याच जागीं आहे. येथुन कमठाणें तीन कोस. बाडयामुळें कोसं कोसाचा फेर जाणें येणें होतें. नेहमीं तेथें कोन्हेरपंत व च्यार जोडया जासुद ठेविले आहेत. रा छ. २४ जमादिलावल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशिर्ष वा १० शनिवार शके १७१५ ता. २८ दिसेंबर १७९३.

विनंति विज्ञापना. कमठाण्यावर नवाब राहिल्यास येक महिना जाला. सैर शिकार व दोलाची मिजाज मादंगी हेंच आजपर्यंत जालें. बेदरास येण्याचा बेत होता तो तुर्त राहिला. येक महिन्याचा सरंजाम कमठाण्यावर गेला. महिना पंधरा दिवस मुकाम आहेत. येकरामुदौला गफुरजंगाचे पुत्र यांनीं आपली षादी करण्याकरितां हैदराबादेस जाण्याचा निरोप मागितला, परंतु दिल्हा नाहीं. मुलें

माणसें येथेंच आणा यैसी ताकीद जाली. याचप्रों मीर आलम यांचींही मुलें माणसें आणविलीं. रा छ. २४ जावल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशिर्ष वा १० शनिवार शके १७१५ ता. २८ दिसेंबर १७९३.

विज्ञापना यैसीजे. येथील वर्तमान ता छ. १५ माहे जावल शुक्रवार पावेतों अखबार पत्रीं लेखन करून सेवेसीं पत्राची रवानगी केली त्यावरून ध्यानास आलें असेल. तदनंतर येथील वर्तमान. छ. १६ रोज शुक्रवारीं प्रातःकालीं सरबुलंदजंग व दिलदारखान पुढें चिते घेंऊन सिकारीस गेलें. दोन घटिकां दिवसां जनान्यासहित बाडयाआंत मौजें चिटपालाकडें गेलें. दीड प्रहरास माघारें आले. पागावाल्यांनीं वीस हरणांची शिकार करून गुजराणिली. दोन घटिकां दिवस शेष राहतां नवाब बरामद जाले. पागावाले यांचा सलाम व शिकारीच्या नजरा जाल्या. रात्रौ दौलाची अर्जी गुजरली. छ. १७ रोज मंदवारीं प्रातःकालीं पागावाले हुकुमा प्रों बाडयाबाहेर शिकारीस गेले. नवाब दोन घटिकां दिवसां स्वार होऊन जनान्यासुधां सैर करावयास गेले. येक प्रहर पांच घटिकेस डेऱ्यास आले. पागावाल्यांनीं नऊ हरणांची शिकार करून गुजराणिली. रात्रीं खैरसला. दौलाचे तबियतीचें वर्तमान आणविलें. छ. १८ रोज रविवारीं दोन घटिकां दिवसां नवाब शिकारीस बाडयाबाहेर गेले. पागावाले वगैरे लोकांचा सलाम जाला. शिकार करून येक प्रहर पांच घटिकेस डेऱ्यास आले. रात्रीं साहा घटिकेस खिलवतीमध्यें नवाब बरामद जाले. सरबुलदजंग व घांसीमियां व अजमखां वगैरे इसमांचा सलाम जाला. पागावाल्यासीं बोलणें जालें. येक प्रहर दोन घटिकेस बरखास्त जालें. छ १९ रोजीं सोमवारीं दोन घटिका दिवसांनंतर नवाब सवार होऊन जनान्यासहित बाड्याआंत चिटपालास गेले. तेथें भोजन जालें. येक प्रहर साहा घटिकेस डेऱ्यास आले. पागवाल्यांनीं येक ससें व तीन डुकरांची शिकार करून गुजराणिली. डुकरें मिस्तर किनबीकडे पाठविलीं. रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. छ. २० रोज मंगळवारीं दोन घटिकां दिवसां नवाब सवार होऊन जनान्यासहित

शिकारीस गेले. दीड प्रहराचे अमलांत फिरोन डेऱ्यास आले. दौलांनीं आरोग्यस्नान केल्याचा अर्ज जाला. नवाबांनीं सथका पंचवीस बकरीं उडीद, तेल व खाना व खुर्दा याप्रों केला. दौलांनीं नजर पाठविली ती गुजरली. मिस्तर किनवी यांनीं आपला असबाब हैदराबादेकडे रवाना केला. मालेगांवचे यात्रेहून पन्नास घोडीं किनवीनें खरीद करुन आणविलीं तीं आलीं. पागावाल्यांनिशीं करार करून गुजराणिलीं. तीन प्रहरास असद-अलीखान मालेगांवचे यात्रेहून तीनसे आठ घोडे खरीदी करून आणिले याचा अर्ज जाला. रात्रीं दौलाचीं अर्जी गुजरली. छ. २१ रोज बुधवारीं दोन घटिकां दिवसां नबाब जनान्यासहित स्वार होऊन गेले. आंबराईत भोजन करून येक प्रहर तीन घटिकेस डेऱ्यास आले. तीन प्रहरास खाब-गामध्यें बरामद होऊन लालन हाऱ्यामाची याद केली. तो हजर जाला. हऱ्यामत करविली. च्यार घटिकां दिवस बाकी राहातां बरखास्त जालें. रात्रीं दोन घटिकेस नबाब दौलाचेथें आले. दौला व मीर आलम व असदअली-खां व रायेरायां यांचा सलाम नजरां जाल्या. दौलांसीं बोलणें होऊन येक प्रहराचे अमलांत नबाब आपले मकानास गेले. रा छ. २४ जावल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा १० शनिवार शके १७१५ ता. २८ दिसेंबर १७९३.

विनंति विज्ञापना. मिस्तर किनवी दिलावरजंग यांस रुखसत देण्याची याविषई दौलांनीं नवाबांस अर्जी लिहिल्यावरून दौलांस हुकुम जाला जे तुह्मीं किनवीस घेऊन च्यार घटिकां रात्रीं यावें. त्याप्रमाणें छ २२ रोज गुरुवारीं च्यार घटिकेस रात्रीं नवाब खाबगामध्यें बरामद जाले. मीर आलम व पागावाले व अर्जबेगी व रायेरायां वगैरे इसमांचा सलाम जाला. दौला आंतील वाटेनें आले. हातीं कांठी धरली होती. किनवींची याद केल्या प्रों हाजर जाले. हैदराबादेहून मुजफरखान आला. त्याची हुलाजमत नजर जाली. सिदी इब्रेमास यांस जगल्यालची किलेदारी होऊन खिलत

दिल्हा. यानंतर दौला व मीरअलम व किनवी यांसी तीन घटिका पावेतों खिलवत जाली. किनवीस सिरपेंच, जिगा व कंठी तीन दागिने जवाहीर व रुखसतीचें पानदान देऊन रुखसत केलें. त्याजवर येक घटिका दौला व मीर आलम यांसीं बोलणें जालें. प्रहराचें अमलांत बरखास्त जाली. याउपरी किनवी कुच करून जाणार. रा छ. २४ जाावल हे विज्ञापना.

श्री.

मार्गशीर्ष वा १० शनिवार शके १७१५ ता. २८ दिसेंबर १७९३.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसीं यांस ताा छ. २४ माहे जाावलचें पत्र + ++ + विशेष. कित्येक खुफिया वर्तमान यैकण्यांत आलें तें ताावार राजश्री गोविंदराव भगवंत यांस लिा आहे. सेवेसीं गुजराणतील. तें अवलोकनांत येऊन उत्तराविषीं आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

छ २ जाखरीं डांकेवर.

श्री.

पोष शु. ४ रविवार शके १७१५ ता. ५ जानेवारी १७९४,

श्रीमंत रावसाहेब यांस मामुलीं हवाल्याचें पत्र.

श्री.

पौष शु. ४ रविवार शके १७१५ ता. ५ जानेवारी १७९४.

विनंती विज्ञापना. दौलाकडे छ. २७ जाावलीं मी गेलों. च्यार घटका प्रथम दिवसां नवाबांनीं यांस आपला बंगला दिल्हा. त्या बंगल्यांत अंगांत डगला घालून जवळ असदअलीखां व हाकिम महमदमाखां वगैरे पांच सात इसमेंसहित होते. असदअलीखान यांनीं मालेगांवचे यात्रेंतून घोडीं खरीद करून आणिलीं तीं पाहिलीं. त्याजवर पाबेखान बीडवाला याजकडील घोड्याचीही हजरी इसमनवेसी होती. तबियत मादंगीमुळें बसण्याउठण्याची शक्ति पाहिल्यापा नाहीं व बोलण्याचा आवाजही हालका. मुखावर कांहीं म्लानता. तशांत

कामाचा क्रम चालिलाच आहे. हाकिमाची दवा नित्य घेत असतात. सांप्रत तबियत बरी आहे. रा छ. २ जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष शु. ४ रविवार शके १७१५ ता. ५ जानेवारी १७९४.

विनंती विज्ञापना. असद अलिखान यांनीं मालेगांवचे यात्रेंतून घोडे खरीद करून आणिले ते दौला पाहात असतां 'घोडे किती खरीद केले' ह्मणोन मीं विचारिलें. दौलांनीं बोलण्यांत आणिलें कीं, 'असदअलीखान मुजफरुलमुलिक यांची जामियत पांच हजारांची सुलेमानपाहासाहेब जादे यांचे पागा रिसाल्यापैकीं हाजुरजचे हुकमाप्रा. पैकीं चार हजार स्वार घोडा याजपासीं. हजार बाकी. येक हजाराची भरती व्हावयाची. त्यास चार हजार जमावांत कुलसिदर समशेर असे लोक आहेत. करोल बिलकुल नाहींत. याजकरितां येक हजार करोलाची जमियत करण्याचा ईर्षाद. हजार घोडीं खरीद व्हावयाचीं. पैकीं मालेगांवचें यात्रेंत यांनीं तीनसें घोडे पंच्यायेसी हजारांस खरीद करून आणले. आणिकही यैवज जेथें घोडीं खरीद मिळतात तेथें पाठविला. मग खरीद होऊन काय येतात पाहावें, याप्रा बोलले. रा छ. २ जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष शु. ४ रविवार शके १७१५ ता. ५ जानेवारी १७९४.

विनंति विज्ञापना. दौलाचे बोलण्यांत आलें '.कीं टिपूनें मीरकमरुद्दीखां व महमद वजीरखां व आणिक येक मातबर गृहस्त या तिघांस कैद केलें. हें एक वर्तमान. व दुसरें कलिकोट-प्रांतीं मापिलें ह्मणोन जमीनदार मुफसद भारी जमियतेचे आहेत. त्याजवर टिपूनें दोन कुशून पयेदल बार व दोन रिसाले तंबीकरितां रवाना केले होते. त्यास मापिल्यांनीं दोन कुशुन व दोन रिसाले टिपुकडी ७ लढाई करून गारत केले. हें वर्तमान टिपुस समजल्यावर खुद जातीनें मापल्यावर जाण्याचा इरादा केला आहे. याप्रा वर्तमान आहे, ह्मणोन बोलले. रा छ. २ माहे जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष शु. ४ रविवार शके १७१५ ता. ५ जानेवारी १७९४.

विनंती विज्ञापना. मिस्तर किनवी दिलावरजंग यांस नवाबांनीं रुखसत छ. २३ जाावलीं दिल्ही. इत्यादिक वर्तमानाची विनंती पेशजी लिहिल्यावरुन ध्यानांत आलें असेल. किनवीनें दौला व मीर आलम यांचा निरोप घेऊन छ. २४ रोजीं तीन प्रहर दिवसां लस्करांतुन निघोन मंगळवारपेठ येथें त्यांस जागा नवाबांनीं दिल्ही तेथें येऊन भोजन केलें. इष्टवट व आणीक दोघे सोबती त्यांस येथें ठेविलें. किनवी स्वार होऊन छ माारीं सदाशिव पेंठेच्या मुकामास गेला. हैदराबादपर्यंत रथ, घोडे, पालखी, म्याना, हाथी यांची डांक बसविली. हैदराबादेस छ. २५ रोजीं पोंहचावयाचा होता. तेथुन चिनापटणास जाणार. चेनापटणाहुन विलायतीस जाण्याचा बेत जाला. किनवीचे मुबादला दुसरा येणार, तो अद्याप येथें आला नाहीं. तुर्त इष्टवट आहे. तो आल्यानंतर मागाहुन विनंती लिहिण्यांत येईल. रा॥ छ. २ माहे जा खर हे विज्ञापना.

श्री.

पौष शु. ४ रविवार शके १७१५ ता. ५ जानेवारी १७९४.

विनंती विज्ञापना. येथील साहुकार मंडळी बेदरचे किल्याआंत हुकमाव-मोजीब छपरबंदी करुन दुकानें घालून राहिले. त्यास छ. ३० जाावल शुक्रवारीं दोन घटका प्रथम रात्रीचे समई येकायेकीं फतेदरवाज्याकडुन पस्तीस चाळीस मनुष्य हत्यारबंद साता आठाचे हातांत बलम, व सात आठ तरवारी नागव्या धरून, व पांच सातजणाचे वोंटांत धोंडे, पांच साताचे हातीं कांड्या, येकदोन पटेकरी, व तिघे दोंघे मोठे लाऊन, याप्रा प्रथम मल्हार नाइकाचे दुकानापासीं आले. त्या दुकानास ताटी लाऊन येक माणुस उभा होता. त्यानें चोर असें म्हणतांच त्यास कांठी घालुन बसविला. पुढें नन्हुमल याचे दुकानीं माणुस होता. तोही दगडानें जाया

करुन तसेंच मोतीराम टंकसाळी याचे दुकानावर पडले. तो लस्करांत गेला होता. गुमास्ता दुकानीं. त्यास बलमानें जखमी करून जिवें मारिलें. येक दोन माणसेंही चित केलीं. दुकानांतून संदका आणुन कुऱ्हाडीनें फोडला. त्यांत नगदी तोडे व सोनें रुपें वगैरे गाहाण ठेवी-सुधां यैवज होता, तो घेतला. तेथुन जमनादास धरमदास याचे दुकानावर पडुन त्याचे मेव्हण्यास जिवें मारिलें. येक गुजराथी ब्राह्मणाचा मूल तेच दिवसीं हैदराबादेहुन नवा आला तोही पुरा केला. येकदोन माणसें ठार जखमी करून जमनादासाचा संदुक फोडुन नगदी व चीजवस्त कुल वित्तविषय नेला. त्यानंतर मछुकचंद व लक्ष्मणदास अगरवाला याचे दुकानावर गेले. परंतु अवकाश पडला नाहीं. मोतीराम व जमनादास दोन्हीं दुकानचा यैवज घेऊन निघाले. वाटेंत ज्यानें चोर ह्मटलें त्यास ठार जखमी केलें. चौकांतील पिंजारी व गंजाचे बाजारचा बहेडा व रायेरायां यांचे बाजारांतील मारवाडी वगैरे सात आठ जखमी व ठार करून नीट मार्गे वासलगंजाचे दरवाज्यानें निघोन गेले. याप्रा भरले बाजारांत साहुकाऱ्यावर या बमोजीब चोरांनीं जबरदस्तीची चोरी करुन सांभाळुन यैवजसहित गेले. रा॥ छ. २ माहे जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष शु. ४ रविवार शके १७१५ ता. ५ जानेवारी १७९४.

विनंति विज्ञापना. शंकरराव भोंगे यांजकडील कांहीं जिन्नस व कापड खुदावंतपुर येथें कोमटी याचेथें होते. त्याचा पत्ता भारामल यांनीं लाऊन जिनस व कापड व ते कोमटी धरून बेदरास पाठविले. भारामल यांनीं बासमधें दौलास पत्र लिा आहे. कापड व जिनसाची मोजदाद करून घेण्याचें दौलांनीं नेमवंतास सांगितलें. रा॥ छ. २ माहे जा॥ खर हे विज्ञापना.

श्री.

पौष शु. ४ रविवार शके १७१५ ता. ५ जानेवारी १७९४.

विनंति विज्ञापना. चेनापटणाहून व्यंकटराम दिला याजकडून अखबार

आली, ती सांप्रत रा॥ केली आहे. राजश्री गोविंदराव भगवंत सेवेसी प्रविष्ट करतील. अवलोकनें मार्ग ध्यानांत येईल. उत्तराविषयीं आज्ञा जाली पाहिजे. रा॥ छ. २ माहे जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष शु. ४ रविवार शके १७१५ ता. ५ जानेवारी १७९४.

विनंती विज्ञापना. तिमराव देशपांडे वसमतकर यांचा राहातां गांव मौजें. लांक येथें सैद मुनवरखां व बाजीराव अमील यांनीं माहासरा केला. आठ दाहा दिवसपर्यंत गोळी वाजली. सेवटीं मौजे मारचें ठाणें उभयतांनीं बेतलें. आंतील चीजवस्त व तिमाराव यांचा पुतण्या व कारकून सांपडले ते धरून आणिले. दौलांस सैद मुनवरखां व बाजीराव यांचीं पत्रे सदरहुप्रा॥ आलीं. रा॥ छ. २ माहे जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष शु. ४ रविवार शके १७१५ ता. ५ जानेवारी १७९४.

विज्ञापना ऐसिजे. येथील वर्तमान ता॥ छ. २६ माहे जावल शुक्रवार पावेतों अखबार पत्रीं लेखन करून सेवेसी पत्राची रवानगी केली आहे, त्यावरून ध्यानास आलें असेल. तदनंतर येथील वर्तमान. छ. २४ रोज मंदवारीं प्रातःकाळीं नवाब जनान्यासहित शिकारीस गेले. पागावाले हुकुमाबमोजीब वाड्याबाहेर होते. परिंदाची शिकार करून येक प्रहर दोन घटिकेस डेऱ्यास आले. दौलाचे मीर आलम यासीं दौलाचें खिलवत जालें. याचा अर्ज जाला. जो रावरंभा यांचा पुत्र मुजाहिदुदौला यांजपाशीं मोंगल चाकरीस होता, त्याची तनखा चहडली सबब मागावयास गेला. बोलीचाली होतां मोगलानें कटार मुजाहिदुदौलावर चालविली. त्यानें मोगलास धरून मारिलें, त्यावरून दौलाचे रिसाल्यांतील मोगल चालुन गेले. कटकट होऊन तीन च्यार माणसें जखमी ठार जालीं. मिस्तर किनवी कुच करून हैदराबादेकडे गेला. तेथून विलायेतीस जाणार. रात्रीं दौलाची भेटी गुजरली. छ. १६ रोज रविवार

दोन घटिका प्रथम दिवसां नवाब जनान्याचे बंदोबस्तानसीं स्वार होऊन शिकारीस गेले. येक हरणाची शिकार करुन दोन प्रहराचे अमलांत डेऱ्यास आले. फौजदारखानाचा माणुस उसाचे मळ्यांत जाऊन ऊंस मोडले. गांवकरी यांनीं त्यांस धरून देवढीवर आणिलें. त्या माणसास बरतरफ करावयाचा हुकुम जाला. रात्रीं च्यार घटिकेस खिलवतीमधें नवाब बरामद जाले. सरबुलंदजंग व घांसीमिया व हिसामुदौला वगैरे इसमांचा सलाम जाला. सा'हा घटिकेस बरखास जालें. छ. २६ रोज सोमवारीं प्रातःकालीं नबाब जनान्यासुधां शिकारीस निघोन पागावाले यांस हुकुम बाड्याबाहेर शिकारीचा, त्याप्रा तेही बाहेर हजर जाले. दोन हरणांची शिकार करून दीड प्रहरास डेऱ्यास आले. रघोत्तमराव यांनीं पुण्याहुन सोळा उंट बंदुखीं पाठविल्या त्या गुजरल्या. रात्री दौलाची अर्जी व हिंदुस्थानची अखबार गुजरली. छ. २७ रोज मंगळवारीं दोन घटिकां दिवसां नबाब जनान्यासहित स्वार होऊन शिकारीस गेले. दोन प्रहरास डेऱ्यास आले. रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. च्यार घटकेस खिलवतीमधें नवाब बरामद जाले. सरबुलंदजंग व घांसीमियां वगैरे इसमांचा सलाम जाला. येक प्रहरास बरखास जाले. छ. २८ रोज बुधवारीं दोन घटिकां दिवसां नवाब स्वार होऊन शिकारीस गेले. चित्ते सोडुन दोन हरणांची शिकार केली. दोन प्रहराचे अमलांत डेऱ्यास आले. सिदी अबदुला यांजकडे गंजीकोट्यास तीनसें स्वार रवाना जाले. रात्रीं खैरसला. छ. २९ रोज गुरुवारीं दोन घटिका प्रथम दिवसां नवाब स्वार होऊन आंबराईमधें गेले. तेथें भोजन जालें. दोन प्रहरास डेऱ्यास आले. रात्रीं दोन घटिकेस नवाब बंदोबस्तानें दौलाचेथें आले. दौला व मीर आलम व पागावाले व मुनपी व रायेराया यांचा सलाम जाला. दिवाणखान्यामध्यें बरामद जाले. अजमखान पागावाले याचा भाऊ कमरुसाहेब हाणोन होता त्याचा बाका जाला. सबब मातमपुरसी अजमखान यास च्यार पारचे करचोबी दिल्हे. दौला व मीर आलम यांसीं खिलवत होऊन साहा घटिकेस बरखास जालें. रात्रीं लस्करांत चोरीनें जोरावरजंग याचे घोड्याचा कंडापटा

व दिलदारखानाचेथील दुषाला गेली. अर्ज जाला. छ. ३० रोज शुक्रवारीं दोन घटिकां दिवसां नवाब बंदोबस्तानें शिकारीस गेले. परिंदाची शिकार करून दीड प्रहरास माघारे आले. माहबतजंग याची अर्जी व दोन बंदग्या दालिबें गुजरलीं. दौलांनीं मालेगावींहुन उंट व सवदागरी आणिले ते पाहिले. रात्रीं दोन घटिकेस नवाब दौलाचेथें आले. दौला व मीर आलम व पागावाले वगैरे लोकांचा सलाम जाला. दौला व मीर आलम यांसी खिलवत जाली. साहुकाऱ्यांत किले बेदर येथें दरवडा पडोन जमनादास व मोतीराम यांची मालियत गेली, याचा अर्ज जाला. येक प्रहरास नवाब आपले मकानास गेले. छ. १ जाखर मंदवारीं दोन घटिकां दिवसां नवाब स्वार होऊन शिकारीस गेले. पागावाले यांनीं बाडाबाहेर शिकार करून येक लांडगा धरून गुजराणिला. दोनप्रहराचे अमलांत डेऱ्यास आले. औरंगाबाद येथील सुभेदाराची अर्जी व दालिबें आलीं तीं गुजरलीं. रा॥ छ. २ माहे जाखर हे विज्ञापना.

छ. ७ जाखरीं डांकेवर.

श्री.

पौष शु॥ ९ शके १७१५ शुक्रवार ता. १० जनेवारी १७९४.

श्रीमंत रावसाहेब यांस मामुली हवाल्याचें पत्र.

श्री.

पौष शु॥ ९ शके १७१५ शुक्रवार ता. १० जनेवारी १७९४.

विनंती विज्ञापना. दौलाचे बोलण्यांत आलें कीं राजश्री परशरामपंत भाऊ यांचे चिरंजीव रामचंद्रपंत फौजसुधां कोल्हापुर प्रांतीं येके मातबर गढीस लागोन लडाई करून गढी व गांव घेतला. फौज लुटावयास गुंतली. आपण जातीनें सेंदोनसें स्वार सुधां गांवापासोन येक कोसाचे फांसल्यावर उभे होते. हे बातमी कोल्हापुरकरास समजतांच त्याचे लोक हजार पांचसें येऊन रामचंद्रपंत यांस धरून घेऊन गेले. याप्रा॥ वर्तमान लिहिलें आलें.

लढाई करून प्रथम फते जाली असतां येकायेकीं अशा तऱ्हेनें दगा जाला हें मोठें ताजुब. याप्रा बोलण्यांत आलें. त्यास याचें कचें वर्तमान सरकारांत आलेंच असेल. यांजकडे सदरहुप्रा वर्तमान आलें. यांनीं सांगितलें त्याची विनंती लिा असे. दोन जखमां त्यास आहेत. राजश्री परशराम भाऊ तासगांवाहुन निघाले. तिकडे जाणार यैसें यांचें सांगण्यांत आलें. रा॥ छ. ७ माहे जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष शुा ९ शके १७१५ शुक्रवार ता. १० जानेवारी १७९४.

विनंती विज्ञापना. उमरखेडकर काा दाराकडील दोघे कारकुन भारामल यांनीं समागमें नेले होते. पैकीं भगवंतराव यांस पेशजीच उमरखेडास रवाना केल्याची विनंती लिहीण्यांत आली आहे. रामराव यांस येथें पाठऊन देण्याविषई भारामलास दौलांनीं पत्र दिल्हें तें पाठविलें. त्यावरून भारामल यांनीं समागमें स्वार देऊन मारानिलेस दौलांकडे पाठविलें. छ. ४ रोजीं बेदरास आले. छ. ५ रोजीं दौलांनीं रामराव यांस आह्मांकडे पाठविलें, आणि निरोप पाठविला कीं, यांस आपले जवळ ठेऊन घ्यावें. मावजी नाईक सोईटकर यांस हजर करणें वगैरे येकदोन जाबसालाचा गुंता आठ पंधरा दिवसांत यांनीं उरकोन उमरखेडास जावें. मजला विच्यारल्याशिवाय यांची रवानगी उमरखेडास अथवा कोठें न व्हावी, त्यास रामराव आह्मांपासीं आहेत. इतक्यावर दौलांसीं याजप्रकर्णी बोलणें होऊन जसें ठरेल तसी विनंती मागाहुन लिहिण्यांत येईल. रा॥ छ. ७ जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष शु. ९ शके १७१५ शुक्रवार ता. १० जानेवारी १७९५.

विनंती विज्ञापना. शंकरराव भोंग नागपुरास गेल्याचें वर्तमान यांजकडे आलें होतें. त्यावरून दौलांनीं माधवराव रामचंद्र, भोंसले यांजकडील, यांजकडून सेनासाहेब सुभा यांस लिहविलें कीं, शंकरराव हरामखोरी करून

पळून गेला. सरकारचा माहा सवेदार लाखोचाच. चौकशी करून जेथें शोध लागेल तेथें अटकाऊन त्यास पाठवावे.' सदरहू अन्वयें सेनासाहेबसुभा यांस भारामल यांचींही पत्रें गेलीं होतीं. त्याचे जबाब सेनासाहेब सुभा यांजकडून आले 'कीं हजरतीचे सरकारचा हरामखोर तो इकडील; त्याची तंबी जरूर. नागपुरांत शोध केला, परंतु कोठें आढळ पडत नाहीं. हजारों मनुष्याची अमद रफ्त. त्यांत असा चोरून जो येणार तो कोणें स्वरूपानें व कसा येतो हें कशावरून समजावें? तलाश फार केला, परंतु शोध लागत नाहीं; याप्रा उत्तर आलें. रा छ ७ जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष शु. ९ शके १७१५ शुक्रवार ता. १० जानेवारी १७९४.

विनंति विज्ञापना. दौलाचे बोलण्यांत आलें कीं 'अजिमुदौला कोठें गेला याचा शोध कोठेंही लागत नाहीं. इंग्रजाचे मकाणास गेला ह्मणावा तर ममइ व सुरत या दों ठिकाणचीं वर्तमानें तहकीक आलीं. अजिमुदीला तेथें नाहीं. तेव्हां कोणे ठिकाणीं गेला. मोठे ताजुब आहे. याचा शाध येथुनही होत आहे. व श्रीमंताचे सरकारांतूनही शोधं व्हावा.' ह्मणोन बोलण्यात आलें. रा छ. ७ माहे जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष शु. ९ शके १७१५ शुक्रवार ता. १० जानेवारी १७९४.

विनंति विज्ञापना. येथील साहुकाऱ्यांत दोन घटका रात्रीं चालीस पंचेतालीस मनुष्यें येऊन जमनादास व मोतीराम दुकानें दोन लुटुन वित्त विषय घेऊन गेले. त्या दिवसापासून शंभुनाथ ब्रजलाल, व बखतामल हुलासराये, व मनुलाल अपचलराये हे तीन दुकानदार मातबर, वरकड लहानमोठे सर्व हवालदील जाले आहेत. दुकानें आटोपून व्यवहार बंद. या प्रा तूर्त जालें आहे. चोरीचें बंदोबस्ताकरितां कित्यांत साहूकाऱ्यांपासीं कांहीं पाहाव्याचे जवानही दिल्हे आहेत. परंतु साहुकार लोकांस कोणे गोष्टीचा भरं-

असा वाटत नाहीं. असा प्रकार जाला आहे. रा॥ छ. ७ जाखर हे विज्ञापना.

श्री.

पोष शु. ९ शके १७१५ शुक्रवार. ता. १० जानेवारी १७९४.

* नेहमींप्रमाणें छ १ ते छ ९ बुधवार पावेतों नवाबांसंबंधीं कमठाण्याची अखबार. छ ७ जाखर.....शंकरराव भोंग यांजकडील तीनसें गाडदी बरतरफ केले.

छ. ९ रोज मकरसंक्रमण निमित्य पत्र पो.

श्री.

पोष व. ११ शके १७१५ रविवार ता. १२ दिसेंबर १७९३.

श्रीमंत राजश्री ———— रावसाहेब

स्वामीचे सेवेसीं ————

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांनमस्कार विनंति विज्ञापना. तागायतें छ ९ माहे जमादिलाखर पर्यंत मुकाम बेदर येथें स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष. स्वामीचे सेवेसीं मकरसंक्रमणयुक्त तिलशर्करासहित थैली पाठविली आहे. याचा स्वीकार होऊन उत्तरगौरवामृतसंतोषसंपन्न सेवकास करणार स्वामी समर्थ. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

* अशा प्रकारच्या अखबारांचे नमुने मागें तीन च्यारदां दिलेच आहेत. (पृष्ठें ८१, १०३, ११०, ११५, १३५, १३१) ह्मणून त्याच प्रकारचा मजकूर असेल तेथें पुनरावृत्ती टाळण्याकरितां फक्त महत्वाचा तेवढाच मजकूर तारीखवार देण्यांत येईल. बाकी मजकूर मामुली पोंच आहे असें समजावें, सम्पादक.

श्री

पौष व. १ शुक्रवार शके १७१५ ता. १७ जानेवारी १७९४.

रा छ. १४ जाखरी डांकेवर.

—श्रीमंत राजश्री ———— रावसाहेब

—स्वामीचे सेवेसीं ————

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सा नमस्कार विनंति विज्ञापन ता छ. १४ माहे जमादिलाखरपर्यंत स्वामीचें कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष. राजश्री गोविंदराव भगवंत यांचे लिहिण्यांत आलें कीं 'इंग्रज प्रकर्णी नवाबाचे थैलीपत्र श्रीमंतास आलें. त्यांत सर्व साघनें इंग्रजाचे कलमांचीं. तेव्हां सरकारांत राजश्री पाटीलबावासहित विचार जाला या प्रमाणेंच नवाबांनीं मान्य करावें.' त्याजवरून मुषीरुलमुलुक यांसी बोलण्यांत येऊन भवति न भवति जाली. आणि त्यांनीं त्याहावयास सांगितलें त्या अन्वयें राजश्री गोविंदराव यांस जाव लिहा आहे. सेवेंत विनंति करतील ते ध्यानांत येऊन उत्तराविषयीं आज्ञा जाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्री.

पौष व. २ शनिवार शके १७१५ ता. १८ जानेवारी १७९४.

छ. १५ जाखरी डांकेवर.

श्रीमंत रावसो यांस हवाल्याचें पत्र.

श्री.

पौष व. २ शनिवार शके १७१५ ता. १८ जानेवारी १७९४.

विनंति विज्ञापना. नवाब कमठाण्यावर राहिल्यास कमकसर दोन महिने होत आले. सैर शिकार जाली. सांप्रत येथून कुच करून मौजे बोरोंची व मौजे पांपाड पा हसनाबाद बेदराहून आठ कोस व कमठाण्याहून बारा कोस येथें जाण्याचा बेत ठरला आहे. दोन्हींही गांव बंजरातीरीं आहेत. तेथून

संगारडी पंधरा कोस, सदाशिव पेंठ सतरा कोस आहे. बोरोंची व पापाड येथील जागा पाहण्याकरितां लछीराम व हरकाऱ्याचा नाईक व हरकाऱ्याच्या जोड्या याप्राा पाा होते. जागा पाहून आले. नक्षा दौलास आणोन दाखविला. कमठाण्याहून कुच होण्याची तारीख छ. १७ व छ. २२ जाखर दोन आहेत. यांतून कोणे तारखेस कुच करणार त्याप्राा वर्तमानाची विनंति मागाहून लिहिण्यांत येईल. येथून निघोन जनवाडा तीन कोसांवर, येथें मुक्काम होऊन तेथुन पांपाडास जाणार. पांपाड हा रुख हैद्राबादचा आहे. पांपाडाहून आग्नेय दिशेस हैदराबाद आहे. बेदर आठ कोस पाठीमागें राहिलें. तेथून शिकार करीत कोठें कोठें फिरतात हें पहावें. रा छ. १५ जाखर हे विनंति.

श्री.

पोष व. २ शनिवार शके १७१५ ता. १८ जानेवारी १७९३.

विनंति विज्ञापना. दौलांकडे छ. १३ जाखर गुरुवारीं अस्तमानीं आह्मीं गेलों. नव खरीदीचे घोंडे वमा दवाना परंडे वगैरे जवळ तालुक्यांतून आल्या त्या पाहात होते. असदअलीखान वगैरे जवळ होते. ताळभुपाल येथील पठाण नौकर यांचे सरकारांत राहिले आहेत. त्यांनीं नजरा केल्या. त्यानंतर चोबी बंगल्या पुढील सायबानामधें बैठक जाली. मीरआलम यांस बोलाऊं पाठविलें. तेही आले. येथून कुच होऊन मौजे पांपाड व बोरोंची या जाग्यास नवाब जाणार हेंही दौलाचे बोलण्यांत आलें. तेथील नक्षा आला तो दौलांनीं दाखविला. बेदराहून ईशान्य कोनास पांपाड बोरोंची बंजरातीरीं आहेत. तेथून संगारडी पेठ पंधरा कोसावर आहे. या प्राा बोलण्यांत आलें. रा छ. १९ माहे जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष व. २ शनिवार शके १७१५ ता. १८ जानेवारी १७९४.

विनंती विज्ञापना. नवाबाकडील जासुदाचा सवाई नाईक यास दौलांनीं येथुन पुण्याकडे छ. १४ जाखरी पत्रें समागमें देऊन बाबाराव गोविंद यांज-

पासीं जाण्याचें सांगोन रवाना केलें. तो येथून दरमजल गेला. येकवीस दिवसांत सवाई नाईक यानें फिरोन हजुर यावें यैसी ताकीद त्याजला दौलांनीं केली आहे. सवाई नाइक याचे समागमें हरकाऱ्याच्या जोड्या च्यार दिल्या आहेत. यैसेंही यैकिलें कीं सवाई नाइक यानें बाबाराव यांची पत्रें नवाबांकडील डांकेवर परभारां रवाना करीत जावीं. पूर्वी रघोत्तमराव यांजपासीं लाखोटे येऊन रवाना होत होते. तसें असूं नये. याजकारितां नाइकास पाठविलें. दोहींतुन कोणता प्रकार होतो हें निदर्शनास येईल. रा छ. १९ माहे जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष व. २ शनिवार शके १७१५ ता. १८ जानेवारी १७९४.

विनंती विज्ञापना. हषमतजंग यांचे शरीरीं समाधान नव्हतें सबब भातांबरें येथून हैदराबादेस जाऊन राहिले. तेथें हषमतजंग यांचा काल जाला. या प्रा वर्तमान येथें छ. १३ जाखरीं आलें. छ. ११ तेरखेस वारले. रा छ १९ जाखर हे विनंती (?).

श्री.

पौष व. २ शनिवार शके १७१५ ता. १८ जानेवारी १७९४.

मामुली अखबार छ. ९ माहे जाखर बुधवार ते छ. १४ रोज शुक्रवार.... छ. ७ रोज शुक्रवारीं.....आवसे परगण्यांतील येक गांवचे पाटलानें पुत्राकरितां नवाबास मानत केली होती. त्यास पुत्र जाला. सबब त्यास पाटलानें आणोन नवाबाचें पायावर घातलें. मानत केली. पाटलास शंभर रुा नगदी व वस्त्रें मुलास नवाबांनीं इनायत केली.....रा छ. १९ जाखर हे विज्ञापना.

छ. १७ जाखरीं रामचंद्र भिरध्या समागमें.

श्री.

पौष व. ४ सोमवार शके १७१५ ता. २० जानेवारी १७९४.

श्रीमंत राजश्री ———— रावसाहेब

स्वामीचे सेवेसीं ————

विनंती सेवक गोविंद राव कृष्ण कृतानेक सा नमस्कार. विनंती विज्ञापना. ता छ. १७ माहे जाखर पर्यंत मुा बेदर येथें स्वामीचें कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष. स्वामीचे सेवेसीं येथुन पक्षियर त्याची जोडी दोन पिंजरे समवेत पा आहे. हे जोडी नानाप्रकारचे पांखराच्या बोल्या तऱ्हेतऱ्हेनें बोलत आहेत. व येकास येक लढाईही चमत्कारानें करीत असतात. हे पाखराची जोडी सरकारचे शिकारखान्यांत असण्या योग्य जाणुन खाना केली आहे. राजश्री गोविंदराव भगवंत सेवेसीं प्रविष्ट करितील. उत्तर खाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

सा छ १९ जाखरीं डांकेवर.

श्री

पौष वा ६ बुधवार शके १७१५ ता. २२ जानेवारी १७९४.

श्रीमंत रावसाहेब यांस मामुली हवाल्याचें पत्र.

श्री

पौष वा ६ बुधवार शके १७१५ ता. २२ जानेवारी १७९४.

विनंती विज्ञापना.—नवाब कमठाण्याहून कुच करून पांपाड व बारोंचीस जाण्याचा बेत ठरला होता. याची ता विनेती पेशजी लिहिली. त्यास पांपाड बारोंचीकडे जाण्याचें तुर्त मवकुफ होऊन छ १९ तारखेस नवाब कमठाण्याहून कुच करून किले बेदरास येण्याचें ठरलें. च्यार पांच दिवस बेदरांत राहून मग जनवाडा येथून तीन कोसांवर नैरुत्येकडे कारेमुंगी परगण्याचा गांव, येथें जाऊन राहण्याचा बेत जाला आहे. दौला जनवाडयास जाऊन जागा पाहून आले. तेथील नक्षा करुन नवाबास आणून दाखविला. जनवाडयांत लोकांचीं घरें होतीं, तीं तमाम खालीं करविलीं. गांवांत जाऊन नवाब राहणार. वाडा कमठाण्यास होता तो उठऊन जनवाडयाकडे नेउन बसविला आहे. पेषखाना डेरे वगैरे सरंजाम जनवाडयाकडे गेला. राज्याजीस ताकीद जाली कीं तुर्ती जनवाडयास जाऊन तेथील राहण्याचा बंदोबस्त मिसलबंदी-

सुद्धां करणें. त्यावरून राज्याजी दोन दिवसांपासोन नेहमीं तेथें आहेत. जनवाडयाचे गांवाबाहेर पेठेची वस्ती आलाहिदा होती, तेथीलही घरें झाडून रिकामीं करविलीं. नवाब बेदरास येऊन च्यार पांच दिवसांनंतर जनवाडयास जाऊन राहाणार. तेथें किती मुकाम होतात व पुढें तेथून कोणीकडे शिकार करीत जाणार हें निदर्शनास येईल त्याप्रा विनंती मागाहुन लिहिण्यांत येईल. कारेमुंगी तालुका सरबुलंदजंग पागावाले यांजकडे आहे. त्यांनीं दोन तीनसें लोक सिंवाराचे रखवालीकरितां ठेविला आहे. तथापि कहीकवाडाचा उपसर्ग लोकांचा होतच आहे.. छ १८ जाखरीं कमाठणें येथें बागड जाली. छ. १९ अगर २० या दोन तारखेंतून येके तारखेस कुच करुन नवाब बेदरचे हवेलींत येणार. हवेलीचा झाडा जाला. रा छ. १९ माहे जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष व. ६ बुधवार शके १७१५ ता. २२ जानेवारी १७९५.

मामुली अखबार छ १३ माहे जाखार गुरुवार ते ताा १८ रोज मंगळवार पावेतों.

+ + + + ताा १६ रोज रविवारीं.....मुसारेहमुपासीं येक फरासीस नवा नौकरीचे उमेदवारीनें आला. त्याची मुलाजमत नजर जाली. जनवाडयाचा नक्षा दौलांनीं दाखऊन जागा पाहून आले त्याचा बयान केला. साहा घटिकेस बरखास जालें. रा ताा छ १९ जाखर हे विज्ञापना.

छ २० जाखरीं डाकेवर.

श्री.

पौष वा ७ गुरुवार शके १७१५ ता. २३ जानेवारी १७९४.

श्रीमंत रावसाहेब यांस मामुली हवाल्याचें पत्र.

विनंती विज्ञापना. मौजे कमठाण्याहुन कुच नवाबानीं छ. १९ माहे जाखर बुधवारीं पाव घटिकां प्रथम दिवसां केलें. अंबारीमध्यें हाथीवर सवार

ाले. खवासीमधें दौला व मीरआलम उभयतां होते. तमाम फौज बराबर होती. सवा प्रहर दिवसां किले बेदरचे हवेलीस नवाब दाखल जाले, पांच सात मुकाम येथें होण्याचा बेत आहे. पुढें जनवाडयास जाऊन राहावयाचा बेत निश्चय जाला. कुल असबाब डेरे वगैरे जनवाडयावर उभा राहिला आहे. मागाहुन विनंती लिहिण्यांत येईल रा छ.२० जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष व. ७ गुरुवार शके १७१५ ता. २३ जानेवारी १७९४.

विनंती विज्ञापना. दारा ज्याहा बाहदुर माहबतजंग यांचे शरीरीं समाधान नव्हतें. त्यांचा काल जाल्याचें वर्तमान नवाबांकडें छ. १८ जाखर मंगळवार रात्रीं आले. नवाबांनीं यैकुन बहुत अपसोस केला. माहालांत बेगमां आदि-करून सर्वांचा आकांत रात्रीं मोठा जाला. नौबत मना केली. कुच कर-ण्याचा हुकुम आधीं जाला होता. त्यानंर तीन च्यार घटकेनें हें वर्तमान आलें. छ. १९ रोजीं नबाब स्वार होऊन सवा प्रहर दिवसां किले बेदरास दाखल जाले. तेही मोठे उदासीनपणें. खवासींत दौला व मीर आलम होते. गमी करून कोणासीं न बोलतां दाखल जाले. रा छ. २० माहे जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष व. ७ गुरुवार शके १७१५ ता. २३ जानेवारी १७९४.

विनंती विज्ञापना. हशमतजंग वारले. सबब त्यांजकडील जागिरीचे गांव मौजे भातांवरें पा भालकी वगैरे पांच गांवची जती नवाबांचे सरकारांतुन जाली. रा छ. २० माहे जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष व. ७ गुरुवार शके १७१५ ता. २३ जानेवारी १७९४.

विज्ञापना. यैसीजे. येथील वर्तमान तागा छ १८ माहे जाखर मंगळवार पावेतों अखबार पत्रीं लेखन करून सेबेसीं पत्राची रवानगी केली

त्यावरून ध्यानांत आलें असेल. तदनंतर येथील वर्तमान छ. मारीं रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. उदईक कुच करावयाचें ह्मणोन त्यांची अर्जी दसखत होऊन आली. चार घटिका रात्रीं आदवनी राये चुरचें वर्तमान आलें कीं दारा ज्याहा माहाबतजंग यांचा वाका जाला. त्यावरून नौबत मना जाली. छ. १९ रोज बुधवारीं प्रातःकालीं सवारीचा हुकुम होऊन लवाजिमा हजर जाला. जनान्याचे रथ पुढें वाटे लाऊन नवाब पांच घटिकेस दिवाणखान्यामधें आले. दौला व मीर आलम व पागावाले व रायेरायां व असदअलीखां वगैरे मामुली लोकांचा सलाम जाला. हाथीवर अंबारीमधें नवाब सवार जाले. खवासीमधें दौला व मीर आलम होते. वासल गंजाचे दरवा. ज्यानें सवा प्रहर दिवसां बेदरचे हवेलीस किल्यांतील दाखल जाले. गांवांत दाखल होते समई येक स्वार विहरींत घोडयासुद्धां पडला. दुसऱ्या दरवाज्यांत दाटीमुळें दोन माणसें जायां जालीं. रा छ. २० जाखर हे विज्ञापना.

छ. २२ जाखरीं डांकेवर.

श्री.

पौष व. ९ शनिवार शके १७१५ ता. २५ जानेवारी १७९४.

श्रीमंत रावसाहेब यांस मामुली हवाल्याचें पत्र.

श्री.

पोष व. ९ शनिवार शके १७१५ ता. २५ जानेवारी १७९४,

विनंती विज्ञापना. नवाब कमठाण्याहुन छ. १६ माहे जाखर बुधवारीं बेदरचे हवेलीस दाखल जाल्याचें वर्तमानाची विनंती डांकेवर यापूर्वी लिहिण्यांत आली आहे. छ. २० रोज गुरुवारीं बेदर येथें मुकाम जाला. छ. २१ रोज शुक्रवारीं प्रातःकाळीं नवाब गदीचे हाथीवर सवार जाले. दौला व मीरआलम व पागावाले आदिकरून अलाहिदा हाथीवर, याप्रा स्वार होऊन प्रथम प्रहर दिवसां जनवाडयास दाखल जाले. बाडा अगादर रायेराया यांनीं जाऊन तेथें बसविला आहे. येक महिन्याचा सरंजामही तेथें गेला. इतक्यावर

जनवाडे येथें किती मुकाम होतात पुढें कोणीकडे जातात हें ठरेल त्याप्रा विनंती मागाहुन लिहिण्यांत येईल. रा छ. २२ जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष व. ९ शनिवार शके १७१५ ता. २५ जानेवारी १७९४.

विनंती विज्ञापना. चेनापटणाहुन व्यंकटरामदिला. याजकडुन अस्वबार आली ती रा केली आहे. राजश्री गोविंदराव भगवंत सेवेसीं प्रविष्ट करतील. अवलोकनें मार ध्यानांत येईल. उत्तराविषयीं आज्ञा जाली पाहिजे. रा. छ. २२ जाखर हे विज्ञापना.

श्री.

पौष व. ९ शनिवार शके १७१५ ता. २५ जानेवारी १७९४.

विज्ञापना येसीजे. येथील वर्तमान ता छ. १९ माहे जाखर बुधवार पावेतों अखबार पत्रीं लेखन करुन सेवेसीं पत्राची रवानगी केली त्यावरुन ध्यानांत आलें असेल. तदनंतर येथील वर्तमान. छ. मारीं रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. रायेरायां यांस हुकुम जाला जे जनवाडयास जाऊन बाडा बसवणें. छ २० रोज गुरुवारीं तीन घटिकां प्रथम दिवसां लालबागांमर्ये नवाब बरामद जाले. जनान्याचा बंदोबस्त केला. नवा दिवाणखाना पाहिला. त्यानंतर येक प्रहर च्यार घटिका दिवसां खिलवतीमधें नवाब बरामद जाले. आपज्यां उलमुलुक व येकरामुदौला वगैरे लोकांचा सलाम जाला. रायेरायां यांनीं प्रातःकालीं जनवाडयास जाऊन बाडा बसविल्याची अर्जी पा. ते दौलाचे अर्जी सहित गुजरली. लालन हज्यामाची याद केली. तो हजर जाला. हज्यामत होऊन येक प्रहर सात घटिकेस बरखास जाले. दौलाची अर्जी गुजरली. उदईक कुच करून जनवाडयास जाण्याचें दसखत जालें. छ २१ रोज शुक्रवारीं गजर समई प्रातःकालीं सवारीचा हुकूम होऊन लवाजिमा हजर जाला. जनान्याचे रथ पुढें रा केले. दौला व पागावाले व मुनषी व असदअलीखां वगैरे सरदार मनसबदार मुतसदी सर्व हजर जाले. लालबागामधें नवाब बरामद जाले. सफेत पोषाग व हिऱ्याचें जवाहिर घालुन हाथी जर्द

गदीचा त्याजवर नवाब सवार जाले. पिछाडीस मनु छत्री घेऊन उभा होता. दौला व मीरआलम व सरबुलंदजंग व घांसीमियां व अजमखा वेगळाले हाथीवर, याप्रा सवार होऊन दिली दरवाज्यानें शुक्रतीर्थाचे रस्त्यानें येक प्रहराचे अमलांत जनवाडे येथें दाखल जाले. सा छ. २२ जाखर हे विज्ञापना.

छ १८ जाखरी डांकेवर.

श्री.

पौष व. ३० शुक्रवार शके १७१५ ता. ३१ जानेवारी १७९४.

श्रीमंतरावसाहेब यांस हवाल्याचें पत्र.

वरील पत्राचा पृष्ठांक २६३ आहे. पुढें ३०६ पावेतों पृष्ठें उपलब्ध नाहींत. संपादक.

माघ वा १२ गुरुवार शके १७१५ ता. २७ फेब्रुवारी १७९४.

+ + + रुदौला व अजिमुदौला यांच्या नजरां जाल्या. नाच रागरंग पाहुन येक प्रहर साहा घटिकेस जनवाडयास दाखल जाले. छ २० रोज शुक्रवारीं दोन घटिका दिवसां नवाब नदीकडे जाऊन माशाची शिकार करुन दोन प्रहराचे अमलांत आले. दारकोजी पाटणकर यास इस्तकबाल बक्षीखान्याचे दारोगे यास पाठविलें. रात्रीं साहा घटिकेस नवाब दौलाचे मकानास आले. दौला व पागावाले व अर्जबेगी व मुनषी व रायेरायां वगैरे मामुली इसमांची सलाम जाला. दारकोजी पाटणकर याची मुलाजमत होऊन अकरा इसमांची नजर जाली. हषमतजंगाचे पुत्रास मातमपुरसी तीन पारचे कारचौबी दिल्हे. कंचन्याचा नाच होता. दौलासीं बोलणें होऊन येक प्रहर दोन घटिकेस बरखास जालें. छ. २१ रोज मंदवारीं प्रातःकालीं नवाब नदी किनारियास गेले. सैर करून एक प्रहर तीन घटकेस जनवाडयास आले. तीन प्रहरास फिरोन नवाब सवार होऊन गेले. दौला हुकमाबमोजीब आपले चावडीवर गेले. रात्रीं नाच, रोशनी, आतषबाजी जाली. छ. २२ रोज रविवारीं प्रातःकालीं सैद उमरखां याने मासे धरुन गुज-

रांणिले. प्रहराचे अमलांत जनवाडयास आले. येक प्रहर पांच घटिका दिवसां खबाबगामध्यें नबाब बरामद जाले. जंगु व मनुचा सलाम जाला. लालन हजामाची याद केली. तो हजर हजामत होऊन दोन प्रहरास बरखास जालें. लोदीखानास इस्तकबाल मुजाहिदु दौलास पाठविलें. च्यार घटिका दिवस राहात नबाब जनान्यासहित स्वार होऊन शिकारीस नदीकडे गेले. लोदी खानाचे पुत्रास मातमपुरसी तीन पारचे दिले. महमंद हुसेनखा घटाल्या तालुक्यांतुन दोनसें स्वारानसीं लस्करांत आला. अर्ज जाला. छ २३ रोज सोमवारीं येक प्रहर bl&r घटिका दिवसां नबाब जनवाडयास आले. दौलांनीं कंदुरीची तयारी करुन अर्जी पाठविली. त्याजवरून दोन प्रहर दोन घटिका दिवस नबाब दौलाचे येथें आले. भोजन होऊन दोन प्रहर च्यार घटिकेस दौला व मीर आलम व पागावाले वगैरे इसमांचा सलाम जाहला. नाच रागरंग पाहुन येक प्रहर येक घटिका रात्रीं हवेलीं गेले. छ २४ रोज मंगळवारीं तीन घटिकां दिवसां नबाब सवार होऊन नदीकडे गेले. च्यार माशांची शिकार करून येक प्रहर साहा घटिकेस आले. तीन प्रहरास दौला येकरामु दौलाचेथें जाऊन आले. मगरबाचे समई नबाब येकरामुदौलाचे घरास गेले. दौलाही हजर जाले. नाच रागरंग पाहुन बरखास जाले. येक प्रहर दोन घटिकेस हवेलीस गेले. छ. २५ रोज बुधवारीं दोन घटिका दिवसां रथामधें नबाब सवार होऊन इसलामपूरचे नाल्याकडे गेले. सीकार न होतां येक प्रहर साहा घटिकेस फिरोन आले. मीर पोकदअली व सुभानअली व जुल्फुकरअली तिघे साहेब जादे यांचे कबीले हैदराबादेहुन आले. बखतमलाचा दत्तपुत्र मेला, सबब दुकान जप्ती करविलें. रा छ २६ रजब हे विज्ञापना.

श्री.

माघ व. १२ गुरुवार शके १७१५ ता. २७ फेब्रुवारी १७९४.

विनंती विज्ञापना. रणदुलाखान करनुळकर यांचें पत्र दौलास आलें. त्यांत वर्तमान लिहिलें कीं 'टिपु पटणाहुन निघोन मांगडीस आला. तेथील किल्याचा बंदोबस्त करुन बागेरुलास दाखल जाल्याची बातमी आली. पुढें

कोणीकडे इरादा करील नकळे! करनुल बाबत पेषकसीचा जाबसालही त्यांचे चित्तांत आहे, तेव्हां कसें पडेल? याप्रो भयाभीत होऊन लिहिलें तें पत्र दौलांनीं वांचून पाहून बोलले कीं 'आतां टिपु पासोन भय वागवावें ऐसें नाहीं. अथवा त्यानेंही इकडील भयाचा अंदेश करावा ऐसें राहिलें नाहीं.' याप्रो बोलले. उगेच वर्तमान समजण्यांत आलें त्याची विनंती लिहिली असे. सा छ २६ रजब हे विज्ञापना.

श्री.

माघ व. १२ गुरुवार शके १७१५ ता. २७ फेब्रुवारी १७९४.

विनंती विज्ञापना. सांप्रत लस्करांत धारण वजन पके

८।६ जोरी दादरी

८।७ बाजरी

८।१ गहूं

८।१ तांदूळ मोठे

८।९ हरभरे

८।३ दाळ तुरीची

८८१।।। तूप

८८३ तेल

८। मुग

८।५ उडीद

८। मीठ

सदरहु प्रमाणें धारण छ २९ रजबीं आमखास बाजारांत जाली. यापूर्वी च्यार दिवसांमागें या निरखाहून कमी सेर दीड सेर धारण होती, ती हल्लीं महसुलांत अडीच आणे सूट पडली, सबब ताकीद करोडे वगैरेस होऊन धारण हालीं असी आहे. याजहुनही पुढें सेर दोन सेर जास्त करावी असी ताकीद आहे. सा छ. २६ रजब हे विज्ञापना.

छ २९ रजबीं संक्रमणाचे तिळाचा जाब निंबाजी
नाा यापासीं जिल्हा.

श्री

फाल्गुन शु. १ रविवार शके १७१५ ता. २ मार्च १७९४.

श्रीमंत राजश्री ———— राव साहेब

—स्वामीचे सेवेसीं ————

विनंती सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साा नमस्कार विनंती विज्ञापना. ताा २९ माहे रजब पर्यंत माा जनवाडा येथें स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष. सरकारांतून छ. १० माहे जाखरचें पत्र सादर जालें तें छ. १९ माहे माारीं पावलें. "त्यांत मकर संक्रमणाचे तिळ शर्करायुक्त पाा आहेत, घेणें" ह्मणोन आज्ञा. यैसीयास पत्र व संक्रमणाची थैली सिरसा वंदन करून स्वामीरोवामृतसंतोषसंपन्न सेवक सनाथ जाला. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

साा छ ४ माहे शाबान रवानगी डाकेवरुन.

श्री.

फाल्गुन शु. ६ शुक्रवार शके १७१५ ता. ७ मार्च १७९४.

श्रीमंत रावसाहेब यास मामुली हवाल्याचें पत्र.

श्री.

फाल्गुन शु. ६ बुधवार शके १७१५ ता. ७ मार्च १७९४.

विनंती विज्ञापना. दौलाची नात सैफनमुलुक यांची कन्या गफुरजंगाचे लेकीपाशी जाली ती मीर पोलादअली सिकंदर ज्याहा बाहादुर साहेब जादे यांस देण्याचा निश्चय होऊन छ. ३० माहे रजबीं पखतखोरी जाली. नवाब दौलाचे वरास आले. जनानाही समागमें होता. सारबतखोरीचा समारंभ दौलांनीं नवाबास व माहालांत नजरां केल्या. सिकंदर ज्याहा यांस चढावाचे खालें पोषाग व जवाहीर सरपेच जिगा कंठी व तुरा भुजबंद या

प्रो मीर आलम व अर्जबेगी या समागमें पाठविला. षादी छ. १५ माहे षाबानापासून शुरु होणार. सैफनमुलुक यांची दुसरी कन्या हरम झणजे राखीचे पोटची ती असद अलीखानाचे पुत्रास देण्याचा नेम धरुन त्याचीही शरबतखोरी व चढावा छ मारींच जाला. रा छ. ४ माहे षाबान हे विज्ञापना.

श्री.

फाल्गुन शु. ६ शुक्रवार शके १७१५ ता. ७ मार्च १७९४.

विनंती विज्ञापना. सिकंदर ज्याहा मीर पोलाद अली यांची षादी व्हाव-याची याचा समारंभ भारी होणार. जनवाडा येथें जागा प्रशस्त नाहीं. सबब बेदर येथें मंगळवार पेठेंत जाऊन राहावें. तेथें षादी व्हावी ऐसा बेत ठरला आहे. येथुन छ. ९ साबानीं कुच करून मौजे चिलरगी पो करिमुंगी येथें पांच सात दिवस राहावें; तेथुन मंगळवार पेठेंत जाऊन राहावें ऐसें घाटत आहे. ठरेल त्याप्रमाणें विनंती मागाहुन लिहिण्यांत येईल. रा छ० ४ माहे षाबान हे विज्ञापना.

श्री.

फाल्गुन शु. ६ शुक्रवार शके १७१५ ता. ७ मार्च १७९४.

विनंती विज्ञापना. नवाबाचे सरकारांतुन सवाई नाईक पुण्यास पेशजी पुण्यास गेला होता. तो तिकडुन येथें छ. ३० रजबी आला. राजश्री कल्याण-राव व बाबाराव गोविंद यांचीं पत्रें समागमें घेऊन आला तीं दौलास देऊन दौलाचें व सवाई नाइकाचें बोलणें च्यार साहा घटका जालें. त्याजवर दौलांनीं नवाबास अर्जी पाठविली त्याजवरुन सवाई नाइकास घेऊन येणें ऐसा हुकुम जाल्या बमोजीव दौला नाइकास आपले बराबर घेऊन नवाबाकडे गेले. नवाबांनीं सवाइ नाइकास वर्तमान विच्यारिलें. यानें अर्ज केला. कल्याण-राव व बाबाराव यांचीं पत्रें दौलांनीं दाखविलीं. त्याजवर दोन घटका दौलासीं खिलवत जालें, सवाई नाइक नासिक प्रांताकडे गेला होता झणोन ऐकण्यांत. रा छ. ४ षाबान हे विज्ञापना.

श्री.

फाल्गुन शु. ६ शुक्रवार शके १७१५ ता. ७ मार्च १७९४.

विनंति. करनुल संस्थानचा अधिकार अलफखान याजकडे जाला. त्याजकडुन रणदुलाखान येथें येऊन करनुलास गेल्यानंतर अलफखान व रणदुलाखान या उभयतांचें वयमनस्य येऊन सांप्रत रणदुलाखान व अकबर अलीखां म्हणोन रणमस्त खानापासुन मातबर त्याचे सलाह मसहलतींत होता त्यास व मुस्तफाखान यां त्रिवर्गास अलफखानानी कैद केलें. लोकांस नित्य उपद्र(व) तालुक्याची खराबी. कुणी चांगला राहिला त्यास नागवणें. याप्रमाणें जालमी व जलालीची चाल अलफखानाची ऐसें वर्तमान नवाबांकडे आले. रा छ. ४ पावान हे विज्ञापना.

श्री.

फाल्गुन शु. ६ शुक्रवार शके १७१५ ता. ७ मार्च १७९४.

विनंती विज्ञापना. चेनापटणाहुन व्यंकट रामदीक यांजकडील अकबरां दोन आल्या. त्या रवाना केल्या आहेत. राजश्री गोविंदराव भगवंत सेवेसीं प्रविष्ट करितील. अवलोकनें मार ध्यानांत येईल. उत्तरा विषई आज्ञा जाली पाहिजे. रा छ ४ पावान हे विज्ञापना.

श्री.

फाल्गुन शु. ६ शुक्रवार शके १७१५ ता. ७ मार्च १७९४.

ता छ. २९ माहे रजब ते छ. ४ सावान पावेतों मामुली अखबार. या अखबारांत विशेष महत्वाचा मजकुर नाहीं. मागें आलेल्या शादीचा थोडासा उल्लेख आहे. सं.

छ १० सावानीं डांकेवर.

श्री.

फाल्गुन शु. १२ गुरुवार शके १७१५ ता. १३ मार्च १७९४.

श्रीमंत रावसाहेब यांस मामुली हवाल्याचें पत्र.

विनंती विज्ञापना. छ. २ सावान बुधवारीं रात्रीं दौलांकडे मी सरकारचें थैलीपत्र सिंदे प्रकर्णी नरवास आलें तें जाबसाकारितां गेलों. मीर आलमही

होते. मी आल्याची इतला दौलांनीं नवाबास अर्जी पाठविली. त्याजवर दस. खत होऊन आलें कीं बरामद जाल्यानंतर फलाण्यास आह्मांकडे पाठवणें. नवाब बरामद होऊन चोपदार येतांच मी नवाबांकडें गेलों. जाते समई दौला बोलले कीं हाजरतीपासीं जाऊन तेथुन फिरोन मजकडे आपण यावें. नवाबांकडे गेलों दरबार जाला होता. नाचही होत होता. सिकंदर ज्याहा साहेब जादे यांचे पादीचा निश्चय जाल्याच्या नजरांही लोकांनीं केल्या. सरकारचें थैलीपत्र नवाबांस प्राविष्ट केलें त्याजवर नवाबाचें बोलण्यांत आल्याची ता। विनंति अलाहिदा पुरवणी पत्रीं लिा आहे त्यावरुन ध्यानांत येईल. रा छ. १०बाबान. हे विज्ञापना.

श्री

फाल्गुन शु. १२ गुरुवार शके १७१५ ता. १३ मार्च १७९४.

विनंती विज्ञापना. नवाबांनीं बोलण्यांत आणिलें कीं 'सिकंदर ज्याहा बाहादूर यांची षादी करण्याचा निश्चय जाला. त्यास या षादीचे समारंभांत राव पंत प्रधान यांनीं येण्याची यैनसलाह आहे. राव पंत प्रधान यांस पाहावें हें बहुत दिवसांपासोन आमची खाहेव आहे. त्या गोष्टीचा इत्यफाक या षादीचे खुषीचे समारंभांत घडावा हें फार चांगलें यैसें समजोन राव पंत प्रधान यांस आह्मीं पत्र या मुकदम्याविषईं तयार करविलें रवाना होत आहे. तुह्मीं हे मरातब मुफसल लेहुन त्याचें येण्याची इतला लौकर करावी. दोन्ही रियासतीं पुस्तैन पासोन येक जुदाई नाहीं. त्या अर्थी राव पंत प्रधान यांनीं अनमान न करितां षादीस जातीनें यावें हें त्यांस लाजम आहे. याप्रा। बोलण्यांत आलें. या प्रकारीं पत्रें यांनीं राजश्री रघोत्तम राव यांजकडे रवाना केलीं आहेत. त्यास विनंती कीं येविषीं बोलण्याचा प्रकार आज्ञा येईल त्या प्रा। बोलण्यांत येईल. 'आपले सरदार व मुतसदी सुधां येऊन लग्नाची शोभा करावी' ह्मणोन हौसेनें सांगुन बोललें कीं 'याचें उत्तर लौकर आणवावें. तोंपर्यंत षादीची तारीख मुकरार करीत नाहीं. च्यार दिवस षादी लांबवावयास येईल, चिंता नाहीं. 'येण्यास फार दिवस लागतील, आणि

शादी तर लौकर होणार' असें कदाचित म्हणतील तर त्यांचे येण्याचा सुमार पाहुन मग तारीख ठरण्यांत येईल. पंत प्रधान यांचे येण्यांत दोन खुब्या. येक तर, जन्म त्यांचा जाला त्या दिवसांपासोन त्यांस पाहावें ही उत्कंठा. दुसरें, त्यांचे षादीस सिकंदर ज्याहा गेले; यांचे षादीस राव पंत प्रधान आले. दोही दौलतीची असी बाहदीयेत याचा लौकिक दिगांत होईल. विलायेत पर्यंत सर्व दौलतदारांनीं आश्चर्य मानावें, ही दुसरी खुबी. यास्तव येणें व्हावें. याची इंतजारी आहे. याप्रा ताबार लिहुन लौकर उत्तर आणवा म्हणोन सांगितलें, त्याजवरुन लिा आहे. सदरहुचा जबाब विस्तारें करुन यावा. त्या अन्वयें यांसीं बोलण्यांत येईल. रा॥ छ. १० षाबान हे विज्ञापना.

श्री.

फाल्गुन शु. १२ गुरुवार शके १७१५ ता. १३ मार्च १७९४.

विनंती विज्ञापना. दौलाचे बोलण्यांत आलें कीं 'सिकंदर ज्याहा बाहदुर साहेबजादे यांचे षादीस श्रीमंतांचें येणें व्हावें येविषीं हाजरतीनीं श्रीमंतास पत्र लिा आहे. त्यास त्यांचें येणें घडावें हें यैन सलाह आहे. येण्यास कांहीं अनमान करतील कीं काय? म्हणोन विच्यारिलें. मीं उत्तर केलें कीं "दोन्ही सरकारची बाहदीयस्त व येकदिल, त्या अर्थी अनमान कशाकरितां व्हावा? मगर कांहीं अडचण असल्यास नकळे.' दौला बोलले कीं 'टिपु व इंग्रज या दोन दौलतदारासीं सलूख व फजल इलाही घरचाही बंदोबस्त खातरखी कोणतीही अडचण नाहीं. अशा प्रसंगीं श्रीमंतांचें येणें होऊन परस्परें मुलाकात व षादीचा समारंभ. यांत हाजरतीची चित्तापासोन खषी. व सर्वांत चांगलें दिसेल. पत्रें रवाना होतात व तुम्हींही हा मा श्रीमंतांस ल्याहावा. षादीस येण्याची इतला लौकर व्हावी. हाजरत इंतजारी करीतात." याप्रों दौलाचे बोलण्यांत आलें. रा॥ छ. १० षाबान हे विज्ञापना.

श्री.

फाल्गुन शु. १२ गुरुवार शके १७१५ ता. १३ मार्च १७९४.

विनंती विज्ञापना. नवाब जनवाड्याहून कुच करुन छ. ११ साबानीं

बेदर येथील मंगळवार पेठेंत येणार. कारखान्यास तमाम हुकुम जाला. षादीचा समारंभ होणें त्यास जागा प्रशस्त पाहिजे. बेदरचे किल्यांत पहिलें नवाब होते ते जागा अडचणीची, व जनवाडा येथें केवल संकोचित, जाणून मंगळवार पेठ येथील झाडुन लोकांचीं घरें खालीं करऊन नक्षा करुन राज्याजींनीं आणोन दाखविला. नागझरी पोटीं घेऊन भोंवता बाडा दीड कोस दोन कोस पर्यंत बसउन बंदोबस्त करविला. साहेब जादे यांची षादी रमजानचे महिन्यांत व्हावी. अद्याप पवाल! अद्याप मुकरर जालें नाहीं. परंतु तयारी सरंजामाची ज्याबज्या ताकिदी करुन होत आहे. मंगळवार पेठेंत नवाब आल्यानंतर कांहीं दिवस राहुन बारोंचीस जाण्याचाही बेत आहे. तेथील षैर षिकार करुन फिरून मंगळवार पेठेंत येणार. तदनंतर षादीची शुरुवात, यैसेंही आहे. होईल त्याप्रा विनंती लिहिण्यांत येईल. नवाब बोलले कीं 'मंगळवार पेठेंत तुमचे येथें आह्मीं राहावयास येतों'. मीं उत्तर केलें कीं 'आम्हीं राहतों तेथें आपण येऊन षादी करितात याजपेक्षां अधिक काय आहे! ज्या जाग्याचें नसीब थोर म्हणोन हजरतीचे मनांत आलें.' हें बोलणें यैकुन संतोष मानला. राजे रायेरायां यांस सांगितलें कीं किल्यांतील हवेल्या यांस राहावयास खालीं करुन द्याव्या. त्याजवरुन देशपांडे आदिकरून मुलें माणसें काढावयाची झिकर. ती जागा पाहावयास मी गेलों होतों. देशपांडे यांचे घरचें पंनास मनुष्य कुटुंबाचें आहे. बायका पोरें येकच कलकलाट जाला. त्यांनीं निघोन दुसरें ठिकाणीं राहावें तर बाईकांपोरें आणि असबाब कोठें ठेवावा? ठिकाणा नाहीं! सरकारची तर सख्ती! तेव्हां त्या देशपांडे यांचें मीं समाधान केलें. त्यांचें दुःख पाहावेना! बाहेर येक आंबराई पाहून डेरे देऊन तेथें राहिलों. नवाबांनीं सांगून पाठविलें कीं घरांत जाऊन राहिला कीं नाहीं? जर नाहीं म्हणावें तर वाईट मानतील कीं 'आह्मीं मंगळवारांत यांचे जाग्यावर राहिलों हें वाईट वाटलें, याजकरितां बाहेर राहिलें.' यास्तव सांगोन पाठविलें कीं त्या जाग्यांत पडझड फार जाली. मरमत करावयाची. तूर्त तयार होण्यास चार दिवस लागतील. याजकरितां

आमराईत राहिलों. याप्रा गरीबगुरबा यांस अतिशय उपद्रव! लिहिण्यांत किती ल्याहावें ? सीमा जाली ! रा छ १० षाबान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १२ बुधवार शके १७१५.

विनंति विज्ञापना. सिकंदर ज्याहा साहेब यांचे षादी संबंधानें यांनीं पत्रें पाठविण्याची योजना केली—

१२ पुणियास

१ सरकारांत.
१ नाना.
१ हरिपंततात्या.
१ आपा बळवंत.
१ गोविंदराव भगवंत.
१ बाबाराव गोविंद.
१ रघोतम हैबतराव.
१ दौलतराव सिंदे.
१ आबा चिटणीस.
१ कल्याणराव कवडे.
१ अंबाबाई कल्याणराव यांची. स्त्री व बायाबाई कन्या येा। २

१२

३ नागपुरास

१ रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा.
१ भवानी काळो.
१ आनंदराव नरसिंव्ह.

३

५ इंग्रजांस

१ मिस्तर ज्यानषोर जनराल कलकत्तेकर.
३ पहिले वकील येथें होते त्यांस.

१ मिस्तर हालन.
१ मिस्तर ज्यानसेन.
१ मिस्तर किनवी दिलावरजंग.

३

१ चेनापटणचे गौरनरास.

६

१ महमद अली वालाज्याहा बाहादुर यांस.
४ टिपुकडे
१ टिपु सुलतान
२ त्यांचे पुत्र दोघे चेनापटण येथें त्यांस.
१. गुलामअली.
१ रजाअली.

४

याप्रा॥ पत्रें तयार करविलीं. पो कांहीं रवाना जालीं व होणार. याशिवाय करनुळकर आदिकरुन सर्वांस पादीस येण्याचीं पत्रें सिद्ध करविलीं आहेत. रा॥ छ. १० षाबान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १२ बुधवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. करोडगिरीचें काम कृष्णमा यांचा पुत्र व त्याचे नायब हासन अलीखां यांजकडे होतें तें तगीर करुन सिदी इमाम यांचा साडू नूर महमदखां यांजकडे करार होऊन छ ९ साबानीं त्यास करोडगिरीचा खिलत दिल्हा. करोडगिरी व पंचोत्रा दोन्हीही कामें नूर महमदखां यांजकडे जालीं. रा॥ छ. १० षाबान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शुं. १२ बुधवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. दौलतराव सिंदे यांनीं दौलांस व नवाबांस पत्रें कारकुनासमागमें कल्याणराव व बाबाराव यांचे पत्रांसहित हरराव यांजकडे आलीं. त्या कारकुनास प्रथम दौलांसीं भेदऊन छ. ७ साबानीं नवाबाची मुलाजमत केली. पत्रें प्रविष्ट करुन जिनस, नवाबांस पोषाग, बिलोरी रिकाब्या, प्याले, व मोमबतीचे दुपेालां येक शालो याप्रो जिनस गुजराणिली, ऐसें वर्तमान ऐकिलें. हरराव याचे मारफात गुजरलें. त्याजवरून बोलण्यांत कीं दौलतराव यांजकडुन आलें. मनांत येण्यास हेंच कारणही आहे. रा॥ छ. १० षाबान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १२ बुधवार शके १७१५.

छ १ ते छ. १० साबान पावेतों नवाबाची मामुली अखबार.

श्री.

चैत्र शु. १२ बुधवार शके १७१५.

—श्रीमंत राजश्री ———— रावसाहेब

—स्वामीचे सेवेसीं ————

विनंती. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना ता॥ छ १० माहे साबानपर्यंत मुा जनवाडा येथें स्वामीचें कृपावलोकनें-करुन सेवकाचे वर्तमान यथास्थित असें विशेष. सरकारांतुन छ २६ माहे जमादिलाखरचीं पत्रें, नवाबाचे पत्राचा जाब—इंग्रज प्रकर्णी दफातीचा—सहित रवानगी जाली. तीं पत्रें छ ४ रजबीं पावलीं आझेप्रो खरीतापत्र प्रविष्ट करून यासंबंधें मजकुर यांसीं बोलण्यांत आला. सरकारचे थैलीपत्राचा जबाब मागितला. तजवीज ठरून तयार करवून देवितों ऐसें बोलिले. त्यास त्याजवर इकडून जबाबविषई निकड केली नाहीं. जबाब लौकर घेऊन पाठविण्याची आज्ञा आल्यास निकड करून जबाब घेऊन रवाना करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १२ बुधवार शके १७१५

श्रीमंत राजश्री ———— राव

साहेब स्वामीचे सेवेसीं ————

विनंती. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तां छ १० माहे पावान मुकाम जनवडी येथें स्वामीचे कृपावलोकनेकरुन सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. सरकारांतुन छ १६ माहे रजबचें पत्र सादर जालें तें छ २६ माहे मारीं पावलें. त्यांत माहादजी सिंदे यांस आठ दहा दिवस ज्वर येत होता. नंतर वायूची भावना होऊन माघ शुद्ध त्रयोदशी प्रहर रात्रीं देवआज्ञा जाली. सरकारचे पदरचे मातबर सरदार होते. ईश्वरी इच्छेस उपाय नाहीं. ह्मणोन आज्ञा. ऐसियास यासंबंधें नवाबास सरकारचे थैलीपत्र होतें तें नवाबांकडे मीं जाऊन प्रविष्ट केलें. पत्र वाचून पाहिल्यानंतर नवाबांचे बोलण्यांत आलें कीं 'माहादजी राव सिंदे राव पंत प्रधान यांचे सरकारचे मातबर उमदा सरदार, हिंदुस्थान प्रांतीं कामेंही मोठीं मोठींच अंमलांत येऊन बंदोबस्त खातरखा केला. असे मनुष होणें दुर्लभ! याप्रो बोलले. सिंदे यांचे नातु दौलतराव, त्यांस त्यांचे दौलतीची बाहाली सर्फराजी सरकारांतून होउ! याचा मार नवाबांचे पत्रीं होता, तो पाहून बोलले कीं बाहाली सर्फराजी होणें उचित आहे. सिंद्यांची बहुत तारीफ नवाबांनीं केली. नंतर बोलले कीं 'नजर घेतल्याशिवाय सर्फराजी केली हे मोठी गोष्ट केली. याजवर मीं उत्तर केलें नोकर खाविंदाचें कामावर ज्याफिषानी करुन चाकरी करितों त्या नोकराचे मुलाची सर्फराजी खाविंदांनीं न केलीयास मग खाविंदी ती कांय? दुसरे नोकराचा दिल साहेबचाकरीस कसा बोढेल? खावि (द) आपले नोकरास लेंकराप्रमाणें संरक्षण करितात ही नजर आहे ह्मणोनच नौकर ज्याफिषानी करावयास हजर आहे. श्रीमंताचे सरकारची हमेषापासून ही चाल आहे ऐसें खोंचून बोलिलों. याजवर नवाब थोडेसे कळत

न कळत बसून बोलिले कीं तुह्मीं बोलतां हें दुरुस्त आहे. रा छ. मार सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १३ गुरुवार शके १७१५.

रा छ. ११ माहे पावान डांकेवरुन रवानगी.

श्री.

श्रीमंत राघसाहेब यांस मामुली हवाल्याचें पत्र.

विनंती विज्ञापना. नवाब छ ११ साबान शुक्रवारीं जनवाऱ्याहुन च्यार घटका प्रथम दिवसां सवार जाले. खवासीमध्यें दौला व मीर अलम हाथीरव मखमली लाल अंबारीमध्यें होते. प्रहर दिवसां बेदर येथील मंगळवार पेठेंत चार पांच मुकाम करुन बोरोचीस जाण्याचा मनसबा आहे. तेथुन रंगमा पेठेसही जावयाचा बेत. रंगमा पेठ ह्मणजे हैदराबादचा नीट रुख आहे. अद्यपा कोणता येक निश्चय नाहीं. ठरेल त्याप्रमाणें विनंती मागाहुन लिहिण्यांत येईल. रा छ. ११ माहे साबान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १३ गुरुवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. अदवानीस नवाबांनीं मुस्तकीमजंग यांस मोजदाद करुन पाठविण्याकरितां रवाना केलें. त्यांनीं जाऊन मोजदाद खजाना व नगदी, जवाहीर, सोनें, रुपें, हाथी, घोडे, पागा, रथ, हत्यारें सुधां मोजदाद करुन याद पाठिवली. चौपन्न लक्ष रोकड, सिवाय सोनें, रुपें व जवाहिर दागिने, घोडा पागेचीं येकंदर चौदासें; पैकीं सातसें सरस व सातसें निरस, हाथी पस्तीस, तोफा वगैरे कुल आसबाब अदवानी व रायचूर संस्थानचा तीन करोडीचा मालियत लिहिली आली. रायचूर येथें सिबंदी मोहबतजंगाकडील स्वार व पागेचे बारगीर व गाडद व प्यादे यांनीं रायचुरचे किल्याचे दरवाजे बंद करुन गोळी वाजवितात. तलवेचे ऐवजाचा फडशा जाल्यासिवाय किल्याचा दखल देऊं नये, असा अठा बांधिला आहे. हें वर्तमान आल्यावरून येथून यांनीं असद-

अलिखान यांस त्यांचे जमियत सुधां व बराबर मुसारेहमुकडील गाडद येक हजार देऊन रवानगी छ ११ साबानीं केली आहे. व्यंकट सुरापुरकर यांस ताकीद गेली आहे कीं तुह्मीं अमद अलीखान यांस सामिल होणें. खान मार कुच करून येथुन छ मारीं गेले. रा छ ११ हे विज्ञापना.

श्री. .

चैत्र शु. १३ गुरुवार शके १७१५.

विनंति विज्ञापना. गर्जींद्रगड तालुकियांत घोरपडे यांचा हंगामा भारी. दखल नाहीं. सबब वलीहसनखान यांस पेशजी येथून जमियतसुधां रवाना केलें. त्याचीं पत्रें यांस आलीं कीं घोरपडे याजपासीं जमियत चांगली हाजुरांतून कुमक जमियतीची मजपासीं असल्याशिवाय तालुक्यांत दखल बोलत नाहीं. त्याजवरून गर्जींद्रगडीकडे फौज व गाडद मिळोन येक हजार जमाव येथून मांजी रवाना केला. इंग्रजी दोन पलटणें गर्जींद्रगडीं सुमारें कनकगिरीचे आसपास होतीं तीं रायचुराकडे आणविलीं तीं येणार आहेत. रा छ ११ साबान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १३ गुरुवार शके १७१५.

विनंति विज्ञापना. लस्करांत धारण माहाग सा पेशजी नवाबांनीं दौलांस ताकीद केल्यावरून सांप्रत दौलांनीं नुरमहंमदखान करोडगिरी देऊन महसुल व पंचोत्रा मुकरर करून दिल्हा. बेपारी बणजारे यांस कौल देऊन गल्याची अमदनी करणें याची तजवीज केली आहे. पंनास हजार बैल सरकारची कोठी आसपास वीस कोसपर्यंत तालुकियांतील गला किफायत वार खरेदी करून बैलावर लस्करांत आणून कोटींत जमा व्हावा. बाजारांत विकरी बेपारी उदमी यांनीं कोठीपैकीं खरेदी करून करावी, यैसी तरतुद केली आहे. रा छ ११ साबान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १३ गुरुवार शके १७१५.

विनंति विज्ञापना. तेगजंगाचा पुत्र शमशुल उमरा यांस नवाबांनीं आपली

नात, नक्षीबंदी बेगम मोहबतजंग यास दिल्ही तिची कन्या, देण्याची योजना केली, व तेगजंगाची कन्या ज्याहांदार ज्याहासाहेब जादे यांस करावी ऐसा बेत ठरऊन अजमनुलमुलुक सरबुलंदजंग यांस सांगितलें. त्यांनीं अर्ज केला कीं ' हाजरतीसीं शरीरसंबंध करणें आमची काय योग्यता आहे !' नवाबांनीं सांगितलें 'दोन्हीं माझींच! चित्तास येईल तसें करीन. तुम्हांकडे काय आहे!' याप्रों होऊन दोन्हीं घाद्या कराव्या ऐसें आहे. परंतु तेगजंग यांची बायको. मुलाची मातुश्री—हें कबुल करणार नाहीं, असें वाटतें. मग पाहावें. रा छ ११ सावान हे विज्ञापना.

दफे अलाहिदा.

श्री.

चैत्र शु. १२ गुरुवार शके १७१५.

श्रीमंत राजश्री ——————— रावसाहेब
स्वामीचे सेवेसीं ———————

विनंति सेवक. गोविंदराव कृष्ण कृतानेक सा नमस्कार विनंति विज्ञापना ता छ ११ माहे षावानपर्यंत स्वामीचे कृपेंकरून मुा बेदर येथें सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष. कितेक मार राजश्री गोविंदराव भगवंत यांचे पत्रांत लिा आहे. स्वामीसेवेंत विनंति करतील त्याजवरून ध्यानांत येईल. अधिक उणे शब्द असतील त्याविषई क्षमा असावी. पत्रांतील मार मनन होउन उत्तराविषयीं आज्ञा जाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

विनंति विज्ञापना ऐसीजे. नवाब निजामली खान यांनीं सवाई नाईक ह्मणोन येक जासुदाचा नाइक पुण्यास व नाशकास पाठविला, येविषींची विनंति पेशजी सेवेंत लिा आहे. नाईक मार तिकंडे येऊन अजिमुद्दौला यांचा शोध लाऊन येथें आला. त्यानें मुपीरुलमुलुक व नवाब यांस सांगितलें कीं अजिमुद्दौला यांस श्रीमंतांनीं आश्रय दिल्हा आहे. गोविंदराव कृष्णही त्यांत कामांत आहेत. कोणी कारकून व हुजरे पुण्याहून गेले होते. या-

प्रा त्यानें सांगितलें त्याजवरुन नवाब व कारभारी मला पुसणार आहेत ह्मणोन येक खबर यैकिली. पुस्तील असा निश्चय नाहीं. परंतु कदाचित पुसल्यास याविषीं काय उत्तर करावें याविषीं आज्ञा जाली पाहिजे. स्वामी तील तुम्हीं या गोष्टीची समजुत नसतां सरकारांत लिहिलें याचें कारण ? त्यास सरकारविषई तर माझी खातरजमा. परंतु पुर्वी येक माझें यैकण्यांत आली कीं अजिमुदौला यांनीं राव शिंदे यांसीं साधन कलें. त्याजवरून त्यांनीं अंगिकार कदाचित् केला असेल. राव सिंदे याचा काल जाला, त्यांनीं ज्यांस आश्वासन दिल्हें तें त्यांचे पाठीमागें सरकारांतून ५ ापटून पार पाडणें प्राप्त. + + + + +. (पुढील पुष्टें गहाळ) झालीं आहेत. सं.) + + + + पृष्ठ ३३८.

४ पापड.
२ मुगाचे
तळें १ भाजलें १.
—
२
२ उडदाचें तळीव व भाजलें.
—
४
१ काढी ताकाची.
१ सांबारें चाकवताचें.
१ मठा.
९ भाज्या.
१ वांगीं सगळीं मसालेदार.
१ सुरणाची.
१ पांढरा भोंपळा.
१ मेथीची.
१ अंबाड्याची.
—
९

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
दा. क. २१२
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

११ दफे चटण्या.
१ कोथिंबिर, लसण, आलें.
१ तिळाची.
१ जवसाची.
१ कारल्याची.
१ अंबसलाची.
१ हरभरे याचे डाळीची.
१ उडदाचे डाळीची.
१ आल्याची.
१ फक्त मिरच्याची लाल.
१ निवें.
१ पंच्यामृत मिरच्याचें.

—

११

१ आंब्याचे लोणचें.
१ दूध.
१ साखर.

—

९३

सदरु प्रमाणें सरंजाम नवाबांकडें व दौलांस व आपजाउलमुलुक यांस छ २० पावान.

श्री.

चैत्र शु. १ शनिवार शके १७१७

विनंती विज्ञापना. आपल्या उलमुलुक नवाबांचे हुकुमाप्रमाणें आमचे डेऱ्यास आले. त्याजला ज्याफत केली.

४ कारचोबी पोर्चे.
१ चीरा.
१ ज्यामेंवार.
१ पटका.
१ गोपपेच.

४
१ दुषाला,
१ किनाखाब.
१ जवाहिर सरपेंच.

७

सदरहु प्रों छ. २६ षाबानीं दिल्हे रा छ २९ षाबान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १ शनिवार शके १७१७.

विनंती विज्ञापना. राजश्री कल्याणराव हरराव यांस यांनीं रुखसत देऊन पुण्याकडे रवाना केले. छ २३ षाबानीं येथुन माारनिले मैलारास जाऊन राहिले, दर मजल जाणार. हरराव यांस पाठवावयाचें कारण बारीक रितीनें शोध करितां समजण्यांत आलें. महादजी सिंदे यांचा नवाबासीं तहनामा दोस्तीचा पेशजी जाला आहे. त्यांचा काल जाला. हाली दौलतीवर राजश्री दौलतराव सिंदे कायम जाले. त्यांस पूर्ववतप्रमाणें दोस्तीचा सिलसिला ज्यारी राहावा. पहिला तहनामा जाला त्याप्रमाणें सांप्रत नवा तहनामा दौलतराव यांचा व्हावा या विषईचे साधनार्थ कल्याणराव व बाबाराव तेथें आहेत. कितेक बारीक मोठे प्रकार लिहिण्यांत कोठवर लिहावें? खान-

---

* मागील ८ पानांतील मिया सुमार एक महिन्यानें चुकल्या आहेत. त्यांचे शुद्धिपत्र येईल.

करीस्त दौलांनीं हरराव यांसीं बोलण्यांत आणुन रवाना केलें. कल्याणराव व बाबाराव यांसीं सर्व मरातब बोलुन अबा चिटणीस यांचे विद्यमानें सिल-सिला व नवीन तहनामा पकेपणें करुन घ्यावा, सा हरराव यांची रवानगी केली. जितका प्रयत्न तितका करून पाहावा, हें कारण कुफिया समजण्यांत आलें. रा छ २९ षाबान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १ शनिवार शके १७१७.

विनंती विज्ञापना. दौलाचे बोलण्यांत आलें कीं सिकंदरज्याहाबाहादुर साहेबजादे यांचे षादीकरितां श्रीमंतांनी येण्याविषईं हजरतीनीं पत्रें पेशजी रवाना केलीं. त्यास फार दिवस जाले; अद्याप त्यांचे जबाब आले नाहींत. नवाबाचीं इंतजारी हजरत करितात. श्रीमंतांस तुम्हीं विनंती लेहुन षादीचे मुकदम्याच्या पत्राचे जबाब बसबब लौकर येत ऐसें टप्यावर लौकर लिहावें, ह्मणोन बोलण्यांत आलें. त्यावरुन विनंती कीं योविषईं. आज्ञा येईल त्याप्रों यांसीं बोलण्यांत येईल. उत्तराविषईं आज्ञा सत्वर जाली पाहिजे. रा छ २९ षाबान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १ शनिवार शके १७१७.

विनंती विज्ञापना. गर्जीद्रगड तालुकियापैकीं घोरपडे यांचे तशरुफात तालुका आहे त्यास श्रीमंताचे सरकारचीं व राजश्री परशरामपंतभाऊ यांचीं पत्रें पेशजी दिल्हीं असतां इकडील तालुका बागुवस्त करीतात. याजकरितां अलीहासनखान यांस जमियत सुद्धां रवाना केलें. याची इतला लिहिण्याविषईं तुह्मांस सांगितल्याप्रमाणें तुम्हीं लिहिलें असेल. यास फार दिवस जाले, अद्याप श्रीमंतांकडुन जवाब आला नाहीं. हल्लीं पायंणाघांत अमील तो गर्जीद्रगड यांचें पत्र आलें कीं पेशजी तालुक्याचे बंदोबस्तीकरितां पुणियास रायरावं ह्मणोन कारकुन पाठविला होता. दोन तीन महिने तेथें राहुन श्रीमंताचे सरकारची ताकीदपत्रें गडकरी यांस आणिलीं तीं दिल्हीं असतां ठाणीं

देण्यास दिकत. त्यावरुन सांप्रत नीलवंगल येथील किल्यास अलीहासनखान यांनीं मोर्चे दिल्हे आहेत. याप्रो लिहिलें आहे म्हणोन दौलींचें बोलण्यांत आलें. रा छ २९ षाबान विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १ शनिवार शके १७१५.

विनंती विज्ञापना. आदवनी रायचूर येथील मोजदाद करण्याकरितां येथुन यांनीं मुस्तकीमजंग व मिर्धे सवाउक यांस रवाना केलें ते जाउन मोजदादीची फर्द पेशजी नवाबाकडेस पाठविली. परंतु रायचुरांत मोहबत जंगाकडील सिबंदी स्वार बारगीर गाडद व प्यादे यांनीं तलबेचे वैवजाकरितां हंगामा केला. किल्याचे दरवाजे बंद केले. हें वर्तमान मुस्तकीमजंगानीं लिहिलें. त्यावरुन असद अलीखान यांची रवानगी फौज जामियत सुद्धां रायचुराकडे केली. खान माार येक दोन मजल गेले. इतकियांत मुस्तकीम जंगाची अर्जी नवाबांस आली कीं ' रायचुरांतील सिबंदीचा गवगवा होता तो सफा जाला. तोड पडली. खजीना जवाहीर सुद्धां वगैरे सरंजाम घेऊन मी निघोन लौकरच हाजुर पोंहचतों' या प्रों अर्जी आल्यावरुन असदअलीखानास यांनीं पत्रें पाठऊन माघारें आणविलें. खान माार छ २३ रोजीं बेदरास आले. मुस्तकीमजंग मोहबतजंगाकडील अनवरादौला बहादीखान कारभारी या समागमें घेऊन छ २७ रोजीं बेदरास आले. घोडीं व उंटें व वैवज जवाहिर कापड व सिलेखाना वगैरे सरंजाम आला. बतीस हाथी रायचुरचे व येथुन नवाबांकडून बावीस हाथी भारबारदारीस गेले. येकुण चौपन हाथी व सरंजाम सोनें, रुपें, नगदीं वैवज जवाहीर भरुन आलें. रा छ २९ षाबान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १ शनिवार शके १७१७.

विनंती विज्ञापना. मंगळवार पेठेंत नवाब दाखल जाल्यानंतर तमाम

कारखानेज्यात चराईस जाण्याचा हुकुम जाला. त्यावरुन फिलखान, पुतरखाना व बैल, रथ, गाड्या, छकड्याचें व जिनसीकडील येथुन पंधरा वीस कोस कौकस प्रांतीं व कुहीर वगैरेकडे रवाना जालें. रा छ २९ षाबान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १ शनिवार शके १७१७.

विनंती विज्ञापना. दौलांनीं बोलण्यांत आणिले कीं 'हे दिवस होळीचे आहेत. आपण मंडळी सुधां येथें येऊन नाच रागरंग पाहावा' याप्रों फार आग्रह केला. त्यावरुन छ १९ षाबानीं दौलांकडे रात्रीं गेलों. दौलांनीं आपले हवेलीपुढें येक चबुत्रा हजार माणसें बसावया जोगा विस्तीर्ण केला आहे. छ मारीं नवाब दौलाकडे येणार म्हणोन दोलांनीं राज्याजीचे जाग्यावर फर्ब अलाहिदा करउन नाच रागरंग तेथें आम्हांस बसावयाची जागा केली. इतक्यांत नवाबांनीं दौलांकडें सांगुन पाठविलें कीं 'आज आमचें येणें होत नाहीं. तुमचा समारंभ होऊं द्यावा.' त्यावरुन राज्याजीकडील जागा तयार केली होती तें राहिलें. दौलाचे चबुत्रावरच नाच सुरु जाला. राज्याजी आदिकरुन सर्व मंडळी व दौला होते. अबीर कुमकुम्याचे खाने आणोन पुढें ठेविले. त्याची मार जाली. दोनप्रहर पर्यंत नाच रागरंग जाला. रा छ २९ षाबान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १ शनिवार शके १७१७.

विनंती विज्ञापना. शिमग्याचे दिवसांत पागावाले यांस नाच पाहण्याकरितां वर्षास आम्हीं बोलावीत असतों. त्याप्रों सालमारीं घांसीमियां व अजमखान व सर बुलदजंग यांस बोलाविलें. अजमखान घांसीमिया यांनीं नवाबांचीं परवानगी घेऊन छ १८ षाबानीं रात्रीं आले. नाच रागरंग जाला. सर बुलंदजंग यांनीं सांगोन पाठविलें कीं हजुरची परवानगी घेऊन उदईक

१ हत्ती.

येतों. त्याप्रो जंग मजकुर छ १८ रोजीं आले होते. नाच पाहुन अतर पान दान देऊन रुसकत केलें. रा छ २९ माहे पावान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. १ शनिवार शके १७१७.

विनंती विज्ञापना. कडपें प्रांतीं जमीदार मुफसद यांनीं जमियत धरुन हंगाम केला. याचें बोभाट नवाबांकडें आल्यावरुन असद अलीखान यांस जमियत सुध कडप्याकडे बंदो × × × (पुढील पृष्ठें गहाळ झालीं आहेत.)पृष्ठांक ३४९.

(गु) लाबाचीं फुलें आलीं तीं गुजरलीं. रात्रीं दोन घटिकेस चौबी बंगला उभा करविला. छ १४ रोजीं सोमवारीं च्यार घटिकां दिवसां नवाब बंगल्यामधें बरामद जाले. पागावाले व अर्जबेगी वगैरे लोकांचा सलाम जाला. नाच पाहुन प्रहराचें अमलांत बरखास जाले. रात्रीं दोन घटिकेस दौलांनीं सिकंदरज्याहा साहेब जादे यांस पोषाग येक खाने व जवाहिर किस्त येक व मिठाई पान फुलें वगैरे सरंजाम मुनीमुदौला समागमें पाठविला. तीन घटिकेस नवाब दौलाचे मकानास आले. दौला व मीर आलम व पागावाले व रामराया वगैरेचा सलाम जाला. कंचन्याचा नाच होता. दौला व मीर आलम यांसीं बोलणें होऊन येक प्रहर च्यार घटिका रात्रीं बरखास जालें. छ १५ मंगळवारीं तीन घटिका दिवसां नवाब सवार होऊन नागझरीकडे गेले. सैर करून उमदा बेगमचे बागांत आले. भोजन होऊन येक प्रहर साहा घटिकां दिवसां हवेलीस आले. रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. छ १६ रोज बुधवारीं दोन घटिकां दिवसां नवाब सवार होऊन शिकारीस चिते समागमें घेऊन गेले. शिकार जाली नाहीं. नागझरीस येऊन तेथें भोजन करुन आराम केला. (प्र) हरास हवेलीस आले. रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. तीन घटिकेस बंगाल्यामध्यें नवाब बरामद जाले. पागावाले व अर्जबेगी वगैरेचा सलाम जाला. नाच कंचन्याचा भाउंचा व अतषबाजी व रोशनी जाली. छ १७ रोज गुरुवारीं पांच घटिका दिवसां नवाब नागझरीकडे सैर करुन येक प्रहर पांच घटिकेस आले.

च्यार घटिका दिवस शेष असतां नवरोज्यांची साअत हैदराबादेहुन नवाजष-अलीखानानें पोषाग तयार करउन पाठविला तो गुजरा (णिला). च्यार घटिका दिवस राहतां पोषाग घेऊन नवरोज्याचा समारंभ शुरु जाला. दौलाची अर्जी गुजरली. पांच घटिकां रात्रीं नवाब जनान्यासहित दौलाचे मकानास आले. बरामद होऊन दौला व मीर आलम व सलाबतखां वगैरे इसमांचा सलाम जाला. नवरोजीच्या नजरां दौलां वगैरेनीं केल्या. दिल्लीवाले कंचनीचा नाच जाला. बहलोलखान वगैरेस खिताब सर्फराजी जाली. अतष-बाजी रोशनी पाहून प्रहर रात्रीं आपले हवेलीस गेले. छ १८ रोज शुक्र-वारीं दोन घटिकां दिवसां नवाब सवार होऊन शिकारीस गेले. तेथुन उमदा बेगमचे बागांत आले आमराईमधें भोजन व आराम करुन येक प्रहर पांच घटिका दिवसां हवेलीस आले. रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. येक प्रहर पांच घटिकेस कंचन्याचे नाचाचा बंदोबस्त होऊन नाच व अतषबाजी जाली. छ १९ रोज मंदवारीं येक प्रहर येक घटिकां दिवाणखान्यामधें नवाब बरामद जाले. रायराया यांनीं खाना पाठविला, तो गुजरला. येक प्रहर पांच घटिकेस बरामद होऊन मीर पोलादअली व सुभानअली व तेमुरअली व झुलफुकारअली साहेब जादे च्यार यांच्या खवाबगामधें बलाऊन घेतलें. त्यांनीं नजरा केल्या. भोजन जालें. च्यार साहेब जादे यांस च्यार फुलाचे हार दिल्हे. त्यांस वाटें लाविलें. ते आपलाले मकानास गेले. पागेकडील बारागिरांच्या नजरा घेऊन दोन प्रहरास बरखास जाले. रात्रीं दौलानीं अर्जी गुजरली. जनान्याचा बंदोबस्त व नाच होता. छ २० रोजीं रविवारीं चौघे साहेबजादे यांचे जनान्याची याद केली. ते जनाने देवढीनें येऊन त्यांचें भोजन जालें. दिवसां दरबार नाहीं. रात्रीं चार घटिकेस नवाब दौ-लाचे मकानास आले. जनान्याचा बंदोबस्त होउन दौलांचा व गफुरजं-गचा व मीर आलम याचे जनान्याचा नजरा जाल्या. सात घटिकेस चां-दणीचे फर्षावर नवाब बरामद जाले. दौला व मीरआलम व रायराया वगैरे मामुली लोकांचा सलाम जाला. नजराही कित्येकांनीं केल्या. रावजीची याद केली.

ते आले. सलाम जाला. दिलेवाले कंचनीचा नाच होता. दौला, रावजी व मीर आलम तिघांसीं खिलवत होतें. येक प्रहर पांच घटिकेस बरखास जाले. छ २१ रोज सोमवारीं प्रातःकालीं नवाब सवार होउन नागझरीस गेले. सैर करुन येक प्रहर चार घटिकेस आले. रात्रीं खैर सला. छ. २२ रोज मंगळवारीं तीन घटिका दिवसां नवाब सवार होउन गेले. सैर करुन येक प्रहर पांच घटिकेस आले. प्रहर दिवस असतां किल्यांतील छपरास आग लागुन दोन चार घरें जळालीं. रात्रीं पांच घटिकेस दौलाचे मकानास नवाब गेले. साहेबजादे व दौला पागावाले वगैरे मामुली इसमांचा सलाम होउन नजरा जाल्या. रावजीची याद केली. ते आले. दौला व रावजी उभयतांसीं खिलवत जालें. साहेबजादे आदिकरून मनसब व खिताब सर्फराजी जाली. कंचन्याचा नाच होता. येक प्रहर पांच घटिकेस बरखास जाले. छ २३ रोज बुधवारीं तीन घटका दिवसां नवाब सैर करावयास गेले. येक प्रहर च्यार घटिकेस आले. च्यार घटिका दिवस राहतां असद अलिखान आल्याचा अर्ज जाला. मगरबाचे समई मीर पोलादअली वगैरे साहेबजादे चौघे हजर होउन त्यांनी सर्फराजीच्या नजरा केल्या. चौघांस गुलबाचे हार दिल्हे. ते आपले ठिकाण्यास गेले. पांच घटिका रात्रीं नवाब दौलाचे मकानास आले. दौला व असद आलीखान वगैरे लोकांचा सलाम जाला. असद आलीखा व त्याचे पुतण्यास खिताब मनसब सर्फराजी जाली. दिलेवाली कंचनीचा नाच पाहुन येक प्रहर पांच घटिकेस हवेलीस गेले. छ २४ रोज गुरुवारीं तीन घटिका दिवसां नवाब सवार होउन अमीनुद्दीन साहेबाचे गुमजाकडे गेले. पागावाले व अर्जबेगी वगैरेचा सलाम जाला. सबदागरी ऊंट येकसे पंचावन पाहिले. पसंद करुन दाग करण्याचा हुकुम जाला. गुमजापुढे पंनास रुो देउन येक प्रहर दोन घटिकेस हवेलीस आले

रात्रौ दौलाची अर्जी गुजरली. छ २९ रोज शुक्रवारीं दोन घटिकां दिवसां बामणी बादषाहचे गुमजाकडे नवाब सवार होउन गेले. तेथून बंदे नवाबाचे वस्तादाचे गुमजापासीं जाउन शेमर रुा पुढें ठेविले. कबरेवर किमखावी चादर घातली. फात्या देउन भोजन जालें. दोन प्रहराच अमलांत हवेलीस आले. रात्रौ दौलाची अर्जी गुजरिली. छ २९ रोज मंदवारीं च्यार घटिका दिवस, नवाब बागामधें जनान्यासहित गेले. आषऱ्याउलमुलुक दारोगे बबचीखान, यास खाना यहतीयातीनें रावजीकडील घेउन येणेंयाचा हुकुम जाला. ते आले. ते खाना घेऊन नवाबांकडे गेले. भोजन जालें. दोन प्रहरास हवेलीस आले. रायचुराहून मुस्तकीमजंग व अनवरुद्दौला वगैरे आले. खजीना, वगैर सरंजाम अदवनी रायचुरचा आला, अर्ज जाला. रा छ २९ षाबान हे विज्ञापना.

छ मारीं, दुसऱ्या प्रकर्णी येक पत्र.

—श्रीमंत राजश्री _____ रावसाहेब
—स्वामीचे सेवेसीं _____

विनंती.—सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञपना. तागाइत छ २९ माहे षाबानपर्यंत मुाबदेर येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. इकडील कितेक वर्तमान अलाहिदा पत्रांत लिहून सेवेसीं पाठविलीं त्याजवरुन ध्यानांत येईल. सांप्रत राजश्री नाना यांचे सांगण्यावरून रघोतमराव नबाबाकडील यांणीं पुणियाहुन नबाबास व मुषीरुल-मुलुक यांस स्वराज्याचे कलमबंदीचे फडच्याविसीं पत्रें लिहिलीं, त्याजवरून नबाबांनीं व कारभारी यांनीं मजकुर बोलण्यांत आणिला व अदवनीचे स्वराज्याचे फडच्याविसीं पत्र राजश्री नाना यांस नबाबांनीं पत्र लिहिलें व

कलमबंदी प्रकर्णीं गोविंदराव भगवंत यांस पत्रें लिहिलीं. हा सर्व मजकुर सविस्तर लिहिला आहे. राजश्री नाना शेवेंत निवेदन करतील, त्याजवरुन ध्यानांत येईल. उत्तराविसीं आज्ञा जाली पाहिजे. सेवेसीं श्रुत हाय हे विज्ञापना.

रा॥छ २ माहे रमजान खानगी टप्यावरुन.

श्रीमंत राव्साहेब यांस मामुली हवाल्याचें पत्र.

श्री.

चैत्र शु. ३ गुरुवार शके १७१६.

विनंती विज्ञापना. बेदरचे किल्यांत नबाब पेशजी राहिले, त्या जाग्याच्या दुरुस्ती करुन दिवाणखाना व येक दोन मकाणें चांगलीं तयार केलीं. मंगळवार पेंठ येथें नबाब छ ११ पाबानीं दाखल जाल्यापासोन बीस दिवस राहिले. सांप्रत माहे रमजान. राजे यांचा महिना. सैर शिकारीस जाणें येणें यांत लोकांस तसदी. यांजकरितां हा महिना किल्यांत राहावें, यैसी तजवीज ठरुन कुल असबाब छ १ रमजानीं किल्यांत खाना केला. छ २ रोज गुरुवारीं पांच घटका प्रथम दिवसां नबाब हाथीवर पिस्ताई आंबराईमध्यें सवार जाले. खवासींत दौला व मीर अलम उभयतां होते. सात घटिका दिवसां किले बेदरचे हवेलींत दाखल जाले. रमजानचा महिना किल्यांत राहुन मागती मंगळवार पेठेंत येउन राहण्याचाही बेत आहे. मंगळवारांतील जाग्याचा बंदोबस्त चौकी पाहारे आहेत. रा॥छ २ माहे रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. ३ गुरुवार शके १७१६.

विनंती विज्ञापना. छ २ पाबानीं रात्रीं दौलांकडे गेलों होतों. राज्याजी व रावरंभा वगैरे होते. दोन घटिका बैठक जाली. इतक्यांत दौलाचे चबुत्र्यावर

फर्ष तयार होऊन नवाब आले. बरामद जाले व मजला बोलाउन घेतले. मीर आलम असद अलीखान वगैरे तमाम दरबारचीं मामुलीं इसमें होतीं. कितेकांच्या नजरा नबरोज्यासमंधें जाल्या असद अलीखानाचे पुत्रास खिताब मनसब वगैरे खानीचेही खिताब सर्फराजी जाली. पुन्हा भांडाचा नाच होता. नबाब मजकडे पाहुन बोलिले कीं तुम्हीं खाना पाठविला तो बहुत पसंद. त्यांपैकीं येक येक पदार्थाचें वर्णन करुन तारीफ केली. दौलाही त्यांस अनुमोदन देत गेले. दोन घटिका बैठक जाली. लोदीखान वगैरे लोकांचे नजराची दाटी होती. साहा घटिका रात्रीं नबाब बरखास जाले. आणिखी बोलिले कीं येकवेळ बहुत पदार्थ असले ह्मणजे यथास्थित स्वाद सर्वांचा समजत नाहीं. मी सांगुन पाठवीन ते वेळेस दोनतीन पदार्थ करुन पाठवीत जावे, ह्मणजे स्वाद समजेल. जसी आज्ञा होईल त्याप्रमाणें पदार्थ करुन पाठवीन ह्मणोन बोलुन निरोप घेतला. राछ २ माहे रमजान हे विज्ञापना.

श्री.

विनंती विज्ञापना. सरकारनें खरीतापत्र नबाबास माहादजी सिंदे यांचा काल जाला त्याचे दौलतीवर दौलतराव सिंदे यांची बाहाली सर्फराजी या प्रकर्णी पेशजी आलें तें नबाबास प्रविष्ट जाल्याची विनंती पेशजी लिहिण्यांत आली. सांप्रत सरकारचे पत्राचा जबाब नबाबांनीं थैली पत्र दिलें तें सेवेसीं रवाना केलें आहे. राजश्री गोविंदराव भगवंत प्रविष्ट करितील. अवलोकेन मजकुर ध्यानांत येईल. राछ माहे **षाबान** हे विज्ञापना.

फारसीपत्र व अनुवाद.

दर जवाबे बनामे श्रीमंत राव पंडित प्रधान शहामत व बसालत मर्तबत उबहत मेझलत मनीउश्शान बलामकान बरखुरदार सतूदे अतवारदर हि फझ् बाशंद.

मकतूबे इत्तिहाद असलूब बहरये वसूल कशूद. व केफियते इंतिकाले राव सिंधिया बहादर व परदाख्ते अहवाले राव दौलतराव सिंधिया बहादर नझर बर मदार जे रुसूख व वसूके फिदविन व दौलत रवाहीये मुतवफका मझकूर मुफस्सेल व वुजुह अजामीद. व मरासमे कदीम परवरी व मुख्तार नमूदने रावे मझकूर बतनसीक मोहम्माते हिंदुस्तान बजा व अझ आइने सरदारी व बाअसे इंतिझामे उमूरे रियासत मुतसव्वर शुद. व इत्तिलाये इनमानी व मावदौलत व मुकतझाहा इत्तिहाद व अकजाहेती मबज्जेह व खुशतर नमूद. पयवस्ते आफियतहा पिदाख्ते व इसाले रकाइमे इत्तिहाद हमोझमाईम मसरूर मुशाहेबत शुद. झियादे अय्याम बकाम बाद.

(सदर पत्राचा मराठींत अनुवाद.)

श्रीमंत राव पंडित प्रधान शहामत यांस जबाब आपलें कुशल असो. आपलें ऐक्यौत्तेजक पत्र पोंचलें. सिंदे यांचे निधन व तदनुषंगिक गोष्टींची बातमी, तसेंच राव दौलतराव शिंदे यांचे ठायीं असलेला आपला विश्वास व कैलासवासी शिंदे यांची राजनिष्ठा वगैरे गोष्टी सविस्तर (लिहून आलेल्या) समजल्या. तुर्ने कायम ठेवणें व उत्तरहिंदुस्थानांतील बंदोबस्त मागीले पुरुषाचे वारसास देण्याचा आपला संकल्प फार चांगला आहे. विशेषेंकरून त्यांचे अंगीं असलेलें राज्यकर्तृत्व व राजकारणपटुत्व आपल्या विश्वासाला पुष्टि आणितात. ह्यावरुन (आपल्या) ऐक्याची व सलोख्याची कल्पना करितां येते. वरचेवर प्रकृतीचें मान येत असावें व ऐक्य व कुशल कळवीत असावें बहुत काय लिहिणें ?

श्री.

चैत्र शु. ३ गुरुवार शके १७१६.

विनंती विज्ञापना. कडपे प्रांतीं जमीदार मुफसदाचा हंगामा व टिपुकडील तीन च्यार जमियेन सरहादेवर आला. याचें वर्तमान नवाबाकडे आल्यावरुन असद अलीखान यास फौजसुधां कडप्याकडे जाण्याची रुखसत दिल्ही. याउपरी खानमार कुच करुन गेले ह्मणजे मागाहुन विनंती लिहिण्यांत येईल. गाछ २ माहे रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. ३ गुरुवार शके १७१६.

विनंती विज्ञापना. माहावतजंगाचे कारभारी अनवरुद्दौला व हादीखान यांस घेऊन मुस्तकीमजंग खजीना वगैरे घेऊन आले. यांची विनंती पेशजी लिहिल्यावरुन ध्यानांत येईल. दौलासीं बोलणें होऊन यांची नवाबाची मुलाजमत जाली. नगदी व सोनें रुपें जवाहीर + + + + —.....

(पृष्ठ ३९९) + + + + + + + +

मामुली अखबार व हवाल्याचें पत्र.

श्री.

चैत्र शु. ८ सोमवार शके १७१६.

विनंति विज्ञापना. नवाबाचे मनांत या उपरी हैदराबादेस जावें; येथें राहूं नये. याचप्रमाणें माहालांत बेगमा आदि करून सर्वांचीं सलाह. दौलाचें चित्तांत हैदराबादेकडे तूर्त जाण्यांत कुल यातीस दुरुस्त नाहीं, याजकारितां येथेंच असावें. आप्तों त्याची सलाह. तथापि, आग्रहानें नवाब येथें न राहतां हैदराबादेस जाणार. छ ९ शवालची तारीख कुच करण्याची योजून

ठेविली. याप्रों बारीक रीतीनें वर्तमान समजण्यांत आलें. होईल त्याप्रमाणें विनंति लिहिण्यांत येईल. अधिक बोझीं बोंगमांकडील जीं आहेत तीं खाना करावीं म्हणोन हुकुम जाला असें ऐकिण्यांत आलें. याजउपरी आणखी काय निश्चय होईल तो लिहून पाठवीन. रा छ १३ रम जान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. ८ सोमवार शके १७१६.

विनंति विज्ञापना. बाहलोलखान इसमाइलखान यांचे पुत्र यांजकडे अलजपुरची सुभेदारीचें काम आहे. सांप्रत छ. ४ रमजानीं नबाबांनीं अलजपुरची रुखसत खानमार यास दस्तबंद जोडी व पानदान दिल्हें. अषफजंग यांचे कारभारी यांस मोत्यांची कंठी दिल्ही. त्याजवर औरंगाबादचें सुभेदारीचें व पैठण वगैरे तालुक्याचें काम बाहलोलखान यांसीं बोलणें होऊन ठरलें. फकरुद्दौला व चिमणाराजें यांची तगीरी होऊन बाहलोलखान यास सनदांपत्रें व खिलत छ ९ रमजानीं जाला. दौलाचा निरोप घेऊन या उ. परी खानमार कुच करून जाणार. रा छ १३ रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शु. ८ सोमवार शके १७१६.

विनंति विज्ञापना. बाहलोलखान नवाबाची रुखसत व मध्यस्ताचा निरोप घेऊन आह्मांकडे छ. १० रमजानीं आले. घरोघ्याचें मागें खान मार यांचें बोलणें कीं, आजपर्यंत अलजपुरचे सुभ्याचें काम 'मजकडे होतें भोंसले सेना-

साहेब सुभा यांसी दोस्ती व येक + (पुढील दोन पृष्ठें गहाळ). + + पृष्ठ ३६१. वस्त्रें दिल्हीं:—

६ खान मार यांस—

५ पोषागसनगें

१ दस्तार

१ ज्यामेवार

१ पटका

१ दुपाला

१ किमखाव

—

५

१ जवाहिर सिरपेंच.

—

६

१ अफजंग कारभारी यांस

(मुसलमानी मृगसालही संपत आलें आहे. सरासरी वर्षांचीं पत्रें छापून झालीं. याप्रमाणें आणखी ९ वर्षांचीं आहेत. कधीं योग येईल तो खरा.

सं. महाराष्ट्र इतिहास)

१ पागोटें
१ दुषाला

—

२

६ पेषकार व वकील असाम्यांत
३ पागोटीं
३ षालफर्द

—

३ (?६)

सदरहुप्रमाणें दिल्हे. रा छ १३ रमजान हे विज्ञापना.

श्री.

(चैत्र शुद्ध १४ शके १७१६, ता. १४ एप्रिल १७९४ इ०.)

विनंती विज्ञापना. छ ११ रमजानी बाहलोलखान यांनीं आह्मांस मेजवानी करितां बोलाविलें. त्याजवरून छ माारीं त्यांचे डेऱ्यांस गेलो. पोषाग व सिरपेंच दिल्हा. "श्रीमंताचे सरकारांत पत्रें तयार करून पाठवितो, ते रवाना करावीं; व आपणही मुकसल ह्याहावयाचें प्रकारें ह्याहावें" या प्रों बोलण्यांत आलें. आह्मीं आपले ठिकाण्यास आलों. खान माार कुच करुन गेले. रा छ १३ रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शुद्ध १४ शके १७१६, ता. १४ एप्रील १७९४ ईसवी.

विनंति विज्ञापना. गफुरजंगाचे चौघे पुत्रांकडे च्यार कामें. येकास खान सामानी. येक बक्षी खाल्याचा दारोगा. येक बेदरचा किल्लेदार. येकाकडे बादशाही दिवाणीचें काम. दौलाचे आत, च्यारी कामें मोठींच, येक घरीं. सांप्रत अमिनुदौला तारासाहेब ज्याकडे बेदरचा किल्ला. त्यांस नवाबांनीं सांगितलें "अंगुराची रखवाली बहतियातीनें करावी" असें सांगितलें असतां अंगुराची बहतीयात न जाली. लोकांस, कंचन्या वगैरे अंगुर दिल्हे. हें नवा-

वास समजल्यावरून "ज्याच्यानें अंगुराची रखवाली झाली नाहीं तो किल्ल्याचा बंदोबस्त काय राखील?" या प्रो बहुत रागें भरून किलेदारीचें काम त्याज-कडील तूर्त मना केलें. दुसरें, अपज्याउलमुलुक याजकडें बबचीखान्याचें काम होतें. त्यांनीं (न)वाबांकडील माहालांत खाना पाठविणें तो तुपांत च्यर्व्याची भिसळ करून पाठविला. बेगमांनीं चौकशीं करून नवाबास समजाविलें. त्यावरून त्यांजकडीलही बबचीखान्याचें काम दुर करुन ते गज-गापासी (व) बर्चीचा दारोगा होता तो हैद्राबादेंत आहे; त्यास बलाऊ पाठविलें. येकुन गफुरजंगाचे दोघे पुत्रांकडील दोन कामांची व्यवस्था तूर्त या प्रो जाली. किलेदारीचें काम अद्याप काहाडलें नाहीं. तजवीज होत आहे, बबरची खान्याची दारोगी थोरले भावाची काहाडली, रा॥ छ १३ रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शुद्ध १४ शके १७१६, ता. १४ एप्रील १७९४ ईसवी.

विनंती विज्ञापना. छ ७ रमजानीं राजाराम मोही रायरायाकडील, त्याचे गुमास्त्यानें येक तेल्यापासून पांच पले तांदूळ दर पल्यास साडेबारा रो प्रो खरीदी केले. त्यांपैकीं येक रुपयाचे तांदूळ नवाबाकडील असीलेस पंधरा रो पल्याचे भारानें आठशेर वजन करुन दिल्हे असील घरास तांदुळ घेऊन आली. घरीं वजन केलें तों साडेसात शेर भरले. असीलनें बक्षी बेगम यांस अर्ज केला. त्यांनीं नवाबाचे समक्ष तांदुळ आणून वजन करुन पाहिलें तों साडेसात शेर भरले. बेगमांनीं अर्ज केला कीं बाजारचे मारवाडी याप्रमाणें मनास येईल तसी विक्री करितात. वजन खोटी. नवाबांनी फौजदारखान यांचे मार्फत गंजाचे बाजारांतून येक रुपयाचे आणिक तांदुळ खेरदी करुन आणविले. ते चौदा रुा पल्याचे भावानें नवाबानीं स्वतः वजन करविलें. नउ शेर रुा भरले व तांदुळ चांगले. मोद्याचे गुमास्त्याचें व तेल्याचें कृत्रिम) सम (ज)लें. तेव्हां मोद्याचे गुमस्त्या ची गर्दन मारण्याचा व तेल्याचे नाक (का न घेण्यांचा हुकुम झाला. मोद्याचे गुमस्त्यास गाढवावर बसवोन वांसलगंज.

बाहेर नेऊन गर्दान मारविली. तेल्याचे नाक कान घेतले; त्यानें विहिरींत जीव दिल्हा. याप्रों जालें. रा छ १३ रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शुद्ध १४ शके १७१६, ता. १४ एप्रील १७९४ ईसवी.

विनंती विज्ञापना. हैदराबादेहुन आलीज्याहा बाहादुर साहेबजादे याची अर्जी नवाबास छ १० रमजानीं आली. त्यांत. शहरांत गिराणी तांदुळ सात शेर व जोरी दाहा शेर जाली. करोडयाकडील बोभाटही लिहिण्याबरुन तेजसिंग हजारी यांस हुकुम जाला जे तुह्मीं दाहा स्वार पाठवून करोडा नुरमहंमद याचा नायब तेथें आहे त्यास धरून आणावें. हैदराबादेहुन अर्जी आली ती नवाबानीं दौलांकडे पाठविली. असीले हातीं दौलाकडे निरोप पाठविला कीं जनवाड्याचे मुकामीं तुह्मीं करार केला होता की पंधरा दिवस धारण तांदुळ सोळा शेर, व जोरी चोवीस शेर करितो त्यास किती दिवस जाले ? या उपरी करोडा अथवा मारवाडी वाणी कोणी यत्काचा मुलाजे होणार नाहीं. याप्रों मोठें रागानें सांगोन पाठविलें. दौलांनीं नुरजाहंद खानास बोला उन आणून गोडवे गाईले. याप्रों जालें रा छ १३ रमजान हे विज्ञापना.

श्री

चैत्र शुद्ध १४ शके १७१६, ता, १४ एप्रिल १७९४ इ०.

विनंति विज्ञापना. चेनापटणाहून व्यकटरामदीक याजकडील अखबर आली तें रवाना केली आहे. राजश्री गोविंदराव भमबंत सेवेसीं प्रविष्ठ करितील. अवलोकने सार ध्यानांत येईल. उत्तर रवाना व्हावयास अज्ञा जाली पाहिजे. रा. छा १३ रमजान हें विनापना.

श्री

चैत्र शुद्ध १४ शके १७१६. तप्रिल ता. १७९४ इ०.

विनंती विज्ञापना. सोम भुपालराव गदवालकर संस्थानिक याचा काल जाल्याचें वर्तमाम त्याजकडील वकील कृष्णाजी (न)रसिंव्ह येथें आहेत त्यास त्याचे चिरंजीव रामराव यांची पत्रें व नवाबास व दौलास वेगळी पत्रें आलेलीं

आहेत. सरकारांत सोमभुपाल याचे पुत्राची पत्रें आलींच असतील तर रा छा १२ रमजान हे विज्ञापना.

मामुल अखबार, छा २ गुरुवार ते छा १३ रमजान.

श्रीमंतांकडील पत्रांची मामुलपोच.

श्री.

चैत्र शुद्ध १४ शके १७१६, ता. १४ एप्रील १७९४ ईसवी.

विनंती विज्ञापना.

'उमरखेडचे कारकुनास निरोप देणें व महालास उपसर्ग न लागे येसा बंदोबस्त करणें' ह्मणोन आज्ञा त्यास उमरखेडकरांकडील कारकुन रामराव दादाजी येथें होते त्यास उमरखेडास पेशजीच रवाना केलें. माहालासही नवाबाकडील उपसर्ग न लागे ऐसा बंदोबस्त सरकार आज्ञेप्रों जाला. कलम १.

'बेदरास सावकारावर दरवडा पडला, नवाबासमीप असतां असें कसें जालें. पता लागला कीं जिरालें हें समजलें लिहिणें' ह्मणोन आज्ञा, त्यास त्याची चौकशीही दोन चार दिवस होत होती, परंतु पत्ता लागला नाहीं. कलम १.

'नवाब उदगीर वैगेरेकडे फिरणार किंवा बेदरास येणार हे शोध करुन लिहिणें' ह्मणोन आज्ञा, त्यास तूर्त

'मालेगांवचे यात्रेंत नवीं घोडीं नवीन्दे किती खरेदी केलीं, नवाबांनीं परवानगी किती दिली हें शोध करुन लिहिणें' ह्मणोन आज्ञा, त्यास शोध केला व दौलास युक्तीनें विचारिलें. याचें सांगण्यांत अठेचाळीस घोडीं खरीद केलीं. आणीकही घोडीं घेते, परंतु इंग्रजी काठीचें मोजानें जितकीं घोडीं मिळालीं तीं अठेचाळीस खरीद जालीं. कलम १.

'बसालत जंगास पुत्र किती, त्यांत नवाबाच्या लेकीं कोणकोणास दिल्या, हल्लीं नवाबापासीं कोण आहेत. संस्थानचा बंदोबस्तकार किंवा आपणच घेणार याचा भाव गर्भ लिहिणें' ह्मणोन आज्ञा, त्यास, बसालत जंगास पांच साहा पुत्र आहेत. नवाबाच्या लेकीं कोणास व येथें किती याचा शोध करुन लिहितो. संस्थानचा बंदो-

बेदरास आहेत. हैदरबादची बोलवा बस्त बसालतजंगाचे पुत्रांपैकीं कोणास आहे. ठरेल तशी विनंती लिहीन. सांगत नाहींत. माहाबत जंगाचा पुत्र कलम १. खवासेचा आहे. त्याचे नांवचा संस्थानचा अधिकार–बरकड कामाचा बंदोबस्त येथुनच होतो. कलम १.

कलमें सुमार पांच रा छा १३ रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शुद्ध १४ शके १७१६, ता. १४ एप्रील १७९४ ईसुवी.

विनंती विज्ञापना. छ २० माहे षाबानचे सरकारचें पत्र सादर जालें तें छ १ माहे रमजानी पावलें. त्यांत नवाबाकडुन स्वराज्य प्रकर्णी जावसालाचे फैसले होणें येविषई राजश्री रघोतमराव व बाबाराव यांस आज्ञा जाली कीं दाहा वर्ष जाबसाल होतच आहे. हल्लीं तुहीं नवाबाकडे जाऊन सरकारचे जा(ब) सालाचे फडचे होत ते करणें, याप्रों आज्ञा जाली. उभयतांनीं नवाबाकडील परावनगी येण्याची विनंती केली. त्यास परवानगी पाठविण्यावसी आज्ञा येसीयास या प्रकर्णी सरकार आज्ञेप्रमाणें मुषीरुलमुलुक यांसीं बोलणें जालें त्या प्रकर्णी पत्रें लिहून रवानगी करितो. रा छा १३ रमजान हे विज्ञापना.

रा छ १६ माहे रमजान रवानगी डाकेवरुन.

श्री.

चैत्र शुद्ध २ शके १७१६, ता. १७।४।१७९४,

श्रीमंत राजश्री ——— रावसाहेब ———

स्वामीचे सेवेसीं———

विनंती सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना ता छा १६ माहे रमजान मु॥ बेदर येथें स्वामीचें कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान यथास्थित असो विशेष. स्वामी छ २० माहे षाबानचे

आज्ञापत्र पाठविलें तें छ १ माहे रमजानी पावलें. " स्वराज्य प्रकर्णी नवाबाकडून फडचे व्हावयाचे या विषई राजश्री रघोत्तमराव व बाबाराव त्याजकडील उत्तरें बोलले. परंतु फडच्याची सुरत दिसत नाहीं, याजकरितां त्यास नवाबाकडे जाण्याविसी आज्ञा केली. त्यांनीं नवा(वा)चे परवानगीचा उजर केला. पत्रें ही त्यांनीं लिहिलीं आहेत. तुह्मीं नवाब मुषीरुलमुलुक यांसीं बोलोन यांस बलाउन घेणें ह्मणोन आज्ञा त्यास आज्ञेप्रों दौलासी सर्व मार बोलण्यांत आला. त्याची उत्तरें यांनीं सांगितलीं तीं अलाहिदा पुरवणींत लिहिलीं आहेत. अवलोकनें ध्यानांत येईल सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शुद्ध २ शके १७१६, ता. १७।४।१७९४

विज्ञापना ऐसिजे. नवाब निजामअली खानबहादुर यांचे सरकारांतुन व माहालाकडून स्वराज्याचे अमलाचे बगैरे फडशे बहुत होणें. करार मदार सर्व जाले. त्यास सालचीं सालें लोटलीं. परंतु, येकही फडशा न जाला. तुह्मांस जाऊनही पांच वर्षें कमकसर होत आलीं. त्याजवर राजश्री गोविंदराव भगवंत व रघोतम हैबतराव आले. त्यांनीं तिकडील उत्तराची विनंती केली. त्यांत मार्गाची व वाजवी फैसल्याची तऱ्हा न पाहिली, नंतर बाबाराव गोविंद हैदराबादेस जाते समई कितेक वो (ल) ले. त्यावरुन आठफर्दा तुर्त तुह्मांकडे पाठविल्या होत्या, त्या तुह्मीं बाबाराव गोविंद यांस घेऊन मोइनुद्दौला यांस दाखविल्या त्याचे जाब मारनिले समागमें आलें ते पाहतां गोविंद भगवंत व रघोत्तम हैबतराव या समागमें उत्तरें आलीं, त्या प्रोंच याचा जाबसाल पडला. तोंडीं पाडावयासे नाहीं. मषीरुलमुलुक यांणीं राजश्री बाळाजी जनार्दन यांचे पत्रांत लिहिलें होतें कीं जाबसाल ठराऊन उभयतांस लवकर रवाना करावें, त्यास ठराव करणें तो कोणता? जागीर बाबत कांहीं लेस तिकडील नाहींत. स्वराज्य कैलासवासी यांचे वारकीर्दी प्रमाणें घेणें. आणि ज्या जबाबी रकमा तितक्या करास बमोजीब फर्दावर लिहुन पाठविल्या; मग निराळा ठराव तो काय होणें. असो वाजवी फडशे व्हावे हें दोस्तीस

व स्नेहास चांगलें. यास्तव मोझुदौला यांचे लिहिल्याप्रमाणें सर्व मार बोलोन रघोतम हैबतराव गोविंद यांस नवाबाकडे जाण्याविसीं आज्ञा जाली. त्यांण विनंती केली कीं येक वेळ आह्मीं लेहुन पाठवतो. उत्तर आलें ह्मणजे जाऊं ये विसी नवाबास उभयतांनीं लिहिलें आहे. व तुह्मीं बोलून उभयतांस येण्याविसी पत्र पाठवणें मामलतीं फार तटल्या. या उपर फैसलें होणें चांगलें. उत्तर त्वकर पाठवणें. दिवसगत न लावणें, ह्मणोन आज्ञा, त्यास आज्ञेप्रमाणें दौलाकडे जाऊन बोलणें झालें. बोलिले कीं, "रघोतमराव व बाबाराव यांनीं येथें येऊन विशेष काय सांगावयाचें आहे. पत्रांत मार लिहिला आहे तोच समक्ष बोलतील. इकडून सेवटचे प्रकार तोंडीचे जे सांगावयाचे ते पूर्वी गोविंदराव भगवंत व रघोतम हैबतराव याजबरोबर सर्व सांगून पाठविले आहेत, बाबाराव यांसही त्याच अन्वयें सांगून पाठविले. यांज परतं. राजवटी ती कोणती आहे? जे वेळेस बोलणें पडेल तेव्हां तेंच आमचें बोलणें जाप श्रीमंताचे व मदारुलमहाल याचे चित्तास न येई तरी ती गोष्ट अलाहिदा आहे. खुद श्रीमंतांनीं बमैफोज पंढरपुर अथवा पंढरपुरचे घाटापर्यंत इरादा केला तरी आमचें बोलणें वाजवी असेंच बोलत जाऊं. पुढें ईश्वर इच्छा. याप्रमाणें बोलिल्यावर त्यास ह्मटलें कीं "आपण असें उत्तर कां करितां? हें वाजवी उत्तर नव्हे. याची दरयाफ्त करून बोलावे. श्रीमंतांकडून आठ फर्दी मुजकर होऊन आल्या त्यांत काय गैरवाजवी लिहिलें आहे? दोंही सरकारची दोस्ती याजकरितां वाजवी असतां इतके दिवस मुरवती करितां लोटले, आतां किती दिवस प्रतीक्षा करावी. बेदरचें स्वराज्य मामुल पासून येत आलें. त्यांत तुह्मींच दिकत काढुन च्याहारुम तकुब ठेवावे असफ ज्याची रुजुवात करुन त्या अन्वयें पुढें चालावें असें तुमचें बोलण्यांत. आह्मांस किफायत नसतां मुरवतीकरितां महकु करुन रुजुवातीचा न्येम दोन वर्षांचा ठरला. आमचे सरकारांतून अमीन रुजुवातीकरितां मुकरर करुन पाठविले असता वर्षेंनिवर्षें गुजरली. अद्याप ठिकाणच नाहीं. च्याहारुम बजा करून ठेवतांही नुकसानही कशी कबुल होईल? तेव्हां बोलिले कीं "रुजुवात अमीन जाऊन

होत नाहीं. याजकरितां माहालाचा मामुल आख असफज्याचे वेळचा तुह्मीं आपले दप्तरचा काढुन आह्मांस सांगावा, त्या आंखाप्राणें अमल देऊं. तह कीकात देवऊन वाजवी आख ज्या माहलचा आह्मीं शाबीत करून देऊं. तेव्हां त्याप्रों पुढें अंमल ज्यारी राहिल. अथवा आह्मीं जो (जी) रक्कम सांगु त्या प्रों प्रस्तुत अमल तुह्मीं सरकारांत ध्यावा. या आखास ज्याजती आख असल्यास आह्मांस शाबीत करुन ध्यावें. ते वेळेस त्याप्रमाणें अमल देऊ ही तोड ठरवावी" याचें उत्तर त्यास दिलें "कीं आम्हीं येक आख सांगावा अथवा तुह्मीं सांगाल त्या प्राा ज्यारी करावें. च्याहारुम आज परियंत ठेऊन घेतलं. पुढें आणिक ठेवावें. तहकीकातही करणें बाकीच आहे. हें कसें पुरवेल? वाजवी करावेसें ह्म(ण)णें तें हेंच कीं काय? नवाबाचे सरकारची किफायत पाहावी आणि श्रीमंताचे सरकारची नुकसानीं होणें हें मनांतच येऊं नये. हेंच दोस्तीस लाजम कीं काय? च्याहारुम ठेऊन घेतल्यावर रुजुवाती आपणास काय कलकल? जर नुकसानी होईल तरी कलकल असावी. त्यापक्षीं राव, पंत, प्रधान आपली नुकसानी कशी कबुल करतील? करणार नाहींत. आपणही वाजवी मनांत आणून पहावें." याजवर बोलिले कीं, " कैलासवासी माधवरावसाहेब यांचे वेळचे अमलाप्रमाणें अमल देतां, तेव्हा यांत नुकसानी नाहीं. तहकीकात जाल्यावरही यास अधिक होणार नाहीं, बरोबरच होईल. कदाचित एखादे माहालास तोटा येईल. " " तेव्हां बोलिले (लों?) की " माधवरावसाहेब यांचे वेळचे अमलाप्रमाणें ह्मणतां यांतही संदेहच आहे. तथापि तुह्मीं ज्या हारुम बजा करितां हे कोठला? आमचा अंमल आजपरियेंत ज्यारी होता. त्यांत तुह्मी च्याहारूम केला तेव्हां तेव्हां किती नुकसान जाली ही समजावी याजकरितां श्रीमंतांचें ह्मणणें हेंच आहे कीं ' याजउपरि च्याहारुम तकुब राहणार नाहीं. आपण ज्यारी करावें. नंतर रुजुवात करणें तसी सुखरुस करावी ' हें श्रीमंतांचें ह्म (ण) णें वाजवी आहे. कोणीही ऐकिल्यास या गोष्टीस गैरवाजवी ह्म(ण)णार नाहीं! आपणही बोढूं नये " या प्रों बोलणें जाल्यावर बोलिले कीं " फडच्या क-

रावा असें मनांत आलियावर दिवसगत लागावयाची नाहीं, तोंड पडलें नाहीं. नाहीं तर समजलेंच आहे. गोविंदराव भगवंत यांस पत्रें गेलीं तें श्रीमंतांची मर्जी घेऊन काय लिहितात ते समजोन बोलण्यास येईल." या प्रो उत्तर जालें. रा. छ १६ रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शुद्ध २ शके १७१६, ता. १७।४।१७९४

विज्ञापना ऐसीजे. सरकारचें पत्रा अन्वयें मुषीरुलमुल्क यांणीं बोलणें जालें ते वेळेस त्याचे बोलण्याचे उद्गार निघाले त्याचा तपसील:—

१ सरकारचे पत्रांतील मार्ग यैकोन बोलिले कीं "आतांच इतके नेटानें कां लिहिलें? होळकर यास बलावणीं गेलीं. ते आलियावर नेट धरावयाचा होता'. यावें उत्तर दिल्हें कीं 'राव शिंदे असतांनांच हो(ळ)करांस बोलावावें हा निश्चय ठरून पत्रें पूर्वीच गेलीं आहेत. नवाबाची श्रीमंताची दोस्ती जुज. यांत कुल. यांत वाजवी जाबसाल. यास दुसऱ्या कोणाची दरकार नाहीं. दोस्तीचा जाबसाल यास हेाळकराचे प्रतीक्षेचें कारण नाहीं.

१ आणखी येक गोष्ट अशी आहे कीं 'श्रीमंताचे नुकसान बंदगान अली यांस करणें नाहीं. तसेंच, बंदगानअलीचें नुकसान श्रीमंत करीत नाहींत, हा निश्चय. तेव्हां दौलतीस व उभयतां सरदार यांचे कांहीं होत नाहीं. मगर, मदारुल माहाला यांचा व माझा उभयता मझेला याजमुळें इतका प्रकार त्यास हा निश्चय करून ठरविला आहे कीं मदारुलमहाला याचा गुरु तुटेल अथवा माझा उरु मोडेल. दोहींतून येक गोष्ट होईल. ईश्वर इच्छा. काय घडेल पहावें. 'याप्रों स्पष्ट बोलून हांसले. मलाही हास्य येऊन बोललो कीं 'आपले बुधीची हातवटा कोणास यावयाची नाहीं. मसलहत करण्याची जात विलक्षण पाहिली. ईश्वर आपल्यास सलामत राखो' 'काय मनांत आलें?' ह्मणोन पुसों लागलें. तेव्हां बोलिलों कीं 'अंत:करणाची जात साफ. कांहीं मनांत ठेवावयाचे नाहीं. येक वेळ गोष्ट मनांत मनांत आली ह्मणजे तिचा जाहिराणा करून बोलत असावें. अशी छाती कोणाची आहे? बंदगान अलीचे कारभारी जें पूर्वी जाले. परंतु

आपल्या मुकाबल्यास कोणी येणार नाहीं.' असें बोलल्यावर म्हणाले कीं. 'सिधांताची गोष्ट ध्यानांत आलीयावर काय भय? आणि संकोच कश्यास? दोन दोन हात देही आहेत, असें बोलले. नंतर त्यांस म्हटलें कीं 'आपले सारखें दाम येथ परियंत वाढुं देणार नाहींत ही आम्हांस खातर जमा आहे.

—

२

सदरहू प्रों मार जाला. छ १६ रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शुद्ध २ शके १७१६, ता. १७।४।१७९४

विज्ञापना म्हैसीजे. मुलील मुलुक म्हणत होते कीं मदारुल्महाला यांस पहिल्यानें कोणते गोष्टीचा नेट फार येत असतो. प्रस्तुत स्वस्थतेचा समय पाहून जुरत धरली. यखादा फंद उभा राहिला म्हणजे सर्व विसरून नरम पडतात. आतां हुषार जाले. शवसिंदे यांचा काल जाला बखेडे पडतील. पाहावें. तिकडील पुरवणी करितां करितां पुरें होईल. त्यावेगळ घरांत (घरांत) दौलत आहे किती दिवस स्वस्थता राहील? नाना प्रकारचे अंदेषे येऊन वारद होतात. दक्षण आमची असें आम्हीं म्हणवीत असतां टिपु सुलतान याचा उत्कर्ष तों परियंत आमची दक्षण अश्या म्हणण्याचा भाव आम्हांस कोठें होता? ईश्वराचे कृपें करून त्याचें पारिपत्य जालियावर आमची दक्षण असें शब्द आतां तोंडावाटें निघुं लागले. याचें उत्तर त्यांस दिलें कीं 'श्रमिंताचे दवलतीस हा दोष निघडून द्यावा असें नाहीं, याप्रत्वी (पृथ्वी) वर जे रिया. सत करितत. सर्वावर ईश्वराची इच्छा गालब आहे. ईश्वर कोणते वेळेस काय करील हा भरंवसा कोणीच मनांत आणुं नये हे खरें. या प्रों बोलणें जालें. रा. छ. १६ रजमान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शुद्ध २ शके १७१६, ता. १७।४।१७९४

विज्ञापना यैसीजे: नवाबाकडुन (न) साहेब याचे पादी समधें पत्रें सरकारांत आली. याची उत्तरें पोहचवून स्वारी न येण्याचा भाव समजला म्हणजे

नबाब बोरचीस जाणार. तेथून हैदराबादेस जावें यैसी परभारें बातमी समजली. त्यास बहुतकरून हैदराबादेस जाणार नाहींत असें असतांही जावयाचा निश्चय पूर्णपणें जाला असें समजलियावरून बाबासी व दौलासी तुह्मीं बोलावें. जे अजमासे बेदरास येणें जालें यांत सरकारचे लढे जुज यातीचे उगऊन परस्परें भेटी होणें चांगलें. यास्तव ही गोष्ट करुन हैदराबादेस जाणें हे सलाह या प्रों बोलणें हें कीं यावर जातील जाबोत ह्मणोन आज्ञा त्यास प्रस्तुत येथें फार पैहरत जाली कीं नबाब रमजानचा महिना जालियावर हैदराबादेस जाणार यात (त) था नाहीं. जनान्यांतीलही बातनी (मी) या प्रकारचीच तेव्हां मुषरिलमुलुक यांस पुसावयासि पाठविलें कीं हैदराबादेस जाण्याची खबर फार प्रगटात आलेली आहे याचा काय निश्चय जाहला तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं मी ही असेंच लोकांचें बोलणें ऐकतों. परंतु नबाब मसी अद्याप बोलले नाहींत आणि निश्चयही जाण्याचा दिसत नाहीं. या प्रों त्याजकडील निरोप आला. याचा तपशील अलाहिदा लिहिला आहे, त्याजवरून ध्यानांत येईल. जाण्याचा निश्चय असें खचित समजलें ह्मणजे स्वामीचे आज्ञे प्रों बोलण्यांत येऊन उत्तर होईल तें लिहीन. रा. छ १६ रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शुद्ध २ शके १७१६, ता. १७।४।१७९४

विज्ञापना यैसीजे. नबाबाची प्रकृत बेंदरास आलियापासुन ठीक नाहीं. शरीराची भावना हैदराबादेस होती त्यापेक्षां बहुत क्षीण, शरीर फार रोड जाले. वृद्धापकाळ पहिल्या प्रों भक्षणही होत नाहीं. दरबार करुन बसतात शिकार करितात हें सर्व शोभार्थ लौकिक. हवा येथील मानत नाहीं. मनांत हुरहुर फार. चित्त येक ठिकाणीं लागत नाहीं. दौलाचे आग्रहामुळें आजपर्यंत राहिलें. अलीकडे प्रकृतीस क्षोभ बहुत जाला आहे. हैदराबादेस जावें हें मनांत भरलें. बेगमा आदिकरून सर्वांनीं निकड केली, चित्त उदास जालें, तेव्हां निश्चय केला कीं हैदराबादेस रमजानचा महिना जाला ह्मणजे जावें

दौलांनीं येक दोन वेळ अर्ज केला कीं कुल्यांत बिघडती. याजकरितां च्यार महिने छावणी येथेंच व्हावी. त्यास झिडकारुन उत्तर केलें कीं 'माझी कुल्यात बिघडावयाची नाहीं. माझी मी संभाळून घेईन. रुकनुदौलापासून जी दोस्ती त्याची बेहदुदी आमची आहेंच. तुह्मांस अदल जो जातीचे येऊन पडेल त्यास मदारुल महाला व तुह्मी उभयतां समजाऊन घेणें व बेदरास राहणें असल्यास राहावें. तुम्ही आपलें साठीं आमचे कुल्यातींत खलेल करणें मुनासब नाहीं. आम्ही हैदराबादेस जाउं.' या प्रों दोन वेळ बो(ल) ल्यावरून दौला बोलिले कीं 'हजरती वेगळ मी कवडीचा माल. मला कोण पुसतो ? जसी मर्जी असेल तसेंच करीन.' या प्रों बोलणें उभयतांचें जालें, मध्यें असीला जवळ होत्या, त्यांनीं मात्र हें वर्तमान यैकिलें. कारखानेदार यांस तयारीची ताकीदही जाली. त्यावरुन गोष्ट फायद्यांत आली. छ १३ तेरखेस मुषीरुल्लुक नवाबाकडे गेले होते. खलबतही जाले. कांहीं प्रकारच्या गोष्टी सांगून मर्जी हम (ला) वर करुन हैदराबादचें जाण्याचें राहविलें. कारखाने चराईस जावें अशी वार्ता निघाली त्यास शहरास जाण्याचा गुल फार जाला हे मसलतीस ठीक नाहीं, जाण्याची मर्जी असल्यास जावें. परंतु पोहरत आली ही मोडेल ऐसे समजाऊन रहावयाची पोहरत मात्र घातली हा येक प्रकार दुसरा प्रकार छावणी येथेंच करावी हा निछय. दोहींतून कोणता प्रकार निश्चयाचा हें समजल्यावर मागाहुन लिहीन. रा छ १६ रमजान हे विज्ञापना.

रा. छ १७ रवानगी टपालावरून.

श्रीमंत रावसाहेबांस छ. १७ च्या डांकेनें हवाल्याचें पत्र.

श्री.

चैत्र शुद्ध १४ शके १७१६, ता. १४ एप्रील १७९४ ईसवी.

विनंति विज्ञापना. निर्मळ वगैरे माहाल बाबत स्वराज्याचा यैवज नवाबाकडून साबाद अवरंगाबादेवर तनखा येती त्याप्रमाणें सन १२०२ सालची बाकी व सन १२०३ सालचा यैवज येणें याजकरितां दौलास निकड केली कीं साले गुजरोन गेली सरकारचे यैवजाची तनखा व्हावी. दौलांनीं

राजाजीस तनखा बाा यैवज जफरुदौला या माहालचा देणें किती याचा फर्द करून समजावणें म्हणोन सांगितलें. राज्यांजीनीं फर्द तयार करून दिली, सन १२०२ साल पैकीं दीड लक्ष आलेसें हिशोबी पेशजी तनखा यैवजी दिल्ले ते वजा करून सन १२०३ पैकीं आलेले हिशेब दीड लक्ष द्यावयाचे जमा करून सालाबादी तेरा हजार सरंजामी वगैरे याजकडे दुसाला देहेतीबाा सवीस दजार दोनसें व परवणी, लोहगांव, आवढें, ठाकळी, पांचळेगांव वगैरे महालांत स्वराज्याकडील अमलदानी वसूल येक लाख सतावीस हजार आठसें घेतला आहे. तो वजा करून बाकी यैवज राहिला त्याची तनखा तयार करून देवितों यैसें याचें बोलणें.' याचें उत्तर आह्मीं केलेंकीं ' जफरुदौला बाबत महाल यैवज सरकारांत येतो. परभारें माहालीं सरंजामी वगैरे सरकारचे अंमलदारांनीं यैवज घेण्याची आज्ञा सरकारांतून नाहीं. त्या पक्षीं स्वराज्याकडील अमंलदार पैका घेणार नाहींत. कोणे मामलेदारानें यैवज घेतला त्याच्या रसीदा दाखवल्या ह्मणजे सरकारांत विनंती लिहितां येईल' यांचें ह्मणेकीं ' श्रीमंताकडील मामलेदारांनीं येवज जबरदस्तीनें घेऊन रसीदा अमीलास दिल्या नाहींत. रोंशनखां वगैरेंनीं पत्रें व यैवज दिल्याचे जमाखर्च पाठविले आहेत त्यावरून हें लिहिलें? आम्हीं सांगितलें कीं ' रसीदाच नाहींत त्या पक्षीं मामलेदारांनीं यैवज घेतला कशावरून समजावें ? दौलाचें बोलण्यांत कीं आह्मीं रोंसनखा वगैरे जागिरदारास इनामतनामे पाठविले आहेत, कीं ज्या कमाविसदारांनीं महालीं यैवज घेतला त्याजपासोन रसीदा घेऊन पाठवणें. रसीदा आणविल्या. येतील.' या प्रमाणें याचें बोलणें. त्यास सदरहु प्रों. यैवज वजा करून तनखा देवितात त्यास ये विषई आज्ञा जसी होईल त्या प्रमाणें यांसीं बोलण्यांत येईल. छाछ १७ रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शुद्ध १४ शके १७१६. ता. १४ एप्रील १७९४ ईसवी.

विनंती विज्ञापना. पो. उमरखेड पासोनं शहा मिर्जा यानें यैवज घेतला. तो सरकारांत नबाबाकडून येणें. त्यास दौलाचें ह्मणें कीं येहंतषामजंग जफ-

रुदौला यांनीं चाळीस हजारचा तमसुम लेहुन घेऊन फारखती आपाजी कोंडाजी कारकुनी श्रीमंताचे सरकार तर्फेने याजाबसालास जफरुद्दौलापाशीं आला ते समयीं घेतली, ते बर्जानस आहे, त्या बमोजीब चाळीस हजाराची तनखा प्रों, वसमतेवर यांनीं दो वायद्याची तयार केली. त्या पैकीं पहिले वायद्या बा. वीस हजार रुपये परगणें माार चे अमील बाजीराव व सैद मुनवरखान यांनीं मजकडे यैवज दिला तोघे ऊन रसांद अमलिाचे नावें मी दिल्ही कीं "शहामिर्जा यानें उमरखेडापासोन यैवज घेतला तो नबाबा कडून श्रीमंताचे सरकारांत येणें त्या यैवजीं चाळीस हजारांची तनखा तुम्हांवर जाली त्या पैकीं पहिलें वायद्याचें वीस हजार रों आम्हांस पावलें" या प्रों रसीद मोहगम देऊन यैवज घेतला. पुढें दुसरे वायद्याचे वीस हजार घेऊन रसीद सालिनात खानाचा यैवज पावल्याची द्या यैसें वसमतकर अमीलाचें बोलणें पडलें. ते समई हा माार राजश्री गोविंदराव भगवंत यांस लिहिला. त्यांनीं राजश्री नानांस विनंति केली त्याची आज्ञा ज ली. पत्रही मला आलें कीं शाहा मिर्जा यानें उमरखेडापासोन यैवज बहुत घेतला यैसें असतां चाळीस हजारावरफैसला होणार नाहीं. आपाजी कोंडाजी पासून जबरदस्तीनें जफरुद्दौलांनी फारखत घेतली. ते सरकारांत कबूल नाहीं, यास्तव पहिली वीस हजारांची मोहगम रसीद दिल्ही. त्या प्रां रसीद देऊन यैवज येत असल्यास द्यावा. सालिना रसीदीचा आग्रहच करूं लागल्यास पहिले वीस हजार घेतले आहेत ते फिरोन द्यावे. या प्रों आज्ञा जाली, तेव्हां वीस हजार दुसरे वायद्याचे वीस हजार अमीलांनीं आणिले ते रसीदीचे दिकती करितां घेतले नाहीं. सांप्रत हा जाबसाल दौलाशीं बोलण्यांत आणिला कीं शाहामिर्जा बाबत आपल्याकडे सरकारचा यैवज येणें आपण वसमते कडून चाळीस हजार देविले त्या पैकीं वीस हजार पेशजी घेऊन रसीद अमीलाचे नावें दिली. दुसरे वायद्याचे वीस हजार रुपये अमील आम्हांस द्या म्हणतात त्यास सरकारांत ये विषईची विनंति लिहिली. आज्ञा जाली कीं शाहामिर्जा बाबत मुबलक येथें आपाजी कोंडाजी पासोन जबरदस्तीनें जफरुद्दौलांनी चाळीस हजाराचा तकसुम देऊन फारखत घेतली ते सरकारांत मंजुर नाहीं

जो यैवज उमरखोडापासोन घेतला त्याचा फडशा जाला पाहिजे. याप्रों आज्ञा आहे. याचें उत्तर दौलांनीं केले कीं हे जाबसाल आहेत. तर्फेनें सरकारनें विचारें पुढें जसा निर्णय ठरेल तसा ठरो. तुर्त यैवज आला तो घेण्याचा तुह्मापासीं अमानत असों द्यावा. त्यास पेशजी वीस हजार घेतले आहेत. बाकी वीस हजाराच्या हुंड्या आल्यात्या सावकारांचे दिवाळे निघालें. याज करितां त्या हुंड्या फिरोन दिल्या. त्यास मोबम रसीद घेऊन वीस हजार दिले तर यैवज घेतो. नाहीं तरी घेत नाहीं. रा. छ. १७ रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शुद्ध १४ शके १७१६, ता. १४ एप्रील १७९४ ईसवी.

विनंती विज्ञापना. घासी मिया याची तबियत बहुत कसलमंद. नित्य दहा, बारा पंधरा दस्त होतात. नबाबांनीं चंपाअसील नेहेमीं मियापासीं जवळ बैसऊन हकीमाकडुन दवा देवितात. दोन दोन घटिकेस घासीमयाचे तबियतीची खबर आणवितात. येक दिवस हुशार येक दिवस बेआराम याप्रमाणें मियाचें तबियतीचा अहवाल आहे. रा छ. १७ रमजान हे विज्ञापना.

सदर तारखेच्या डांकेवर व्यंकटराम दीक यांजकडून चेनापटणाहुन आलेली अखबार गोविंदराव भगवंत यांचे मार्फत रवाना केल्याचें पत्र.

छ. ११ ते छ. १७ पावेतों मामुल रोजनामे अखबार (पृष्ठांक ३८७ १८८)

छ २३ रोजीं डांकेवर.

श्रीमंत रावसाहेब यांस मामुल हवाल्याचें पत्र.

श्री.

चैत्र शुद्ध १४ शके १७१६. तारिख ता. १७१४ इ०.

विनंती विज्ञापना. बेदराहुन कुच करून हैदराबादेकडें जाण्याचा बेत नबाबांनीं योजिला होता. यास सलाह बेगमा आदि करून सर्वांचें संमत. फारासखाना वगैरे कुल तयारीतही डौल जाला. बाजारांत तमाम साहुकार

लोक वगैरे हैदराबादेकडे नबाब जातात हे खबर गरम जाली. दौलास समजल्यानंतर त्यांनीं खिलवतींत नबाबांस अर्ज केला कीं 'हैदराबादेकडे सवारी मुबारक मुतवजे होण्याचा दाट गुलबाग जाला आहे. हे गोष्ट कुलयातीस दुरुस्त नाहीं. लोकांतही हा गुलबाग होणें खुषनुमानारी. याप्रमाणें तीनच्यार घटका नवाबाचें व दौलाचें बोलणें होऊन ताकीद सर्वास जाली कीं हैदराबादेकडे कुच असें कोणी ह्मणेल त्याचे पारिपत्य होईल. हे ताकीद जाल्यावरून तुर्त हैदराबादेस जाण्याची चर्चा राहिली बेदरची छावणी हेच बोलबा जाली आहे. इतक्यावर जें पाहण्यांत ऐकण्यांत येईल त्याची विनंती लिहिण्यांत येईल. नवाबानीं यकदोन वेळ दौलास झिडकारुन सांगितलें कीं माझी कुलियात मी संभाळुन घेईन, बिगडावयाची नाहीं, तुह्मासाठीं मी आपली कुलियात बिगडु (न) कीं काय ? तुमचे आणि मदारुल माहाला यांचे ठीक नाहीं. तुह्मीं येथें रहावें. तेव्हां यांच्यानें पुढें बोलवेना. त्यास येक दोन दिवस जाउ दिल्हे नंतर जाऊन अर्ज केला कीं हजरतीस जेव्हां जाणें असेल तेव्हां जावें, सरंजाम लांब नाहीं जवळपासच आहे. परंतु आजपासोन जाण्याचा पुकारा आणि शोहरत बेतन्हा होणें हें खुषनुमा नाहीं.' त्याजवरुन सर्वास ताकीद जाली. चौकीचे लोकांची छपरबंदी करावयास हुकुम जाला. शोहरत जाली होती ते मोडली. पुढें शहरांत जावोत न जावोत. वैशाखाचे महिन्याची संधि आहे. त्या महिन्यांत गेले तर जातील नाहींतर जात नाहींत. छावणी करतीलसें वाटतें. र॥ छ १३ रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र शुद्ध २ शके १७१६, ता. १७।४।१७९४

विनंती विज्ञापना. छ १७ रमजानी दौलांनीं रात्रीं. आह्मांकडे रुका पाठविला कीं हजरतीकडून पादीचे मुकदम्यांत खरीता सर्व पंतप्रधान व मदारुल माहाला व हरी पंडतजी यांचे नांवें पत्रें गेलीं होतीं. त्याचे जवाब खोत्तमराव यांचे विद्यमानें आले आहेत. ते हजरतीनी मुलाहिजा करून कि. त्येक मार तुह्मांसी बोलावयाकरितां ईर्षाद केला. त्यास मी अर्ज केला कीं

यंविषींचा रुका लेहुन रावजीकडे पाठवितो. ईर्षाद जाब कीं " रुक्का न लि. हितां त्यांजला आपले येथें बोलाउन ईर्षाद बमोजीब त्यांसी माार बोलण्यांत आणुन त्यांजकडोन राव पंत प्रधान यांस व मदारुलमाहाला यांजला पत्रें लिहवुन व तुम्हींही पत्रें त्याहावीं. याजकरितां उदईक आपण यावें " म्हणोन लिहीलें. त्यावरून आम्हीं छ १८ रोजीं दीडप्रहर दिवसां दौलांकडे गेलो. ते मार्गप्रतीक्षा करीत होते. सर्वत्र मुत्सद्दी मंडळी वगैरेस जबाब दिल्हाच होता. आम्हीं जातांच खिजमतगार वगैरेस दुर करून दौलांनी माार केला कीं " पादीचे मुकदम्यांत राव पंतप्रधान यांस व मदारुलमाहाला आदिकरून पत्रें पादीस रौनक आफजा देण्याविषयीं लिहून रवोत्तमराव यांचे मारफत पाठविली होती. त्याचे जबाब हाल आले त्याप्रमाणें दोन पत्रें येक मदारुलमहाला यांचें व येक गोविंदराव भगवंत यांचें येकुण दोन मत्रें वाचून पाहिलीं त्यास याचे मसविदे पेशजी तुमचे विद्यमानें आले होते त्यांवरून मजकुर समजलाच होता. तथापि दोन्हीं पत्रें वांचून भाव समजला कीं पादीस येण्याविषयीं टाळा देऊन अस्ताचा बहाणा करून लिहिलें आहे कीं राव पंतप्रधान प्रथम स्वारीस निघणार तेव्हां *साअतनेक पाहिजे. ते नाहीं.. तेव्हां शुक्राचा अस्त व मंगल वक्री तेव्हां येणें कसें होईल? असं भाव लिहिले आहेत. याजकरितां हाजरतीस संतोष वाटला नाहीं व मजला ईर्षाद केला कीं रावजीस बोलावून तुह्मीं व ते येऊन याचेवर जबाबाची तजवीज ठराऊन त्याजकडोन विस्तारें पत्रें लिहवावीं कीं आमचे येथें नजुम विशेष करून जाचून पाहण्याचा संप्रदाय नाहीं. लग्नाची तारीखही मुकरर केली नाहीं. राव पंत प्रधान याचे येण्याची अमद पाहून मग तारीख करार करावी. त्यास प्रस्तुत तिकडील उत्तरांत अस्ताचा सबब लाउन लिहिलें आहे. त्यास तेथें नजुमी व गणक वगैरे ब्राह्मण चांगले आहेत, त्यांस विचारून पादीची तारीख व राव पंतप्रधान यास बाहेर स्वारीस निघण्याचा साअतनेक पाहून आह्मांस इतला करावा ह्मणजे त्या प्रमाणेंच पादीचा निश्चय करण्यांत येईल. सारांश शादीची खुबी व राव पंतप्रधान याचे भेटीचा हेत फार आहे व यांचे येण्यांत रौनक

* चांगला मुहुर्त

अधिक होईल. जेव बजीवत येईल. याजकरितां रावजा कडून राव पंत प्रधान यांस व मदारुलमहाला यांस पत्रें लिहवावीं व आमचे तर्फेनही त्याहावें ह्मणोन ईर्षाद केला. त्यास तुह्मी विस्तारयुक्त त्याहावे व हजरतीचीही पत्रें तयार करवितों. हजरतीस राव पंतप्रधान यांचे भेटीचा इपनियाक फार आहे हे गोष्ट जरूर घडावी ह्मणोन दौलाचे बोलण्यांत आलें. आणि अन्वयें सरकारचे खरीत्याचा जबाब नबाबाकडून थैली दिल्ही ती पाठविली आहे. राजश्री गोविंदराव भगवंत सेवेसी प्रविष्ट करतील त्याजवरून ध्यानांत येईल. राछ रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र वद्य ९ शके १७१६, ता. १४ एप्रील १७९४ इसवी.

विनंती विज्ञापना ऐसीजे. नबाबाचे कुच्याची पोहरत फार. या विषई दौलाचे माझें भाषण होते समई या विषई संकटांत पडून बयान करून बोलू लागले. याचा तपसील बहुत आहे. ते वेळेस असें समजलें कीं पोहरत मुकामाची प्रगट केली. परंतु आंतील निश्चय कुच करण्याचा. तेव्हां स्वामीचे आज्ञेचें स्मरण होऊन दौलासी बोलिलों कीं "नबाब हैदराबादेहून बेदरास आले हेच ठीक नाहीं. तथापि येऊन एक वर्ष राहिले. आतां माघारे चालले. यांत लोक काय ह्मणतील? येवढे रईस यांची हरकत व्यर्थ होणें चांगलें नाहीं. त्यास ज्यापक्षीं येथपर्यंत आले तेव्हां आतां हेंच लाजम आहे कीं श्रीमंत पंडित प्रधान यांजकडील जुजवियातचे फैसले होऊन परभारें खुलासा करून भेटी व्हाव्या. नंतर नबाबांनीं हैदराबादेस जावें. यांत शोभा. नाहीं तर कांहींच नाहीं. जर नबाबाचा आग्रह कुच करण्याचा आहे तर याविशीं अर्ज करावा. येसे माझे मनांत" हे शब्द बोलताच दौलाचे मनास संतोष होऊन बोलिले कीं "माझे मनांतील गोष्ट सांगितली. वास्तविक नबाबाचें येणें येथें प्रकृतीकरितां हे खरें, परंतु येथून माघारें जाणें व्यर्थ होऊं नये तेव्हां त्यांस ह्मटलें कीं 'तुह्मीं प्रकृतीकरितां असें ह्मणतां परंतु सर्व दुनिया बात असें कोणीं ह्मणत नाहीं, अणिकच कांहीं बोलतात.' तेव्हां बोलिले कीं नानाप्रकारचे तर्क निघतात

खरे. कोणी म्हणतात भोंसल्यावर दृष्टी आहे. कोणाचें म्हणें राव शिंदे यासी सख्त आहे. याजकरितां येथें आले. सुरापुरकर यांजवर मोहीम इतकें. आणि याजपेक्षांही अधिक जे मनांत आणाल ते प्रकार यांत निघतात. आणि घोहरतही आहे परंतु येक प्रकृति करितां येणें जालें हें खरें. दुसरें कांहीं नाहीं त्यास आतां व्यर्थ घहरास जाणें हें माझे मनास प्रशस्त वाटत नाहीं. श्रीमंताकडील फडचे ठरून सफाई व भेटी होऊन उपरांत जावें अथवा श्रीमंताकडील गोडी संपादन करून त्याचें विचारे भोसले याजकडील कार्यावर असावें" या प्रों. बहुत विस्तारें बोलिले याचा तपशील अलाहिदा लिहिला आहे त्याजवरून ध्यानांत येईल. राळ रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र वद्य ९ शके १७१६, ता. २४।४।१७९४

विनंती विज्ञापना होसीजे. बेदरचे राहण्याचे प्रसंगावरून दौला बोलिले कीं "श्रीमंत व नबाब उभयतांची ऐक्यताच आहे. मदारुलमहाला यांची माझी चित्तशुद्ध नाहीं. याविसीं त्याचे चित्तांना सफाई करावी असें आलें तर यास उशीर लागणार नाहीं आणि सफाई न होतां जिदेवर आले तर इतकी जिदी करावी असें त्याचें कीं कांहीं केलेंही नाहीं. मगर जुजवियात यास फारनीकसी केली तर आदवनी आणि च्याहारुमचा पैका मागतील त्यास पंतप्रधान व नबाब दोन्हीं दौलती बाहीद मदारुमहाला याचे माझें येक अंतःकर्ण असल्यास करोडो रुपयांची किफायत करून दाखवीन. नबाबाची किफायत याचे दौलतींतील यका रुपयाची केली तर पंत प्रधान यांची किफायत आठ आण्याची करीन. पंतप्रधान याचे दोलतींतील किफायत येका रुपयाची केली तर तेथें नबाबाची किफायत आठ आण्याची करून दाखवीन, येक वेळ अनुभव तरी पहावा. यांचे दोन प्रकार दोही सरकारचे जुजवियातचा लढा उलगडून टाकावा. नंतर येकवर्ष होऊन घ्यावें. त्यांत माझी परीक्षा पाहावी. अथवा जुजावियात इतके दिवस राहिली तशी आणखी येक वर्ष अशीच राहु द्यावी. मदारुलमहाला यांणीं सफाई अंतःकरणपूर्वक करावी. माझी चाल कशी

ही येक वर्ष पाहून अनुभव घ्यावा. जर सचोटीस उतरलो तर उत्तम जालें. नाहींतर आपण आपले ठिकाणीं मुखत्यार आहां. दोहींतून जसें मर्जीस येईल तसा अनुभव पहावा. मध्यें उगीच खलष आहे हा ठेवणें मुनासीब नाहीं." ह्मणोन बहुत विस्तारें करून बोलिले, आणि लिहावयास सांगितलें. त्याजवरून लिहिलें आहे. आज्ञा येईल त्याप्रमाणें यासी बोलण्यांत येईल. साल रमजान हे विज्ञापना.

श्री

चैत्र वद्य ९ शके १७१६, ता. २४।४।१७९४

विनंती विज्ञापना ऐसीजे. दौला बोलिलें कीं "दोही दौलतींची दौलत खावी कृष्णराव भिकाजी यांनीं आज परियंत केली. आतां जबाब सालांत तुह्मीं आहां. त्यास इश्वरनकरो व कदांचित जर दोहों दौलतीचा बिघाड झाला तर तुह्मांवर शेव्द आहे कीं कृष्णराव यांचे पाठीमागें तुह्मीं या कामांत असतां अशी गोष्ट जाली असें न घडावें." याचें उत्तर मीं त्यास दिलें कीं "आमचें काम आणखी कोणतें? श्रीमंतांचे तर नौकर आणि नबाबाचे दौलत खांव. त्यास दोहीं दौलतीची बेहबुदी आणि यगायनगतीची मजबुती तेंच आम्हीं करीत असावें, ही गोष्ट श्रीमंतांस आणि नबाबास रोषन आहे. आपल्यासी आणि आमचे घरांसी जी चाल आहे त्याची व काफियत ही मला ठाऊक आहे जे वेळेस आपण आवश्यांत होते ते समई आपल्या कडील दोघे कारकून आपलीं पत्रें व इमान घेऊन कृष्णरावजीकडे आले. तीं पत्रें रावजीस मींच वाचून दाखविलीं. त्या इमानावर रावजींनीं मदारुल. माहाला यासी बोलुन त्यांचीं पत्रें आपणांस पाठविलीं. ईश्वरकृपें करुन हा दर्जा आपणांस प्राप्त जाला त्यापक्षीं आपले ममतेचे दृष्टींत आम्हीं असावें. आमचा हक आपल्यावर आहे. ह्या सर्व गोष्टी मी विसरलों नाहीं. आपले खातेंत हे कांहींच न येतां श्रीमंतांकडील राजदारीच्या गोष्टी आपण फायाषांत आणिल्या. मदारुलमहाला यांची मर्जी तुम्हांवर ठीक नाहीं हा उगींच आरोप आम्हांकडे ठेऊन जसें दौलत खांव आपण केलें अशी आपली चाल दिसूं

लागली. जर मदारुमहाला यांची मर्जी आम्हांवर नाहीं तर आम्हांस आपल्याकडे कशास पाठविते? हें देखील आपले मनांत न आलें! असो तथापि आम्हीं आपली चाल सोडिली नाहीं आपल्याशीं कांहीं बोलावें तर भरंवसा असा येईना कीं गोष्ट आपले रुचीस पडेल. लाच्यार उगींच बसुन राहिलों. नूतन दौलतखांब याचा अनुभव येऊन द्यावा, आम्हीं शिलकी दौलतखबां आहोंच. जे वेळेस ममतेची दृष्टी इकडे फिरेल ते वेळेस जवळच आहों असें मनांत आणुन स्वस्थ आहों. श्रीमंतांकडील वाजबी जाबसाल स्नेहानें करावे असें मनांत येईल तेव्हां आमचें काम, ही उमेद ठेऊन आहों. त्या अर्थी बिगाडाची सुरत जाली याचा शब्द आम्हांकडे काय? आपण ज्या मार्गे चालवाल तसेंच चालूं. आपले शिवाय नाहीं. या प्रों बोलिल्यावर लाजत लाजत कांहीं उत्तर द्यावें म्हणोन दिल्लें. समर्पक नाहीं. शेवटीं बोलिलें कीं श्रीमंतांस व मदारुलमहाला यांस जें लिहिणें तें लिहावें आणि ज्यांत दोंही दौलतीची बेहबुद तें करावें." याप्रों दोन च्यार घटिका बोलणें जालें तें शेवटीं लिहिलें असे. रा छ माहे रमजान हे विज्ञापना.

श्री

चैत्र वद्य ९ शके १७१६, ता. २४।४।१७९४

विनंती विज्ञापना ऐसीजे. दौला बोलिलें कीं "राव शिंदे यासीं दोस्ती संपादन केली याविशीं कोणास काय संशय असेल तो असो. परंतु माझे मनांतील हेत फार आहे कीं हिंदुस्थानांत येक साहेबजाद्यास घेऊन जाव आणि राव पंत प्रधात यांजबरोबर शरीक राहावें. याजकरितां किती वर्षापासुन राव शिंदे यांचे साधनास लागलों श्रीमंतांचे आज्ञेशिवाय शिंदे ही गोष्ट कशी करतील हा संशय. त्यास श्रीमंताचे घरचे मातबर सरदार त्यांनीं भिड घालुन श्रीमंतांस विनंती केली असतां अमान्य न करते या भरंवसियावा राव शिंदे यांसीं शिलशिला राखिला. त्यास राव शिंदे तर गेले परंतु माझे मनांतील उटउट गेली नाहीं. ही गोष्ट नबाबाचे पसंदी (ती) स येत नाहीं. कारण हिंदुस्थानांत पातशाईत दर्क करावा यास खुद पातशाहा बद्दोल आणि

कायम मिजाज येकसुत्राने चाल असावी तर शोभा. तो प्रकार नाहीं. तेव्हां बखेडा. पातषाहा बखेडे करूं लागल्यावर नजरबंद करुन दौलत चालवावी. हें करणे प्राप्तप्रसंग गाजूर्दीखान हाल आहेत त्याजवर बदनामी आली त्याच फेऱ्यांत अद्याप फिरत आहेत. याजकरितां इतके खोल पाण्यांत शिरणें नको म्हणोन नवाबास इच्छा नाहीं. परंतु माझी हाउस आहे. या विषई येक वेळ, दोन वेळा च्यार वेळ श्रीमंतांस विनंती करीन असें करतां येखादें वेळेस तरी मनांत येईल. हा सिलसिला माझा चाललाच आहे. राहणार नाहीं असें बोलिलें. राछ रमजान हे विनंती

श्री

चैत्र वद्य ९ शके १७१६. ता. २४ एप्रील १७९४ ईसवी.

विनंती विज्ञापना ऐसीजे. पातषाहींतील मजकुर बोलत बोलत दौल, बोलिलें कीं पातषाहा इंग्रजाचे पुढ्यांत शिरावयास करतो. कारण काय त्यास कितेक दिवस इंग्रजापासीं बंगाल्यांत पातशाहाचें राहणें जालें होतें ते वेळेस त्याचे मुदारातीचे सुखाचा अनुभव त्यास आहे. प्रस्तुत खाया खर्चा वेगळ हैराणगत कैदे सारखा आहे. रडणें भेकणें नित्य चाललें आहे त्यास पातशाईची थोडीच आशा आहे? खायास खर्चास आराम इतकें असले म्हणजे संतोष. याजकरितां येखादे वेळेस इंग्रजांनीं लालुच दाखविली तर उठोन जाईल. ही येक कवाईतच आहे" म्हणोन बोलत होते. राछ रमजान हे विज्ञापना,

श्री

चैत्र वद्य ९ शके १७१६. ता. २४ एप्रिल १७९४ इ०.

विनंती विज्ञापना ऐसीजे. दौलाचे सांगितल्याप्रमाणें पुरवण्या स्वामीस लिहिल्या. याचीं उत्तरें समर्पक गोड आणि दावाचीं लिहा यावी. याचें कारण मला हे पुसतील कीं 'तुम्ही पत्रें लिहिली त्यांचीं काय उत्तरें आलीं? तेव्हां मला पत्रें दाखवावी लागतील यास्तव विनंती लिहिली आहे. तर छ २३ रमजान हे विज्ञापना.

श्री

चैत्र वद्य ९ शके १७१६, ता. २४।४।१७९४ इ.

विनंती विज्ञापना ऐसीजे. दौलाचे बोलणें जालें हा मार स्वामीस लिहिला याजवेगळ कांही मार आढळांत आला तो राजश्री गोविंदराव भगवंत यांस लि॥ अहे. सेवेंत विनंती करतील त्यावरुन ध्यानांत येईल. रा छ २३ रमजान हे विज्ञापना.

श्री

चैत्र शुद्ध १४ शके १७१६, ता. १४ एप्रील १७९४ ईसवी.

विनंती विज्ञापना. दौलाचे बोलण्यांत आलें कीं "येलंदगल, वरंगळ, नलगुंडा वगैरे तालुकियाचें काम ईसामियां यांस सांगोन तालुक्याचे बंदोबस्ताकरितां त्यांस तेथें पाठविल्या पासोन तालुक्याची लावणी व आकार ईसामियानें खातरखा केला. परंतु जमीदार वगैरे मुफसद फार आहेत त्यांची तंबी होऊन तालुका निर्वेध जाला पाहिजे. याजकरितां इंग्रजी दोन पलटणें कडपे प्रांती गंजीकोट्यापासीं होतीं तेथुन गजींद्रगडचे बंदोबस्तास खाना केली होतीं. तीं पलटणें येलगंदलाकडे आणवून ठेविलीं आहेत. येक हजारा सवाराचीही जमियत आहे. या उपरी मुफसदाचा खलल न होतां तालुक्याचा बंदोबस्त होईल" याप्रा यांचे बोलण्यांत आलें. आणखी बोलले कीं, 'देवगड चांदेंही तेथून जवळ आहे.' म्हणोन हंसत हंसत बोलले. यांतील तात्पर्य तिकडील रुखावर दबाव. रा छ २३ रमजान हे विज्ञापना

श्री

चैत्र शुद्ध २ शके७१६, ता. १७।४।१७९४

विनंती विज्ञापना. दौलाचे बोलण्यांत आलें कीं आसद अलीखान मुजफरुलमुलुक यांजकडे पहिले कडपे तालुक्याचें काम होतें. अलिकडे सुगुरजठपोळ कृष्णातीरचा तालुकाही त्याजकडे दिला. ताडपत्री ताडकरी, सिंगणमला, येलापुर हे तालुके ईसामियांकडे होते तेही आसदअलीखान यांजकडे सांगितले. यवुन तेथन येकहाती बंदोबस्त तालुक्याचा आसद अलीखान यांज-

कडे जाला. सवार पायेदळ जमियत सान मार यांची मजबुत आहे. तालुकियांचा बंदोबस्त खातरखा ठेविला आहे म्हणोन बोलण्यांत आलें. साहा हजार स्वार व पैदल साहा हजार बारा हजार जमियत मारनिलेची आहे. रा॥ छ. २३ रमजन हे विज्ञापना.

श्री.

चैत्र वद्य ९ शके १७१६, ता. २४ एप्रील १७९४ ईसवी.

विनंती विज्ञापना. दौलाचे बोलण्यांत आलें कीं वाळकुडे येथील जमीनदरा रुकमारडी व रमारडी याजपासी शेकरराव भोंग यांनीं नगदी ऐवज व चीजबस्त ठेविली याचा पत्ता लागल्यावरून उभयतां जमीनदारांस हस्तगत करून पाठवणेविशई भारामल तेजवंत यास येथुन लिा. फौजे सूद्धां वाळकुडे प्रांती भारामल आल्याचा बातमी ऐकून जमीदार फरारी जाले, तेजवंतानीं दोन हजार जमियत ज्याबज्या त्याचे शोधास रवाना केली. जमीदाराचा शोध देवगड चांदे येथें आहेत हा समजल्यावरून भारामल यांनीं चांद्यात रायले पुरषोत्तम यांस दाहा स्वार व च्यार हरकारे समागमें देऊन रवाना केले. हें चांद्यात जाऊन तेथील देवीचे नजीक डेरा उभा होता तेथें जाऊन रुकमारडी व रमारडी जमनिदार कबील्यासुद्धां पाडुन तेथील अधिकारी नाना फौजदार व गुंडोपंत व यादोसकदेव याचे जिमे जमीनदार लाविले त्यांनीं उत्तर केलें कीं ' जमीनदार आम्हांपाशीं आहेत सेनासाहेब सुभा याजकडे सांडणीस्वारासमागमे पत्र रवाना करितो. तेथील आज्ञा येईल तशी वर्तणुक करूं. य॥ प्रो बोलून रायेल पुरुषोत्तम यांस यांनीं आपल स्वार बराबर देऊन पाचकोस वर्धा पार करून दिल्हे. पुरुषोत्तम फिरोन तेजवंताकडे आला. त्यांनीं येथें पाठविले. त्याचे जबानी वर्तमान ऐकावें म्हणोन त्यास बोलाऊन रुबरु त्यानें हा मार सांगितला. दौला बोलिले ' वाळकुड्याचे जमीनदार शंकरराव याजपासीं खजीना होता तो घेऊन चांद्यांत राहिले. बजीनस तेथील अधिकाऱ्याचे जिमे केले. ये विषई सेनासोहेब सुभा यांस आपलें पत्र यावें व श्रीमंतांकडूनही त्यास पत्र जावें. इकडील माहसबेदार असामींस त्यांनी आश्रा देऊन ठेवावें हें त्यास लाजम नाही ' या प्रा॥ दौलाचे बोलण्यात आले. रा॥ छ २३ रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र वद्य ९ शके १७१६, ता. २४ एप्रील १७९४ ईसवी.

विनंती विज्ञापना. मीर पोकद अली शिकंदरज्याहा बाहादुर साहेबजादे यांस पुत्र हरमचे स्त्री पासुन छ १९ माहे रमजानीं रविवारीं च्यार घटिका दिवस शेष असतां जाला. नवाबास अर्ज होऊन खुषी जाली. दौलानें अर्जी पाठविली कीं गुलाम नजर देण्याकरितां हजर होत आहेत. रात्रीं येणें म्हणोन हुकुम जाला. त्या प्रो येक घटिका रात्रीं नवाब बरामद होऊन दौलाची याद केली. पागावाले वगैरे लोक हजर होऊन साहेबजाद्यास पुत्र जाल्याच्या नजरा लोकांनीं केल्या' राछ २३ रमजाम हे विज्ञापना.

श्री.

चैत्र वद्य ९ शके १७१६, ता. २४।४।१७९४

विनंती विज्ञापना. असद अलीखान यांस नवाबांनीं रुकसत कडप्याकडे जाण्याची छ १५ माहे रमजानी दिल्ही. छ १६ रोजीं दौलाचा निरोप घेऊन खान मार बेदराहुन कुचकरून छ १७ रोजीं गेले. राछ २३ रमजान हे विज्ञापना.

श्री.

चैत्र वद्य ९ शके १७१६, ता. २४ एप्रील १७९४ ईसवी.

विनंती विज्ञापना. व्यंकटरामदीक याजकडुन चेनापटणाहुन अखबार आली ते रवाना केली आहे. लौकर मजकुर ध्यानांत येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा जाली पाहिजे. राछ २३ रमजान हे विज्ञापना.

श्री

चैत्र वद्य ९ शके १७१६, ता. २४।४।१७९४

विनंती विज्ञापना. मिस्तर किरकपात्रिक इंग्रजाकडील वकील बाहेर डेर देऊन राहिला होता. त्यास इंग्रजी दोन पलटणें नवाबाकडे नोकरीस आहेत. ती कडयेप्रांतीं होतीं. तेथुन येलंगदलाकडे आणविली. हैदराबादेस पलटणे सरदार सुधां आल्याचे वर्तमान आल्यावरून पलटणांतील लोक व सरदार

याची देखरेख करण्याकरितां किरकपात्रिक येथुन छ २२ रमजानी निरोप घेऊन हैदराबादेस गेला. पलटणें पाहुन मागती बेदरास येणार. वरकड इष्टवारट वगैरे त्याचे सोबती मंगळवार पेठेंत पूर्वजागीं येऊन राहिले. छ २३ रमजान हे विज्ञापना.

श्री

चैत्र वद्य ९ शके १७१६, ता. २४।४।१७९४

विज्ञापना ऐसीजे. येथील छ १९ वर्तमान रमजान बुधवार पावेतों अखबार पत्रीं दाखल करून सेवेसी पत्राची रवानगी केली त्याजवरून ध्यानास आलें असेल, तदनंतर येथिल वर्तमान. छमार तीन प्रहर दिवसां नवाब जनान्यासहित दौलाचे हवेलीस आले. भोजन जनान्यांत होऊन नवाब दिवाणखान्यामध्यें बरामद जाले. दौला व मीरआलम व आसदअलीखान वगैरे इसमांचा सलाम जाला. असद अलीखानास कडप्याकडे जाण्याची रुकसत देऊन पानदान इनायत जालें. दौला व मीरअलम यांसीं खिलवत होऊन प्रहर रात्रीस आपले हवेलीस आले. छ १६ रोज गुरुवारीं च्यार घटिका दिवसां लालबागामध्यें जनान्याचा बंदोबस्त जाला. मगरबाचे समई चांदणीचे फर्षावर नवाब बरामद जालें. सरबुलदंजगं व अर्जबेगी वगैरे इसमाचा सलाम जाला. लखनउचे कंचनीचा नाच होता. मना कंचनीस पुत्र जाला. तिनें मान केली होती. नजर दिल्ही. मुलास नवाबानीं हसळी व बिंदिली इनायत केली. येक प्रहर दोन घटिकेस बरखास जालें. छ १७ रोज शुक्रवारीं लाग. (ल?) बागाचा झाडा करऊन तीन घटिकेस नवाब आले. जनान्याचा बंदोबस्त जाला. घासीमियाचे तबियतीची खबर आणिवली. तीन प्रहर दिवसां औरंगाबादेची अखबार गुजरली. मगरबाईचे समई चबुत्र्यावर चांदणीचा फरष करऊन नवाब बरामद जाले. सरबुलदंजग व खानसामाचा सलाम जाला. खानसामाच्या फर्दा पाहुन च्यार घटिका रात्रीं बरखास जालें. दौलाची अर्जी गुजरली. छ १८ रोज मंदवारी तीन घटिका दिवसा लालबागामध्यें जनान्याचा बंदोबस्त जाला. (म)गरबाचे समई सरबुलदंजंग व अजमखान व दिल-

दारखान व अर्जबेगी व खानसामा वगैरे मामुली लोक हजर जाले. नवाब कुर्सीवर बरामद जाले. सर्वांचा सलाम जाला. खानाखाने भरुन सर्वांपुढें ठेविले. सर्व इसमांनीं रोज्याचे भोजन केलें. पानदान देऊन तीन घटिका रात्रीं बरखास जालें. हैदराबादेहुन अलीज्याबाहादुर साहेबजादे यांचा अर्जी व नजरमेवा गुजरला. प्रहर रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. छ १९ रोज रविवारीं तीन घटिका दिवसा लालबागामध्यें जनान्याचा बंदोबस्त जाला. तीन प्रहर दिवसां दौलाची अर्जी गुजरली. मीर पाकेद अली सिकंदरजाहा साहेब जादे यांस हरमचे स्त्री पासोन पुत्र झाला. नवाबास अर्ज जाला. दौलांनीं नजर देण्यास येतो असी अर्जी पाठविली. रात्रीं येणें म्हणोन हु (कुः) म जाला. येक घटिका रात्रीं नवाब चांदणींचे फर्पावर बरामद जाले. दौला व पागावाले व गफुरजंगाचे पुत्र वगैरे इसमाचा सलाम होऊन पोकद अली साहेबजाद्यास पुत्र जाला. याच्या नजरां केल्या. राछ २३ रमजान हे विज्ञापना.

डांकराछ २ डांकवेरून

श्री

वैशाख शुद्ध ३ शके १७१६, ता. २।५।१७९४

मामुली पत्र डांकेबरोबरचें श्रीमंतांस,

श्री

वैशाख शुद्ध ३ शके १७१६, ता. २।५।१७९४

विनंती विज्ञापना. मीर पोकद अली सिकंदरज्या बाहादुर साहेबजादे यांस दौलाची नात नवाबांनीं केली. त्याचे शादीचे निक्याचा साअत छ २९ रमजान रविवारीं ठरून नवाबानीं सुभान अली वगैरे साहेबजादे यांजकडुन सांगोन पाठविलें कीं तुह्मी शादीचे सुर्ख रंगी पोषाग जवाहीर घालुन सिकंदर ज्याहा यांचे हवेलिस हजर असणें त्या प्रो ते पोकद अली यांचे मकानास तयार होऊन गेले. तीन प्रहर दिवसां पोकदअली आदिकरून साहेबजादे यांचीं याद केली. हजर जाले. दौलांनीं सिकंदर ज्याहा यांस पोषाक जरी कारचोबी व जवाहीर सिरपेंच जिगा तुरा दस्तबंद - भुजबंद कंठी पो-

ह्या जोड याप्रों पाठविले. नवाबास व माहालांतही वस्त्रें जवाहीरखाने किस्ती पाठविल्या. मगरबाचे समई जनाने देवढीपासोन दौलाचे हवेली पर्यंत कनाता पडदे देऊन बंदोबस्त करउन नवाब जनान्यासहित साहेबजादे समवेत दौलाचे हवेलीस आले. समारंभाचा तपशील अलाहिदा पुरवणीवरून ध्यानांत येईल. साल २ माहे षवाल हे विज्ञापना.

श्री

वैशाख शुद्ध ३ शके १७१६, ता. २।५।१७९४

विनंती विज्ञापना. मीर पोकद अली सिकंदरज्याहा बाहादुर साहेब जादे यांचा निका दौलाचे नातीसी लागावयाची साअत छ २६ रमजानी ठरुन रात्रीं दौलाचे हवेलीस नवाब जनान्यासहित साहेबजादे मंडळीस घेऊन आले. नवाबाचे हुकमाप्रो दौलांनीं आम्हांकडे पादीचा रुका सुर्ख रंगीन कागदावर लेहुन पाठविला कीं तुम्हीं यावें. त्यावरून च्यार घटिका रात्रि आम्हीं गेलो मीर पोकद अली, व सुभान अली व जुल फिकर अली व तैमूर अली च्यार साहेबजादे दौलाचे दिवाणखान्यामध्यें मजलस करून बसले होते, मीर आलम व इंग्रजाकडील वकील मिस्तर इष्टवारट व येहतषामजंग आदि करून दरबारचीं इसमें तमाम अमीर मनसबदार सरदार मुतसदी हजर होते, मी जातांच मीर पोकद अली यांनीं आपले जवळ बसऊन पटणचे मोहिमेच्या बगैरे गोष्टी सुरु केल्या. मीर आलम व इष्टवारट सहित बोलणें एक घटिका होत. नवाब जनान्यांत व दौला खटपटीस होते. साहेबजादे मज्यालस करून कंचन्याचा नाच होता. इतक्यांत निक्याची साअत समय होतांच मिर पोकद अली यांस असील बोलाऊं आली. चौघे साहेबजादे महालांत जाऊन मीर पोकदअली यासी दौलाचे नातीचा निका लागला. त्यानंतर नवाब दिवानखान्यामध्यें वरामद जाले. मजला बाजुस जवळ बैसउन बेतलें. सर्वांच्या नजरा जाल्या. कंचन्याचा नाच होता. दौलांनीं शरबताचा प्याला आपलें हातीं घेऊन नवाबापुढें येऊन प्याला धरला. प्रथम प्याला नबाबांनीं प्राशन केला. दुसरा प्याला दौलांनीं पुढें केला तो नवाब प्राशन करावयास गेले तों

प्याला माघारा सरकाउन घेतला. याप्रमाणें दोनतीन वेळां व्याहीपणाचे नात्यानें मपकरीचा अनुकार दाखविला. हा संप्रदाय करून दौलाचे हातचा प्याला घेतला. दौलास बसावयाचा हुकुम जाल्याप्रमाणें बाजूस बसले. नबाब मजकडे पाहुन बोलिले कीं " तुह्मीं पादीकरितां त्याची खेप कोणें प्रकारची? याचा बयान थोडा सांगण्यांत संयुक्त तऱ्हेचा केल्यावरून नबाब कांहीं हास्य-मुख होऊन संतोष जाले. मिस्तर इष्टवारट इंग्रजाकडील यानें कलकतेकर जन-रलाचें पत्र गुजराणिलें. तें दौलांनीं वांचून दाखविलें कंचनाचा नाच समाप्त करुन खुषालखान व कल्याणखान यांचे लेक येथें प्रस्तुत आले आहेत. त्यांचे गाइन दोन घटिका जालें मिश्री रुपेरी वर्खाची पानदान भरून आह्मांपुढें ठे-विली. अमीर उमरा येवन लोक यांस शरवताचे प्याले दिल्हे. याप्रमाणें समारंभ होऊन दहा घटिकां रात्री बरखास जाली. राछ २ षाबान हे विनंती विज्ञा-पना.

श्री

वैशाख शुद्ध ३ शके १७१६. ता. २।५।१७९४

विनंती विज्ञापना. दौलाचे बोलण्यांत आलें कीं ' रुकमारडी व दमारडी जमीदार बाळकोंडकर शंकरराव भोंग यांची माळियेत घेऊन कबीले सुद्धां फरारी होऊन देवगडचांद्यास गेले. त्यांचा पत्ता तेथें लाऊन रायेल पुरुषोत्तम येथें आला. तेजवंत यांचीं पत्रें या मजकुराचीं रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांस गेलीं होतीं. त्याचा जबाब त्याजडून आला कीं ' जमीदार चांद येथें आहेत. परंतु येकायेकीं पाठीसीं आल्यास हातीं कसें द्यावें? कांहीं येक तऱ्हेनें ज़मीदारास तेथून काढून देऊं, तुमचे हस्तगत होतील या अन्वयें लिहिलें आलें ह्मणोन बोलले,' रा छ २ माहे शवाल हे विज्ञापना.

श्री

वैशाख शुद्ध ३ शके १७१६. ता. २।५।१७९४

विनंती विज्ञापना. वजीरखान वासीम वगैरे वराड तालुकियाचा अमील तेथून निघोन दर मजल वेदरास छ २९ माहे. रमजानी येऊन उतरला.

समागमें पांचसें स्वार व दोनशें पायदळ दोन हत्ती याप्रमाणें सरंजाम आहे. ताळ २ माहे पवाल हे विज्ञापना.

श्री.

वैशाख शुद्ध ३ शके १७१६

ता. २।५।१७९४

विज्ञापना यैसीजे, येथील वर्तमान ता॥ छ १९ रमाजान रविवार पावेतों अखबार पत्रीं लेखन करून सेवेसीं पत्राची रवानगी केली. त्याजवरून ध्यानांस आलें असेल. सांप्रत येथील वर्तमान छ मजकुरीं मीर पोकद अली साहेब जादे यांस पुत्र झाल्याच्या नजरा होऊन च्यार घटिका रात्रीं बरखास जालें. छ २० रोज सोमवारीं पांच घटिका दिवसा नव्या बंगल्यामध्यें नवाब बरामत जाले. पागावाले व मीर आलम व रायेरायां, मुनसी वगैरे इसमाचा सलाम जाला. दौलाची याद केली. ते हजर जाले. कित्येक लोकांच्या नजरा जाल्या. दौला व मीर आलम यांसीं खिलवत होऊन येक प्रहराचे अमलांत बरखास जाले. कामाठ्याचे दारोग्यास हुकुम जाला. जे साहासे कामाठी रायेचुरास पाठऊन माहाबतजंगाचे कोठ्यांतील चकमकी बंदुका आणाव्या. मगरबाचे समई मीर पोकद अली वगैरे चौघे साहेबजादे यांजकडे खान्याचे खाने पा. रात्रीं दौलाची अर्जी व निरखबंद गुजरला. छ २१ रोजीं मंगळवारीं लाल बागाचा झाडा करून प्रातःकाळीं येक घटिका दिवसां नवाब आले. मीर पोकद अली साहेबजादे यांची याद केली. ते पांच घटिका दिवसां हाजर जाले. त्याची नजर जाली. रात्रीं जनान्याचा बंदोबस्त होऊन कंचन्याचा नाच जाला. दौलाची अर्जी गुजरली. छ २२ रोज बुधवारीं च्यार घटिका दिवसां लालबागामध्यें नवाब आले. जनान्याचा बंदोबस्त जाला. तीन प्रहरास कवलासाहुन आंबे २ व हंग्या आले ते गुजरले. रात्रीं दौलाची अर्जी व धारणेचा निरखबंद गुजरला. छ २३ रोज गुरुवारीं हैदराबादेपर्यंत टपा फुलें वगैरे जिन्नस येण्याकरितां बसविला. दिवसा दरबार जाला नाहीं. रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. छ २४ रोज शुक्रवारीं तीन घटिका दिवसां नवाब लालबागामध्यें गेले. येक प्रहर पांच घटिका दिवसां मीर पोकद अलीसाहेब जादे

यांचे मकानास बक्षी बेगम वगैरे बेगमा तेरा रथ गेले. पांचवे दिवसाचा समारंभ जाला. च्यार घटका दिवस शेष राहता मोतियांच्या फुलाच्या बंद्या* व गजरे नवाबांनीं साहेब जादे याजकडे पाा. मगरबाचे समई बेगमा हवेली आल्या. रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. छ २५ रोज मंदवारीं दिवसां दरबार जाला नाहीं. रात्रीं दौलाची अर्जी व धारणेचा निरखनामा गुजरला. छ २६ रोज रविवारीं तीन घटिका दिवसां लालबागामध्यें नवाब बरामद जाले. सैद उमरखान व जंगली वगैरेचा सलाम जाला. लालन हज्यामाची याद केली. तो हजर जाला. हज्यामत होऊन सात घटिकेस बरखास जाले. मीर सुभानअली व झुलफकर अली व तैमुर अली व ज्याहांगिर अली चौवे साहेब जादे व मनसुरजंग वगैरे मंडळीस हुकूम जाला कीं ' षादीचे सुर्खरंगी पोषाग घेऊन मीर पोकदअली साहेबजादे याचे मकानीं असावें. फराषखान्याचे दारोग्यास हुकूम होऊन जनानें देवडीपासोन दौलाचे हवेली पावेतों कनाता देऊन बंदोबस्त करविला. तीन प्रहरास मीर पोकद अली वगैरे साहेबजादे येऊन हजर जाले. दौलांनीं कारचोबी पोषाग व जवाहीर खाने मीर पोकद अली यांस पाा. येक घटिका दिवस शेष राहतां दौलाचे हवेलीस जनानापुढें पाठऊन बंदोबस्त जाला. नवाब मगरबाचे समई गदीचे हाथीवर स्वार जाले. पिछाडीस सरबुलदजंग होते. मीर पोकद अली घोड्यावर, बरकडही साहेब जादे घोडयावर स्वार होऊन दौलाचे हवेलीस आले. जनान्याचा बंदोबस्त होऊन नवाबांनीं अडीचसे खाने मिठाई व वस्त्रें जव्हेर नवरीस फुलें पानें या प्रों सरंजाम आणून चढावा चढविला. काजीस बोलाऊन पांच घटिका रात्रीं मीर पोकद अली यांचा निका दौलाचे नातीशीं लागला. त्यानंतर नवाब बाहेर आले. दौलाचे दिवाणखान्यांमध्यें बरामद जाले. दौला व मीर आलम व यहेतषामजंग व सरबुलंदजंग वगैरे लोकांच्या नजरा जाल्या. रावजी आले. सलाम जाला. दौलांनें षरबताचा प्याला आपलें हातें नवाबास दिल्हा. दौला व रावजीसीं बोलणें जालें. कवालाचें गायन ऐकून येक प्रहर दाहा घटिकेस बरखास्त जाले. जनान्यांत जाऊन शरबत, खीरी व खाना जाला.

येक प्रहर पांच घटिका रात्रीं दिवाणखान्यामध्यें नवाब बरामद जाले. मीर पोकद अली वगैरे साहेबजादेनीं नजरा केल्या. काजीस पांच पार्चे इनामत जाले. दौला व मीर आलम यांसीं बोलणें होऊन दोन प्रहर तीन घटका रात्रीस गदीचे हाथीवर स्वार होऊन रोषनाईनें आतषबाजी होत हवेली दाखल जाले. छ २७ रोज सोमवार दोन घटिका दिवसां नवाब लालबागांत आले. रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. छ २८ रोज मंगळवार दोन घटिका दिवसां लालबागामध्यें नवाब आले. जनान्याचा बंदोबस्त जाला. वजीरखान पांचसे स्वार सुद्धां येउन उतरल्याचा अर्ज जाला. रात्रीं दौलाची अर्जी व धारणेचा निरखनंद गुजरला. छ २९ रोजीं बुधवारीं दिवसा दरबार जाला नाहीं. तीन प्रहरास फराषखान्याचे दारोग्यास हुकुम होऊन जनान्याचे देवढीपासोन दौलाचे हवेलीपर्यंत कनाता देउन बंदोबस्त केला चांदरात येकुणतिसावे तारखेसे जाली. चांदरातीच्या तोफा सुटल्या. छ १ शवालीं इदीचा सभारंभ होई(ल?) ताा. छ २ शवाल हे विज्ञापना.

श्री.

वैशाख शुद्ध ८ बुधवार शके १७१६ ता. ७।५।१७९४

श्रीमंत रावसाहेबांस मामुली हवाल्याचें पत्र.

श्री.

वैशाख शुद्ध ८ बुधवार शके १७१६ ता. ७।५।१७९४

विनंती विज्ञापना. रमजानचे रोजे छ २९ माहे मजकुर. बुधवारीं समाप्त होऊन छ १ माहे शवाल गुरुवारीं इदीचा समारंभ इदगापासीं किलेदार व काजी व मुला यांस पाठऊन कुतबा पढावयाचें जालें. येक प्रहर दोन घटिका दिवसां तोफाचे बार करविले, साहेबजादे मीरपोकदअलीसाहित याद केली, लालबागांत नबाब बरामद होऊन साहेबजादे व दौला कांहीं कांहीं लोकांच्या नजरा जाल्या. छ १ ते छ ९ शवालपर्यंत नित्य ईदीच्या नजरा लोकांकडील होत गेल्या. छ ४ रोज रविवारीं आल्यांस ईदीच्या समारंभाकारितां बोलाविल्यावरुन गेलों. लालबागेमधें नबाबांनीं नवा दिवाणखाना तयार केला. तेथें बरामद जाले.

दौलाकडील रिसाला व पागेचे लोकांची नजर दौला खाले उभे राहुन आपले हाते येक येक लोकांस धरून करीत होते, नजरवाले लोकांची दाटी फार होती. आम्हीं जातांच सलाम जाला, नवाबांनीं जवळचे वाटेनें दिवाणखान्यांत येणे म्हणोन हातानें इशारा केला, त्याप्रा दिवाणखान्यांत येऊन नबाबांनीं जवळ बाजूस जागा दाखविली तेथें बसलो. येक प्रहरपर्यंत नजरा प्रथम दौलाकडील लोकांच्या, त्यानंतर जोरावरजंगाकडील, त्याजवर सलाबतखानाचे लोक, याप्राा जाल्या. संपुर्ण नजरा होत तोपर्यंत दौला उभेच होते. दोन प्रहराचें अमलांत बरखास जाले. रा छ ७ पवाल हे विज्ञापना.

श्री.

वैशाख शुद्ध ८ बुधवार शके १७१६ ता. ७।५।१७९४

विनंती विज्ञापना. समशेरजंग यांस नवाबाचा हुकुम जाला कीं 'हैदराबादेंत तुमची थोरली हवेली च्यार मिनाऱ्याचें रस्त्यांतील आहे. ते हवेली तुह्मीं शहरास जाऊन आंतील असबाब काढुन खाली करावी.' याप्राा सांगितल्यावरून छ २ शवाली समशेरजंग हैदराबादेस गेले. हवेली खाली करून येणार. समशेरजंगाची हवेली दौलास देण्याचा योजना व दौलांनीं आपली हवेली मीरपोकदअल्ली सिकंदर ज्याहा साहेबजादे यांस आपण द्यावी ऐसा बेत आहे. रा छ ७ माहे पवाल हे विज्ञापना.

श्री

वैशाख शुद्ध ८ बुधवारशके १७१६ ता. ७।५।१७९४

विनंती विज्ञापना. महंमद अमीरखान अरब यांस नबाबांनीं बल्हारी कुरगोड वैगेरे टिपुकडील नवे तालुके पैकीं कितेक गांव कसबे येथें दाखल नाहीं. टिपुकडील तसरुफात याचे तहकीकाती करितां अमीन मुकरर करून पाठविले. खान मार तालुक्यांत जाऊन तहकीकांत कितेक ठिकाणची केली व करितात. परंतु दखल नबाबाकडील अद्याप नाहीं. हल्लीं अमीखान अरब यांची अर्जी नबाबास व दौलास पत्र आलें तें छ ४ शवालीं गुजराणुन दौला व मीर आलम व इंग्रजाकडील इष्टवारट वकील यांसी बोलणें जालें.

तहकीक समजल्यानंतर याची विनंती मागाहुन लिहिण्यात येईल. रा छ. ७ माहे पवाल हे विज्ञापना.

श्री.

वैशाख शुद्ध ८ बुधवार शके १७१६ ता. ७।५।१७९४

विनंती विज्ञापना. वजीरखान वासीमाहुन पांचसे स्वार सुद्धां आले. त्याचे मुलाजमती विषई दौलांनीं अर्ज नबाबास करून आपल्याउलमुलुक गुफरजंगाचे पुत्रास इस्तकबाल पाठविलें. छ २ माहे शवाली वजीरखानाची मुलाजमत होऊन चाळीस इसमाची नजर जाली. रा छ ७ माहे पवाल हे विज्ञापना.

श्री.

वैशाख शुद्ध ८ बुधवार शके १७१६ ता. ७।५।।१७९४

विनंती विज्ञापना. कमठाणें येथील आंबराईची रखवाली. बढन असील व येकरामुदौलाखानसामा व नुरमहमदखान करोडा यांस सांगितली. गाडयाचे पाहारे चौकीस आंबराइपाशीं ठेविलें आंबे पक्के होतील ते वरचेवर रोज पोंहचावें अशी ताकीद जाली. कित्येक झाडास आंबे आले नाहींत. त्यास येक कसबी कारागर यानें अर्ज केला कीं ज्या झाडास आंबे नाहींत त्यास बार आणुन अंब्याची फसल बारमाही चालती करतो. त्यावरून त्याजला मसाले वैगेरे आंब्याकरितां चारहजार रुपये नुरमहंमदखान करोड्याकडुन देविले. वहलोलखान यांस ताकिद गेली कीं ' चारहजार आंबे बहंग्यासुद्धां तुम्हांकडुन दररोज येत जावे. ' याप्रा ताकीद जाली. रा छ ७ माहे पवाल हे विज्ञापना.

श्री.

वैशाख शुद्ध ८ बुधवार शके १७१६ ता. ७।५।१७९४

विनंती विज्ञापना चेनापटणाहुन व्यंकटरामदीक याजकडील अखबारआली ते सेवेसी रवाना केली आहे. अवलोकनें मजकुर ध्यानांत येईल. उत्तर रवाना व्हावयास आज्ञा जाली पाहिजे. रा छ ७ पवाल हे विज्ञापना.

श्री

वैशाख शुद्ध ८ बुधवार शके १७१६ ता. ७।५।१७९४

विनंती विज्ञापना. दौलाचे बोलण्यांत आलें कीं ' चेनापट्टण येथील गौरनर इंग्रजांकडुन होता तो तगीर जाला. दुसरा गौरनर विलायतेहुन लाट आंबट ह्मणोन रवाना जाला तो येत आहे. अद्याप चेनापटणास दाखल जाला नाहा. लौकरच येईल. , ह्मणोन बोलण्यांत आले. मिस्तर इष्टवारट जवळ बसले त्यांनीं आपले मुखें हें सांगितलें. रा॥ छ ७ पोहेषवाल हे विज्ञापना.

श्री.

वैशाख शुद्ध ८ बुधवार शके १७१६ ता. ७।५।१७९४

विज्ञापना यैसीजे. येथील वर्तमान ता॥ छ २९ माहे रमजान बुधवार पावतों अखबार पत्रीं लेखन करून सेवेसी पत्राची रवानगी केली त्यावरून ध्यानास आलें असेल. तदनंतर येथील वर्तमान. छामारीं मगरबाचे समई तरफ महालामधें नबाब बरामद होऊन चांदरातीच्या तोफा सुरु करण्यास हुकुम जाला. चार घटिका रात्रीं नबाब जनान्यासहित दौलाचे हवेलीस आले. आसद अलीखान यांचे पुत्राकडील चढावा मिठाईचें खानें व फुलें पानें वगैर सरंजाम जवाहिर वस्त्रेंसुद्धां गुजरलीं. भोजन होऊन सात घटिका रात्रीं दिवाणसान्यामध्यें नबाब मरामद जाले. दौला व मीर आलम व पागावाले वैगरे इसमाचा सलाम जाला. दौला व मीर आलम यांसी खिलवत जाली. त्यांस मोतिया फुलाचें हार दिल्हे. एक प्रहर येक घटिका रात्रीं बरखास होऊन षिकारी म्यान्यामध्यें नबाब सवार जाले. रोशनीनें हवेली दाखल जाले. छ १ माहे शवाल गुरुवारीं ईदीचा समारंभ सवब मीरपोकदअली वगैरे साहेबजादे व दौलाची याद केली. ईदगास किलेदार व काजी व मुला तिघांस पाठविले. ते कुदबा पढुन आले. तोफाचे वार दहा घटिका दिवसां करऊन नबाब लालबागामध्ये बरामद जाले.

मीरपोकदअली व सुभानअली व जुलफकारअली व तैमुरअली व दौला व पागवाले व येहत पामजंग व मीरआलम वगैरे मामुली इसमांचा सलाम जाला. ईदीच्या नजरा केल्या. बरखास होऊन साहेबजादे यांस समागमें जनान्यांत नबाब घेऊन गेले. त्यांसहित भोजन होऊन पानदान हार होऊन साहेबजादे यांस निरोप दिल्हा. ते आपले मकानास गेले. रात्रीं च्यार घटिका नव्या बंगल्यामध्यें नवाब बरामद जाले. सरबुलदजंग व आजमखान व अर्जबेगी वगैरेचा सलाम जाला. पंना भांडाचा नाच होता. समशेरजंगास हैदराबादेंतील हवेली खाली करणें म्हणोन हुकुम जाला. येक प्रहर येक घटिकेसे बरखास जाले. छ २ रोज शुक्रवारीं येक प्रहर दोन घटिकां दिवसा लालबागेमधें दिवाणखान्यांत नवाब बरामद जाले. दौला व पागेवाले वगैरे मामुली लोकांचा सलाम जाला. वजीरखानास इस्तकबाल आपज्याउलमुलुख याजला पाठविलें. त्यास च्यार पारचे कारचोबी व सिरपेंच वजीरखानानी दिल्हा. वजीरखानाची मुलाखत होऊन चाळीस इसमांची नजर जाली. कमठाणें येथील आंबराईचे बंदोबस्ताकरितां मामाबढन असीलेस हुकुम जाला. दौलासी बोलणें जालें. घांसीमियांकडील लोकांच्या नजरा जाल्या. येक प्रहर साहा घटिकेस बरखास जाले. हैदराबादेस समशेरजंग गेले. सजावरुदौला रुकसत होऊन उदगीरीस गेला. अर्ज जाला. रात्रीं च्यार घटिकेस बंगल्यामधें नबाब बरामद जाले. सरबुलंदजंग व आजमखान वगैरे लोकांचा सलाम जाला. पागेकडील बारगिराच्या नजरा जाल्या. सरबुलंदजंग व अजमखान व गुलाम इमाम यांस मोतिया फुलाचे हार इनायत जाले. लखनउचे कंचनीचा नाच होता. प्रहराचे अमलांत बरखास जाले. छ ३ रोज मंदवारीं तीन घटिकां दिवसां (+ + + + येक पान नाहीं पृष्ठांक ४१८) लालबागामधें जनान्याचा बंदोबस्त करविला. नांदडाहून खरबुजाचे बैल आले ते जोरावरजंगाकडून गुजरले. दोन प्रहरीं दिवसां दौलाची अर्जी गुजरली. रा छ ७ पर्यंत हे विज्ञापना.

छ १६ रोजी टपारवाना.

श्री.

वैशाख वद्य १ शुक्रवार शके १७१६ ता. १६।५।१७९४

श्रीमंत रावसाहेब मामुली हवाल्याचें पत्र. (ता. १६ शवालचें)

श्री

वैशाख वद्य १ शुक्रवार शके १७१६, ता. २।५।१७९४

विनंती विज्ञापना. नवाबाची सालगीरे छ ११ माहे शवाल रविवारीं सवज दौलांनीं नजर करावयाचा सरंजाम सोन्या रुप्याचीं खरबुजें तयार करविलीं. नवाबास अर्जी पाठविली. दौन घटका दिवस असतां येणें ह्मणोन हुकुम जाला. त्या प्राा दौला सरंजामसुद्धां हजर जाले. रात्रीं दोन घटिकेस नवाब बरामद जाले. दौलांनीं सोन्याचीं खरबुजें पांच हजारांचीं व रुप्याचीं दोन हजारांचीं खरबुजें बादाम, पिस्ते आक्रोड मिश्री चिरोंजे याचे खाने पनास व पानेसुपारी लवंगा इलायची फुलें अत्तर गुलाब याप्राा सरंजाम व गुल अनारी रंगाचा पोषाख गुजरावुन नजर केली. मीर आलम व पागावाले आदिकरून सर्वांनीं नजरा सालगिरेच्या केल्या. नाच राग रंग होऊन साहा घटिकेस बरखास जालें. रा छ १६ माहे पवाल हे विज्ञापना.

श्री

वैशाख वद्य १ शुक्रवार शके १७१६ ता. १६।५।१७९४

विनंती विज्ञापना. पांबेखान बीडवाला नवाबाचे सरकारांत सरदार आहे. त्याजपासीं येक जमातदार मऱ्हाटा ग्रहस्त हमेषा आह्मांकडे येणें जाणें घरोबा अशा रितीचा आहे, त्यानें येक वर्तमान सांगितलें कीं इंग्रजी दोन पलटणें

नवाबाकडे नौकर आहेत. ते कडप्याकडून हैदराबादेस आलीं, तीं दोन पलटणें व गुंटुराकडील पांच येक सात पलटणें इंग्रजी लोक जगत्याळापर्यंत गेलीं तें पाहुन येक दोघें स्वार आले. इंग्रजी पलटणें जगत्याळाहून झाडीचे मार्गे देवगड चांद्याचे रुखे ज्या जागीं विठलपंत सुभेदार भोंसल्याकडील फौजसमेत आहे त्याजवर अचानक रात्री जाऊन छापा घालावा यैसी बातनी आहे. भारामल विंठलपंत सुभेदारापासोन तीन कोसाचे फासल्यावर सोळा हजार फौज सुद्धां आहे. त्यास नबाबाकडील पत्रें सांडणी स्वारा बराबर गुप्तरुपें गेलीं कीं ' पलटणें देवगड चांद्याचे मार्गे येतात त्याची बातमी ठेऊन तिकडुन पलटणें व येके बाजुनें तुह्मीं येकसमई भोंसल्याकडील फौजेवर हंगामाकरून फौज तार बतार करावी.' याप्रो बातनी समजली ह्मणोन जमातदाराचे सांगणें तें यैकुन मात्र घेतलें. परंतु याचा विच्यार करतां मनसब्यास असी गोष्ट येत नाहीं. कारण कीं गुटुरची पांच पलटणें इंग्रजी इंग्रज या कामास सहसा देणार नाहींत. इंग्रजांची दूरदेशी व मनसब्याचा पाला लांब, तह सोडून भलतीच गोष्ट आपण होऊन येकायेकीं कसी करतील? त्यांत इंग्रजांस फरासीसाचे मसलतीचा पायेबंद असा नाहीं कीं तुर्त कालीं त्यांनीं डोई उचलुन दुसरी कोणती येक मसलत करावी. तेव्हा गुटुराकडील पलटणें हे गोष्ट कांहींच मिळत नाही. कदाचित मुसारेहमुचे लोक नवी पलटणें यांनीं सजविली त्या पैकीं असतील तर असोत. परंतु परभारा जगत्याळाकडून पलटणें पाठवुन भोंसले यांचे फौजेवर दगा करावा हेही घोरण दिसत नाहीं. जे गोष्ट दम्यानें करणें ते जाहिराणा बोलण्यांत येणार नाहीं. दौला सहजी येक दिवसीं आड्डासीं बोललें कीं 'यलगंदल वरंगळ तालुक्याकडे दोन पलटणे इंग्रजी कडप्याकडुन आणविली. ईसामियानी तालुक्याचा बंदोबस्त केला. त्याजपासीही जमियत स्वार आहेत. पलटणें वरंगळ प्रांतीं राहिली असतांच जुरुर वगैरे बंदोबस्त हीं बोलणीं. भोंसले यांजकडील फौज जवळ आहे. आपलीही जमियत नजीक. हा दाव दाखऊन बोलले. याची वितंची पेशजी लिहिण्यांत आलीच आहे. यावरून वाटतें कीं दगा करण्याचा

मनसबा असता तर पळठणे व स्वाराचा दाव बोलण्यांत न येता. हा विचार पाहता बातनी सांगितली ते अशीच कांहीं दिसते. यौकिले वर्तमात तें ध्यानांत यावें यास्तव विनंती लिहिली असे. रा॥ छ १६ पवाल हे विज्ञापना.

श्री

वैशाख वद्य १ शुक्रवार शके १७१६ ता. १६।५।१७९४

विनंति विज्ञापना. येथें वर्तमान यैकण्यांत आल्याची विनंति.

टिपुचे पुत्र पटणास पोंहचल्या नंतर टिपुनें पटणाहुन कुच करून दुसकोव्यास आला. तेथुन पिळगुंड्यास येणार. दहा हजार स्वार व वीस हजार बार या प्रा॥ जमियतगुतीस टिपुकडील * * वर्तमान. महमद अमीखान आरब सरहादेचे तहकीकाती करितां बल्हारीकडे गेलें होते ते छ १९ रम॰ जानी पागटुरास आल्याची खबर. असद अलीखान बैगनपलीस जाऊन पोंहचलें.

कलमें सुमार तीन याप्रो॥ वर्तमान दाट आहे. टिपु पिलगुंड्यास आल्याचें व गुतीवर फौज पाठविली या वर्तमानाची तहकीकात करून मागाहून लिहिण्यांत यईल. आलफखान करनुळकर यांचें पत्र शडमल ह्मणोन नबाबाचें येथील दफ्तरचें मुत्सदी आहेत त्यांस आलें. त्यांत सदरहु टिपुकडील मजकुर लिहिला होता. तें पत्र मारनिलेनीं दौलास दाखविलें. दौलांनीं उत्तर त्यास केले कीं ' आपल्या तालुक्यांत फिरण्यास ज्याचा तो मुखतियार आहे. ' याप्रमाणें वर्तमान ऐकिलें तें लिहिलें असें. रा॥ छ १६ माहे पवाल हे विज्ञापना.

श्री

वैशाख वद्य १ शुक्रवार शके १७१६, ता. १६।५।१७९४

विनंती विज्ञापना. वेदरांत छावणी (पृष्ठांक ३२३-३२४ गहाळ)

पृष्ठांक ४२५ चालू.

* * * * * *

कबीला.

१ हामीदुलाखान रुस्तुम यारजंग याचा कबीला ज्याहांआराम बेगम नबाबाची कन्या.

१ मीरकुददुलाखान इब्रारतयाबजंग यांस नबाबाची कन्या ज्यानी बेगम यांची लेक तिचें नांव साजिदा बेगम.

१ मीर पाहाबुदीखान.

१ मीरफतेअलीखान सिपह सालारजंग इब्रारतयाबजंगांचें बंधु येकमात ह्मणजे येकोदर.

३ गोरी बेगम बसालतजंगाची स्त्री यांजपासीं हैदराबादेंत आहेत.

१ नसरुलाखान.

१ फतहुमखान.

१ परजंभ.

३

८

एकुण आठ पुत्र हैदराबादेंत आहेत रा छ १६ माहे पत्राल हे विज्ञापना.

श्री.

वैशाख वद्य १ शुक्रवार शके १७१६ अखबार. ता. १६।५।१७९४

विज्ञापना यैसीजे-येथील वर्तमान. येथील वर्तमान ता॥ छ ९ माहे पत्राल सोमवर पावेतों अखबार पत्रीं लेखन करून सेवेसी पत्राची रवानगी केली त्यावरून ध्यानास आलें असेल. तदनंतर येथील वर्तमान. छ मारी च्यार घटिका दिवसा नबाब लालबागामध्यें येऊन जनान्याचा बंदोबस्त करविला. दिवसां दरबार जाला नाहीं. रात्रीं दौलाची अर्जी व धारणेचा निरखबंद गुजरला. छ ९ रोज मंगळवार तीन घटिका दिवसां लालबागामध्यें जनान्याचा बंदोबस्त जाला. रात्रीं येक प्रहर येक घटिका दिवसां चांदणीचें फर्पावर नबाब बरामद जाले. सरबुलंदग व रायेराया व सुनबी यांचा सलाम जाला. कवालाचें गायन यैकुन येक प्रहर च्यार घटिकेस बरखास जाले. छ ७ रोज बुधवारीं दिवसा दरबार

जाला नाहीं. रात्रीं साहा घटिकेस चांदणीचें फर्षावर नबाब बरामद जाले. सुरबुलदजंग व अजमखां व रायेराया व मुनशी व अर्जबेगी वगैरे मामुली लोकांचा सलाम जाला. कवालाचें गायन यैकिलें व रायेराया यांच्या फर्दा पाहुन येक प्रहर पांच घटिकेस बरखास जाले. छ. ८ रोज गुरुवारीं तीन घटिका दिवसां लालबागामधें नबाब आले. जनान्याचा बंदोबस्त जाला. दाहा हाथी सवदागीर हजह जाले. साहा घटिका दिवसा खिडकी बाहेर नबाब आले. पागावाले व अर्जबेगी व रायेरायां वगैरे इसमांचा सलाम जाला. हाथी पांच व हातन्या पांच पाहिल्या. सात घटिकेस वरखास जाले. घटिका दिवस शेष असतां जोरावरजंग तालुक्यांत जाण्याकरितां रुखसती विषई दौलाची अर्जी गुजरली. त्यावरुन पांच घटिका रात्रीं नबाबांनीं रुखसतीचें पानदान दौलाकडे पाठविलें. जोरावरजंग रफादुलमुलुख यांस तालुक्यांत जाण्याची रुखसत जाली. छ ९ रोज शुक्रवारीं येक घटिका दिवसां लालबागामधें नबाब येऊन जनान्याचा बंदोबस्त जाला. दिवसां दरबार नाही. रात्रीं दौलाची अर्जी व धारणेचा निरखबंद गुजरला. छ १० रोज मंदवारीं तीन घटिका दिवसां लालबागामधें जनान्याचा बंदोबस्त जाला. दिवसां खैरसला. रात्रीं मामुली लोक हजर होते. त्यांस जबाब जाला. छ ११ रोज रविवारीं प्रातःकालीं दौलांची अर्जी गुजरली. त्यांस हुकुम जाला जे मालगिरेचा सरंजाम दोन घटिका दिवसां राहतां घेऊन येणें. कबुतरखाना व चिनीची बासनें वगैरे सरंजाम हैदराबादेकडे रवाना करण्याचा हुकुम (द) रोगे यास जाला. तीन प्रहरास आसदअलीखान यांची अर्जी नबाबास व दौलास पत्र बैगनपलीहून आलें तें दौलांनी अर्जीसहीत नबाबाकडे पाठविले. दोन घटिका दिवसां शेष असतां दौला सालगिरेचा सरंजाम घेउन हजर जाले. दोन घटिका रात्रीं नबाब दिवाणखान्यामधें बरामद जाले. दौला व मीर आलम व पागावले व रायेराया वगैरे मामुली इसमांचा सलाम जाला. दौलांनीं पोषाक व खरबुजे सोनेरी रुपेरी व मेवाखाने गुजराणिले. चंदा कंचनीचा नाच होता. दौलांस फुलाचा हार दिल्हा. साहा घटिकेस बरखास जाले. छ १२ रोज सोमवारी च्यार घटिका दिवसां नबाब कबुतरखान्यापासीं

आले. सैदमुनवरखान वगैरेचे सलाम जाला, कबुतरें पाहून हैदराबादेकडे रवाना करण्याचें सांगितलें. सालगिरेचा बबचींखाना पाहिला. साहा घटिकेस लालबागामधें येहुन जनान्याचा बंदोबस्त जाला चिमणाराजे औरंगाबादेहून बेदरास येऊन उतरले. याचा अर्ज जाला. रात्री दौलांची अर्जी व धारणेचा. निरखबंद गुजरला. छ १३ रोज मंगळवारीं च्यार घटिका दिवसा नबाब लालबागामधें येऊन जनान्याचा बंदोबस्त जाला. दौलाची अर्जी प्रहर दिवसा गुजरली. दिवसा दरबार झाला नाहीं. रायचूराहून चकमकी बंदुखा माहबतजंगकडील नवाबांनीं आणविल्या त्या कामाठ्या समागमें आल्या. चिमणाराजे यांस इस्तकबाल आषज्याउलमुलुक गफुरजंगाचे पुत्र यांस पाठविलें. चिमणाराजे यांनीं त्यास तीन पारचे पोषख व दुषाल किनखाब व येक घोडा याप्रा नियाकत केली, सिरपेंचही दिल्हा. रात्रीं दौलाची याद केली. ते हजर जाले. च्यार घटिकेस बंगल्यामधें नबाब बंगालमध्यें बरामद जाले. दौला व मीरआलम व पागावाले व रायेराया व मुनषी वगैरे मामुली लोकांचा सलाम जाला. चिमणाराजे यांची मुलाजमत होऊन सात इसमांची नजर जाली. बसालत जंगाचा चेला मरमतखां याची मुलाजमत नजर जाली. पंना भांडाचा नाच होता. असदअलीखानाचे पुत्रास तीन हजारी मनसबा आलमनगारा जाला. दौला व मीर आलम यांसी खिलवत होऊन प्रहर रात्रीं बरखास जाले. छ १४ रोज बुधवारीं लालबागाचा झाडा करून च्यार घटिका दिवसां नबाब आले. जनान्याचा बंदोबस्त जाला रा छ १६ माहे षवाल हे विज्ञापना.

वैशाख वद्य ८ शके १७१६ गुरुवार ता. २२।५।१७९४

छ २२ रोजीं टपा रवाना पुण्यास.

मामुली हवाल्याचें पत्र रावसाहेब पेशवे यांस.

छ २२ माहे शवाल मुकाम बेदर.

श्री.

वैशाख वद्य ८ शके १७१६ गुरुवार ता. २२।५।।१७९४

विनंती विज्ञापना. मिस्तर किरकपात्रीक इंग्रजाकडील वकील भागानगरास गेला होता तो येथें आला ते अंबराईत राहिला. कारण कीं पहिला

वकील मिस्तर कनवी मंगळवार पेठेंत सेव्याचे वाड्यांत राहात होता. नंतर नबाब मंगळवार पेठेंत राहिले तेही जागा नबाबाचें तसरुफात होती. भिंती वगैरे जागा पाड पाड करून खराब केली तसेच जागेमध्यें इष्टवर होता. सांप्रतचा तरीक आंबराईंत राहिल्यास इष्टवर जाऊन त्यास मंगळवारांत येऊन राहावयाविसी आग्रह केला. त्यावरून उभयतां मिळोन जागा पाहावयास आले. जागा मरमततलब आहे सबब दुरुस्ती करावयास माणतें लाऊन मागती उभयतां आंबराईंत जाऊन राहिले आहेत. जागा तयार जाल्यानंतर मंगळवारांत रहावयास येणार. रा छ २२ पत्राल हे विज्ञापना.

श्री

वैशाख वद्य ८ शके १७१६ गुरुवार ता. २२।५।१७९४

विनंती विज्ञापना. कडपे तालुक्यांत जमीनदारांनीं हंगामा केला आहे ह्मणोन बोभाट आल्यावरून येथुन असदअलीखान याची रवानगी केली खान मजकुर कडपे तालुक्यांत जाऊन पोंहचुन प्रथम नारायेणराज जमीदार अडक तालुक्याचा त्याचें रहातें मकान कसबें अडक जागा बाकी येका अंगास पहाड व तीन अंगास मैदान किला जमीदानें जागा मजबुत व मुस्तकीम आहे तेथें मोर्चे लाविलें आहेत. जमीदार मजकुर याचाही सरंजाम किल्यांत मजबुत आहे ह्मणोन वर्तमान. याखेरीज आणिक जमीदाराची संस्थानें कडपे तालुक्यांत येणेप्रो.

१ मठलेवार उपालवाडा.
१ नासेवाले मुत्यालपाड.
१ संगापटण येमलेवाला.
१ पुललेचरु ता खमम.
१ नरसापुर.

५

अडक घेतल्यानंतर पांच मकानें पुढें घ्यावीं तर जमीनदाराचा बंदोबस्त मकानें कलब झाडीचीं आहेत. रा छ २२ पत्राल हे विज्ञापना.

श्री.

वशाखे वद्य ८ शके १७१६, गुरुवार ता. २२।५।१७९४

विनंती विज्ञापना. टिपु दहाहजार स्वार व बारापंधरा हजार जमियते घेऊन नबाबाकडील व आपले सरहादेस आला. पुढें गुतीस येण्याचा इरादा होता. यांचें वर्तमान येथें आलें व करनुळकर अलफखान यानीं पत्राचा सिलसिला ज्यारी केला कीं खामखा करनुलावर टिपुचा इरादा पेशकसीकरितां आहे. याचा बंदोबस्त जाला पाहिजे. त्याजवरून नबाबांनीं किरकपातरीक यांस लिहुन त्याचें पत्र टिपुजवळ कंपनीकडोन वकील आहे त्यास पाठविलें कीं 'तुम्ही आपले तालुक्यांतुन पुढें हरकत करणें हे गोष्ट तहनाम्यापासोन दुर आहे. जर तुमचा इरादा असाच आहे तरी आहीं कुंपणीस इतला करितों ते तुम्ही समजोन घेतील.' असें वकीलाकडे गेल्यानंतर त्यानें पत्रान्वयें टिपुसीं जाबसाल केला. टिपुचें म्हणणें कीं 'आपले तालुक्याचे बंदोबस्ताकरितां आलो होतो तुमची मर्जी नाहीं तर राहिलें.' म्हणोन कांहीं जमियत गुतीस रवाना केली. व आपण खासा कांहीं जमयेतसुद्धां सिरे प्रांतास गेला या प्रकारचें वर्तमान. व कांहीं भ्रमही जाला आहे म्हणोन म्हणतात, मग सत्य किंवा मिथ्या कळत नाहीं. रा। छ २२ पत्राल हे विज्ञापना.

वैशाख वद्य ८ शके १७१६ गुरुवार ता. २२।५।१७९४

श्री

विनंती विज्ञापना. तालुके रायेचुर वगैरे पांच महाल व तालुके अदवणी हे सरकारांत ठेऊन अमील करावा या विच्यारांत बदरुद्दौला व सिलेमखांबाई वगैरे दोन च्यार शेखस करणार यांणीं दौलांसीं पैगाम के। कीं गुा पेक्षां कारण कीं तालुका दाराज्या म्हणजे माहबतजंग यांणीं लुटुन ताराज केला आहे याजमुळें हालकमीकरूम तालुका सांगावा. पुढें इस्तावा लाऊन देऊन काम काज आमचे हाते घ्यावे. त्यास यांचें बोलणें होतच आहे. दौलांनीं आंतुन व्यंकटराव सरसुभेदार यांस पत्र लिहुन बोलाऊं पाठविलें कीं 'हे दोन्ही तालुके तुमचे नांवें करार केले आहेत. जलद येणें.' त्याजवरून राव मजकुर पा। चिचोली यथें होते ते छ २० रोजीं येथें येणार. आले. त्याजकडील वकील शिवशंकर जाधवराव यांणीं त्याचे येण्यापूर्वीच साडेबारा लाख रुपये

दोन्ही तालुक्याचे कबुल करून कबुलियेत लिहुन देऊन सनदा तयार करविल्या. दाराज्याहा बहादुर याचे पुत्र मीर गुलाम हुसेन यांची नियाबत व्यंकटराव यांचे नांवें नवाबापासून करार करून घेतली. छ २० रोजी व्यंकटराव येथें येऊन दौलाच्या त्यांच्या भेटी होऊन काये पुढें आणिक ठरेल त्याप्रो लिहीन. रा छ २२ षवाल हे विज्ञापना.

वैशाख वद्य ८ शके १७९४ गुरुवार ता. २२।५।१७९४

श्री

विनंती विज्ञापना. तालुका देवदुर्ग व आरकिरें व जालिहाल व गुरगुंठ कृष्णदक्षणतीर जितके तालुके बोहरी बाहादुर वईतगकडे आहेत यांचेही बोलणें व्यंकटराव यांसीं आहे कीं 'तालुके तुम्हींच करून घ्यावे' व त्यास रावचा जाबसाल हा काल पावेतों नेमांत आला नाहीं. व्यंकटराव आल्यानंतर काये निश्चये ठरतो हे समजेल लिहीन. रा छ २२ षवाल हे विज्ञापना.

श्री

वैशाख ८ शके १७१६ गुरुवार ता. २२।५।१७९४

विनंती विज्ञापना. औरंगाबादचे बुलद्याचे सुभेदारीचें काम फकरुदौला यांकडे व गीर्डनबाईचे महालांतचे काम चिमणाराजे यांजकडे व मिरचे मुराद हे दोघावर येक टोणपा या प्रो कांहीं येक दिवस काम चालले. हालीं बाहालोलखान यास सुभेदारीचे काम सांगून रुखसत केले. याचा तपसील पेशजीं विनंती पत्रीं लिहिलच आहे. बहलोलखान आलनपुरास (नां) जातां नांदेडाहुन औरंगाबादेस पुढें नायेब रवाना केला त्याचा दरवल जाला. चिमणाराजे निवोन श्रीक्षेत्र प्रेमर येथें येऊन आठदिवस राहुन कांहीं संतर्पण करून येक दिवस रात्रीस येऊन मध्यस्ताची व राजे रघोबाया याची भेट घेतली. मागती क्षेत्रास गेले. उपरांतीक दौलानी अषज्याउलमुलुक गफुरजंग याचे पुत्र यास इस्तकबाल पाठऊन सन्मानेंकरून नवाबाची मुलाजमत करविली. बेद(रा) हून एक कोसावर जिनसींत राहिले आहेत. दौलासी पैगाम कीं 'इजाफा घेऊन सुभेदारीचें काम मजकडे बाहाल ठेवावें' ह्मणोन आपली मोहर दौलाकडे पाठऊन दिल्ही. गुदस्ताची बाकी साडेपांच लाख रु। येणे बाहालीचे पोटी त्याचाही

मार्ग करून देतों ह्मणोन बोलणें आहे. दौला कबुल करीत नाहींत. नित्य रद-बदल दाट आहे. फखरुद्दौला औरंगाबादेहुन निघोन आले. मरिचे मुरादही येणार. रा छ २२ पत्रावल हे विज्ञापना—

श्री.

वैशाख वद्य ८ शके १७१६ गुरुवार ता. २२।५।१७९४

विनंती विज्ञापना. नबाबाकडील पागा व जमातदार वगैरे लोक चराईस गेले. तीनच्यार हजार पावेतो जमयेत येथें आहे. पावसाळा समीप छावणीचा डौल छेरे बंधा व कवलारें होतात. प्रस्तुत धारण येणें प्रो आहे.

जोरी.

जेष्ठ शु० ४ शके १७१६ रविवार ता. १।६।१७९४

* * * * * *

(पृष्ठांक ४४०) (पृष्ठ ३३३ ते ३३९ गहाळ.)

प्रो चालावे तेव्हां अगोधरचा तहनामा बाहाल राहिला कीं नाहीं याप्रो आमचे बोलणें लिहुन पाठवावें. तहनाम्याच्या नकला आणवाव्या म्हणोन सांगितलें. याविसी जसी आज्ञा येईल त्याप्रो बोलण्यांत येईल. रा छ २ जिल्काद हे विज्ञापना.

श्री. ६

ज्येष्ठ शु॥ ४ शके १७१६ रविवार ता.।१।६।१७९४

विनंती विज्ञापना. या प्रांती टोळझाड छ १५ शवाली मौजे आंदोण्या-वरून छ १६ रोजीं जनवाडयास मुकाम जाला. तेथुन चिटगोप्याचें रुखे कलबर्गे प्रांती गेली. लक्षावधि करोडो टोळ आकाशमार्गे जात असतां अभ्र-छायेप्रो छाया पडावी. जेथें मुकाम व्हावा तेथील झाडास पान राहीना. ज्या गांवावरून टोळ झाड गेली तेथील गांवकरी वेलीबाहेर आडवे जाऊन साकर खोबरे दुध दही गुळ याप्रो सरंजाम आणुन देवीत गेले. बेदराहुन तीन कोस जनवाडा येथें मुकाम जाला होता. रा छ २ माहे जिलकाद हे विज्ञापना.

ज्येष्ठ शु॥ ४ शके १७१६ रविवार ता. १।६।१७९४

श्री ९

विनंति विज्ञापना ऐसीजे. आदवनी प्रकर्णी स्वराज्याचा फडच्या होणें या विशई नवाबांनीं राजश्री नानास पत्र लिहिलें होतें त्याच जबाब आला कीं आदवनीकर यांचे येथील सर्व वडीलपणें नवाबानीं पाहावें. सरकारचे स्वराज्याचा फडच्या करावा अथवा आमचे सरकारातुन कोणी पाठऊन बंदोबस्त त्याचे घरचा पाहुन स्वराज्याचा फडच्या करुन घ्यावा. असी मर्जी असल्यास * * * (पृष्ठांक ४४१) गहा * * च उधार आहे. यास्तव तहनामे भोसले काढीत नाहींत. घरांतील भावाच्या घालमेली यांत तहनामे गल्हाटे असे ह्मणतात, नवाबाचे ह्मणणे आमचे जवळ नकला आहेत ह्या पाहाव्या भोसल्याचे ह्मणे असल काढाव्या, त्या मंजुर हे बोलतात. असल तहनामे विठलसुंदर यांचे गारतीचे वेळेस अफरातफरीक जालें परंतु त्याच्या नकला नानाजीपंत यांचे हातच्या पहिल्या आहेत. आज आह्मीं नव्या लिहिल्या नाहींत. या प्रमाणें व द प्रतिवाद. बादमीचे स्वारींत खास मुधोजीबावा होते, ते वेळेस जाला. मला माहित आहे. तहनामा धरुन बोलु लागल्यास भोसले काइम होतील. बादामीवर असेंच जालें. याजकरितां घरावर रितीनें भोसलें याजकडील तहनाम्याच्या नकला आणुन स्वामीनी पाहाव्या. नंतर यांसी बोलावयाचा निश्चय पका होऊन आज्ञा यावी. यांस उत्तर समर्पक द्यावें लागतें. तहनामा धरुन हे बोलुं लागल्यास त्यास उत्तर तहनामा पाहुनच द्यावे जर तहनामा कायम करून उत्तर देणे ठीक नाहीं असें असल्यास तहनामे हरवले आणि मागल्या तहनाम्या प्रा अमलांत काये आले तेव्हां तो तहनामा कबुल नाहीं असे ह्मणोन नवाब तहनामा करावयास जबरदस्ती पाहिजे असे ह्मणावे तर हाली सरकारचे पत्र नबाबास आलें यांत मुधोजी भोसले यांचे तहनाम्याचा दाखला आहे त्यांत पहिले तहनाम्याचा उधार आहे इकडुनही अडचण. इतका तपसील लिहावयाचा कारण जे स्वामी पुढें प्रसगीं ह्मणतील

कीं तुम्हीं नीट बोलत नाहीं. बोलण्याचे प्रकार सर्व ध्यानांत यावे. याचा निश्चये खचित करून आज्ञा यावी. त्या धोरणावर चालत जाईन. रा छा २ जिलकाद हे विज्ञापना,

छ ५ जिलकाद अखबार

ज्येष्ठ शु ६ शके १७१६ बुधवार ता. ४।६।१७९४

रवाना छ ६ आवाल.

श्री.

विज्ञापना ऐसीजे येथील वर्तमान ता छ १९ माहे, शवाल सोमवार पावेतो अखबार पत्रीं लेखन करून सेवेसी पत्राची रवानगी कली त्यावरून ध्यानास आले असेल. तदनंतर येथील वर्तमान रात्रीं दौलाची अर्जी व धारणेचा निरखबंद गुजरला. घांसीमिया यांनीं नबाबास मलाजमत केली होती. त्यांचा सरंजाम मिठाई दीडमण वजन व फुलें गुलाब पानें सुपारी व पंचवीस मोहरा नजर गुजरली. छ २० रोज मंगळवारी लालबागामधें तीन घटिका दिवसां नबाब आले. कुहीरचे आवे जनान्यांत बटबडा करून दिल्हा. रात्री दौलाची याद केली. ते हजर जाले. पांच घटिका रात्रीं नबाब नवे बंगल्यामध्यें बरामद जाले. मीरआलम व पागावाले वगैरे मामुली इसमाचा सलाम जाला. मिस्तर किरकपात्रीक वकील इंग्रजाकडील आला. त्यानें कलकत्याचे जनरालचें पत्र गुजराणिले. रोशनराव यानीं शादीची नजर केली. लखनउचें कंचनीचा नाच होता. दौला व मीर आलम व किरकपात्रीक यांसी खिलवत जाली. येकप्रहर येक घटिकेस बरखास जाले. छ २१ रोज बुधवारी दिवसा दरबार जाला नाहीं. व्यंकटराव सुरापुरकर आल्याचा खर्जे जाला. त्यास इस्तकबाल राज्याजीचे भाऊ आपाराव व राज्याजीचे पुत्रास पाठविलें. दौलाची याद केली. व्यंकटराव यांनीं राज्याजीचें बंधुसह पुत्रास पोषाग व सरपेच दोन दिल्हे. पांच घटिका रात्रीं बंगाल्यामध्यें नबाब बरामद जाले. दौला व पागावाले व रायेरायां वगैरे मातुली लोकांचा सलाम जाला.

व्यंकटराव सुरापुरकर यांची मुलाजमत पांच इसमाची होऊन नजर जाली. दौला व व्यंकटराव यांसी दोन घटका बोलणें जालें. लखनउचें कंचनीचा नाच होऊन यक प्रहर तीन घटिकेंस बरखास्त जाले. छ २२ रोज गुरुवारीं दिवसां दरबार नाहीं. रात्री दौलाची अर्जी व धारणेचा निरखबंद गुजरला. छ २३ रोज शुक्रवारी दिवसां लालबागेमधें जनान्याचा बंदोबस्त जाला. रात्रीं दौलाची अर्जी गुजरली. छ २४ रोज मंदवारीं लालबागेमध्यें तीन घटिका दिवस नबाब आले. जनान्याचा बंदोबस्त जाला. बहलोल खानाकडील अर्जी गुजरली. रात्री कंचन्याचें ताफे बोलाऊन नाच रागरंग अतषबाजी रोषनाई जाली छ २५ ९ रोज रविवारीं दिवसा दरबाराची खैर सला. रात्रीं पाच घटिकेस नबाब दिवानखान्यामधी बरामद जाले. दौला व पागावाले मुनसी व रायेराया वगैरे इसमाचा सलाम जाला. दौलासी खिलवत जाली. भोसल्याकडील पत्र माधवराव व रामचंद्र यांनीं गुजराणिलें. येक प्रहर येक घटिकेस बरामद जाले. छ २६ सोमवारी दिवसा लालबागेमधें जनान्याचा बंदोबस्त जाला. रात्रीं साहा घटिकेस दिवानखान्यामध्यें नबाब बरामद जाले. दौला व पागावाले व रायेराया वगैरे मामुली इसमांचा सलाम जाला. कादरखान अमील खमसेठ याची मुलाजमत नजर जाली. रावजीकडे, येण्याविसी सांगोन पाठविल्यावरून आले. सलाम जाला. दौला व रावजीसुद्धा खिलवत जाली, व्यंकटराव सुरापुरकर यास आदवनी रायेचुर वगैरे माहालाचे काम सांगितले. खिलवत इनायत जाली. रुखसतीचें पानदान दिल्हें. महमद अमीखान आरब याची अर्जी. दौलानी गुजराणिली. यक प्रहर च्यार घटिकेस बरखास जाले. छ २७ रोज मंगळवारी प्रातःकाळी दौलाचे हवेली परियंत खांच देण्यास हुकुम जाला. दौला व गफुरजंगाकडील व असदअलीखानाचा जनाना लालबागेंत येऊन बंदोबस्त जाला. गोपाळ पेठचे जमीदारानें चोबी बंगला दोनखणी तयार करऊन नबाबास पाठविला तो गुजरला. दिवसां दरबार नाहीं. रात्री दौलाची अर्जी गुजरली छ २८ रोज बुधवारी दिवसा लालबागामधे जनान्याचा बंदोबस्त

जाला. रात्री दौलाची अर्जी व धारणेचा निरखबंद गुजरला. नाचरागरंग आत-
षबाजी रोशनाई जाली. भवानी मीर्धा यांचे घरास आग लागुन दग्ध जाले.
अर्ज जाला. छ २९ रोज गुरुवारी प्रहर दिवसा खबाबागामधे नवाब बरामद जाले.
सेखउमरखान वगैरेचा सलाम जाला. लालनहजामाची याद केली. हजामत
होऊन येक प्रहर तीन घटिकेस बरखास जाले. रात्री बहलोलखानाकडील अर्जी
गुजरली छ. ३० रोज शुक्रवारी दिवसा खैरसला. रात्री मीरपोकद अली याचे
कवीलयाकारिता मिठाई पंताश खाने व फुले चंगेऱ्या व पाने सुपारी इलाची
लवगा बदाम मिश्री खारीक खोबरे वगैरे सरंजाम हीसा मुदौला अर्जबेगी व
यकरामुदौला खानसामा याजसमागमे नवाबानी दौलाचे हवेलीस पाठविले.
पोषाग यक व जवाहीर आदद पांच या प्रो सरंजाम दौलाचे हवेलीस आणिला.
दौलानी अर्जी पाठविली. चंदाकंचनीचा नाच होता. छ १ माहे जिलकाद
मंदवारी यक घटिका दिवसां लालबागामधे नवाब आले. जनान्याचा बंदोबस्त
जाला. रात्री दौलाची अर्जी व धारणेचा निरखबंद गुजरला. छ २ रोज
रविवारी दिवसां दरबार जाला नाहीं. रात्री च्यार घटिकेस फुलाचे हार दान
दौलाकडे पाठविले. दौलाची अर्जी गुजरली. छ ३ रोज सोमवारी दिवसा
खैरसला. रात्री दौलाची सिदी अबदुल याची गंजीकोटयाहुन अर्ज आली
त्यासुधा गुजरली. छ ४ रोज मंगळवारी दोन घटिका दिवसां लाल बागामधे
जनान्याचा बंदोबस्त जाला. रात्रीं पांच घटिकेस दिवानखान्यामधे नवाब
बरामदजाले. दौला व पागावाले व रघेराया व मुनसी वगैरे इसमाचे सलाम
जाला. व्यंकटराव मजेवार जमीदार हातनुरकर यास रुखसत जाली. कंचनीचा
नाच पाहुन यक प्रहर यक घटिकेस बरखास जाले. छ ५ रोज बुधवारी
हुमणाबादेहुन तोफ लांबी दाहा गज दोन गिरे आली. जिनसीत दाख ल जाली.
दिवसां दरबार नाहीं. रात्री दौलाची अर्जी गुजरली. रा छ ६ माहे जिलका
हे विज्ञापना.

सदरहु पत्रें श्रीमंतांस अखेर साला परियंत मामुल.

महाराष्ट्र इतिहास.

खर्ड्याच्या लढाईचा पत्रव्यवहार.

(गोविंदराव काळे यांचें दफ्तर.)

सरकारी–नानास.

श्रीं.

(शके १७१५ ज्येष्ठ शु. २ सोमवार.)

विनंति ऐसि जे. छ. २६ (वै० व. १३ गुरुवार) रोजीं बाबाराव मध्यस्ताचे सांगितल्यावरून आमचे घरास चार घटका दिवस शेष राहतां आले. परस्परें आगतस्वागत बोलणें आलें. राव म।।र यांनीं तिकडील म।।र व आपले कर्ण्याचा व मजबुतीचा भाव सर्व सांगितला कीं, "मी पांचच्यार वेळा राजश्री नानांकडे गेलों होतों. त्यांचेही बोलण्यांत सर्व प्रकारें स्वच्छता आहे. कोणेही प्रकारें तर्फेनचे जाबसालाचा उलगडा व्हावा. येविषयीं मजलाही आज्ञा केली होती, त्याप्रमाणें सर्व दरजे मी मध्यस्तांसी बोलोन यांची मर्जी हमवार केली आहे, त्यास प्रस्तुत मदारुलमहाम यांचीं पत्रें व यादी आपल्याकडे आल्या असतील त्या काढाव्या, त्याची भवनि न भवते करून कलमें नेमांत आणावीं." याचें उत्तर मीं यांसी केलें कीं, "पत्रें अथवा यादी अद्याप आल्या नाहींत. येतील. त्यास, येथून यानीं दसखतें ठरावून गोविंदराव व रघोत्तमराव यांजपाशीं दिल्या आहेत; त्या दसखतांची तेथें भवति न भवति होऊन त्याजवर मदारुलमहाम जबाब लिहितील ते आल्यानंतर यांनीं मंजूर करून नेमांत आणावें; म्हणजे फडच्या. त्या यादीच्या नकला आम्हांपाशीं

आहेत, परंतु तेथून करार होऊन आल्या नाहींत. मग भवति न भवति केल्यांत फल काय ?" याप्र॥ यांसीं बोलणें जालें. बाबाराव यांचें ह्मणणें कीं, "प्रस्तुत यादी आणि पत्रें मदारुलमहाम यांजकडून आपल्याकडे आल्या ऐसें कल्याणराव यांनीं लिहिलें आहे." मी बोललों कीं "यादी आल्यास त्या तर तुह्मांसी छपावून ठवितों? येणार आहेत. पहिल्या यादी पहावयाच्या असल्यास आहेत. पाहाव्या. त्याजवर दसखतें कसीं करावीं त्याचे मसोदे ठराविले त्याचा निश्चयही अद्याप पका नाहीं. गोविंदराव तेथें बोलून सरकारची आज्ञा येईल त्याप्रमाणें बोलण्यांत येईल." ऐसें सांगितलें. त्याजवरून ते कल्याणराव यांजकडे ऐसेंच लिहून पाठवितील—ध्यानांत असावें. रा॥ छ. ३० सवाल हे विनंति.

श्री.

(शके १७१५ ज्येष्ठ शु. २ सोमवार.)

विनंति ऐसीजे. सांवतखान राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांजकडोन वस्त्रे पादीचे रस्मीयातीचीं घेऊन आले तीं नबाबास पावतीं केलीं. मध्यस्तास पादीचीं व गमीचीं वस्त्रें होतीं तीं द्यावीं याचा विचार पडला कीं यांचे पुत्रास मरून फार दिवस जाले. नबाबांनी आपला पुत्र यांस देऊन मनोधारण केलें तेव्हां गमी राहिली नाहीं. आतां गमीचीं वस्त्रें दिल्यास कसें पडेल नकळे ह्मणोन याचा विचार कोणास पुसावयाचा आहे ? यांचें यांसच पुसोन द्यावें; यांस पुसल्यास हेही नका असें ह्मणतील. याजकारितां मध्यस्तांस पुसलें कीं, सेनासाहेब सुभा यांचे येथील दोन प्रतीचीं वस्त्रें आपले नांवें आहेत. यांचे देण्याचा विचार कसा? याचें उत्तर मध्यस्तांनीं केलें कीं गमीचीं वस्त्रें आहेत तीं आमचे समक्ष न आणितां तोषेखान्यांत देवावीं, व पादीचे रस्मयातीचीं वस्त्रें आहेत तें (तीं) मात्र आणावीं. त्यास त्याप्रमाणें केलें. सारांश लोभ दोन वस्त्रांपावेतों सुटला नाहीं. रा॥ छ ३० सवाल हे विनंति.

श्री.

(शके १७१५ ज्येष्ठ शु. २ सोमवार.)

विनंति ऐसी जे. मनसुकराये कायत पेशजी जोरावरजंग मरहुम यांजकडोन पा॥ आंबेजोगाई व पा सेलगांव पा परळी येथील अमीलीचे कामावर होता. त्याजवर माहासबा काढोन कैदेंत ठेविलें. तेथेंच मृत्यु पावला. त्याचा पुत्र व्रजलाल भोंसल्यांचे येथें नोकर होऊन सांप्रत सांवतखान आले यांचे बराबर भोंसले यांनीं पाठविल्यावरून आला. सर्वांच्या भेटी गोष्टी जाल्या. दोनच्यार दिवस जाल्यानंतर जोरावर जंग मरहूम यांचे मामा व विश्वनाथपंत वकील यांनीं नबाबास अर्ज करून मध्यस्तांस सांगितलें कीं, याचा बाप-जोरावरजंग याचा माहासबेदार-कैदेंत मेला ते समई सर्व जिनस आज नास (?) जरजवाहिर व्रिजलाल नागपुरास घेऊन जाऊन तेथें आश्रय करून राहिला. हल्लीं आला आहे. आमचा फडच्या करून देवावा. त्यावरून लाला म॥र यांस आणून बसविलें. सांवतखान यांस नबाबाचा निरोप जाला. मध्यस्ताचा होणें तों लाठाची हे दशा याजकरितां छ. २७ रोजीं मध्यस्ताकडे येऊन फार रदबदल केली कीं, मजसमागमें आला आहे. याजकरितां यास बसवूं नये. मध्यस्तांचें ह्म (ण) णें कीं, तुह्मी आपला जिमा करून लिहून द्यावें कीं नागपुरास गेल्यानंतर यास पोंहचाऊन देऊं; नाहीं तर याचे जिम्याचा जाब करूं. त्यास सांवंतखान लिहून देण्यास अनमान करितात. यांजमुळें च्यार दिवस खानाचे जाण्यास तामुल जाला आहे. हे रदबदल जाल्यानंतर खान मा॥ यांनीं मध्यस्तांस सांगितलें कीं, पांचा हजारांचें कापड गदवालचे भोंसले यांचे येथें जाणार त्याचे महसूल माफीचें दस्तक देवावें व दाहा बाहेरी परीद्याचे सिकारी सिकाकोल राजबंदरीहून येणार त्याचें एक दस्तक एकून दोन दस्तकें देवावीं. त्यावरून मध्यस्तांनीं दोन दस्तकें आपले मोहरेचीं करून देवावीं. रा॥ छ. ३० सवाल हे विनंति.

श्री.

(शके १७१५ ज्येष्ठ शुद्ध २ सोमवार.)

विनंति ऐसी जे—आजपावेतों पागावाले, सराफा, साहुकार, मुतसदी वगैरे

मंडळास छपरबंदी करण्याविषयीं नबाबाची आज्ञा जाली नव्हती. छ. २७ रोजीं सर्वत्रांस ताकीद केली कीं आपलाली छपरबंदी करावी. त्यावरून छपराची तयारी होत आहे. नबाबाचे महालांतील बायका नव दाहा आसामी हैदराबादेंत आहेत. त्यांस आणावयाकरितां समशेरजंग व तेजपा पांडे यांची रवानगी करणार आहेत. छ. ३० सवाल हे विनंति.

श्री.

(शके १७१५ ज्येष्ठ शु. २ सोमवार.)

विनंति ऐसी जे. व्यंकट रामदीक याजकडून चेनापट्टणाहून सांप्रत दोन अखबारा व दोन लाखोटे पत्राचे आपले नांवें आले. एकूण च्यार पत्रांची रवानगी केली आहे. अवलोकनें सविस्तर मजकूर ध्यानांत येईल. उत्तरें रवाना करावयास आज्ञा व्हावी. रा॥ छ. सवाल हे विनंति.

श्री.

(शके १७१५ जेष्ठ शु. २ सोमवार.)

विनंति ऐसी जे. सेनासाहेब सुभा यांजकडून सांवतखान नबाब व मध्यस्तास लग्नप्रकर्णी पोषाग व जवाहीर घेऊन आले. आमचे विद्यमानें मध्यस्ताची भेट व नबाबाची मुलाजमत जाल्याची विनंति पेशजी लिहिल्यावरून ध्यानांत आलें असेल. छ. २७ शवालीं मध्यस्तांनीं सांवतखान यांचे रुखसतीविषयीं नबाबासें अर्ज केल्यावरून खान मा॥ यांजपाशीं सेनासाहेब सुभा यांचे पत्रांचे जाबाब देऊन रुखसत दिल्ही. सरपेंच इनायत केला. खानासमागमें राजश्री भवानी काळो यांनीं आपल्याकडील लाला ब्रिजमल यास दिल्हें. त्याचीही रुखसत होऊन विडे दिल्हे. या उपरी मध्यस्ताचा निरोप घेऊन आह्मांकडें येणार. येथून खान मा॥र रवाना जाल्याचें वर्तमान मागाहून विनंति लिहितों. रा॥ छ. ३० सवाल हे विनंति.

अखबार ई॥ छ. १९ माहे शवाल ता॥ छ. २९ मिनहूपर्यंत.
(शके १७१९ वे० व० ९ गुरुवार-ज्येष्ठ शु० १ रविवारपर्यंत.
छ. ६. रोज टपा. रवाना.

श्री.

(शके १७१५ जेष्ठ शु. ७ रविवार.)

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:

विनंति ऐसी जे. इकडील वर्तमान पेशजी छ. ३० माहे शवालीं पत्राची रवानगी केली आहे. त्यावरून तपसीलें ध्यानांत आलें असेल. सांप्रत येथील वर्तमान, अलाहिदा पुरवणीपत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानास येईल. उत्तरें रवाना करावयास आज्ञा जाली पाहिजे. रा॥ छ. ६ माहे जिल्काद हे विनंति.

श्री

विनंति ऐसी जे–नबाबाकडील फौज व गाडद याची सुमारी शोध करून दप्तराच्या यादी तलाशानें मेळवून अलाहिदा तपसिलाच्या यादीं पाठविल्या आहेत.

बितपसील–

२ स्वाराच्या–

१ येकंदर फौज सुमारी;

१ रिकाब हमराही.

२

२ पयेदल–

१ येकंदर सुमारी;

१ रिकाब हमराही.

२

४

ऐकूण च्यार यादी पाठविल्या आहेत. अवलोकनें ध्यानांत येईल. रा॥ छ. ६ माहे जिल्काद हे विनंति.

यादी फौज सवार जमियत नवाबाचे सरकारांत बमोजीब जाबीता दफ्तर--

२१८७० जागीरदार-

७०० रावरंभा निंबाळकर
३०० कल्याणराव जगदेवराव निबाळकर
३० बाळा बाई
५० भवानराव निंबाळकर
५०० तेजसिंग खंदारकर
२०० पदमसिंग खंदारकर
१५० जोधासिंग खंदारकर
१०० दारकोजीराव पाटणकर
७५ साबाजी घाटगे
६० चडचणकर सिंदे
५० मानसिंगराव हके
२५ रुस्तुमराव पांढरे
३०० अषज्या उल्मुलुक
७५ महंमद अजमखां बिज्यापुरी
४०० महंमद हुसेनखां घवाले
३० दावरजेंग
२५ हसन अल्लीखां
७५ महंमद सुलतान खां
३५० सैद दाउद अली खां
५०० महंमद हिंदायेतुला खां
२०० महमद रहिमान खां
३०० महमद कबीर खां
२०० लोदी खां

२०० जमालखां लोहानी
३०० महमद हींदायेत खां
७०० रफाउलमुलुक
११० मीर दौरा पिसर मरिआलम
२५ सैद रसूल
१००० महमद रोषन खां.
८०० महमद सुभानखां व मोहबि अली
१००० सलाबतखां
२५ सैदउसमाईल
७५ सैद अहमद
५० सैद निज्याम
१५० नामदार खां
२००० वजीर खां
५०० महमद अमीबा आरब
१०० बदरुदौला
१००० बहलोल खां
१०० अलावलखां
५०० अलहयावरुदौला
५०० सनावरुदौला
१५० हसेन खां बिज्यापुरी
२०० सिकंदरुदौल
२२५ चिमणा राजे
३०० राये राया
१०० गोविंदराव कृष्ण
७५ माणको माधवराव
१०० खोतमराव

२९० शंकरराव भोंग
९० त्रिमलराव
४००० असद अलीखां.
१५०० मलकईसा
१००० सिद्धी अबदुला
१०० नारायणराव वशंपायन

२१८७०

८००० पागा
५००० शमघुल उमरा
३००० सयेफुलमुलुख

८०००

६४०१ रिसालदार
२१५० शमघुल उमरा
२००० सयफुलमुलुख
६०० बहादर अलीखां
७० जी तनखां
१३ अबदुल करीम
२५० कुतुब उलउमरा
१५० आमन उलमुलुक
५०० पुजान उलमुलुक
३२ बखत्यार जेंग
१६० ज्यानेसीर जेंग
५० करीमदाद खां
१७ हशम व कुवत जेंग

२५ अजमन मुलुक
१०० फतउदी महमदखां
१८ महमद जहीरुदीखां
६३ महमद जीवनखां
९३ यमीनुदौला
७० सयेद हसनखां

६४०१
१००० मनसबदार व सायरचे लोक अजमासें

३७२७१
१२२०० नवनिगादास्त करार जाबीता
५००० महमद अजम बीडवाला
२००० रामचंद्रराव मुंगीकर राजे
२००० सवाराज निगादास्त मा तेजवंत भारामल
२७०० सवराज मुतफर्कात मा॥रोशनराये
५०० सिवबा महजारी नागपुराहून आला तो.

१२२००

४९४७१

येकुणत्रनास हजार च्यारसें येकाहत्तर स्वाराची फौज येकंदर दफ्तराची. पैकीं वीस हजार मोजदाद रिकाब हमराही; बाकी फौज रोषनखां व दौलतखां व असदअलीखां वगैरेकडील तालुक्यांत ज्याबज्या सदरहू प्रो आहे. छ. ६ जिलकाद सुं॥ अर्बाति सैन मया व अलफ.

---

१ आरबी सन ११९४-फसली १२०३-हिजरी १२०७.

यादी फौज सवार स्वारीसमागमें हमराही रिकाब नवाबाचे सरकारांत हजर.

४७५० जागीरदार—

१५० राव रंभाजी निंबाळकर
२०० तेजसिंग खंदारकर
१५० पदमसिंग खंदारकर
५० दारकोजीराव पाटणकर
२५ साबाजी घाटगे
४० चडचणकर सिंदे
२५ हके
२०० अपज्या उलमुलुक
२५ दावरजेंग
२० हसनअलीखां
७५ सुलतानखां
३०० दाउदअलीखां
१५० राहिमानखां
१०० कबीरखान
७५ लोदीखान
१०० जमालखां लोहानी
२० सैद रसूल
५०० सलाबतखां
७५ सैद उसमाल व सैद अहमद
१०० नामदारखां
१०० बदरुदौला
१०० अलावलखां
३०० अलहयावरुदौला
२०० सनावरुदौला

१०० हसनखां विज्यापुरी
१०० सिकंदरुदौला
२०० चिमणा राजे
२०० रायेराया
१०० गोविंदराव कृष्ण
३० माणको माधवराव
४० नारायणराव येशवंतराव
६०० असदअलीखांपैकीं.

४७५[1]

५५०० पागा--

३००० शमषुल उमरा
२५०० सयेफुलमुलुक

५५००[2]

१०२५०

४७७५ रिसालदार--

१५०० शमषुल उमरा
१५८० सयेफुल मुलुक
५०० बहादर आली खां
५० जीवन खां
१२ अबदुल करीम

---

१ याच यादाची दफ्तरी जमा २१८७० आहे हें मागील यादीवरून वाचकांनीं ताडून पहावें.

२ पागेची दफ्तरी यादीतील जमा ८००२ आहे.

२०० कुतबुल उमराव
१२५ आमनउमुलुक
४०० पुज्यान उलमुलुक
२५ बखत्यारजेंग
१२५ ज्याने सीरजंग
५० करीमदाद खां
१७ हषम व कुवत जंग
२० अजमन मुलुक
७५ फतउदी महमद खान
१६ महमद जहीरुदी
५० जीवन खां
६० यमीनुदौला
५० सैद हसन

४७७५[1]

१९०२५

५००० नव निगादाश्ती पो[2] हजार
२००० महमद अजम बीडवाला
१००० मुंगीकर राजे
५०० राजे तेजवंत पौा
१००० रोशनराये पौा मुतफकात

१ रिसालदारांची दफ्तरी यादींतील संख्या ६४०१ आहे.
२ पैकीं.

५०० सिवबा महजारी

५०००[1]

२००२५

बीस हजार पंचवीस स्वार रिकाब हमराही बेदरापासून पांच कोस, दहा, पंधरा, वीस, पंचवीस कोस ज्याबजा उद्गीर, निटूर, हसनाबाद, कौलास या तालुक्यांत चराईस आहेत. -- -- स्वार बेदराबर नवाबापाशीं -- -- माहे जिलकाद सु॥ अर्बातिसैन मया व अलफ. (रविवार तारिख १६ जून १७९३ इ.)

श्री.

(शके १७१५ ज्येष्ठ शुद्ध ७)

यादी गाडद प्यादे वगैरे जमीयत पयेदल नवाबाचे सरकारांत बा॥ जाबीता दफ्तर

१४४५० रिसाले कदीम.

५०० फौजदारखा
५०० महमद जहीरुद्दी
३०० येतमादखां
१०० जीवनखां
२०० गालबुदौला
१५० गुलाम महदखां
४५० रसूलखां
४५० मुसाइसमत
२५ नवाजषअलीखां
६०० ऐमीनुदौला

१ ही जमा दफ्तरी यादींत १२२७० आहे.

१९० सेखवली महमद

७९ सेखहसनखां

१०० महमद ताहेर

३०० दिलावरुदौला

३०० महमदमुजफर

१२०० अबदुल करीम

७९० सैद उमरा

१००० तेजसिंग हजारी व शाहमहमदखां

२०० सेख जथे

३०० महममद शाबान

४०० ज्यानेसारजंग

२०० रायेराया

२००० सर्यकुल मुलुक

१००० रफाउलमुलुक

२०० मीरदौरा

३००० तैनाती हैदराबाद

१४४९०

१०७७ गाडद मुसा रेहमुमये मुसापेरु व मुसा

१७००० प्यादे

१०००० असदअलीखां

२००० मलक ईसा

२००० सिदी अबदुल

१००० अमीखां आरब

२००० अलहयावरुदौला

१७०००

११९० कामाठी

८०० जमाल अलीखां

२०० महमद दिलेर

१९० काजम अलीखां

११९०

५०० कारीगराज व गोलंदाजान व बरकंदाजान रिसाले राये तुळजाराम.

१२०० पटाले बायकाची

४४३००

चवेताळीस हजार तीनशें गाडद कुल पयेदलची जमीयत दफ्तरची. पैकीं तेरा हजार रिकाब हमराही बमोजीब याद आलाहिदा. बाकीची जमीयेत तालुकियांत आसद अलीखां वगैरे ठिकाणीं आहे. छ. ६ माहे जिलकाद. सु॥ अर्बातिसैन मयाब अलफ. (रविवार तारीख १६ जून १७९३ इ.)

श्री.

(शके १७१५ जेष्ठ शु ७)

यादी गाडद पयेदल रिकाब हमराही नवाबाचे सरकारांत हजर.

७००० कदीम रिसालेपैकीं

५००० मुसा रेहमु जमीयेत करार येकंदर तेरा हजार; पैकीं मोजदाद हैदराबाद येथें ८००० पैकीं,

२००० तैनाती हैदराबाद कीले गोलकुंडा व रखवाली शहर.

१००० कोयलकुड्याकडे खजिना आणावया-
करितां रवाना.

२०००

बाकी हमराही.

१००० पठाणं बायेकापैकीं आजमासें

१३००० तेरा हजार पायदल गाडदची जमीयेत रिकाब हमाराही असे. छ. ६ माहे जिलकाद.

श्री.

(शके १७१५ ज्येष्ठ शु. ७)

विनंति ऐसी जे. वेदर येथील किल्ल्यांतील हवेली नीट करावयाचे काम नवाबांनीं लाविलें. कारखाना ज्यारी आहे. मध्यस्तांनींही आपली हवेली तयार करण्याचें काम चाली लावलें. वरकड कोणीं कोणीं छपरें घातलीं. साहुकार सराफ, उदमी, बकाल यांणीं छपरें घालावीं कीं नाहीं येविषयीं मध्यस्तास विचारिलें होतें. 'सांगतों' या प्रा बोलत गेले. हैदराबादेकडे नबाब बरसात तेथें करावयास जाणार, याप्रा बोलवा फार होती. त्यावरून साहुकार वगैरे मंडळींनीं छपरें न घालितां पालावर काम आजपर्यंत चालविलें. सांप्रत छ. २७ शवालीं सर्वत्रांस हुकूम जाला कीं आपलाली छपरबंदी करून राहणें. त्यावरून छपरें घालावयास सावकार वगैरे लोक लागले आहेत. या हुकुमावरून तमाम लोकाची खातरजमा कीं च्यार ——— ——— ———[1] गवत मिळत नाहीं. सरकारचें गवत कांहीं आहे तें ——— मध्यस्तांनीं सांगितलें पंधरा हजार प्रा ——— ——— हालीं करतात. पुढें आणखी महाग होईल. कडब्याची वैरण गावगना कांहीं आहे. ती विकूं नये. एसी ताकीद आहे. जनावरास वैरण मिळणें कठिण पडलें. महिन्यानंतर रानांत ही गततें होतील. रा॥ छ. ६ जितकाद हे विनंति.

---

१ याप्रमाणें अडव्या रेघा मारून सोडलेल्या जागचीं अक्षरें, मूळ पत्रें वाळवीनें खाऊन, नाहींशीं झालेलीं समजावीं.

मोहे शवाल उर्फ वैशाख मास छ. २४ रोज मंगळवार,
ट्यावर पुण्यास.

श्री.

वैशाख व ११. मंगळवार शके १७१५.

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी,

विनंति ऐसी जे. इकडील वर्तमान छ२० शवालीं पत्राची रवानगी केल्यावरून सविस्तर ध्यानांत आलें असेल. सांप्रत येथील वर्तमान आलाहिदा पुरवणीपत्रीं विनंति लिहिली आहे; त्यावरून अवलोकनांत येईल उत्तरें पेशजी व हलीं एकंदर रवाना करण्यास आज्ञा जाली पाहिजे. रा॥ छ. २४ सदाल हे विनंति.

श्री.

वैशाख व. ११ मंगळवार शके १७१५.

विनंति ऐसा जे—राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांजकडून सांवतखान, नबाबाकडे येण्याकारितां नागपुराहून निघोन बेदरानजीक चार कोसांवर आल्याची विनंति छ. २० सवालचे रवानगींत लिहिल्यावरून ध्यानांत आलें असेल खान म॥र यांनीं, राजश्री रामचंद्र दादो यांचे चिरंजिव माधवराव येथें आहेत, त्यांजला बोलाविलें. म॥ र निले गेले. त्यांसमागमें खानानीं आह्मांकडे सांगोन पाठविलें कीं "सेनासाहेब सुभा यांची आज्ञा आह्मांस आहे कीं आधीं आपल्याकडे जावें. आपण मध्यस्ताची भेट करवून हुजुरची मुलाजमत करवावीं ऐसें आहे. यास्तव आपले भेटीस कोणे समई यावें? इतला व्हावी." याचा निरोप माधवराव रामचंद्र यांसमागमें पाठविला कीं, "तुह्मांस सेनासाहेबसुभा यांची आज्ञा याप्र॥ फार उत्तम आहे. यावें." त्यावरून छ. २२ रोजीं प्रातःकालीं खान म॥र आह्माकडे आले. समा-

१ पहिल्या अंकांत "सरकारी—नानास" या सदराखालीं छापलेल्या पत्रांच्या आधींच्या मित्तीचीं कांहीं पत्रें सांपडलीं तीं आज येथें छापीत आहों.

गमें पंचवीस पठाण निवडक होते. भेट होऊन सेनासाहेब सुभा यांचे पत्र व वस्त्रें, लग्नाचीं आह्मांस होतीं तीं, खान म॥र यांनीं दिलीं. मध्यस्ताची व हुजुरची मुलाजमत केव्हां हें विचारिल्यावरून ' अस्तमानीं होईल ' याप्र॥ सांगोन खान म॥र यांस निरोप दिला. आपले स्थळास गेले. र॥ छ. २४ सवाल हे विनंति.

श्रीं.

वैशाख व. ११ मंगळवार शके १७१५.

विनंति ऐसि जे—सांवतखान आमची भेट होऊन गेल्यानंतर मध्यस्ताकडें आह्मीं सांगोन पाठविलें कीं, " सेनासाहेबसुभा यांजकडून सांवतखान आले. आमची भेट जाली. खान म॥र यांस हुजुरचे आपले भेटीकरितां बादमगरबा घेऊन येतों. " याचें उत्तर मध्यस्तांकडून आलें. " फार उत्तम आहे. खानम॥र यांस आपलें समागमें घेऊन अस्तमानीं यावें. " खानास इस्तकबालीविषईं माधवराव रामचंद्र यांनीं मध्यस्तास अगोदर विचारिलें होतें. " इस्तकबालाचें प्रयोजन नाहीं " याप्र॥ त्यांनीं सांगितलें. नेमाप्रमाणें अस्तमानीं आह्मीं मध्यस्ताकडें जाऊन खान आले त्यांची भेट करविली. सेनासाहेबसुभा यांचें खरितापत्र व वस्त्रें जवाहीर मध्यस्तास आणिलें तें खानांनीं पावतें केलें. आगतस्वागत बोलणें जालें. मध्यस्तांनीं नबाबाकडें अर्ज करविला कीं " गोविंदराव, सेनासाहेबसुभा यांजकडील सांवतखान यांस मुलाजमतीकरितां घेऊन आले, ईर्षाद यावी. यांजला समागमें घेऊन बंदा हजर होईल. " च्यार घटका रात्रीं नबाब लालबागेनजीक चांदणीचे फर्षावर बारामद जाले. येण्याविषईं मध्यस्ताकडें हुकुम आला. मध्यस्त, मी सांवतखानांसहित नबाबापासी जाऊन खान म॥र यांची मुलाजमत करविली. सेनासाहेबसुभा यांजकडील खरितापत्र व लग्नसंबंधी वस्त्रें, जवाहीर गुजराणिलें. चंदा कंपनीचा नाच होता. मध्यस्त व मी समीप होतों. असद अलीखान प्रकर्णी खमम येथील हाथीचा जंगलातला व चोबीना वगैरे प्रकर्णी बोलणें जालें. मध्यस्तांनीं साल्गिरेकरितां नबाबास जवाहीर द्यावयाचें

आणिलें तें दाखविलें. इत्यादिक होऊन फुलाचे हार बहुत प्रेमानें नवाबांनीं आह्मास व सांवतखान यांस दिले. यापा॥ खान मा॥र यांचे मुलाजमतीचा तपसील कचा ध्यानांत यावा सबब विनंति. रा॥ छ. २४ सवाल हे विनंति.

श्री.

वैशाख व. ११ मंगळवार शके १७१५.

विनंति ऐसी जे—सेनासाहेब सुभा यांजकडून पोषाग व जवाहिर सांवतखान यांसमागमें नवाब व मध्यस्त व आह्मास पादीसमंधे आल्याचा ता॥ —

५ नवाबास पादीसमंधे—

२ पोषाग—

१ गुलाबी रंगाचा पांच पाचे (?) दुपाला किमखाबासहित.

१ बंगाली पोषाग चांदणी पांचपांचेमय दुपाला किमखाब.

—

२

३ जवाहीर आदत—

१ कंठी मोत्याची.

१ सरपेंच.

१ जिगा.

—

३

—

५

४ मध्यस्तास—

२ पोषाग—

१ पादीसमंधे आबासीरंग पेठणी जामेवार व दुपाला किमखाब.

१ मातमीचा पोषाग सफेत रंगी.

—

२

१ जवाहीर दागिने—

१ सरपेंच.

१ जिगा.

—

२

—

४

१ आह्मास पोषाग पादीसमंधे.—

१ तिबट पैठणी.

१ सेला पैठणी.

१ जामेवार.

-॥-किमखाब.

—

३॥-

सदरहूप्र॥ वस्त्रें व जवाहीर खान मजकूर यांनीं समागमें आणिलीं तीं प्रविष्ट जालीं; रा॥ छ. २४ सवाल हे विनंति.

श्री.

वैशाख व. ११ मंगळवार शके १७१५.

विनंति ऐसी जे—मध्यस्तांनीं नवाबास सालगिरेचे समारभांत आपले तर्फेनें जवाहीर गुजराणावयाकारितां खरीद केलें. छ २२ सवालीं आह्मीं मध्यस्ताकडें सांवतखान यांस घेऊन गेलों. तेसमयीं मध्यस्तांनीं बोलण्यांत आणिलें कीं "हजरतीस सालगिरेकरितां द्यावयास जवाहिर तीन तऱ्हेचें घेतलें तें तुह्मीं पाहावें. पसंद होईल कीं नाहीं हें सागावें." या प्रा॥ बोलून तीन जोड जवाहीर दर जोडांत कंठी, सरपेंच, जिगा, भुजबंद, दस्तबंद, तुरावलज्या

याप्रा। हिऱ्याचा जोड एक व जमरुप पांचेचा जोड एक व तिसरा माणकाचा ऐकूण तीन जोड जवाहिर दाखविलें. जवाहीर उमदे! किमतही भारी. आह्मी पाहिल्यानंतर तसेच नवाबाकडें गेलों. जवाहिराचे खोन मध्यस्तांनीं समागमें घेऊन नवाबास दाखविलें. त्यांनीं एक एक रकम पाहून मजकडें पाहावयास देत गेले. पाहून ज्या रकमेची जसी तारीफ करणें तसी केली नबाबास पसंद जालें सालगिरेच्या दिवशीं मध्यस्त गुजराणार. ध्यानांत यावयाकारितां विनंति. रा। छ. २४ शवाल हे विनंति.

श्री

वैशाख व. ११ मंगळवार शके १७१५.

विनंति ऐसी जे-असद अलीखान मुजफरुलमुलुक कडप्याहून येथें आले. मध्यस्ताची भेट हजर (त) ची मुलाजमत जाल्याचा तपशील पेशजी विनंति लिहिल्यावरून ध्यानांत आलें असेल. खान मा। र यांनीं मध्यस्तास सांगितलें कीं " खमम तालुकियांत सागवानी लांकडें बहुत आहेत. एक एक लाट बारा गजी, दहा गजी, आठ गजी याप्रा। लांबी, लपेटही त्याच अन्वयें याप्रा। लांकडें सागवानी व सिशाचींही आहेत " हें सांगितल्यावरून मध्यस्तांनीं छ. २२ शवालीं नवाबास लांकडाचा अर्ज केला. खान मा। र ही जवळच होते. " खममहून लांकडें बेदरास नवे शहराकरितां आणावीं. " हा अर्ज मध्यस्तांनीं केल्यावर नवाबांनीं उत्तर केलें कीं " बारा गज लांबी लाट आणवयाच्या त्या छकड्यावर कांहीं येणार नाहींत. " मध्यस्त बोलले. " दुरुस्त आहे. तख्ते करावे छागतील. तेव्हां असा मातबर चोबीना येईल. शिशाचीं लांकडेंही अशींच मातबर आहेत. तें (तीं) ही आणवावीं. " हजरत बोलले. " सिशाचे लांकडाची इमारत दुरुस्त नाहीं " मध्यस्तांनीं अर्ज केला ' बादषाही माहलास सिशाचे लांकडाचें काम शाहाज्याना .....(पुढें बंद गहाळ)

श्री.

ज्येष्ठ शु. ७ रविवार शके १७१५.

विनंति ऐसी जे, हैदराबादेहून नवाबांनीं बेदरास तोफा आणविल्या होत्या,

त्या येथें छ. २९ शवालीं दाखल जाल्या. तीन थोर, मध्यम सात, लहान पांच एकूण पंधरा तोफा निवडक येऊन पोंहचल्या. लालबागेनजीक आणून ठेविल्या. बाकी तोफा हैदराबादेहून येत आहेत. २॥ छ. ६ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ शु. ७ रविवार शके १७१५.

विनंति ऐसी जे. इंग्रजी दोन पलटणें यांचे सरकारांत नौकर—तनखा असदअलीखान यांजवर चनूर कडपे ता(लुकिया) ऐवजीं तीस हजार व चिटवेल तालुकिया ऐवजीं बत्तीस हजार एकूण बासष्ट हजारांच्या तनखा दोन केल्या होत्या. तो ऐवज पोंचला नाहीं ह्मणून बोभाट आल्यावरून मिस्तर किनरी दिलावरजंग यांनीं, येथें त्यांजकडून मवलवी आहे त्यांस व मीर आलम यांस, पत्र लिहिलीं कीं, "पलटणास ऐवज करार बमोजीब पावत नाहीं. तनखा त्यांजवर होतात त्यांजकडून ऐवज पोंहचण्याची हरकत होती. यास्तव असदअलीखानही हजूर आले आहेत. त्यांसी तनखाचे ऐवजाची रूबरू करून मगील फैसला व पुढील पलटणीचे दरमाहाचा बंदोबस्त असा कीं बोभाट न पडे याप्रा॥ करणें" ह्मणोन पत्रें आल्यावरून मीर आलम व मवलवी यांनीं या मजमुनाचे रुके छ. २९ शवालीं मध्यस्तांस पाठविलें. आह्मी मध्यस्तांपासीं असतां असदअलीखानास मध्यस्तांनीं हा मजकूर छडिला....जबाब केला कीं " सदरहू ऐवजाच्या तनखाची....कियांतील साहुकारावर दिल्या होत्या. हवी....यांचे मारफत रसीद घेऊन तीस हजार देव....वले नसल्यास येथें फडच्या करितों. बाकी ऐवज तेथें....लफलमाची फलम देविले. त्यांत नुकसान. सबब ऐवज न घेतला अलेल. याची जसी ,ईर्षाद त्याप्रा॥ फैसला होईल. " याप्रा॥ खानाचे बोलण्याअन्वयें मवलवीस 'जबाब मध्यस्तांनीं पाठविला. जालें वर्तमान समजावयाकरितां विनंति. २॥ छ० ६ जिलकाद हे विनंति,

श्री.

ज्येष्ठ शु. ७ रविवार शके १७१५.

विनंति ऐसी जे --निर्मळ वगैरे माहलबाबत तनख्याचे वसुलाकरितां सरकारांतून कारकून सखो जिवाजी अवरंगाबादेस गेल्यानंतर फकरूदौला व अर्जीमुदौलासी ऐवजाचें बोलणें म।।रनिलेचें जालें. याचा तपसील बजिनस त्यांचें पत्र आलें व मध्यस्ता- ..... दौलास ताकीद निक्षुण पाठवण्याचा राजश्री..... व यांनीं आज्ञेप्रमाणें लिहिल्यावरून मध्यस्ता....शवालीं सविस्तर बोलण्यांत आलें. व पत्राची नकल....दाखविली. त्यावरून मध्यस्त बोललें कीं, " तनख्याचे ऐवजाचा फैसला मागेंच जाला असतां सुभेदारीचे बंदोबस्ताकरितां आरसा जाला. याउपरी ऐवजास गुंता नाहीं. नगदीच ऐवज पदरीं पडे याप्रा।। जगधन साहुकाराचा दुकान तेथें आहे त्याजवर कांहीं ऐवजाची चिठी व कांहीं अजीमुदौवलाकडून फैसला करवितों. परंत माजी अमलदाराकडून तनखापैकीं वसूल काय पावला व बाकी काय राहिली हें खचित समजलें पाहिजे. लेहून आणवावें. त्याप्रा।। फैसला करून देवितों. " त्यावरून विनंति कीं, एकंदर तनखा बाबत सरकाराचा ऐवज सुभ्याकडून येणें त्यापैकीं वसूल पोंहचला तो वजा होऊन बाकी ऐवज येणें किती याचे तपसिलाची याद दप्तरांतील शोधोन इकडे खाना करावयास आज्ञा व्हावी. र।। छ. ६ जिलकाद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ शु. ७ रविवार. शके १७१५.

विनंति ऐसी जे---टिपुसुलतान यांजकडून.....जोडी समागमें नबाब व मध्यस्तास पत्रें आलीं.....मध्यस्ताचे बोलण्यांत कीं " दुसरे हप्त्याबाबत.... ठगिरीकडे पहिल्यानें पाठविला. पेशजीचा करार कीं कडपे प्रांतीं ऐवज पोंहचवावा. ऐसें असतां व्यंकटगिरीकडे पाठविला. तेथून आणावयाची सोय नाहीं. सबब इकडून लाड साहेबास लि।। होतें. सांप्रत कडपे तालुकियांत करारबमोजीब दुसरे हप्त्याचा ऐवज पाठविला आहे. तेथून आणवून

द्यावा. " आप्रा॥ पत्रांत मजकूर ह्मणोन बोलले. त्यांचे पत्राचें जवाबही यांनीं मुनषीकडून तयार करविलें आहेत. शुतरसवारास एक दोन दिवसांत रवाना करणार. रा॥ छ. ६ जिलकाद हे विनंति

श्री.

ज्येष्ठ शु. ७ रविवार शके १७१५.

विनंति ऐसी जे—लाड कारनवालीस यांजकडून नवाब व मध्यस्तास पत्रें आलीं. तीं हैदराबादेहून किनवीनें आपले अर्जासमवेत मवलवीकडे येथें पाठविलीं. त्यानें गुजराणिलीं. पत्रा.....ही तयार करविले. पत्रांतील मजकूर काय याचा .....समजण्यांत आला नाहीं. याहूम तहकीक.....विनंति लिहिण्यांत येईल. रा॥ छ. ६ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ शु. ७ बुधवार शके ७१५.

विनंति ऐसी जे–सेना साहेब सुभा यांजकडून सांवतखान लग्नसमंधी जवाहीर वस्त्रें नवाब व मध्यस्तास घेऊन आले. मुलाजमत होऊन पोषाग. जवाहीर पत्रें गुजराणिलीं. नवाबाची खरवसत घेतली. सरपेंच दिल्हा. मध्यस्तांनीं पानदान देऊन निरोप दिल्हा. आह्माकडें आले. घराऊ बोलणें बोलून निरोप देऊन नागपुरास रवाना जाले. यांचे समागमें राजनी भवानी काळो यांजकडोन लाला ब्रजमल होता. त्याजकडें जोरावरजंगाकडील लडा सबब त्यास च्यार दिवस अटकाव जाला होता. याचा ता॥ पेशजी लि॥ आहे. सांप्रत लालाचि. पईं सांवतखान यांनीं रदबदल केली कीं " माझेबरावर आला.....जाली. तेव्हां माझें जाणें कसें होतें. " यावरून....सुटका होऊन खानाचे समागमें लालाचीही रवानगी जाली. रा॥ छ. ६ जिलकादें विनंति.

श्री.

ज्येष्ठ शु. ७ रविवार शके १७१५.

विनंति ऐसी जे—मेलगीरराव देशमुख चींच....गोलकुंडा येथें होता. त्याचें बोलणें त्रिमलराव व्यंकटेश सुरापुरकर यांचे विद्यमानें मध्यस्तांसीं हो-

ऊन तूर्त मेलगीररावं यांचे सुटकेची परवानगी जाली. मेलगीररावं यांचे भावाच्या दोन मुली उपवर–लग्नाच्या त्यांचे लग्नास्तव सुटकेविषई अर्ज केल्यावरून मेलगीररावं बायकोसहित किल्यांतून सोडून चिंचोलीस खाना करण्याचें ठरलें. लग्न होतांच त्यास हजर करावें, हा जिमा त्रिमलराव यांनीं करून सोडविलें. पुढें लग्न होऊन हजर करण्याचें समई काय ठरेल त्याप्रा॥ विनंति लिहिण्यांत येईल: रा॥ छ० ६ जिलकाद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ शु. ७ रविवार शके १७१५.

विनंति ऐसी जे–नवाबांनीं श्रीमंतास पत्र पेशजी पो॥. त्याचा जबाब सरकारांतून रवोत्तमराव यांचे विद्यमानें खाना जाला. याचा इतला राजश्री गोविंदराव यांणीं इकडे लिहिला आणि जवाबाचा मसावदाही पाठविला. त्यावरून मजकूर समजला. त्यास मसविदा मध्यस्तांस दाखविला असतां त्यांस कांहीं त्यांत गोड वाटावयाचें नाहीं. सबब मसविदा जवळ ठेऊन पत्र त्यांजकडें परभारा आल्याचें वर्तमान समजल्यावरून मध्यस्तांकडें कोन्हेरपंत यांस पाठवून त्यांस विचारिलें कीं " जवाब आपल्यापासीं आला कीं नाहीं. " याजवर मध्यस्ताचे बोलण्यांत आलें त्याचा तपसील गोविंदराव यांस लिहिला आहे. मा॥रनिले विनंति करतील. त्यावरून सविस्तर ध्यानांत येईल. रा॥ छ. ६ जिलकाद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी.

विनंति ऐसी जे—इकडील वर्तमान पेशजी.....पत्रांची रवानगी केली त्यावरून ध्यानांत (आलें असेल). सांप्रत येथील वर्तमान नवाब व मध्यस्ताचे बोलण्यांत आल्याअन्वयें तपसीलें आलाहिदा पुरवणी पत्रीं विनंति लिहिली आहे. त्यावरून अवलोकनांत येईल. उत्तरें रवाना करावयास आज्ञा जाली पाहिजे. रा॥ छ. १९ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

विनंति ऐसी जे—नवाबाकडे सालगिरेचे नजरेकारितां आह्मी मध्यस्तासहित गेलों. लालबागेमध्यें बरामद जाले. साहेबजादे सिकंदरज्याहा मीर पोलाद अली व सुभानअली होते. मीर आलम व पागेवाले सर बुलंदजंग आदिकरून तमाम सरदार, मनसबदार, मुतसदी हजर. सर्वांच्या नजरा जाल्या. मध्यस्तांनीं जवाहिराच्या किस्ती व पोषाग .... दोन च्यार तऱ्हेचे व मिठाईचे खोन व .... छेड्या तास बादलीनें मढवून तऱ्हेतऱ्हेच्या तयार केल्या त्या व चेंडू सोनेरी व रुपेरी .... एक खोन भरून व शेहरा ह्मणजे मुडावली (मुंडावली ?)यास तास मोत्याची झालर लाऊन तयार केली तें याप्रा खोन आणून गुजराणिले. हा सर्व सरंजाम नवाबांनीं पाहून घेतला. मध्यस्त व मी व मरिआलम समीप होतों. इंग्रजाकडील मिस्तर इष्टवट आला. कंचन्यांचे ताफेही पुढें हजर होते. नजराचे लोकाची दाटी फार. आणि लालबागेंतील मकान आठोपसीर. सबब नाच मना झाला. किल्यांतील विहिरीस मोटा लाऊन त्याचा नहर बांधून आणिला. त्याची चादर झडत होती. पांच सहा घटिकापर्यंत निषस्त राहिली. मध्यस्थ, मी व मीर आलम, ईष्टवट या चौघांसीं बोलणें जालें, याचा तपसील आलाहिदा विनंति लिहित्यावरून ध्यानांत येईल. रा. छ. १९ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

विनंति ऐसी जे—सालगिरेचे नजरांचा .... होत असतां नवाबासमीप मध्यस्त व मी व मीरआलम होतों. नवाबांनीं आह्मांकडे झुकून बोलण्यास आरंभ केला कीं " हिंदुस्थानांत राव शिंदे यांजकडील सरदार फौज-

सुधा आहेत. त्यांसीं व होळकर यांसीं पहिली लढाई मातबर होऊन होळकर यांची सिकस्त जाली. पुन्हा लढाईचे इराद्यानें महेश्वराकडून जमीयेत कुमकेस आली. त्यासहित होळकर याजपासीं जमा व पोख्त सरंजाम जाला इतक्यावर लढाई जाली असतां कसें घडेल? हा दाबरोआब सर्वांत दिसो लागला. अशा समयांत सिंदे यांजकडील सरदारासी व होळकरासी सलूखाची .... ठरून आखबारा आल्यावरून चिता—.... .... जाली होती कीं सरदार आपसांत समजोन म.... .... जाला. सुलह ठरली. हें फार चांगलें जालें. ऐसें असतां मागाहून मल्हारराव होळकर आले. त्यांनीं, आपले वडिलास निर्भेळनापूर्वक बहुत कांहीं बोलून, सेवटीं लढाई न करी त्यास फलाण्या शपथा याप्राा ज्या गोष्टी न बोलावयाच्या त्या बोलण्यांत आणून, जंग सुरू केली. सिंदे यांजकडील फौज सरंजाम मजबूत. लडाईचा तावा न सोसतां होळकराकडील मोड जाला. कितेक सरदार शिपाई लोक बहुतकरून ठार व जखमी झाले. कितेक फरारी होऊन पसपा (?) जाले. त्यांचा पाठलाग सिंदे यांजकडील लोकांनीं केला. लुटले गेले. याप्राा वर्तमान आलें. त्यावरून वाईट वाटलें. कारण कीं राव पंतप्रधान यांचे दौलतीतील उभयतां सरदार .... मातबर आपसांत असा कलह वाहडणें हें स-.... .... नाहीं. त्यांत एकवेळ लढाई पहिली जाली. .... फौजेचा जमाव होळकरापासी चांगलाच जम—.... .... दाबाचे पोटीं सलुख ठरला. इतक्यानें दाब सलाबत मोठी होती. ते मल्हारराव यांचे ज्याहेलीमुळें हे खराबी! मोंठा सदमा गुजरला." याप्रा नवाब बोलत असतां मध्यस्तांनीं मधीं छूट चालविली कीं "दोनही सरदार उमदा. हजरतीस समान. बलकी होळकर यांची भेट व दाट परिचय आहे. असा कांहीं सिंदे यांजकडील भेटगोष्टींचा दंडकही नाहीं. होळकरावर हे नौबत गुजरली. सबब खफगांस जागा." याप्राा बोलणें झालें. सा छ. १९ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके ७११५.

विनंति ऐसी जे—होळकर सिंदे प्रकर्णी लढाईचें बोलणें चालत असतां मध्यस्तांनीं बोलण्यांत आणिलें कीं "हजरतीकडून राव सिंदे यांसी दोस्तीचा सिलसिला ठेवण्याची स॥ कीं राव पंतप्रधान यांचे तर्फेनें हिंदुस्तानचे बंदोबस्ताचे कामांत राव सिंदे शाहज्यानाबाद आदिकरून बादषाही कामावर सरगरम. यास्तव त्यांसीं दोस्ती ठेवणें लाजम व सलाह दौलत. बादषाही बंदोबस्तांत राव पंतप्रधान यांजकडून जो मुखत्यार तेथें राहील त्यासीं दोस्ती व ऐगानगतीचा सिलसिला ज्यारी करणें प्राप्त आहे." याप्र॥ नवाबाचें समक्ष मध्यस्तांनीं बोलण्यांत आणिलें. ध्यानांत यावें, यास्तव विनंति. र॥ छ. १९ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

विनंति ऐसी जे—नवाबाचे समक्ष मध्यस्तांनीं बोलण्यांत आणिलें कीं "मिस्तर बैद इंग्रज.....पलटणाचे जमियेतसुधा महेश्वरा.....अहिल्याबाई यांनीं तुकोजीराव होळकर.....कुमकेकारितां खाना केला तो मार्गी येत असतां सिंद्याकडील सरदारास बात्नी समजल्यावरून त्यांनीं अंबोजी इंगळे यांस पांच हजार फौजेनसी त्याचे तोंडावर खाना केलें. एक ब एक येऊन इंगळे यांचे फौजेसी व इंग्रजी पलटणासी मुकाबिला जाला. तीनच्यार पलटणें इंग्रजी लोक मारून लुटून ताराज केले. या प्र॥ वर्तमान आलें. यावरून ताजुब होतो कीं इंग्रजी पलटणें चार असतां पांच हजार सवारांनीं लुटून घ्यावीं असें सर्वथैव घडूं नये. ज्या गोष्टी न घडावयाच्या त्या घडतात. तस्मात् जिकडे येश तिकडे हे सर्व प्रकार होतात." याप्र॥ बोलले. र॥ छ. १९ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

विनंति ऐसी जे–नवाब नीं, मिस्तर ईष्टवट व मीर आलमसमीप असतां, आह्मांसी बोलण्यांत आणिलें कीं "लाड कारनवालीस यांजकडून टिपु सुलतानसमंधी तहनाम्याची याद आली. त्याची नकल मदारुलमहाम यांजकडें पाठवण्याकारितां तुह्माकडें दिल्ही. तुह्मीं रवाना केल्यासही फार दिवस जाले. अद्याप त्याचा जवाब तिकडून आला नाहीं. जबाबाकरितां यांची निकड आहे. त्यास मदारुलमहाम यांजकडून जबाब किती दिवसांत येईल?" याचें उत्तर आह्मीं केलें कीं "तहनाम्याची नकल इकडून रवाना केली ते मदारुलमहाम यांनीं पाहिली. जबाबही लौकरच तिकडून येईल." याजवर ईष्टवट यानें अर्ज केला कीं "लाड साहेब यांजला विलायेतीस जाण्याची त्वरा. या जबाबाची इंतजारी करून राहिले आहेत. याजकरितां जबाब लौकर गेले पाहिजेत. येविषईं पैहम तिकडील निकडीचीं पत्रें येतात." यावरून नवाबांनीं आह्मास मागती सांगितलें कीं "तुह्मी मदारुलमाहम यांस आणीक लेहून जवाब.....पोंहचेत ऐसें करावें." त्यावरून विनंति कीं तहनामे-प्रकर्णी जवाब ठरले असतील. रवाना करण्यास सत्वर आज्ञा व्हावी. रा॥ छ. १५ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार. शके १७१५.

विनंति ऐसी जे—नवाबांनीं बोलण्यांत आणिलें कीं "विलायतीमध्यें इंग्रजाचे बादषाहासी व फरासीसासी बिगाड जाला. लडाई मचून राहिली आहे." याप्रा॥ बोलत असतां मध्यस्तांनीं बयान केला कीं "फरासीस सर्व रयेत येक आवा जमून त्यांनीं आपले बादषाहास जीवें मारिलें. दौलतीचा सर्व कारभार रयेत लोक करितात. दोन टोपीवाले यांसी व फरासीसासी लडाई जाली. त्यांत फरासीस गालब पडले. कितेक फिरंगी टोपी-

वाले यांसी फरासिसाचे.... .... ह्न(ण) णें कीं बादषाहाचें प्रयोजन नाहीं; बादषाहावांचून दौलत सर्वांनीं चालवावी. हा खुलस .... केला—बहुत जमले. कमकसर सात आठ (लाख) मनुष्य जमून आहेत. जबरदस्ती भारी! इंग्रजाचे बादशहास मोटा मनसबा पडला कीं हें खूळ कोणेंही प्रकारें तोडलें पाहिजे. यास्तव इंग्रजांनीं वरकड टोपीवाले यांचे बादषाहांस अनुकुल करून घेऊन फरासिसाची तंबी करावी हा नक्षा बांधिला. दक्षण हिंदुस्थानांत जेथें फरासीस आढळेल तो मारून टाकावा. फरासिसाची कतल करावी. याप्रा॥ बेत केला. सदरहू—अन्वयें ज्याबज्या बंदर जातीचे जनराल व गौरनर यांजला हुकूम पोंहचले. फुलचरीचें मकान फरासीसाचे सिकमांत आहे तें घेऊन बंदोबस्त करावा. याप्रा॥ चेनापटणचे गौरनराकडे हुकूम आला आहे. फुलचरीचा इरादा करणार. तेथील जनरलानें ही .... तयारी केली आहे. इतक्यावर मसलत कोणे .... कसी जाईल पाहावें हा मोटा हजुमा आहे." याप्रा॥ नवाब व मध्यस्ताचे बोलण्यांत आलें. इष्टवट जवळ होता, त्याचेंही बोलणें याच अन्वयें पडलें. वर्तमान ध्यानांत यावें, यास्तव विनंति. रा॥ छ. १९ जिलकाद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

विनंति ऐसी जे—मिस्तर इष्टवट याचे रुबरू इंग्रज फरासिसाचे विघाडाचा बयान नवाब व मध्यस्ताचे बोलत असतां इष्टवट बोलला कीं "इंग्रजाचे बादषाहानें फरासिसासी जंग करण्याचा सरंजाम करून तयारी केली. हे बातनी फरासीसास समजल्यानंतर त्यांनीं आपली मजबुती करून लडाईस सिद्ध जाले. लडाईचे अगोधर इंग्रजाकडील .... जाहजें दर्याहून येत असतां फरासीसांनीं जमियतसुधा जाहाजावर चालून जा .... जाहाजें जबरदस्तीनें नेली. त्याजवर येक लडाई इंग्रज फरासीसासीं होऊन इंग्रजांनीं त्यांचीं जाहाजें कांहीं आणिलीं. याप्रा॥ वर्तमान आलें." ऐसें बोलण्यांत.

सारांश इंग्रज फरासीसाची लडाई रुबकार आहे. दोंहीकडूनही जमाव, सामान सरंजाम पोख्त. काय घडतें पाहावें. हीं वर्तमानें सरकारांतही मालिट वगैरें कडून आलींच असतील. येथें ऐकिलें त्याची विनंति लि॥ असे. र॥ छ. १९ जिलकाद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

विनंति ऐसी जे—मिस्तर किनवी दिलावरजंग हैदराबादेस आहे. बेदरास येणारं होता. परंतु तबियेत आराम नाहीं. मांदगी ! सबब तेथें राहून त्यांनीं अपले तर्फेनें मिस्तर ईष्टवट यास रवाना केलें. ईष्टवट बेदरास येऊन नवाबाची मुलाजमत जाली. सांप्रत ईष्टवट व मवलवी दोघे दरबारीं जाबसालास येथें आहेत. किनवी दिलावरजंग हैदराबादेहून अद्याप आले नाहींत. र॥ छ. १९ जिलकाद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

विनंति ऐसी जे—राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांसी व वेंकोजी भोंसले उभयेता बंधूंत कलह होऊन सेनासाहेब सुभा यांनीं त्या कलहांत आपले कपाळावर तांब्या मारून घेतला. असी आखबार नवाबाचे येथें आली. खरें लटकें याचें वर्तमान—तेथें वर्तमान आलें असेल तें खरें. वर्तमान ऐकून आश्चर्य वाटलें. र॥ छ. १९ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

विनंति ऐसी जे—पेशजी गोविंदराव यांचे लिहिण्यांत म॥र आला होता कीं "उमरखेड वगैरे प्रांतांत खुर्दा नवा पडतो. त्याची जमाबंदी होती. वाजमुळें सरकारचें नुकसान फार. दरसाल कमाविसदारांस सरकारांतून

नुकसान मुजरा द्यावे लागतें. त्यास याचा मजकूर मध्यस्तांसी बोलून प्रांतांत मोगलाईकडील मा(मलत) तेथील बंदोबस्त व पैशाचा ठराव करून..... त्याहावें. ह्मणजे इकडोनही उमरखेडकर कमाविसदारास ताकीद अमलांत येईल. ह्मणोन सरकारची आज्ञा निकडीची आहे. त्यास सदरहू म।।र मध्यस्तांसी बोलून बंदोबस्त करून लौकर त्याहावें." ह्मणोन लि।। होतें. त्याजवरोन मध्यस्तांसी बोलणें जालें. यांणींही आपले माहलांतील नुकसानीचा बयान फार सांगितला; व उमरखेडकराचा बयान फार केला. एक उमरखेडकराचा बंदोबस्त जाला ह्मणजे आह्मी आपले माहलांत बंदोबस्त करवितों ह्मणोन नेम करून शाहआलमबादषाह याचे नावें सिका व पैसा निखालेस तांब्याचा दाहा मासे असावा याप्र।। करार करून सैदमुजवरखान यांस याणीं आपलेकडील माहलचे टांकसाळेचे अमीनींचें काम करार करून नवाबाचे मोहरेनसी सनद करून पाठविली. .... ही सांगितलें कीं "तुह्मीं मदारुलमाहम .... त्याहावें व ऐक पत्र आपले नावें दिल्हें तें रवाना .... पावेतों जागाजागाचे पैसे खोटे चालीचे .... ते ते यांचें येथें अमीलांनीं पो। होते तेही पाहाण्यास पो। आहेत. अवलोकनें ध्यानांत येईल. उमरखेडांत पैसा होणें तो दाहा मासे वजनाचा व्हावा ऐसी ताकीद कमाविसदार यांस व्हावी आणि मुर्षारुलमुलुक यांचे पत्राचे उत्तराविषईं आज्ञा व्हावी. रा। छ. १५ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. ३ बुधवार शके १७१५.

विनंति उपरि. बाळाजी रघुनाथ यांची रवानगी लौकर करावी. तेथें रिकामे आहेत. येथें कामें फार तटलीं. यास्तव म।।रनिलेस सत्वर रा। करावें. रा। छ. १६ जिल्काद हे विनंति.

महाराष्ट्र इतिहास.

खर्ड्याच्या लढाईचा पत्रव्यवहार.

(गोविंदराव काळे यांचें दफ्तर; खासगी.)

श्री.

(शके १७१५ वैशाख वद्य ११ मंगळवार.)

विनंति उपरि " येक हजार बंदुखा तीन नमोण्याप्रा॥, खरीद करण्याच्या; पैकीं पुणीयांत इंग्रजी व फरासीसी दोन मासल्याच्या मिळतात. त्या, नमोण्याचे बंदुखाहून, वजनास आदसेर पावसेर जाजती अहेत. " इत्यादिक तै॥ लिहिल्या अन्वयें मध्यस्तासी बोललों. नमोण्याच्या बंदुखा जुन्या, सबब नवे खरीदीच्या बंदुखा वजनास यापेक्षां अधिक हें कारणही सांगीतलें. याजवर मध्यस्त बोलले कीं:—" थोर बंदुखाचे दोन नमुणे पाठविले त्याबमोजीब इंग्रजी व फरासीसी बंदुखा पुण्यांत मिळतात. नेमाप्रा॥ च्यारसें त्या व दुसऱ्या च्यारसें एकूण आठशा बंदुखांची खरीदी व्हावी. नव खरीदीच्या बंदुखा जुन्यांहून अलबता वजनास आदसेर पावसेर जाजती असतील, याची चिंता नाहीं. परंतु पुण्यांत नव खरीदीच्या बंदुखा, याची किंमत ईंग्रजी बंदुखांची कसी व फरासीसीस काय पडतें? हें कांहींच गोविंदराव ह्यांनीं न लिहिलें व रघोतमराव यांजकडूनही लिहिण्यांत आलें नाहीं; हें काय "? या प्रा॥ बोलले. त्यास इंग्रजी व फरासीसी बंदुखांची किंमत चौकसीनें लेहून पाठवावी. त्या प्रा॥ मध्यस्तासी बोलतां येईल रे॥ छ २४ सवाल हे विनंति.

---

१ प्रमाणें. २ तपशील. ३ खात्री.

श्री.

(शके १७१५ वैशाख वद्य ११ मंगळवार.)

विनंति उपरि "आलेमानी धाकटी बंदुख, नमोण्या करितां सांडणी स्वाराबराबर, यांनीं येथून-सदरहू प्र॥ दोनसें बंदुख खरीद करण्याकारितां-पाठविली. त्या बेताच्या बंदुखा पुण्यांत मिळत नाहींत; ममईहून आणविल्या येतील. परंतु तेथील जनराळास मिस्तर कीनवी दिलावरजंग यांचे पत्र यावें. सरकारातूनहीं पत्राविषयीं मदारुल माहाम यांस वीनंति केली" इत्यादिक तपशील, तुमचे लिहिल्या बमोजीब, मध्यस्तास सांगितला. यांनीं उत्तर केलें कीं:-" कीनवी दिलावरजंग हैदराबादेहून येथें अद्याप आले नाहींत; आल्यानंतर पत्राविषयीं त्यांस सांगू." याप्रा॥ यांचे बोलण्यांत आलें रा॥ छे. २८ सवाल हे विनंति.

श्री.

(शके १७१५ वैशाख वद्य ११ मंगळवार.)

पुं॥. राजश्री गोविंदराव स्वामींचे सेवेसी. विनंति उपरि. औरंगाबादेस तनख्याचे वसुलाकरितां कारकुन गेला. त्याचें पत्र सरकारांत आलें. त्याची नकल पाठविली. त्यावरून मौ॥ र समजला. छ २२ शवालीं मध्यस्तासी बोलण्यांत आलें व सखो सिवाजी कारकुन तनख्याचे वसुलास औरंगाबाद येथें गेला. त्याचे पत्राची नकलच वाचून दाखविली. फकरुदौला व अजीमुदौला दोघांकडून तनख्याचे ऐवजांस दिलातिचें बोलणें हें मध्यस्ताचे ध्यानांत आणोन दिल्हें. मध्यस्त बोलले कीं:-" सुभेदाराचे घालमेलीमुळें ऐवजास दिवसगत लागली. याउपरी कांहीं ऐवज जगधन याचे दुकानीहून व कांहीं अजीमुदौलाकडून फडच्या करावितों." परंतु "एकंदर तनखा ऐवजाच्या येथून पेशजी केल्या त्याप्रों अहसनुदौला व कृपावंत यांचे विद्यमानें वसुल पावला असेल तो वजा जातां ततीमा ऐवज काय राहिला हें

१ छ-चंद्र क्षणजे मुसलमानी तीथ. ही १५ पर्यंत शुक्ल पक्षाची व पुढें कृष्णपक्षाची समजावी. २ पुरवणी. ३ मजकूर.

समजलें पाहीजे. त्यास, ऐवज आला किती व येणें किती याचा चौकसी करुन मागाहून लिहितों " ऐसें तुह्मीं लिहिलें. त्यास, बाकी ऐवज तनखा प्रों वसुल पावला तो वजा जाऊन, किती येणें त्याचा ताा लवकर लेहून पाठवावा. त्या प्रों मध्यस्तासी बोलोन जगधनाचे दुकानावर व अजीमुदौला यांस निक्षूण पत्रें घेऊन पाठविण्यांत येतील– उत्तर सत्वर यावें. रा॥ छ. २४ सवाल हे विनंति.

श्री.

(शके १७१५ वैशाख वद्य ११ मंगळवार.)

विनंति उपरि.

१ "शमषुल उमरा बहादुर यांचे पादीकारितां ममईचा जिन्नस खरिदी करविला. याजकरितां पंधरा हजारांची हुंडी त्यांजकडील पाठवावी " ऐसें लिहिलें त्या प्रें॥ अजमसाहेब यांसी बोलगें जालें. यांचें म्हणणें कीं " ममईचा जिन्नस पांच सात हजारांचा खरिदी करविला. पंधरा हजार कशावरून गोविंदराव यांनीं लिहिलें?" त्यास, पांचसात हजाराचा यांनीं आणविल्या प्रों जिन्नस खरीद व्हावा. पंधरा हजारांचें प्रयोजन नाहीं. अधिक खरिदी करूं नये. याचे ऐवजाची हुंडी यांजपासोन घेऊन येकादो दिवसीं रवाना होईल.

१ "मोहराचे खरिदीच्या ऐवजाची हुंडी लौकर यावी; " म्हणोन लि'॥. त्यास, येकादो दीवसांत हुंडी रवाना होईल.

२ दोन कलमें. रा॥ छ. २४ सवाल हे विनंति.

छ. ३० रोजी रवाना टपा.

श्री.

मिती शके १७१५ ज्येष्ट शुद्ध २ सोमवार.

राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी,

विनंति उपरि. तुम्हांकडील पत्रें छ. १६ व छ. १८ स्वानगीचीं छ. २१

१ लिहिलें.

व छ. २३ शवालीं पावलीं. यांजपैकीं कांहीं उत्तरें पहिलीं पाठविलीं. बाकीचीं तयार जालीं. एकादो दिवसांत रवाना होतील. सांप्रत इकडील सविस्तर मा।र मध्यस्तासी बोलणें जालें. याजवर बाबाराव आम्हांकडे आले. याचा ता।. राजश्री नाना यांचे पत्रीं लिहिलें आहे, त्यावरून कळेल. पेशजी इकडून रवानग्या जाल्या त्यांसहित येकंदर पत्रांचीं उत्तरें व तिकडील वर्तमान विस्तारें लेहून पाठवावें. तुमचे पत्राचे जाब उदईक रवाना होतील. रा।। छ. ३० सवाल हे विनंति.

मोहे जिल्काद उर्फ जेष्ठमास छ. २ रोज मंगळवारीं पत्रें डांकेवर रवाना.

श्री.

राजश्री गोविंदराव स्वामिचे सेवसि,

विनंति उपरि. तुमचीं पत्रें छ. १६ शवालचीं येथें छ २१ मिनहूस पावलीं. यांचीं उत्तरें कांहीं यापूर्वी रा।। केलीं. बाकी राहिलीं तीं सांप्रत पा।। आहेत. दुसरीं तुह्मांकडोन रवानगी छ. २९ शवालचीं पत्रें छ. २३ रोजीं पावलीं. त्याचीही उत्तरें हलीं पा।। आहेत. त्यावरून सविस्तर मा।र कळेल. पहिल्या रवानग्या पत्रांच्या येथून फार झाल्या. कितेक मा।रांचीं उत्तरें येणें आहेत. तीं व तिकडील वर्तमान पैहाम लिहून पा।। जावें. रा।। छ. २ माहे जिल्काद. हे विनंति.

श्री.

(शके १७१५ वैशाख वद्य ११ मंगळवार.)

विनंति उपरि. " लार्ड कार्नवालिस याजकडून तहनाम्याची याद नबाबाकडे आली. त्या यादीची नकल येथून छ. ३० साबानीं तुह्मांकडे रवाना केली. ती नकल त्या रवानगिचे पत्रांत पाठविली ऐसें लिहिलें. परंतु नकल आली नाहीं. याचा शोध तेथें पहावा. हलीं दुसरी नकल पाठविली ते

१ ह्या दिवशी जेजीवरून ज्येष्ठ शुद्ध ४ बुधवार शक १७१५ ही मिती येते वाराचा फरक होतो. तो मुसलमानी व आपली पद्धति भिन्न असल्यामुळें होय.

२ पाठविलीं. ३ पाठवीत.

पावली. राजश्री नानांनी पाहिली. या उपरी भवति न भवति करून उत्तरें, ठरेल त्या प्रा॥, पाठवीन." म्हणोन लि॥. त्यास छ. ३० साबानीं इकडून नकलसहित पत्राची रवानगी केली ऐसें असतां 'नकल आली नाहीं.' हें लिहिल्यावरून आश्चर्य झालें. येथें दफ्तरांत शोध बहुत करून पाहिला. परंतु रवानगीचे समयीं नकल केली ते येथें नाहीं, दुसरी नकल पाठविली ते येथें पोहचली. भवति न भवति जाली असेल. उत्तरें ठरल्या प्रा॥ सत्वर लेहून पाठवावें. त्या प्रा॥ मध्यस्तासी बोलण्यांत येईल. रा॥ छ.२ जिल्काद हे विनंति.

श्री.

(शके १७१५ वैशाख वद्य १९ मंगळवार.)

विनंति उपरि. मध्यस्ताचे पत्राचा जबाब, राजश्री नानाकडून छ १६ शवालचे रवानगींत पाठविला तो छ. २१ रोजीं पावला. मसविद्यावरून सविस्तर मा॥र ध्यानांत आला. पत्र मध्यस्तास जबाबाचें प्रविष्ट केलें. कळावें रा॥ छ. २ जिल्काद हे विनंति.

श्री.

(शके १७१५ वैशाख वद्य ११ मंगळवार.)

पु॥ राजश्री गोविंदराव स्वामिचे सेवेशि,

विनंति उपरि. "बनबरी वगैरे बंदोबस्तास बाजू राहून बलि हुसेन खां फौजसरंजाम समवेत जाणार. गजिंद्रगड · तालुक्याचाही बंदोबस्त करतील" याची इतला लिहिण्याविषयीं मध्यस्तांनीं सांगितल्याप्रा॥ पेशजी इकडून लिहिलें होतें. त्याचें उत्तर तुह्मांकडून आलें कीं:—"पापण्णापंत याचा कारकून पांच सहा महिने येथें आला आहे. राजश्री भाऊही होते. मोठे काजी याचे जलसे होऊन टिपु सुलतान यांचे तहप्रा॥ गांवखेडीं सोडून देविलीं; व तहपासोन वासलातिचा ऐवजही माघारा देविला. सनदापत्रें – कांहीं गुंता राहिला नाहीं. रामराव दोचौं दिवशीं जाणार." इत्यादिक लि॥ मध्यस्तास सांगितलें. संतोष पावोन बोलले कीं, "मोठी गोष्ट व चांगली ती जाली. इतका प्रकार तेथें जाला, परंतु रघो-

तमराव यांजकडून आह्मांकडे ये विषयींचा लेख अद्याप आला नाहीं. येईल." या प्र।। बोलणें झालें. रा।। छ. २ जिलकाद हे विनंति.

श्री.

(शके १७१५ वैशाख वद्य ११ मंगळवार.)

विनंति उपरि. "रोशनखानप्रकर्णीं त।। लिहिल्याप्र ।। राजश्री नाना यांजपाशीं पका निर्णय करून लिहितों" ह्मणोन लिहिलें. उत्तम आहे ! निर्णय होऊन लौकर त्याहावें. त्याप्रा।। यांसीं बोलण्यांत येईल. सैदमुमुजबरखान यांनीं धोंडो मोरेश्वर यांजला मध्यस्ताकडे पाठविलें. मा।।रानिलेनीं कचें पकें वास्तव्य मध्यस्तास येकांतीं समजाविलें. उदईक धोंडो मोरेश्वर यांस मागती रवाना करणार. पाहावें--कधीं कोठें जाणार ! रा।। छ० २ जिलकाद हे विनंति.

श्री.

(शके १७१५ वैशाख वद्य ११ मंगळवार)

विनंति उपरि. "वराडचे खुर्द्यामुळें दोन्ही सरकारचें नुकसान. याचा नक्षा ठराऊन सांगतों. याप्रा। पेशजी मध्यस्तानीं सांगितल्या अन्वयें इकडून लिहिलें होतें. त्यास खर्चाचें लौकर त्याहावें. मार्गाचे रितीनें उमरखेडचा बंदोबस्त मदारुल्महाम करतील." हें तुह्मी लिहिल्या प्रा।। मध्यस्तास सांगितलें यांनीं तिकडील प्रांतीं, खुर्दा, कोणते माहलीं कसी चाल? याचे पैसे, अबेले, पाठऊन देण्याकारितां सैदमुजबरखान यांस लिहिल्यावरून त्यांनीं वसमत, माहूर, वासीम, परवाणि, हाटें? उमरखेड--वरांडी--इत्यादिक महालचे पैसे मासल्याकरितां पाठविले. ते पुण्याकडे रवाना कर्ण्याकरितां मध्यस्तांनी आम्हाकडे पाठविले व तमाम प्रांतीं अमुक माशांचा पैसा चालावा हा नक्षाही ठरविला. याच्या यादीही यानीं तयार करविल्या प्रा। देणार. ते घेऊन मागाहून रवाना करण्यांत येईल. रा।। छ० २ माहे जिलकाद हे विनंति.

श्री

(शके १७१५ वैशाख वद्य ११ मंगळवार)

विनंति उपरि. वाबले प्रकर्णी वगैरे मा।र पेशजी मध्यस्तासी बोलण्यांत

१ मजार २ वऱ्हाडांतील.

आल्याचें यांपूर्वी लि॥ आहे. छ. २३ रोजीं मध्यस्तासमीप रावरंभा असतां बाबले संबंधी पाटिलबावा व कल्याणराव यांस आपलीं व बाबाराव यांचीं पत्रें देवावीं या प्र॥ बोलण्यांत आलें. त्यांनीं रावरंभा यांस विचारलें. हे बोलले "कीं बाबले पानगलीं आले तेव्हां बाजीद होऊन 'तीस हजार द्यावे म्हणजे फारकत देतों' ऐसें बोलत असतां ते समई फडच्या न केला हें बजाजी पंतास पुसावें." बजाजीपंत बोलले "पंचवीस हजार, आह्मी बाबल्यास घ्या म्हणत होतों. बाबल्याचे म्हणणें 'तीस हजार द्यावे' या प्र॥ होतें." रावरंभा बोलले:—"मागें असा सोयेवार फडचा होत असतां तो राहून हलीं पंचवीस हजार तूर्त द्यावे, फडच्या पुढेंच; तेव्हां ऐवज तरी बाबल्यास किती म्हणून द्यावा?" आह्मीं बोललों—"याचा जाबसाल पाटीलबावापासी पडला. बाबाराव यांचे विद्यमानेंच ठराव झाला. त्यांस विचारावें." त्यावरून, बाबाराव तर दरबारीं नव्हते, हरराव यांस मध्यस्तांनीं विचारलें. "जो फडच्या पंचवीस हजारावर पानगलीं होत होता तो आतां बाबल्या पंचवीस उगेच घेऊन, पुढें पन्नास हजार यावे, पाउण लाख द्यावे हें बोलतो ह्याचें काय"? हरराव बोलले. "बाबले कजिंदलाल कोणाचे ऐकावयाजोगे नाहींत." मध्यस्तास म्हटलें "आपण येविषयीं पाटीलबावा, कल्याणराव यांस पत्रें द्यावीं." त्यांचे बोलणे "कल्याणराव यांस पत्र देतों, पाटीलबावास देत नाहीं. कारण कीं बीडचें कजीये हजारों पडतील; त्याच्या भीड्या घालतील; यास्तव त्यांस पत्र लिहित नाहीं. बाबाराव यांनीं राव सिंदे कल्याणराव व आबा चिटणीस याजला पत्रें लेहून द्यावीं" या प्र॥ हरराव यांस ताकीद केली. 'आपलेंही पत्र कल्याणराव यांस देतों' या प्र॥ बोलले. पत्रें आल्यानंतर रवाना होतील बाबले यांचीं पत्रें रावरंभा यांस आलीं. त्यांत 'कारभारी याकडोन फडच्या होत नाहीं' हा गिल्ला करून लिहिलें: पत्रें रावरंभा यांनीं आह्मांस दाखविलीं. सारांश रावरंभाचे दौलतीस चांगलें पडावें म्हणोन केलें. तत्रापि असें पडून त्याचे गांवीं कांहीं नाहीं; या प्र॥ होतें. मुपुटराव बाबले यांनीं आल्या हजारांचे

रोख्याकरितां वसिलेदाराकडून मसाद्याबाबत ऐवज येणें येविषयीं बाबल्यांनी आह्मांस पत्रें व याद पाठविली. सरकारचें पत्र मध्यस्तास आलें व हरि नारायेण यांस बाबल्यांनीं लिहिलें आहे तीं पत्रें मध्यस्तास पावतीं झाल्यावर ठरेल त्या प्रां॥ लिहिण्यांत येईल. रा॥ छ० २ जिलकाद हे विनंति.

श्री.

पु॥. राजश्री गोविंदराव स्वामींचे सेवेसीं.

विनंति उपरि. 'बाबले प्रकर्णीं पत्रें तुह्मीं पाठविण्याचा ता॥ पेशजीं लिहिला होता. त्याप्रा॥ मध्यस्तासी बोलणें जालें' इत्यादिक पेशजी लिहिल्यावरून कळलें असेल. मध्यस्तांनीं बाबाराव यांस पत्रें देण्याची ताकीद केल्यावरून बाबाराव यांनीं पत्रें आपलीं दिल्हीं तीं रा॥ केलीं आहेत वि॥.

१ पाटीलबावांस.

१ आबा चिटणिस.

१ कल्याणराव.

१ हरि नारायेण यांचे पत्राचें उत्तर.

४

येकूण चार पत्रें खुलीं बेगोदे[1] पा॥ आहेत. प्रयोजन असल्यास देऊन, बंदोबस्त करणें तसा करुन घ्यावा. मध्यस्तांनीं 'आपलें पत्र कल्याणराव यांस देतों' ह्मणोन बोलले. पत्र आलें ह्मणजे रवाना करूं. पाटीलबावांस मध्यस्त आपलें पत्र देत नाहींत. याचा ता॥ अलाहिदा त्यांचे बोलल्या प्रा॥ लिहिल्यावरून कळेल. रा॥ छ० २ जिलकाद हे विनंति

श्री

पु॥. राजश्री गोविंदराव स्वामींचे सेवेसी.

विनंति उपरि "बजाजीपंत व बक्षी व जामदार यांजला दफ्तराचा

१ वितपर्यंत-खालीं केलेल्या खुलाशाप्रमाणें.

२ गोदें-डिंक लावल्याशिवाय.

तगादा रावरंभा यांनी केला हें मध्यस्तासी आमचें बोलणें झालें; दर्याफ्त होणार" इत्यादिक पेशजी लिहीण्यांत आलेंच आहे. छ. २२ सवालीं दोन प्रहरास मध्यस्तांनीं जलसा केला. रावरंभा आले; बाबाराव व हरराव यांजलाही बोलाऊन आणिलें. बजाजीपंत, बक्षी, जामदार आणून दफ्तरा-विषयींची भवति न भवति जाली. मध्यस्तांनीं आम्हांकडे येण्याविषयीं सांगोन पाठविलें. त्यास, अस्तमानीं सांवतखान यांस घेऊन जाण्याचें, सबब दोन-प्रहरीं जावयास अवकाश न जाला. दुसरा चोपदार आला कीं 'आपल्याकडून कोणास पाठवावें.' त्यावरून माधवराव यांस पाठविलें. आडीच प्रहरपर्यंत जलसा जाला. 'उदईक याच समयीं निर्णय सांगतों' याप्र॥ सांगोन, ते दिवशीं इतकें जालें. अस्तमानीं आह्मीं गेलों तेव्हां जाला म॥र मध्यस्तांनीं सांगितला. 'उदईक जलसा आणिक होणार' याप्र॥ बोलले. त्यावरून छ. २३ रोजीं मध्यस्ताकडे अगोदर रावरंभा, बजाजीपंत वगैरे गेले. दोनप्रहरां आह्मीही गेलों. बक्षीचे हतची एकंदर याद दफ्तराची पाहावी ह्मणोन मध्यस्तांनीं दिल्ही. त्यांत कितेक दफ्तरें सरबमोहर[1]; व कितेक बेमोहरेची[2] याप्र॥ लिहिलीं,—त्यांतच बीबीकडील दफ्तर लिहिलें आहे. बक्षीचें ह्मणणें—"बजाजीपंत दफ्तरें सांगत गेले, मी लिहीत गेलों. जामदारानें उचलोन ठेविलीं". मध्यस्त आह्मांस विचारूं लागले—'ह्याचें कसें?' आह्मीं उत्तर केलें 'ज्याचे जिमेस त्यानें द्यावें.' रावरंभा यांचें ह्मणणें 'दफ्तर लाल छींटाचें.' बक्षी, बजाजीपंताचे बोलण्यांत 'पांढरे रुमालाचें'; जामदारास फुरसीस केली, त्यांचें ह्मणणें 'वरता सफेत रुमाल आंत छीटाचें लाल.' याजवर मध्यस्तांनीं तर्क केला कीं:—दफ्तर कोठें गेलें नाहीं त्यांतच आहे. रावरंभा यांनीं पाहतां 'लाल छीटाचें नाहीं, वरतें सफेत कपडा आहे, ह्मणोन सांपडलें नाहीं' ऐसें त्यांचें ह्मणणें. यांनीं कांहीं दफ्तर सोडून पाहिलें नाहीं. त्यापक्षीं तेथेंच आहे. मोहराचीं दफ्तरें तितकीं आणावीं

१ सरबमोहर—सही शिक्का यथास्थित असलेला.

२ बेमोहरेचीं—मोहरच नाहीं अशीं.

म्हणजे तें दफ्तर सांपडतें. याजवर आह्मी बोललों कीं 'अगर तें दफ्तर तेथें न सांपडल्यास जिमा कोणाचा?' मध्यस्त बोलले 'यादी बमोजीब एकंदर दफ्तरें जामदाराचे स्वाधीन मोजून केलीं; यांत उणें आल्यास जामदारानें द्यावें, या प्रा। भवति न भवति होऊन 'दफ्तराचे शोधाकरितां बक्षी व बजाजीपंत व जमादार यांनीं हैदराबादेस जावें' याप्रा। मध्यस्त बोलले. आह्मीं उत्तर केलें "यांनीं जाण्याचें काय कारण? जामदारांनीं जावें.' मध्यस्तांनीं सांगितलें "मुजाका नाहीं. नोकर आहेत, त्यापक्षीं जावें व जामदारास दफ्तरें कोणतीं हें समजणार नाहीं यास्तव यांणीं जाऊन सरबमोहर दफ्तरें येथें आणावीं. खोलणें तीं येथें खोलावयास येतील." याप्रा। ठरलें. बजाजीपंत वगैरे चौघे शहरास जाणार. कचें समजावें सबब लि।। असे. बजाजीपंत वगैरे शहरास दफ्तरें आणावयास गेले. आज उद्यां येतील. रा। छ. २ जिल्काद हे विनंति.

श्री.

पु।। राजेश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

विनंति उपरि. रावरंभा यांनीं मध्यस्तास समजाविलें कीं "तालुकियाचे कारभाराशिवाय माझा ऐवज साडेसोळा हजार येणें त्या ऐवजीं हरिपंत याजवर वराती मीं केल्या असतां त्यांनीं वराता माघारा दिल्या. तो ऐवज देवावा" त्यावरून मध्यस्त आह्मासी बोलले कीं "वराता यांनीं आपले शिवाय ऐवजीं केल्या त्या माघाऱ्या देण्याचीं सबब काय"? आह्मीं उत्तर केलें "याचें कारण समजण्यांत आलें नाहीं" मध्यस्तांनीं यादबाजीनीं त्यांजपासीं पारसी करून दिली होती ते दाखविली आणि बोलले कीं "या पारसी यादीची हिंदवी करून गोविंदराव यांजकडे पाठवावी आणि त्यांस लिहावें कीं हा ऐवज यांस येण्याचा असतां वराता माघाऱ्या दिल्या; सबब काय? ऐवज यांचा पावता व्हावा." ह्मणोन सांगितलें त्यावरून पारसी यादीची हिंदवी पा। आहे. 'रकमा मनन कराव्या, सदर ऐवज नगदी द्यावा' ऐसें यांचें

१ हैदी चिट्ठी.

बोलणें आहे. मुपीरुल्मुलुकही बोलले कीं 'करारामदाराशिवाय यांचा ऐवज; यास हरिपंत यांनीं दिलात घालणें ठीक नाहीं. हा ऐवज यांजकडील अनामत यांस पाठवावा.' याचें उत्तर लवकर यावें र ॥ छ २ जिल्काद हे विनंति.

श्री.

यादी जमाखर्च आमदनी देहात वगैरे.

एकंदर रुपये.

१६५००

तपशील—

१०००० बाबत आमदनी देहात.

४००० मौजे देवलाली.

४००० मौजे जांतेगांव उंमरगांव.

२००० मौजे जवळें तीजपामजीं?

१००००

६५०० सीवाय कलमें.

६००० रंगराव दिवाण.

५०० आहमद साहेब निंबाळकर.

६५००

१६५००

यास वराता बदल. रुपये

४००० कुबेरचंद मोदी.

३००० जाघव मारवाडी.

३००० रायेचंद मारवाडी.

३००० साहेबखान आफखान.

२००० ग्यानचंद मारवाडी.
८०० आंदाप्पा कोरपे.
५०० सलमखान.
२०० सुभाना माहर.

१६५००

सोळा हजार पांचशांच्या बराता केल्या होत्या. त्या माघाऱ्या फिरल्या. सबब ऐवज द्यावा, या प्रा॥ रावरंभा यांचें बोलणें.

श्री.

विनंति उपरि. " सुरापुरकराकडील करार जाल्यांत तथा नाहीं. वागवून घेणें. मंत्रीकडे व्यत्यास पडूं नये. ऐवजही येतो. व्यंकटराव उण्यावर असतील त्यास जपावें. गोपाळ आपा त्यांचे त्यांजकडे पाठवावा." इत्यादिक लिहिलें. त्यास सुरापूरकराकडील मजकूर मंत्रीसी बोलण्यांत आला. यांचें बोलणें कीं—" एक महिन्याचा करार असतां, आपण या कामाचे दरमीयान, बदल खातर आपली, ह्मणोन आठ महिने सबुरी केली. शेवटीं पैशास ठिकाण नाहीं. कितीही दिवस वाट पाहिली. तत्रापि शेवटीं हेंच. याजकारितां सुरापुरकरास एक वेळ थोडीशी चमक दाखविल्याशिवाय त्यांचे डोळे उघडत नाहींत. हें पक्कें समजलें. यास्तव हा उद्योग याजवर करणें जरूर. शेवटीं समेट करणें तो आपले विचाराशिवाय होणार नाहीं. परंतु कांहीं त्यांजला समजूं द्यावें " या प्रा॥ बोलले. आह्मीं यांचीं उत्तरें केलीं कीं ' करार बमोजीब ऐवज सुरापुरकराकडून येईल. परंतु आपण वागवून घेतलें पाहिजे.' मंत्रीचें बोलणें " आणीक किती वागवावें? येक महिन्याचे आठ महीने झालें. अद्याप प्रथम दिवस. वागविण्याची रीत अशीच असते कीं काय? हें आपणच सांगावें " याजवर बोलणें फार जालें. गोपाळ आपाचा मा॥र यांसी बोलावा तर यांचे ऐवजास ठिकाण नाहीं यामुळें यांची मर्जी नाईकावर खपा. त्यांत गोपाळ आपाचा मा॥र बोलल्यास

रुचणार नाहीं हें समजोन तूर्त गोपाळ आपाचा जाबसाल बोलण्यांत आला नाहीं. दोन लक्ष रुपये तूर्त पाठविणार. त्यांत लाख पुण्याकडून व लाख परभारा येथें पाठवावे. ऐसा बेत. परंतु तोही ऐवज नाहीं. पुण्याकडून येणें त्याची अवस्था तसी. येथें येणें तो अद्याप पैसा नाहीं. मंत्रीसी भिडेनें सुरापुरकराविषयीं किती बोलणें आंगेजीचें होतें? हें त्याचे गांवीं नाहीं. त्यापक्षीं यांचे येहसान अंगावर घेऊन त्यांजकडून काहींच अमलांत न यावें. याप्र॥ कोठ पावेतों दिवसगत करावी? हें कांहीं चांगलें नाहीं. यास्तव इकडूनही सुरापुरकरास बहुत कांहीं लिहिण्यांत आलें. तुह्मींही हे सर्व प्रकार लेहून ऐवजाची तोडजोड आठ पंधरा दिवसात होत असल्यास त्याहावें. तो प्रकार त्यांजकडून घडणें असाध्य. ऐसें असतां मंत्रीसी बोसणें तसें अंग टाकून बोलतां येईल. यांची नजर तूर्त त्यांजवर वांकडे चालीची दिसती. ऐवजाची सरबराई होऊन आल्यास बोलूनच फेदफे करण्याची शकल ठरवितां येईल. नाहीं तर केलें कर्तव्य व्यर्थ होऊन बखेडा पडतो. हें मनन करून त्यांजकडे लिहिणें ते ल्याहावें व इकडे खुलासा उत्तर पाठवावें. त्याप्र॥ समजोन बोलतां येईल. सुरापुरकर यांचा प्रतरणेचा कारभार, बोलावें त्याप्र॥, कांहींच अमलांत येत नाहीं. लबाड कारभार त्यांत हर्फ येण्याचा प्रकार. याजकरितां बेजार जालों. कृष्णाजीपंत तुह्मांपासीं बजावून गोष्टी सांगतात, तितकेंच! परिणाम सुधा नाहीं. पार पडणें ईश्वराधीन आहे! र॥ छ० २ जिल्काद हे विनंति.

२९

श्री.

विनंति उपरि.

येथून छ. २२ रमजानापासोन छ. ८ माहे हावाल पावेतों पत्राच्या रवानग्या सात केल्या. तीं पत्रें पावल्याचा ता॥ तारीखवार लि॥ तो समजला

पाटील बावा कूच करून वानवडीवर आले. नदीकडील जमीन काळवट, दिवस पर्जन्याचे; हें कारण लिहील्यावरून समजलें. कलम— १

"राजश्री नानास पत्रें अपार्ली येतात; ते जाबाकरितां मजपासीं देतात. मला समाधान नाहीं. सबब जाब तटले. बोभाट लेहूं नये." ह्मणोन लिा. त्यास तुमची प्रकृत स्वस्थ जाली असेल. नानाकडील पत्राचे जाब फार येणें ते तयार करून लौकर पाठवावे. वरचेवर जाब येण्यास आळस करूं नये. कलम-- १

रामचंद्र दादो यांचे दोन लखोटे त्यांचे चिरंजीव माधवराव यांस पावते झाले. कलम— १

"सावकार, सराफ, मातबरांनीं हात आटपले. तमाम लोकांची दिवाळी निघतात." ह्मणोन लि॥. त्यास पुण्यांत साहुकाराची आसी अवस्था हे गोष्ट कठीण ! येथील ही साहुकारांत हुंडीपांडी करण्याची दिकत फार तूर्त आहे. कलम-- १

"बावड्याहून ताईबाईकडून हरिकाळा आला. मिरज प्रांतीं वगैरे पाऊस दोन तीन जाले. पुण्याकडे पर्जन्य नाहीं." ह्मणोन लि॥ त्यास मृग नक्षत्राचे पाऊस कांहीं जाले न जाले? धारण कसी? हें त्याहावें. इकडेही पर्जन्य जाले. कलम— १

"गंगाधरराव रास्ते यांस वेड लागलें, रामचंद्रराव वारले; बाळाजीपंत ढेकण्यांचा काळ झाला; लक्ष्मणराव व्यथिस्त, उदास, काशिस जाणार, तुला केली;" इत्यादिक लि॥ तें समजलें. ईश्वरी इच्छा! कलम— १

२६

"दत्तपुत्र केडगांवकराचा घेणार, बापु व बावा दोन्हीकडील संधान राहून त्रितियपंथ करणार," हे लिहिल्यावरून कळलें. दत्तकपुत्र कोणता घेतला? सरकारांतून ठराव कसा जाला? हें कचें त्याहावें' कलम— १

"मारडकर घाईस आले; मी व आपाजी बाबाजी कांहीं मदत करून पाहातों" ह्मणोन लि॥. त्यास देश, काल, समय येक प्रकारचा. यास्तव

मदत करणें तें बहुत समजोन पाहून करावी. पेंच न पडे ऐसें जाल्यास करावें. कलम-- १

श्री.

विनंति उपरि. राजश्री कल्याणराव कवडे छ. १४ शवालीं राजश्री नानाकडे आले. आपले खासगत कामाची विनंति करून 'नवाबाकडील कामें उगवावीं, मध्यस्तासी स्वच्छता असावी, हें काम मला सांगून पहावें' इत्यादिक बोलण्यावर उत्तर जालें--कामें उगवल्यावर काय गुंता? इतकें जालें आसतां बाहेर लोकापासीं जसा स्वभाव त्याप्रमाणें बोलणें. त्याच अन्वयें इकडे मध्यस्ताकडेंही बजाऊन पत्रें आलीं. हा म॥र मध्यस्तांनीं आह्मांसीं बोलण्यांत आणिला. याचीं उत्तरें प्रत्युत्तरें, प्रथम मध्यस्त आह्मीच, मागाहून बाबाराव यांस बोलाऊन घेऊन, बोलणें जालें याचा कचा त॥ 'बाबाराव आह्मांकडे आले' इत्यादिक राजश्री नाना यांचे पत्रीं लिहिल्यावरून कळेल. सारांश ज्याचा जो स्वाभाविक धर्म त्यांनीं त्या प्रे॥च करावें हा त्यांचा मार्ग. समजणारास सर्व समजतें. तुम्हांपासीं कल्याणराव येऊन बोलले त्याचाही म॥र समजला. या प्रकर्णीं राजश्री नानास पत्रें लिहिलीं त्याचीं उत्तरें लौकर यावीं. रा॥ छ० २ जिलकाद हे विनंति.

श्री.

विनंति उपरि; "होळकराकडील बापूजी होळकर व कासीराव यांच्या व सिंद्याकडील गोपाळराव यांच्या परस्परें भेटी जाल्या; कलह राहीला." ह्मणोन लि॥, तें कळलें. त्यास, मल्हारराव-तुकोजी बाबाचे पुत्र-मागाहून गेल्यावर मागतीं त्यांनीं कलहास आरंभ केला, ऐसें ऐकण्यांत. तर वास्तव्य त्यांहावें. रा॥ छ २ जिलकाद हे विनंति.

श्री.

विनंति उपरि. छ. १३ शवालचीं आह्मांकडील पत्रें पावल्यांचा दाखला छ. १६ मिनहुचे स्वानगींत तुह्मीं लिहिल्यावरून कळला. कलम-- १

" राजश्री पाटील बावांस समाधान नाहीं, सीतज्वर येतो, राजश्री नाना

व तात्या समाचारास गेले होते; त्यांचे स्त्रीसही समाधान नाहीं. " ह्मणोन लि॥, तें कळलें. पाटील बावांस अलीकडे समाधान कसें ? हें ल्याहावें कलम– १

" गोविंदराव गायकवाड यांस सरकारांतून वस्त्रें दिल्हीं; परंतु सरंजामी होऊन जाणें होत नाहीं; मानाजी गायकवाड बडोद्यांत हुशारीनें राहून सरकार नजरेचें संधान लाविलें " हा त॥ समजला. सरकारांतून दोघांतून कोण ठरेल हें ल्याहावें. कलम–– १

" श्रीमंतांची स्वारी हाथी व वाघाची लढाई पाहावयाकरितां छ. १७ रोजीं गेली, " हें लिहिल्यावरून समजलें. अलीकडे नवल विशेष ल्याहावें. कलम–१

" राजश्री परशरामपंत भाऊ तासगांवास गेले, मुंज जाली, सांवताचे कामाकरितां करवीरास जाणार, सरंजाम करितात, सरकारांतून तोफा खाना होणार. " ह्मणोन लि॥. त्यास सरकारांतून भाऊकडे तोफा किती गेल्या ? भाऊ आद्याप तासगांवींच आहेत ? किंवा करवीराकडे ? हें वर्तमान आलें असल्यास ल्याहावें. सांवताकडून बोलणार सरकारांत येणार. जें ठरेल तें लेहून कळवावें. कलम–– १

सागवानी लांकडाचा व बंदुखाचा म॥र. लिहिला. त्यास यापूर्वी येथून त॥ वार लि॥ आहे. त्यावरुन कळेल. कलम — १

कलमें सुमार साहा र॥ छ० २ जिलकाद हे विनंति.

श्री

विनंति उपरि.

१ " अजमसाहेब यांसि बोललों 'सध्या हुंड्या घेऊन पाठवाव्या.'

१९००० ममईचे खरेदीबदल.

३०००० मोहरा खरेदीबदल.

४९०००

पंचेचाळीस हजाराच्या हुंड्या सत्वर घेऊन पाठवाव्या. दिवसगत लागो नये" ह्मणोन लि॥ त्यास, ममईची खरिदी पंधार हजारांची करावयाची नाहीं. पांच सात हजारपर्यंत करणें ऐसें यांचें बोलणें. तेव्हां पांच सात हजार काय

देतील तो व मोहराबाबत तीस हजार सदरहूचे हुंडीविषयीं आह्मीं त्यांजकडे सांगून पाठविलें. त्यांस, "प्रस्तुत हुंडी होत नाहीं. पुण्याचे हुंडीचा भाव साहुकारांत सेंकडा साडेचार, पांच, साडेपांच, असा असोन हुंडी होत नाहीं. याजकरितां ऐवज आपल्यापाशीं देतों." याप्रा यांचें ह्मणणें. आमचें बोलणें कीं एथें ऐवज घेऊन खरेदीचे तेथें उपयोगी काय? अगर हुंडावनसुद्धां ऐवज दिल्हास हुंडी करितां येईल. त्यास हुंडावनसमेत ऐवज दिल्यास तुह्मांस लेहूं. ऐवजाचा भरणा कसा करतात त्याप्रा लेहूं. तोंपावेतों तुम्हीं तेथें खरिदी न करावी. यांजकडून ऐवज येण्यास दिवसगत लागल्यास ताण बसेल यास्तव लेहूं तेव्हां खरेदी करावी.

•१ "शमपुल उमरा यांचे पादीकारितां सरंजाम आणावयास श्रीरामास मुंबईस खाना केलें. मजपासीं तर ऐवज नाहीं. तेव्हां मानुरकर का॥ दार यांनीं एकोणीस हजार ऐवज भरला. त्यापैकीं बारा हजारांच्या हुंड्या करून श्रीरामासमागमें दिल्या" ह्मणोन तुह्मी लि॥ त्यास बारा हजारांचाहि जिन्नस खरीदी करूं नये. पांच निदान साहापावेतों खरीदी करावी. ह्मणोन आजमखां यांनीं सांगोन पाठ्यास मुजरद मनुष्याबराबर तुह्मीं श्रीरामास मुंबईस लेहून पाठवावें. १ "सिदी इमामखां यांचीं मोतीं खरीदी करणें. त्यास पुण्यांत माहाग; सबब मुंबईस खरीदी करविली" ह्मणोन लिहिल्या प्रा सिदी इमाम यांस सांगीतलें. 'उत्तम' ह्मणाले. परंतु फार दिवस जाले.

३

कलमें सुमार तीन रा छ. २ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ शु. ४ बुधवार शके १७१५.

विनंति उपरि.

१ राजश्री हरिपंत तात्या व आबा चिटणीस तात्याचे बागांत भोजनास गेले. तेथें खिलबत झालें. याचा ता॥ लिहिला व येथून तुह्मांस कुफिया लि-

हिलें होतें; त्याचीं उत्तरें तुम्हीं लिहिल्यावरून ध्यानांत आलें. त्यास तुमचे लिहिण्यावरून तर खचितसें वाटतें. जोंपर्यंत हिंदुस्थानांत गेले नाहींत, तोंपर्यंत आमची खातरजमा होत नाहीं.

१ बेदरच्या गोष्टीविषईं संज लि॥. येथें नाहीं. बलकी मागील फडचे व पुढें स्वच्छता व्हावी ऐसी कल्याणराव यांची आर्जू म्हणोन लिहिलें. त्यास ईश्वर असेंच करो!

१ साहासें चाळीस मोहरा खरीदी केल्या म्हणोन लि॥. त्यास तूर्त इतकेंच पुरें करावें. याचा ऐवज व आणखी खरीदीचे ऐवजाची तरतूद करूं तेव्हां खरीदी करावी.

३

कलमें सुमार तीन रा॥ छ २ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ शु. ४ बुधवार शके १७१५

विनंति उपरि. "पुण्यांत दुखण्याचा झपाटा भारी! सीतज्वरानें बहुत लोकांस हैराण करून पाडलें. कितेक जीवें गेले, कितेक दुखणाईत, कांहीं नव उमेदी, कितेक कुणकुणतात," त्याचा नांवनिसीवार ता॥ लिहिल्यावरून कळला. मोठा उपद्रव जाला! हल्लीं मृगसीतळाई पडल्यापासोन शम जाले असेल. तुमची प्रकृत आतां कसी आहे? निस्तोप आरोग्य जाल्याचें त्याहावें. या दिवसांत प्रकृतीस तुम्हीं फार सावधपणें जपून अवषधपथ्यास आळस न करितां प्रकृत नीट राखावी. चिरंजीव तात्यास मधुरा जाला होता. मोठी चिंता प्राप्त होती. श्रीकृपेनें आराम जाल्यावरून समाधान वाटलें. रा॥ छ २ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ शु. ४ बुधवार. शके १७१५

विनंति उपरि. साहुकाऱ्यांत येथें हुंड्यांचा भाव पुण्याचे हुंडीचा असा

जाला आहे कीं एकसें च्यार, साडेच्यार, पांच प्रा॥ येथें ऐवज घेऊन पुण्यांत हली सिक्याची शंभराची हुंडी करावी. याजकारितां साहुकार घरोघर फिरतात कीं 'पुण्याची हुंडी द्या.' परंतु मिळत नाहीं. असी चडचड हुंडीची जाली आहे. आह्मांकडें दाहा पांच जण आले. हुंड्या मागितल्या. दाहा वीस हजाराची हुंडी येथून केल्यास सांप्रत सोयही हुंडावन मिळावयाची चांगली. परंतु तुह्मीं पुण्यांतील साहुकारसराफांनीं हात आटोपिल्याचें लिहिल्यामुळें हुंडी न केली. 'हुंडी दहा पांच हजारांची करावी,' ऐसें तुमचें उत्तर आल्यास करूं. नाहीं तर प्रयोजन नाहीं. उत्तर लौकर यावें. हा भाव पुढें ठरतो याचा नेम नाहीं. तूर्तकाळीं मात्र भाव याप्रा॥ जाला आहे. र॥ छ २ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ शु. ४ बुधवार शके १७१५

विनंति उपरि. तेजवंत भारामल यांनीं सांगितलें कीं " खासगत आह्मांस मोतीं पुण्याहून आणावयाचीं; येविषई गोविंदराव यांस लेहून मोतीं आणवावीं. त्याचा ऐवज येथें देतों " त्यावरून मोत्यांचे किंमतीचा अजमास व सुमारी मोतीं वि. ॥

४०० कि॥ (किंमत) मोतीं, दाणें १००. दर ४ प्रा॥.
६०० कि ॥ दाणे १०० दर ६ प्रा॥
९०० कि॥ दाणे ९० दर १० प्रा॥

२९०

१९००

येकूण मोतीं सुमार आडीचशें, किमत दीड हजार. याशिवाय भावसिंग चौधरी जिनसीकडील यास जोडी नथेची--तीनसें, निदान च्यारसें, सेवटीं पांचसें पावेतों किंमतीची--उत्तम. या प्रा॥ सदरहू मोतीं खरीद करून पाठ-

वावीं. ह्मणजे ऐवज यांजपासोन येथें येतां येईल. रा॥ छ. २ जिलकाद हे विनंति.

छ ६ जिल्कादीं टप्यावर. स्वानगी पत्रें.

श्री.

ज्येष्ठ शु. ७ रविवार, शके १७१५

राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

विनंति उपरि. छ. २९ माहे शवालचीं तुह्मीं पत्रें पा॥ तीं छ ३० माहे मा॥रीं पावलीं. त्यांची उत्तरें—" श्रीमंतांस पत्र नबाबांनीं पा॥ होतें त्याचा जवाबाचा तरजुमा हिंदवी पाठविला. त्यास श्रीमंताचें उत्तर तयार करविलें. चिटणिसास मसविदा करून दिल्हा. पत्र होऊन आलें ह्मणजे रवाना करितों." ह्मणोन लि॥. त्यास, ज्या हेतूस्तव पत्र लिहिलें कीं श्रीमंतांकडून त्याचें उत्तर ज्यासमयीं यावें तेव्हां न आलें. नबाबाचे पत्राचा जाबही येथें येऊन पोंचला. तुह्माकडून मसविदाही आह्मास आला. आद्याप श्रीमंताचें उत्तर नाहीं. आतां जें उत्तर येणें तें, आह्मीं पत्र लिहिलें त्याचें उत्तर, कधींतरी आलें. इतकेंच फळ! रा॥ छ ६ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ शु. ७ रविवार शके १७१५

विनंति उपरि. नबाबांनीं श्रीमंतासी पत्र पाठविलें. त्याचे जबाबाचा मसविदा हिंदवी पाठविला. त्यांत परस्परें नोका लाऊन जबाब लिहिला. त्याचे कुन्हे ध्यानांत येण्याकारितां आलाहिदा पुरवणी तुह्मीं लिहिली. त्याप्रा। अक्षरशः मननांत आलें. हा मसविदा मध्यस्तास वाचून दाखवित्यांत त्यांजला कांहीं खुषी व्हावयाची नाहीं; हें समजोन त्यांस न दाखवितां मसविदा आपल्याजवळ ठेविला. पत्र जबाबाचें रघोतमराव यांजकडून आल्याचें वर्तमान समल्यावरून मध्यस्ताकडे कोन्हेरपंत यांस पाठवून त्यांजला विच्या-

रिलें कीं श्रीमंतांकडून हजरतीचे पत्राचा जबाब खाना जाला. ऐसें आह्माकडे लिहिलें आलें. त्यास पत्र आलें कीं नाहीं? उत्तर केलें कीं " पत्र आलें. परंतु अद्याप हजरतीस गुजराणिलें नाहीं. गुजराणिल्यानंतर पत्रांतील भाव काय याची इतला तुह्मांस होईल." याप्रा बोलले. रा॥ छ. ६ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ शु. ७ रविवार शके १७१५

विनंति उपरि. नबाबाचे पत्राचा जबाब श्रीमंताकडून रघोतमराव यांचे विद्यमानें यांजकडें आला. तो नबाबांनीं मध्यस्त समीप असतां वाचून पाहिला. छ. ५ जिल्कादीं मध्यस्ताकडे कोन्हेरपंतास पाठऊन विचारिलें कीं " श्रीमंतांकडलि जबाब आला तो हजरतींनीं पाहिला कीं नाहीं " मध्यस्त बोलले " मी जवळ असतां पत्र अक्षरशा हर्फबहर्फ पाहिलें. त्यावरून हजरतीची मर्जी बहुत खफा जाली; आणि बोलले कीं मागती याचा जबाब राव पंत प्रधान यांस मी लिहितों" याजवर मीं अर्ज केला कीं " पुन्हां या पत्राचा जबाब लिहिण्याचें कारण नाहीं, येकवेळ पत्र लिहिलें. त्याचा जबाल तिकडून या तऱ्हेचा आला. आतां पत्र लिहिल्यानंतर तिकडून जवाब काय येईल? तकरारीनें तकरार वाढेल. यांत फायदा नाहीं. सबब मागतीं पत्र लिहिण्याचें मवकुफ करविलें.', याप्रा मध्यस्त बोलले. रा॥ छ. ६ जिल्काद. हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ शु. ७ रविवार शके १७१५

विनंति उपरि. नबाबांनीं श्रीमंताकडील जबाब आला तो वाचून पाहते समई जवळ कोणी गृहस्थ होते. त्यांजला कोन्हेरपंत यांनीं पत्र वाचते समईचा प्रसंग विचारिल्यावरून त्यांनीं सांगितलें कीं " श्रीमंतांचें पत्र नबाब वाचीत होते, ते समई नबाब हास्यमुखें वाचून वरचेवर हांसून बोलत होते. त्यांत मध्यस्तांनीं अर्ज केला कीं ' पीर मुर्शद! या पत्राचा झाडून मजमुन हजरतके खतका जबाब लेकिन् गुलामके उपर सब मारका ' याप्रा मध्यस्त

अर्ज करित गेल्यानंतरही नबाब पत्रांतील मजमुन एक एक पाहून हांसत होते, याप्रा समीपचे गृहस्थाचे मुखें ऐकिलें. त्यावरुन लिहिलें असे. साराश मध्यस्तांनीं सांगितलें त्यांत 'पत्र वाचून हजरतीची मिजाज खफा;' दुसरे वर्तमान, तेंच समयींचे, दुसऱ्या

३५।३६

कडून अंतरंगींचें याप्रा; यावरून यांतील कयास कसा तो पाहावा. रा छ. ६ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ शु. ७ रविवार शके १७१५

विनंति उपरि. " ताटांत सांडलें काय? वाटींत सांडलें काय? पाटीलबावाही समंजस! दौलतीची काळजी सर्वांस आहे. दुसऱ्यांनीं तमाषे पहावें हें कोणास गोड वाटेल कीं काय? समजोन वहिवाट चालली" ह्मणोन लि॥. त्यास असेंच असावें हें चांगलें. हीच इच्छा आहे! कलम १ " करनुळकरांचें कसें ठरलें हें त्याहावें. दोहींकडे सिलसिला राखावा ह्मणोन लि॥." त्यास, इब्राहिमखां याचा कारभार करून मध्यस्तांनीं त्यांस पागदुरीं बसविलें. अलफखानाचें राजकारण पकें करून रणदुला येथें येणार. येथें आल्यावर कारभारही बोलण्यांत येईल. सध्याचा काल वाजबीवर नाहीं. जबरदस्त असेल त्याचा आहे. आह्मीं दों. हींकडे सिलसिला ठेविला. परंतु घडणार असेल तसे घडेल! कलम—— १

"लांकडाचे खरेदीस ऐवज द्यावयास तात्यास आपण लि॥. कीं 'एक लाख बत्तीस हजार जगधनास पावले. बाकी राहिला ऐवज तो आपण द्यावा.' त्यास, मी तो तात्यासी उत्तर केलें कीं कमकसर दीड लक्ष पावले असतील. त्यास ऐवज यापेक्षांही अधिक पावला असावा. आपण लिहिलें त्यांत थोडा. याचें कसें आहे तें त्याहवयास आज्ञा व्हावी" ह्मणोन ता॥ लिहिलें व त्याची याद पाठविल्यावरून समजलें. त्यास तुह्मास समजावयाजोगी याद तयार करविली आहे. एका दो दिवसांत रवाना करूं. त्या बराबरच्या पुरवणीचा जाब ता॥ वार लेहूं. ह्मणजे सर्व समजण्यांत येईल. कलम—— १

"मालीटाकडून याद आली. त्याविषयीं सलाह पाटीलबावांस पुसावी ऐसें ठरलें. त्यांचे येणें होऊन ठरेल तसें उत्तर लिहीन" ह्मणोन लि॥. त्यास लौकर उत्तर यावें. कलम— १

" नन्हुमलास तीन हजारांच्या हुंड्या दिल्या. याचा ऐवज देतों. याउपरि हुंडी होऊं नये. घासीमियांकडे माझा ऐवज येणें त्याची याद मागाहून पाठवितों" ह्मणोन लि॥. त्यास हुंडी इतक्यावर करीत नाहीं. परंतु तुमची याद लौकर यावी, ह्मणजे समजेल. कलम— १

"पालख्यांचे दोन सरंजाम पाठविले. याविषयीं बाळाजी हरि यांचे लिहिलें आलें. त्यास, येथून सांडणीस्वार पाठवून सरंजाम आणवितों. पसंद पडल्यास घेतील. नाहीं तर माघारा रवाना होईल. निदान—निदानची किंमत आज्ञा यावी" ह्मणोन लि॥. त्यास सरंजामाचे किमतीची याद पेशजी टप्यावर तुह्मांकडे पा॥ आहे. त्यांत निदान किमतच ठराऊन लिहिलें आहे. तेव्हढ्यावर ठरत असल्यास ठेवावा. नसल्यास माघारा रवाना करावा. कलम— १

"बालाघांट वगैरे बाबतीची मामलत बाळाजी महिपतरायाकडील याचा मा॥र व बाजी खंडेराव सरदेशमुख याचा ता॥ मागाहून समजोन उत्तर लिहिण्यांत येईल. कलम— १

"घासीमियांकडील तीन हत्ते जाले. त्यांत दोन तर आलेच असतील. पैकीं सखाराम अनंतास साडे सत्तावीस जातां बाकी ऐवज रदकर्जास पावल्यास व्याज कमी होतें. रदकर्जास ऐवज पावला नाहीं, तेव्हां काय व्यवस्था? याची समजूत पडत नाहीं." ह्मणून लि॥. त्यास, तुह्मीं लिहिल्याप्र॥ हत्ते आले असते तरी तुमचें लिहिणें नीटच. तीन हप्त्यांत एक तो ऐवज निमे आला. याचा ता॥ मागाहून लेहुं. तेव्हां समजूत पडेल. कलमें सुमार आठ. पा॥ छ. ६ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ शु. ७ रविवार शके १७१५

विनंति उपरि. " औरंगाबादचे तनख्या ब॥ वसूल किती व बाकी किती

याची याद पाठवितों " ह्मणोन लिहिलें. परंतु याद येत नाहीं. तुह्मांकडून याद येण्याचा उसीर. यास्तव याद लौकर यावी. कलम— १.

"करनुळकराकडें ऐवज फसला. येविषयीं स्वस्थ असो नये. तगाद्यास कोणी पाठवावें. भिंवरायास फजीत करून त्याहावें " ह्मणोन विस्तारें लिहिलें; तें कळलें. त्यास तगाद्यास पाठविणें अथवा भिंवरायास पत्र लिहिणें–दोहींतही फळ नाहीं. अलफखानास येविषयीं आह्मीं पत्र पाठविलें होतें. त्याचा जाब आला कीं रणदुलाखां बाहदुर तेथें येत आहेत. दरबारचा जाबसाल होऊन आपल्या तिही ऐवजाचें ते बोलतील. त्यास रणदुलाखानही लौकरच येणार आहेत. ते आल्यावर येविषयीं त्यांसि बोलणें होईल तें लिहून पाठवूं. कलम. १.

" बाळाजी रघुनाथ यांस दिवटी आबदागिरीची नेमणूक आहे. खिजमतगाराची नव्हती. त्यास याद पा॥ त्याजवर करार होउन यावा." ह्मणोन लि॥ त्यावरून यादीवर करार करून पा॥ आहे. कलम. १.

" बसमतचे ऐवजाचें अद्याप ठरलें नाहीं. निश्चय करून लिहितों. याचें कारण दरबारची गोष्ट आजची पंधरा दिवसांवर जाती " ह्मणोन लिहिलें. त्यास, यास उपाय तुमचा काय आहे ? परंतु कामाची खराबी ! कलम. १.

" रावरंभाकडील तालुक्यास तगई देणें वगैरेचे जाब हरिपंतास सांगून लिहविलें. मागाहून पाठवूं " ह्मणोन लि॥ उत्तम आहे. जाब लौकर यावे. कलम— १.

मारडकराचें दिवाळें वाजलें याचा ता॥ लिहिला तो कळला. कलम १.

दुखणीं होऊन माणसें फार मरतात याचा ता॥ लिहिला तो कळला. कलम— १.

मुकुंद जोशी याचे इनामाचे दुमोहरी विषयीं वारंवार सूचना तेथें होती. त्याचा बयान लिहिला तो सर्व कळला. कोन्हेरपंतास या उद्योगास लाविलें. परंतु तुह्मी मुकुंद जोशी याची दुमोहरी सनद इतकीच सूचना लिहीत असावी. कलम— १.

कलमें सुमार आठ रा॥ छ. ६ जिल्काद, हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ शु. ७ बुधवार शके ७११५.

यादी बाळाजी रघुनाथ यांजकडे आफ्तागिरा व मशालची याची तैनात सरकारांतून पावत आहे व खिजमतगार नि॥ आहे. त्यास तैनात पो॥ रोजमरा द्यावा लागतो. स॥ (सबब) महाराजांनीं कृपा करून खिजमतगाराची तैनात आवलसालापासून सरकारांतून करार करून देविली पाहिजे. तैनात दरमहा ५ पांच रुपये दरमहा येणेंप्रा॥ करार चाकरी बारमाही व कबज आकार याही शिरस्ते बमोजीब येणेंप्रा॥ करार.

छ. ६ माहे जिल्काद आर्बातीसईन सन फसली १२०३ मु॥ बेदर.

तैनातपैकीं रोजमरा दरमहा रुपये ४ चार एकमाही रोजमरा नेमणुक येणें प्रा॥ करार.

तेरीख आवलसालापासून छ. २५ शवाल आर्बा तीसैन मयां व अलफ येणेंप्रा॥ करार.

छ. १९ जिल्कादी रवाना पुण्यास टप्यावर.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

विनंति उपरि. तुह्मांकडून फार दिवस जाले, आलीकडे पत्र येऊन तिकडील वर्तमान कांहीं कळत नाहीं. त्यास, हे दिवस पत्रें वरचेवर येऊन समजावयाचे. अशा प्रसंगीं आळस होतो, हें चांगलें नाहीं. राजश्री नानाकडील पत्राचे जाब बहुत तटले. त्यांसुधा तुह्मी आपले पत्राची उत्तरें व वर्तमान पैहाम लेहून पाठवावें. अलीकडे प्रकृत कसी आहे? दरबारास जाणें येणें इत्यादिकचा तपसील ल्याहावा. इकडील वर्तमान, सिंदे, होळकर यांचे लढाई प्रकर्णी वगैरे नबाब व मध्यस्ताचे बोलण्यांत आल्या अन्वयें त॥ मा॥र राजश्री नाना यांचे पत्रीं लि॥ आहे त्यावरून कळेल. उत्तरें लवकर रवाना करावीं.

चार महिन्यापासून खासगत तुह्मांस पत्रें लिहिलीं. त्यांतील नुकते व चुटके उत्तरें यावयाजोगें बहुत लिहिण्यांत आलीं, परंतु बहुतां पत्रांचीं उत्तरें आलीं नाहींत. त्या गोष्टी मागती आठवत नाहींत. तुमचे विसरण्यांत आलें. अथवा आळसामुळें किंवा दुखण्याकारितां उत्तरें न आलीं. हें खरें. उत्तर पत्राचें न आलियावर चैन पडत नाहीं. समजण्यांत येत नाहीं. याविसीं वारंवार किति लिहावें? लिहितां थकलों. आतां ईश्वर तुह्मास प्रेरणा करील ती खरी. रा॥ छ. १९ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

पु॥ राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी. विनंति उपरि. राजश्री जीवनराव पांढरे समशेरबहादर येथें आले. भेट जाली. यांनीं आपलें वर्तमान सांगितलें. इतक्यांत तुम्हांकडील पत्रें आलीं कीं "राजश्री हणमंतराव सभापत यांचे विद्यमानें मा॥रनिलेकडून कर्जाबाबत वगैरे ऐवज येणें. याजकरितां सन १२०२ सालचे मोकाशाची मामलत त्यांजकडील आटकाऊन पांढरे मा॥रनिलेकडे मामलतीचा वसूल न जाय ऐसा, बंदोबस्त व्हावा" ह्मणोन लिहिलें व ऐवज येणें त्याची याद पाठविली यावरून समजलें. मा॥रनिलेसही बोलण्यांत आलें कीं "आमचे ऐवजाचा फडच्या जाल्यासिवाय मामलतीचा ऐवज तुम्हांकडे पावणार नाहीं." या प्र॥ बोलून सजावरुदौलाकडील आवराद निटूर दोनी माहालाचे मोकाशाचा ऐवज अनामत ठेवण्याविषई त्यास सांगोन बंदोबस्त केला. सिद्दी इमाम याजकडील बेदरचाही बंदोबस्त होत आहे. वसूल यापूर्वी हणमंतराव यांजकडे पावला. तो वजा जाऊन बाकी ऐवज अनामत राहील. कोटगीर, हुसें, पोतंगल घांसीमियाचे भरण्यांत सन १२०१ पावेतों आले. पुढें सन १२०२ सालचाही ऐवज बंद करविला. जीवनराव यांचें बोलणें कीं "आपले ऐवजास काय गुंता आहे? वाजवी हिसेबाचे रुईनें जो ऐवज असेल त्याचा फडच्या आपण ठराऊन देतील तसा करीन." आमचेंही बोलणें कीं "वाजवी ऐवज आमचा तोच

घेऊं. गैरवाजवी होणार नाहीं." या प्र॥ जालें. र॥ छ. १५ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

विनंति उपरि, जीवनराव पांढरे यांनीं एकान्ति घराऊ रीतीनें बोलण्यांत आणिलें कीं " पहिलेपासोन आपल्याशिवाय दुसरे कोणाचा आश्रय नाहीं. आणि आपल्यासी ई॥पासून माझी चाल कशी हें सर्व ध्यानांत असेल. पुढेंहि आपण सांगतील तशी वर्तणूक करीन. नेम करून देतील त्या प्र॥ राहीन. महालचा कारभारही सर्व आपल्याकडे ठेवून जशी नेमणूक होईल त्यांत तफावत न येतां चालेन. पेशजीं ऐवज आपल्याकडील घेतला, तो आदा केला किती ? ऐसें असोन मजकडून माहालासमंधीं जो ऐवज पावला तो गोविंदराव यांस पावला न पावला हेंहि कळेना. कारभारी यांचे हातीं मोहर देऊन मुखत्यारीचें काम सांगितलें त्यांची वर्तणूक व चाल कसी याचा बयानकारितां विस्तार ! गोविंदराव यांजकडें तरि ऐवज पावला असल्यास चिंता नाहीं. माझे उपयोगावर आहे. तें न होतां दरम्यान कळेल तसी धांदल केली आहे. दोन च्यार कलमांवरून प्रत्ययासही आलें. ई॥ पासोन त्यांजकडे हिसेब येणें हेंही केवळ माझ्यानें होतें असें नाहीं. आपले आश्रयावर होईल. आपला ऐवज एकंदर व्याजसुद्धां किती ? त्यांत वसूल पोहंचून बाकी निवळ किती राहिला याचे वास्तविक समजावें. फडच्या करून घ्यावा. आपले ऐवजास मजकडून कसूर सहसा व्हावयाचा नाहीं " या प्र॥ फार बोलले. आह्मींहि यांची खातर जमा करून सांगितलें कीं "जो ऐवज वाजवी असेल त्याचाच फडच्या करून घेऊं. कोणी गैरवाका समजाविल्यास ध्यानांत यावयाचें नाहीं. हिशेबाच्या कच्या यादी आहेत त्या गोविंदराव यांस लेहून आणवितों. " या प्र॥ सांगितलें. त्यास पांढरे यांजसमंधीं हिसेब वाजवी ऐवजाचे असतील त्या यादी कच्या पाठवाव्या. बाकी राहिले ऐवजांची तडजोड करून घेतां घेईल. यांचें बोलणें कीं " हणमंतराव यांनीं गैरवाका सम-

जाविल्यावरून गोविंदराव यांनीं याद पाठविली. त्यांत पसतीशाची रकम किता म्हणोन लिहिली. असा हिसेब येऊं नये. खरें असेल तें लिहिलें यावें. त्याप्रा॥ हजर आहे." याप्रा॥ बोलणें. त्यास हिसेबांच्या यादी जो ऐवज खर्चांत दिल्हा व व्याजसुधा हिसेब ठरला तो ता॥वार लौकर यावा. रा॥ छ. १५ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

विनंति उपरि. जीवनराव पांढरे यांनीं आपल्याकडील हिसेब आणिला. त्यांत हणमंतराव यांचे विद्यमानें माहाल समंधी वगैरे ऐवज बहुत पावला. यांचे हिसेबी फाजील निघते. तुह्मांकडून याद आली त्यांत बाकीचा ऐवज येणें. या हिसेबास व यादीस कांहींच मिळत नाहीं. यावरून हे याद हणमंतराव यांनीं सांगितल्याअन्वयें पाठविली ऐसें दिसोन आलें. त्यास पांढरे यांजकडे जो ऐवज हिसेब ठरून वाजवी निघाला त्याच्या कच्या यादी नकला आह्माकडे पाठवाव्या व जीवनराव यांजकडून फडच्या कसा करून घेणें. याचेंहि खोलून लिहावें. त्याप्रा॥ समजून होईल. आपले ऐवजास यांचें कांहीं वाकडेपणाचें नाहीं. त्यापक्षीं आपणही यांसि सरळपणें खरें तें समजाविल्यांत काय बाध आहे ? जीवनरावही थोर उमदा मनुष्य ! पहिलेपासोन याची चाल दुसरी नाहीं. पुढेंही "आज्ञेप्रा॥ सांगाल तसी वर्तणूक करीन" ऐसें निखालसतेचें बोलणें. त्याअर्थी त्याचा खुलासा घराउ लेहून पाठवावा. व यादी हिसेब लौकर यावे. रा॥ छ. १५ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार. शके १७१५

विनंति उपरि. जीवनराव पांढरे यांचे व कारभारी यांचे वांकडें आलें. त्यांनीं कांहीं विचार मागें पुढें न पाहतां मन माने तसी धूम केली आहे. इल्ली जीवनराव यांचे म्हणणें "आपले मांडीवर मान आहे." त्यापक्षीं अन्याय

व्हावा हें कांहीं चांगलें नाहीं. व त्या करण्यांत फायदा तरि कोणता ? वाजबी तेंच कां न घडावें. येविसीं तेथें तुह्मांस कदाचित रकारनामक यांची भीड पडत असेल. त्यास येविषीं मुरवत व भिडेचा संकोच पडल्यास आह्मांवर टाकून बोलावें ह्मणजे चिंता नाहीं. परंतु भिडेमुळें वचनीं गुंतूं नये. खरें वास्तविक तें खुलाशानें इकडे लेहून पाठवावें. तेथें तुम्हे तुम्हेनें गैरवाका सांगितल्यास त्याजवर न जातां कचा हिसेब व कर्तव्य तें लिहून पाठवावें. त्याप्रा बंदोबस्त करितां येईल. रा॥ छ. १९ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

विनंति उपरि. गोपाळराव पांढरे तेथें आले आहेत. जीवनराव यांचा त्यांचा प्रकार तुमचे माहीतगिरींतच आहे. सांप्रत जीवनराव यांचें व कारभारी यांचें वैमनस्य. यास्तव ते कांहीं गोपाळराव यांस चिमटा घेऊन फंद उभा करतील. रकारनामक तुह्मांस बोध करून नानाप्रकार समजावितील. ते मनांत न आणितां, बोलतील तें ऐकून घेऊन आंतून जीवनराव यांचें लक्ष चित्तापासोन ठेऊन गोपाळराव समंधीं नवीन दरज कांहीं न चाले, पूर्वी नेम जाला त्या प्रा॥ त्यानें आपला दरसाल ऐवज घेणें तो घेऊन स्वस्थ राहावें, दौलतीचा कारभार जीवनराव यांजकडे सर्व ठरल्याप्रा॥ चालावा, ऐसा बंदोबस्त जरूर करून त्याहावें. कारण कीं जीवनराव यांची चाल आपल्यासि बहुत घरोब्याची व निखालसपणें आहे. यांत तथा नाहीं. तो प्रकार बदमामलीचे सिरोमणी, सर्व भाताचा वैश्वदेव करून पाहतां कशास कांहीं ठिकाण नाहीं. हा स्वभाव पुर्ता विचार समजला हें तुमचेंही मनांत आसावें. सारांश गोपाळराव वगैरे हरयेक फंद उभे राहिल्यास त्यांचें निराकरण करून जीवनराव यांजकडे लक्ष राखून बंदोबस्ताच्या शकली त्याहाल त्याप्रा॥ येथें पकें करितां येईल. या गोष्टीचा बाच्यांश तेथें न होतां येहतीयातीनें या बंदोबस्तांत मन ठेवावें. जरूर ! रा॥ छ. १९ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

विनंति उपरि. रघुनाथ बाबुराव साहुकार पुण्यांतील यांजपासोन जीवनराव पांढरे यांनीं पेशजी मामलत समंधे कर्ज घेतलें होतें त्यांत वसूलही बहुतकरून हणमंतराव सभापत यांचे विद्यमानें पावला. कांहीं ऐवज देणें त्यास, सांप्रत हणमंतराव यांची चित्तशुद्धी नाहीं. तुफान करून रघुनाथ बाबुराव यांचे देण्याचा तोदा मनस्वी समजावितील यास्तव त्याचे देण्याचा अजमास याजकडील वसूल काय पावला व बाकी राहीलें काय? हें तुह्मी समजोन घेऊन त्याची आकसात बंदी वाजवी ऐवजाची ठरावून पाठवावी. "नेमाप्रा ऐवज पावता करीन" ऐसें जीवनराव यांचें बोलणें, त्यास, हणमंतराव यांचे समजाविल्यावर न जातां रघुनाथ बाबुराव यांचा हिसेब खचित समजोन घेऊन ऐवजाची वायदा मुदत ठरवून त्याहावें. यास आळसाखालें न टाकितां जरूर करून त्याहावें. रा॥ छ. १९ जिल्कादे हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व २. मंगळवार शके १७१५.

विनंति उपरि. राजश्री रावरंभा यांनीं दफ्तराचें झट बजाजीपंत वगैरेकडे लाविलें होतें. याची पंचाईत मध्यस्तापासी होऊन ठरलें त्याचा त॥ पूर्वी लिहिल्यावरून कळला असेल. बजाजीपंत व बक्षी व जामदार ऐसे दफ्तराचे शोधाकरितां हैद्राबादेस गेले होते. तेथून दफ्तरें आणिलीं, बाजीस दाखविलीं. त्यांत तें दफ्तर सांपडलें. बाजींनीं यांस सर्वांस सांगितलें कीं "आमचें दफ्तर आह्मास सांपडलें." या प्र॥ जालें. बजाजीपंत वगैरेवर आळ रिकामा आला होता तो दूर जाला. तुह्मास कळावें सबब लि॥ असे. मध्यस्थानीं बाजीदेखत आह्मांस सांगितलें कीं "रुमाल—कागद सांपडलें. ऐसें बाजीसाहेबांचें ह्मणणें मुबारक" ह्मणोन. आह्मीं बोललों " नाहक पेंच ब्राम्हणावर आणिला होता. आतां

पार पडला." बाजी आम्हासी बोलले कीं "घरची गोष्ट मुषीरुल्मुलूकपर्यंत बजाजींनीं कशास नेली?" याचें उत्तर त्यास आम्हीं केलें कीं हा दोष बजाजीकडे किमपि नाहीं. माझी ताकीद बजाजीस होती कीं मुषीरुल्मुलूक यांजपाशी गोष्ट न काढावी आणि आम्हीही याविसीं बोललों नाहीं. तुम्हीच जामदार आदिकरून प्रथम मुषीरुल्मुलूक यांजपासी घेऊन गेला. नंतर मध्यस्ताचे बोलावण्यावरून बजाजीपंतास पाठविलें. ऐसें असतां आपण बजाजीपंत यांजकडे फायप केली याचा दोष ठेवितात हें मलाच आश्चिर्य जालें." याजवर बाजींनीं कांहीं उत्तर केलें नाहीं. आणखीच गोष्ट काहडली. सारांश मल्हाटे काबाडीचे! ईश्वर या कारभारांतून तुम्हास कधीं सोडवील याचे नवस कारितों. रा॥ छ. १९ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५

विनंति उपरि. घटाल्याकडे दोन तनखाबाबत साडे चौतीस हजार रुपये येणें. त्याचे वसुलास तिमणा नाइक पांच महिनें बसोन निकड संतत केली. तेव्हां पंधरा हजार रुपये वसूल जाला. ऐवज त्याजकडील प्यादे बादरका समागमें देऊन नाइक मा॥र यांनीं रवाना केला. तो येथें पावला. पंनास रुपये परत होऊन बाकी नन्हुमल यांचे दुकानीं जमा केला. 'बाकी साडे एकुणीस हजार येणें. त्याची निकड होत आहे. परंतु दोन महिन्यासिवाय तूर्त ऐवज हातास येता दिसत नाहीं." याप्रा॥ नाइक यांनीं लिहिलें. मध्यस्ताची ताकीद घटाले यांस पाठऊन निकड करणें तितकी कारितां येईल. याजवर ऐवज वसूल, येईल तेव्हां प्रमाण. रा॥ छ. १९ जिल्काद हे विनंति.

छ १९ रावरंभा यांनीं

मागीतल्यावरून.

श्री.

ज्येष्ठ व. २ मंगळवार शके १७१५.

राजश्री याविराजीत राजमान्य राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

पो गोविंदराव कृष्ण साा नमस्कार विनंति. उपरि, येथील कुशल जाणून स्वकीयें लिहित जावें. विशेष—मौजे शिरसांव पाा हवेली परंडा जागीर—राजश्री राव रंभाजी जयवंत निंबाळकर यांची—तेथील व मौजे देगांव पाा बारसी या दोगांवचे सिवेचा कजिया बहुत दिवस. साा पांच चाहूर जमीन आज पावेतों मोहगम पडिक आनामत असतां सालगुदस्ता मौजे देगांव व कांदेलगांव पाा बारसी या दोगावांनीं अनामत राण जबरदस्तीनें पेरलें. तेव्हां सिरसांवकराचा त्यांचा कजिया जाला. बारसीकर कमाविसदारांनीं सरकारांत गैरवाका समजाऊन सिरसांवची जमीन—कदीम पांच चाहूर कजीयाची व जंदीड साडिबारा चाहूर येकूण—साडेसतरा चाहूर जमीन सिरसांव येथील जप्त केली. कमाविसदारांनीं वाडा बांधून जमीन वहिवाटावयास लागले. येविषई राव माारनिले यांनीं तुह्मास पांच चार वेळां लिा सिरसांवकर रयेत येक वर्ष पुण्यांत बसले. परंतु बंदोवस्त न जाला. दिवस लावणीचे. त्यांत यांची जमीन देगांवकर व कांदलगांवकर जसीचे राण पेरतात. साा सिरसांवची रयेत उठोन बेदरास आली. गांवची खराबी जाली. राव माारनिले यांचें ह्मणे कीं " याप्रा। गैरवाजबी होणें हें उचित कीं काय? " त्यावरून लि॥ असे. तरी सालगुदस्ता मौजे म॥राचा माल व ऐवज नेला असेल तो माघारा देवऊन वाजवीचे रुईनें नवी जमीन रेटली तिची मोकळीक व्हावी. कदीम पांच चाहूर कजियाचा निर्णय होऊन ठरेल त्या प्रा॥ दोहीं गांवांनीं वर्तावें. येविषीं तुह्मीं राजश्री नाना यांस विनंति करून बंदोबस्त करून घ्यावा. र॥ छ० १५ जिलकाद बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. ३ बुधवार शके १७१५.

छ. १६ रोज रवाना टपा.

राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी —

" विनंति उपरि. जफरुद्दौलायहतेषामजंग यांचे बोलणें कीं " माझे बापापासून श्रमिंताचे दौलतखा तुमचे दोस्तीचा सीलसिलाही कदीमपासून असें असतां माझे कामावर आपण कांहींच मुतवजे होत नाहीं. हें अपूर्व आहे! पानगलचे मुकामीं मध्यस्त आलजपूरचें काम मजकडे सांगत होत ते वेळेस आपण खातर केली असती तर माझें काम होतें. श्रीमंताचे दौलतखाह तुमची दोस्ती कधीं कधीं उपयोगीं पडावी" इत्यादिक बहुत गिला केला. त्याचें उत्तर त्यांस दिल्हें कीं " तुह्मीं ज्या गोष्टी बोलिलां त्या खऱ्या. परंतु इतके दिवस या विषईचा तुह्मांस खियालच नाहीं. जर खियाल असता तर आजपरीयेंत स्वस्थ का बसलां? तुमचे बाप सरकारचे दौलतखा हें समजोन निर्मळचे मोहिमेचे वेळेस मदारुल माहम यांनीं तुह्मांविषई आमचे बरोबर नबाबास कित्येक गोष्टी सांगून पाठविल्या तेव्हां हजरतानीं मान्य करून आह्मांस सांगितलें. त्याजवरून ज्यांत तुमचें खैरखाहीची गोष्ट ती सांगून पाठविली. हजरतीनी ही मान्य करून लढाई मोकूफ करून तुह्मांकडीलजबाब सवालाचे इंतज्यारींत होते. सेवटीं तुमचे असंमजसपणाचें बोलणें पडलें; तेव्हां आह्मी लाचार होऊन निरोप घेऊन पुण्यास गेलों. सेवटीं जें व्हावयाचें तें झालें. आह्मी बोलत होतों त्याचे शतांश तरी तुम्हांस कांहीं लाभ जाहला? कांहींच नाहीं! त्याजवरून आमचे मनांत निश्चये कीं अद्याप दुनयार्यांचे उंच नीच गोष्टींविसीं प्रवीणता नाहीं. आणि तुमचे बापाची काय माई यांची ही माहितगारी नाहीं. तेव्हां तुमचा विश्वास खातरजमा कोण तरहेचा कसा मानावा? याजकरितां या गोष्टीचा गिला आह्माकडे नाहीं तुह्मी हुषीयार जालीयावर पुढें तुह्मासच बरें वाईट कोणतें हें समजत जाईल." ऐशा कितेक गोष्टी सांगितल्यावर सावध होऊन बोलिले कीं

" जें मागें जालें तें गुदस्ता आतां मदारुल माहम यास माझी पास असावी. माझे दौलतरवाहीचा सिलसिला कायम करावा. मदारुलमाहम व हरिपंतजी यांस पत्रें लिहून देतों हीं पाठवावीं. माझे कार्याविषयीं तुझी मध्यस्तापासीं सई करावी. मदारुलमाहम यांचे लक्षाखेरीज मी नाहीं. यांची खातरजमा जसी पाहिजे तसी करून देईन. त्यांत अंतर पडावयाचें नाहीं " म्हणोन बहुमताप्रकारें बोलिलें. त्यावरून त्याची खातरजमा केली. " मदारुल माहम यासही लिहितों. उत्तर येईल. नंतर तिकडील खातरजमेचा प्रकार तुमची बोलण्यांत येईल. " याप्र।। बोलण्यांत आलें. आस्थाही लावून ठेविली आहे. हा मजकूर राजश्री नानास श्रुत करावा. रा।। छ. १६ जिल्काद. हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. ३ बुधवार शके १७१५.

विनंति उपरि. जफरुद्दौलायहतेषामजंग यांनीं राजश्री नाना व तात्या यांस पत्रें दिल्हीं. तीं पाठविलीं आहेत. प्रविष्ट करून उत्तरें घेऊन पाठवावींत. यांनीं आमचे नांव लिहिलें आहे तिकडून पत्रें येतील त्यांत आमचे नांव असावें किंवा नसावें याची सलाह राजश्री नाना, तात्या सांगतील तसें करावें. मनांत संशय आला याजकरितां लि।। आसे. पत्रांत दोस्तीचे खातरजमेचा मजकूर लिहावा. उत्तरें लवकर यावीं ह्मणजे खातरजमा त्यास वाटेल. दिवसगत न लागावी. रा।। छ. १६ जिल्काद हे विनंति.*

श्री.

ज्येष्ठ व. २ बुधवार शके ७११५.

विनंति उपरि. जफरउद्दवला यांचे मनांत मध्यस्तापाशी यांनीं साहित्य केलीयांस माझें कार्य होईल. मध्यस्ताची जात म्हटल्यास याचे उपयोगी तसे करतील परंतु याचा मोहभंग कशास करावा ? या अर्थी जंग यासही आस्था लावून ठेविली कीं प्रसंग पाहून मध्यस्तासी बोलावयासी येईल. प्रयत्न तुमचा असावा त्या वेळेस आम्हींही साहित्य करूं इतके मधाचे बोट लावून

* पारसी पत्राची नकल नानाचे नांवाचे जुनावर छ मजकुरी बार आहेत.

ठेविले आहे. समयानुसार घडावयाचें तसें घडेल. राजश्री नाना, तात्यास पत्रें आहेत त्याचे जाब पाठविण्याची अडचण मनांत येईल त्यास उगीच दोस्तीचीं पत्रें आलीं त्याचा जाब लिहिल्यास बाद यावयाचा नाहीं. तहनाम्यांत कलम ओंवलें आहे. उपयोग काय ऐसे म्हणतील त्यास दौलत आहे तेथें उपयोग सर्वदा पडतच आहे कोणते वेळेस उपयोग पडेल त्याचा न्यमे नाहीं आपण होऊन पैगाम आला त्याचा मार्ग कुंठित कां करावा ? सिरसिला असल्यास उपयोगच आहे. यांतील प्रकार बहुत आहेत. प्रसंगोपात ध्यानांत येतील. याजकरितां पत्राचीं उत्तरें पाठवावयास आनुमान नसावा ऐसी विनंति करावी. र॥ छ. १६ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. २ बुधवार शके १७१५.

विनंति उपरि. राजश्री बाबाराव मध्यस्तापाशीं बोलत होते कीं राजश्री तुकोजी होळकर यांचीं पत्रें मदारुलमहाम यास आलीं कीं सिद्यासी आमसी हा प्रकार उपस्थित जाहला, हा तेथील आज्ञाव्यतरिक्त नाहीं त्यास त्यांची जमीयेत फार, इकडील थोडी, याजमुळें लढाईचा प्रसंग आसर जाहला. पुढें कसी आज्ञा ? केलें कर्म सिद्धीस तर गेलें पाहिजे याचें उत्तर लवकर यावें ऐसीं पत्रें आलीं त्याजवरून मदारुलमहाम आंदेशांत पडले आहेत. पहावें काय जवाब देतात. याप्रमाणें वर्तमान ऐकिलें त्याजवरून लिहिलें आहे. खरें खोटें नकळे. याचा शोध तुम्हांसही तेथें लागला असेल. लिहून पाठवावें. र॥ छ. १६ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. ९ मंगळवार शके १७१५.

भावसिंग चौधरी यानें पत्र मागितले सबब.

राजश्री याविराजित राजमान्य राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी

पो॥ गोविंदराव कृष्ण सा॥ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें लि॥ जावें.

विशेष राजश्री गोपाळ नाईक वानवले यांचा ऐवज शंकरदास साहुकार हैदराबादकर यांजकडे सतराशें रुपये मुद्दल याजकरितां याचा मूल मनुलाल यास पैठण येथें वानवले यांनीं अटकाविलें येविषयीं रोशनराव व भावसिंग चौधरी यांनीं बहुत वेळ आम्हांस सांगितल्यावरून वानवले यांस पत्रें पाठविलीं, परंतु मनुलाल याची सुटका जाली नाहीं. सांप्रत भावसिंग चौधरी याचे मारिफात साहुकारी निशा सतराशें रुपये मुद्दल घेण्याची खातरजमा बशर्त मनुलाल येथें आल्यावर ऐवज द्यावा. याप्र॥ घेऊन वानवले यांस पत्र समागमें जासूद देऊन पैठणास पाठविलें. त्यास मा॥रनिलेनी मनुलाल यास मोकळीक करूं नये. येथें पाठविल्यास उत्तम. कदाचित व्याज वगैरे आड करूं लागतील तरी यास्तव तुह्मांस लि॥ त्यास शंकरदास याजपासी देण्याघेण्याचा आहवाल कांहीं. नाहीं वाडा वस्तवांनीं गाहण ठेवून चौधरी यानें मोठे बलानें साहुकाराकडून निशापाती केली आहे यास्तव व्याज वगैरे तंटा कांहीं एक न करितां मुद्दल फडच्यांत समजोन मनुलालास सोडून रवाना करावें. आह्मापासी पोहचते करून द्यावे, या प्र॥ वानवले यांस तुह्मी परभारा लेहून सदरहु प्र॥ अमलांत आणीत ऐसा बंदोबस्त करावा. रा॥ छ. २२ जिल्काद बहुत काय लि॥ लोभ कीजे हे विनंति.

छ. २३ रोजीं टप्यावर रवाना पत्रें.

श्री.

ज्येष्ठ व. १० बुधवार शके १७१५.

राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

विनंति उपरि तुमचे पत्रापो॥ मामलत समंधें घासीमियां व सरबुलंद जंगाकडील ऐवजाचा व जगधनास ऐवज पावल्याचा मार लिहिला होता, त्याचे जाब हली पा॥ आहेत त्यावरून तो॥ कळेल. राजश्री नाना यांस पत्रें लि॥ आहेत त्यावरून दिनचर्या वगैरे वर्तमान कळेल. वरचेवर तिकडून पत्रें रवाना करीत जावीं. इकडील पत्राचे जाब येणें फार तटले आहेत. छ. १२

जिल्कादची तुह्मांकडील पत्रें छ. १८ माहे मा।रीं पावलीं. यांचीं उत्तरें उदईक रवाना होतील. रा। छ २३ जिल्काद हे विनंति. चिनापटण आखबार पा। आहे हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. १० बुधवार शके १७१५.

विनंति उपरि घासीमीयां व सरबुलंदजंगा बाबत तीन हप्त्याचा ऐवज येणें दोन हप्त तरि जगधनाकडे पावले असावे ऐवजाची व्यवस्था कसी? आज्ञा यावी म्हणोन ता। लिहिलेंल्यास उभयतांकडील ऐवज महमद अजीमखां यांचे मारफातीनें आला त्याचे झाडयाची याद आलाहिदा ता। वार लिहिल्यावरून कळेल. सरबुलंद जंगाकडील ऐवजाचा फडच्या जाला थोडी बाकी येणें राहिली. घासीमीयांकडे भरणा भारी कारमार बोडग्रस्त. आरंभापासोन खांसाहेबास निकड करण्यांत गुंता नाहीं परंतु आजपर्यंत ऐवजाची सरबराई जाली नाहीं. तीमाराव व गोविंदराव पालीमलार दोन आमीलाकडून वसूल तीन्याणव हजार पांचशें पावला. कांहीं माहली मामलेदाराकडे फडच्या होऊन रसीदाही आल्या. त्या रुजु करण्याकरितां चिमणलाल आला होता. सांप्रत तिमाराव ही आले. खां साहेबास निकड लाविली आहे. पांच सात दिवसांत हिसेब रुजू होऊन बाकीचा फडच्या कसा करून देतात हें समजोन लिहिण्यांत येईल. रा। छ २३ जिल्काद हे विनंति.

श्री.

यादी महमद अजीमखां यांजकडे घासीमीयां व सरबुलंदजंग यांजकडील माहाला बाबत स्वराज्याचे मामलतीचा ऐवज येणें ता। सन १२०१ पावेतों.

१६९४१४४८= बमोजी बदस्तऐवज मा।रनिले रुपये
१६८६९४।।।—।। सरबुलंदजंग व।।
४००७१९।-।। घासीमीयां व।।

१६९४१४४८=
ता।।
४६९४१४४८= तीन हप्त्यांनी ध्यावे
१००००० रसीदा रुजवातीकरितां
तहकूफ ठेविले ते.

१६९४१४४८=

६१३६।।=।। ज्याजती सरबुलंदजंग यांजकडील रसीदाची रुजवात पानगली मा। विठ्ठल बाबा व भवानीपंत यांनीं करून बाकी आठेचाळीस हजार काहडली होती, त्यांतील कितेक कलमें हली हिसेबी सरबुलंदजंग यांजकडे लागू जाली सबब इजाफा——

१७१९९०।।।=।

रुपये
१७०६३४८=। सरबुलंदजंग यांजकडील
१६०६७ मा। त्रीमलराव आमीन पा। आलंद गुंजोटी ७१०० किता
२१६७ किता
६००० माहदाजी खंडेराव
तनखा प्रो

१६०६७

३०००० रामचंद्र जोसी साहुकार यांजकडोन रोख.

२९३४७ जिवाजी बाबुराव आमीन नीलगेकर यांजकडोन

१२९०० किता

९००० ३९००

१२८४७ देविले सखारामें अनंत

९००० ३८४७

१२८४७

२९३४७

१४६९३ तनखा सिदी इमामखां यांजवर प॥ चितापूर ऐवजीं.

४४९।- जीवाजी बाबुराव यांजकडून रोख वसूल.

१८३७६ तनखा ता॥ मानुर वसूल गोविंदराव भगवंत यांजकडे.

६९७४२॥॥=। रसीदा मामलेदारास माहली वसूल पावल्याच्या रुजु.

१७०६३४८=।

९३९०० वासी मियांकडील

६०९०० तिमाराव हरि.

१०००० कि॥ रोख.

४८००० कि॥ चिठी.

२९०० म॥ जमनादास.

६०९००

३३००० गोविंद रघुनाथ आर्मान पाली मलार.
२९००० किता
८००० किता

३३०००

९३९००

२९४१३४८=।

पो। आदा ——————————— रुपयें

९६३९८ सरकारांत

८०९२५ रदकर्ज जगधन साहु
२८००० रामचंद्र जोसी पो।
९००० जिवाजी बाबुराव पो।
८००० १०००
१८९२५ तिमाराव हरि पो।
९९२५ ९०००
२९००० गोविंदराव पालीमलार पो।

८०९२५

४००० गणपतराव व्यंकटेश
२००० रामचंद्र जोशी पो।
२००० जिवाजी बाबुराव पो।

४०००

११४३३ जासूद तैनाती व डांकवाले व चेनापटण.

१०००० गु॥ गोविंदराव भगवंत.

तिमाराव हरि पो॥ झाडा

म॥रनिले पासी.

१४३३ वरात सरकारची.

मु॥ माहदाजी विठल २.०९९

पो॥ आदा गोविंदराव

यांजकडून १२६ पुण्यात

५०० चिटी मुरुम.

६२६

बाकी ——————— रुपये

११४३३

४० रामचंद्र गुणाजी, यास रोशनखान बसेहुकर याचे तहकी कातीकारितां खाना सेहुखर्चास रोख रोख

९६३९८

१०६३२१।=। मामलेदार स्वराज्याकडील यांस आदा २९६७ गोविंदराव कृष्ण बाबती पा॥ आलंदगुंजोटी सन १२०१ बा॥ ६९६८ पो॥ पेशजी बालाजी व्यंकटेश यांचे विद्यमानें वसूल ४००० बाकी हली वि॥ त्रिमलराव.

१००० फतेसिंग भोसले. मोकासा पा। सारबाड जगदेव राव कोकाटे ब।। गु।। रामचंद्र गुणाजी रोख.

२२३२।। गोविंदराव कोकाटे मोकासे पा। बासरव त।। सीरफूर बाकी त।। सन ११९९ रुपये २९३२।। ह।। पर पो।। हैदराबादी नख्त वसूल ३०० बाकी हलि गु।। जोती भास्कर.

२७९०० रंगो प्रल्हाद म।। सखाराम अनंत.

१२८४७ गु।। जिवाजी बाबुराव

९००० ३८४७

१२८४७

१४६९३ जनरवा सिदी इमाम.

२७९००

१४०० गोपाळराव धोंडदेव तळेगांवकर त।। मुरुग पा।। उदगीर बाकी त।। सन ११९९ रुपये २००० पो।। आदा.

५०० पुण्यास त्रि।। गोविंदराव भगवंत.

१०० हैदराबादी जयराम गोविंद कारकून नि।। मशारनिले.

---

६०० बाकी हल्ली

६९७४२।।=। रसीदा सर बुलंदजंगाकडील मामलेदारास माहलि वसूल पावत्याच्या आल्या त्या.

८८० गोविंदभट मोकासी मौजे मुधोळ पा॥ निटूर बाकी ता॥ सन ११९९ ह॥ पट राहिले ते.

१०६३२२।=।

२०२७२०।=।

बाकी सिलक ---------- रुपये

६११४१३॥-

ता॥

८३०० तिमाराव हहि ४८०० पौ॥ वसूल रुपये ३९७०० बाकी येणें.

(५९) १४९५ व्यंकटीदास यांजकडे सिलक.

१८४७६।- गोविंदराव कृष्ण याजकडे.

६००० भाहदाजी खंडेराव तनखा पा॥

६९६७ गोविंदराव पालि मलार ८००० पो

१९०० जिवाजी बाबुराव ३९०० पो

४००९ नन्हुमल पो

४४९।- जिवाजी बाबुराव नगदी.

१८९१६।-

पो रामचंद्र गुणाजी खर्चास

४०

बाकी ---------- रुपये

२९३७५ गोविंदराव भगवंत यांजकडे.

७००० रावरंभाजी जयवंत निंबाळकर.

१४९०० गु॥ व्यंकटीदास
३००० रा॥कर पो
५५०० जगवल ह॥
३५०० २०००

१४५००

२५०० म॥ जमनादास भावल पो

१००००

पो॥ खंडी खुशालचंद किसनदास याजक
नन्हुमलाकडे जमा १०००० बाकी येणें.
१८३७५ त॥ मानुर ह॥ तनखाचा ऐवज.

२५३७५

६००० नन्हुमल याजकडे १०००० पो॥ रोख.
१७६७॥. रोख सीलक.

६१४१३॥'-
बाकी ऐवज महमद अजीम खां यांजकडून
येणें ——— रुपये

३११४५६॥=
त॥
४१९७।-॥ सर बुलंदजंग यांजकडे जमा.

१७४८३१॥'॥'
पैकीं वसूल १७०६३४८=।
बाकी येणें ——— रुपये

२६४॥॥-॥ म॥ निले कडोन.
३९३२॥ बाकी जिवाजी बाबुराव.

४१९७।-॥.

३०७२९२।८।। सरदारुद्दौला यांजकडोन जमा.

४००५७२।=॥

पो वसूल ९३५००

बांकी येणें ——————————— रुपये

३०७२५९।८॥

३११४५६॥=

श्री.

यादी ऐवज झाडा सन १२०२ सला सती सईन मयां व अलफ

जमा ——————————— रुपये

३०००० सरकारांतून हुंडया पुण्याहुन त्रि॥ गोविंदराव भगवंत खुशा-
लचंद किसनदास वगैरे साहुकारावर आल्या ३ त्याजबाबत.

२८५०३ सोमभूपालराव गदवालकर यांजकडून.

२५००० ह॥रो खा असल.

३ जासुदास खर्चाबा॥

३५०० व्याजह॥ हिसेब.

२८५०३

५८५०३

——————————— रुपये

५२००० सरकारांत रदकर्ज जगधन साहु.

३०००० साहुकारी हुंड्या ह॥

२२००० गदवाल कराप्र॥

१२००० १००००

२२०००

५२०००

५०० गोविंदराव कृष्ण गदवालकरापो रोख.

५२७० गोविंदराव भगवंत यांजकडे गदवालकरापो.

५००० वरात मलेगीर न॥ भागवत.

२७० वरात सुब्रह्मण्याचार्ये.

५२७०

४३३ परत व्याज मलेगीर न॥ व सुब्रह्मण्याचार्ये यांचे वराते ह॥

१८९०३

बाकी गदवालकराकडून ---------- ३०० रुपये

श्री

ज्येष्ठ व. १० बुधवार शके १७१५.

विनंति उपरि जगधनाकडे रदकर्जी ऐवज पावला असाल. पहिले हल्याबाबत दीडलक्ष व गदवालकराबाबद साडेबावीस व घटाले साडे सतरा व हुंडया बाबत तीस व वसमतेपो बीस हजार. या प्रा॥ दोन लक्ष चाळीस हजार पावले असावें. ऐसें असतां येक लाख बतीस हजार पावले म्हणोन लेख हे काय? येविषी त॥ लिहिलें, त्यास मामलेदारा बाबत ऐवज आजपर्यंत आला व गदवालकराकडील हुंडया बाबत तीस हजार एकंदर जमा धरून याचा झाडा दोन यादी आलाहिदा पाठविल्यावरून घटाल्याकडील पंधरा हजार आले. पो परत वजा पन्नास जातां चौदा हजार नऊशें पंनास रुपये नन्हुमल याचे दुकानीं जमा केले आहेत, वसुमतेपो बीस हजारहि साहुकाऱ्यांत आहेत. जगधनाकडे दिल्हे असते परंतु **वसमतेचे** ऐवजाची परवानगी पाठवितों ऐसें तुम्हीं लिहिल्यावरून ऐवज साहुकाऱ्यांत ठेविला. परवानगी अद्याप आली नाहीं. त्यास घटाल्या बाबत व **वसमतेचा** ऐवज जगधनाकडे घ्यावा ऐसें लिहिल्यास भरणाकरितां येईल. उत्तर यावें. दुसरे बीस हजार वसमतचे तनख्याबाबत खोळंबून पडले आहेत. याजविषी दोन चार वेळ लिहिले असतां

उत्तर नाहीं. यास काय करावें ? येक वेल नानास स्मरणपूर्वक यादींत लिहून पुसावें म्हणजे पहिले वीस हजार घेतले त्या सुद्धा माघारे द्यावें किंवा कसें हें समजेल. पुढें वीस यावयाचे ते द्यावे न द्यावे हेंहि समजावें म्हणजे तसें करावयासी येईल. हें काम विशेष अडचणीचें नाहीं. या विषई राजश्री नानाचें पत्र घेऊन पाठवावें. म्हणजे पुढें पाठी चांगलें. रा॥ छ २३ जिल्काद हे विनंति.

श्री

ज्येष्ठ व. १० बुधवार शके १७१५.

विनंति उपरि

प्रांत बालाघाट येथील मामलत सन १२०२ चीनले गांवकर व रदगीरकरकरांनी केली माजी बाकी बालाजी महिपतराव यांनी लिहून दिल्हीं. त्याप्रो पंचवीस हजार त्यास द्यावे. बाकी नवे मामलेदारानीं निशा केली. दोघांचाहि ऐवज एकदांच देणें लागेल, आपण जमा करून ठेविला असेल म्हणोन लि॥ त्यास बाबतीवाल्याचा ऐवज ता॥ १२०१ पावेतो एकंदर घासीमियां सरबुलंदजंगाचे भरण्यांत आहे. वसूल आला त्याचा झाडा लिहिल्यावरून कळेल. बाकी ऐवज घासीमियांकडून आला म्हणजे जमा होईल. बाबतीवाल्याकडे माहली वसूल पावला, तो वजा होऊन हिसेबी बाकी निघेल ते ध्यावयास येईल.

कलम १

बाजी खंडेराव सरा॥ मुख यांचे हत्या बा॥ ऐवज देणें ते हाका मारितात, ऐवजाची निकड करितात. ऐवज रोख असावा आगर नबाबाचे रदकर्जास पावावा म्हणोन लि॥ त्यास बाजी खंडेराव यांस ऐवज देणें पेकीं हरीपंतास रोख दहा हजार तुम्ही दिले आहे. शिवाय माहली फडचे होऊन रसीदा आल्या. हिसेबी बाकी राहील त्याची रुजुवात त्यांजकडील लक्षमण संगो येथें आहे त्यासि करून जो ऐवज देणें तो घासीमीयाकडून ऐवज आला म्हणजे द्यावयास येईल, अथवा तुम्हांकडे पत्र पाठवूं त्या प्रा॥ तुम्हीं तेथें द्यावा.

कलम १

दोन कलमें रवाना छ २३ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. ११ गुरुवार. शके. १७२५

छ २४ रोज रवाना टपा पुण्यास

राजश्री गोविंदराव स्वामीचें सेवेसी विनंति, उपरी तुम्ही छ १२ जिल्कादची पत्रें पाठविलीं तीं छ १८ माहे मजकुरीं पावली त्याची उत्तरें.

१ राजश्री आबाचिटणीस व तात्या जोसी यांस बेदरी पिकदाण्या पाहिजेत. याजकरितां चार पिकदाण्या चांगल्या घेऊन पाठवावयासी आज्ञा म्हणोन लिहीं त्यास नबाब येथें आलियापासून जकातीचे उपद्रवामुळें माल निघत नाहीं. कारीगराचे मुचलका घेतले आहेत याजकरितां पिकदाण्या मिळत नाहींत. पूर्वी बेदरी सरंजाम फर्मायेपी आम्ही करविला त्यांत पिकदाण्या आहेत. बाळाजी रघुनाथ यास सांगून त्यापैकीं प्रस्तुत दोन पिकदाण्या चांगल्या बारामतीहून आणवून उभयतां दोन घ्याव्या. कलम.

१ मिस्तर मालीट यानें सरकारांत विनंति केली कीं दिलावरजंग यास लाड साहेबाचें पत्र आलें कीं नबाबाचा इरादा पुण्याकडे. यांत आमची खुषी नाहीं ऐसे नबाबासी स्पष्ट बोलावें, त्यास यांचा उद्गार मध्यस्त आपले जवळ करितात किंवा जिरवितात हे समजावें म्हणोन लिहिलें त्यास मध्यस्ताचा उद्गार अद्याप निघाला नाहीं. उणेपणाची गोष्ट याजकरितां कळविणार नाहींत असें वाटतें. कलम

१ होळकर यांचे पुत्र मल्हारराव गेले. यांनीं बापु होळकर यांचे विद्यमानें सिंद्याकडील गोपाळराव यासी स्नेह जाला असतां तो मोडून पुन्हा विरुद्ध करून लढाई केली. पीकस्त खाऊन फरारी झाले. याविषयीं दोन तीन पुरवण्या तपसीलवार लिहिल्या याजवरून सर्व मजकूर ध्यानांत आला. आर्भकाचे बुद्धीनें जें करणें त्याचा परिणाम. समज कच्चा आहे; परंतु बादलौकिक वाइट झाला. कलम.

१ इंग्रजासी व फरासिसासी लढाई विलायतेंत सुरु जाली याचा तपसिलें मजकूर लिहिला तो कळला. येथेंहि हें वर्तमान कळलें, त्याजवरून राजश्री नानांचे पत्रांत पेशजी लिहिलें आहे. कलम.

१ मालीट वगैरे बोलणें लिहितो म्हणोन राजश्री नानांचे पत्रांत दाखला कोठें नसावा म्हणोन लिा तें समजलें. तसेंच घडलें. कलम.

१ कोणी मुसलमान स्वार ठेवीत होता तो धरला, बीडवाल्याचें नांव घेतो. लोक ठेवावे त्याचा दस्ता ऐवज व्याज वगैरेचा तपसील लिहिला तो सर्व कळला.

त्यास स्वारापासून दस्तऐवज लिहून घेणें तो संप्रदाय येथील संप्रदायास मिळाला. गुंता नाहीं. यांस वर्तमान कळलें, दबून राहिले, बोलत नाहींत. कलम.

६

साहा कलमखाना छ. २४ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. ११ गुरुवार शके, १७२५.

विनंति उपरी. "आवरंगाबादचे तनख्यापैकीं आजपावेतों वसूल आला त्याची याद पाठविली त्याजवरून ध्यानांत येईल. मदारुलमाहम रोज कळ-वितात तेव्हां उगेंच खालें पाहवें. असो! हाल्लीं वसूल जाऊन बाकी येणें त्याची याद पाठविली. मनन होऊन मध्यस्तांसि बोलोन जगधन सावकार याजवर चिठी द्यावी. अथवा रद कर्जी ऐवज कांहीं देऊन बाकी जगधन यांजवर चिठी द्यावी. सारांश ऐवज याउपरि सत्वर ठिकाणीं लागावा म्हणोन लिो." त्यास तुमचे लिहिल्याप्रमाणें मध्यस्तासि दोन तीन वेळा बोलणें जालें. तुम्हांकडील वसूल बाकीची याद आली ती बाजिनस यांस दाखविली. त्याजवरून यांचे येथें बाळाजी नायक व आहस नुदौला यांचे मोहरनसी वसुलाची यादी आली आहे. एक लाख येकावन हजार दोनशे

रुपये सव्वा तेरा आणे १९१२००॥।८। याच्या रसीदाच्या नकलाहि आ-
ल्यात; त्या यार्णी दाखविल्या. त्यास तुम्हीं यादी पाठविली त्यास व यांज-
कडील वसूलाचे यादीसी मुकाबला पडत नाहीं. बाकीचे ऐवजाची चिठी
जगधन याचे दुकानीं द्यावी. याजपैकीं कांहीं ऐवज रदकजांत लाऊन द्यावा.
हुंडावणीचा म॥र तुमचे लिहिण्याप्रमाणें दोन रु॥ सेंकडा बोलण्यांत सरासरी
आला आहे. येविषीं मध्यस्ताचें बोलणें कीं मी याचा म॥र राज्याजीसी
बोलतो. ते तुम्हांस सांगतील त्यास पाच सात दिवस राज्याजी आपले लग्नाचे
गडबडींत आहेत. मध्यस्ताचें याचे बोलणें जालें नाहीं. याउपरि राज्याजी
दरबारास गेल्यानंतर जसें ठरेल तसें व यांजकडील वसुलाची यादी आली आहे
त्याच्या व रसीदाच्या नकला वगैरे मागाहून रवाना करण्यांत येतील. सध्यां
तुम्हांस कळावयाकरितां म॥र लिहिला आहे. रा॥ छ. २४ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. १२ शुक्रवार शके १७१५.

विनंति उपरी. कल्याणराव प्रकर्ण.—

१ "कल्याणराव यांस आणून जलसा करणें हें कश्यावरून तुम्हीं लिहिलें
ऐसें राजश्री नानानीं मला पुसिलें. याचें उत्तर मीं केलें कीं, कल्याणराव
मजकडे येऊन आपल्यासि असें बोलणें जालें म्हणोन सांगत होते, त्याज-
वरून लिहिले. तेव्हां बोलिलें कीं, कल्याणराव यांस इतके चिकटून द्याव-
याचें नाहीं, याजकरितां वरचेवर उत्तर सांगितलें. त्याचा ग्रंथ इतका मध्य-
स्तापरियेंत जाला." म्हणोन विस्तारें म॥र लिहिला तो कळला. त्यास ति-
सरा गृहस्थ कामांत आला, तेव्हां थोड्या गोष्टीवरून मोठे ग्रंथच होतील;
असाच काल आहे. आणि प्रसंगहि सर्व नमुदेतच आहेत. याजकरितां
बहुत सावधपणें वर्तत जावें. इकडेहि सुचविणें असेल तें सुचवावें. आळस
करीत न जावा. कलम १

आदवनी वगैरे कलमें निवडून पाठविणार त्या कलमांची याद पाठ-

विली ती पावली. ठराव करून याद येईल ते वेळेस उलगडून लिहावें. ह्मणजे त्याप्रमाणें मध्यस्तासि बलावयास येईल. कलम — १

"फर्दा कामाच्या दाखवीत नाहीं असे तो ह्मणतां नये. याजकरितां आदवनी वगैरे औघड कामें आहेत त्याची भवति न भवति करून रघोत्तमराव यांस सांगावें; आपलेकडे लिहून पाठवावें; यांत कल्याणराव यांस बोलावुं नये; आपण बाबाराव यांस घेऊन मध्यस्तासि बोलावें. आह्मी फैसले करून देवितों ऐसें ह्मणतात याचाहि अनुभव याजवरून समजण्यांत येईल." ऐसा बेत ठरला ह्मणोन लिहिलें; त्यास यांतील एक गोष्ट असी आहे कीं आतां तोडमोडीचा जाबसाल करूं नये. तोडमोडीचा प्रकार कोठपर्यंत कीं, सोहलतीनें, स्नेहाचे रीतीनें जाबसाल करते तर सर्व होतें. तो प्रकार वास्तवीक नाहीं. आमचेच मानेवर बसून आम्हांकडील सरकारचे कामाचा फैसला न करितां वरती आणखी इच्छा ठेवणें अश्या चालीस तोडजोडीचा कारभार कां करावा? याजकरितां कुलफडश्या वाजवीचे मार्गे करून घ्यावा. तरच कलमाचे फडचे. ऐसें नेटानें, केलियास चांगलें. पोंचट कारभार करणें असल्यास दाब राहील हें समजलेंच आहे. दौलतीचे कपाळीं असेल तें खरें! यास कोणाचा उपाय नाहीं. कलम—

तीन कलमें रा॥ छ. २४ जिल्काद हे विनंति.

श्री

ज्येष्ठ व. १२ शुक्रवार शके १७१५.

विनंति उपरि.

१ हुंडी केलियास बव्यामुळें तोटा पडतो याचा तपसील लि॥ तो कळला कलम.

१ नांवनिसीवार पत्रकाची नकल पाठविली ती पावली कलम—

१ राजश्री नानाकडील जाब सरासरि पाठविला तो पावला कलम—

१ राजश्री रामचंद्र दादो यांचें पत्र त्यांचे चिरंजीस होते तें पावतें केलें. कलम—

जनार्दनपंत चेनापटणकर यांचे पत्र पावलें. नागपुरास जबाहीर आलें म्हणोन लि॥ व त्याचे बंधूचें पत्र त्यांचे नांवाचे पाठविलें तेंहि पावलें. त्यास मध्यस्ताचे कानावर घालून ते सांगतील त्याप्रमाणें जनार्दनपंत यांस लिहिण्यांत येईल. कलम——

१ "सिद्दी इमामखान याची मोतीं आलीं. बाळाजी व्यंकटेश यांजबरोबर पाठवितों" म्हणोन लिो. त्यास सिद्दी इमाम यास कळविलें. कलम——

१ "भारामल व भावसिंग याची मोतीं आणिलीं" म्हणोन लिो; तें कळलें. कलम——

१ "पांडोबा बारामतीस गेला. चिरं सौ॥ दुर्गाबाई पावली" म्हणोन लिो तें कळलें. कलम——

१ "घासीमीया याजकडील ऐवजांत माझा ऐवज येणें त्याची नांवनिसीवार याद पाठविली. त्यास दोन हप्त्यांचा ऐवज येईल. त्यांत माझेकडील ऐवज जमा करावा. घासीमीयाकडील दोन हफ्ते उगवले असे मामलेदार यांचे सांगण्यांत." म्हणोन लिो. त्यास तुम्हीं यास पाठविली त्याप्रमाणें घांसीमीया यांजकडील हप्त्याचा ऐवज आला म्हणजे तुमचा ऐवज जमा करून लिहून पाठवूं. दोन हफ्ते उगवले किंवा नाहींत याचा तपसील काल तुम्हांकडे याद पाठविली त्याजवरून कळेल. कलम——

१" षमषुल उमरावांचे षादीबद्दल जिनस मंबईहून खरेदी होऊन आला; लवकर एकदोन दिवसांत येथून रवाना होईल." म्हणोन लिहिलें तें कळलें. अजमसाहेब यास तुमचे लिहिल्याप्रमाणें कळविलें. कलम——

"पालखीचे सरंजाम फार चांगले आहेत. सरकारांत दाखऊन ठरेल तसें लिहीन म्हणोन लिो. तें कळलें. कलम ——

१ बाळाजी रघुनाथ यांस पाठविण्याविसीं आज्ञा त्यास श्रीमंतास विच्यारतां "थांब" म्हणतात; तेव्हां लाच्यार त्यास आणीक एक महिना लागेल. लाच्यार पाटील कुळकर्णी याविसी मनसबा आहे. इकडील ठीक न पडल्यास पाठलाचें करावें; याचा ताला माला पाहणें. याजकरितां दिरंग." म्हणोन

लिो. त्यास ठीक पडो, अथवा न पडो ! पाटलाचे करावयाचेंच. तिकडील ठीक जाल्यास पर्याय पाटलासी करणें तो निराळा; तेथील ठीक न जाल्यास पर्याय वेगळा. दोन प्रकार करण्याचे आहेत; त्यांतून एक प्रकार प्रसंगानुसार करावा. तिकडील ठीक न जालें तर करावयाचें. नाहीं तर न करावें असें होऊं नये. जसें तेथील ठरेल त्या धोरणासारखें इकडील करावयाचें; परंतु करावयाचें खरें ! या कामास बाळाजीपंत याचे रहाण्याचा उपयोग कांहींच नाहीं. बाळाजीपंत असला तरी तुम्हीं पत्रांत मा॥र लिहिल्यावरच कळेल. बाळाजीपंत आपले बरोबर पत्र मात्र घेऊन येईल; इतकेंच ! विशेष काम नाहीं. येथें बाळाजीपंत यावेगळ फार खोळंबा हें तुमचे ध्यानांतच आहे. लिहावेंसें नाहीं. याजरितां इतकें लिो. बाळाजीपंत यांस इकडे पाठविणें त्यांतल्या कामाची खराबी नाहीं; असें आह्मांस वाटतें. तुमचें मनांत काय असेल तें असो !

रवाना छ. २४ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. १२ शुक्रवार शके १७१५.

विनंति उपरि. बाळाजी व्यंकटेश व येमाखिदमतगार आला तो कारभार ठरला. दस्तक हुजरे सिध करवितों. गुजराथ प्रांत नेमांत; परंतु श्रीमंताचें म्हणणें मावळही खांचर आहे. चिंता नाहीं ! याची भवति न भवति होऊन उदईक तें लिहीन. सारांश करावें ऐसें जालें. आपण निशा घेतली असेल तो ऐवज हस्तगत होये ऐसें करावें. इकडून कार्य जालें. तिकडे दिकत न पडावी याचा विच्यार करून उत्तर आधीं यावें. उत्तर आलियावर दस्तक हुजरे देऊन समास पाठवीन तों पावेतों खोळंबा. यास्तव उत्तर सत्वर यावें म्हणोन लिा.' त्यास निश्या घेतली परंतु त्यांत थोडीसी आटक आहे. सयद तुम्हांकडून कार्य करून त्याजपासी गेला म्हणजे त्यांनीं चिठी येथें सावकारास पाठवावी; म्हणजे ऐवज हातास येईल ऐसें आहे.

त्यास दस्तक हुजरे तयार करून सयद याजबरोबर पाठवावे. ऐवजाची चिठी त्याची घेऊन पाठवितील. नंतर दस्तक व हुजरे त्यांस रुजु करून द्यावे. याप्रमाणें सैदास सांगून करावें; अथवा सैदास म्हणावें कीं, चिठी ऐवजाची घेऊन या; मग दस्तक हुजरे देईन." याजकारितां येमाची व सैदाची अगोधर जलद रवानगी तिकडे करून चिठी आणवावी. तुमचे विच्यारें कसें करावें? खातरजमा ऐवजाची कसी ? हें सैदास पुसून करावें. आतां आम्हापासीं सावकाराची चिठी आहे. परंतु त्यांत करार कीं, "दुसरें पत्र परवानगीचे आणून दिल्हे म्हणजे तेवेळेस पत्र पावतांच रु॥ देईन." याजकरितां सैदास सांगून चिठी आणवावी. आणि कार्य करावें. सैदाचे रवानगीस आळस करूं नये. मावळ अथवा गुजराथ श्रीमंतांचे व त्यांचे युक्तीस येईल तसें करावें. सैदास पाठवून मावळांतील खांचराचा प्रकार कळवावा; आणि चिठी ऐवजाची आणवावी. मग दस्तक हुजरे द्यावें, हें बरें! याजवर सैदाचे तुमचे युक्तीस येईल तसें करावें. ऐवजाविसी कसें बोलण्यांत आलें? आम्ही लिो त्याप्रमाणें किंवा कसें? हें सयेदासही कळवावें. रा छ॥ २४ जिल्काद हे विनंति. लिो त्यांत उणें बोलण्यांत आलें असल्यास सयेदास कळवूं नये. अधिक बोलण्यांत आलें असल्यास सांगावें. हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. १२ शुक्रवार शके १७१५.

विनंति उपरि. राजश्री अंताजी निराजी यांनीं मारडीहून ऐवजांच्या हुंड्या पुण्यास पाठविल्या. कांहीं हुंड्या सोलापुरीहून बापु सिवदत याचे दुकानींहून केल्या. कांहीं तुळजापुरीहून लिंगापा नाइक यांचे दुकानच्या. हा कारभार बापुदेव सोलापूरकर यांचे मार्फतिनें केला. दोन हजार रु॥ हुंडबासिवाय ज्याजती अंताजीपंत यांनीं भरणा केला तो ऐवज बापुदेव यांस अंताजीपंतांनीं निकड करून मागितला. सबब बापुदेव सोलापुरास जाऊन त्यानें आपले पत्तीनें चौघा सराफासीं ऐवज घेऊन सोळाशें रु॥ अंताजीपंत यांचे यांस दिले. ऐसें असतां राजश्री रामचंद्रपंत सुभेदार व रामचंद्र तिमाजी यांनीं

अंताजीपंतास पत्रें पाठविली कीं, आमचा माल सराफापासून तुम्हीं नेला, तो देणें. त्यास हा कारभार परभारा बापुदेव यांचे विद्यमानें ऐवज देऊन हुंडया घेतल्या. इजाफा ऐवज पडला तो बापुदेवापासोन घेतला. ऐसें असोन सोलापूरकर अंताजीपंत यांचें आंगीं लाऊन लिहितात; व बखेडा करणार यास्तव तेथें तुह्मीं या गोष्टीचा बंदोबस्त करून ल्याहावें. कितेक सोलापुराकडील बोभाट! याजकरितां, अंताजी निराजी यांनीं तुम्हांकडे कारकून पत्र देऊन पुण्यास पाठविला आहे. वरचेवर मारडीकडील कामाचा बंदोबस्त करीत जावा. रवाना छ. २४ जिल्काद हे विनंति.

श्री.

ज्येष्ठ व. १२ शुक्रवार शके १७१५.

विनंति उपरी. राजश्री जीवनराव पांढरे यांजविषईंचा मजकूर पेशजी तपसिलें तुम्हास लिहिला आहे; त्यावरून कळलें असेल. पत्राची उत्तरें लवकर रवाना करावीं; व हिसेबाच्या यादीच्या नकलाहि पाठवाव्या. ह्मणजे आपले ऐवजाची तोडजोड यांजपासून ठराउन घेउन पुढील क्रम यथास्थित चालेल. उतरें लिहिल्या मजकुराची सविस्तर खोलून पाठवावीं. रा॥ छ. २४ जिल्काद हे विनंति.

छ. २४ रोज पत्र अनंदराव नरसिव्ह याजवळ दिल्हे तें.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

पो॥ गोविंदराव कृष्ण सांत नमस्कार विनंति उपरि. येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जावें. विशेष आबदुल गनीखां हाकीमजी पुण्यांत आहेत त्यांचा तुमचा सहवासही विशेष ह्मणोन राजश्री आनंदराव नरसिंव्ह यांचे सांगण्यांत. त्यास हाकीमजी स्नेहास योग्य मनुष्य याजकरितां त्यांचा अगत्य वाद धरून हरयेकविषई साहित्य करीत जावें. रा॥ छ. २४ जिल्काद बहुत काय लिहिणें? लोभ कीजे हें विनंति. माहे जिल्हेज उर्फ आषाढ मास.

छ. रोजं पत्र पंचभाई यांनीं मागिततल्यावरून दिल्हे.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

पो गोविंदराव कृष्ण स॥ नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें लिहित असावें. विशेष मौजे भेंडणी उर्फ मामुराबाद रसुलपुरा पा॥ रावेर हा गांव हालीं सरकारांतून मीर मुराद आलीखान बाहादूर पंचभई यांस इनाम आहे. त्याचे बंदोबस्ताविसीं पेशजी मिरफेंत अलीखान बहादूर पुण्यास आले. राजश्री नानांची भेट घेतली. बंदोबस्ताविसीं हुजुरे पत्रें करून दिल्हीं आणि मौजे मारीं जागिरीचे अमलाचा दखल करून दिल्हा. त्याप्रमाणें चालत आहे. परतु स्वराज्याचे, अमलाचा बंदोबस्त होत नाहीं. चोपडेकर कमाविसदार याजकडून मौजे मारीं आनंदराव नामें कारकून आहे. ते यांस नाना प्रकारें दिमती घेऊन उपद्रव करितात. याजमुळें हे हैराण होऊन बोभाट सांगतात. पेशजी यांचे बंदोबस्ताविसीं तुम्हांस जाते समई नबाबानीं व मध्यस्तानीं मार सांगीतला; व वाटणी वगैरेच्या यादी तुम्हांपाशीं दिल्ह्या आहेत. तुम्हीं सरकारांत बोलून बंदोबस्त करून दिल्हा नाहीं ह्मणोन हालीं खान मार यांनीं नबाब बंदगान आलि यास अर्ज केला. त्याजवरून आह्मांस इर्षाद केला कीं तुह्मीं मदारुल महाम यांस पत्र लिहून बंदोबस्त करून देवावा. स्वराज्याचे अमलाच्या यादी दोन शकला सांगितल्या आहेत. एक तो वाटणी करून घ्यावी त्याप्रमाणें कमाविसदार घेत जातील; अथवा स्वराज्याचे अमलाचा मख्ता ठरावून घ्यावा त्याप्रमाणें हे सालाबाद ऐवज दाखल करीत जातील, फरफरमास व सोयरे वगैरे यांस हिसा नाहीं. ते यांचे वहेवटींत राहील. ह्या दोन शकलांतून एक शकल ठराउन दिल्हास गांव यांजकडे निर्बंध चालेल. ह्मणोन इर्षाद केल्यावरून आह्मी राजश्री नानांस आपले हातें पत्र लेहून खुलें तुमचे पत्रांत घातलें आहे. हें तुह्मी वाचून पाहून, गोंद लावून, पावते करून, पेशजीच्या यादी तपसीलवार तुम्हापासी आहेत त्या दाखऊन, याचा बंदोबस्त करून देवावा. येविसीची येथें किती किरकिर आहे हे सर्व तुमचे समजण्यांत आहे. याजकरितां उत्तम रीतीनें नानांस विनंति करून बंदोबस्त करून देवावा व खान

माार यांचे सांगण्यांत कीं गोविंदपंत नाना कोण्ही कारकून तेथें आमचा व-
कील ह्मणून आला आहे तो आमचेच पैशुन्यच्या गोष्टी सांगतो. त्यास त्याचे
बोलणें मंजूर नसावें. याजकरितां तुह्मास लिहिलें आहे कीं गोविंदपंत यांचें
नाहींत; आणि त्यांचे सांगणें सरकारांतही मंजूर न व्हावें. रा छ. १ जिल्हेज
बहुत काय लिहिणें ? लोभ कीजे. हे विनंति.

मध्यस्थ व राजे रायेरामा यांचे मागितल्या-
वरून पत्र लिहिलें असे.

श्री.

आषाढ शु. १ मंगळवार शके १७१५.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
गोविंदराव स्वामीचे सेवेसीं.

पो गोविंदराव कृष्ण सां नमस्कार विनंति. उपरि येथील कुशल जाणून
स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष मौजे बिरमपूर उर्फ बाळेपांसरी वगैरे
गांव पा नेवासे हें गांव नवाब बंदगानअली यांचे सरकारांतून महमद रुस्तम
अलीखान यांचे जातीचे जागीरींत होऊन सनद खासनोहरी जाली. ऐसी-
यास राजश्री माहाराव निंबाळकर याणीं राजश्री मोरो हरि कमावीसदार
पागारकर यांस सांगोन खान मजकूर यांचा दखल होण्यास दिकत
केली व सन १२०२ सालचा वैवज आमानत ठेविला आहे. खान
मजकूर यांस देत नाहींत. त्यास याचे बंदोबस्ताविसीं गोविंदराव
भगवंत यास पत्र द्यावें ह्मणोन मध्यस्तांनीं व राजश्री रायेरामा बहादूर
यांणीं सांगितलें. त्याजवरून हें पत्र लिहिलें असे कीं येविसीं राजश्री
नानास विनंती करून देहाये मजकूरचा अमल दखल बंदगान अलीचे
सनदे प्रमाणें करून देवावा. कदाचित माहाराव व मोरो हरि दिकत करतील
तरी त्यासही सरकारांतून ताकीद करवावी. रा छ. २९ जिल्काद बहुत काय
लिहिणें ? लोभ कीजे. हे विनंति.

माहे जिल्हेज उर्फ आषाढमास.

छ.६ रोजीं सखाराम अनंत निा सरा मुख्यांनीं मागितलें सबब.

श्री.

आषाढ शु. ७ सोमवार शके १७१५.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

पो गोविंदराव कृष्ण सांा नमस्कार विनंति. उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें लिा जावें. विशेष, राजश्री रंगो प्रल्हाद निा सरदेशमुख यांचे मामलतीचा ऐवज तां सन १२०१ पावेतों. त्यापैकीं साडे सतावीस हजार आह्मीं नगदी वसूल येथें सखाराम अनंत निा माारनिलें यांस दिल्हा. पन्नास हजार रुपयाची चिठी, तुह्मी तेथें मंत्रीस माारनिलेचे मामलतीबाबत, राजश्री हरिपंत तात्या यांची देविली तो ऐवज अद्याप पावला नाहीं. ह्मणोन रंगोपंत यांजकडील पत्रीं बोभाट आला. त्यास चिठी देऊन फार दिवस जाले. अद्याप ऐवज पटला नाहीं. याचें कारण काय येविषीं तात्या यांस विनंति करून ऐवज यांचा यांस पावता जाल्यांत पेंचांतून मोकळे होतील. येविषीं पेशजी ही ऐक दोन वेळा लिहिलें. त्यास सदरहुप्रा यांजकडील मामलतीसमर्थें ऐवज पावे तें करावें. यासिवाय माहालींही वसूल माारनिलेकडें पावला त्याच्या रसीदा आल्या. पन्नास हजारांचा भरणा जाला ह्मणजे यांजकडील उलगडा होतो. यास्तव लिहिल्याप्रा घडवावें. रा छ. ६ जिल्हेज बहुत काय लिा? लोभ किजे. हे विनंति.

छ. ७ रोज टपा रवाना

आषाढ शु. ८ मंगळवार शके १७१५.

राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

विनंति. उपरि इकडून पत्राच्या रवानग्या पैहाम बहुत जाल्या. त्याचीं उत्तरें फार येणें तीं यावीं. सांप्रत रावरंभाप्रकर्णी वगैरे माार आलाहिदा लिहिल्यावरून कळेल. वरकड इकडील वर्तमान राजश्री नाना यांचे पत्रीं लिहिलें आहे त्यावरून समजेल. वरचेवर पत्रें पाठऊन वर्तमान लिहित जावें. रा छ ७ जिल्हेज, हे विनंति.

पुा राजश्री गोविंदराव स्वामीचे शेवेसी.

विनंति. उपरि राजश्री रावरंभा यांस माहवारीचा ऐवज येथें साहा हजार रुपये नगदी देऊन दरमहा अकरा हजाराचे दोन रोखे, करमाळ्यांत दोन हजार व कर्जा बाबत वजाई तीन हजार, याप्रा घेण्यांत आले. त्यास सांप्रत मोहरमचे खर्चाकारितां माहवारीसिवाये सात हजार रुपये द्यावे याप्रमाणें राव रंभा यानीं आह्माकडें सांगोन पाठविलें. याचें उत्तर आह्मीं केलें कीं माहवारी सिवाये ऐवज मिळावयाचा नाहीं. बेदरचे स्वारीस निघते वेळेस माहवारीखेरीज च्यार हजार रुपये नवाब आज मुलउमरा बाहादुर यांनीं सांगितल्यावरुन दिल्हे तेच ज्याजती. ऐसे असतां मोहरमचा ऐवज देण्यास जागा नाहीं. याप्रों साफ सांगितल्यावरून बाजी आजमुल उमराबहादुर यांजकडे जाऊन त्यांस सांगितलें. त्यांनीं बजाजीपंतास विचारलें कीं पहिले मोहरमचा ऐवज देण्याची चाल कसी आहे ? यानीं सांगितलें कीं माहवारी पांच हजार पाहेली होती ते समई मोहरमचे खर्चास माहवारीशिवाये देण्यांत आले. दाह हजार माहवारीचा नेम ठरल्यापासोन मोहरम बाबत खर्च माहवारीचे पोटीं. पेशजी साल गुदस्तां मोहरमाकरितां ऐवज, पटणचे स्वारींत कर्ज दिल्हे तो ऐवज माहवारींत वजा करून घेत आलें. याप्रमाणें सांगितल्यावर बाजीचें ह्म(ण)णें कीं सात हजार कसेही करून माहवारीसिवाये द्यावे तर निभाव. तूर्त साहा हजार ऐवज नगदी माहवारीचा येतो. यांत मोहरमाबाबत वजा केल्यास खर्च कसा चालेल? याप्रा बाजीही. (?) तेव्हां मध्यस्तानीं तोड सांगितली कीं पांच हजार रुपये मोहरमाकरितां तुह्मास देवितों; सातहजार मिळणार नाहींत. याप्रा करून आह्मांकडें मध्यस्तानीं सांगोन पाठविलें कीं रावरंभा यांस मोहरमचे खर्चास पांच हजार रुपये आपण द्यावे. गोविंदराव यांस लिहावें. त्यांनीं माहवारीसिवाये मोहरमाबाबत द्यावे ऐसें लिहिल्यास दिल्हेच आहेत. कदाचित माहवारीचे ऐवजी दरमाह एक हजार वजा करून घेत जावें ऐसें लिहिलें आल्यास तसें करितां येईल. तूर्त दिवस मोहरमचे. साहित्य जालें पाहिजे. वास्तव पांच हजार

द्यावे. त्यावरून बाजीचा रोखा घेऊन पांच हजार रुपये दिल्हे. रा छ. ७ जिल्हेज. हे विनंति.

श्री.

आषाढ शु. ८ मंगळवार शके १७१५.

विनंति. उपरि राव रंभा यांचे ह्मा(णा)पें कीं सालगुदस्तां मोहरमाबाबत साडे-सात हजार कर्ज आपल्याकडे होतें तें माहवारीचे ऐवजांत दरमाहा एक हजार प्रा॥ तीन हजार वजईचे पोटीं आदा जाले. माहे जिल्काद्पर्यंत मोहरमचा ऐवज फिटून दीडहजार रुपये जाहले. इजाफा जाले आहेत. याचें उत्तर आह्मीं केलें कीं मोहरमचा ऐवज किती व कोटून कोठपर्यंत वजा घेतला असतां फडच्या हें आह्मांस ठाऊक नाहीं. गोविंदराव यानीं माहवारीऐवजीं तीन हजार वजा घेत जावें ऐसें लिहिल्यावरून तीन हजार मात्र वजा होत आले. परंतु यांत मोह-रमाबाबत किती? व पटणचे स्वारीचे वगैरे कर्ज किती? हें समजलें नाहीं. बाजीचें ह्मा(णा)पें आपण लिहून पाठवावें. याउपरि मोहरमचा ऐवज वजा न करितां माहवारी देत जावी. त्यास मोहरमाबाबत ऐवज तुह्मीं यांस किती दिल्हे आहे व त्याचा करार कोणते महिन्यापासोन वजा किती करून घ्यावयाचे? याचा तपशील लिहून पाठवावा व पटणचे स्वारीबाबत वगैरे कर्ज कोणे महिन्या पासून कोठवर आदा व्हावयाचें हेंही त्याहावें. त्याप्रा॥ समजोन करितां येईल. उत्तर लौकर यावें. रा॥ छ ७ जिल्हेज. हे विनंति.

श्री.

आषाढ शु. ८ मंगळवार शके १७१५.

विनंति. उपरि रावरंभा यांचे बोलण्यांत कीं करमाळ्यांतील खर्चाबाबत दोन हजार रुपये माहवारीचे ऐवजीं वजा घेण्यांत आले. त्यांस करार असा नाहीं कीं तालुक्यांतील कारखान्याचा खर्च माहवारींत मजुरा घ्यावा. ऐसें असतां तो देखील खर्च माहवारींत वजा करून रोखे घेतात तसे देतों. याप्रा॥ मध्यस्तासी बो(ल)ले. त्यांनीं बजाजीपंतास विचारिलें कीं याचा व्याहडा ठरला आहे त्यांत हें कलम कसें उगवलें आहे? यानीं सांगितलें येक व्याहडा गोविंदराव बांजपासीं व

येक बाजीसाहेबापासीं आहे त्यांत पाहावें लागेल. बाजीचें ह्न(ण)णें तालुक्यातील हाती, घोडे वगैरे खर्च व मोहरमाबाबत ऐवज माहवारीसीवाये. आमचें बोलणें कीं माहवारीचे पोटीं. हे विना व्याहाडयासीवाये समजत नाहीं. यास्तव राव रंभा याचें कारभारप्रकर्णी व्याहाडा जाला आहे त्याची नकल इकडे पाठवून द्यावी. ह्नणजे दोन्हीं रकमा व्याहाडयांत उगवल्या असतील त्याप्रा मध्यस्तासीं बोलून अमल होईल. कितेक कलमाचे जाबसाल पडतात. यास्तव व्याहाड्याची नकल येथें असली ह्नणजे प्रसंगोचित जो जाबसाल नमूद होईल त्याचें निराकरण करावयास नीट पडेल. यास्तव व्याहाडयाची नकल पाठऊन द्यावी. रा॥ छ. ७ जिल्हेज. हे विनंति.

श्री.

आषाढ शु. ८ मंगळवार शके १७१५.

विनंति. उपरि रावरंभा यास माहे रावल कार्तिक मासापासोन माहवारी वगैरे ऐवजाचा भरणा ता॥ जिल्हेज आषाढ मासपर्यंत जाला. त्याचा तपशील माानिलेपासोन रोखे घेतले ते जमा धरून आलाहिदा याद पाठविली आहे त्यावरून कळेल. सदरहुप्रा॥ जमाखर्च तुह्मीं केला असल्यास उत्तम. नसल्यास याप्रा॥ करावा. ऐन वसूल नगदी सत्याहतर हजार रु॥ पावले. यापैकीं तुह्माकडील वसूल वजा होऊन आठावीस हजार बाकी येथें मुबादला दिल्हा. हा ऐवज तिमाराम हरि यांचे ऐवजीं अथवा हरयेक येथें फडच्या करून लिहिण्यांत येईल त्याप्रा॥ करावें. रदकर्जाऐवजीं पंचवीस हजार रुपये आजपर्यंत वजा करून घेतले.त्यास माानिलेकडे कर्जाबाबत ऐवज पटणचे स्वारीचा व मोहरमाबाबत किती आहे ? त्यांत पंचवीस वजा जातां बाकी येणें किती राहिलें? तें दरमाहा श्रावण मासापासोन वजा कसें करावें ? याचा तपशील खोलून लेहून पाठवावा. त्याप्रा॥ करितां येईल. त्याची समजूत पडे असी प्रांजल समजोन याद पाठऊन द्यावी. हलीं मोहरमाबाबत सालमाारचे पांच हजार यांस मध्यस्तांनीं सांगितल्याप्रा॥ दिल्हे. याची व्यवस्था कसी? माहवारींत वजा करून घेण्याचे किंवा माहवारीसीवाये हें त्याहावें.करमाळ्यांत खर्च–हाती,घोडीं वगैरेस आजपर्यंत काय पडला

हें हरिपंत यांचे माहितगारीनें समजोन त्याहावें. त्याप्रा॥ माहवारीचे ऐवजीं रोख्यांत चौदा हजार रुपये जिल्हेज पर्यंत वजा आले आहेत. बाकी येणें किती तें लिहावें. त्याप्रा॥ यांसी बोलतां येईल. रा॥ छ. ७ जिल्हेज. हे विनंति.

श्री.

यादी रावरंभाजी जयवंत निंबाळकर यांस ऐवज भरणा ई॥ माहे रावल कार्तीकमास सन १२०२ ता॥ माहे जिल्हेज आषाढमास सन १२०३ बा॥ रोखे–

रुपये.

१०७००० माहवारीबाबत रोखे.

१०००० माहे रावल कार्तीकमास ——— १
१०००० माहे राखर मार्गशीर्ष ——— १
१०००० माहे जावल पौष ——— १
११००० माहे जाखर माघमास ——— १

७००० किता माहवारी ?
४००० कर्जाबाबत ज्याजती.

११०००

११००० माहे रजब फाल्गुणमास ——— २
११००० माहे साबान चैत्रमास ——— २
११००० माहे रमजान अधिकवैशाख ——— २
११००० माहे सवाल वैशाखमास ——— २
११००० माहे जिल्काद ज्येष्ठमास ——— २
११००० माहे जिल्हेज आषाढमास ——— २

१०७०००

९००० माहवारी सीवाये बा॥ रोखे.

१७

४००० माहे रमजान अधिक वैशाखमास बेदरचे स्वारी
खर्चाकरितां देविले नवाब आजमुल उमरा
बाहादुर यांनीं ——————— १
५००० माहे जिल्हेज मोहरमचे आजुरपाचे खर्चा क-
रितां दिा नवाब आजमुल उमरा बाहदुर रोखे २
१५०० ३५००

•९००० रोखे सुा २०

११६०००

यांस भरणा ताा ——————— रु॥

७७००० नगदी वसूल दिल्हा.

१०००० माहे राावल कार्तिक.

५००० गुा ननुमल.

५००० गुा भगवंत ना बुडुक.

१००००

८००० माहे राखर मार्गशीर्ष.

५००० मा जमनादास हुमणाबादेचे हुंडिावा.

३००० मा व्यंकटीदास.

८०००

८००० माहे जाावल पौषमास.

५५०० मा व्यंकटीदास.

२५०० मा जमनादास.

८०००

६००० माहे जाखर माघमास मा व्यंकटीदास.
६००० माहे रजब फाल्गुण मास मा ननुमल.
६००० माहे साबान चैत्रमास मा ननुमल.
१००००० माहे रमजान आधिक वैशाख मा ननुमल
६००० माहवारी बाबत
४००० स्वारी खर्चाकरितां

१००००

६००० माहे सवाल वैशाख मास मा ननुमल.
७९०० माहे जिल्काद ज्येष्ठ मास मा ननुमल.
६००० माहवारी बा.
१९०० मोहरमाबाबत ९००० पैकी.

७९००

९९०० माहे जिल्हेज आषाढ मास मा ननुमल.
६००० माहवारीबा.
३९०० मोहरमाबा ९००० पैकीं

९९००

७७०००

२९००० रदकर्जाबा वजा पठणचे स्वारीबाबत व मोहरम मिळोन.
२००० माहे शाखर मार्गशीर्ष.
२००० माहे जाबल पौषमास.
३००० माहे जाखर माघ.
३००० माहे रजब फाल्गुण.

३००० माहे साबान चैत्र.
३००० माहे रमजान अधिक.
३००० माहे सवाल वैशाख.
३००० माहे जिल्काद ज्येष्ठ.
३००० माहे जिल्हेज आषाढ.

२५०००

१४०००. करमाळ्यांतील खर्चाबाबत.

२००० माहे जाखर माघमास.
२००० माहे रजब फाल्गुण.
२००० माहे साबान चैत्र.
२००० माहे रमजान अधिक.
२००० माहे सवाल वैशाख.
२००० माहे जिल्काद ज्येष्ठ.
२००० माहे जिल्हेज आषाढ.

१४०००

११६०००

एक लक्ष सोळा हजार रुपये माहे जिल्हेज आखरपर्यंत सदरहुचा जमा. खर्च करावा. छ. ७ जिल्हेज आर्बातिसैन सन फसली १२०३.

यादी राव रंभा यांजकडे ऐवज भरण्याचा झाडा सन १२०२ ईा रावल कार्तिक ताा जिल्हेज आषाढ सन १२०३ नगदी भरणा बाा याद रुा ७७००० पो आंदा गोविंदराव यांजकडून.

२०००० नगदी परभारा.

५००० माहे रावल माा ननुमल.

५००० माा जमनादास हुमणाबादे बाबत हुंडीचे माहे राखर.
१०००० ननुमल दोन माही ऐवज पुण्याहून सरबरा (?)केली.
५००० सखाराम बाळाजी कडून.
५००० रघुनाथ पंताकडून.

१००००

१९००० हुंड्या पुण्यावर केल्या.
५००० भगवंत नाइक बुडुख याची माहे रावल.
२००० ननुमल याचे विद्यमाने माहे साबान.
९००० किता ननुभल याचे मारफत माहे रमजानीं.
२५०० ३५०० २०००
१५०० ० ०

९०००

३००० भगवंत नाा बुडुख याची माहे सवाल

१९०००

१०००० पुण्याहून हुंडी खुशालचंद किसनदास याचे दुकानची पाठविली ते

४९०००

बाकी येणें ——————————— रुपये.

२८०००

ताा

७००० गुा व्यंकटीदास रुपये १७००० पो हुंडी बा बजा

१०००० बाकी
२१००० गुा ननुमल.

२८०००

यकूण आठावीस हजार रुपये मुबादला माहे जिल्हेज आषाढ मासपर्यंत पडला पुढें श्रावण मासापासोन माहवारीचा भरणा आलाहिदा छ. ७ माहे जिल्हेज आर्बातिसैन सन फसली १२०३.

श्री.

आषाढ शुद्ध ८ मंगळवार शके १७१५.

विनंति. उपरि रावरंभा प्रकर्णी माार. मौजे जवळे हा गांव बांदलाकडे होता तो तुह्मी त्यास कर्ज देऊन आपल्याकडे करून घेतला. बांदल वारला, सबब बाजीनीं त्या गांवची जप्ती हलीं करविली ऐसें ऐकलें. त्यास आपला ऐवज बांदलाकडून किती येणें हे ताा वार ल्याहावें ह्मणजे यासी बोलून ऐवजाचा फडच्या होईल तेव्हां गांव स्वाधीन करावयाचा. उत्तर लौकर यावें. रंभाजी याजकडील जप्ती बसून द्यावी. कलम ——————— १

तर्फ प्रकर्णी व बाबले समंधीं उत्तरें पेशजी पत्राचीं आद्याप आलीं नाहींत, पाठवावीं. कलम ——————— १

बजाजी पंत दफ्तराचे पेंचांतुन मोकळे जाले. मध्यस्तापर्यंत पंचाइत जाली. यामुळें बाजीची मर्जी यांजवर कांहीं उदासीन आहे. एक वेळ मध्यस्तासी व बाजीसी बजाजीपंताविषीं बोलून बंदोबस्त होईल तो मागाहून लिहूं. कलम ——————— १

उंदरतप्याचा पाटिल येथें आला आहे. त्याचे भावाबंदाकडे येक हजार रुपये बाजीचें येणें. सबब यानीं चिठी केली. याचा माार वास्तविक कसा तो ल्याहावा. त्याप्रा बोलून बंदोस्त करतां येईल. कलम ——————— १

वराता बाजीनीं पेशजी साडे सोळा हजाराच्या केल्या, त्या फिरल्या,

ऐवज पावला नाहीं येविषीं मध्यस्तांनीं सांगितल्याप्रो। पेशजी लिहिलें, त्याचें उत्तर यावें. कलम ——————————— १

बाजीनीं गोपाळराव बक्षीस पुण्याकडे रवाना केलें. सिरसावचे जाबसाल करितां ह्मणोन बोलतात; परंतु आंतून बाबाराव यांचे विद्यमानें पाटील बाबा कल्याणराव यांजकडे गेले ऐसेही ऐकण्यांत. त्यास तेथे याचा शोध करून काय डौलावर आले हें सावधगिरीनें बातमी ठेऊन त्याहावें. येथील बंदोबस्त करणें तो करितां येईल. कलम ——————————— १

६

कलमें सुमार साह रा। छ. ७ जिल्हेज हे विनंति.

श्री.

आषाढ शुद्ध ८ मंवळवार शके १७१५.

विनंति. उपरि, ननुमल याचे विद्यमानें येथून पेशजी तुम्हावर हुंड्या नऊ-हजाराच्या व भगवंत नाईक याजकडील तीन हजाराच्या ऐशा रावरंभा यांचे माहवारी समंधें केल्या. पैका कांहीं ऐवज पावला व बाकी देणें तो दिल्हा नाहीं येविषींचा बोभाटा पुण्याकडून हरदो साहुकाराकडे आला. त्यास हुंड्यांचें काम नाजूक, तुह्मांस सर्व माहीत; याअर्थी येथून पेशजी हुंडया केल्या त्याचे मुदतीप्रों ऐवज पावता केला असल्यास उत्तम. नसल्यास ऐवज देऊन भरपाया करून घ्याव्या व ऐवज पावता झाल्याचें इकडे लिहावें. त्याप्रों उभयतांस सांगून हुंड्याबाबत ऐवज पावला नाहीं याजमुळें ननुमल व भगवंत नाइक बहुत घाबरे. आम्ही खातरजमा करून सांगितलें कीं हुंडीस हरगीज दिकत होणार नाहीं. तुम्हास सूचनार्थ लिहो असे. ऐवज पोंचवून उत्तर पाठवावें. रा। छ ७ जिल्हेज हे विनंति.

श्री.

आषाढ शुद्ध ८ मंगळवार शके १७१५.

विनंति. उपरि शंकरदास साहुकार हैदराबादकर यांजकडे वानवळे हरबाजी

ना॥ यांचा ऐवज सतराशें रुपये याजकरितां पैठणांत गोपाळ ना॥ यानीं शंकरदासाचा पुत्र मनुलाल यास आटकेंत ठेविलें. रोशनराव व भावसिंग चौधरी यानीं रदबदल फार केली; सबब तीन च्यार पत्रें वानवळे यांस पाठविलीं, तुह्मांसही लिहीं, परंतु अद्याप त्याची सुटका जाली नाहीं. सांप्रत भावसिंग चौधरी यांनीं शंकरदासाची हवेली गहाण ठेउन वस्तवानी तडामोडा करून सतराशें रुपयांची साहुकारी खातरजमा करून दिल्ही कीं मनुलाल येथें येतांच साहुकारानें सतराशें रुपये द्यावे; व्याजाचे कांहीं ह्मणों नये. याप्रा॥ ठरून आह्मीं गोपाळ नाइक वानवळे यांस मुजरद जासुदाबराबर पत्र पा॥ आहे कीं याप्रा॥ ऐवज मनुलाल येथें आल्यावर फडच्या होतो. या पत्रावर बहुतकरून वानवळे मनुलाल यास इकडे पाठवितील. कदाचित् व्याज वगैरेची हरकत केल्यास तुह्मी साफ तिकडून त्यास लेहून रंगोबा नाइक यास सांगोन मनुलालाची सुटका होऊन इकडे पाठवीत ऐसें करावें. रा॥ छ. ७ जिल्हेज हे विनंति.

श्री

आषाढ शुद्ध ८ मंगळवार शके १७१५.

विनंति. उपरि राजश्री आनंदराव नरसिंह येथें आले, भेट जाली, वर्तमान समजलें. माारनिलेनीं हलीं पत्रें पुण्याकड दिल्हीं आहेत तीं रवाना केलीं बि॥

१ तुमचे नांवे लखोटापत्रें पाहून उत्तरें यावीं.

१ मालोजी राजे घोरपडे यांचा लखोटा.

१ अबदुल गनीखां हकीमजी आदितवार पेठेंत.

१ बालंमा देसाई गुंड मटकलकर लखोटा सिदगीर गोसावी याचे मठांत अथवा आपाजी बाबाजी आठवले यांजपासी द्यावा.

—

४

सदरहू च्यार लाखोटे जिकडील तिकडे पावते होऊन उत्तरें येतील तीं इकडे रवाना करावीं. रा॥ छ. ७ जिल्हेज हे विनंति.

टपा रवाना पुणें छ. १९ रोज.

आषाढ व. १ बुधवार शके १७१५

राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसीं.

विनंति. उपरि तुह्मी छ. २९ माहे जिल्कादचीं पत्रें पाठविलीं तीं छ. ९ माहे जिल्हेजीं पावलीं. याचीं उत्तरें राजश्री नानाचे नांवाचीं पत्रें दिल्हीं. सर्व मजकुर समजला म्हणोन लिहिलें तें कळलें. कलम. ——— १

होळकर महेश्वरास येणार म्हणोन लिहीं तें कळलें. इंदुरास आले. आलीकडे हि येतील. सरदारीची मजा राहिली नाहीं. स्त्री नायेक, बाल नायेक आणि बेमसलहत—तीन गोष्टी येके ठिकाणीं चवथा अहंकार, तेव्हां ईश्वर त्या सरदारीची आबरो ठेवील तर ठेवो! कलम ——— १

सुरापुरकराचे कारभारी येथें आले, सरकारांत बोलून येकोपा ठरला, देवदुर्ग नजर वगैरे ठराव जाहला, नवाबास साहित्यपत्रें दिल्हीं, इत्यादिक तपसील या उपरि लिहीन म्हणोन लिहीं. त्यास साहित्यपत्रें व गोपाळ आपा यानीं लवकर यावें, देवदुर्गप्रकर्णी याचें मनांत विपरीत आलें आहे. तिकडे फौज मध्यस्तानीं कांहीं बंदोबस्ताविसीं पाठविली ऐसें ऐकण्यांत. शोध घेऊन बोलण्यांत येईल. परंतु तिकडून पत्रें जरूर लवकर यावीं म्हणजे बोलण्यास दुहेरी नेट पडेल विस्मरणांत येऊं नये. कलम ——— १

राजश्री पाटील बावा सरकारवाड्यांत दोन वेळ व येक वेळ नानाचे येथें आले होते. तीन खलबतें जालीं. श्रीमंतांचें दैव थोर! राजश्री नाना, तात्या, पाटीलबावा, तिघेहि थोर समंजस, तिघांसही दौलतीची काळजी आहे, इत्यादिक मजकूर लिहिला तो कळला, त्यास ईश्वराजवळ हेंच मागणें आहे त्रिवर्गाची ऐकता (ऐक्यता) यांतच दौलतीची बोहबुदी आहे. कलम ——— १

बाळाजी व्यंकटेश व येमा खिदमतगार आले. ज्या कामास आले तें होत आहे. त्यास आपली निशा होऊन चिठी आली पाहिजे, याविसीं कसें म्हणोन लिहीं. त्यास निशा जाली. परंतु येक चिठी येणें त्याचा खोळंबा आहे. त्याविषईं पूर्वी लिहीं आहे त्याप्रमाणें सैदास सांगून चिठी आणून पाठवावी. त्या ग्रहस्ताकडील पत्र आम्हास आलें होतें, त्याचा जबाब आम्हीं पाठविला कीं

चिटी लवकर यावी. त्याविसीं खोळंबा आहे, ताकीदपत्रें तयार आहेत, चिटी आली म्हणजे पत्रें तुम्हासी पोंचतील. त्यास येविषईं तुम्ही सैदास सांगून करवावें कलम.——१

पांच कलमें रा छ. १९जिल्हेज हे विनंति, चीनापटणच्या दोन आखबारा पा आहेत. प्रा करावें; हे विनंति.

श्री.

आषाढ व. १ बुधवार शके १७१५.

विनंति. उपरि, तूर्त मोठा कारभार सिंदेप्रकर्णी. प्रातःकालीं तर बनत नाहीं. तृतीये प्रहरीं दरबार. त्या अवसरांत जितका कारभार होईल तितका; प्रस्तुत घरच्या कामामुळें तर दुसरीं कामें होतच नाहींत; इत्यादिक मजकूर लिहिला तो सर्व कळला. त्यास दौलतीचें काम मोठें. यास दोन वेळ दरबार जाल्याखेरीज कसें होईल? दुसरे, दरबारचे जाबसाल तटून राहतात आणि त्यांचे तगादेहि लागत असतांना जाब मिळत नाहीं. याचा खियाल इतर दौलतदार काय करतील तो करोत! कलम——१

जावीतजंगप्रकर्णी पत्रें पावतीं केलीं. उत्तरें घेऊन पाठवितों. गोविंदराव खटपट फार करितात ऐसें बोलिले म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास उत्तरें लवकर पाठवावीं. यास दिरंग पडला म्हणजे मनुष्यास उमेद राहत नाहीं आमचे खटपटीचें रूप करणें खावंदाकडे. कोणतें म्हणाल त्यास जाबसालाचें उत्तर होऊन गोष्ट मार्गास लागली म्हणजे करावें त्याचें सार्थक. नाहीं तर वंध्यामैथुन; ऐसें होतें हें तात्पर्य. कलम——१

सरकारचे फराषखान्याचा सरंजाम पानगलास आटकावावा आणि नवाबाकडील लांकडाविसीं आम्हीं दस्तकें द्यावीं कीं काय ऐसें राजश्री नाना आफ्त्यास लिहिणार ह्मणोन लिहीं तें कळलें. पत्र आलियावर त्याचें उत्तरही समर्पक लिहिण्यांत येईल. कलम——१

वराड प्रांतांतील खुर्दाची चाल कसी असावी याचा नेम आपण लिहिला व खुर्दा पाहवयासी पाठविला त्याजवरून उमरखेडकर यांस राजश्री नानांनीं ताकीद केली याचा मजकूर लिहिला तो समजला. कलम——१

पाटील बाबास लग्नाची मेजवानी सरकारवाडयांत जाली. त्याचे स्त्रीस ऋतु प्राप्त जाला म्हणोन श्रीमंतास आहेर घेऊन गेले होते इत्यादिक लिहीं तें क. कळलें. कलम ——————————— १

टिपूचे मसलतीविसीं पुढें तींही सरकारांनीं कसें चालावें याची याद आपणाकडून आली व मालीटही निकड करीत आहे. हररोज घोळ—पाटीलबाबाचें एकमत, राजश्री नानाचे एकमत—म्हणोन लिहीं तें कळलें. त्यास पाटीलबाबाचें म्ह(ण)णें दौलतीचे दाढ्यांचें परंतु सर्वांची येकवाक्यता होऊन घडणें कठीण! याजकरितां नाना म्हणतात हेंच खरें. परंतु त्यांतहि येखादी दरज राखून जाल्यास चांगलें. संकट आहे! केवळ हात बांधून देणें हेंहि चांगलें नाहीं. न दिल्यास गत नाहीं. याविसीं खावंदास समज होऊन आंगेजीनें करावें तर परिणाम नाहीं. तर नाना तरि काय करतील? दौलतीचे नसीबीं असेल तेंच घडेल आणि करणें प्राप्त ! जाव लवकर येत नाहीं याजकरितां नित्य येथील निकड आहे. त्याचा बयान काय लिहावा? कलम ——————————— १

नवाबाकडील लांकडाचे खरिदीस रघोतमराव यांजकडील कारकून गेला. खरीदी पुरू झाली. ऐवजाची चिठी आपण तात्यावर दिली. त्यास ऐवज देतात म्हणोन लिहीं तें कळलें. याप्रकर्णी मध्यस्त बाजुरांत बो(ल)ले त्याची पुरवणी आलाहिदा लिहिली असे. कलम ——————————— १

पुण्यावर आरंभापासून पाउस नाहीं. वर्कड सर्वत्र आहे. याचा विस्तार लिहिला तो कळला. त्यास रघोत्तमराव याची आखबार छ.२९जिल्हेजची नवाबाचे येथें आली त्यांत चवथे माहेमाारापासून पर्जन्य पडत आहे म्हणोन लेख होता. आतां जाहलाच असेल. इकडे पिकाचे उपयोगी पर्जन्य जाले. कलम १

आठ कलमें रा॥ छ. १९ जिल्हेज हे विनंति.

श्री.

आषाढ व. १ बुधवार शके १७१५.

विनंति. उपरि

सर्व समजोन आहे. हरयेक कामास दिवसगत लागती असें वाटतें. परंतु

कारणाखेरीज नाहीं ह्मणोन लिों. त्यास समजोन दिरंगावर पडल्यास चिंता नाहीं. परंतु सर्व कामें तशींच नाहींत. कोणतीं दिरंगावर, कोणतीं जलदीनें करावीं याचा विचार असावा. सारीं कामें येकसारखीं असें असूं नये. पाटील कुळकर्णी यांचे जवाब येण्यास महिने लोटले; अद्याप कांहीं नाहीं. त्यांत कुळकर्णी यांची तो अति निकड–सांगतां येत नाहीं. पत्राचा जाब येणें यास किती महिने जाले! आद्याप कांहींच कळतही नाहीं याजवरून आमची मनाची तसती कसी होईल? ऐसें नित्य पुसतात. कांहीं बाहना सांगून ठेवितों. बाहना तरी किती दिवस? आतां पत राहत नाहीं. जवाब मात्र यावयाचा संदेह असल्यास पत्र त्यास दाखऊन माघारें घेऊन ठेवण्यांत येईल तेव्हां त्यांचें पत्रही माघारें घ्यावें लागेल. त्या पत्रासुद्धां जवाब लवकर पाठवावा ह्मणजे ठीक. कलम. १

१ तुर्ही पत्रें पाठविलीं.

२ रामचंद्र याचे चिरंजिवाचे नांवे लखोटे.

१ रघोत्तमराव याची अर्जी पंनास हजार सुरापुरचे पावले ह्मणोन मध्यस्तास.

१ माधवराव मुरार यांस.

१ बाळाजी रघुनाथ यांचा लाखोटा.

१ थोरला लाखोटा.

१ किता लाखोटा.

७

सात लाखोटे पावले. कलम—

१ बाळाजीपंत बारामतीस जाऊन पांडुरंग रघुनाथ यांस आपलेकडे रवाना करून येथें आलीयावर लवकरच रवाना करतों ह्मणोन लिहिलें त्यास उत्तम आहे. कलम.— १

१ जुंजयातीचे सात कलमें ठराविलीं त्याची नकल रघोत्तमराव यांनीं केली ह्मणजे लष्कर आपलेकडे पाठवितों ह्मणोन लिहीं तें कळलें. त्यास लष्कर लिहावें. त्याचा सिधांत काय हाही लिहावा. त्या धोरणानें बोलावयासी येईल. कलम.—

१ रामचंद्र दादो यांचे चिरंजीवाचे नांवाचे लाखोटे पाठविले. कलम—

१ मुकुंद जोसी याचे जमिनीचे दुमोहरीचे तयारीस पुरवात केली. कलम. —

१ बाळाजीपंत यांजवर बाजीनीं नाहक पेंच आणला यास्तव आपण त्यास बोधरूप च्यार गोष्टी सांगून यांचे त्याचे मिळवून द्यावें ह्मणोन लिहीं. त्यास तसेंच होईल. कलम—

१ सुरापुरकर याजकडील भरणा—

१००००० सुरापुराहून रोख वैद्यज बापु सिवदत्त याचे मारफत आला तो नवाबाचे खजान्यांत पावता करून तुमचें नांवें आहीं रसीद लिहून सुरापुराकडे पाठविली.

९०००० पन्नास हजाराची आर्जी रघोत्तमरावबाची तुह्मीं पाठविली ती मध्यस्तास प्रविष्ट केली.

९०००० बापु सिवदत्त याचा रोखा आषाढ वद्य १ मुदतीचा पाठविला तो पावला. त्याचें बंधू ह्मणाले भरणा जालीयावर तुह्मांस लिहन पाठवूं.

२००००

सदरहु अन्वयें भरणा जाला. रघोत्तमराव यांजकडील वैद्यज पैकीं दाहा हजार कोणास देविले ? बाकी तसेंच असूं देणें ह्मणोन लिहीं. यांप्रमाणें मध्यस्तांनीं नवाबापासि तपसीलवार बयान केला. कलम— १

८

९ येकूण आठ कलमें रा॥ छ. १९ जिल्हेज हे विनंति.

श्री

आषाढ वद्य १ बुधवार शके १७१५.

विनंति उपरि.

१ जीवनराव पांढरे यांचे प्रकर्णी हिशेबाचे कागदपत्र कचे पाठउन देतों. त्यास हणमंतराव येथें आहे. तसाच गोपालराव जिवाजीपंत तर साहीत्यावर! फत्तेसिंग निमित्य पाहतात. याजकरितां समेटून करीत करीत करावें. आनंदराव तेथें आहे त्याचे तोंडावर हात फिरवावा. जीवनराव, आपण याचा विचार करून लिहावें. तसें करीन ह्मणोन लिहीं. त्यास तुह्मी लिहीं त्याप्रमाणेंच तोंडावर हात फिरवून ढकलावें; परंतु त्याचे हातीं यैवज मात्र जाऊं नये; यैसें जीवनराव यांचें ह्म(ण)णें. आनंदराव यान्ची चाली खोट्या. सजावरुदौलाकडील यैवज निठुर वगैरे आपल्या कर्जाच्या यैवजांत घ्यावा ह्मणोन तुमचीं पत्रें आलीं. यावरून त्यांकडे आह्मीं सांगून पाठविलें. यावरून आनंदराव यांनीं मध्यस्तास सांगविलें कीं मामलतीसमंधें जीवनराव यांजकडे सरकारचा यैवज येणें त्यांत माहाल लाऊन दिल्हे आहेत आणि निठुरचा यैवजही लाविला आहे हीं घ्यावा. त्याजवरून त्यानीं रायरायांस विचारिलें. यानीं सांगितलें:—त्याचे दस्तयैवज पाहून सांगेन. यैसा प्रकार आनंदराव यांचा. याजकरितां तुह्मी कोठेपरियेंत झांकीत बसाल? तथापि तोंडावर हात फिरवून तुह्मास लिहून पाठऊं. जीवनराव यांचा पक्ष दरबारी. तेथें सोडूं नये, खचित असावें, याविषई आलाहिदा पुरवणी लिहीली आहे. ती रवोत्तमराव यास दाखवावी. कलम—— १

१ तात्या वेाक यांजकडील वीस हजार रु॥ त्याविसीं फार निकड समजून आपाजी बाबाजी यांजकडून येक महिन्याची खातरजमा करविली. त्रिमलराव बाबद सा हजार त्याविसीं बोलतात त्यास आश्याचा यैवज ठेऊं नये; आपल्याकडून हुंडी जालीयास पाठवावी ह्मणोन लिहीं. त्यास वीस हजाराचा हवाला आपाजीपंत यांचा दिल्हा. बरें केलें! साहा हजार त्रिमलराव बाबत येथें मारनिलेकडील सदाशिवपंत यांस दिले. हुंड्या

पाठविण्याविसीं लिहीं; त्यास तूर्त सोयें नाहीं. बाळाजीपंत यांची लष्कर रवानगी केलियावर सर्व समजून हुंडी पाठविण्यांत येईल. आपाजी बाबाजी व तुह्मीं आपलेकडील हिशेब माारनिलेबरोबर पाठवावा. कलम--

१ श्रींगेरीकर स्वामी यांस सरकारांतून हजार रो देविले ह्मणोन सांगितलें, त्याजवरून दिल्हे ह्मणोन लिहीं तें कळलें. कलम-- १

१ सुकलाल याजकडील हिशेब कितेक समजला आसाल. बाळाजीपंत याजबरोबर सर्व सांगून पाठवावे. कलम-- १

—

४

च्यार कलमें रा॥ छ. १९ जिल्हेज हे विनंति. नवाबाकडून येक ग्रहस्त फौज ठेवावयाकरितां आला, त्यास धरले याचा मजकूर लिहिला तो कळला.

श्री.

आषाढ वा॥ १ बुधवार शके १७१५

मध्यस्ताचा उद्गार निघाला तो राजश्री नानास लिहिला आहे. त्याजवरून कळेल. हे विनंति.

पु॥ राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेशी. विनंति. उपरि छ. १३ जिल्हेजीं ईदीचे नजरेकारितां आह्मी नवाबाकडे गेलों. मध्यस्त समीपच होते. लोकांच्या नजरा झाल्यानंतर मध्यस्तांनीं अर्ज केला कीं, पुण्याहून चोबीना खरेदी करविला, त्यापैकीं पंच्यायेंसी हजार रुपयाचा खरीदी जाला. पांचगजी नावा मिळाल्या. साहागजी व सातगजी तेथें नाहींत. सबब संगमनेराकडे खरीदी करण्यास गोविंदराव भगवंत यांनीं एक कारकून व रघोत्तमरायाकडील एक याप्रा॥ रवाना जाले आहेत. दोन लाख रुपयापैकीं पंच्यायेंसी हजाराचा चोबीना खरीद जाला. बाकीचा तेथें होणार. त्यास कोंकणपटीचा चोबीना भीमेचे पाण्यानें ताफे बांधून कलबर्ग्यास येईल. तेथून बेदरास आणावा लागेल. ताफे बांधण्याकरितां लांकडें खरीदी

करावीं लागतील यैसेंही रघोतमराव यांनीं लिहिलें. सदर्हूप्रों चोबीना कलबुर्ग्यास येईल. मुजाका नाहीं. लेकीन संगमनेर प्रांतीं जो चोबीना खरीदी होईल तो गंगेचे पाण्यानें वंजरासंगमास आणावयाचा पहिला बेत होता. परंतु यांत मोठी अडचण आहे कीं वंजरा-संगमास चोबीना दाखल जाल्यानंतर तेथून बेदरास वंजरेचे पाण्यानें येणें मुष्कील. सबब कीं, वंजरेचा बोघ फार नीच आहे. तेथून येणार नाहीं. ज्या ठिकाणीं चढवून आणावयाचा तेथून आणावयास प्रयत्न फार. याकरितां वंजरासंगमास चोबीना न आणितां गंगेचे पाण्यानें नांदेड येथें आणावा. तेथून बेदरास आणावयाची तजवीज वंजरेनें अथवा भारबरदारी पाठवून खुष्कींतून जशी सोये तशी करितां येईल. याप्रों अर्ज केल्यावरून गंगेचे पाण्यानें नांदेडास चोबीना आणावा याप्रों नवाबांनीं फर्माविलें. भीमोघानें कलबर्ग्यास येणार याची सलाह कशी? ह्मणोन महमद अजीमखां यांस मध्यस्तांनीं विच्यारिलें. त्यांनीं सांगितलें कीं कलबर्ग्यानजीक फेरोजाबाद व शाहाबाद हे दोन गांवं भीमातीर तीन कोस कलबर्ग्यापासोन आहेत. तेथें चोबीना आणवावा. तेथून भारबरदारी सरंजाम पाठवून बेदरास आणावयाची तरतूद होईल. याप्रों बोलणें जालें. रघोत्तमराव यांनीं मध्यस्तांस लांकडाविषयींचा माार लिा. त्यावरून मध्यस्तांनीं सदरहूप्रों बयान केला. याजवर हें बोलणें जालें. लांकडाविषींचा व बंदुखाचा माार तुह्माकडून इकडे कांहींच लिहिण्यांत आला नाहीं. येथें बोलणें जालें तें कळावें सबब लिहिलें असे. र॥ छ. १९ जिल्हेज हे विनंति.

श्री.

आषाढ वा १ बुधवार शकें १७१५.

विनंति. उपरि मध्यस्तांनीं नवाबास अर्ज आह्मी समीप असतांच केला कीं चोबीना खरीद करण्याकारितां हरि पंडतजी यांजकडून वैवज येणें. त्यांचें पत्र, येक लाख बयाणा व हजार रुपयांचें, यांचें घेऊन पुण्यास पों होतें. त्यापैकीं सत्तर हजार रा नगदीं देतों, बाकीचाही कांहीं वैवज येथें देवितों,

व तेथून कांहीं गोविंदराव यांजकडून देवितों याप्रा तात्यांनीं रघोत्तमराव यांस सांगितलें. याप्रों रघोत्तमराव यांनीं लिों ह्मणोन मध्यस्तांनीं अर्ज केला. त्यास तात्या यांनीं यैवज तेथें किंती पटला व द्यावयाचा किती आणि आह्मांकडून किती देवितणार हें तुह्मीं कांहींच न लिों. त्यास याचा तपसील आधीं इकडे ल्याहावा. ह्मणजे येथून ऐवज देणें लागेल त्याची तरतूद आगाऊ जाली पाहिजे. यास्तव आधीं सूचना ल्याहावी. रा॥ छ. १९ जिल्हेज हे विनंति.

श्री.

आषाढ वा १ बुधवार शके १७१५.

विनंति. उपरि रावरंभा यांस यैवज तुह्मीं पुण्याकडे गेल्या ता॥ जिल्हेज आखर पावेतों येकंदर दिल्हा. याचा ता॥ पेशजी लिहिल्यावरून समजला असेल. साडें सोळा हजार रुपयाच्या वराता रावरंभांनीं हरिपंतावर आपल्या यैवजाच्या केल्या होत्या. त्या फिरोन आल्या येविषीं त्यांनीं मध्यस्तास बोभाट सांगितला. मध्यस्त आह्मासी बो(ल)ले त्याचा तपसील तुह्मांस लेहून फार दिवस जाले. परंतु उत्तर आलें नाहीं. त्यापैकीं जाधव मारवाडी यास येक हजार रुपये देण्याची निकड रावरंभांस भारी वसली. त्यांनीं मारवाड्याकडे नवाबाचे सरकारचा यैवज पटीबाबत, त्यांचे मागें चोपदार सबब, बाजींनीं या वरातेपैकीं यैवज त्यांस लाऊन दिल्हा. दोन महिन्यांचा वायदा तोही होऊन गेला. मध्यस्त आह्मासी बो(ल)ले येक हजार रुपये यास वराती. यैवजीं द्यावे. तुम्हांकडून उत्तर आल्यानंतर द्यावे यैसें होतें. परंतु इकडून जीं पत्रें लिहिण्यांत येतात त्यांचीं उत्तरेंच येत नाहींत. प्रसंगास तर अशा अडचणी पडतात. यैवज देणें प्राप्त. तेव्हां वरात व कबज घेऊन येक हजार रुपये दिल्हे. कळावें. तुम्हीं म्हणाल कीं, रावरंभांकडे यैवजाचा भरणा बेमुवलग जाला. हा यैवज उगवेल कसा? त्यास हें सर्व खरें आहे. परंतु येथें मध्यस्तांसी बोलण्यांत येतें. उत्तर येतच नाहीं. येथील तर निकड या तऱ्हेची—अचडण! तेव्हां समजोन यैवज द्यावा लागतो. उपाय नाहीं! या-

स्तव पत्राचे मार यार्ची उत्तरें वरचेवर लिहित जावीं. त्याप्रों मध्यस्तासीं बोलण्यांत येत जाईल. रा छ. १९ जिल्हेज हे विनंति.

श्री.

आषाढ वा १ बुधवार शके १७१५.

विनंति. उपरि राजश्री जीवनराव पांढरे यांजकडे येवज येणें. यास्तव पा। अवराद व निटूर या दो माहालाचा येवज मोकाशाचा आटकाऊन ठेवावा व मारनिलेचे आणि आनंदराव सभापत यांचें रहस्य करून द्यावें इत्यादिक मार तुम्हीं लिहिला. त्यावरून सजावरुदौला यांजकडे सांगोन दो माहालचें मोकाशाचा येवज सन १२०२ सालचा आटकाऊन ठेविला. जीवनराव यांचें आनंदरायाचें रहस्यही करून द्यावें या तजविजींत असतां आनंदराव यांनीं परभारा सजावरुदौलाकडे राजयाजी यांचा निरोप पाठऊन येवज आम्हांकडे न द्यावा यैसें सांगितलें होतें व मध्यस्तासही परभारा सुचविलें कीं, हसनाबाद व येकहली हे दोन माहाल पांढरे यांजकडे नग्राबाचे सरकारचा येवज येणें त्या येवजीं सरकारांत घेतले आहेत. त्याचप्रा। सरकारचे रदकजीं आवराद निटूरचा येवज द्यावा याप्रों सांगोन येवज आपल्याकडे येणें असतां असी दिकत घातली हेंही मध्यस्ताकडूनच आम्हांस समजलें. आह्मीं उत्तर केलें कीं, दोन माहाल पहिलेच आपले रदकजीं आहेत. आवराद व निटूर हे जीवनराव यांजकडे चालते माहाल. याचा येवज घेण्याची सा। काय? तेव्हां मध्येस्तांनीं राजयाजीस सांगितलें कीं, यांचा दस्तयेवज पाहण्यावर ठरलें आहे. सारांश तुम्हीं लिहिलें कीं, आपला येवज येणें सा। ते माहालचा येवज आटकाऊन जीवनराव याजकडे न द्यावा. त्याप्रों केलें असतां आनंदराव यांनीं परभारा याप्रों उपस्थित केलें. यावरून आश्चिर्य वाटतें कीं तुमचीं पत्रें येतात तीं कसीं! खोत्तमराव यांचेंही पत्र आलें तो प्रकार कसा? आणि वर्तणुकींत आनंदराव यांची चाल हे! तुम्हींच समजावें. रा छ. १९ जिल्हेज हे विनंति.

श्री.

आषाढ वा १ बुधवार शके १७१५

राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसीं.

विनंति. उपरि प्यादे दि॥ रामजी नाईक गलांडे नि॥ सरकार यास पेशजी माहागाईमुळें पटगचे स्वारींत व हैदराबादीं आगाव ज्याजती रोजमरे च्यार, खर्चास नाहीं सा, दिले; तो यैवज उगवून घेतला पाहिजे, येविषयीं तुम्हास जातेसमयीं सांगितलें होतें. परंतु अद्याप यैवजाचा फडच्या करून घेतला नाहीं. तर येविषीं राजश्री नानास विनंति करून यैवज उगवावा. न उगविल्यास हे गरीब बुडतात; व आपला यैवज फसतो. याची काळजी आपणास असावी. याजकरितां लिहों असे. तर हें काम आधीं करून घ्यावें. येविषीं बगाजी प्यादाही तुह्मा समागमें स्मरण द्यावयास दिल्हा आहे. तर यैवज उगवून घ्यावा. रोजमरे तैनात इजारा करून घेण्याची याद तुमचे रूबरू केली होती. ती रोजमुरे याचा यैवज उगऊन घ्याल त्याज समागमें करून घ्यावी. पेशजी रोजमरे आगाव पावले च्यार व यासिवाय तुह्मी गेलियावर आणखी येक रोजमरा ईजाफा, खर्चास नाहीं, ह्मणोन दिल्हा. येकूण रोजमरे पांच. याचा यैवज घ्याद्याकडून उगविला पाहिजे. याजकरितां हे पेचांत; व आपला यैवज उगविला पाहिजे. तर सरकारांत बोलून यैवज उगवावा ह्मणजे हे पेचांतून निघतील; व आपलाही यैवज उगवेल. तर पत्र पावतांच कामाचा फडच्या करून घ्यावा. रा॥ छ. १५ जिल्हेज हे विनंति.

श्री.

आषाढ वा १ बुधवार शके १७१५.

विनंति. उपरि राजश्री मानाजी बळवंतराव देवकांते यांचे पतक सरकारांतून आमचे तैनात आहे. त्यास सांप्रत मोरनिलेस सरंजामसुधा हुजूरचाकरीस येण्याविषीं सरकारची आज्ञा जाली आहे. त्यास येविषीं तुह्मी विनंति करून देवकांते यांस हुजूर चाकरीस येण्याची मनाई व्हावी.

इकडे चाकरीची नेमणूक त्यापक्षीं सरकारचाकरीवर हजर आहेत. रा॥ छ १६ जिल्हेज हे विनंति.

छ १७ जिल्हेजीं येहतषामजंग यांनीं मागितलें सबब.

श्री.

आषाढ वा॥ ३ शुक्रवार शके १७१५.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

पो॥ गोविंदराव कृष्ण सां नमस्कार विनंति. उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें लिहित जावें. विशेष येहतषामजंग नफरुदौला मुबारनुल मुलुक बाहादुर यांनीं शहर बन्हाणपुर येथें किनखाब वगैरे जिनस दाहा हजार रुपयाचा खरीदी करविला. ते जटील कारीगर यांजकडून चौरती कलाबतू तयार तीन हजाराचा करविला. त्यास कारेगर परवानगी मागतात. याजकरितां बाहादुर मवसूफ यांनीं बहुत अगत्यवादानें आग्रास सांगितलें. त्यावरून लिहिलें असे. त्यास येविषीं राजश्री नाना यांस विनंति करून बन्हाणपुरकर सुभेदार यांस राजश्री पाटिलबावा यांचें पत्र कलाबतू व किमखाब वगैरे जिनस दाहा हजारांचा खरीदी करतील त्यास महसूल वगैरे मुजाहिमत न करितां ग्हादारीचें दस्तक वगैरे बंदोबस्त करून देऊन जिनस रवाना करावा. याप्रों निक्षून ताकीद महमद ईसफ तुह्मास सांगतील त्याप्रों द्यावी. रा॥ छ १७ माहे जिल्हेज बहुत काये लिहिणें? लोभ किजे हे विनंति.

छ २० जिल्हेजीं शमषुल उमरा यांनीं मागितलें सबब.

श्री.

आषाढ वा॥ ७ सोमवार शके १७१५.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदराव स्वामीचें सेवेसी. पो॥ गोविंदराव कृष्ण सां नमस्कार विनंति. उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें लिहित जावें विशेष तो मानूर मौ॥ बीड हा तालुका नवाब शमषुल उमरा बाहादुर यांजकडे आहे. तेथील अमिली अबदुल समदखां यांजकडे

आहे. खान मार यांनीं आपल्याकडून तेथें नरसिंगराव नायब यांस ठेविलें. त्याजकडे हिसेबकितेबाचा लडा सबब त्याजला कैद केलें. त्यास तेथील मोकासी माहरणवर वगैरेनीं राजश्री पाटिलबावा यांस गैरवाका समजाऊन तालुकियास लोक पाठवून उपसर्ग करणार ह्मणून बोभाट आला. त्यावरून राजश्री नाना यांस पत्र दिल्हें आहे. येविषीं तुह्मीं विनंति करून बंदोबस्त करावा. तालुकियांतील जमीदारास पुण्यास येण्याविसीं पत्रें पाठविलीं वगैरे उपद्रव फार केला आहे. यास्तव येविषीं बोलून बंदोबस्त करून लेहून पाठवावें. शमपुल उमरा यांजकडील पागेचा तालुका तो नवाबाचा खासगत तालुका यास्तव याचा बंदोबस्त जरूर होणें. येणेंकरून नवाबाचा संतोष हें समजावें. रा॥ छ २० जिल्हेज बहुत काय लिहीं? हे विनंति.

छ. २१ जिल्हेजीं रावरंभा यांनीं मागितलें सबब.

श्री.

आषाड वद्य ८ मंगळवार शके १७१५.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेशीं. पो गोविंदराव कृष्ण सां नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें लिहा जावें. विशेष मौजे जवळें पा हवेली परंडा हा गांव माधवराव बांदल यांजकडे होता. त्याजकडून तुह्माकडे रदकर्जी गांव आहे. त्यास बांदल मार यांचा काल जाला सबब त्या गांवची जप्ती राजश्री रावरंभाजी जयवंत निंबाळकर यांनीं करून कायत यास येथून राजश्री गोपाळराव बक्षीसुद्धां जप्तीचे बंदोबस्तास पाठविलें. त्यास तेथें बाबूराव बल्हाळ यांनीं बांदलाकडील पैका येणें सबब गांवतजप्तीस दिकत केली. याचा बोभाट यांजकडे आल्यावर मारनिलेनीं आह्माकडे सांगोन पाठविलें कीं गोविंदराव यांचा यैवज बांदलाकडे किती? त्यांत जवळें येथील वसूल काय पावला? व बाकी यैवज येणें किती? याचा हिशेब आणवावा. त्याप्रां फडच्या होईल. जप्तीस दिकत होऊं नये. त्यावरून लिहीं असे. तरी बांदल यांजकडे यैवज येकंदर किती, त्यांत वसूल पावला व बाकी येणें याचा हिशेब तात्वार

पाठवावा. रा॥ छ २१ जिल्हेज बहुत काय लिहों? लोभ किजे हे विनंति.

आबाजी बलाळ आवरादकर नि॥ राजश्री हरिपंत तात्या यांचे मागितल्यावरून पत्र लिहिलें असे.

श्री.

आषाद वा॥ १० गुरुवार शके १७१५.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी. पो॥ गोविंदराव कृष्ण सां॥ नमस्कार विनंति. उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहीत असावें. विशेष. राजश्री हरिपंत तात्या याजकडील दुमोहरी सनद मौजे आवराद शाहाज्यानी पा॥ उदगीर येथील सनदेकरितां राजश्री आबाजी बलाळ येथें दोनशें रुपये घेऊन आले होते. त्यास सनद तुह्माजवळ आहे. तरी आबाजीपंत तुह्मास पत्र लिहून सनद ज्यास देवितील त्यास दोनशें रुपये घेऊन सनद द्यावी. रा॥ छ. २३ जिल्हेज बहुत काय लिहिणें? लोभ किजे हे विनंति.

छ. २३ जिल्हेजीं डांकेवर.

श्री.

आषाद वा॥ १० गुरुवार शके १७१५.

राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

विनंति. उपरि अलीकडे तुह्माकडून फार दिवस पत्रें येऊन वर्तमान कांहींच कळत नाहीं. याचें कारण काय? सांप्रत तनखावा॥ वैवजाचा मार वगैरे इकडून त॥ लिहिलें आहे त्यावरून कळेल. राजश्री नाना यांस पत्रें पा॥ आहेत. त्यावरून इकडील मार समजेल. व्यंकट रामदीक याजकडील अखबार व पत्र चेनापटणाहून आलें तें पा॥ आहे. पेशजी पत्रासुद्धां जाब पाठवावे. इकडील पत्राचीं उत्तरें येणें फार राहिलीं आहेत. रवानगी बरचेवर करीत जावी. रा॥ छ २३ जिल्हेज हे विनंति.

श्री.

आषाढ वा। १० गुरुवार शके १७१५

पुा। राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

विनंति. उपरि निर्मळ वगैरे माहालाबाबत स्वराज्याच्या यैवजाच्या तनखा औरंगाबादचे मुक्यावर पेशजी घेतल्या. त्यापैकीं वसूल सरकारांत पावला; व बाकी येणें त्याची याद तुह्मीं पाठविली त्याप्रों मध्यस्तासी बोलण्यांत आलें. यांजकडे अहसनुदौला व कृपावंत यांनीं वसूल पावल्याचें पत्र व रसीदाच्या नकला पाठविल्या. त्यासी व आपले यादीसी मुकाबिला करून येकंदर याद ठरविली ती पा। आहे. त्यावरून ता। कळेल. र।। छ. २३ जिल्हेज हे विनंति.

श्री.

आषाढ वा। १० गुरुवार शके १७१५.

यादी — जावीतजंग मरहुम यांजबाबत माहालचे स्वराज्याचा यैवज नवा. बाचे सरकारांतून ता। सन १२०१ व सन १२०२ पौ। आलल हिसेबी याच्या तनखा अहसनुदौला व कृपावंत यांचे नांवें जाल्या होत्या.

रुपये

४७३९९।॥-।.

पौ। वसूल बमोजीबफर्द मोहरी अहसनुदौला बाहदुर व कृपावंत ता। रजब सन १२०१ हिजरी. १९१२००।॥-।. रुपये.

ता।

१३४३०४।॥= बा। रसीदाच्या नकला.

९६३०४।॥= रसीद बापूजी रामचंद्र व लक्ष्मण तुकदेव निा। गोविंद कृष्ण गोडबोले मुा। कोपरगांव छ १३ रमजान सन १२०२ फसली.

९००० रसीद सखोजीबाजी कारकून निा। सरकार छ. १५ रमजान सन १२०२ फसली.

७३००० रसीदा चिंतामण हरी.

५०००० छ. ६ शवालची रसीद?

२२००० छ. ५ मोहरमचें पत्र.३०१९२।।।=।.

पौ यैवज पटला नाहीं. यैसें पत्रांत सबब मजुरा दिल्हे नाहींत. ७१९२।।।=। बाकी रुपये.

७२०००

१३४३०४।।=

१६८९५।।।=। तनखादारास वसूल दिल्हा ह्मणोन अहसनुदौला व कृपावंत यांनीं नवाबास लिहिलें. परंतु सदरहूची रसीद नाहीं. सबब यैवज मजुरा होणार नाहीं. येसें आमचें बोलणें. यावरून मध्यरतांनीं आपलें पारसी पत्र अहसनुदौलास दिल्हें कीं सदरहू सोळा हजार आठसें पंच्याणव रुपये, सवा चौदा आणे तनखादारास दिल्हे असल्यास रसीद पाठवावी. दिल्हे नसल्यास सदरहू यैवज द्यावा. याप्रों पत्र दिल्हें सबब वसुली घातले.

१९१२००।।।=।

यास ता।। ---------- रुपये

९४०९८।= हा याद रुजू दफ्तर सरकार पुणियाहून आली.

५६३०४।।।= कोंपरगांवची बरात ९९००० पौं.

५००० सखो जिवाजी.

१४७९३।। पोत्यास आले.

१८००० कुराणाकडील बरात जाली त्यास पावले.

९४०९८।=.

१७१०२।८।. ज्याजती वसूल.

४०२०६॥ हा रसीदा चिंतामण हरि.

५०००० किा रसीद.

२३००० किा रसीद.

७३०००

पौं पुणियाहून याद आली त्यांत.

१४७९३॥. पोत्यास आले.

१८००० कुरणाकडील वराती हा.

३२७९३॥.

बाकी ज्याजती.

११८९५॥।८।. तनखादारास वसूल पावला यैसें सुभेदारांनीं लिहिलें येविषयीं मध्यस्ताचें पत्र पो तें.

५७१०२।८।.

१११९००॥।८।.

बाकी ---------- रुपये.

३२२७९०॥।८।.

तपसील.

१०२००० जगधन साहू याचे दुकानीहून पटणचे स्वारीत मध्यस्ताचे विद्यमानें सवातीन लक्ष रुपये कर्ज सरकारांत राजश्री हरिपंत तात्या यांनीं घेतलें त्या येवजीं.

१००००० रदकर्ज सवा तीन लाखाचे रोख्यामागें वसूल जातला.

२००० सदरहू लाख रुपये औरंगाबादीं देणें त्याचे हुंडावणी बाबत.

१०२०००

२२०७९०।।≈। हुंडी चिठी औरंगाबादेवर जगधन साहू याचे दुकानीं नगदी ईा छ २० माहे जिल्हेज पासोन दोन महिन्याचे मुदतीनें छ २० सफरी द्यावे याप्रों.

३२२७९०।।≈।.

तीन लक्ष बेवीस हजार सातसें नवद रुपये सवा पंधरा आणे बाकी तनख्याबमोजीब त्याचा फडण्या सदरी लिहिल्याप्रों छ २३ जिल्हेज मुा बेदर अर्बा तिसईन.

श्री.

आषाढ वा १० गुरुवार शके १७१५.

पुा राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

विनंति. उपरि तनखाचे येवज पो सरकारांत वसुल औरंगाबादचे सुभ्याकडून पावला याचा मुकाबिला पुण्याहून याद आली त्यासी व यांजकडील तेथून सुभ्याचें पत्र व रसीदांसी कारितां कोंपरगांवची वरात व सखो जिवाजी येकूण दोन रकमांचा ताळा यादीसी व रसीदांसी नीट पडला यासिवाय राजश्री दाजीबा यांच्या दोन रसीदा येक पंनास हजारांची व दुसरें पत्र तीस हजार येकसें ब्याणव रुपये सवा पंधरा आण्याचें पैकीं तेवीस हजार येवज पटला म्हणोन पत्रांत लेख. येकूण त्याहातर हजार रुपये पत्राप्रमाणें येवज वसूल लिहिला. व यापों पोत्यास दाखल व कुरणाकडील वरातेबाबत येवज पुण्याचें यादींत बतीस हजार सातसें साडे त्याणव रुपये ह्या रकमा यांचे हिसेबीं आलाहिदा नाहींत. त्या पक्षीं त्याहातर हजारांत असतील. सबब वजा जातां चाळीस हजार दोनसें साडेसहा रुपये पुण्याकडील यादीसिवाय

ज्याजती वसूल राजश्री दाजीबा यांचे पत्रान्वयें पावला. याची रुजगात तेथें पाहावी म्हणजे समजण्यांत येईल.

रा छ २३ जिल्हेज हे विनंति.

श्री.

आषाढ वा १० गुरुवार शके १७१५

पुा राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

विनंति. उपरि तनखाबाबत यैवज येकंदर पौ वसुल वजा होऊन बाकी तीन लक्ष बेचाळीस हजार सातसें नवद रुपये सवा पंधरा आणे निघाले, यापैकीं पटणचे स्वारींत मध्यस्ताचे विद्यमानें जगधन साहुकार याचें कर्ज सवातीन लक्ष राजश्री हरिपंत तात्या यांनीं सरकारांत घेतलें. त्या यैवजीं हलीं येक लाख रुपये वसूल त्या रोख्यामागें घातला. यैवज औरंगाबादीं द्यावयाचा सबब तेथील हुंडावन दर सेंकडा दोन प्रों दोन हजार रुपये यानीं घेतला. हुंडावनीचें बोलणें बहुत होतें. परंतु सेवटीं दोन रुपये प्रों ठरलें. सारांश येक लाख रुपये रदकर्जी वसूल पावला. पेशजी जगधनाकडे भरणा सर बुदेलजंग घासीमिया वगैरे यैवजबाबत एक लाख बतीस हजार नऊसें पंचवीस जाला. हलीं हे लाख पावले. यासिवाय येथून पत्र राजश्री हरिपत तात्या यांस मध्यस्तांनीं पेशजी चोबीना खरीदीकारितां येक लाख व्याणव हजार रुपयाचे मागितल्यावरून दिलें. त्यापैकीं तेथें वसूल काय दिल्हा हें लेहून पाठवावें. म्हणजे येकंदर वसूल रुजू करून रोख्याचा हिसेब व्याजसुद्धां करून पाठविण्यांत येईल. तनख्याचे यैवजीं लाख रुपये हुंडणावळसुद्धां रदकर्जी द्यावे म्हणोन तुमचे लिहिण्यांत आलें, त्यावरून दिल्हें. आणि बाकीची जगधन याजवर चिठी घेऊन पा आहे. चिठीबमोजीब साहुकारा दुकानावर यैवज घ्यावयाचा. अहसनुद्दौला यांस सोळा हजाराविसीं पत्र मध्यस्तांचें पौं आहे हें रवाना करून तगादा करून यैवज घ्यावयास ढील पडूं नये. रा छ २३ जिल्हेज हे विनंति.

श्री.

आषाढ वा। १० गुरुवार शके १७१५

पा। राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

विनंति. उपरि तनखांचे वैवजाची बाकी तीन लक्ष बावीस हजार सातसें नवद रुपये सवा पंधरा आणे निघाली. यापैकीं रदकर्जाबाबत वैवज वसूल रोख्या वैवजीं येक लाख व हुंडावन औरंगाबादची दोन हजार वजा जातां बाकी दोन लक्ष वीस हजार सातसें नवद रुपये सवा पंधरा आणे याची चिठी औरंगाबादेवर जगधन साहू याचे दुकानीं घेऊन पा। आहे. चिठीचा वायदा ईा छ २० जिल्हेज पासोन छ २० सफर येकूण दोन महिन्याचा आहे. सदरहू मुदतीस रोख वैवज घ्यावा याप्रों ठरून चिठी निखालस पा। आहे. सदरहूप्रों तनखाबाबत वैवजाचा फडच्या जाला. मुदतीप्रा। जगधनाचे दुकानीहून औरंगाबादीं सदरहू वैवज घेऊन रसीद द्यावी लागेल. त्या रसिदीचा मसविदा पा। आहे. त्यास सरकारांतून वैवज घेण्यास जातील त्यानें आपले नांवची रसीद सदरहू मसविद्याप्रा। देऊन वैवज रोख घ्यावा. रा। छ २३ जिल्हेज हे विनंति.

श्री.

आषाढ वा। १० गुरुवार शके १७१५.

पा। राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

विनंति. उंपरी तनख्यापैकीं बाकीचे वैवजाची चिठी औरंगाबादेवर जगधनाचे दुकानची दोन महिन्याचे मुदतीची पाठविली. येविषीं राजश्री नाना तुह्मास ह्मणतील कीं तनखाचे वैवजास इतके दिवस जाले, आतांही मुदतीची चिठी घेण्याचें कारण काय होतें? त्यास मध्यस्त सदरहू मुदतीची चिठी देऊं लागले तेव्हां आह्मी बोललों कीं तनखा आपण दिल्हा, त्याचे हस्तबंदीच्या मुदती कशा? आणि सुभेदारांनीं वैवजाचा फडच्या अद्याप न केला. हलीं वैवजास वायदा न करितां नगदी फडच्या करून द्यावा. याजवर मध्यस्ताचें म्ह(ण)णें

कीं हे चिठी बंतेरीक हुंडी आहे. दोन महिन्यांची मुदत कांहीं विशेष नाहीं. येविषीं मदारुलमहाम यांस माझे तरफेनें तुह्मीं लेहून जरूर सदरहूप्रा करावें. मुदतीस नेमाप्रा नगदी यैवज दुकानीहून जगधनाचे घ्यावा. याप्रा दाट रदबदली बहुत कांहीं केली. त्यास विचार पाहतां मध्यस्त दोन महिन्यांचे मुदतीची चिठी देतात. येविषई इकडून लेहून राजश्री नाना यांची आज्ञा आल्यावर करावें तरी पत्रें जाऊन तिकडून जाव येणें, त्याजवर यांसी बोलणें या खालेंच महिना पंधरा दिवस जातात. त्याजवर यांची चिठी घेऊन औरंगाबादेस पोंहचणें याचा आरसा पाहतां तितकेंच पडतें; बोलण्याचालण्याखालेंच दिवसगत लागोन सरकारी यैवजास लांबण पडतें; हें समजोन सेवटीं मध्यस्तास सांगितलें कीं औरंगाबादेस चिठी पावल्यानंतर दोन महिन्यांची मुदत यैसें आपलें ह्मण(णे)णें हें तर सहसा कबूल होणार नाहीं. चिठी पोंहचतांच फडच्या व्हावा. तेव्हां मध्यस्तांनीं ठराऊन नेम करून सांगितलें कीं चिठी पावल्यावर मुदतीची शर्त नाहीं. आज छ २० जिल्हेजपासोन दोन महिन्यांनीं यैवज फडच्या करून घ्यावा. याप्रा होऊन जगधनाचे दुकानची चिठी ईा छ २० जिल्हेजपासून छ २० सफर दोन महिन्याचे मुदतीनें सदरहू यैवज फडच्या करून द्यावा यैसी घेऊन पा आहे. सदरहु अन्वयें तुह्मीं विनंति करावी. सरकारांतून चिठी औरंगाबादेस रवाना करून करारवमोजीव यैवजाचा फडच्या करून घ्यावा. दोन महिन्यांचे वायद्याचें कारण जगधन याचे दुकानांत यैवज थोडा. दोन महिन्याचे मुदतींत त्याजकडे भरणा होईल. चिठीस दिकत न पडावी याजकरितां इतकें बोलणें ह्मणून मध्यस्त बो (ल) ले. रा छ २३ जिल्हेज हे विनंति.

पुा राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी,

श्री.

आषाढ वा १० गुरुवार शके १७१५.

विनंति. उपरि तनखाचे यैवजापैकीं एकंदर वसूल सुभ्यांनीं नवाबाकडे

लिहिला येक लक्ष येकावन हजार दोनसें रुपये सेवा तेरा आणे. पैकीं तनखादारास वसूल सोळा हजार आठसें पंच्यागव रुपये सवा चौदा आणे दिल्हा म्हणून लिहिलें. परंतु सदरहु ऐवजाची रसीद नाहीं. तेव्हां आह्मीं मध्यस्तासी बो (ल) लों कीं हा ऐवज वसुलीं मजुरा पडणार नाहीं. याची रसीद नाहीं त्यापक्षीं ऐवज कोणास पावला? मजुरा काय म्हणोन द्यावा? याजवर मध्यस्त बो(ल)ले कीं आपलें पत्र अहसनुदौलास निक्षून देतों, सदरहू ऐवज श्रीमंताकडून वसुलास आले असतील त्यांस दिल्हा असल्यास रसीद दाखवावी. . रसीद नसल्यास फडच्या करून देणें. याप्रा। बोलून अहसनुदौलास पारसी पत्र मध्यस्तांनीं दिल्हें, तें पा। आहे. हें पत्र त्यांजकडे पाठवून ऐवज दिल्हा असल्यास उत्तम. पावला नसतां अहसनुदौलाकडून फडच्या करून द्यावा. रा।। छ २३ जिल्हेज हे विनंति.

श्री

आषाढ वा १० गुरुवार शके १७१५.

पु।। राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेशी,

विनंति. उपरि तनखा वा।। ऐवजाविषयीं यादी व पत्रें—प।। वि।।

४ रसीदाच्या नकला

१ बापूजी रामचंद्र यांची ९६३०४।।=.

१ सखो जिवाजी याची ९०००.

२ दाजीबा यांचे नांवच्या.

१ किता ९०००

१ कि।। ३०१९२।।=। पौ। २३०००.

—:—

२

४

२ मध्यस्ताचें पत्र अहसनुद्दौलास रुपये १६७९५।।।=।.

१ पारशी पत्र.

१ हिंदवी तरजुमा.

—

२

२ चिठी जगधन साहु याचे दुकानावर छ २० जिल्हेजपासोन दोन महिन्याचे मुदतीनें रुपये २२०७९०।।।=।. व त्याचा हिंदवी तरजुमा.

१ औरंगाबादी यैवज जगधनाचे दुकानीहून घेतल्यानंतर रसीद देण्याचा मसविदा रुपये २२०७९०।।।=।.

१ याद येकंदर झाडयाची.

——

१०

पत्रे सुमार दाहा-रसीदाच्या नकला, यैवजाच्या चिठ्या, मसविदा, तरजुमा, यादीसहित पा। आहेत. पावल्याचें उत्तर पाठवावें. रा। छ २३ जिल्हेज हे विनंति.

रसीदाच्या नकला.

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री
राजे कृपावंत बहादुर स्वामीचे सेवेशीं.

पा। बापुजी रामचंद्र व लक्ष्मण तुकदेव निा। गोविंद कृष्ण गोडबोले मुा। कोपरगांव सा। नमस्कार विनंति. उपरि तुह्मांवर वरात सन १२०२ चे ऐवजीं नवाब बंदगान आली यांनीं श्रीमंत पंतप्रधान बाबत निर्मळचे चौथाई सरदेशमुखी यैवजीं दिल्हया त्या ऐवजीं श्रीमंतांनीं कोपरगांवचे खर्चास रुपये ७९००० पंच्याहत्तर हजार देविले त्या यैवजीं तुह्मी आह्मांस माहलोमाहलीं वराती लाऊन दिल्या व कांहीं यैवज रोख बाबत रुपये ९६३०४।।।= छपन हजार तीनसें पावणें पांच रुपये तीन आणे पावले. यासीवाय माहलपौ जाजती वसूल, तुह्मीं वराता दिल्हा त्यापैकीं लागु जाहल्यास, वरातीचे यैवजी

मजुरा देऊं. आमच्या किरकोळ पावत्या तुह्माजवळ महालांत दिल्ह्या आहेत त्या रद असेत. रा छ १३ रमजान सन १२०२ शके १७१९ प्रमादी नाम संवत्छरे वैशाख आधिक शु।। १९ सन सलास तिसईन बहुत काये लिा? हे विनंति. सरकारची वरात पाऊण लक्षाची तुमचे हवालीं केली असे हे विनंति.

श्री.

आधिक वैशाख वद्य १ शनिवार शके १७१५.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

बळवंतराव व्यंकटेश राजे कृपावंत बाहदुर सुभा औरंगाबाद स्वामीचे सेवेसी.

पौ॥ सखो जिवाजी कारकून निा सरकार कृतानेक सां॥ नमस्कार विनंति. उपरी नवाब निज्याम आलीखान बाहदुर यांनीं सरकारचे यैवजाच्या तनखा तुह्मावर दिल्ह्या त्याचे यैवजीं येथें खर्चास पावलें ईा छ १ माहे रजब ता॥ छ १९ रमजान पावेतों यैवज पावला तो रुपये ९००० पांच हजार पावले असते. या पांचा हजारां पौ॥ राजश्री नारायणराव भवानीदास वकील यांजजवळ तुमचें नांवची पावती साडेतीन हजाराची आलाहिदा छ ४ शाबानची आम्हीं दिली आहे ते रद असे. सु॥ सलास तिसईन मयां व अलफ, छ १९ रमजान सन १२०२ बहुत काय लिहिणें? हे विनंति.

श्री.

वैशाख शुद्ध ७ शुक्रवार शके १७१५.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री,

बळवंतराव राजे कृपावंत बाहदुर स्वामीचे सेवेसी.

पौ॥ चिंतामण हरि सा॥ नमस्कार विनंति. उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिा जावें. विशेष आपण पत्र छ २९ माहे रमजानचें पा॥ तें पावलें. श्रीमंत पंत प्रधान यांच्या वराती पौ॥ हुंडया पंनास हजाराच्या जीवनदास अंबाजीदास यांच्या दुकानच्या पाठविल्या त्या पावत्या. लिहिलें कीं वरातेची नकल व हप्तेबंदीची नकल पाठवावी. त्यास मागाहून नकला

पाठवून देतों त्याप्रों येवजाचा भरणा करावा. तीर्थरूप राजश्री तात्या येथें जेष्ठ शु॥ पंचमीस दाखल झाले. राजश्री सदाशिवपंत यांनीं लिा आहे त्यावरून कळेल. राजश्री हरबाजी नाईक चाबूक सवार यांचे नांवच्या चिठ्या लौकर पाठवाव्या रा॥ छ ६ शवाल बहुत काये लिा लोभ कीजे हे विनंति.

श्री.

राजश्रि विराजित राजमान्य राजश्री,

बळवंतराव राजे कृपावंत बाहदुर स्वामीचे सेवेशी.—

पो॥ चिंतामण हरि सा॥ नमस्कार विनंति. उपरि येथील कुशल जाणुन स्वकीयें कुशल लिा जावें. विशेष तुम्ही पत्रें छ २३ व छ २४ जिल्कादचीं पाठविलीं तीं पावलीं. लिा मा॥र सविस्तर कळला. सरकारचे वरातीचे येवजीं रुपये.

२३००० हुंडी थान १ पीतांबर जीवनदास यांजवर चांदवड रुपयाची चलनी.

७१९२॥=। चिठी राजश्री त्र्यंबकराव राजाराम का॥दार अंतूर व खुलदाबाद याची मुदतीची.

येकूण तीस हजार येकसें व्याणव रुपये सवा पंधरा आणे याच्या पा॥त्या पावल्या. त्याजपैा॥ तेवीस हजार रा॥ पितांबर जीवनदास याजकडील चांदवड छापी सुलाखी पटले. मुदतीवमोजीब बाकी सात हजार येकसें पावणे त्र्याणव रुपये सवातीन आणे याची चिठी श्रावण शु॥ १९ निमे व भाद्रपद शु॥ १९ निमे या प्र॥ व्यावे ह्मणोन लि॥. त्यास श्रावण मासच्या हप्ता अद्याप पढला नाहीं. त्याजवरून राजश्री सदाशिवपंप यांस ताकीद केली. मा॥र निले त्र्यंबक राजाराम का॥दार यांजकडे मुजरद जासूद रा॥ केला आहे. तुहीं त्याजला ताकीद करून मुदतीप्रों ऐवज देवावा. त्याकडील रा॥ आल्यानंतर पावती पाठवूं. ऐसीं हजार रुपयाचा भरणा हल्लीचे ऐवजा

सुद्धा केला म्हणोन लि॥. त्यास पेशजी पंनास हजार रुपयांचें पत्र अलाहिदा गेलें आहे हल्लींचे ऐवजाचा म॥र सदरी लिहीला आहे त्यावरून कळेल बाकीचे ऐवजाचा भरणा सत्वरच करितों म्हणोन लि॥. त्यास येथील हुंड्या पाठवाल त्या शाहाजोगाच्या पाठवाव्या. राजश्री शामराव बलाळ यांजकडील म॥र व कलमबंदीची याद पा॥ ती सदाशिवपंत यांनीं दाखविली. त्यावरून श्रीमंत राजश्री नानास विनंति केली. त्याचें उत्तर नवाब आहसनुदौला बाहादुर यांस श्रीमंत नानानीं लि॥ आहे त्यावरून समजेल. आटोळे यांस ताकीद पत्राची परवानगी सरकारची घेतली. मागाहून लौकरच रवाना करूं. कारंज्याचे फवारे जलद रवाना करावे. बरकड म॥र राजश्री सदाशिवपंत लिहीतां कळेल. दुसरा ऐवज लौकरच रवाना करावा. र॥ छ ९ मोहरम (भाद्रपद शुद्ध ७ गुरुवार शके १७१९) बहुत काय लि॥? लोभ कीजे हे विनंति.

श्री.

पारसी चिठी जगधनाचे दुकानीं औरंगाबादेवर
रोशन राये यांचे मोहोरनसी.

पारसी चिठीचा तरजुमा
हिंदवी राजे रोशन राये

यांचे मोहरे नसी.

चिठी बइस्म बिरजलाल संभूनाथ साहू दुकान बुलदे खुजस्ते बुनियाद अंकी मुबलग २२०७९०॥≡ याचे निमे एक लाख दहा हजार व तीनसें पंचाणव रुपये साडे सात आणे होतात. चौथ व बाबती व सावोत्रा वगैरे रावपंत प्रधान बाबत माहालांत सुमे महमदाबाद वगैरे ता॥ सन १२०१ फसली व आलल हिसेबी सन १२०२ फसलीचे तनखाप्रों अहसनुदौला बाहादूर व राजे कृपावंत यांजकडे वाजबुलतलब होते. त्याचे मुबादला आजमुलउमरा बाहादूर यांनीं देविले. त्यास राव पंतप्रधान यांजकडे जो कोणी पैका न्यावयास येईल त्यास येथून खरिदीचा मसोदा दुकानास पा॥

आहे त्याप्रा॥ रसीद घेऊन छ २० जिल्हेज सन १२०७ हिजरी पासोन दोन महिन्याचे वायद्यानें पावते करावे. पुढें मुबलग मा॥र सरकारचे खजान्याचे हिसेबीं या चिठीप्रों व रसिदीप्रों मुजरा व मुहसूब होतील.

३२२७९०॥≈

पे॥ १०२००० येक लाख दोन हजार याची चिठी लस्कर फेरोजीचे दुकानावर दिल्ही बाकी

२२०७९०॥≈

छ २० जिल्हेज सन १२०७ हिजरी

रसीदीचा मसविदा पा॥ आहे

या प्रो रसिद द्यावी.

राजश्री जगधन साहू दुकान बुलंदे

औरंगाबाद, गोसावी यास:—

अखंढित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे॥ फलाना फलाना ग्रहस्त नि॥ श्रीमंत राजश्री पंत प्रधान अंकी २२०७९०॥≈। मुबलग दोन लक्ष वीस हजार सातसें नव्वद रुपये सवा पंधरा आणे बाबद चौथ व बाबतीं व सावोत्रा वगैरे ब॥ महालांत सुभे महमदाद वगैरे ता॥ सन १२०१ व आलल हिसेबी सन १२०२ तनखापो आहसनमुदौला बाहादूर व राजे कृपावंत यांचे जिमेस बाजबुलतलब येणें होते. त्याचे मुबादला नवाब निजामुदौला बाहादूर यांचे कारपरदाज यांनीं हुंडी सदरहू रुपयांची औरंगाबादेस तुमचे दुकानीं दोन महिन्यांचे वायद्याची राजश्री गोविंदराव कृष्ण यांचे विद्यमानें करून दिल्ही. त्यास सदरहू रु॥ हुंडीप्रो तुमचे दुकानीहून आह्मास पावले. हे रसीद लि॥. सही. बहूत काय लि॥? मिती, तारीख, सन.

श्री.

आहसनुदौला व राजे कृपावंत यांनीं आपले मोहरेनसीं वसुलाची याद पाठविली व रसिदीच्या नकला पाठविल्या. त्यांत १६८९॥≈। याची

रसीद नाहीं. हे मजुरा द्या ऐसें मध्यस्तांचें ह्मणणें. याजवर आमचें बोलणें. रसीद नाहीं. तेव्हां मजुरा देत नाहीं. तेव्हां मध्यस्तांनीं फारसी पत्र आहसनुदौलास दिल्हें. त्याचा तरजुमा मुबलग १६८९॥।=।सोळा हजार आठसें पंच्याणव रुपये सव्वाचौदा आणे, येक लाख ऐंकावन हजार दोनशें रुपये सवा तेरा आणे. पै॥ तनखाचे ऐवज पै॥ बाकीबाबत चौथ व बाबती व सावोत्रा वगैरे राव पंत प्रधान बाबत माहलांत सुभे महमदाबाद तालुके जफरुदौलात रुपये दिल्हे नसल्यास सदरहू रु॥ जलद निशा करून रसीद घ्यावी.

श्री.

आषाढ वा॥ १० गुरुवार शके १७१५.

पु॥ राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसीं:--

विनंति. उपरि मीर मुरादअली वगैरे पंच यांस सरकारांतून मौजे भोडणी पा॥ रावेर हा गांव आहे. तेथील दखलही यांजकडे सरकारची पत्रें व हुजरे जाऊन जाला. स्वराज्याचे अमलाकरितां चोपटेकरकर का॥ दाराकडील आनंदराव कारकून याची कटकट भारी. बेमोईन ऐवज घेऊन उपद्रव लागतो. यास्तव नवाबांनीं सांगितल्यावरून व मुरादअली यांचे हमेषा ह्म (ण) णें कीं बंदोबस्त असा व्हावा कीं मामुलप्रों स्वराज्याचे अमलाची वांटणी जागीर सुधां व्हावी, अथवा मख्ता स्वराज्याचा ठरावा. त्याप्रों दरसाल ऐवज घेत जावा. ज्याजती उपसर्ग होऊं नये. येविषींच्या यादीही तुह्मापासीं दिल्ह्या. ऐसें फत्तेआली याचे बोलण्यांत. त्यावरून राजश्री नानांस व तुह्मांस पत्रें खानमा॥र यांजपासीं दिल्हीं. व डांकेवरही हलीं रोनगी केली असे. येविषीं मुरादआली यांनीं तुह्मांस व त्याजकडून तेथें गृहस्थ आहे त्यास दोन पत्रें ये॥ तीन लाखोटे पारसी पा॥ आहेत. त्याचे त्यास द्यावे; व नाना यांस विनंति करून याचे कार्याचा बंदोबस्त करून इकडे त्याहावें. याचे सांगण्यांत तेथील स्वराज्याचा मामुल चौथाई तीन हिसे व सरदेशमुखी सेंकडा साडे बाराप्रो आहे. याप्रों ठराऊन बंदोबस्त व्हावा. ज्याजती तोसीस सायेर फर्मास वगैरे कादार करितात

ते न व्हावी. ठरावाप्रों साल बसाल फडच्या करून घेत जावा. याप्रों काा-दारास सरकारांतून ताकीद होऊन इकडे त्याहावें. छ २३ जिल्हेज हे विनंति.

गोविंदराव बुरटे यांनीं पत्र मागितलें सबब.

श्री.

आषाढ वा १० गुरुवार शके १७१५

राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री

गोविंदराव स्वामीचे सेवेसीं:--

पो गोविंदराव कृष्ण साष्टांग नमस्कार विनंति. उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें लिा जावें. विशेष राजश्री नागोराव बुरटे काा भूम येथें राहतात. यांचे घरगुती कजियाकरितां गुदस्तां माारनिले पुण्यास आले होते. ते समईं तुह्मीं राजश्री बाबुराव बलाळ काादार यांस पत्र दिल्हें कीं सदरहू-प्रों बुरटे मार वर्तणूक करितील. यास कांहीं उपद्रव न द्यावा. त्याप्रमों बाबूराव यांनीं मान्य केलें. आणि माारनिलेही करारप्रों सिद्ध असतां सांप्रत तुह्मांस कोणीं गैरवाका समजाविल्यावरून बाबुराव यांस दुसरें पत्र तुह्मीं पाठविल्यामुळें त्यांनीं त्यास उपसर्ग लाविला ह्मणोन कळलें, त्यावरून लिा असे. त्यास पेशजी येक वेळ करार ठरल्याप्रो वर्तणूक व्हावी. ऐसें असतां मागती उपसर्गाचें कारण काय? यास्तव बाबूराव बलाळ यांस नि-क्षून पत्र देऊन तुह्मीं ठराविल्याप्रों व्हावें रा छ २३ जिल्हेज बहुत काय लिा? लोभ कीजे हे विनंति.

माहे मोहरम श्रावणमास. छ ३ रोजीं डांकेवर.

श्री.

श्रावण शुद्ध ४ रविवार शके १७१५.

राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसीं:--

विनंति. उपरि तुह्मीं छ २१ माहे जिल्हेजचीं पत्रें पा तीं छ २७ माहे माारीं पावलीं. टिपूचे पुढील मसलहतीचे प्रकर्णी लाड बाहदूर याद आली ती

मुषीरुन मुळीक यांनीं राजश्री नानाकडे पाठवावयासीं दिल्ही. त्यांचा निश्चय ठरून येक फर्द ठरली. त्या प्रकर्णी श्रीमंताचा खरिता नवाबास व आमचे नांवें सरकारचें पत्र व फर्द याप्रो॥ पा॥ तें पावलें. मध्यस्ताकडें तेच दिवसीं सांगून पाठविलें. त्याचें उत्तर जालें कीं आज बंदगान आली माझे येथें येणार, याजकरितां उदईक यावें. त्यावरून दुसरे दिवसीं गेलों. मध्यस्तास फर्द दाखविली. बोलणें जालें. नंतर बोलले कीं हजरतीस आर्जी करून तुह्मांस सांगून पाठवितों त्या वेळेस यावें. दुसरे दिवसीं मीरआलम यांस बोलाऊन आपले घरीं मसलहत केली. तिसरे दिवसीं दरबारास येण्याची सूचना जाली. त्यावरून गेलों. आम दरबार भरला होता. नबाबास पत्र सरकारचें गुजराणलें. नंतर दोन तीन घटकांपर्यंत नवाब व मध्यस्त व मीरआलम व मी चौघांसी खलबत जालें. भवति न भवति होऊन सेवटीं नवाब बोलले कीं टिपूची चाल कसी याविसीं आणि या तहनाम्याप्रकर्णी मध्यस्त आपले घरीं तुह्मासीं बोलतील तें समजोन घ्यावें. ऐसें होऊन बरखास्त जाले. त्या उपरि दुसरे दिवसीं मध्यस्ताकडे गेलों. येक प्रहर बैठक होऊन मीरआलमसुधां बोलणें जालें. त्याचा त॥ लिहूत मागाहून रवानगी करण्यांत येईल. पत्रें पावलीं. बोलणें जालें याचा इतला व्हावा ह्मणोन सरसरीं पत्र लि ॥ असे. भवति न भवति जाली याचा त ॥ आणि यार्चीं उत्तरें मध्यस्त सांगणार. यास आगखीं येक बैठक होऊन निश्चय सांगतील तो लिहिण्यांत येईल. र॥ छ ३ माहे मोहरम हे विनंति.

श्री

श्रावण शुद्ध ४ रविवार शके १७१५.

पु ॥ राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसीं—

विनंति. उपरि छ २६ माहे जिल्हेजची रवानगी ती छ १ माहे मोहरमीं पावली. व इकडील पत्रें राजश्री नानास गेलीं त्याचे जाब व तुह्मीं कांहीं म॥ र लिहिला तो कळला. यार्चीं उत्तरें मागाहून लाकरच पाठविण्यांत येतील. र ॥ छ ३ माहे मोहरम हे विनंति.

श्री.

श्रावण शुद्ध ४ रविवार शके १७१५.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसीं:—

पो॥ गोविंदराव कृष्ण सां। नमस्कार विनंति. उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें लिहित असावें विशेष. राजश्री राजे व्यंकटप्पा नाईक बळवंत बहिरी बहादूर सुरापुरकर संस्थानिक यांजकडे नवाबाचे सरकारचा ऐवज नजराणा बाबत येणें. त्या ऐवजीं म॥र निलेनीं राजश्री बापु सिवदत साहुकार यांचे मारफतीनें रुपये १००००० येक लाख पाठविले ते नाईक म ॥ र निलेकडील वेणू गोपाळ कारकून यांचे गुजारतीनें पोंहचऊन अजिमुलउमराव बहादुर यांसी पावते जाले. सदरहू ऐवजाची रसीद नवाबाकडील आल्यानंतर नाईक म ॥ र निले यांजकडे रवाणा होईल. र ॥ छ १४ माहे जिल्हेज सु ॥ आर्बा तिसैन मया व अलफ, सन फसली १२०३ शके १७१९ आषाढ शु॥ १९ मु ॥ बेदर. बहुत काय लिहिणें ? लोभ कीजे हे विनंति.

छ ७ माहे मोहरम.

श्री.

श्रावण शुद्ध ८ गुरुवार शके १७१५.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसीं.—

पेा॥ गोविंदराव कृष्ण सां॥ नमस्कार विनंति. उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें लिहित असिलें पाहिजे. विशेष, तुम्हीं पत्र पा॥ तें पाऊन लिहिला मा॥र समजला. माहादू गवळी याची मुक्तता जाली. परंतु याचा मुचलका नवाबाचे सरकारांत गुंतला आहे, तो आला नाहीं. याजकरितां मागतीं राजश्री पाटीलबावा यांनीं सांगून पा॥ व समक्षही सांगितलें. त्यास याचा कागद काहडोन देण्याविसीं आज्ञा व्हावी. बाळू गवळी वारंवार गैरवाका समजाऊन कजिया करितो. त्यास निक्षून ताकीद व्हावी. याविसीं पाटीलबावास फार अगत्य आहे म्हणोन लिा॥. त्यास हालीं बावाचे वडिलांचें पत्र आलें.

याजवरून राजश्री राज्याजी यांस पत्र होतें तें काहाडोन आणोन पाा आहे. पावेल. पावलियाचें उत्तर पाठवावें. बाळू गवळी येथें नाहीं. तो आलियावर त्यासही ताकीद केली जाईल. रा छ ७ मोहरम बहुत काय लिा ? लोभ कीजे हे विनंति.

श्री.

श्रावण शुद्ध १३ सोमवार शके १७१५

मोहरम छ ११ रोज, मालोजी कीरपंत यांनीं मागितल्यावरून दिल्हें.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसीं:—

पो गोविंदराव कृष्ण सां नमस्कार विनंति. उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें लिहित जावें. विशेष, राजश्री मालोजी कीरपंत धारासिवकर हे तुह्माकडे पुण्यास येतील. त्यांजजवळ पेशजी तुह्मास व राजश्री हरिपंत तात्यास पत्रें दिलीं आहेत, त्याप्रा यांचे रोजगाराची सोय करून द्यावी. हाली मालोजीचा भाऊ नारायणराव कीरपंत यानें बालेघाटीं जभीयेत करून दंगा केला. याचा बोभाट पुण्यास गेला. सबब मालोजीं कीरपंत तेथें आल्याउपारांतीक हा नारायेणरायाचा भाऊ ह्मणोन यास सरकारांतून वगैर तगादे करतील. त्यास मालोजी भाउ. परंतु उभैतांच्या तीन च्यार पिढ्या गुजरल्या. व येके जागांही नाहींत. त्यापक्षीं याजकडे नारायेणराव यांजविसीं कांहीं खटला नाहीं. रा छ ११ मोहरम. बहुत काय लिो ? लोभ कीजे हे विनंति.

श्री.

श्रावण वद्य ३ शनिवार शके १७१५.

टपा खाना छ १६ मोहरम.

राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसीं:—

विनंति. उपरि तुह्मांकडील पत्रें छ २१ व छ २६ जिल्हेज व छ ३ मोहरमचीं खाना जालीं तीं छ २७ जिल्हेज व छ १ व छ ८ मोहरमीं पावलीं. याचीं उत्तरें आलाहिदा लिहिलीं आहेत त्यांवरून कळेल. रा छ १६ मोहरम हे विनंति.

श्री.

श्रावण वद्य ३ शनिवार शके १७१५.

विनंति. उपरि इंग्रजांकडून पुढील टिपूचे मसलहतसमंधीं पारसी याद आली. त्याची भवति न भवति पाटीलबावा यास घेऊन राजश्री नाना व तात्या यांनीं करून येक कलमाची फर्द ठराविली. यांतील हुस्न लिहिलें. परंतु बोलावयाचे नाहींत. गोविंदराव यांनीं नवाबासी असें बोलावें ह्मणोन पाटीलबावानीं सांगितलें. तो प्रकार लिहिला आहे. परंतु केवळ तसेंच बोलण्यानें इंग्रजापासीं ते सांगतील याजकरितां सहजांत बाराय मसलहत गोष्ट बोलावी व सरकारचें पत्र व याद पाठविली आहे ती नवाबास. याचा जबाब काय ? मनांत वाईट मानितील इत्यादिक मदारुलमाहम यांचे मनांत यावी कीं नाहीं? मध्यस्तांनीं नवाबास अर्ज केला कीं हजरत फरमावितात याचप्रमाणें मदारुलमाहम यांचे मनांत. परंतु सात दफे इंग्रजांकडील न ठरावितां मुख्य सर फर्दच करार करावी. ऐसा आग्रह मदारुलमाहम याचा नाहीं. मगर माहदजीराव सिंदे व हरिपंडतजी यांनीं हे शकल काहडून समजाविलें असेल. यामुळें उपाये नाहीं रा छ १६ मोहरम हे विनंति.

श्री.

श्रावण वा ३ शनिवार शके १७१५.

विनंति. उपरि, आपले पत्राचे कांहीं जाब लेहून श्रीमंत राजश्री नानाकडे विनंत्या करावयास पाठविले. त्यांनीं कांहीं विनंत्या करून दिलाती पुसावयाच्या ह्मणोन पुडकें ठेविलें. काल कागद काहडून दिल्हे. तेव्हां मी बोललों कीं तारीख विसावे जिल्कादची पडली. आज येकवीसावी जिल्हेज. उत्तर जालें कीं गोविंदराव असें समजतील नानांनीं पत्रें करून दिल्हीं. गोविंदराव यांचे आळसामुळें येक महिना खानगीस जाला. यैसें बोलल्यानंतर मी हंसून उगाच राहिलों, ह्मणोन लिहीं तें कळलें. त्यास पत्रें येक महिन्याचे अंतऱ्याचीं आलीं असतां याविषीं आम्हीं कांहीं लिहिलें नाहीं तर ह्मणतील कीं गोविंदराव यानां कांहीं सूचना केली, याजकरितां नानाचें पत्रांत

गिला लिहिला व तुह्मासही पुरवणी आलाहिदा लिहिली आहे. दाखवावी. त्याजवर काय बोलतात हें अगत्य ल्याहावें. र॥ छ १६ मोहरम हे विनंति.

श्री.

श्रावण वद्य ३ शनिवार शके १७१५.

विनंति. उपरि, नानांची पत्रें छ २१ जिल्काद्चे तेरखेची छ २१ जिल्हेजीं तुम्हीं रवाना केलीं, याचें बहुत आश्चर्य जालें. इतके दिवस पत्रास कां लागले याचें कारणही तुम्हीं लिहीं नाहीं. नानापासींच पत्रें इतके दिवस राहिलीं असें ह्मणावें हर येक तेरखेस सर्व पत्रांवर विनंत्या जाल्या. तेव्हां पत्रें आपल्यापासीं कशास ठेवितील ? तस्मात् तुह्मापासीं पत्राचा लाखोटा दिल्हा तो कोठें गैर विल्हेस पडला होता. तो जेव्हां सांपडला तेव्हां पाटविला. ऐसें मनांत आलें. त्यास हें राजकारणाचें काम. नाना यांजकडील पत्राचेकडे आमचे नेत्र असतात. पत्राचे जाब आल्यावर त्या आज्ञेप्रा येथें बोलण्याचीं धोरणें चालतात. हे प्रकार तुह्मांस समजत नाहींत ऐसें नाहीं. परंतु आलस्यामुळें विस्मृति होती. येविषई तुह्मांस तेथें रागें भरून सांगावें असें कोणीं नाहीं. याजकरितां राजश्री नानाचे पत्रांत तुमचा गिला लिहिला आहे, याजमुळें तरी काळजी धराल. त्यास इतःपर असें घडूं नये. पत्राचे जाब लिहिण्यासही तुह्मांसीच देतात. असें असतां इतके दिवस लागणें हें तुमचें कालहरण. परराज्यांत आह्मी राहिलों. येथें व्यवहार सर्व तिकडील पत्रावर. जर पत्रें लौकर न येत तर कसें करावें ? त्यास या पत्राचें येकदां दोनदां मनन करून काळजी ठेवावी. ॥ छ. १६ मोहरम. हे विनंति.

श्री

श्रावण वद्य ३ शनिवार शके १७१५.

विनंति. उपरि, श्रीमंत राजश्री नानांनीं आज्ञा केली कीं गोविंदराव यांनीं आमचे नांवें पत्र लिहूं नयेत. श्रीमंतांचे नांवें विनंतिपत्रें लिहीत जावीं, तीन प्रकरणें मात्र लिहूं नयेत. मध्यस्त जवाहिर व ज्याफत नजर वगैरे वगैरे नबाबास करितात हें येक, शिकारी प्रकरण दुसरें बायका प्रकर्ण तिसरें.

तीन मार येतील ते आलाहिदा आमचे नांवें ल्याहावे. बाकी मार श्रीमंतांचे नांवें लिहीत जावा. येणेंकरून त्यांस माहितगारी होईल. ह्मणोन राजश्री नानाचे आज्ञेवरून लिहीं. त्यास तीन प्रकरणांव्या तिरिक्त सर्व मार माहितगिरी होण्याकरितां लिहित जावा ह्मणोन आज्ञा केली हें उचित. परंतु आद्यापि राजकारणाचे उंच निंच प्रकार व लिहिण्यांतील तोडजोडी ध्यानांत नाहींत. आलम जबानीचा. पुतें मनन न होतां भलतेंच मनांत येईल, बोलतील याविषीं बहुत अंदेशा मनांत आले. परंतु येक खातरजमा चित्ताची आहे कीं पत्रें वाचून दाखविणें, आंतले भाव, गर्भ समजावणें ते राजश्री नाना आपले रुबरु समजावितील. त्यापक्षीं चिंता नाहीं. परंतु तुह्मींही विनंति करावी कीं आपले समक्ष पत्रें दाखऊन जेथें ध्यानांत न ये तेथें समजाऊन सांगावें. आणि समक्ष पत्रें श्रीमंतांस दाखविलीं तरच पाहतील. पाठीमागें पाहणार नाहींत. पत्रें पाहणार नाहींत तेव्हां ध्यानांतही येणार नाहीं. हा पूर्वीचा संप्रदाय ठाऊक आहे, त्यावरून लिहिलें असे. अलीकडील प्रकार कसा हें कांहीं समजलें नाहीं. हल्लीं पत्रें श्रीमंतांचे नांवें लेहून खुला लाखोटा पाठविला आहे. नाना यांस प्रथम दाखऊन आज्ञा करितील त्याप्रा श्रीमंतांचे सेवेंत प्रविष्ठ करावीं. रा छ १६ मोहरम हे विनंति.

श्री

श्रावण व. ३ शनिवार शके १७१५.

विनंति. उपरि, औरंगाबादेवर ऐवजाच्या तनखा घेतल्या तो ऐवज कांहीं आला, कांहीं नाहीं, येविषयीं दफ्तरची याद पाठवावी ह्मणोन आज्ञा आली. त्यावरून पेशजी याद पाा; व हल्लीं याद दप्परची घेऊन पाा आहे. बाकी येणें फार. निकड होऊन जगधनावर चिठ्ठ्या ध्याव्या ह्मणोन लिहीं, त्यास पेशजीच्या यादीवरून येथें रसीदांसी रुजुवात पाहतां कांही मिळेना. येथें रसिदांच्या रुजुवातीनें ऐवज बाकी येणें निघाला, त्यापैकीं येक लाख यांचे कर्जात देऊन बाकीची चिठी जगधनावर घेऊन पशजी पाठविली. व

रसिदांच्या नकला वगैरे या प्रकर्णी ताा पेशजीं लिहिल्यावरून समजलाच असेल. त्याप्राा दफ्तरीं रुजुवात पाहून चिठीप्राा ऐवज आणावयास कारकून तिकडे खाना करावा. कांहीं लडा ऐवजाचा रसिदांपैकीं असल्यास लेहून पाठवावें. रा॥ छ १६ मोहरम हे विनंति.

श्री.

श्रावण व. ३ शनिवार शके १७१५.

विनंति. उपरि.

१ जफरुद्दौला यांचे पत्राचे जाब तयार करविले. मुनषीकडून पत्रें तयार होऊन आलीं ह्मणजे लौकर पाठवितों. मतलब पत्रांतील समजावयाकरितां मसविदा पा॥ आहे. श्रीमंत नानांनीं येविषीं आपल्यास पत्रें लिहिलीं. दिवस येक प्रकारचे. करणें बोलणें बहुत समजोन होत असावें हे भाव घराऊ श्रीमंतांचे पत्रांत आहेत ह्मणोन लिों. त्यास, मसोदा पावला. पत्रें पारसी तयार लौकर पाठवावीं. नानांनीं पत्रांत लिो अर्थ तितके खरे. परंतु कांही चळवळ केल्यासिवाय दुसऱ्याचें समजतही नाहीं. कर्तानां समजूनच सांभाळून उद्योग करावा, इतकें समजोन तेथील आज्ञेप्रा॥ करीत आहें. इतकें विच्यारानें करीत असतां सांभाळणें नाना यांजकडे आहे. कलम—

१ इंग्रज संमधें सरकारचें पत्र व इंग्रजास करार करून देण्याची फर्द ठराविली ती छ २२ जिल्हेजीं खाना केली. ती पोंहचून हजरतीसीं बोलणीं होऊन जाब सत्वर पाठवावे. जाब कधीं येतील ह्मणोन श्रीमंत दिवस मोजितात, ह्मणोन लि॥, त्यास पत्रें आल्यावर दुसरे रोजीं जाऊन मध्यस्तास, नवाबास दाखविलीं; नंतर त्यांची भवति न भवति होऊन उत्तरें त्याहवयांचीं सांगितल्याप्रा॥ लिहिलीं आहेत. मोहिमेचे दिवस होते, याजकारितां नवाबाकडून जाब होण्यास च्यारं दिवस लागले. त्यास छ मा॥रीं जाब खाना केले आहेत. हे प्रविष्ट करावे कलम:—

दोन कलमें रा॥ छ १६ मोहरम हे विनंति.

श्री.

श्रावण वद्य ३ शनिवार शके १७१५.

विनंति. उपरि वसमतेवरील तनखाचा ऐवज वीस हजार घेतला, व वीस हजार साहुकारांत पडला. राजश्री नाना यांची परवानगी घेऊन पाठवितों, ऐसें तुम्हीं लिहिल्यास किती दिवस झाले! परवानगी येत नाहीं. साहुकाऱ्यांतील प्रकार विलक्षण जाला आहे, यास्तव ऐवज यावयाचा नाहीं, ऐसें तरी निक्षून समजल्यानंतर तसेंच सांगावयास येईल. उत्तर ८ दिवसांत यावें. आळस करूं नये. रा॥ छ १६ मोहरम हे विनंति.

श्री.

श्रावण वद्य ३ शनिवार शके १७१५.

विनंति. उपरि. स्वराज्याकडील जुजयातीच्या फर्दा आठ पुढील तोंडीं लाविल्या हें समजोन आहे. असें असतां बाबाराव बो (ल) ल्यानें फडचे होत असल्या अवश्य व्हावे. यांत सरकार काम जाल्यास उत्तम! हेच इच्छा आहे. यास्तव बाबाराव यांस घेऊन करावें. येणेंकरून निमित्य वारलें. त्यांचीही उमेद समजेल. याचा त॥ येक दोन पुरवण्या लिहिल्यावरून सर्व कळेल. त्यास तुम्हीं लिहिल्या अन्वयेंच करावयास येईल. परंतु, यांत येक निश्चय सरकारचा असावा कीं जे फर्द ठराऊन पाठविली याप्रा॥ जाल्यास ऐकावयाचें. दुसरी तोडजोड नाहीं. असा निश्चये असल्यानंतर बाबाराव यांस घेऊन केल्यास चिंता नाहीं. यांत सरकारचे मुध्यामाफीक—तोडझोड न पडतां-कलमें उगवून आल्यास सरकार काम जालेंयास चिंता नाहीं. बाबाराव यांसही दरमियान घेतलें आणि तोडजोड ठरूं लागली तर कांहींच नाहीं. हें तुमचे समजण्यांत असोन याजवर लक्ष असावें. रा॥ छ १६ मोहरम हे विनंति.

श्री.

श्रावण वद्य ३ शनिवार शके १७१५.

विनंति. उपरि या फर्दप्रा॥ नवाबही कबूल करितील असें कोणी येक

बो (ल) ले त्यावरून कबूल करतील. या साधकाचा प्रकार तुह्मीं लिहिला त्यास ही दौलत आहे. श्रेहे जाला ह्मणोन आपले दौलतीचा हुस्न कूबः पावणार नाहीं असें नाहीं. तुह्मीं अंश लिहिला त्याप्रमाणें येथें यांनीं कबूल करण्याचें कांहींच दिसलें नाहीं. ज्या दिकती यांचे मनांत वाटल्या त्या यांनीं स्पष्ट सांगोन लिहिविल्या. तेव्हां कोणी एक बो (ल) ले असतील ते भयाऱ्याची गोष्ट इतकें समजावें ह्मणोन लिहिलें असें. रा॥ छ १६ मोहरम. हे विनंति.

श्री.

श्रावण वद्य ३ शनिवार शके १७१५.

विनंति. उपरि. सेनासाहेब सुभा यांचीं पत्रें नागपुरीहून सरकारांत आलीं कीं बाबुराव वैद्य व श्रीधरपंत व कुशाबा चिटणीस यांची रवानगी आपणाकडे करतों. बाबुराव यांस परवानगी पत्र यावें. ऐशीं पत्रें आलीं. त्यावरून बाबुराव यांस पत्र सरकारचें जावें असें ठरलें. त्रिवर्गही येणार. सत्वरं येतील ह्मणोन लि॥ तें कळलें. त्यास मध्यस्थानीं भोंसले प्रकर्णी म॥र केला कीं भवानी काळो, कुशाबा, श्रीधरपंत तिघांतून येकास आणवावें; आणि जाबसाल उलगडावे. याचा त॥ म॥र श्रीमंताचे पत्रीं लि॥ आहे, त्यावरून तुम्हांस समजेल. बाबुराव आदिकरून त्रिवर्गाचें येणें या संधीस पुणियास घडनें हें ही योग्य आहे. रा॥ छ १६ मोहरम हे विनंती.

श्री.

श्रावण वद्य ३ शनिवार शके १७१५.

विनंति. उपरिः—

१ तैमूरशा दुराणी याचा काळ जाला. पुत्र आहेत त्यांत कोणांत कोणी नाहीं ह्मणोन लिों, व बिज़ेसिंग मारवाडी यांस देवआज्ञा जाली. धाकटे पुत्रास मसनतीवर बसवावें असें त्यानें सांगितलें म्हणोन लि॥, तें कळलें. त्यास बखेडा आहे! ज्याचे दैवीं असेल तो होईल. .... कलम—१ जुजयातीच्या फर्दा तयार करून श्रीमंतांनीं समक्ष भवति न भवति

करून वाजबी निर्गळितार्थ ठराऊन रघोत्तमराव यांचे हवालीं आठ फर्दा केल्या. याच्या नकला त्यांनीं करून घेऊन फर्दा माघाऱ्या आल्या ह्मणजे परवांचे दिवसीं आपल्याकडे रवाना होतील, ह्मणोन छ ३ माहे मोहरमीं तुह्मीं लिहीं. त्यास आह्मी छ ९ मोहरमीं ऐकावयास मध्यस्तांनीं बोलाविल्यावरून गेलों. ते वेळेस त्यांनीं म।र केला कीं आठ फर्दा दफेच्या आपल्याकडे आल्यात कीं काय ? तेव्हां आह्मीं सांगितलें येणार. येका दोन दिवसां येतील. तेव्हां बो (ल) ले कीं रघोत्तमराव यांनीं आठ फर्दा पाठविल्या. त्यास मोहरमेचे दिवस गेल्यानंतर तुह्मीं फर्दा पाहव्या. ठराव करून सांगावे. तसें करावयास येईल. याप्रमाणें बो (ल) ले. तुह्मीं फर्दा परवां पाठवितों ऐसें लिहिलें. त्या अद्याप आल्या नाहींत. मध्यस्त मस्करीच्या स्वभावानें आह्मास ह्मणतात कीं तुह्मी सांगाल तसें करीन. त्यास तोडजोडीचा प्रकार जे समई त्या वेळेस हें बोलणें नोट. आतां तो कांहीं प्रकार राहिला नाहीं. आतां जसें तेथून ठरून येईल तितकें बोलून हो अथवा नाहीं इतका समजावयाचा प्रकार असें दिसोन येतें. त्यास फर्दा खाना करावयास राजश्री नाना तुह्मांस सांगतील ते वेळेस तोडजोडीचाही कांहीं प्रकार सांगतात किंवा लि॥ याप्रमाणें व्हावे, तोडजोड नाहीं याचा निश्चये खुलासा कसा ? हे लिहून पाठवावें. या प्रकर्णी खोलून लिहिण्याविषईं आळस करूं नये. प्रसंगास तुह्मांकडून पत्रें येऊन आह्मांस केलें असें व्हावें. ही पुरवणी नानास दाखवावयाची नाहीं. तुह्मांस कळावें सबब लि॥ असे. उत्तर लौकर यावें. कलम:—

१ तुकोजी होळकर महेश्वरास आले. शरीर समाधान नाहीं ह्मणोन लिहिल्यावरून कळलें. कलम—

१ पालखीचे दाल, सरंजाम पाठविले ते सरकारचे पालख्यांस लाऊन पाहिले, तो सरंजाम थोर होतो यास्तव परत केले; ते बाळाजीपंत सेंबेकरा-बरोबर पाठवितों ह्मणोन लिहीं तें कळलें. त्यास बाळाजीपंत पुण्यांत आले किंवा इकडे आले किंवा कांहीं कामगिरीस गेले हें कांहीं समजत नाहीं

त्यांचें पत्रही आलीकडे येत नाहीं. प्रसंग कोणे प्रकारचे आणि त्यांची खानगी तर होत नाहीं ! यास काय करावें ? ईश्वर इच्छा !

४

कलमें च्यार रा॥ छ १६ मोहरम हे विनंति.

श्री.

श्रावण वद्य ३ शनिवार शके १७१५.

विनंति. उपरि,

मानाजी गाईकवाड मृत्यू पावले. गोविंदराव याचा पुत्र रुसून गेला होता. त्यास दत्तक करावें असा तेथील बत. ठरलें नाहीं म्हणोन लिहीं तें कळलें. कलम १

राघोजी आंगरे यांचा काळ जाला. मूळ लहान. गुलामानें प्रवेश केला आहे. ऐसी व्यवस्था जाली. सर्वांस हुजूर आणावयाची तरतूद होत आहे म्हणोन लिहीं तें कळलें. कलम १

ऐकून कलमें दोन. पुण्यांत रोगग्रस्त असाम्या उलगडणें कठीण—सिवाजी विठ्ठल, नारायणराव पारसनिसाचे चिरंजीव, रामचंद्रभट पोंगसे इतके लिहीं यांतून कोणते उलगडलें तें ल्याहवें. सिदगिरीबावा गोसावी यांनीं दोन लाखोटे—आनंदराव नरसिंव्ह यांचे नांवें येक, व बाबाराव यांचें नांवें येक, व मोर जोसी यांचें पत्र आमचें नांवें—ऐसीं पाठविलीं तीं पा॥. दोन पत्रें आनंदराव नरसिंव्ह यांचे हवालीं केलीं. सांप्रत आनंदराव यांनीं लाखोटा दिल्हा तो पा॥ आहे, प्रविष्ट करावा. रा॥ छ १६ मोहरम हे विनंति

श्री.

श्रावण वद्य ३ शनिवार शके १७१५.

विनंति. उपरि. बाळाजी व्यंकटेश व येमा कामास रवाना केले होते त्यास बाळाजीपंत काल आले. सर्व मजकूर समजला. बंदोबस्त नीटच आहे. परंतु फार कान जाले. त्यावरून चित्तास प्रशस्त वाटत नाहीं. वर्कड

सरकारात काहीं गुंता नाहीं. जर गोष्ट फायाशांत आली, ज्यास ज्यास समंजेल तो फुटला तर पथ(त)च गेली. पुन्हा सबंध व समक्ष बोलावें हें राहिलें. सरकारास काये ? सर्व नीटच आहे ! धर्मच होये ! वर्कड मध्य बागणारास महत् संकट. दुरंदेशीनें पाहतां याचा विचार पडतो. मळमळित सारखें वाटतें, यास कसें करूं ? याचें समर्पक उत्तर यावें. वरकड सर्व नीटच आहे. क्रम चा(ल)ला आहे. करतों, दस्तकही घेतों. बाळाजी व्यंकटेश कोंकणचा ! निश्चयेंकरून आपलें उत्तर पावतेक्षणीं यावें म्हणोन लिहीं. त्यास तुम्हीं लिहिला पर्याय इतकाही खरा. परंतु असीही गोष्ट येस्सादे वेळेस करणें प्राप्त होतें. तेव्हां छातिही केली पाहिजे. केवळ लोभावरच प्रकार नाहीं. फार कान जाले म्हणोन लिहीं. त्यास जे जरुरी या कामांत आहे त्यांस क(ळ)ल्या वेगळ कसें होतें ? दोघे, तिघे आपलेकडीलच आहेत. येक मुतसदी तेथून त्यांनीं खाना तुम्हाकडे विश्वासूक केला. त्याची बाळाजी व्यंकटेश यांची गांठ वाटेंत पडली नाहीं. तो ग्रहस्थ तुम्हासीं येऊन भेट घेतली, तुम्हांस ताकीदपत्राच्या दस्तकाचा मा॥र पुसिला. तुम्हीं त्यास उत्तर केलें कीं हे आम्हास कांहीं वाकाफ नाहीं. हें वर्तमान मुख्याकडून आम्हांस कळलें. त्यास तुम्हीं आंगानिराळें टाकलें. बरें केलें ! त्यास कोणी यांतून फुटल्यास आमचा काय दस्तऐवज दाखविणार आहे ? दस्तऐवज दाखविल्यास बोलावयास जागा नाहीं ऐसें म्हणतील. ती गोष्ट तर नाहीं. मग काय चिंता आहे ? श्रीमंताचे प्रतापावर यांत आम्हीं आहों. येक आपलेच सामर्थ्यावर नाहीं. ईश्वर पार पाडणार आहे ! सर्व सिधता जाली. हें सेवटास न्यावें. कोंकणांतील ठिकाणांत प्रवेश गुप्तरूपें जाला पाहिजे. याची तरतूद कसी केली ? तें लिहावी. उभयेतांसीं ऐवजाचा काये करार ? तुम्हीं काये केला ? हें लिहिलें नाहीं. तर जरूर कळवावें. यास घटिकेचा विलंब न करावा. हिशेब समजला पाहिजे म्हणोन लिहीं आहे. याचे उत्तराकडे दृष्टि लागली आहे. तर लवकर उत्तर यावें, आळस न करणें, न करणें. रा॥ छ १६ मोहरम हे विनंति.

श्री.

श्रावण वद्य ३ शनिवार शके १७१५.

विनंति. उपरि, राजश्री राव रंभाजी निंबाळकर यांचा ऐवज त्यांजकडील रंगराव दिवाण यांजकडे तहरीरबाबत येणें. त्यास म॥रनिलेवर तहरीरीचे ऐवजीं अडीच हजार रुपयांची वरात रावरंभा यांनीं दिल्ही. आणि येथें मारवाडी यांचे देण्याबाबद ताण मोठा ह्मणून आह्मांपासून आडीच हजार रु॥ यांनीं घेतले. रोखा सदरहूचा लिहून दिल्हा. करार केला आहे कीं रंगराव यांजकडून ऐवज पावले त्याची पावती ये तोंपर्यंत व्याज देत जावें. याप्रा॥ करून यांनीं वरात आडीच हजाराची रंगराव याजवर दिल्ही ती पाठविली आहे. सदरहू वरातीप्रा॥ ऐवज म॥रनिले पासून घेऊन इकडे लिहून पाठवावें. रा॥ छ १६ मोहरम. हे विनंति.

श्री.

श्रावण वद्य ३ शनिवार शके १७१५.

रुजू आसे. २९००

(मोहर पारसी)

राजश्री रंगराव रामचंद्र दिवाण गोसावी यांस,

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री॥ रावरंभाजी जयवंत निंबाळकर दंडवत विनंति. उपरि तुह्मांकडोन तहरीरीचा ऐवज येणें त्या ऐवजीं येथें राजश्री गोविंदराव बापू यांजपासून रु॥ २९०० आडीच हजार घेऊन हे चिठी केली आहे. त्यास राजश्री गोविंदराव भगवंत यांसीं रु॥ आडीच हजार देऊन, पावती बापूचे नांवें पाठवून देणें. ऐवज देण्यास दिवसगत लागलिया व्याज तुह्मांस देणें येईल. तरं पत्र पावतांच रु॥ देऊन पावती पाठवावी. रा॥ छ ४ माहे मोहरम ऊर्फ श्रावण मास हे विनंति.

राजे भारामल यांचे मागितल्यावरून पत्र छ १८ मोहरम.

श्री.

श्रावण वद्य ३ शनिवार शके १७१५.

राजश्रीया विराजितें राजमान्यराजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी,

पा॥ गोविंदराव कृष्ण सां नमस्कार, विनंति. उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें लिहीत असिलें पाहिजे. विशेष, राजश्री राजे तेजवंत बाहादुर यांजकडोन नवाब बंदगान आली यांचें सरकारांतून फौजेचे व जातीचे संरजामांत पा॥ धारुरपैकीं कसबें आंतूर वगैरे देहात व पा॥ चाळीसगांव पैकीं कसबे मजकूर वगैरे देहात जागीर जाले आहेत. राजे मा॥र यांणीं सनदा महालीं आमीलासमागमें पाठविल्या. आमीलांनीं माहालचें वर्तमान लिहिलें कीं कसबें चाळीसगांव वगैरे पांच गांव आह्माकडे. पैकीं तीन गांव आबाद व दोन गांव हीन-कुल वैराण; व मौजे गणेशपुर, व मौजे गणपूर दोन गांव राणोजी पवार मोकासदार यांजकडे, व मौजे टाकळी व मौजे खडकी, व मौजे पिपरी सित्तराम पंत सरदेशमुख यांजकडे, व मौजे पातोडे व मौजे तुम्हडी व मौजे खरजाई व मौजे वाकडी हे च्यार गांव माधवराव रामचंद्र पागावाले यांजकडे. ये॥ नव गांव परभारें वहवटतात. आह्मांस दखल देत नाहींत. आखर सालीं हात उचलोन काय देणें तें देतील. प्रस्तुत मोकासदार याजकडील गांवास फर्मास चिठी केली होती. त्यांचें उत्तर त्याणीं जमीदाराचे नांवें पाठविलें त्याची नकल पाठविली आहे, त्याजवरून कळेल. आह्मीं मोकासदार व सरदेशमुख व पागावाले यांस ह्मटलें कीं आमचे गांव सोडोन द्यावें. आह्मीं आपले देखरेख करून घेऊं. तुह्मीं आपला हिसा खा॥ आकारा प्रो॥ ध्याव्या. त्यास ते ऐकत नाहींत. त्यास याचा बंदोबस्त जाला पाहिजे ह्मणोन आमीलाचे लिहिल्यावरून राजे मारनिले यांणीं आह्मांस सर्व मजकूर सांगितला, व बंदोबस्ताविसीं रा. नानांस, व तात्यांस, व गोविंदराव यांस पत्रें द्यावीं व तरफ ओतूर पा॥ धारुर येथील मोकासा येशवंतराव बावने व पर्वतराव याजकडे. याचाही उपद्रव वाचप्रा॥ आहे. त्यास तरफ मारचा मख्ता सरकारांतून करार करून

दिल्याच आह्मी साहुकारी निषा देतों. त्याप्रों साल बसाल ऐवज पावता करून देत जाऊं. अथवा चाकरीस स्वार म्हटल्यास देऊं. निदान ह्या गोष्टी न घडल्यास मोकासदार यांस निक्षून ताकिदा याव्या कीं स्वराज्याचा अमल वाजवी मामुलप्रों घेत जावा. ज्यादा तलबी न करावी. याप्रों दोन्ही माहालचा बंदोबस्त करून देवावा तरीच आमची स्थित राहील. नाहीं तरी बखेडाच आहे. या प्रकारें फार बाजीद होऊन बोलिले. त्याजवरून राजश्री नानांस व तात्यांस पत्रें तुमचे पत्रावर हावाला घालून लिहिलीं आहेत. त्यांस पत्रें प्रविष्ट करून पत्रान्वयें विनंति करून जाबसाल ठराऊन परगणें चाळीसगांव व तरफ ओतुरें येथील मोकासदार, व सरदेशमुख, व पागावाले यांस निक्षून ताकीदपत्रें देवावीं कीं गांव याचे आमीलाचे हावालीं करतील व मामूलप्रमाणें आपला अमल कच्या आकाराप्रमाणें घेतील. कोणतेही गोष्टीची दिकत न राहे असें करवावें. राजे मा॥निले ग्रहस्त थोर मनुष्य जाणून लिों आहे. येविसीं तुम्हास वारंवार स्मरण देण्याविसीं माारनिलेनीं रामकृष्णराव देवाजी यांस लिों आहे. ते स्मरण देत जातील. याप्रों सरकारांतून बंदोबस्त करून देवावा. रा छ १६ मोहरम बहुत काय लिहिणे ? लोभ कीजे हे विनंति.

श्रीनिवास प्रा. नकल.

राजश्री देशमुख व गबाजी व्यकंटेश देशपांडिये पा॥ चाळीसगांव गोसावी यांसी,

श्री बापूजी हरि आ॥ व नमस्कार विनंति. उपरि तुम्ही जागीरीकडून नवा अमल आहे त्यास खडकी वगैरे गांवास फर्मासीच्या चिठ्या करून देऊन मौजे मा॥रीं उपद्रव आरंभिला आहे, म्हणोन कळलें. ऐसियास पेशजी आमल होऊन गेले त्यांणीं फर्मासीची वगैरेची चिठी कांहीं केली नाहीं, हें तुम्हास माहित असतां तुम्हीं हाली त्यास मिळोन गांवावर चिठ्या करून दिल्या. त्यास जागीरदार यांचे चित्तांत कटकट करून बखेडा करावयाचा

असल्यास तसेंच लिहिणें म्हणजे त्यासारखे येथून स्वार प्यादे रवाना करावयास येतील. मग तुम्हांसीच गांठ ! तुमची व कसन्याची खर्चाकडोन खराबी होईल. हें समजोन तुम्हीं त्यास च्यार गोष्टी रीतीच्या सांगोन न ऐकेत तरी तैसेंच पत्राचें उत्तर पाठवणें म्हणजे करणें तें करावयास येईल. पत्राचें उत्तर लौकर पाठवणें. रा॥ छ ६ माहे जिल्हेज. बहुत काये लिहिणें ? लोभ करणें हे आशीर्वाद.

भावसिंग चौधरी यांनीं सांगितलें सबब. छ १९ मोहरम.

(श्रावण वद्य ६ मंगळ शके १७१९)

श्री.

श्रावण वद्य ३ शनिवार शके १७१५.

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री गोविंदराव पेा स्व मीचे सेवेसीं—

गोविंदराव कृष्ण सा॥ नमस्कार, विनंति. उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें लिा जावें. विशेष शंकरदास साहू यांजकडे राजश्री गोपाळराव वानवळे यांचा कर्जाऊ ऐवज मुदल सतरासें रु॥ येणें. याजकरीत माारनिलेनीं शंकरदासाचा पुत्र मनुलाल यांस पैठण येथें कैदेंत ठेविलें. त्यांच सुटकेविषीं तीन च्यार वेळां पेशजीं पत्रें पाठविलीं. त्यानंतर मनुलाल यांस येथें पाठवावें म्हणजे सतरासें रु॥ याचा फडच्या होईल. त्याप्रों साहूकारी खातरजमा करून घेऊन मुजरद जासुदाबरोबर पत्र पों. त्यास सांप्रत गोपाळराव पुणियास मनुलाल याजला समागमें घेऊन गेले म्हणून कळलें, त्यावरून लि॥ असे. तरी वानवळे माारनिलेस ताकीद करून मनुलाल याजला येथें पाठवावयाचें करावें. मनुलाल येथें येऊन पोंचल्यानंतर सतराशाचा फडच्या साहुकाराकडून ज्यास देवितील त्याजकडे करून देवप्यांत येईल. येविषयीं रोशनराव व भावसिंग चोधरी यांचें सांगणें बहुत. यास्तव लिा असे. रा छ १९ मोहरम. बहुत काये लिहिणें ? लोभ कीजे हे विनंति.

टपाल रवाना पुणें, छ २२ मोहरम.

श्री.

श्रावण व. ९ शुक्रवार शके १७१५.

राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसीं.

विनंति. उपरि. तुम्ही छ १५ मोहरमचीं पत्रें जुजवियातचे आठ फर्दा समेत पाठविलीं तीं छ २१ माहे मिनहूस पावलीं. मजकूर समजला. त्याची उत्तरें मागाहून लिहिण्यांत येतील. सांप्रत कांहीं वर्तमान समजलें तें आलाहिदा लिहिलें आहे. त्याजवरून कळेल. रा छ २२ मोहरम. हे विनंति.

श्री.

श्रावण व. ४ शुक्रवार शके १७१५.

विनंति. उपरि. राजश्री बाबाराव यांस इतके दिवस पाटिल बावाजवळ ठेविलें यांतील प्रधान हेतू हा कीं येक आपला पुत्र हिंदुस्थानांत घेऊन जावा, त्यास वजारतीवर कायम करावें, त्यानें पाटील बावाचे ऐक्यतेंत असावें. म्हणजे गोडीचे पोटांत पातषाहींत आपला पाय कायम जाहला. दक्षणची सुभेदारी आहेच. यास च्यार रु॥ खर्च जाळे तरी चिंता नाहीं. आपण नवाबाचे कारपरदाज जाहलों यांत खाविंदाचे दौलतीची तरकी करुन पाया मजबूत केला. असें कोणे कारपरदाजानें केलें नाहीं. तें आपण करून दाखविलें ऐसें होतें. आणि राव पंतप्रधान, आदिकरून सर्व रइसांवर दाब ! ऐसी मसलहत बांधून नवाबाचे मनांत ही गोष्ट बिंबऊन, परवानगी घेऊन मध्यस्तांनीं राजकराण घुरु केलें. पाटीलबावा यासीं करारमदार ठरला कीं या प्रकर्णी पातषाहाची नजर येक करोड ठरली. त्यांतील करार असा आहे कीं पुणियास गेलियावर तेथील बंदोबस्त खातरखा करून हिंदुस्थानांत गेलियावर हें कार्य सिद्ध करावें. येथें फौजेचें खर्चास ऐवज लागेल तो पुरवावा. आणि अनकूळ असावें. नवाबाचे पुत्रास वजिरीवर कायम करावें. त्याची नियाबत पाटील बाबानीं करावी, याप्रमाणें करार. त्यास पुणियास

आले. पैक्याविसीं आणि मसलहतीविषईं आम्हीं अनुकूळ असतां आज परियेंत आपला बंदोबस्त काय केला ? कीं ज्या बंदोबस्ताचे भरवसियावर हिंदुस्थानांतील कामें खातरखा करावीं हें अद्याप कांहींच दृष्टीस पडत नाहीं. करोड रुपये देण्याचा करार पैकीं चाळीस लाखपरियेंत आजपरियेंत पोंचून चुकलें. बाकी साठ लाख रु।। राहिले. अद्याप कोणतेही उपयोगाचें लक्षण दिसत नाहीं. केवळ सुस्त होऊन बसलां ! यांस काय म्हणावे ? याप्रमाणें बाबाराव यांस छेडणी फार आहे. बाबाराव यांचे सांतवन करतात कीं सुस्ती धरून बसले आहेत यांतच काम आहे. लौकिकांत भावका उठल्या, त्याजवर कितेकांचे अंतःकर्णीत संशय. यांत कांहीं विपरीत दिसल्यानें अधिक सावधगिरि जाली म्हणजे गोष्ट बहकण्यांत येऊन आफ्तरी होईल, याज करितां पड घेऊन नरम चालीनें संशयनिवृति करून सुस्तीखालें टाकल्यावर कारस्थान चालेल. नाहींतर सर्व आफ्तरी होईल. याजकरितां च्यार दिवस दम धरून नंतर काय होतें तें पहावें. याप्रमाणें विप्र खातर-जमा करित आहेत. त्यास ही बातनी आत्मिका कडून कळली नाहीं. विप्राचे घरांतील बारीक बातनी ऐकिली ती लिहिली आहे. या गोष्टीस खरें खोटें दोन्ही म्हणतां येत नाहीं. राजकारणाचा ग्रंथ जसा लिंध केला तसा होतो. याजकरितां जें ऐकिलें तें लिहों आहे. मननांत असल्यानें बहुत उपयोग, हुषयारी तर राहिल ? यास्तव ही पुरवणी राजश्री नानास दाखवा-वी. यांचे उत्तर विशेष लिहूं नये. आमके तारखेचीं पत्रें पा। तीं पावलीं, श्रीमंतांस दाखविलीं; इतकीच सूचना पुरे. रा। छ २२ मोहरम. हे विनंति.

श्री.

श्रावण व. ९ शुक्रवार शके १७१५.

विनंति. उपरि. अत्मीकांनीं सांगितले कीं मध्यस्त आपले घरीं कोणा येकासीं बोलत होते कीं हजरतीचा निरोप दो महिन्यांचा

घेऊन पुण्यास जावयाचें: त्या ग्रहस्तानें पुसिलें कीं मग हजरतीपासीं कोण आहे? आणि जावयाचें प्रयोजन कोणतें? याचें उत्तर मध्यस्तांनीं केलें कीं पटणचे मोहिमेस गेलों ते वेळेस हजरतीपासीं आपले नियावतीवर गफुरजंग याचे पुत्रास ठेविलें, त्यास ठेऊन पुणियास जावें. मदारुलमहाम याचे मनांत संशये आले ते काढून दोन्ही सरकारची ऐक्यता करून लवकर यावें असें मनांत आहे. याप्रमाणें बोलण्याचा उद्गार निघाला. पुढें पहावें काय ठरतें? जाहीरदारींत तर ऐसें आहे. मनांतील बेत काय असेल तो असो! त्यास असाच विचार ठरविल्यास मध्यस्ताचे बोलण्यांत येईल. ही गोष्ट झांकून रहावयाची नाहीं. काय ठरतें हें समजेल. रा॥ छ २२ मोहरम. हे विनंति.

श्री.

श्रावणव. ९ शुक्रवार शके १७१५.

विनंति. उपरि जुजयातच्या आठ फर्दा ठरल्या, त्याच्या नकला राजश्री रघोत्तमराव यांनीं मध्यस्ताकडे पाठविल्या; त्याचे पारसी तरजुमे करून पाहिलें. नंतर बाबाराव यांस बोलाविलें. बाबाराव यांस समाधान वाटत नाहीं परंतु तसेंच यावें म्हणोन हुकूम गेला, तेव्हां गेले. तिघे जण साहा घटिका बसून खलबत केलें. आठ फर्दाच्या नकला करून पाटिल बावाकडे पाठऊन याचा जबाब लवकर आणवावा ऐसें सांगितलें. त्या फर्दा-नकला तयार करून रवाना जाल्या. कलम, ——————— १

इंग्रजांकडून साता कलमाची याद तहनाम्याची आली. त्याजवर विचार होऊन येक फर्द पुणियाहून ठरून आली. त्याची भवति न भवति करून श्रीमंतास उत्तर लिहावयासी आम्हांस सांगितलें. त्या पुरवणीवर नवाबाचे दसखत करून घेतलें. नंतर श्रीमंतांस पुरवणी लिहिली. त्याची नकल मध्यस्ता जवळ होती ती नकल करून पाटीलबावाकडे पाठवावयासी बाबा-राव यांस सांगितलें. कलम, ——————— १

पटणास टिपूसीं तहनामा जाला. त्याची नकल करून पाटीलबावा कडे पाठवावयाकरितां बाबाराव यांस दिल्ही. कलम.————————१
तीन कलमें

बाबाराव लाखोटा देतील तो टप्यावर पांच दिवसांत पावता व्हावा, आणि पांचा दिवसांत उत्तर लवकर यावें, ऐसी रवानगी जलद व्हावी म्हणोन आनंदराव सभापत यांस मध्यस्तानीं ताकीद केली. याप्रों बातमी कळली ती लिहिली असे. सारांश सर्व इतला गुह्य मार्गे पाटीलबावाकडे होतो हें ध्यानांत असावें, रा॥ छ १२ मोहरम हे विनंति,

श्री.

श्रावण वद्य ९ शुक्रवार शके १७१५.

विनंति. उपरि. व्यंकट रामदीक याजकडून चिनापटणची अखबार व राजश्री नानाचे नांवें पत्र आलें तें पाठविलें आहे, प्रविष्ट करावें. अखबारांत श्रीमंत पंतप्रधान यांजकडील तिसरी किस्त पावती जाली नाहीं असें असावें. तेथें सेना साहेब सुभा यांचें नांव हस्तदोषें करून पडलें असें वाटतें. पाहिल्यावर समजण्यांत येईल. व्यंकट रामदीक उमेदवार आहे. याज करितां त्याची नेमणूक सरकारांतून व्हावी. ह्मणजे स्वरूपवृद्धीचा संतोष होऊन सरकार कामाचे उपयोगीं पडेल. याविषई विनंति करावी. सर्फराज करणें खावंदाकडे आहे रा॥ छ २२ मोहरम हे विनंति.

श्री.

श्रावण वद्य ९ शुक्रवार शके १७१५.

विनंति. उपरि. कुशालपुरी यानें राजश्री रघोतमराव व रामचंद्र दादो यांचे नांवें दोन लाखोटे पाठविले. त्यांस पावते करून जाब घेऊन पाठवावें. रा॥ छ ९१ मोहरम हे बिनंति.

छ २९ मोहरम टपा रवाना पुण्यास.

श्री.

भाद्रपद शु. १ शुक्रवार शके १८१५.

राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी विनंति. उपरि. तुमचीं पत्रें छ १९ मोहरमचीं छ २१ माहे मा॥रीं पावलीं. लिहिल्याप्रा॥ मा॥र सर्व समजला. त्याचीं उत्तरें सांप्रत लिहिलीं आहेत. त्यावरून कळेल. इकडील सविस्तर मजकूर श्रीमंताचे पत्रावरून समजण्यांत येईल. राजश्री नाना यांसही सरासरी पत्र लि॥ आहे. चनापटणाहून अखबार आली ते व नानाचे पत्राचा लाखोटा पाठविला आहे. सर्व पत्रें श्रीमंतासहित नाना यांस दाखऊन त्यांचे आज्ञेप्रमाणें श्रीमंताचे सेवेसीं प्रविष्ट करावीं, उत्तरें घेऊन बरचेवर रवाना करावीं. र॥ छ २९ मोहरम. हे विनंति.

श्री.

भाद्रपद शु. १ शुक्रवार शके १७१५.

विनंति. उपरि. जुजयातच्या फर्दा आठ पाठविल्या. या प्रथम मध्यस्तास दाखवाव्या. नंतर दुसरे दिवसीं राजश्री बाबाराव यांस बोलाऊं पाठऊन आणवावें, आणि फर्दा दाखवाव्या. बोलावें कीं तुमची गांठ मध्यस्ताचे घरीं पडावी तेथें आह्मीं बोलतों. तुह्मींही बोलून सरकारलिहिल्याप्रा॥ बोलून ठराव करावा, ऐसें त्यास घेऊन बोलणें ह्मावें. ऐसी राजश्री नानाची आज्ञा, त्याजवरून लिहिलें असें. आपण ह्मणतील बाबाराव येथें असतां त्यांचें बोलणें कीं:- काये जाबसाल असतील ते मला समजाऊन दिल्यास मी मध्यस्तासीं बोलून सर्व उगरून देतों. यास्तव त्यांस घेऊन करावें ह्मणोन श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं बोलण्याचा उपर कशास ठेवावा? यास्तव घेऊन बोलावें, हा यांतील खुलासा ह्मणोन लि॥. त्यास फर्दा पावल्यानंतर ध्यमस्ताकडे गेलों. फर्दाही दाखविल्या. याच फर्दाच्या नकला रघोतमराव यांजकडून आल्या, त्या अक्षरशा पाहिल्या. त्यावरून पुर्त्या नेहननिषीन

जाहल्या आहेत. याचे जवाबाचे पर्याय दो ती दिवसांनंतर तुह्मासीं सर्व बोलण्यांत येईल. बाबाराव यांजकडे सांगून पाठविलें होतें त्याचा म॥र आलाहिदा पुरवणी पत्रीं लिहिला आहे त्याजवरून कळेल. र॥ छ २९ मोहरम. हे विनंति.

श्री.

भाद्रपद शु. १ शुक्रवार शके १७१५.

विनंति. उपरि:— र॥ बाबाराव यांजकडे कोनेर बाबुराव यांज बरोबर सांगून पाठविलें कीं जुजयातीच्या फर्दा सरकारच्या आल्या ह्मणजे आह्मांस कळवावें, ऐसें तुमचे बोलण्यांत पेशजी होतें. त्यास, हालीं फर्दा पाहव्या, नंतर तुमचे आमचे विच्यारें मध्यस्तांसी म॥र व्हावा. त्यास प्रथम बाबाराव बोलले कीं मला दुखण्यामुळें सामर्थ्य येण्याचें नाहीं. कसें करावें ? तेव्हां कोनेरपंत त्यांसी बोललें कीं तुमच्या बोलण्यांत आले होतें याजकारितां बापूंनीं मला तुह्माकडे पा॥ आहे. त्यास येवत नाहीं असें ह्मणूं नये, पालखींत बसून यावें; बहुत बसवेना तर तेथेंच आमळसें लवावें, घर आहें: चिंता नाहीं. याजवर बोलिलें कीं:— मध्यस्ताचे परबानगी वेगळ येतां नये, कसें करावें ? त्यास उदईक मी सांगून पाठवितों, नंतर येईन. याप्रमाणें निरोप आला. मध्यस्तास पुसल्यासिवाये येत नाहींत ऐसें समजलें. तेव्हां आपणही मध्यस्ताकडे याचा इतला कां न सांगून पाठवावा ? ह्मणोन मध्यस्ताकडे आह्मीं सांगून पा॥ कीं:— फर्दा आल्यानंतर आह्मांस कळवाव्या ह्मणोन पहिलें बाबाराव आह्मांसीं बो (ल) ले होते, त्यावरून आह्मीं त्यांजकडे सांगून पाठविलें कीं फर्दा आल्या आहेत. तुह्मीं येऊन पाहाव्या. याजवरून मध्यस्त बोलिले जे:— बाबाराव यानीं काल हा मजकूर लिहून पाठविला नंतर कांहीं बोलावयाचें आहे, असें लिहिलें होतें. त्यास आज दोन प्रहरीं मीं त्यास बोलावलें आहे. त्यांचें बोलणें ऐकून येऊन आपल्याकडे जावें ह्मणोन सांगतों. याप्रा॥ मध्यस्ताचे

बोलण्याचा म॥र. त्यानंतर दुसरे दिवसीं बाबाराव यांचा निरोप आला कीं:— परवानगी आली. आज आमावास्येची संधि, उदईक ग्रहण, परवां कर; याजकरितां द्वितीयेस येतों. त्यास, ते आल्यावर त्यांजला फर्दी दाखऊन मध्यस्तासीं कसें बोलणें होईल तें लिहून पाठऊं. रा। छ २९ मोहरम हे विनंति.

श्री.

भाद्रपद शु. १ शुक्रवार शके १७१५.

विनंति. उपरि:-बाबाराव यांजकडे कोनेरपंत बोलविण्याकारितां गेले होते. त्यांजपासीं बोलिलें कीं:— आह्मीं येऊन काये करावें ? करावयाचें—हीं मोठीं, मोठीं कामें ! यांचे उलगडे होणें संकट; तेव्हां आह्मीं काये करावयाचें ? याजवर हरराव बोलिलें कीं:— नानाचा कारभार फार वोढक, तेव्हां फडचे कसे होतात ? याचें उत्तर बाबाराव यांनीं त्यांस केलें कीं:— ग्रहस्त वोढकपणास काये कमी आहेत ? कीं त्यांचा दोष तुह्मीं काढतां ? याप्रा॥ परस्परें आपल्यांत बोलत होते. रा॥ छ २९ मोहरम. हे विनंति.

श्री

भाद्रपद शु. १ शुक्रवार शके १७१५.

विनंति. उपरि. प्रथम मध्यस्तास फर्दी दाखविल्या; ते वेळेस यांची उत्तरें काये ? ऐसें आह्मीं पुसिल्यावर मनांत कोंडून कांहीं गोष्टी बोलिले. त्यांत निश्चयाची गोष्ट त्याहावया जोगती येकही नाहीं. कांहीं उत्तर करावें म्हणोन काल्वाकालव करून बोलिले. सेवटीं बोलिले कीं:— दोचौ दिवसां याजविषईं तुह्मासीं बोलूं. बलकी मीं येखादें पत्र त्याहावें असें ठरल्यास लिहून देईन व तुम्हांसही त्याहावयास सांगेन. त्या प्रा॥ लिहून उत्तर आलियावर मग फर्दीचे ठरेल. या बोलण्याचा अर्थ आमचे मनांत आला जे:— फर्दीच्या मजकूर ज्यांस लिहिला तिकडून उत्तर आलियावर निश्चय बोलणें तो बोलावा. तों परियेंत कांहीं दिवस काळहरण करावें. याजवरही यांची उत्तराविसीं निकडच लागल्यास कांहीं येक उत्तर

पर्याय लाऊन द्यावें म्हणजे च्यार दिवस काळहरण जाहलें, आशा लागली. तिकडील उत्तर आलियावर बोलणें तें बोलावें. आसा बेत ठरला आहे. यास दुसरें प्रदर्शन:—बाबाराव यांचा निरोप आला. त्यांत ग्रहणाचे संधीचें निमित्य आणि मध्यस्त पाठ सांगतील त्या धोरणानें आम्हासीं बोलतील असें वाटतें. त्यास, आज उद्यां दोन दिवस ग्रहणाचे गेले म्हणजे आम्हीं मध्यस्तासीं जाऊन बोलतों म्हणजे काये ते समजेल. त्यासारखें लिहिण्यांत येईल. र॥ छ २९ मोहरम हे विनंति.

श्री.

भाद्रपद शु. १ शुक्रवार शकें१७१५.

विनंति. उपरि:—तफावत कांहीं ऐवजाची आहे. त्याचे रुजुवातीविषईं हालींच्या सुभ्यास नवाजषनामा पाठविला. परंतु आमका ऐवज आमके दिवसांत देणें ऐसें जगधन साहुकार यास पत्र नाहीं. याविषईं दिकत पडेल ह्मणोन लि॥. त्यास, येकंदर तनख्यांपैकीं एक लाख येकावन हजार दोनसें रु॥ सवा तेरा आणे १५१२०० ०॥।—। राव पंत प्रधान यांचे सरकारांत वसूल जाहला म्हणोन आहसनुदौला, कृपावंत या उभयतांनीं आपले मोहरेनसीं वसुलाची फर्द पाठविली. परंतु वसुलाप्र॥ रसीदा असाव्या त्या नाहींत. च्यार रसीदा मात्र आल्या. त्या यांणीं दिल्ह्या. यांत १६७९५ ।॥=। सोळा हजार सातसें पंच्याणव रु॥याची रसीद नाहीं. त्यावरून मध्यस्तासीं आमचें म्ह (ण) णें पडलें कीं:—सदरहूची रसीद द्यावी; अथवा रसीद नाहीं तरी ऐवज द्यावा. यांचें ह्मणण्यांत ऐवज पावला आहे. तेव्हां उभयतांनीं आपले मोहरांनसीं दस्ताऐवज पाठविला. आमचे म्ह (ण) ण्यांत ऐवज पावला नाहीं. असी दोनच्यार दिवस विष्ट पिष्ट जाली. तेव्हां मध्यस्त बोलिले कीं:— ऐवज तो पावलाच आहे. नसेल पावल्यास या ऐवजाचा जिमा आहसनुदौला व कृपावंत यांचा. त्यास आमचें ह्म (ण) णें:— कृपावंत आठकेंत आहेत. त्याजवरून मध्यस्तांनीं आहस-

नुदौला यांचे नांवें पत्र करून दिल्हें कीं तुह्मीं येक लाख येकावन हजार सातशें पंच्याणव रु॥ सवा तेरा आणे याची फर्द मोहरीं लिहून पाठविलीं, त्यांत सोळा हजार सातसें पंचाण्यव रु॥ सवा चौदा आणे कमी येतात, याची रसीद नाहीं, याज कारितां रावपंत प्रधान यांचे सरकारचे मुतसदी तकरार करून कबूल करीत नाहींत. त्यास, तुह्मीं ज्यांस सदरहू रु॥ दिल्हे असतील त्यांची रुजुवात करून द्यावी. अथवा सदरहू रु॥, जे ऐवज मागावयास येतील, त्यांचे पदरीं घालून रसीद घेउन पाठवावी. मध्यस्ताचें ह्म (ण) णें:— हे रुपये पावलेच आहेत. त्यांत गुंता नाहीं. मगर तुमचा आग्रह कीं रु॥ पावले, नाहींत. याज कारितां हें पत्र दिल्हें आहे. हें पत्र आहसनुदौलास पावतें करून यांचें उत्तर आणवावें ह्मणजे समजेल. त्यावरून हें पत्र घेऊन पाठविलें आहे. आहसनुदौला यांजकडे रवाना करावें. त्यांनीं रुजुवात करून दिल्ह्यास गुंताच उरकला. रुजुवात न जाल्यास त्यांजपासोन ऐवज घ्यावा. ऐवज न दिल्ह्यास उत्तर लिहून पाठवावें. ह्मणजे यांस कायेल करून, जगधन याचे दुकानची चिठी घेऊन पाठवावयास येईल. सोळा हजार ऐवज द्यावाच असें ठरलें नाहीं. सबब जगधनावर चिठी नाहीं. आहसनुदौला यांस मात्र पत्र कीं ऐवज दिल्हा नसल्यास तुह्मीं देणें त्यास ऐवज आहसनुदौलाच देतील. त्यांणीं अनमान केल्यास लवकर लिहिलें यावें. रा॥ छ २९ मोहरम हे विनंति.

श्री

भाद्रपद शु. १ शुक्रवार शके १७१५.

विनंति. उपरि:—ऐवज क्षेपनिक्षेप पदरीं पडे ऐसीं परभारें आणिक पत्रें जावीं. इकडे पाठवावयाचीं असतील तें पाठवावीं. याविसीं स्वस्त असों नये. पैक्यास लांबण पडों नये ऐसें व्हावें म्हणोन लि॥. त्यास तनख्याचे ऐवजाची तपसिलाची याद लिहिलीच आहे. निकी बाकी.

२९० ७९० ॥≈ निघाली याची चिठी-रोषनराय यांचे मोहरेची, जगधन याचे दुकानीं इ॥ छ २० जिल्हेज पासोन दोन महिन्यांत द्यावे याप्र॥ खचित चिठी-आहे. तथापि तुमचे लिहिल्यावरून मागाहून आणिक ही परभारें ताकीद लिहिविण्यांत येईल. हालीं फखरुदौला नवे सुभेदार यांचे पत्र मध्यस्तास आले कीं:-- सखोपंडत-रावपंतप्रधान यांजकडील-तनख्याचे ऐवजाचे वसुलास येथें आहेंत. हे खर्चास मागतात. यांस फार तसदी आहे. दोनदिवस बिलकुल यांस कांहीं मिळालें नाहीं. तिसरें हिवशीं पन्नास बैल गेल्याचे रसदेचे घेऊन नेऊन रोजमरा केला. याजबराबर जम-येतही आहे. त्यास, आज्ञा आल्यास कांहीं ऐवज द्यावयास येईल. त्यावरून मध्यस्तांनीं आम्हांसीं सदरहू म॥र केला; आणि बोलिले कीं:— तनख्याचें बाकीचे ऐवजाची चिठी जगधन याचे दुकानीं करून दिल्हीं त्यापक्षीं आह्मीं ऐवज कां द्यावा ? आणि ते ग्रहस्त खर्चाविन हैराण आहेत. जर तुम्हीं कांहीं ऐवज देत असाल तरी आम्ही जगधन याचे दुकानींहून देवितों; नाहीं तरी जबाब साफ. लिहिलें असे, व रसीदीचीही नकल पा॥ आहे र॥ छ २९ मोहरम. हे विनंति.

श्री.

नकल.

राजश्रिया विराजित राजमान्य र॥
बाजीराव आमील व तिमाराव दे-
शपांडे पा॥ वसमत स्वामीचें सेवेसीं.

पो॥ गोविंदराव कृष्ण सां॥ नमस्कार विनंति. उपरि. पा॥ उमरखेड यामा-हाला पासोन शाहमिर्जा यांनीं ऐवज घेतला तो नबाबाचे सरकारांतून येणें. त्या ऐवजीं पा॥म॥रचे ऐवजीं चाळीस हजार रुपयांची तनखा आमची तुह्मांवर आली त्याचे नवाजषनामें दोन. पैकीं आवल हप्ता माहे र॥ वल आखरचे वायद्याचे र॥ २०,००० वीस हजार. सद-

रहू वीस हजार रा॥ मा॥ मेहरबान सैद मुजवरखान आमील पा॥ मा॥र दिल्हे ते पावले आहेत. छ ज्ञा॥ खरीं सु॥ सलास तिसैन मया व आलफ, सन १२०२. बहुत काय लि॥? हे विनंति.

श्री.

भाद्रपद शु. १ शुक्रवार शके १७१५.

विनंति. उपरि. तेजसिंगाकडील जागिरीचे माहाल येहतषाम जंगाकडे जाले. येविषि॑ रा॥ नाना तुम्हासी बोलले कीं:– सरकारचा ऐवज खंदारकराकडे येणें. त्या ऐवजीं करडखेल, होकरणें हे माहाल लाऊन दिल्हे असतां दरमियान फौज पाठऊन घेतले. ते समई हिसेबी ऐवज निघेल त्यास नांदापुर लाऊन देण्याचा करार असतां वलीजंगास नांदापुर देऊं लागले. ते समई मध्यस्तासी नांदापुर आमचे ऐवजीं केलें असतां यास कसें देतां ? हें बोलावें कीं नाहीं ? व जंग घराउ पुसों लागले त्यास तुम्हीं नांदापुर कबूल करूं नका असें म्हणावें कीं नाहीं ? हे गोष्ट कसी राहिली ? इत्यादिक तों लिों. त्यास करडखेल राज्याजीकडे जागीर होऊन तालुक्याचे दखलास यांजकडील फौज गेली. ते समई यांचे बोलणें कीं:––खंदारकराकडे येकंदर स्वराज्याचा ऐवज तुमचा येणें, त्या ऐवजीं करडखेल व होकरण्याचा वसूल काय पावला व बाकी काय राहिली याचे हिसेब आणावावे. अजरुये मवाजा हिसेबीं ऐवज निघेल त्यास नांदापुर हा महालखंदारकर तेजसिंगाचे जागिरीचा–लाऊन देतां येईल. आमचे म्ह (ण) णें कीं:— सेवालें हा महाल उमरखेडालगता. तो ऐवजीं लाऊन द्यावा, ऐसें बोलणें. त्याजवर हिसेब येऊन ठराव व्हावा तो कांहींच जाला नाहीं. खंदारकराबाबत ऐवजाचा फडऱ्या करून द्यावा. सेवालें नांदापुर आमचे ऐवजी माहाल. हें हमेषा मध्यस्तासीं बोलण्यांत येतच आहे याचें विस्मरण कसें होईल ? येहतषामजंगास जागीर होण्याचे पूर्वी मध्यस्तासी बोलणें जालें. यांचे म्ह (ण) णें कीं:—तुमचे सरकारचा ऐवज बाकी काय ? याचा हिशेब

आणावया. सेंवाले नांदापुराचाच आग्रह काय आहे. वाजवी बाकी निघेल त्याचा फडच्या तेजसिंगाकडून करउन देउं; आगर नांदापुर लाउन देणें जाल्यास तसें घडेल. हिसेब यावा. ऐवज तादाप काय राहिला ? हें मुख्य यांचे बोलण्यांतील रहस्य. त्यास, हालीं तुम्हीं लिहों कीं हिसेबही मागाहून पाठवितों. फार उत्तम आहे. हिसेब पाठउन द्यावे म्हणजे मध्यस्तासीं बोलण्यांत येईल. मध्यस्ताचे म्ह (ण) णेंः— सेंवाले नांदापुर हे सरकारांतच आहेत. जंगांसीं दिल्हे म्हणोन कोठें गेलें नाहींत, तुम्हांस आपले फडच्याची गरज, तालुक्यासी काय कारण ? ऐसें म्ह (ण) णें. यास विचार पाहतां माहाल आपले सरकारांत लाउन देणें ते समई जंगाकडून देवण्यास काय उशीर आहे ? येहतपामजंग घराउ पुसों लागले ते समई नांदापुर घेऊं नका ऐसे त्यास म्हणावें कीं नाहीं ? ऐसा लेख. त्यास, आह्मीं जंगास म्हणावें, यार्णी महाल ठाकावा, मध्यस्तांनीं त्यास विचारावें, तेव्हां आम्हीं सांगितलें हें बोलणें प्राप्त, इत्यादिक लांबचे लांब बखेडा पडतों. आणि जंगास तुम्हीं माहाल हा नका घेऊं म्हंटल्यांत फळही नाहीं. हें बोलणें मध्यस्तासीं त्यांज कडूनच होणें तें व्हावें. याचें त्यांसी हमेषा बोलणें होतच आहे. हिसेब आणवावा ऐसें म्हणतात त्यास हिसेब पाठवावा. त्याप्रा॥ बोलतां येईल. रा॥ छ २९ मोहरम हे विनंति.

श्री.

भाद्रपद शु. १ शुक्रवार शके १७१५.

विनंति. उपरि- मौजे वाघोली प॥ धारूर हा गांव गणपतराव माधव यांजकडे. हालीं राजे तेजवंत यांस जागीर जाला. त्यांजकडून राये रघुनाथ चंद आले. त्यांणीं ठाण्यास उपद्रव दिल्हा. आणि यास लिहों कीं:— ठाणें खालीं करून देणें, व्यर्थ खर्चाखालीं न येणें. याचा हुजूर जलसा होऊन राजश्री गोविंदराव कृष्ण यांणीं साफ सांगितलें कीं:— तुम्हीं आपलें

ठाणें सुखरूप घेणें. या प्र॥ लक्ष्मीचंद याणीं पत्र लिहिलें त्याची नकल पा॥, त्यावरून ध्यानास येईल. हा मजकूर आनंदराव गणपतराव याजकडील. कोणीं श्रीमंत राजश्री नानास जवाब साफ लिहितो कीं येक दाम न देणें. त्याजवरून आह्मीं सखो जिवाजी यांचे नांवें पत्र लिहून दिल्हें कीं:—तुमचे खर्चाविसींचा मा॥र फखरुद्दौला यांचें लि॥ वरून मध्यस्तांनीं आह्मांस सांगितला. त्यास, तुह्मांस खर्चाची जरूर असल्यास जगधन यांचे दुकानींहून वीस हजार रु॥ खर्चास घ्यावे. त्याचे दुकानावर चिठी दोन लक्ष वीस हजार सातसें नवद रु॥ पंधरा आणे याची जाली, ती पुण्यास रवाना केली आहे. परभारें तुह्मांकडे येईल. त्या ऐवजांत सदरहू वीस हजार घ्याल ते मुजरा द्यावे ह्मणोन पत्र लिहून जगधन याचे दुकानीं मध्यस्ताचे सांगितल्यावरून दिल्हे आहे. याचा इतला तुह्मास आसावा ह्मणोन लिहों आहे. रा॥ छा॥ २९ मोहरम. हे विनंति.

श्री.

भाद्रपद शु. १ शुक्रवार शके १७१५.

विनंति. उपरि. उमरखेड बाबत पा॥ वसमत येथें चाळसा हजाराची तनखा मध्यस्तांनीं देविली. त्यापैकीं वीस हजाराची पावती तुह्मीं दिल्ही. त्यास त्या पावतींत चाळीस हजारपैकीं पैसा उधार मात्र नसावा.; ह्मणोन राजश्री नाना यांचें पत्रीं आज्ञा व सदरहूआन्वयें तपसिलें तुह्मींही लिहिलें. त्यास चाळीस हजाराचा उच्चार रसीदेंत न येतां पा॥ उमरखेडचे ऐवजीं वीस हजार दिल्हे ते पाहले या प्रो पहिल्यानें आह्मीं रसीद वसमतकरास द्यावलागलों, परंतु सदरहूप्रो रसीद घेईतात. त्यांचे ह्म (ण) णें कीं:— चाळीस हजाराची तनखा जाली त्यापक्षीं चाळिस हजारापौ वीस हजार दिल्हे. ऐसा उध्धार रसीदींत आणोन रसीद द्याल तर घेऊं. याप्रों मोठा पेंच पडला. तेव्हां आपला दस्तऐवज न गुंते, आणि वसमतकराची

समजूत निघे आशा तऱ्हेची रसीद दिल्ही कीः-- प॥ उमरखेड या महाला-पासोन शाहभिर्जानें ऐवज घेतला तो नवाबाचे सरकारांतून येणें त्या ऐवजीं वस-मतेवर चाळीस हजाराची तनखा दिल्ही त्यापैकीं वीस हजार पावले. याप्रा' रसीदींत लेख. तेव्हां शाहभिर्जानें उमरखेडचा ऐवज घेतला तो नवाबाकडू येणें त्या ऐवजीं चाळीस हजाराची तनखा ऐसें लिहिण्यांत, त्या अर्थी चाळीस हजारावर ठराव जाला ऐसा आर्थ कांहीं सरसीदींत परिच्छिन्न निघत नाहीं. त्या ऐवजीं ऐसा शब्द, येणें करून जो शाहभिर्जानें नेला नसेल त्या ऐवजीं याप्र॥ स्पष्टार्थ आहे. वसमतकराची तर समजूत चाळीस ह[illegible] तनखा-पैकीं वीस पावले हें लिहिल्यावरून जाली. आणि आपला तर चाळसावरच ठराव जाला, ऐसें नाहीं. पुढें बोलण्यास, जाबसालास जागा राखूनच रसीद सदरहू प्र॥ देण्यांत आली. तुह्मास सविस्तर समजावें सबब लिहिलें. अं नानास सांगितलें. नानांनीं मला आज्ञा केली कीः-ठाणें तुम्हीं घेणें ऐ गोविंदराव कसें बो (ल) ले ? मीं जाब दिल्हा कीः- असी गोष्ट कर. घडेल ? हीं अक्षरें त्यांचे मुखावाटे निघणारच नाहींत. लक्ष्मीचंदानें आप साधनाकरितां लाऊन लिों आहे. परंतु यांजकडोन असें घडणार नाहीं याप्र॥ जालें, कचें समजावे म्हणोन विनंति लि॥. मध्यस्तांसीं बोलोन गांवास उपसर्ग न होये असें घडावें. तेजवंत यांसही सांगावेः-हें काम जाबसाली यास लडाई व मोर्चे कारण नाहीं. वाजबी जाबसालानें ठरेल तसें येका चिठी वर होण्याचें काम ! सध्यां उपसर्ग गांवास न लागे, असें मध्यस्तांसीं बोलोन करावें, म्हणोन लिों. त्यास, मौजे वाघोली हा गांव तेजवंत यांस जागी जाल्या नंतर त्यांणीं आपल्याकडोन आनंदराव केशव वकील यांस आम्ह-कडे पाठविलें कीः- हा गांव आम्हाकडे जागीर जाला नाहीं. आपण आपले पत्र द्यावें. ते समई आह्मीं यास उत्तर साफ दिलें कीः-हा गांव सरकारचा याचें नांव तुम्हीं न द्यावें, कदाचित गांवास उपसर्ग कराल तर परि[illegible] लागणार नाहीं, आम्हांसही मध्यस्तांसीं बोलावें लागेल हें कामें जा

291